रशियन कथा

भाग १

'रशियन कथा' वाचकांना रशियन साहित्यात फार पूर्वीच रूढ झालेल्या कथा पठडीतील सर्वोत्तम कथांची ओळख घडवील. आशयघन मितभाषीपणा असणाऱ्या आणि मानवी व्यक्तिरेखांच्या विविध नमुन्यांना दाखविणाऱ्या ह्या साहित्य-प्रकाराला १९ व्या आणि २०व्या शतकांमधील जवळजवळ सर्व रशियन लेखकांनी हाताळले. आधुनिक सोविएत साहित्यातही कथेला मानाचे स्थान आहे.

रशियन साहित्याचे मानदंड मानल्या गेलेल्या १९ व्या शतकातील लेखकांच्या कथांच्या 'संग्रहा'च्या पहिल्या खंडात समावेश आहे: नि. करामझिन, अ. पूष्कीन, नि. गोगोल, अ. गेर्त्सेन, इ. तुर्गेनेव, मि. साल्तीकोव-श्चेद्रिन, वि. गार्शिन, व. कोरोलेन्को, ल्ये.तल्स्तोय, आ. चेखोव, अ. कूप्रिन, मा. गोर्की.

रशियन साहित्याचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी व आम वाचकांसाठी प्रस्तुत संग्रह तयार केला आहे.

ISBN 5-05-001323-4
ISBN 5-05-001322-4

मानवी दैवांची चित्रविचित्र मालिका... तरुणीचे हरण करणारा तेजस्वी ऑफीसर आणि स्वतःच्या वादळी तारुण्याच्या आठवणी करणारी म्हातारी... अचानक "निर्जन बेटावर" टपकलेले जनरल व शहरभर भटकणारे नाक... जंगलातील गूढ चेटकीण आणि नाजुक विद्यार्थिनी... सत्य आणि अद्भुत, वास्तव आणि काल्पनिक, सखोल मनोविश्लेषण आणि मजेदार विनोद – ह्या सर्व गोष्टी तुम्हाला रशियन अभिजात कथेत सापडतील. रशियन अभिजात साहित्यात जेवढ्या विविध शैली, व्यक्तिरेखा आणि जेवढे प्रकार आहेत, तेवढे जगातील दुसऱ्या कोणत्याही साहित्यात नाहीत.

"पाश्चात्य साहित्यात यापूर्वी कधीही न घडलेले असे अत्यंत सूक्ष्म राजकीय व सामाजिक जीवनातील बदलांचे प्रतिबिंब रशियन साहित्याने दाखविले."

ए. सीमन्स,
अमेरिकन टीकाकार

"...रशियन लेखक अत्यंत सहजपणे अफाट कल्पनाविलास रंगवितात. त्यामुळे श्वास रोधला जातो. हे तुकडे आश्चर्यजनक आहेत. वाचकाने स्वतःला सावरण्याच्या आतच त्याला ते काबीज करतात."

डे. डेव्हिस,
इंग्रज टीकाकार

"रशियन साहित्याला विशेष सौंदर्य लाभले आहे: साध्या गोष्टींना ते सुरेखपणे सादर करू शकते... तुर्गेनेवच्या अप्रतिम कलाकृती अवघ्या काही पानांमध्ये सामावल्या आहेत; त्यांचे सर्वोत्तम लेखन आकाराने अत्यंत लहान आहे."

हेन्री जेम्स,
इंग्रज लेखक

रशियन कथा

भाग १

रादुगा प्रकाशन · मॉस्को

लोकवाङ्मय गृह प्रा. लि. मुंबई

अनुवाद : अनिल हवालदार
सजावट : वा. कोइलोव
चित्रे : से. सेम्योनोव

АНТОЛОГИЯ РУССКОГО РАССКАЗА

В 2-х томах. Том I

На языке маратхи

Anthology of Russian Short Stories
In 2 vols. Vol. I. Classics of Russian Literature
in Marathi

© लेखकांबद्दलची माहिती, प्रस्तावना,
मराठी अनुवाद, रादुगा प्रकाशन, १९८७
सोविएत संघात मुद्रित

ISBN 5-05-001322-4
ISBN 5-05-001323-2

अनुक्रमणिका

रशियन कथेची दोन शतके 5

निकोलाय करामझिन : बिचारी लीझा 17

अलेक्सान्द्र पूश्कीन : टप्पा-स्थानकाचा व्यवस्थापक 39

निकोलाय गोगोल : नाक . . 57

अलेक्सान्द्र गेर्त्सेन : चोरटी मैना . . . 91

इवान तुर्गेनेव : गायक 123

मिखायल साल्तीकोव-श्चेद्रिन : एका शेतकऱ्याने दोन जनरलना कसे खाऊ घातले त्याची गोष्ट 147

व्लादीमिर कोरोलेन्को : जगावेगळी . 159

ल्येव तल्स्तोय : बॉलनृत्यानंतर . 185

व्सेवोलोद गार्शिन : लाल फूल . . 201

आन्तोन चेखोव : कारकुनाचा मृत्यू . . . 223

अलेक्सान्द्र कूप्रिन : आलेस्या . . 229

इवान बूनिन : हलका निःश्वास 323

मा‍क्सिम गोर्की : म्हातारी इझेरगिल 333

रशियन कथेची दोन शतके

कथा हा वाङ्मयप्रकार जगातील सर्व साहित्यांमध्ये उत्तम ज्ञात आहे आणि त्याचा विस्तृत प्रसार झाला आहे. प्रत्येक देशात त्याचा आपापल्या परीने विकास घडलाय.

रशियन कथेचा इतिहास रशियामधील सामाजिक-राजकीय व साहित्यिक चळवळींशी निकटपणे निगडित आहे. १८ व्या शतकाच्या अखेरीस उदयाला आलेल्या रशियन कथेला आरंभी फार अवघड वाटचाल करावी लागली आणि एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून प्रस्थापित व्हायला तिला फार काळ लागला. प्रदीर्घ काळपर्यंत लघुकादंबरिका, विनोद, चुटका, परीकथा अशा "किरकोळ गद्यां" मध्ये तिला "मिसळून" रहावे लागले. "कथा" हा शब्दप्रयोग १९ व्या शतकाच्या तिसऱ्या दशकाच्या उत्तरार्धात रूढ झाला. तरीसुद्धा, त्यानंतर आणखी दोन दशकांपर्यंत सर्व छोट्या गद्यप्रकारांना लघुकादंबरिका अगर कहाणी म्हणूनच संबोधण्यात येत होते. गेल्या शतकाच्या पाचव्या दशकाच्या अखेरीस सरतेशेवटी कथा एक स्वतंत्र साहित्यप्रकार म्हणून प्रस्थापित झाली, तरीही, लघुकादंबरिका आणि कथा यांच्यातील भेदरेषा अनिर्णित व प्रवाही राहिली. म्हणून अनेक लेखक स्वतःच्या छोट्या लेखनांना कधी कहाणी, तर कधी कथा असे म्हणत ह्यात काही नवल नाही.

संक्षेप, विषयाची बहुव्यापकता, कलात्मक तपशीलाचे निवेदन, आग आंतरिक ताल आणि सखोल आशय – रशियन कथेची ही ठळक वैशिष्ट्ये आहेत. सोविएत कवी अ. त्वार्दोवस्की यांना कथेच्या कलात्मक रचनेवर सूक्ष्म भाष्ये करताना आढळले होते की, "तिच्यात मुक्त आणि असाधारण बहुव्यापक रचना असते, नेमक्या वर्णित विषयाशी चिकटून

राहण्याचे टाळते, जीवनातील घटनेच्या अथवा व्यक्तीच्या कलावंताने केले-ल्या निरीक्षणातून जणू थेटपणे उमटते आणि उपस्थित केलेल्या प्रश्नाची अथवा समस्येची उकल करून पूर्णविराम देणारा "बंद" शेवट अनेकदा तिच्यात नसतो."*

१९ व्या शतकातील रशियन साहित्यात आणि त्यानंतरच्या का-ळातही, कथेचा विकास सातत्यशील नव्हता. काही असे कालखंड होते जेव्हा इतर साहित्यप्रकारांनी कथेला अंधारात लोटले होते, तर काही कालखंडात कथेने इतर साहित्यप्रकारांवर वर्चस्व गाजविले होते. ह्याचा खुलासा स्पष्ट आहे. प्रत्येक युगात केवळ नव्या कल्पनाच जन्माला आल्या नाहीत, तर त्या कल्पना अवगुंठित करणारे नवे प्रकारही जन्माला आले. रशियन टीकाकार-देमोक्रात वि. बेलीन्स्की यांनी नमूद केले होते की, "जर काळाचे विचार असतील, तर काळाचे प्रकारही असतात."** कथा हा असाच काहीवेळा "काळाचा प्रकार" होता. जेव्हा राजकीय, तत्त्वज्ञानविषयक, सौंदर्यशास्त्रीय, कायदेविषयक इत्यादी अत्यंत तातडीच्या सामाजिक समस्यांना सोडविणे आवश्यक ठरले होते, अशा समाजाच्या आत्मिक शोधांच्या व जाणीवेमधील स्थित्यंतरांच्या कालखंडांमध्ये कथा हा वाङमयप्रकार अत्यंत लोकप्रिय ठरला होता.

रशियात कथेचा उदय आणि विकास अपूर्व परिस्थितीत घडले. वस्तुस्थिती अशी होती की, जवळ जवळ संपूर्ण १९ व्या शतकात रशियन साहित्य हा प्रगत सामाजिक जाणीवेच्या राजकीय कार्याची अभिव्यक्ती घडविणारा एकमेव प्रकार होता. म्हणूनच नि. चेर्नीशेवस्कींनी लिहिले होते: "...आमच्या बौद्धिक विकासात ते (साहित्य – नि. याकूशिन) फ्रेंच, जर्मन अथवा इंग्लिश साहित्याने त्या लोकांच्या बौद्धिक जीवनात बजावलेल्या कामगिरीपेक्षा अधिक महत्त्वाची भूमिका बजाविते व इतर कोणत्याही साहित्यापेक्षा जास्त जबाबदाऱ्या उचलते. तूर्तास साहित्य

---

* अ. त्वार्दोवस्की, बूनिन यांच्याविषयी; इ. अ. बूनिन, संकलित संग्रह, ९ खंडांमध्ये, खंड १, मॉस्को, १९६५, पान ३३.

** वि. बेलीन्स्की, संपूर्ण संकलित संग्रह, मॉस्को, १९५३, खंड १, पान २७६.

हेच आमच्या लोकांचे संपूर्ण बौद्धिक जीवन आहे आणि म्हणून, इतर देशांमध्ये आता बौद्धिक कार्याच्या इतर प्रवृत्तींच्या नियंत्रणाखाली असलेल्या गोष्टींची त्याने काळजी वाहणे त्याचे कर्तव्य आहे."*

कथेची घडण ज्या काळात सुरू झाली त्याचवेळी, १८ व्या शतकाच्या अखेरी, निकोलाय करामझिन यांच्या पहिल्या भावनाप्रधान कहाण्या प्रकाशित झाल्या. माणसाच्या आंतरिक जगाबाबत त्यांच्यामधून प्रथमच आस्था प्रकट झाली होती, संवेदनेचा संप्रदाय घोषित झाला होता.

करामझिन यांची 'बिचारी लीझा' ही कहाणी एकूण रशियन गद्याच्या विकासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरली. आकाराने फारशी मोठी नसलेली, व्यवस्थितपणे विषयाची मांडणी केलेली, "संवेदनाक्षम" नायकाच्या तोंडून सांगितलेली ही कथा प्रदीर्घ काळपर्यंत कथेचा एक आदर्श नमुना मानली जात होती.

छोटया गद्यप्रकारांना १९ व्या शतकाच्या तिसऱ्या दशकात व चौथ्या दशकाच्या आरंभी फुलवा आला. तेव्हा साहित्यात रोमांचवादी प्रवृत्तीचे वर्चस्व प्रस्थापित होऊ लागले होते.

पश्चिम युरोपीय कथा लेखनाच्या यश:सिद्धींचा फायदा घेऊन रशियन रोमांचवाद्यांनी स्वत:ची वाट काढण्याचे प्रयत्न केले. उदाहरणार्थ, पश्चिमी रोमांचवादी साहित्याची वैशिष्टये असलेल्या व्यक्तिवादी आणि गूढवादी विषयांचा व्यापक विस्तार त्यांनी केला नाही, कारण ते त्यांना परके होते. आत्मिकदृष्टया विमुक्त झालेल्या माणसाचे चित्रण करण्यावर रशियन रोमांचवाद्यांनी लक्ष एकवटले. रशियन रोमांचवाद्यांच्या लेखनांमधील भावनावेगी उदात्त नायक जीवनातील स्वत:चे स्थान समजून घेण्याला व स्वतंत्रपणे विचार आणि वर्तन करण्याचा हक्क प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो.

१८३० नंतरच्या काळात "छोटया गद्याच्या" रोमांचवादी उदाहरणांबरोबरच महान रशियन कवी अ. पूष्कीन यांच्या पहिल्या वास्तववादी

* नि. चेर्नीशेवस्की, संपूर्ण संकलित संग्रह, खंड ३, मॉस्को, १९४७, पान ३०३.

कथा 'बेल्कीनच्या कथा' नामक संग्रहामार्फत प्रसिद्ध झाल्या. रशियन अस्सल राष्ट्रीय वृत्ती त्यांच्यात काठोकाठ भरली होती.

पूष्कीन यांची गद्याबाबत स्वत:ची वेगळी संकल्पना होती. १८२२ मध्ये, 'बेल्कीनच्या कथा' प्रकाशित होण्यापूर्वी जवळजवळ दहा वर्षे आधी, त्यांनी लिहिले होते: "अचूकपणा आणि आटोपशीरपणा – गद्याचे सर्वप्रथम गुण आहेत. ते विचारांची आणि आणखी विचारांची मागणी करते – त्यांच्याविना तेजस्वी अभिव्यक्ती विफल ठरतात."* ह्या तत्त्वांची त्या महान लेखकाने स्वत:च्या सृजनशील सरावात सातत्याने अंमलबजावणी केली.

पूष्कीन आणि गोगोल यांनी केवळ वैयक्तिक समस्या सोडविण्याच्या इच्छेने नव्हे, तर एकूण रशियन जीवनाच्या समस्या सोडविण्याच्या प्रबळ हेतूने पहिली वास्तववादी "छोटी गद्ये" निर्माण केली. त्यातून पुढे कथांच्या संपूर्ण मालिका तयार झाल्या. त्यांच्यातून वास्तवतेच्या सर्व पैलूंना आणि गुंतागुंतींना वाचकांसमोर मांडण्यात आले. पूष्कीन यांच्या 'बेल्कीनच्या कथा', गोगोल यांच्या 'पीटरबुर्गच्या' कथा, लेर्मोन्तोव यांच्या 'आपल्या काळाचा नायक' ही ठळक उदाहरणे होत. इतर रशियन लेखकांनी अशाच प्रकारच्या कथा-मालिकांचा अवलंब केला (उदाहरणार्थ, तुर्गेनेव यांची 'शिकाऱ्याची रेखाचित्रे,' दस्तोयेवस्कींच्या 'स्वप्नाळूंच्या' कथा).

विविध सामाजिक स्तरांच्या आणि वर्गांच्या प्रतिनिधींच्या जीवनांमध्ये १८४० नंतरच्या काळात दिसून आलेले स्वारस्य, लोकांच्या प्रत्यक्ष जीवनपरिस्थितीबद्दल, नैतिक गरजांबद्दल, आत्मिक आकांक्षांबद्दल माहिती करून घेण्याची इच्छा, ह्यांच्या परिणामी रशियन साहित्यात अनेक "इंद्रियविज्ञानशास्त्रीय" निबंध अवतरले. सुविहित विषय आणि डौलदार कथा ह्यांचे वर्चस्व संपले व ह्या अथवा त्या सामाजिक प्रकाराच्या वैशिष्ट्यांना दाखविण्याकडे सारे अवधान एकवटले.

"इंद्रियविज्ञानशास्त्रीय" साहित्याच्या यश:सिद्धींचा फायदा उचलत

---

*अ. से. पूष्कीन, संपूर्ण संकलित संग्रह, खंड ७, मॉस्को-लेनिनग्राद, १९५१, पाने १५-१६.

असताना तुर्गेनेव यांनी त्यांच्या सुप्रसिद्ध 'शिकाऱ्याची रेखाचित्रे' मध्ये नव्या प्रकारची कथा निर्माण केली. तिच्यात सर्वप्रथम प्राधान्य घरगुती प्रसंगांच्या तपशीलवार वर्णनांना देण्यात आले होते, पात्रांची विस्तृत मानसशास्त्रीय आणि व्यक्तिमत्वाची वर्णने केली होती, व्यापक व अत्यंत काव्यात्मक निसर्गवर्णने केली होती. पण 'शिकाऱ्याची रेखाचित्रे' मधील सर्वांत महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे त्या काळात रशियात राहणाऱ्या सर्वांत मोठ्या वर्गाच्या, गुलाम बनलेल्या पण न मोडलेल्या रशियन शेतकरीवर्गाच्या जीवनाचे अधिक आकलन व त्याच्या बलाढ्य आत्मिक शक्तींचे घडविलेले दर्शन.

१८५० नंतरच्या काळात रशियन साहित्यात माणसाच्या आंतरिक जीवनाबाबत, अत्यंत सूक्ष्म मानसशास्त्रीय अनुभवांचे चित्रण करण्याबाबत, अथवा सुप्रसिद्ध रशियन लेखक-देमोक्रात चेर्नीशेवस्की यांच्या भाषेत सांगायचे तर, "आत्म्याच्या विरोधविकासाबद्दल" अधिक स्वारस्य वाढल्याचे आढळले. तुर्गेनेव आणि ल्येव तल्स्तोय यांच्या कहाण्यांमध्ये व कथांमध्ये ही प्रवृत्ती ठळक दिसून आली. इथून रस्ता थेट सामाजिक-मानसशास्त्रीय कादंबरीच्या निर्मितीकडे गेला. हा नवा साहित्यप्रकार १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात सर्वांत प्रमुख बनला.

१८६१ साली रशियात भूदास पद्धती नष्ट करण्यात आली. लक्षावधी शेतकरी शतकानुशतकांच्या गुलामीच्या जोखडामधून मुक्त झाले. ह्या परिणामी देशात भांडवली संबंधांची वाढ झाली, सामाजिक जाणीव वाढली. त्या परिस्थितीत छोटे गद्य-प्रकार पुन्हा आघाडीवर आले.

झारशाहीविरोधी क्रांतिकारक-नरोदनिकांच्या कारवाया दडपून टाकण्यात आल्याच्या परिणामी व नरोदनिकांच्या वैचारिक सिद्धांतांवरील लोकांचा विश्वास ढासळल्याच्या परिणामी गेल्या शतकाच्या नवव्या व अखेरच्या दशकांमध्ये रशियात सामाजिक जाणीवेत आणि सामाजिक वातावरणात जे बदल घडले, त्यांच्यानंतर अनेक लेखकांच्या साहित्यात व्यक्तीच्या आत्मिक व तत्त्वज्ञानविषयक शोधांना अधिक प्राधान्य लाभले, सार्वत्रिक मानवी सुखाचा आणि सुमेळाचा शोध घेण्याचा प्रयत्न आढळला. मोठ्या खंडःप्राय ग्रंथांमध्ये आणि "छोटया गद्यांमध्ये" ह्या समस्यांची उकल शोधण्याचा सारखाच प्रयत्न झाला.

नव्या समस्यांमधून नव्या प्रकारच्या कथा जन्माला आल्या: कबुलीजबाब देणाऱ्या, त्याचप्रमाणे भूतकालीन परंपरांच्या. त्या काळात "लोकांसाठी लिहिलेल्या कथांना" साहित्यात महत्त्वाचे स्थान लाभले. ज्ञानाची आणि संस्कृतीची नुकतीच ओळख करून घेणाऱ्या सर्वसामान्य जनांसाठी मुद्दाम अशा कथा लिहिण्यात येत होत्या. ह्या कथालेखनात ल्येव तल्स्तोय, निकोलाय लेस्कोव व इतर लेखक विशेष क्रियाशील होते.

१९ व्या आणि २० व्या शतकांच्या स्थित्यंतरकाळात, रशियात व इतर अनेक देशांमध्ये कथा प्रमुख गद्यप्रकार बनली. आत्यंतिक भ्रमनिरासाचा आणि जुन्या परंपरांच्या ऱ्हासाचा हा कालखंड होता. सामाजिक उद्रेकांच्या भावी आगमनांची चाहूल तेव्हा लागत होती आणि सामाजिक अस्तित्वाच्या नव्या प्रकारांचा शोध घेतला जात होता. चेखोव त्या काळातील सर्वांत ठळक आणि गुणी कथालेखक होते. रशियातील जीवनाचे आणि रशियातील सर्व सामाजिक स्तरांच्या व गटांच्या प्रतिनिधींच्या जीवनाचे संपूर्ण चित्र अत्यंत खरेपणाच्या आभासाने आणि प्राविण्याने त्यांच्या कथांमधून व कहाण्यांमधून सादर करण्यास ते समर्थ होते. अत्यंत आश्चर्यकारक विविध व्यक्तिरेखा त्यांनी रंगविल्या: त्यांच्या "झुरळांच्या कोपऱ्यां"मधील क्षुद्रप्रवृत्तींपासून ते उदात्त आदर्शांच्या विजयामध्ये श्रद्धा बाळगणाऱ्या विशुद्ध, उन्मादी, भाबड्या स्वप्नाळूपर्यंत.

चेखोव यांच्या गद्याच्या परंपरा बूनिन यांनी पुढे चालविल्या आणि आजच्या काळात त्यांच्या यशःसिद्धींचा फायदा विस्तृत प्रमाणात विक्तर अस्ताफ्येव, वासिली ब्येलोव, यूरी कझाकोव, गीओर्गी सेम्योनोव व इतर लेखकांनी घेतला आणि अद्यापही घेत आहेत.

२० व्या शतकाच्या आरंभी केवळ सामाजिक उद्रेक आणि संघर्षच घडले नाहीत, तर अभिजात वास्तववादाच्या विशिष्ट तत्त्वांचा आढावा घेण्याचेही प्रयत्न झाले. कथेचे पूर्वीचे अचूकपण आणि रचनास्थैर्य काहीसे अंधुक बनले. रशियन साहित्यात वास्तववादी कथेबरोबरच आधुनिक प्रवृत्तींची ठळकपणे अभिव्यक्ती करणाऱ्या साहित्यकृतीही उदयाला आल्या (फ्योदोर सोलोगूब, अलेक्सेय रेमीझोव यांच्या साहित्यात आणि काही अंशी लेओनिद आंद्रेयेव यांच्या लेखनात). त्याउलट, वास्तववादी कथा नूतनीकरणाचा कल दाखवू लागली.

उभय शतकांच्या स्थित्यंतरकाळात लोकशाहीवादाकडे कल झुकलेल्या लेखकांमध्ये माक्सिम गोर्की निःसंशयरीत्या ठळकपणे उठून दिसले. त्या गुंतागुंतीच्या काळाचे त्यांच्या लेखनात संपूर्ण प्रतिबिंब उमटले होते. रशियन अभिजात कथेच्या परंपरा वापरून, सर्वप्रथम १९ व्या शतकातील ७ व्या आणि ८ व्या दशकांमधील लेखक-देमोक्रातांच्या परंपरा वापरून, त्याचप्रमाणे स्वतःच्या संपन्न जीवनानुभवांना वापरून, गोर्कींनी वास्तवाच्या सामाजिक विसंगतींना अधिक सखोलपणे उघड केले, तत्कालीन प्रसंगांकडे नव्या रीतीने पाहिले आणि त्यांच्या अनेक समकालीनांना जे दिसले नव्हते, ते त्यांना दिसू शकले—कामगारवर्गाची जागृत होणारी जाणीव आणि सामाजिक-राजकीय चळवळीत वाढणारा त्याचा प्रभाव.

गोर्कींच्या कथांमध्ये वैयक्तिक गुंतवणुकीची खास उबदार भावना आहे. आत्मचरित्रपर प्रवृत्ती लाभलेला त्यांचा नायक त्याच्या भोवतालच्या घडामोडींसंबंधी संवेदनक्षमतेने प्रतिक्रिया व्यक्त तर करतोच, पण त्या घडामोडींमध्ये प्रवेश करण्याचा, काहीतरी करण्याचा, बदल घडविण्याचा, प्रयत्न करतो. गोर्कींच्या नायकाचा सक्रिय दृष्टिकोन काही अंशी खुद्द लेखकाच्या उद्दिष्टांचे व आकांक्षांचे प्रतिबिंब घडवत होता.

विसाव्या शतकाच्या आरंभी गोर्कींच्या गुणाचा हितकर प्रभाव वेरेसायेव, कूप्रिन, सेराफीमोविच आणि इतर अनेक कथालेखकांवर पडला होता. त्या महान कामगारवर्गीय लेखकाचे साहित्य, इतर सर्व गोष्टी वगळता, अभिजात रशियन आणि सोविएत साहित्याला जोडणारा दुवा आहे. आरंभीच्या सोविएत गद्याच्या घडणीला आणि विकासाला गोर्कींचे लेखन पाया म्हणून उपयोगी पडले.

महान ऑक्टोबर समाजसत्तावादी क्रांतीने अखिल मानवजातीच्या आत्मिक विकासाला नवे वळण दिले. लेनिन यांच्या शब्दात तिचे मुख्य महत्त्व म्हणजे तिने "कामकरी जनतेला नवजीवनाच्या स्वतंत्र निर्मितीच्या मार्गाला"* लावले. नव्या जीवनाची ही निर्मिती अवघड, काहीशा नाट्यमय शोधांच्या वाटेने गेली. नवजात सोविएत साहित्याने घडामोडींचा कलात्मक अर्थ लावण्यात प्रचंड कामगिरी बजावली.

* व्ला. इ. लेनिन, संपूर्ण संकलित संग्रह, खंड ३५, पान १९९.

घडामोडींची संपूर्ण गुंतागुंत समजून घेण्याचे आणि त्यांच्यात प्रत्यक्ष भाग घेणाऱ्या माणसांच्या व्यक्तिरेखा नमूद करण्याचे पहिले प्रयत्न छोटया गद्य-प्रकारांमध्ये झाले. क्रांतिपूर्व काळात ज्यांच्या लेखनाची वाटचाल सुरू झाली होती (अलेक्सांद्र सेराफीमोविच, अलेक्सेय तल्स्तोय, बरीस पील्न्याक आणि इतर) असे लेखकच केवळ कथेकडे वळले नव्हते, तर प्रत्यक्ष क्रांतीमध्ये नुकताच भाग घेतलेल्या नव्या लेखकांनीही कथेचा अवलंब केला होता. घनघोर झुंजींमध्ये मिळालेला स्वतःचा अनुभव त्यांनी साहित्यात आणला (अलेक्सांद्र फदेयेव, व्सेवोलोद इवानोव, इसाक बाबेल, अलेक्सांद्र मालीश्किन आणि इतर).

चालू शतकाच्या तिसऱ्या दशकात लिहिल्या गेलेल्या कथा रचनेच्या आणि एकूण वृत्तीच्या दृष्टीने विलक्षण विविध होत्या. जबरदस्त कथानक असलेल्या गोष्टींच्या जोडीने महाकाव्याच्या शैलीत लिहिलेल्या कथाही होत्या. आशावादाने भरलेल्या कथांबरोबर अस्सल शोककथाही निर्माण झाल्या. जुने जग कोलमडून पडल्यामुळे खुद्द जीवनच एवढ्या जबरदस्त संघर्षांनी भरलेले होते की, तेच भरपूर परस्परविरोधी मसाला पुरवीत होते आणि एकाच पद्धतीच्या लेखनाद्वारे त्याची अभिव्यक्ती करणे शक्य नव्हते. पण मुख्य म्हणजे, प्रसंगांची आणि पात्रांची चित्रणे करताना सगळे लेखक नवजीवनाच्या विजयावरील सखोल श्रद्धेने एकवटले होते.

स्वतःचा जीवनविषयक दृष्टिकोन व्यक्त करण्यासाठी तरुण सोविएत लेखक चिकाटीने नवनवे प्रकार अवलंबत होते. त्या परिणामी कथेचे नवे प्रकार अस्तित्वात आले. त्यांच्यात बाबेल यांच्या रंगीबेरंगी, किंचित मिस्कील कथा होत्या, अलेक्सान्द्र ग्रिन यांच्या अद्भुतकथा होत्या, मिखायल प्रीश्विन यांची मानवी जीवन आणि निसर्ग यांच्याविषयीची काव्यात्म चिंतने होती, मिखायल बूल्गाकोव यांची नाटचमय कथने होती. काही काळानंतर यूरी ओलेशा आणि मिखायल झोश्चेन्को ह्यांचे तिखट उपहासात्मक लेखन अवतरले.

अनेक सोविएत लेखकांनी खंड-साहित्याच्या निर्मितीआधी मधला टप्पा म्हणून कथालेखनाचा वापर केला. तिसऱ्या दशकाच्या अखेरीस पहिल्या सोविएत कादंबऱ्या निर्माण झाल्या. त्यांच्यातील चित्रविचित्र वस्तुस्थितींमधून जीवनाचे सर्वव्यापी चित्र साकार झाले होते.

कथेच्या रचनेत आणि निवेदनपद्धतीत भरपूर बदल घडला. नाट्यमय संघर्षाचे चित्रण करण्याचा लेखकांचा कल कमी झाला. पात्रांच्या स्वभाव-वैशिष्ट्यांचे खोल अवगाहन करणे त्यांना अधिक आवडू लागले. अनेक लेखनांमधून लेखकाचा स्वत:चा आवाज ऐकू येऊ लागला आणि भावात्मकता प्रबळ बनली.

महान पितृभूमीरक्षक युद्धामुळे (१९४१-१९४५) कथेच्या विकासाला नवी चालना मिळाली. त्यावेळी अखिल सोविएत जनता मायभूमीच्या रक्षणार्थ उभी ठाकली होती. देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांमध्ये सोविएत लेखक होते. शोलोखोव, सोबोलेव, सीमोनोव, तीखोनोव, कोझ्नेवनिकोव, प्लातोनोव आणि इतर अनेक लेखक युद्धवार्ताहर म्हणून युद्धआघाड्यांवर गेले. त्यांनी कथा लिहिल्या, त्याचप्रमाणे युद्धवार्ता पाठविल्या, लेख लिहिले. सोविएत लोकांनी युद्धामध्ये गाजविलेले पराक्रम हा अनेक वर्षेपर्यंत सोविएत साहित्यामधील एक मुख्य विषय होता.

युद्धाबद्दल ऐन रणधुमाळीत, प्रत्यक्ष घटनास्थळी कथा लिहिल्या गेल्या (कॉ. सीमोनोव 'तिसरा ॲडज्युटंट,' मि. शोलोखोव 'द्वेषाचे शास्त्र,' नि. तीखोनोव 'निमिषार्ध,' अ. तल्स्तोय 'रशियन स्वभाव'); पहिल्या शांतताकाळातही कथांमध्ये युद्धविषय प्रामुख्याने होता (वोरोबीयेव, कझाकेविच, प्लातोनोव, पलेवोय यांच्या कथा); नंतरच्या काळातही युद्धकथा निर्माण झाल्या (बाक्लानोव, बोन्दारेव, बीकोव, बोगोमोलोव).

तपकिरी प्लेगपासून मानवजातीला वाचविणाऱ्या सोविएत लोकांच्या पराक्रमांबद्दल सोविएत युद्धकथांनी तर सांगितलेच, पण त्याचबरोबर युद्धामधील व्यक्तीच्या शोकांतिक दैवावर भर दिला ('माणसाचे दैव', मि. शोलोखोव), युद्धामुळे होणारी महाभयानक हानी दाखविली ('परतणे' प्लातोनोव, 'दिवसा उजेड आहे का', विक्तर अस्ताफीयेव), युद्धातील अमानुषतेचे, माणसांना त्याने भोगायला लावलेल्या अपार यातनांचे चित्रण केले.

जे स्वत: युद्धआघाडीवर लढले होते आणि ज्यांनी युद्धाचे "समीप" दर्शन घेतले होते, अशा गुणी लेखकांनी कथा खूप समृद्ध बनविली. युद्धामुळे ते अकाली प्रौढ बनले होते. त्या काळात त्यांची पिढी देशाचे

भवितव्य निर्णित करीत होती आणि कदाचित सबंध जगाचेही. बोगोमोलोव, बीकोव, बाक्लानोव असे लेखक त्यांच्यात होते. ज्यांचे बालपण आणि आरंभीचे यौवन अवघड युद्धकाळात सरले अशा लेखकांनीही युद्धकथा हाताळल्या (वासिली ब्येलोव, वासिली शुकशीन).

त्यांच्यापैकी प्रत्येकाने केवळ स्वत:चा जीवनानुभव आणि जीवनविषयक दृष्टिकोन साहित्यात आणला नाही, तर स्वत:ची वैयक्तिक लेखनशैलीही आणली.

युद्धोत्तर सोविएत कथेच्या विकासात जुन्या पिढीच्या लेखकांनीही भरीव कामगिरी बजावली: प्लातोनोव, सीमोनोव, पाऊस्तोवस्की, लीदिन, याशिन आणि इतर.

गेली अडीच दशके कथेचा ऐन भरभराटीचा काळ आहे.

सोविएत कथालेखक कशाबद्दल लिहितात त्याची यादी देणे अवघड आहे, अशक्य आहे. अशी एकही महत्त्वाची समस्या नाही, जी त्यांनी हाताळली नाही. वैज्ञानिक आणि तंत्रशास्त्रीय क्रांतीच्या युगातील मानव आणि निसर्ग यांच्यामधील संबंधांचा विषय त्यांनी हाताळला (अस्ताफ्येव, याशिन, कझाकोव), युद्धामधून पार पडलेल्या पिढीचे आत्मिक अनुभव सांगितले (यूरी नगीबिन, व्लादीमिर बोगोमोलोव, गीओर्गी सेम्योनोव, विक्तर अस्ताफ्येव), रशियन ग्रामीण जीवनातील नव्या समस्यांचा परामर्श घेतला (फ्योदोर अब्रामोव, वासिली ब्येलोव, व्लादीमिर सोलोऊखिन), बुद्धिमंतांच्या आत्मिक शोधांचा मागोवा घेतला (यूरी त्रीफोनोव, यूरी नगीबिन, इरीना ग्रेकोवा), जीवनातील स्वत:चे स्थान निर्णित करण्याची व्यक्तीची चिरंतन धडपड आणि तिची लोकांविषयीची व स्वत:विषयीची जबाबदारी दाखविली (यूरी बोन्दारेव). गेल्या युद्धाचा विषय सोविएत लेखक अजूनही हाताळत आहेत. दुसऱ्या महायुद्धाने आमच्या भूमीवर अपरिमित विध्वंस घडविला, २ कोटी सोविएत माणसे ठार झाली, शेकडो शहरे बेचिराख झाली, हेच केवळ त्याचे कारण नाही. पृथ्वीच्या भवितव्याबाबत चिंता, जगभरच्या लोकांच्या अस्तित्वाबद्दल चिंता – आमच्या माणसांना ही समस्या छळतेय. परिणामी, सोविएत लेखक अखंडपणे युद्धाच्या अमानुषतेला ठळकपणे

दाखवीत आहेत आणि युद्धाची पुनरावृत्ती घडल्यास किती भयंकर परिणाम घडतील ह्याबद्दल लोकांना इशारा देत आहेत.

छोटया गद्याच्या विस्तारामुळे आणि समस्यांच्या वैविध्यामुळे निवेदनाचे नवनवे प्रकार शोधणे आवश्यक बनले. उदाहरणार्थ, सातव्या दशकात कबुलीजबाबात्मक लघुकथा आणि कहाणी लोकप्रिय बनली (लीखोनोसोव, अलेक्सिन); लेखक आणि त्याचा वाचक ह्यांच्यामध्ये मुक्त व गुप्त संवाद निवेदनात्मक निबंधांमधून घडला (सोलोऊखिन); तीव्र भावात्मक कथा निर्माण झाली (यूरी कझाकोव); अद्भुतकथा सांगण्यात आल्या (इवान एफ्रेमोव, आर्कादी आणि बरीस स्त्रूगात्स्की), इ. इ. त्याचवेळी अभिजात रशियन कथा विकसित होत राहिली आणि तिला नवनव्या सूक्ष्मता लाभल्या (अब्रामोव, ब्येलोव, नोसोव, सेम्योनोव).

कथेच्या नव्या प्रकारांचा शोध घेणे चालू आहे.

प्रस्तुत संग्रहात भिन्न साहित्यिक प्रवृत्तींच्या लेखकांनी भिन्न कालखंडांमध्ये लिहिलेल्या कथांचा समावेश आहे. क्रांतिपूर्व रशियाच्या जीवनातील अडचणी व वैविध्यता आणि नवजात सोविएत राज्याच्या ऐतिहासिक विकासातील महत्त्वाचे टप्पे, ह्यांचे त्यांच्यातून दर्शन घडते.

"छोटया गद्यात" सक्रिय काम करणाऱ्या अनेक स्वारस्यपूर्ण लेखकांच्या कथा प्रस्तुत संग्रहात समाविष्ट करणे शक्य झाले नाही. तरीही, वेगवेगळया कालखंडांमध्ये रशियन व सोविएत लेखकांना भिडलेल्या समस्यांना, रशियन साहित्यात घडलेल्या वैविध्यपूर्ण कथांच्या विकासाच्या वाटांना वाचक जाणून घेईल अशी आशा आहे.

निकोलाय याकूशिन

निकोलाय करामज़िन

बिचारी लीज़ा

2 1985

निकोलाय करामझिन (१७६६-१८२६) – रशियन साहित्याच्या "सुवर्ण युगा"चा आरंभ करणारे लेखक. अत्यंत खळबळजनक आणि हादरवून टाकणाऱ्या सामाजिक घडामोडींच्या कालखंडात करामझिन जगले. महान फ्रेंच क्रांतीच्या आरंभीच्या काळात त्यांचे पहिलें लेखन प्रकाशात आले. नेपोलीयनच्या स्वारीच्या वेळी देशभक्तीने पेटून उठलेल्या रशियन जनतेला त्यांनी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिलें होते आणि दलित जनतेच्या हक्कांसाठी १८२५ साली झारविरुद्ध सशस्त्र बंड पुकारणाऱ्या रशियन क्रांतिकारक सरदारांच्या अतुलनीय धैर्याला ते साक्षी होते.

करामझिन अष्टपैलू गुणी माणूस होते आणि त्यांच्या काळातील सुशिक्षितांमध्ये त्यांची गणना होती.

'मॉस्को नियतकालिक' आणि 'युरोप-वार्ता' यांचे प्रकाशक, शेक्सपीयर आणि लेस्सिंग यांच्या साहित्याचे अनुवादक, कवी, गद्यलेखक, टीकाकार व प्रचारक, रशियन भाववादाचे ठळक प्रतिनिधी असलेले करामझिन संशोधक-इतिहासकारही होते. त्यांच्या अनेक खंडांच्या 'रशियन राज्याचा इतिहासा'ने तत्कालीनांच्या ऐतिहासिक विचारांना दिशा दिली व त्याचे संशोधकीय आणि कलात्मक महत्त्व आजही टिकून आहे.

करामझिन यांनी रशियन ललित साहित्यात मानसशास्त्रीय कथांचा प्रकार निर्माण केला.

करामझिन यांच्या कथा, त्याचप्रमाणे 'रशियन प्रवाशाची पत्रे' रशियन वाचकांमध्ये अमाप लोकप्रिय होती. प्रेमाच्या फसवणुकीची, आशाभंगाची कथा 'बिचारी लीझा' (१७९२) त्यांना खूप नाव देऊन गेली.

कदाचित मॉस्कोत राहणाऱ्यांपैकी कुणालाही शहराभोवतालचा परिसर एवढा माहीत नसेल, तेवढा मला माहीत आहे, कारण माझ्याएवढे वारंवार ग्रामीण भागात कुणीही जात नाही, माझ्याएवढे पायी फिरायला कुणीही जात नाही. कोणतीही निश्चित योजना, कोणताही विशिष्ट हेतू मनात न धरता, जशी इच्छा होईल त्याप्रमाणे मी कुरणांमध्ये, रायांमध्ये, डोंगरांमध्ये आणि मैदानांमध्ये भटकायला जातो.

पण माझे सर्वांत आवडते स्थळ आहे सेंट सा. मठाचे भकास गॉथिक मनोरे जेथे उंचावतात ती जागा. ह्या टेकडीवर उभे राहिले म्हणजे त्याच्या बाजूला जवळजवळ सर्व मॉस्को दिसते. घरांचा आणि प्रार्थनामंदिरांचा तो प्रचंड समूह एखाद्या भव्य **ॲम्फीथिएटरसारखा** भासतो: जेव्हा सूर्य त्या दृश्यावर प्रकाशत असतो, जेव्हा त्याची मावळतीची किरणे असंख्य घुमटांना आणि आकाशात झेपावणाऱ्या असंख्य क्रूसांना सोन्यात न्हाऊन घालत असतात, तेव्हा हे चित्र फार सुरेख दिसते. खालती गडद हिरवीगार फुलांची कुरणे पसरलेली दिसतात आणि त्यांच्यापलिकडे, पिवळ्या वाळूपलिकडे, नितळ नदी वाहते. मच्छीमारांच्या होड्यांच्या हलक्या वल्ह्यांनी नदीचे पाणी डहुळले जाते किंवा लोभी मॉस्को शहराला रशियन साम्राज्याच्या सुपिक भूमींमधून धान्य घेऊन येणाऱ्या अवजड गलबतांच्या सुकाणूंखाली जोराने खळाळते. नदीच्या दुसऱ्या तीरावर ओक वृक्षांची राई दिसते व तिच्याजवळ असंख्य गुरांचे कळप चरत असतात. तेथे तरुण गुराखी झाडांच्या सावलीत बसून आपली साधी, करुण गाणी गातात आणि त्यांना एकसुरी भासणारे उन्हाळी दिवस लौकर घालविण्याचा प्रयत्न करतात. प्राचीन एल्म वृक्षांच्या दाट

पालवीमधून आणखी पलिकडे सेंट दानीलोव मठाचा सोनेरी घुमट चमकतो आणि त्याहून दूर, जवळजवळ क्षितिजापाशी, निळसर धुक्यात लपेटलेल्या वोरोब्योव टेकड्या दिसतात. आता तुमच्या डाव्या बाजूला विस्तीर्ण पसरलेली गव्हाची शेते दिसतात, झाडांचे छोटे पुंजके दिसतात, तीन-चार खेडी दिसतात आणि दूरवर कोलोमेन्स्कोयेचा उंच राजवाडा ओझरता दिसतो.

मी वारंवार ह्या जागी येतो आणि जवळजवळ नेहमी वसंताचे इथे स्वागत करतो. निसर्गाबरोबर एकत्रपणे दुःख करण्यासाठी शरदाच्या उदास दिवसांमध्येसुद्धा मी इथे येतो. ओसाड मठाच्या भिंतींमध्ये, उंच गवतांमध्ये दडलेल्या थडग्यांमध्ये, मठाच्या खोल्यांदरम्यानच्या अंधाऱ्या वाटांमध्ये वारा भयानकपणे घूं घूं घुमत असतो. तेथे थडग्यांच्या कोसळलेल्या दगडांवर रेलून, काळाच्या पोकळीत गाडल्या गेलेल्या युगांच्या कण्हण्याला मी साद देतो; ते कण्हणे माझ्या हृदयाचा थरकाप उडविते, त्याला हादरवते. काहीवेळा मी मठातील खोल्यांमध्ये जातो आणि एकेकाळी तेथे राहिलेल्या माणसांची चित्रे मनासमोर उभी करण्याचा प्रयत्न करतो – फार दुःखी चित्रे! मला दिसतो एक पांढरे केसवाला संन्यासी, क्रूसासमोर वाकून प्रार्थना करणारा; त्याच्या ऐहिक बंधनांमधून त्याची लौकरात लौकर मुक्ती व्हावी म्हणून तो प्रार्थना करतोय, कारण जगण्यात आता त्याला कोणतेही सुख उरलेले नाही, त्याच्या सर्व भावना मेल्या आहेत, केवळ आजाराच्या आणि दुबळेपणाच्या भावना सोडून! दुसरा एक पांढुरक्या चेहऱ्याचा तरुण संन्यासी दिसतो. त्याच्या गजांच्या खिडकीमधून जगाकडे तो स्वप्नाळूपणाने पाहतोय, हवेच्या महासागरांमध्ये आनंदी छोटी पाखरे मुक्त संचार करताना त्याला दिसतात आणि त्याच्या डोळ्यांमधून दुःखाची आसवे ओघळू लागतात. तो खंगतोय, झुरतोय, नष्ट होतोय आणि घंटेच्या करुण नादात मला त्याचा अकाली मृत्यू ऐकू येतोय. काहीवेळा चर्चच्या प्रवेशद्वारांपाशी मी उभा राहतो आणि तेथे घडलेल्या चमत्कारांची चित्रे नजरेसमोर आणतो: शत्रूच्या झुंडींनी वेढलेल्या मठातील माणसांना खाऊ घालण्यासाठी आकाशातून मासे पडतात; मेरी मातेची प्रतिमा शत्रूंना धूम पळायला लावते; ही सर्व चित्रे माझ्या देशाचा इतिहास माझ्या मनात परत जागा करतात –

रशियाच्या राजधानीभोवतालाचा प्रदेश जेव्हा क्रूर तातारांनी व लिथुआनियनांनी जाळूनपोळून, कत्तली करून उध्वस्त केला होता आणि वेढ्यात सापडलेल्या, संरक्षणविहीन विधवेसारखी अवस्था बनलेल्या गरीब बिचाऱ्या मॉस्को नगरीला त्या आत्यंतिक निराशेच्या क्षणी देवावाचून कुणाच्याही मदतीची अपेक्षा उरली नव्हती, त्या काळातील दुःखद इतिहास.

पण सेंट सा. मठाच्या भिंती मला वारंवार आकर्षित करतात — मुख्यतः लीझाच्या शोककारक नशीबाच्या आठवणी! बिचारी लीझा!

मठाच्या भिंतींपासून सत्तर साझेन* अंतरावर, भोज वृक्षांच्या एका छोटया राईत, हिरव्या कुरणाच्या मध्यभागी एक रिकामी झोपडी उभी आहे. तिला दारे नाहीत, खिडक्या नाहीत, मजले नाहीत आणि तिचे छप्पर केव्हाच कुजून गेलेय व कोसळलेय. ह्या झोपडीत सुमारे तीस वर्षांपूर्वी सुंदर, गोड लीझा तिच्या म्हाताऱ्या आईसह रहात होती.

लीझाचे वडील सुस्थित ग्रामवासी होते, कारण त्यांना काम करणे आवडायचे, स्वतःच्या जमिनीची ते चांगली मशागत करीत आणि नेहमी शांत, विचारी जीवन जगत. पण ते वारले व लौकरच त्यांच्या विधवेला आणि कन्येला आत्यंतिक दारिद्र्याला तोंड द्यावे लागले. भाडोत्री मजूर आळशी होते, त्यांनी जमिनीची योग्य मशागत केली नाही आणि पीक अगदी वाईट आले. लीझाला आणि तिच्या आईला स्वतःची जमीन जवळजवळ फुकटात खंडाने द्यावी लागली. आणखी वाईट म्हणजे नवऱ्याच्या मृत्यूचा सतत शोक करून बिचारी विधवा दर तासागणिक अधिक दुबळी बनत होती. शेतकरी बायकासुद्धा जीव तोडून प्रेम करू शकतात. पण त्यामुळे कोणतेही काम करण्यास ती असमर्थ बनली. एकटी लीझा रात्रं-दिवस खपत होती. तिचे वडील वारले तेव्हा ती पंधरा वर्षांची होती. पण स्वतःच्या कोवळ्या वयाचा आणि दुर्मीळ सौंदर्याचा मुळीच विचार न करता ती कापड विणत होती, मोजे विणत होती, वसंतामध्ये फुले व उन्हाळ्यात रानफळे वेचत होती, त्यांना विकायला नेत होती. लीझाचे अथक परिश्रम पाहून प्रेमळ म्हातारी आई तिला स्वतःच्या मंद

---

*साझेन — रशियन माप — २.१३ मीटर — सं.

ठोके पाडणाऱ्या हृदयाशी आवळून धरायची, तिची मुलगी म्हणजे देवाने पाठवलेली देणगी आहे असे म्हणायची ; तिच्या म्हातारपणात तिचे पोषण करायला आणि सांत्वन करायला देवाने ही मुलगी धाडली होती असे म्हणायची व मातेसाठी ती जे काही करीत होती त्याबद्दल देवाने तिला बक्षिस द्यावे अशी देवापाशी विनवणी करायची. "मी काम करावं म्हणून देवानं मला हात दिलेत," लीझा म्हणायची. "मी लहान होते तेव्हा तू मला स्तनाशी धरून दूध पाजलंस, माझी काळजी घेतलीस ; आता तुझी काळजी घेण्याची माझी पाळी आलीय. मात्र झुरणं आणि रडणं कृपा करून थांबव ; आपले अश्रू बाबांना परत जिवंत करणार नाहीत." पण नाजुक लीझाला अनेकदा स्वतःचे अश्रू आवरणे अशक्य व्हायचे. तिला एके काळी वडील होते हे तिला चांगले आठवत होते आणि आता ते हयात नव्हते ; पण आईखातर ती स्वतःच्या हृदयातील दुःख लपवून ठेवत होती, शांत आणि आनंदीपणाचा बहाणा करीत होती. "आता दुसऱ्या जगातच मी रडायची थांबेन, माझ्या लाडक्या लीझा," तिची दुःखी आई उत्तर द्यायची. "तिथं सगळे आनंदी बनतात, असं ऐकलंय. जेव्हा तुझ्या वडलांना मी पाहीन, तेव्हा नक्की आनंदी होईन. मात्र आत्ता मरायची माझी इच्छा नाही – माझ्याविना तुझं काय होईल? कुणाच्या हवाली तुला करू? नाही, देवाच्या कृपेनं प्रथम तुझी नीट व्यवस्था लावीन! कदाचित लौकरच एखादा चांगला माणूस भेटेल. तेव्हा माझ्या लाडक्या मुलांनो, तुम्हाला आशीर्वाद देईन, स्वतःवर क्रूस-चिन्ह करीन आणि मातीमध्ये शांतपणं झोपीन."

लीझाच्या वडिलांचा मृत्यू घडल्याला दोन वर्षे लोटली. कुरणांमध्ये भरपूर फुले होती आणि फुलांचे गुच्छ बनवून ते विकायला लीझा मॉस्कोत गेली. एक तरुण, उत्तम पोषाख केलेला, देखणा पुरुष तिला रस्त्यात भेटला. तिने त्याला फुले दाखविली आणि ती एकदम लाजली. "ही फुलं तू विकतेस काय ग?" त्याने स्मित करीत विचारले. "विकते," ती उत्तरली. "किती पैसे पाहिजेत?" "पाच कोपेक." "हे फारच स्वस्त झालं. हा घे रूबल." लीझा चकित झाली व तिने त्या तरुणाच्या चेहऱ्याकडे पहायचा धीटपणा केला, मग ती आणखीच लाजली आणि डोळे जमिनीवर खिळवून त्याला म्हणाली की, ती रूबल घेणार

नाही. "का बरं?" "जास्त किंमत घेणं मला योग्य वाटत नाही." "मला वाटतं की, एका सुंदर तरुणीच्या हातांनी खुडलेली ही सुंदर फुलं नक्की एक रूबल किंमतीची आहेत. पण तू रूबल घेत नाहीस, तर हे घे पाच कोपेक. तुझ्याकडून नेहमी फुलं विकत घ्यायला मला आवडेल. फक्त माझ्यासाठीच तू फुलं तोडावीस अशी माझी इच्छा आहे." लीझाने फुले दिली, पाच कोपेक घेतले, झुकून नमस्कार केला आणि ती जायला निघाली, एवढ्यात त्या अनोळखी तरुणाने तिचा हात धरून तिला थांबविले. "कुठं निघालीस तू?" "घरी." "तुझं घर कुठं आहे?" लीझाने स्वतःचे घर कुठे होते ते सांगितले व ती निघून गेली. तिला आणखी थोपवून धरण्याची तरुण गृहस्थाची इच्छा नव्हती, बहुधा त्याचे कारण रस्त्यावरून येणारे-जाणारे आता थांबू लागले होते व त्या दोघांकडे पाहून खवचट हसू लागले होते.

लीझा घरी आली आणि तिने आईला सर्व हकीकत सांगितली. "तू रूबल घेतला नाहीस हे चांगलं केलंस. कदाचित तो वाईट माणूस असेल..." "छेः, नाही ग आई! मला नाही तसं वाटत. त्याचा चेहरा एवढा प्रेमळ होता, आवाज खूप छान होता..." "तरीसुद्धा स्वतःच्या कष्टाचं खाणं जास्त चांगलं, कुणापासून काही फुकट घेण्यापेक्षा. माझ्या लाडके, अजून तुला ठाऊक नाही, गरीब मुलीचा दुष्ट माणसं किती वाईट अपमान करू शकतात! तू जेव्हा शहरात जातेस, तेव्हा नेहमी माझा जीव थाऱ्यावर नसतो. मी नेहमी देवाच्या तसबिरीपुढं मेणबत्ती पेटवते आणि सर्व संकटांपासून त्यानं तुझं रक्षण करावं म्हणून त्याची प्रार्थना करते." लीझाच्या डोळ्यांमध्ये आसवे तरारली. तिने आईचे चुंबन घेतले.

दुसऱ्या दिवशी लीझाने सर्वोत्तम फुलांचा गुच्छ बनविला आणि पुन्हा त्याच ठिकाणी ती शहरात गेली. जणू कुणाचीतरी वाट पाहिल्याप्रमाणे डावी-उजवीकडे चोरटे कटाक्ष टाकीत ती तेथे उभी राहिली. अनेक लोकांनी तिची फुले विकत मागितली, पण फुले विकायची नाहीत असे तिने त्यांना सांगितले आणि ती रस्त्याच्या दोन्ही दिशांना नजरा टाकीत राहिली. संध्याकाळ झाली, घरी जायची वेळ झाली आणि परतताना वाटेत तिने ती फुले नदीत फेकली. "तुमचा कुणालाही लाभ

होणार नाही", हृदयात कसल्यातरी दुःखाचा अनुभव घेत लीझा म्हणाली. दुसऱ्या दिवशी संध्याकाळच्या सुमाराला ती घराच्या खिडकीशी बसून सूत कातत होती व एक दुःखद गीत हळू आवाजात गात होती. अचानक तिने उडी मारली व ती ओरडली : "आह् !" अनोळखी तरुण खिडकीखाली उभा होता.

"काय झालं ग तुला?" तिच्याजवळ बसलेल्या आईने घाबरून विचारले. "काही नाही, आई", लीझा भित्र्या आवाजात उत्तरली, "मी फक्त त्याला पाहिलं." "कुणाला?" "त्या माणसाला, ज्यानं माझ्याकडून फुलं विकत घेतली होती." म्हातारीने खिडकीबाहेर डोकावून पाहिले. तरुणाने अत्यंत नम्रपणे वाकून तिला अभिवादन केले आणि तो एवढा छान दिसत होता, की तिचे त्याच्याबद्दल एकदम चांगले मत बनले. "नमस्ते, भल्या म्हातारे!" तो म्हणाला. "मी खूप दमलोय. तुझ्यापाशी ताजं दूध मिळेल का?" आईच्या उत्तराची लीझाने वाट पाहिली नाही – कदाचित तिला ते आधीच ठाऊक होते – ती धावत कोठीच्या खोलीत गेली, स्वच्छ लाकडी थाळी झाकलेला स्वच्छ मातीचा खुजा तिने घेतला, एक ग्लास उचलून, त्याला धुवून, स्वच्छ रुमालाने पुसला, त्यात दूध ओतले आणि खिडकीतून बाहेर दिला, पण तिने स्वतःची नजर मात्र जमिनीवर खिळविली होती. अनोळखी दूध प्यायला – त्याला हेबाच्या* हातचे अमृतसुद्धा तेवढे गोड वाटले नसते. अर्थातच नंतर त्याने लीझाचे आभार मानले आणि त्याच्या शब्दांपेक्षा त्याची नजर जास्त बोलली. दरम्यान लीझाची आई स्वतःच्या दुःखाबद्दल आणि सांत्वनाबद्दल तरुणाला हकीकत सांगत होती ; म्हणजे नवऱ्याच्या मृत्यूबद्दल आणि तिच्या मुलीचे गोड वागणे, तिचा उद्योगीपणा, तिचा भलेपणा, इ. इ. तरुण माणूस म्हातारीचे बोलणे लक्षपूर्वक ऐकत होता, पण त्याचे डोळे मात्र भिरभिरत होते – कुठे ते सांगायला पाहिजे? आणि लीझा, लाजरी लीझा, तीसुद्धा तरुणाकडे वारंवार कटाक्ष फेकत होती. पण वीज चमकून ढगात नाहीशी होते त्यापेक्षा अधिक वेगाने तिचे निळे डोळे त्याच्या डोळ्यांना भिडताच खाली वळत. "माझी

---

*हेबा – ग्रीक पुराणातील चिरयौवनाची देवी – सं.

इच्छा आहे की," तो लीझाच्या आईला म्हणाला, "तुझ्या मुलीनं तिचं काम माझ्याशिवाय दुसऱ्या कुणालाही विकू नये. त्यामुळं तिला शहरात वारंवार जायची गरज पडणार नाही आणि तुला तिचा वियोग घडणार नाही. मी स्वतःच अधूनमधून तुमच्याकडं येत जाईन." ह्या शब्दांसरशी लीझाच्या डोळ्यांमध्ये आनंद चमकला, तो लपविण्याचा तिने वृथा प्रयत्न केला; नितळ उन्हाळी संध्यासमयीच्या सूर्यास्तासारखे तिचे गाल भाजत होते. तिने स्वतःच्या डाव्या बाहीकडे पाहिले आणि उजव्या हाताने तिला चिमटा घेतला. म्हातारीने तरुणाची सूचना आनंदाने स्वीकारली. तिला कोणताही वाईट संशय आला नाही. तिने तरुणाची खात्री पटविली की, लीझाने विणलेले कापड सर्वोत्तम असते आणि इतरांपेक्षा जास्त काळ टिकते. अंधार पडू लागला होता आणि तरुण गृहस्थ जायला निघाला. "खरंच, भल्या साहेबा, आम्ही तुला कोणत्या नावानं हाक मारायची?" म्हातारीने विचारले. "माझं नाव एरास्त," तो उत्तरला. "एरास्त", लीझा हळूच म्हणाली, "एरास्त!" तिने पाच वेळा ह्या नावाचा उच्चार केला, जणू ते तिला स्मरणात पक्के ठसवायचे होते. एरास्तने त्यांचा निरोप घेतला व पुन्हा भेटण्याचे आश्वासन देऊन तो गेला. लीझाचे डोळे त्याची सोबत करीत होते आणि आई विचारमग्न बसली होती. मग लीझाचा हात पकडून ती म्हणाली: "अग लीझा! तो किती छान आणि प्रेमळ आहे! तुझा नवरा असा असेल तर किती छान होईल!" लीझाचे काळीज फडफडले. "आई! आई! हे कसं शक्य आहे? तो मोठ्या घरचा आहे आणि शेतकऱ्याशी..." लीझाने वाक्य पूर्ण केले नाही.

आता वाचकाला माहीत होणे आवश्यक आहे की, हा तरुण माणूस, हा एरास्त, एका उमराव घराण्यातील होता, बुद्धिमान आणि दयाळू होता; स्वभावाने तो प्रेमळ असला, तरी दुबळा आणि चंचल होता. तो उधळे आयुष्य जगत होता, केवळ स्वतःच्या सुखाचा विचार करीत होता, उच्चभ्रू समाजाच्या मनोरंजनांमध्ये त्या सुखाला शोधण्याचा प्रयत्न करीत होता, पण अनेकदा त्याला ते गवसत नव्हते. म्हणून स्वतःच्या दैवाला तो दोष देत होता, कुढत होता. लीझाच्या सौंदर्याने पहिल्या दृष्टिक्षेपातच तो घायाळ झाला होता. कादंबऱ्या व लघुकाव्ये वा-

चण्याचा त्याला नाद होता, त्याची कल्पनाशक्ती तल्लख होती आणि विचाराने तो त्या काळांमध्ये वाहवत जायचा (तसे काळ होते अथवा नव्हते) जेव्हा, जर कवींवर विश्वास ठेवायचा म्हटले, तर सर्व माणसे चिंतामुक्त मनाने मैदानांमधून भटकत होती, शुद्ध झऱ्यांमध्ये नहात होती, कबूतरांप्रमाणे घुमत होती, गुलाबांच्या आणि सुगंधी पांढऱ्या फुलांच्या झुडूपांखाली विसावा घेत होती व सगळे दिवस उत्सव साजरा करण्यात व्यतीत करीत होती. त्याचे हृदय ज्याचा फार काळापासून शोध घेत होते. ते लीझामध्ये गवसल्याचे त्याला भासले. "विशुद्ध आनंदाची चव अनुभवायला निसर्ग मला स्वत:पाशी बोलावतोय," असा तो विचार करीत होता. त्याने निर्णय घेतला की, निदान काही काळापुरता उच्चभ्रू जगताचा निरोप घ्यायचा.

आता लीझाकडे वळू. रात्र झाली. लीझाच्या आईने स्वत:च्या मुलीला आशीर्वाद दिले आणि गाढ झोप लागो अशी इच्छा व्यक्त केली. पण ह्यावेळी तिच्या इच्छा खऱ्या ठरल्या नाहीत: लीझाला चांगली झोप लागली नाही. एरास्तची, तिच्या हृदयात प्रवेश करणाऱ्या नवागताची, प्रतिमा तिच्यासमोर एवढ्या ठळकपणे येत होती, की ती दर मिनिटागणिक जागी व्हायची व उसासे टाकायची. सूर्योदयापूर्वीच ती उठली, मस्क्वा नदीवर गेली, गवताळ किनाऱ्यावर बसली आणि हातावर चेहरा टेकवून पाण्यावर उमटणाऱ्या, मग हवेत वरती चढणाऱ्या आणि हिरव्या गालीचावर चमकणारे दवबिंदू मागे ठेवणाऱ्या पांढऱ्या धुक्याकडे टक लावून बघत राहिली. लीझाभोवती शांततेचे साम्राज्य नांदत होते. पण लौकरच उगवत्या सूर्याने सर्व सृष्टीला जाग आणली: राया आणि झुडूपे गजबजली, पाखरे भिरभिरत गाणी गाऊ लागली, जीवनदायी प्रकाशकिरणांना शोषण्यासाठी फुलांनी चेहरे वर उचलले. पण लीझा अजूनही हातावर चेहरा धरून खिन्नपणे बसली होती. अरेरे, लीझा, लीझा! तुला काय झाले? अगदी आत्तापर्यंत, पाखरांबरोबर जागी होऊन तू त्यांच्यासह प्रात:कालाचा आनंद लुटत होतीस आणि दवबिंदूमध्ये जसा सूर्य चमकतो, तसा तुझ्या डोळ्यांमध्ये तुझा विशुद्ध, आनंदी आत्मा चमकायचा; पण आता तू विचारात गढून बसली आहेस, निसर्गाच्या सार्वत्रिक आनंदात सहभागी होत नाहीस. दरम्यान एक तरुण

धनगर स्वतःचा कळप नदीतीराने हाकलीत, पावा वाजवीत आला. त्याला पाहून लीझाच्या मनात विचार आला: "माझ्या सगळ्या विचारांना गुरफटून टाकणारा तो जर साधा शेतकरी किंवा धनगर म्हणून जन्मला असता, — जर आत्ता तो माझ्याजवळून अशा मेंढ्या हाकत गेला असता, हाय! मी त्याला हसून वाकून नमस्कार केला असता आणि म्हटलं असतं: 'नमस्कार, भल्या धनगरा! कुठं घेऊन निघालास तुझा कळप? इथं तुझ्या मेंढ्यांसाठी छान हिरवं गवत उगवतं आणि तुझ्या टोपीसाठी छान माळ बनवायला इथं फुलंही फुलतात!' त्यानं माझ्याकडं प्रेमळ कटाक्ष टाकला असता, कदाचित... माझा हात आपल्या हाती धरला असता... स्वप्न!" पावा वाजविणारा धनगर त्याच्या कळपाला घेऊन तिच्या जवळून चालत गेला व टेकाडापलिकडे नाहीसा झाला.

पाण्यावरील वल्ह्यांच्या सपकाऱ्यांच्या आवाजाने लीझा दचकली. तिने नदीकडे पाहिले आणि तिला एक होडी दिसली — होडीत एरास्त बसला होता.

तिच्या अंगाचा थरकांप सुटला, अर्थातच भीतीपायी नव्हे. ती जाण्यासाठी उठून उभी राहिली, पण तिला एक पाऊल पुढे टाकवेना. एरास्तने किनाऱ्यावर उडी मारली, लगबगीने तो लीझापाशी आला आणि तिचे स्वप्न अंशतः खरे बनले... कारण त्याने **प्रेमळ नजरेने तिच्याकडे पाहिले व तिचा हात पकडला...** आणि लीझा, लीझा तेथे डोळे जमिनीला खिळवून, भाजत्या गालांनी आणि फडफडत्या काळजाने उभी होती. स्वतःचा हात सोडवून घेण्यास ती असमर्थ बनली होती, तिच्या ओठांपाशी त्याने स्वतःचे ओठ आणले तेव्हा चेहरा बाजूला फिरविण्यास असमर्थ बनली होती... आह! त्याने तिचे चुंबन घेतले, त्याने एवढ्या आवेगाने तिचे चुंबन घेतले, की सारे जग पेटल्याप्रमाणे तिला भासले! "लाडक्या लीझा!" एरास्त म्हणाला. "लाडक्या लीझा! माझं तुझ्यावर प्रेम आहे!" हे शब्द तिच्या आत्म्याच्या खोल अंतरंगात स्वर्गीय, उदात्त संगीताप्रमाणे घुमले. स्वतःच्या कानांवर तिचा विश्वास बसत नव्हता आणि... पण मी लेखणी खाली टाकतो. एवढेच सांगतो की, ह्या उन्मादी क्षणापासून लीझाचे लाजरेपण नाहीसे झाले. एरास्तला समजले की, त्याच्यावर प्रेम केले जात होते; ह्या नव्या,

विशुद्ध, मोकळ्या हृदयाकडून अत्यंत आवेगाने त्याच्यावर प्रेमवर्षाव घडत होता.

एकमेकांच्या नजरांमध्ये नजर मिसळून ती दोघे गवतावर एकमेकांना बिलगून बसली होती व म्हणत होती: "माझ्यावर प्रेम कर!" दोन तास त्यांना एखाद्या क्षणासारखे भासले. शेवटी लीझाला आठवण झाली की, तिची आई कदाचित तिच्याबद्दल काळजी करीत बसली असेल. त्यांनी एकमेकांचा निरोप घेणे आवश्यक होते. "आह् एरास्त!" ती म्हणाली. "तू माझ्यावर नेहमी प्रेम करशील?" "नेहमी, लाडक्या लीझा, नेहमी!" तो उत्तरला. "असं तू मला वचन देशील?" "होय, प्रिय लीझा, देईन!" "नको, तुझ्याकडून वचन घेणं मला योग्य वाटत नाही. माझा तुझ्यावर विश्वास आहे, एरास्त, विश्वास आहे. खरंच तू गरीब लीझाला फसवशील? तसं घडणं शक्य नाही ना?" "शक्य नाही, शक्य नाही, लाडक्या लीझा!" "मी खूप सुखी आहे आणि तू माझ्यावर प्रेम करतोस हे आईला समजेल, तेव्हा तिला फार फार आनंद होईल!" "नको लीझा! तिला ह्यातलं काही सांगू नको!" "का नको?" "म्हातारी माणसं संशयी असतात. ती ह्यात काहीतरी वाईट समजेल." "तसं ती समजणार नाही." "तरीसुद्धा मी तुला विनंती करतो की, ह्याबद्दल तिच्यापाशी अवाक्षर काढू नको." "ठीक आहे, तुझी आज्ञा मी पाळली पाहिजे, पण तिच्यापासून काही गुपित राखण्याची माझी इच्छा नाही." त्यांनी निरोप घेतला, चुंबने घेतली आणि रोज संध्याकाळी किनाऱ्यावर अथवा भोजांच्या राईत किंवा लीझाच्या झोपडीच्या आसपास कुठेतरी न चुकता एकमेकांना भेटण्याचे आश्वासन दिले. लीझा गेली पण तिच्याकडे पहात किनाऱ्यावर उभ्या असलेल्या एरास्तकडे तिने शंभर वेळा मागे वळून पाहिले.

लीझा तिच्या घराकडे परतली तेव्हा सकाळपेक्षा तिची मन:स्थिती आता अगदी वेगळी होती. तिचा चेहरा व तिच्या सर्व हालचाली तिच्या हृदयातील आनंद व्यक्त करीत होत्या. "तो माझ्यावर प्रेम करतो," ती मनाशी विचार करीत होती व त्या विचारामुळे तिला आनंद होत होता. "ए आई! सकाळ किती सुरेख आहे!" झोपेतून नुकत्याच उठलेल्या आईला लीझा म्हणाली. "बाहेर फार छान आहे! चंडोल इतकी

छान गाणी कधी गायले नव्हते, सूर्य एवढ्या तेजानं कधी प्रकाशला नव्हता, फुलांना एवढा मधुर वास कधी आला नव्हता!" लीझाने एवढ्या मोहक रंगांमध्ये वर्णन केलेली सकाळ पहायला तिची आई कुबड्या घेऊन बाहेर गेली. आणि खरोखरीच तिला ती सकाळ सुरेख भासली, कारण तिच्या लाडक्या मुलीने स्वतःच्या प्रसन्न चित्तवृत्तींनी सारा निसर्ग आनंदी बनविला होता. "लीझा," ती म्हणाली, "देवाच्या जगात साऱ्या गोष्टी किती सुंदर आहेत! साठ वर्षं मी जगात राहतेय, पण अजून देवाच्या सगळ्या करणी मनःपूत पाहिल्या नाहीत, उंच तंबूसारख्या स्वच्छ आकाशाकडं अजून डोळे भरून पाहिलं नाही आणि दरवर्षी नव्या गवतानं आणि नव्या फुलांनी झाकून जाणाऱ्या धरतीला पाहून अजून मनाची तृप्ती होत नाही. आकाशातल्या झारनं माणसावर खूप प्रेम केलं असावं, म्हणून त्यानं हे जग त्याच्यासाठी एवढं छान नटवलं. लीझा! जर कधी कधी आपल्याला दुःख भोगावं लागलं नसतं, तर कुणाला मरायची इच्छा होईल?.. पण बहुधा तसं असणंच योग्य आहे. जर आपल्या डोळ्यांमधून कधी आसवं वाहिली नसती, तर कदाचित स्वतःच्या आत्म्याला आपण विसरून गेलो असतो." लीझाच्या मनात येत होते: "आह्! माझ्या लाडक्या मित्रापेक्षा माझ्या आत्म्याला मी लौकर विसरीन!"

त्यानंतर, त्यांच्या वचनांशी प्रामाणिक राहून, एरास्त आणि लीझा रोज संध्याकाळी (लीझाची आई झोपल्यानंतर) एकमेकांना नदीच्या तीरावर अथवा भोजांच्या राईत भेटू लागली. पण जास्त करून त्यांच्या भेटी ओकच्या प्राचीन वृक्षांखाली घडत (झोपडीपासून सुमारे ऐंशी साझेन अंतरावर). पुरातन काळी खणलेल्या तेथील विशुद्ध, खोल पाण्याच्या तळ्यात ओक वृक्षांच्या गर्द छाया पडत. हिरव्या फांद्यांमधून पाझरत येणारे चांदणे लीझाच्या प्रेमिकाच्या लाडक्या हाताकडून व मंद पश्चिम वाऱ्यांकडून कुरवाळल्या जाणाऱ्या लीझाच्या फिकट केसांना रुपेरी बनवीत. अनेकदा लीझाच्या डोळ्यांमध्ये उमटणाऱ्या प्रेमाच्या आसवांना चंद्र उजळून टाकायचा व एरास्त त्यांना चुंबनांनी पिऊन टाकायचा. ती एकमेकांना आलिंगने देत, अर्थात पवित्र मनाने आणि लाजरी चंद्रिका त्यांच्यापासून ढगाआड लपायची नाही; त्यांची आलिंगने निष्पाप

आणि निर्मळ होती. "जेव्हा तू," लीझा एरास्तला म्हणाली, "जेव्हा तू मला म्हणतोस : 'लाडके, तुझ्यावर मी प्रेम करतो!' जेव्हा तू मला स्वतःच्या हृदयाशी घट्ट धरतोस आणि तुझ्या प्रेमळ डोळ्यांनी माझ्याकडं पाहतोस, आह्! तेव्हा मला एवढं छान वाटतं, एवढं छान वाटतं, की मला स्वतःचा विसर पडतो, सगळ्याचा विसर पडतो–फक्त एरास्त सोडून! किती आश्चर्य, माझ्या मित्रा, जेव्हा तू मला माहीत नव्हतास तेव्हा मी शांत आणि आनंदी जगू शकत होते, हे किती आश्चर्य! आता मला हे समजत नाही, आता वाटतं की, तुझ्याविना जीवन हे जीवन नाही, केवळ दुःख आणि कंटाळा. तुझ्या डोळ्यांविना तेजस्वी चंद्र काळा बनतो; तुझ्या आवाजाविना गाणारी मैना कंटाळवाणी वाटते; तुझ्या श्वासाविना वारा मला अप्रिय वाटतो!" एरास्त त्याच्या धनगरणीवर–लीझाला त्याने हे नाव दिले होते–मंत्रमुग्ध झाला होता आणि ती त्याच्यावर अमाप प्रेम करीत असल्यामुळे तो स्वतःला अधिक चांगला माणूस मानू लागला होता. ह्या निष्पाप जीवापासून त्याला लाभणाऱ्या **निर्मळ स्नेहाच्या** शुद्ध आनंदापुढे उच्चभ्रूच्या जगातील सर्व झगमगती सुखे त्याला ओंगळवाणी भासू लागली होती. पूर्वीच्या स्वतःच्या विषयलोलुपतेची त्याला आता किळस वाटू लागली होती. "लीझाशी मी भावाच्या नात्यानं राहीन," त्याच्या मनात विचार आला, "तिच्या प्रेमाचा मी दुरुपयोग करणार नाही आणि नेहमी सुखी राहीन!" अविचारी तरुण माणसा! तुझे हृदय तू जाणले आहेस का? स्वतःच्या वर्तनाचा नेहमी जाब देऊ शकशील? तुझ्या भावनांवर विचाराचा नेहमी पगडा राहील?

लीझाने मागणी केली की, एरास्तने तिच्या आईला वारंवार भेटावे. "माझं तिच्यावर प्रेम आहे," ती म्हणाली, "आणि तिचं चांगलं व्हावं अशी माझी इच्छा आहे. मला वाटतं, तुला पाहणं म्हणजे कुणाचंही फार भलं होणं आहे." खरोखरीच, एरास्तला पाहून तिच्या म्हाताऱ्या आईला नेहमी खूप आनंद व्हायचा. आपल्या दिवंगत नवऱ्याबद्दल त्याच्याशी बोलायला तिला आवडायचे; स्वतःच्या तारुण्यातील दिवसांबद्दल, तिच्या लाडक्या इवानशी तिची पहिली भेट कशी झाली, तो तिच्या प्रेमात कसा पडला व किती प्रेमाने आणि एकोप्याने ती दोघे राहिली, ह्याबद्दल ती एरास्तला सांगायची. "आमचं एकमेकांना पाहून कधीही

पुरेसं समाधान झालं नाही आणि मृत्यूनं क्रूरपणं त्याला माझ्यापासून हिरावून घेतलं त्या अखेरच्या क्षणापर्यंत असंच होतं. माझ्या हातांवर तो मेला!" आणि एरास्त मनःपूर्वकपणे तिचे बोलणे ऐकायचा. लीझाने बनविलेल्या सर्व गोष्टी तो विकत घेत होता आणि तिने सांगितलेल्या किंमतीच्या दसपट पैसे देण्याची त्याची नेहमी इच्छा होती, पण म्हातारी त्याच्यापासून एक कोपेकसुद्धा जादा स्वीकारीत नसे.

अशा रीतीने काही आठवडे उलटले. एके संध्याकाळी एरास्त खूप खूप वेळपर्यंत लीझाची वाट पहात राहिला. नियोजित भेटीची वेळ केव्हाच टळून गेली होती. अखेरीस ती आली, पण तिची चर्या एवढी म्लान होती की तो घाबरला. रडण्यामुळे तिचे डोळे लाल बनले होते. "लीझा, लीझा, तुला काय झालं?" "आह् एरास्त! मी रडले!" "कशाबद्दल? झालं तरी काय?" "मी तुला सगळं सांगितलं पाहिजे. माझं लग्न ठरवताहेत, शेजारच्या खेड्यामधल्या एका श्रीमंत शेतकऱ्याच्या मुलाशी. आईची इच्छा आहे की, मी त्याच्याशी लग्न करावं." "आणि तू संमती दिलीस?" "दुष्ट! कसा तू मला हा प्रश्न विचारू शकतोस? होय, मला आईबद्दल वाईट वाटतं. ती रडतेय आणि म्हणतेय की, तिला मनःशांती लाभावी असं मला वाटत नाही, तिच्या डोळ्यांदेखत तिनं माझं लग्न लावून दिलं नाही, तर मरताना तिचा छळ होईल. आह्! माझा एक लाडका मित्र आहे हे आईला ठाऊक नाही!" एरास्तने लीझाचे चुंबन घेतले, तो म्हणाला की तिचे सुख जगात त्याला सर्वांत मोलाचे वाटत आहे, तिच्या आईच्या मृत्यूनंतर तो तिला स्वतःकडे घेऊन जाईल आणि तिच्यापासून वेगळे न होता खेड्यात अथवा जंगलात राहिला तरी त्याला तो स्वर्गच वाटेल. "पण तू माझा नवरा होऊ शकत नाहीस," लीझा हलका उसासा टाकीत म्हणाली. "का बरं?" "मी शेतकऱ्याची मुलगी." "तू माझा अपमान करतेस. तुझ्या ह्या मित्राला सर्वांत महत्त्वाचा आत्मा वाटतो; संवेदनाक्षम, निष्पाप आत्मा— आणि लीझा नेहमी माझ्या हृदयापाशी राहील."

ती त्याच्या बाहुपाशात शिरली—आणि त्याच क्षणाला गुणाचा नाश झाला! एरास्तला त्याच्या रक्तात विलक्षण खळबळ जाणवली. लीझा एवढी सुंदर कधीही भासली नव्हती, तिच्या कुरवाळण्याने एवढा उत्ते-

जित तो कधी बनला नव्हता, तिची चुंबने एवढी आवेगपूर्ण कधी वाटली नव्हती आणि तिला काही माहीत नव्हते, कसला संशय नव्हता, कसली-ही भीती नव्हती. अंधाऱ्या रात्रीने वासना चेतविल्या – आकाशात एकही तारा चमकत नव्हता, तिचा मोह नष्ट करायला प्रकाशाचा एकही किरण नव्हता. एरास्त पेटला होता आणि लीझाची तशीच अवस्था बनली होती. मात्र त्या स्थितीचे कारण तिला उमगत नव्हते, तिला काय होत होते ते उमजत नव्हते... आह्, लीझा, लीझा! तुझा रक्षक देवदूत कुठे होता? कुठे तुझी निष्पापता?

मोह एका मिनिटानंतर नाहीसा झाला. लीझाला तिच्या नव्या भावना उमजत नव्हत्या. ती गोंधळली व एरास्तपाशी तिने खुलासा विचारला. पण योग्य शब्द न सापडल्यामुळे तो गप्प राहिला. "मला भीती वाटते," लीझा म्हणाली, "आपल्या बाबतीत जे घडलं त्याची मला भीती वाटते! मला भासलं की, मी मरतेय, माझा आत्मा... नाही, हे सांगणं मला जमत नाही! तू गप्प का, एरास्त? उसासे का टाकतोस? देवा रे! काय झालं?" दरम्यान वीज चमकली आणि ढगांचा गडगडाट झाला. लीझाच्या देहाचा थरकाप उडाला. "एरास्त! एरास्त!" ती म्हणाली. "मला खूप भीती वाटते! मला गुन्हेगार म्हणून विजेचा लोळ मला ठार मारील अशी भीती वाटते!" विजांचा भयानक कडकडाट चालू होता, काळ्या मेघांमधून मुसळधार पाऊस कोसळत होता; जणू लीझाच्या गमावलेल्या निष्पापतेबद्दल निसर्ग रडत होता. एरास्तने तिचे सांत्वन करायचा प्रयत्न केला व तिला तो तिच्या झोपडीपाशी घेऊन गेला. ती त्याचा निरोप घेताना हुंदकू लागली. "एरास्त! मला खात्री दे, आपण पूर्वीप्रमाणंच सुखी राहू!" "राहू लीझा, राहू!" तो उत्तरला. "देवदयेनं तसं होवो! तुझ्या शब्दांवर मी विश्वास ठेवला पाहिजे, कारण माझं तुझ्यावर प्रेम आहे. पण माझ्या हृदयात... आता पुरे! माफ कर! उद्या, उद्या भेटू!"

त्यांच्या संकेतभेटी पुढे चालू राहिल्या. पण सर्व किती बदलून गेले! लीझाच्या निष्पाप कुरवाळण्यांनी, तिच्या नुसत्या प्रेमळ कटाक्षांनी, नुसत्या हस्तस्पर्शाने, नुसत्या चुंबनानी, नुसत्या निष्पाप आलिंगनांनी एरास्तचे आता समाधान होत नव्हते. त्याची इच्छा सतत वाढतच होती

आणि शेवटी इच्छा करण्यासारखे काही उरले नाही. ज्याला स्वतःचे हृदय माहीत आहे, स्वतःच्या अत्यंत चवदार सुखांच्या परिणामांचा ज्याने विचार केला आहे, असा कोणताही पुरुष माझ्याशी सहमत होईल की, त्याच्या **सर्व** इच्छांची परिपूर्ती होणे म्हणजे त्याच्या प्रेमाची सर्वांत धोक्याची कसोटी. एकेकाळी कल्पनाशक्तीला उत्तेजित बनविणारी आणि आत्म्याला उन्मादाने भारून टाकणारी लीझा आता एरास्तच्या दृष्टीने निष्पाप परी राहिली नव्हती. त्याच्या बौद्धिक प्रेमाची जागा आता वैषयिक प्रेमाने व्यापली होती, ज्याचा तो अभिमान बाळगू शकत नव्हता. इतःपर त्या प्रेमात त्याला नवलाई उरली नव्हती. लीझा मात्र पूर्णपणे त्याच्या आधीन बनली होती, तिच्या जीवनाचा तो श्वास बनला होता, गरीब कोकराप्रमाणे त्याच्या सर्व इच्छा ती पूर्ण करीत होती, त्याचे सुख हाच स्वतःचा आनंद मानीत होती. मात्र त्याच्यातील बदल तिच्या ध्यानात आला होता व ती वारंवार म्हणायची : "पूर्वी तू जास्त उल्हासी होतास, पूर्वी आपण जास्त सुखी आणि समाधानी होतो, तुझं प्रेम मी गमावून बसेन अशी मला फार भीती वाटते." काहीवेळा निरोपाचे चुंबन घेताना तो म्हणायचा : "लीझा, उद्या मी तुला भेटू शकणार नाही. एक महत्त्वाचं काम आहे," आणि ह्या शब्दांनंतर प्रत्येक वेळी लीझा उसासा टाकायची.

अखेरीस ओळीने पाच दिवस तो तिला भेटला नाही आणि लीझा व्याकुळ बनली. सहाव्या दिवशी खिन्न मुद्रेने तो आला व तिला म्हणाला : "लाडके लीझा! काही काळपर्यंत मला तुझा वियोग सहन केला पाहिजे. आपल्याकडं युद्ध चाललंय हे तुला माहीत आहे, मी लष्करी सेवेत आहे आणि माझी रेजिमेंट मोहीमेवर निघालीय." लीझाचा चेहरा पांढराफटक पडला. ती जवळजवळ बेशुद्ध पडायच्या बेतात होती.

एरास्तने तिला कुरवाळले आणि सांगितले की, त्याच्या लाडक्या लीझावर तो नेहमी प्रेम करील व घरी परतल्यानंतर त्यांचा कधीही वियोग होणार नाही अशी आशा व्यक्त केली. खूप वेळपर्यंत ती गप्प राहिली. मग तिला रडू कोसळले. त्याचा हात पकडून, त्याच्याकडे अत्यंत प्रेमळपणे पहात तिने विचारले : "तुला राहता येणार नाही?" "येईल," तो उत्तरला, "पण केवळ मोठी मानहानी पत्करून, माझ्या

नावावर मोठा कलंक पत्करून. सगळे माझा तिरस्कार करतील. भित्रा म्हणून, मातृभूमीचा नालायक पुत्र म्हणून, सगळे मला दूषणं देतील." "आह्, जर तसं असेल," लीझा म्हणाली, "तर जा, जा, जिथं देव नेईल! पण कदाचित तू ठार होशील!" "मातृभूमीसाठी मरायला भीती वाटत नाही, लाडके लीझा!" "जर तू जगातून नाहीसा झालास तर मी तात्काळ मरीन!" "असा कशाला विचार करायचा? मी जिवंत राहीन अशी आशा करतो, तुझ्याकडं परत येईन अशी आशा बाळगतो." "देव करो, तसं होवो! दर दिवसाला, दर तासाला, तशी प्रार्थना करीन. अरेरे, का बरं मला लिहा-वाचायला येत नाही? तू मला सर्व हकीकत लिहून कळवली असतीस आणि मी माझ्या आसवांविषयी तुला लिहिलं असतं!" "नाही, सांभाळ स्वतःला, लीझा, तुझ्या मित्राखातर स्वतःला सांभाळ. माझ्या अनुपस्थितीत तू रडावं अशी माझी इच्छा नाही." "दुष्ट माणूस! हा आनंदसुद्धा तू माझ्यापासून हिरावून घेतोस? नाही! तुझा वियोग झाल्यानंतर, जर माझं हृदय कोरडं पडलं, तरच मी रडायची थांबेन." "आपण पुन्हा भेटू त्या प्रिय क्षणाबद्दल विचार कर." "करीन, त्याबद्दल विचार करीन. तो क्षण लौकर येवो! लाडक्या एरास्त! स्वतःपेक्षा तुझ्यावर अधिक प्रेम करणाऱ्या ह्या गरीब बिचाऱ्या लीझाची आठवण ठेव!"

त्यावेळी ती दोघे काय काय बोलली ते सर्व वर्णन करून सांगणे मला शक्य नाही. दुसरा दिवस त्यांच्या संकेतभेटीचा शेवटचा दिवस होता.

एरास्त लीझाच्या आईचा निरोप घ्यायला आला. ह्या **प्रेमळ, देखण्या सद्गृहस्थाला** युद्धावर जावे लागत होते, हे ऐकल्यानंतर तिला रडू आले. त्याने तिला बळजबरीने काही पैसे घ्यायला लावले. तो म्हणाला: "माझ्या अनुपस्थितीत, लीझानं केलेलं काम करारानुसार माझ्या मालकीचं असेल. ते तिनं दुसऱ्या कुणाला विकू नये अशी माझी इच्छा आहे." म्हातारीने त्याला तोंड भरून आशीर्वाद दिले. "देव कृपा करो," ती म्हणाली, "तुला सुखरूप परत आणो आणि तुला परत एकदा ह्या आयुष्यात बघायची मला संधी देवो! तोवर लीझाला तिच्या मनासारखा नवरा सापडेल अशी आशा करते. तिच्या लग्नाला तू हजर

होऊ शकलास तर देवाचे मी खूप खूप आभार मानीन! आणि जेव्हा लीझाला मुलं होतील, तेव्हा साहेबा, तू त्यांचा धर्माचा बाप व्हायला पाहिजे! त्या दिवसाला पाहीपर्यंत जगायची माझी फार इच्छा आहे!" लीझा आईपाशी उभी होती, पण आईकडे नजर उचलून पाहण्याचा तिला धीर झाला नाही. त्या क्षणी तिच्या काय भावना होत्या, ते वाचक सहज समजून घेईल.

पण एरास्तने जेव्हा अखेरचे आलिंगन दिले, तेव्हा तिची काय मनःस्थिती झाली असेल ह्याची कल्पना करा. तिला छातीशी घट्ट धरून तो म्हणाला: "माफ कर, लीझा!" किती हृदयस्पर्शी प्रसंग! किरमिजी सागराप्रमाणं पूर्वेच्या आकाशात पहाट फुटत होती. एका उंच, प्राचीन ओक वृक्षाखाली एरास्त उभा होता व म्लानवदना लीझा त्याच्या बाहुपाशात होती. जेव्हा तिने त्याचा निरोप घेतला, तेव्हा जणू तिचा आत्मा तिचा देह सोडून जात होता. सारा निसर्ग गप्प होता.

लीझा हुंदकत होती, एरास्त रडत होता आणि जेव्हा तो तिला सोडून गेला, तेव्हा ती गुडघ्यांवर खाली टेकली, तिने आकाशाकडे हात पसरले आणि तो दूर दूर दृष्टीआड होईपर्यंत त्याच्याकडे टक लावून ती पहात राहिली. सूर्य उगवला आणि बिचारी, एकाकी लीझा बेशुद्ध पडली.

जेव्हा ती भानावर आली, तेव्हा जग तिला खिन्न व उदास भासले. तिच्या हृदयाच्या लाडक्याबरोबरच निसर्गातील सर्व सौंदर्ये अदृश्य झाली होती. "आह्! " तिच्या मनात विचार आला. "कशाला मी ह्या वाळवंटात एकटी उरले? लाडक्या एरास्तच्या पाठोपाठ उडत जायला मला कशाचा अडथळा येतोय? युद्धाची मला भीती वाटत नाही; जिथ माझा मित्र नाही, तिथं केवळ मला भीती वाटते. त्याच्याबरोबर जगायची आणि त्याच्याबरोबरच मरायची माझी इच्छा आहे, किंवा त्याच्या बहुमोल प्राणांचं रक्षण करताना मला मरण यावं. थांब, थांब, लाडक्या! मी तुझ्याकडं उडत येते!" ती एव्हाना एरास्तपाठी धावण्याच्या बेतात होती, पण तेवढ्यात विचार आला: "मला आई आहे!" ह्या विचाराने तिला थोपविले. लीझाने उसासा टाकला व खालच्या मानेने, मंद पावलांनी ती स्वतःच्या झोपडीकडे निघाली. ह्या क्षणापासून तिचे

दिवस प्रतीक्षेचे आणि दु:खाचे बनले. तिच्या लाडक्या आईपासून तिला स्वत:चे दु:ख लपवावे लागत होते व त्यामुळे तिच्या हृदयाला अधिकच वेदना सहन कराव्या लागत होत्या. फक्त जेव्हा ती एकटीच रानात असायची, तेव्हा स्वत:च्या प्रियकराच्या आठवणीने मनसोक्त रडून दु:ख हलके करायची. अनेकदा तिच्या दु:खाला एका कबूतरीचे करुण घुमणे साद द्यायचे. पण काहीवेळा – मात्र हे अगदी क्वचित घडायचे – आशेचा सोनेरी किरण, सांत्वनाचा किरण, तिच्या दु:खाच्या काळोखामधून चमकून जायचा. "तो परत आला म्हणजे किती सुखी होईन मी! सगळं किती पालटून जाईल!" ह्या विचारासरशी तिची अश्रुभरली नजर स्पष्ट व्हायची, गालांवर गुलाब फुलायचे आणि मुसळधार पावसानंतरच्या मे महिन्यातील सकाळीप्रमाणे लीझा स्मित करायची. अशा स्थितीत सुमारे दोन महिने उलटले.

एके दिवशी आईच्या डोळ्यांमध्ये गुलाबपाणी घालण्यासाठी ते विकत घ्यायला लीझाला मॉस्कोत जावे लागले. एका मोठ्या रस्त्यावर तिला एक आलीशान बग्गी दिसली आणि त्या बग्गीत होता – एरास्त! "आह्!" लीझा चीत्कारली आणि एरास्तकडे धावली, पण बग्गी तिच्याजवळून गेली व एका आवारात वळली. एरास्त बग्गीतून खाली उतरला आणि एका मोठ्या घराच्या पायऱ्या चढू लागला होता, तेवढ्यात तो लीझाच्या बाहुपाशात आवळला गेल्याची त्याला जाणीव झाली. त्याचा चेहरा फिका पडला आणि नंतर तिच्या उद्गारांना एकाही शब्दाने प्रत्युत्तर न देता त्याने तिचा हात धरून तिला स्वत:च्या अभ्यासिकेत नेले, दार बंद केले व तो म्हणाला: "लीझा! परिस्थिती बदललीय. माझा वाङ्निश्चय झालाय. तू मला त्रास देऊ नको आणि स्वत:च्या मन:शांतीसाठी मला विसरून जा. मी तुझ्यावर प्रेम केलं होतं आणि आताही करतो, तुझं भलं व्हावं असं मनापासून चिंततो. हे शंभर रूबल घे", त्याने तिच्या खिशात पैसे कोंबले, "तुझं अखेरचं चुंबन घ्यायची मला परवानगी दे आणि घरी जा." लीझा भानावर येण्यापूर्वीच त्याने तिला अभ्यासिकेबाहेर नेले व नोकराला म्हटले: "ह्या मुलीला घराबाहेर पोचव."

ह्या मिनिटाला माझ्या हृदयातून भळभळा रक्त वाहतेय. एरास्त

हा स्खलनशील पुरुष आहे हे मी विसरतोय, त्याच्या माथी सर्व दोष मारू इच्छितोय, पण माझी जीभ वळत नाही. मी आकाशाकडे पाहतो आणि माझ्या चेहऱ्यावर अश्रू ओघळू लागतात. आह! मी कादंबरी लिहीत नाही, तर एक दुःखी, सत्यकथा लिहितोय!

म्हणजे एरास्तने युद्धावर जातो असे सांगून लीझाला फसविले होते? नाही, तो खरेच त्याच्या रेजिमेंटमध्ये दाखल झाला होता, पण शत्रू-विरुद्ध लढण्याऐवजी तो पत्ते खेळत बसला आणि स्वतःची सर्व संपत्ती जवळजवळ त्याने गमावली. लौकरच तह झाला आणि गळ्यापर्यंत कर्जात बुडालेल्या अवस्थेत एरास्त मॉस्कोला परतला. त्याच्या पूर्वीपासून खूप प्रेमात असलेल्या एका श्रीमंत, वयस्क विधवेशी लग्न करणे, एवढा एकच मार्ग त्याच्यासमोर मोकळा होता. त्याने ते निर्णायक पाऊल उचलले, विधवेच्या घरात तो रहायला गेला आणि प्रामाणिक खेदाचा सुस्कारा टाकून त्याने लीझाचा विचार मनातून काढून टाकला. पण त्यामुळे त्याचे वर्तन योग्य ठरते काय?

लीझा रस्त्यावर आली तेव्हाच्या तिच्या मनःस्थितीचे वर्णन करणे कुठल्याही लेखणीला शक्य नाही. "त्यानं मला हाकलून दिलं? तो दुसरीवर प्रेम करतो? मी संपले!" तिचे हे विचार होते, तिची ही संवेदना होती! ती बेशुद्ध पडली आणि ह्या जाणीवांमध्ये काही काळ खंड पडला. रस्त्यावरून जाणारी एक दयाळू बाई खाली पडलेल्या लीझापाशी थांबली व तिने लीझाला शुद्धीवर आणण्याचे प्रयत्न केले. बिचाऱ्या मुलीने डोळे उघडले, त्या दयाळू बाईच्या मदतीने ती स्वतःच्या पायांवर उभी झाली, तिने त्या बाईचे आभार मानले व वाट फुटेल तिकडे ती जात राहिली. "मी जगणं योग्य नव्हे," लीझाच्या मनात विचार आला, "मी जगणं योग्य नव्हे! माझ्यावर आकाश कोसळलं तर किती बरं होईल! मला बिचारीला धरतीनं गिळून टाकलं तर किती बरं होईल! नाही! आकाश कोसळणार नाही, धरती दुभंगणार नाही! बिच्चारी मी!" ती शहरातून बाहेर पडली व अचानक प्राचीन ओक वृक्षांशेजारच्या खोल तळ्याच्या किनारी ती उभी असल्याचे तिला आढळले. अवघ्या काही आठवड्यांपूर्वी ह्याच स्थळाने तिची उन्मादावस्था पाहिली होती. त्या आठवणीने तिचे हृदय ढवळून निघाले आणि तिच्या चेहऱ्यावर भयानक वेदना उम-

टली. मात्र एक-दोन मिनिटातच तिने स्वतःच्या विचारांना सावरले आणि सभोवार पाहताना तिच्या शेजाऱ्यांची मुलगी (पंधरा वर्षांची) रस्त्यावरून जात असलेली तिला दिसली. लीझाने तिला हाक मारली, खिशातील शंभर रूबलची नोट तिच्यापाशी देत ती म्हणाली: "लाडके आन्यूता, माझ्या मैत्रिणी! हे पैसे माझ्या आईला दे, ते चोरीचे नाहीत. तिला सांग, लीझा तिच्यासमोर अपराधी आहे, एका दुष्ट माणसावर केलेलं प्रेम मी तिच्यापासून लपवून ठेवलं, ए... वरचं! पण त्याचं नाव कशाला सांगू? तिला सांग, त्यानं मला फसवलं, तिला म्हणावं– मला क्षमा कर. देव तिला मदत करील. आता मी तुझा जसा हात चुंबते, तसा तिचा हात तू चुंब. म्हणावं, बिचाऱ्या लीझानं तिचं चुंबन घ्यायला सांगितलं होतं–सांग की मी..." आणि लीझाने तळयात उडी मारली. आन्यूताने खूप आरडाओरडा केला, पण ती लीझाला वाचवू शकली नाही. ती खेड्यात पळत गेली. माणसे गोळा झाली आणि त्यांनी लीझाला तळयातून ओढून बाहेर काढले, पण एव्हाना ती मेली होती.

अशा रीतीने मनाने व देहाने सुंदर असलेल्या त्या मुलीने स्वतःच्या जीवनाचा अंत केला. जेव्हा आपण **तिथे**, नव्या जीवनात भेटू, तेव्हा माझ्या लाडक्या लीझा, मी तुला ओळखीन!

तळयापाशी उदास ओक वृक्षाखाली तिचे दफन करण्यात आले आणि तिच्या थडग्यावर एक लाकडी क्रूस उभारण्यात आला. लीझाच्या अस्थींच्या निवासावर टेकून मी अनेकदा तेथे विचारमग्न होऊन बसतो; माझ्या डोळयांसमोर पाण्यावर तरंग उमटतात; डोक्यावर पाने सळसळतात..

जेव्हा लीझाच्या आईला तिच्या मुलीच्या भयानक मरणाची बातमी समजली, तेव्हा भयाने तिचे रक्त बर्फ बनले आणि तिने कायमचे डोळे मिटले. रिकाम्या झोपडीच्या भिंतींमध्ये वारा कण्हतो आणि रात्रीच्या वेळी तो भयानक आवाज ऐकणारे श्रद्धाळू खेडुत म्हणतात: "तिथं मेलेलं माणूस कण्हतंय; तिथं बिचारी लीझा कण्हतेय!"

एरास्त त्याच्या अखेरच्या दिवसांपर्यंत दुःखी राहिला. लीझाच्या मृत्यूची बातमी कळल्यानंतर त्याचे सांत्वन होईना आणि स्वतःला त्याने खुनी म्हटले. त्याच्या मरणापूर्वी एक वर्ष आधी मी त्याला भेटलो होतो. त्याने स्वतःच मला ही कहाणी सांगितली व लीझाच्या थडग्यापाशी तो मला घेऊन गेला. आता बहुधा त्यांचे मीलन झाले असावे!

१७९२

अलेक्सान्द्र पूश्कीन

टप्पा-स्थानकाचा व्यवस्थापक

अलेक्सान्द्र पूष्कीन (१७९९-१८३७) ह्यांचे साहित्य म्हणजे रशियन संस्कृतीच्या विकासातील एक आख्खे युग. ह्या महान रशियन कवीने रशियन जनतेच्या आत्मजाणीवेचे दर्शन घडविलें, तत्कालीन उत्तमोत्तम माणसांच्या विचारांचे आणि आकांक्षांचे दर्शन घडविलें.

पूष्कीन यांनी रशियन सहित्याच्या विकासाच्या नव्या वाटा मोकळ्या केल्या. त्यांनी साहित्यात वास्तववाद आणला. ह्या नव्या कला-प्रकारामुळे रशियन साहित्याचा दीर्घ काळपर्यंत विकास निर्णित झाला. गोगोलपासून चेखोवपर्यंतचे सर्व थोर रशियन लेखक स्वतःला पूष्कीन यांचे शिष्य व अनुयायी समजत होते.

पूष्कीन फार काळ जगले नाहीत. क्रांतीच्या वेळी रशियात पळून आलेल्या दान्तेस नामक फ्रेंच सरदाराशी द्वंद्व खेळताना वयाच्या ३७ व्या वर्षी पूष्कीन ठार झाले.

पूष्कीन यांचे साहित्यनिर्मितीचे कार्य वीस वर्षांपेक्षा थोडा जास्त काळपर्यंत चाललें. ह्या काळात त्यांनी वेगवेगळ्या साहित्यप्रकारांमध्ये विपुल लेंखन केलें. त्यांच्या पद्य आणि गद्य लेखनात अनेक भावकाव्ये व कविता, 'येवगेनी अनेगिन' ही पद्यकादंबरी, 'बरीस गदूनोव' हे ऐतिहासिक नाटक, 'छोटया शोकांतिका', 'बेल्कीनच्या कथा', 'कप्तानाची मुलगी' ही कादंबरी व इतर अनेक पुस्तकांचा समावेश आहे.

पूष्कीन यांचे पहिलें गद्यलेंखन ('बेल्कीनच्या कथा') (१८३१), हेच रशियन साहित्यातील वास्तववादी कथेचा आरंभ होते.

नागरी दफतरदार,
टप्पा-स्थानकाचा हुकूमशहा.

प्रिन्स व्याझेम्स्की

टप्पा-स्थानकाच्या व्यवस्थापकाला कुणी शिव्या घातलेल्या नाहीत, कुणाचा त्याच्याशी तंटा झालेला नाही? रागाच्या क्षणी कुणी त्याच्याकडून तक्रार-पुस्तिका मागून घेतलेली नाही आणि त्याच्या लहरी वर्तनाबद्दल, उद्धटपणाबद्दल व दिरंगाईबद्दल त्या पुस्तिकेत निरर्थक तक्रारी लिहिलेल्या नाहीत? कोण त्यांना मयत अंमलदारांइतके वाईट मानवरूपी राक्षस किंवा निदानपक्षी मूरोमचे दरोडेखोर समजत नाही? पण तरीही, आपण न्याय्य वागण्याचा प्रयत्न करू, स्वतःला त्यांच्या जागी कल्पू आणि मग कदाचित खूपच मऊपणाने आपण त्यांचा निवाडा करू. टप्पा-स्थानकाचा व्यवस्थापक म्हणजे काय? कनिष्ठ अंमलदारांमधील साक्षात हुतात्मा. केवळ त्याच्या हुद्द्यापायी त्याचा मारहाणीपासून बचाव होतो आणि नेहमी त्याचा बचाव होतोच असे नाही (माझ्या वाचकांच्या सदसद्विवेकबुद्धीला मी आवाहन करतो). प्रिन्स व्याझेम्स्कींनी थट्टेने ज्याला हुकूमशहा म्हटलेय, त्याचे काम प्रत्यक्षात किती अवघड आहे? त्याचे काम म्हणजे साक्षात सक्तमजुरी नव्हे काय? ना दिवसा, ना रात्री त्याला विश्रांती! कंटाळवाण्या प्रवासात झालेल्या सर्व त्रासांचा राग प्रवासी व्यवस्थापकावर काढतो. हवा वाईट आहे, रस्ते भिकार आहेत, गाडीवान हट्टी आहे, घोडे आळशी आहेत—ह्या सर्वांचा दोष व्यवस्थापकाने स्वतःच्या माथी घ्यायचा. त्याच्या गरीब खोपटात प्रवेश करणारा प्रवासी त्याला शत्रू समजतो. अनाहूत पाहुण्याची ब्याद लौकर घालवण्यात यश आले, तर व्यवस्थापक सुदैवी समजावा. पण जर घोडे उपलब्ध नसले तर? बापरे, त्याच्यावर किती धमक्यांचा भडिमार! पावसात चिखल तुडवीत त्याला घरोघर पळावे लागते. चिडलेल्या प्रवा-

शाच्या किंचाळ्या आणि धक्के-बुक्के यांच्यापासून क्षणाची विश्रांती घेण्यासाठी ऐन जानेवारी महिन्यात बाहेर वादळ घोंघावत असताना व गोठवणाऱ्या थंडीचा कडाका असताना, त्याला बाहेर पोर्चमध्ये धाव घ्यावी लागते. एखादा जनरल येतो आणि थरथर कापणारा व्यवस्थापक त्याला शेवटच्या दोन त्रोयका देतो. त्यातील एक त्रोयका वस्तुतः टपालासाठी राखलेली असते. पाचच मिनिटांनंतर घंटांचा आवाज येतो आणि सरकारी दूत ताज्या दमाच्या घोड्यांची मागणी करणारे कागदपत्र टेबलावर भिरकावतो. ह्या सर्व परिस्थितींना तोलून पहा, म्हणजे व्यवस्थापकाचा राग येण्याऐवजी तुमची अंतःकरणे त्याच्याबद्दलच्या प्रामाणिक सहानुभूतीने उचंबळून येतील. ह्या विषयावर आणखी चार शब्द : वीस वर्षांच्या अवधीत सबंध रशियाभर मी प्रवास केलाय. सर्व टपाली रस्ते मला ठाऊक आहेत. गाडीवानांच्या अनेक पिढ्यांशी माझी ओळख आहे. जो मला माहीत नाही आणि ज्याच्याशी माझा व्यवहार झाला नाही, असा व्यवस्थापक विरळाच. प्रवासांमध्ये संचित केलेली माझी निरीक्षणे प्रसिद्ध करण्याचा नजीकच्या काळात माझा इरादा आहे. पण तूर्तास मी एवढेच विधान करतो की, व्यवस्थापकांची जमात पूर्णतया चुकीच्या रीतीने लोकांसमोर सादर केली जाते. अत्यंत बदनाम झालेले हे व्यवस्थापक प्रत्यक्षात फार शांत स्वभावाचे लोक असतात, त्यांचा स्वभाव तडजोडीचा असतो, मिळून-मिसळून वागणारे असतात, लोभी नसतात, फारशी अपेक्षा बाळगणारे नसतात. त्यांच्या संभाषणांमधून खूप काही स्वारस्यपूर्ण आणि बोधक आढळते (अनेक सन्मान्य प्रवासी ह्या गोष्टींकडे दुर्लक्ष करण्याची घोडचूक करतात). माझ्यापुरते सांगायचे, तर मी कबूल करतो की, सरकारी कामानिमित्त प्रवास करणाऱ्या दुय्यम दर्जाच्या अंमलदारांशी गप्पा मारण्यापेक्षा, व्यवस्थापकांशी बोलत बसणे मला जास्त आवडते.

सहज तर्क करता येईल की, मान्यवर व्यवस्थापकांच्या वर्गात माझे काही स्नेही आहेत. खरोखरीच, त्यांच्यापैकी एकाची स्मृती मला फार मोलाची वाटते. माझ्या जीवनाच्या एका विशिष्ट कालखंडात परिस्थितीपायी आम्ही एकत्र आलो होतो आणि आता माझ्या लाडक्या वाचकांना त्याच्याबद्दलची कहाणी सांगण्याचा माझा इरादा आहे.

१८१६ च्या मे महिन्यात *** गूबेर्नियातून प्रवास करण्याचा योग

मला लाभला होता. इतःपर तो मार्ग अस्तित्वात नाही. तेव्हा मी एका कनिष्ठ पदावर काम करीत होतो, टपालगाड्यांमधून प्रवास करीत होतो, केवळ दोन घोड्यांचे भाडे देण्याचीच माझी ऐपत होती. त्यामुळे टप्पा-स्थानकांचे व्यवस्थापक माझी विशेष दखल घेत नसत आणि अनेकदा माझ्या मते हक्काच्या वाटणाऱ्या गोष्टी मला बळजबरीने घ्याव्या लागत. मी तेव्हा तरुण आणि उतावीळ होतो. माझ्या वापरासाठी सज्ज केलेले घोडे कुणा उच्च पदाधिकाऱ्याला देऊन टाकणाऱ्या व्यवस्थापकाच्या नीचपणाचा आणि भेकडपणाचा मला राग यायचा. त्याचप्रमाणे, गव्हर्नरच्या मेजवानीच्या वेळी एखादा पदार्थ मला वाढायचे टाळणाऱ्या हलकट वाढप्याच्या वर्तनाची सवय व्हायलाही मला खूप वेळ लागला. आता मला दोन्हीही बाबी ठीक वाटतात. कारण सर्वमान्य नियमाला – **एका पदाने दुसऱ्या पदाच्या आधीन व्हायचे** – ठोकरून आपण जर त्याऐवजी, **एका मनाने दुसऱ्या मनाला आधीन व्हायचे** असा नियम स्वीकारला असता, तर आपले काय झाले असते? किती तंटे उद्भवले असते! आणि नोकरांनी प्रथम कुणाला वाढले असते? पण मी माझ्या कथेकडे वळतो.

त्या दिवशी खूप गरम होत होते. टप्पा-स्थानकापासून तीन वेर्स्ता* अंतरावर पावसाची झिमझिम सुरू झाली आणि काही मिनिटातच मुसळधार पावसात मी ओलाचिप्प भिजलो. स्थानकावर पोहोचताच माझे पहिले काम होते कपडे बदलण्याचे आणि दुसरे, चहाची मागणी. "ए, दून्या!" व्यवस्थापक ओरडला. "समोवार तापत ठेव आणि दूध आण!" ह्या शब्दांसरशी पार्टीशनआडून चौदा वर्षांची एक मुलगी बाहेर आली व पोर्चकडे धावली. तिचे सौंदर्य पाहून मी थक्क झालो. "ही तुझी मुलगी?" मी व्यवस्थापकाला विचारले. "होय," आत्मप्रौढीने तो उत्तरला. "तिची आई जशी चतुर आणि झटपट होती, तशीच हीसुद्धा आहे." त्याने माझ्या कागदपत्रांची नक्कल करण्याचे काम सुरू केले व मी त्याच्या साध्या, पण नीटनेटक्या घरातील चित्रे पाहू लागलो. 'उधळ्या मुलगा' ही कथा त्या चित्रांमधून चितारली होती. पहिल्या

---

* वेर्स्ता – १.०६६८ कि. मी. – सं.

चित्रात रात्रीची टोपी व अंगरखा घातलेला सन्माननीय म्हातारा अस्वस्थ तरुणाला निरोप देत होता, तो तरुण घाईघाईने म्हाताऱ्याकडून आशीर्वाद व पैशांची थैली घेत होता. दुसऱ्या चित्रात त्या तरुणाचे बेताल वर्तन ठळकपणे दाखविले होते – खोट्या मित्रांच्या आणि निर्लज्ज स्त्रियांच्या संगतीत तो मेजापाशी बसला होता. नंतरचे चित्र होते दरिद्री बनलेल्या, फाटक्या अंगरख्यातील व तिकोनी टोपी घातलेल्या तरुणाचे. तो डुकरांची राखण करीत होता व त्यांच्या खाण्यात वाटेकरी होत होता. त्याच्या चेहऱ्यावर कमालीचा उदास आणि पश्चात्तापाचा भाव होता. मालिकेतील शेवटच्या चित्रात तो बापाकडे परत आलेला दाखविला होता. अजूनही रात्रीची टोपी व अंगरखा घातलेला भला म्हातारा मुलाला भेटायला धावला होता. उधळ्या मुलगा बापाच्या पायांशी झुकला होता. पार्श्वभूमीवर आचारी लठ्ठ वासराची कत्तल करीत होता व मोठा भाऊ नोकरांपाशी मेजवानीचे कारण विचारीत होता. प्रत्येक चित्राखाली अनुरूप जर्मन कडवी मी वाचत होतो. ह्या सर्व गोष्टी माझ्या स्मरणात अजून ताज्या आहेत. त्याचबरोबर, वनस्पतींच्या मुळ्यांच्या अर्कांची मातीची भांडी, रंगीबेरंगी पडद्याचा पलंग आणि माझ्या भोवतालच्या तेथील इतर वस्तूही मला स्पष्ट आठवतात. त्या घराचा मालक अजून माझ्या डोळ्यांसमोर उभा राहतो: सुमारे पन्नाशीचा, निरोगी आणि आनंदी, त्याच्या लांब हिरव्या फ्रॉक-कोटावर मळकट फितींवरून लोंबणारी तीन पदके.

गाडीवानाचे पैसे मी चुकते केले न केले, तेवढ्यात दून्या समोवार घेऊन आली. माझ्यावर तिच्या सौंदर्याची छाप पडल्याचे त्या नखरेल कारटीच्या ताबडतोब ध्यानात आले होते. तिने स्वतःचे टप्पोरे निळे डोळे खाली झुकविले होते. मी तिच्याशी गप्पा मारू लागलो व मुळीच न लाजता, जग पाहिलेल्या मुलीप्रमाणे ती माझ्या प्रश्नांना उत्तरे देत होती. मी तिच्या बापाला पंचचा एक ग्लास दिला. दून्याच्या हाती मी चहाचा कप दिला व जणू खूप काळापासून ओळखीचे असल्याप्रमाणे आम्ही एकत्र गप्पा मारीत बसलो.

घोडे सज्ज झाले होते, पण व्यवस्थापकाचा आणि त्याच्या मुलीचा निरोप घेणे माझ्या जिवावर आले होते. अखेरीस मी त्यांची रजा घेत-

ली. माझा प्रवास सुखकर होवो, अशा बापाने शुभेच्छा दिल्या व मुलगी घोडागाडीपर्यंत मला पोचवायला आली. मी पोर्चमध्ये थांबलो आणि तिच्यापाशी एका चुंबनाची परवानगी मागितली. दून्याने संमती दिली... अनेक चुंबनांची मी मोजदाद करू शकेन,

जेव्हापासून ह्या फंदात मी पडलो,

पण त्यांपैकी एकाही चुंबनाची अशी मोहक आणि कायम आठवण मला राहिली नाही.

अनेक वर्षे उलटली आणि परिस्थितीपायी परत त्याच रस्त्यावरून, त्याच ठिकाणी जाण्याचा मला योग आला. व्यवस्थापकाच्या मुलीची मला आठवण झाली आणि पुन्हा तिला पाहण्याची संधी मिळणार ह्या विचाराने मी सुखावलो. पण मग दुसरा विचार आला की, व्यवस्थापकाची कदाचित हकालपट्टी झाली असेल, दून्याचे एव्हाना लग्न झाले असेल. दोघांपैकी कुणाचा मृत्यू घडला असेल, असाही विचार माझ्या मनात चमकून गेला आणि अशुभाच्या धास्तावल्या मन:स्थितीत स्थानकापाशी मी पोहोचलो.

व्यवस्थापकाच्या घरकुलाशी घोडे थांबले. खोलीत जाताच भिंतीवरील 'उधळ्या मुला'ची सचित्र कथा मी तात्काळ ओळखली. मेज व पलंग पूर्वीच्याच जागी होते, पण खिडकीच्या चौकटीत फुले नव्हती. खोलीतील प्रत्येक वस्तू जीर्णतेची आणि दुर्लक्षाची साक्ष देत होती. मेंढकातडी कोट अंगाभोवती गुंडाळून व्यवस्थापक झोपला होता. माझ्या आगमनामुळे तो जागा झाला व उठून बसला... तो साम्सोन वीरीनच होता. पण किती म्हातारा दिसत होता! माझ्या कागदपत्रांची तो नक्कल करीत होता, तेव्हा त्याचे पांढरे केस, त्याच्या दाढी वाढलेल्या गालांवरील खोल सुरकुत्या, त्याचे वाकलेले खांदे, माझ्या ध्यानात आले. अवघ्या तीन ते चार वर्षांच्या अवधीत एका दणकट माणसाचे कृश म्हाताऱ्यात रूपांतर होऊ शकते, ह्याचे मला विलक्षण आश्चर्य वाटले. "तू मला ओळखलंस?" मी त्याला विचारले. "आपली जुनी ओळख आहे." "शक्य आहे," तो खिन्नपणे उत्तरला. "हा वर्दळीचा रस्ता

आहे. खूप प्रवासी इथं येतात." "दून्या कशी आहे?" मी पुढे विचारले. म्हाताऱ्याच्या कपाळाला आठ्या पडल्या. "देवाला ठाऊक!" तो म्हणाला. "तिचं लग्न झालं वाटतं?" मी विचारले. म्हाताऱ्याने माझा प्रश्न न ऐकल्याचा बहाणा केला व तो माझे कागदपत्र पुटपुटत वाचत राहिला. मी प्रश्न थांबविले आणि चहाची किटली तापविण्यास सांगितले. कुतूहल माझ्या मनाला अस्वस्थ करू लागले आणि पंच माझ्या जुन्या स्नेह्याची जीभ सैल सोडील अशी आशा करू लागलो.

माझा अंदाज चुकला नव्हता: म्हाताऱ्याने पंचचा ग्लास नाकारला नाही. रम प्यायल्यावर त्याची उदासीनता नष्ट झाल्याचे मी पाहिले. दुसऱ्या ग्लासाला तो बोलका बनला, मी कोण होतो हे त्याला आठवले, निदान माझी ओळख पटल्याचा त्याने बहाणा केला. त्याच्या तोंडून जेव्हा मी त्याची कथा ऐकली, तेव्हा त्यावेळी मला ती खूप स्वारस्यपूर्ण वाटली व मी हेलावून गेलो होतो.

"तर माझी दून्या तुम्हाला माहीत होती?" त्याने सुरुवात केली. "तिला कोण ओळखत नव्हतं? अग, दून्या, दून्या! काय पोरगी होती! इथं येणारा प्रत्येकजण तिचं कौतुक करायचा, कुणी एका शब्दानं तिच्याविरुद्ध तक्रार करायचा नाही. मोठ्या घरच्या बायका तिला भेटवस्तू द्यायच्या–कुणी हातरुमाल, कुणी कानातले डूल. साहेब लोक प्रवासात मुद्दाम इथं थांबत. दुपारच्या किंवा रात्रीच्या जेवणाचं निमित्त करत. पण प्रत्यक्षात तिला जास्तीत जास्त वेळ पाहता यावं, हाच त्यांचा उद्देश असे. एखादा गृहस्थ कितीही चिडलेला असला, तरी तिला पाहताच एकदम शांत व्हायचा आणि माझ्याशी चांगुलपणानं बोलायचा. तुमचा विश्वास बसणार नाही, पण सरकारी दूत तिच्याशी अर्धा-अर्धा तास बोलत बसायचे. माझं घर तिच्यावर अवलंबून होतं. घर स्वच्छ करणं, स्वैपाक करणं, बाकी गोष्टी उरकणं–सगळ्याला तिला सवड सापडायची. आणि मी, मूर्ख म्हातारा, तिच्यावरून नजर काढायचा नाही, तिच्याबद्दलचा आनंद माझ्यात मावायचा नाही. माझ्या दून्यावर मी प्रेम केलं नाही काय? माझ्या पोरीला मी जपलं नाही काय? तिला चांगलं आयुष्य जगायला मिळत नव्हतं काय? पण नुसत्या प्रार्थना करून तुम्ही संकटांना दूर ठेवू शकत नाही. दैवापासून पळवाट

नाही." इथे त्याने त्याच्या दुर्दैवाची तपशीलवार हकीकत सांगायला आरंभ केला.

तीन वर्षांपूर्वी, एका हिवाळी सायंकाळी, जेव्हा व्यवस्थापक नव्या नोंदणीवहीत रेघा आखत होता आणि त्याची मुलगी पार्टीशनआड बसून नवा पोषाख शिवत होती, तेव्हा एक त्रोयका येऊन थांबली व चेर्कास्की टोपीतील, लष्करी ओव्हरकोटातील, जाड मफलर गुंडाळलेला एक प्रवासी आत आला आणि त्याने ताज्या दमाच्या घोड्यांची मागणी केली. सगळे घोडे बाहेर गेले होते. हे ऐकताच प्रवाशाने त्याचा आवाज व चाबूक उंचावला. पण अशा प्रसंगांशी परिचित असलेली दून्या एकदम पार्टीशनमागून धावत आली व काही खायला पाहिजे का, असे प्रवाशाला उद्देशून तिने मधुरपणे विचारले. दून्याच्या आगमनाने अपेक्षित परिणाम साधला. प्रवाशाचा राग नाहीसा झाला. घोड्यांची वाट पहायचा त्याने निर्णय घेतला व जेवण मागवले. ओली केसाळ कातडीची टोपी डोक्यावरून उतरवून, ओव्हरकोट बाजूला फेकून आणि गळ्याभोवतालचा मफलर सोडवून तो बसला, तेव्हा बारीक काळ्या मिशीचा सडपातळ तरुण हुस्सार असल्याचे आढळले. व्यवस्थापकाच्या घरात त्याने ऐसपैस आसन मांडले व लौकरच व्यवस्थापकाशी आणि त्याच्या मुलीशी तो मजेने गप्पा मारू लागला. जेवण मांडण्यात आले. दरम्यान घोडे परतले आणि त्यांना दाणा-वैरण न घालताच प्रवाशाच्या घसरगाडीला जुंपण्याचा व्यवस्थापकाने हुकूम दिला. पण तो खोलीत परत आला, तेव्हा तरुण हुस्सार बाकड्यावर निपचित पडल्याचे त्याला आढळले. हुस्साराला चक्कर येत होती, त्याचे डोके दुखत होते, प्रवास करण्याजोगी त्याची परिस्थिती नव्हती... काय करायचे! व्यवस्थापकाने स्वत:चा पलंग हुस्साराला दिला आणि ठरविण्यात आले की, दुसऱ्या दिवसापर्यंत रुग्णाची प्रकृती सुधारली नाही, तर *** गावातून डॉक्टरला बोलावून आणायचे.

दुसऱ्या दिवशी हुस्साराची प्रकृती अधिकच बिघडली. त्याचा नोकर शेजारच्या शहरातून डॉक्टरला आणायला गेला. शिरक्यामध्ये भिजवलेल्या रुमालाची पट्टी हुस्साराच्या कपाळावर ठेवून दून्या त्याच्या बिछान्याशेजारी बसली व शिवणकाम करू लागली. व्यवस्थापकाच्या उपस्थितीत रुग्ण

कण्हायचा आणि त्याच्या तोंडून कष्टाने शब्द बाहेर फुटायचा. मात्र तो दोन कप कॉफी प्यायला आणि कण्हतच त्याने जेवणाची मागणी केली. दून्या त्याच्या उशीपासून अजिबात हलत नव्हती. तो सतत प्यायला मागायचा आणि स्वतःच्या हातांनी बनविलेल्या लेमोनेडचा ग्लास दून्या सतत त्याला आणून द्यायची. रुग्ण स्वतःचे ओठ ओले करायचा आणि ग्लास परत करताना कृतज्ञतेची खूण म्हणून दून्याचा हात दुबळेपणाने दाबायचा. दुपारच्या जेवणाच्या वेळी डॉक्टर आला. त्याने रुग्णाची नाडी तपासली, रुग्णाची तो जर्मन भाषेत बोलला व रशियन भाषेत जाहीर केले की, रुग्णाला केवळ विश्रांतीची गरज आहे आणि दोन दिवसांनंतर प्रवास करण्याइतपत त्याची अवस्था सुधारेल. हुस्साराने डॉक्टरच्या हाती फीदाखल पंचवीस रूबल ठेवले आणि जेवायला बसायचे निमंत्रण दिले. डॉक्टरने त्याचे निमंत्रण स्वीकारले. दोघे भरपूर जेवले, बाटलीभर मद्य प्यायले आणि एकमेकांवर खूष होऊन त्यांनी निरोप घेतला.

आणखी एक दिवस उलटला आणि हुस्सार ठणठणीत बरा झाला. तो अत्यंत आनंदात होता, व्यवस्थापकाशी आणि दून्याशी सतत विनोद करीत होता, शीळेवर गाणी वाजवीत होता, प्रवाशांबरोबर गप्पा मारीत होता, त्यांच्या कागदांची नोंदणी-वहीत नोंद करीत होता. दयाळू व्यवस्थापकाला त्याने एवढा लळा लावला की, तिसऱ्या दिवशी सकाळच्या दरम्यान ह्या प्रसन्न पाहुण्याच्या वियोगाची कल्पनाच त्याला सहन होईना. तो रविवार होता आणि दून्या चर्चला जाण्यासाठी तयार झाली होती. हुस्साराची घसरगाडी आणण्यात आली. व्यवस्थापकाला राहण्या-जेवण्याबद्दल भरपूर पैसे देऊन त्याने त्याचा निरोप घेतला. त्याने दून्याचाही निरोप घेतला आणि खेडयाच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या चर्चपर्यंत तिला घसरगाडीमधून सोडण्याची तयारी दर्शविली. दून्या घोटाळ्यात पडलेली दिसली... "भितेस काय?" बाप तिला म्हणाला. "साहेब काही लांडगा नाहीत -- तुला ते खाणार नाहीत! जा चर्चपर्यंत त्यांच्या गाडीतून!" दून्या गाडीत हुस्साराशेजारी बसली, नोकर उडी मारून पेटीवर बसला, गाडीवानाने शीळ घातली व घोडे दौडू लागले.

दुर्दैवी व्यवस्थापकाला कधीच समजू शकले नाही की, दून्याला त्याने

हुस्साराबरोबर जाण्याची परवानगी कशी दिली, एवढा तो आंधळा कसा बनला, कशाने त्याला झपाटले! जेमतेम अर्धा तास उलटला असेल, त्याला काळजात कुरतडण्याची भावना जाणवू लागली आणि चिंतेने त्याला एवढे घेरले की, न राहवून तो चर्चकडे तिच्या शोधासाठी गेला. चर्चपाशी तो पोहोचला, तेव्हा माणसे बाहेर पडत असलेली त्याला दिसली, पण दून्या ना आवारात होती, ना प्रवेशद्वाराशी. तो घाईने चर्चमध्ये गेला. पाद्री देवाची वेदी सोडून गेला होता, चर्चचा कारभारी मेणबत्त्या विझवत होता. दोन म्हाताऱ्या कोपऱ्यात बसून अजूनही प्रार्थना करीत होत्या. पण दून्या कुठेच दिसत नव्हती. अभागी बापाने शेवटी चर्चच्या कारभाऱ्यापाशी दून्या पूजेच्या वेळी आली होती का, अशी चौकशी केली. कारभाऱ्याने नकारार्थी उत्तर दिले. व्यवस्थापक अर्धमेल्या मन:स्थितीत घरी परतला. आता त्याला एकच आशा उरली होती—तारुण्यसुलभ चंचलतेने दून्या पुढच्या टप्पा-स्थानकावर राहणाऱ्या तिच्या धर्माच्या आईपाशी गेली असावी. अत्यंत अधीरपणे तो घोडे परतण्याची वाट पाहू लागला. पण दिवस उलटला, तरी गाडीवान परतला नाही. शेवटी रात्री, झिंगल्या अवस्थेत गाडीवान आला. त्याने भयानक वार्ता आणली होती: "दून्या पुढच्या टप्पा-स्थानकापासून हुस्साराबरोबर निघून गेली होती."

म्हाताऱ्याला ह्या दुर्दैवाचा आघात सोसला नाही. आदल्या दिवशी तरुण लुच्चा ज्यावर झोपला होता, त्याच पलंगावर व्यवस्थापकाने अंथरुण धरले. सर्व परिस्थितीचा आढावा घेतल्यावर व्यवस्थापकाने तर्क केला की, त्या माणसाचा आजार खोटा होता. म्हातारा तापाने झपाटला व *** शहरी उपचारांसाठी त्याला नेण्यात आले. त्याच्या जागी दुसरा व्यवस्थापक तात्पुरते काम पाहू लागला. हुस्साराला तपासायला आलेला डॉक्टरच आता व्यवस्थापकावर उपचार करीत होता. त्याने व्यवस्थापकाला खात्रीपूर्वक सांगितले की, तरुण हुस्साराची प्रकृती ठणठणीत होती, त्याच्या दुष्ट हेतूंचा त्याला तेव्हाच सुगावा लागला होता, पण हुस्साराच्या चाबकाच्या धास्तीने काहीही बोलला नव्हता. जर्मन खरे बोलत होता अथवा स्वत:च्या दूरदर्शीपणाची बढाई मारत होता हे समजायला मार्ग नव्हता, पण बिचाऱ्या आजाऱ्याचे त्याने मुळीच सांत्वन केले

नाही. व्यवस्थापकाने आजारातून जेमतेम बरे होताच *** शहरातील वरिष्ठांपाशी दोन महिन्यांची रजा मागितली व स्वतःच्या हेतूंविषयी कुणापाशी चकार शब्द न काढता, मुलीच्या शोधासाठी तो पायीच प्रवासाला निघाला. नोंदवहीवरून त्याला समजले की, कप्तान मीन्स्की स्मोलेन्स्कहून पीटरबुर्गला गेला होता. त्याला घेऊन जाणाऱ्या गाडीवानाने व्यवस्थापकाला सांगितले की, दून्या सबंध रस्ताभर रडत होती, मात्र ती स्वेच्छेने जात होती हे स्पष्ट दिसत होते. "देवाची कृपा असेल," व्यवस्थापकाने विचार केला, "तर वाट चुकलेल्या माझ्या कोकराला मी घरी परत आणीन." ह्या विचारासरशी हुरूप येऊन तो पीटरबुर्गमध्ये आला. त्याच्या लष्करी सेवेच्या काळातील जुन्या स्नेह्याच्या घरी, सेवानिवृत्त नॉन-कमिशन्ड ऑफीसरच्या घरी, इझ्मायलोव रेजिमेंटच्या बराकीत त्याने मुक्काम टाकला. तेथून त्याने शोध सुरू केला. लौकरच त्याला आढळले की, कप्तान मीन्स्की पीटरबुर्गमध्ये आहे, देमुतोव पथिकाश्रमात रहात आहे. व्यवस्थापकाने त्याची भेट घेण्याचा निर्धार केला.

भल्या सकाळीच तो हुस्साराच्या पुढच्या दाराशी उभा झाला आणि एक जुना सैनिक साहेबांना भेटू इच्छितोय असा निरोप देण्याची त्याने नोकराला विनंती केली. बुटांना पॉलीश करणाऱ्या नोकराने सांगितले की, त्याचे साहेब झोपले होते आणि अकरा वाजण्यापूर्वी ते कुणालाही भेटत नाहीत. व्यवस्थापक निघून गेला व ठरल्या वेळी परतला. ड्रेसिंग गाऊन आणि किरमिजी टोपी घातलेला मीन्स्की स्वतःच बाहेर आला. "बंधू, तुला काय पाहिजे?" त्याने व्यवस्थापकाला विचारले. म्हाताऱ्याचे काळीज भावनावेगाने खळबळले, त्याच्या डोळ्यांमध्ये पाणी तरारले. कापऱ्या आवाजात तो केवळ म्हणत राहिला: "साहेब!.. देवाखातर कृपा करा!".. मीन्स्कीने व्यवस्थापकाकडे पटकन कटाक्ष टाकला, त्याचा चेहरा लाल झाला, त्याने व्यवस्थापकाचा हात धरून आत अभ्यासिकेत त्याला नेले व आतून दार बंद केले. "साहेब!.." म्हातारा पुढे बोलू लागला, "भांड्यातून जे पडलं, ते गमावलं. निदान माझी गरीब बिचारी दून्या मला परत करा! तुम्ही तिला उपभोगलंत. आता निष्कारण तिचा नाश करू नका!" "जे केलं ते परतवता येत नाही," तरुण अत्यंत भावनावश होऊन म्हणाला. "मी तुझा अपराधी

आहे आणि तुझी क्षमा मागायला तयार आहे. पण मी दून्याला टाकून देईन असं समजू नकोस. ती सुखी होईल. मी तुला शब्द देतो. कशाला हवी ती तुला? तिचं माझ्यावर प्रेम आहे. पूर्वीच्या परिस्थितीची तिला सवय राहिली नाही. जे घडलं ते ना तू, ना ती विसरू शकाल." मग व्यवस्थापकाच्या हातात त्याने काहीतरी कोंबले, दार उघडले आणि रस्त्यावर आपण कसे आलो ते व्यवस्थापकाला समजलेच नाही.

बराच काळपर्यंत तो निश्चल उभा होता. शेवटी त्याच्या ध्यानात आले की, त्याच्या हाती कागदांचे पुडके होते. त्याने पुडके सोडले तेव्हा पाच आणि दहा रूबलच्या चुरगळलेल्या नोटा त्यातून बाहेर पडल्या. पुन्हा त्याचे डोळे अश्रूंनी डबडबले. हे संतापाचे अश्रू होते. त्याने त्या नोटा चुरगाळून त्यांचा चेंडू बनवला, जमिनीवर फेकला व टाचांखाली तुडवला आणि तो निघून गेला... काही पावले चालून गेल्यावर तो थांबला व विचार करू लागला... परतला... पण एव्हाना नोटा तेथे नव्हत्या. चांगल्या पोषाखातील एक तरुण त्याला पाहताच गाडीवानाकडे धावला, घाईघाईने घोडागाडीत बसला व ओरडला: "चलो!" व्यवस्थापक त्याच्यामागे धावला नाही. स्वतःच्या टप्पा-स्थानकाकडे परतायचा त्याने निर्णय घेतला. पण जाण्यापूर्वी निदान एकदा स्वतःच्या दून्याला पाहण्याची त्याची इच्छा होती. म्हणून, दोन दिवसांनंतर, मीन्स्कीच्या घरी तो परत गेला. पण लष्करी नोकराने कडक आवाजात त्याला सांगितले की, त्याचे साहेब कुणालाही भेटत नाहीत आणि त्याला धक्के मारून हॉलबाहेर घालवत त्याने त्याच्या तोंडावर दार बंद केले. व्यवस्थापक बाहेर काही काळ उभा राहिला व नंतर निघून गेला.

त्याच दिवशी संध्याकाळी सर्व हुतात्म्यांच्या चर्चमधील प्रार्थनेला हजर राहिल्यानंतर तो लीतेयनाया रस्त्यावरून चालला होता. एक डौलदार घोडागाडी त्याच्या जवळून गेली आणि व्यवस्थापकाने मीन्स्कीला ओळखले. एका तीन मजली घरापाशी घोडागाडी थांबली आणि हुस्सार उडी मारून प्रवेशद्वारात गेला. व्यवस्थापकाच्या मनात एक सुखी विचार आला. मागे परतून घोडागाडीपाशी येत त्याने गाडीवानाला विचारले: "बंधू, हा घोडा कुणाचा? मीन्स्कीचा तर नव्हे?" "होय," गाडीवान म्हणाला, "तुला काय करायच्यात चौकशा?" "त्याचं असं आहे, तुझ्या

धन्यानं मला त्याच्या दून्याला देण्यासाठी चिठी दिली होती आणि त्याची दून्या कुठं राहतेय ते मी विसरलोय." "इथंच राहते, दुसऱ्या मजल्या-वर. बंधू, तुझ्या चिठीसकट तुला पोचायला उशीर झाला. आता तो स्वतःच तिच्याकडं गेलाय." "काही हरकत नाही," व्यवस्थापक म्हणाला. त्याच्या काळजात विचित्र फडफड झाली. "मला थाऱ्यावर आणल्याबद्दल धन्यवाद, पण मी माझं काम करतो." एवढे बोलून तो जिना चढू लागला.

दार बंद होते. त्याने घंटी वाजवली व ताणलेल्या प्रतीक्षेत काही क्षण गेले. कुलूपात किल्ली फिरली व दार उघडले. "इथं आवदोत्या साम्सोनोवना राहतात?" त्याने विचारले. "होय," तरुण मोलकरीण म्हणाली. "कशाला पाहिजेत त्या तुला?" व्यवस्थापक उत्तर न देता हॉलमध्ये गेला. "नाही, आत जायचं नाही!" मोलकरीण त्याच्या पाठोपाठ जात ओरडली. "आवदोत्या साम्सोनोवनाकडं पाहुणे आलेत!" पण व्यवस्थापक दुर्लक्ष करून आणखी पुढे गेला. पहिल्या दोन खोल्यां-मध्ये अंधार होता, पण तिसरीत दिवा जळत होता. उघड्या दारांपाशी तो गेला व थबकला. उत्तम सजवलेल्या खोलीत मीन्स्की खूप विचारात गढून बसला होता. झकास नटलेली दून्या त्याच्या खुर्चीच्या हातावर बसली होती – इंग्रज रीतीने एका बाजूने घोड्यावर बसतात तशी. ती मीन्स्कीकडे प्रेमाने टक लावून पह्यात होती, हिरे चमकणाऱ्या स्वतःच्या बोटांभोवती त्याच्या काळ्या झुलूपांना गुंडाळीत होती. बिचारा व्यव-स्थापक! स्वतःची मुलगी यापूर्वी एवढी सुंदर त्याला कधीही भासली नव्हती. नकळत तो तिला कौतुकाने न्याहाळू लागला. "कोण आहे?" डोके वर न उचलताच तिने विचारले. तो गप्प राहिला. उत्तर न मि-ळाल्यामुळे दून्याने मान वर केली... आणि किंचाळून ती गालीच्यावर कोसळली. मीन्स्की घाबरून तिला उचलायला धावला, पण दाराशी म्हातारा व्यवस्थापक नजरेला पडताच दून्याला सोडून तो संतापाने थर-थरत व्यवस्थापकापाशी आला. "काय पाहिजे तुला?" दात आवळून त्याने विचारले. "एखाद्या दरोडेखोरासारखा माझ्या पाठी का फिरतो आहेस? माझा जीव घ्यायचा इरादा आहे का? चालता हो!" आणि

म्हाताऱ्याची कॉलर खस्सदिशी पकडून त्याने त्याला जिन्यावरून खाली ढकलून दिले.

म्हातारा मित्राच्या घरी आला. त्याने तक्रार नोंदवावी असा मित्राने सल्ला दिला. पण विचारांती व्यवस्थापकाने हात झटकून माघार घ्यायचे ठरविले. दोन दिवसांनंतर पीटरबुर्गहून स्वतःच्या टप्पा-स्थानकाकडे तो रवाना झाला व कामावर परत रुजू झाला. "आता जवळ जवळ तीन वर्षं झाली," समारोप करीत तो म्हणाला, "दून्याशिवाय मी राहतोय आणि तिच्याबद्दल काहीही बातमी ऐकली नाही. जिवंत आहे अथवा नाही, देवाला ठाऊक. काहीही घडतं. लबाड प्रवाशानं फूस लावून पळवलेली, अंगवस्त्र म्हणून ठेवलेली आणि मग टाकून दिलेली ती काही पहिली मुलगी नव्हे आणि शेवटचीही नव्हे. पीटरबुर्गमध्ये तिच्यासारख्या अनेक मूर्ख तरुण पोरी आहेत. आज सॅटिन आणि वेल्वेटच्या पोषाखात सजलेल्या दिसतात, तर दुसऱ्या दिवशी फाटकी लक्तरं नेसून रस्ते झाडताना दिसतात. काही वेळा मनात विचार येतो की, दून्यासुद्धा त्यांच्यात पडली असेल, तेव्हा नकळत पापी इच्छा होते की, त्यापेक्षा ती थडग्यात असलेली जास्त इष्ट..."

माझ्या मित्राची, म्हाताऱ्या व्यवस्थापकाची, अशी कहाणी होती. कथन करताना अनेकदा अश्रूंनी तिच्यात व्यत्यय आणला. द्मित्रीयेवच्या सुरेख पोवाड्यातील उत्साही तेरेन्तीचप्रमाणे स्वतःच्या कोटाच्या किनारीने त्या अश्रूंना तो पुसून टाकत होता. कथनाच्या क्रमात त्याने रिचविलेले पंचचे पाच ग्लास त्या अश्रूना अंशतः कारणीभूत होते, पण तरीही त्यांनी माझे अंतःकरण जबरदस्त हेलावून टाकले. त्याचा निरोप घेतल्यानंतर खूप काळपर्यंत म्हाताऱ्या व्यवस्थापकाला मी विसरू शकलो नाही, बिचाऱ्या दून्याविषयी खूप काळ विचार करीत राहिलो...

अलिकडेच *** वस्तीमधून प्रवास करीत होतो, तेव्हा माझ्या मित्राची मला आठवण झाली. त्याचा अंमल चालायचा ते टप्पा-स्थानक आता अस्तित्वात नसल्याचे मला समजले. "म्हातारा व्यवस्थापक जिवंत आहे का?" ह्या प्रश्नाला कुणीही समाधानकारक उत्तर देऊ शकला नव्हता. परिचित स्थळांना भेट देण्याची मला इच्छा झाली व घोडे भाड्याने घेऊन मी न. खेड्यात गेलो.

शरदाचा मोसम होता. आकाश मेघांनी भरले होते, रित्या शेतांमधून वारा वाहात होता, जाता जाता झाडांची तांबडी-पिवळी पाने वाहून नेत होता. सूर्यास्तापूर्वी मी खेड्यात पोहोचलो आणि व्यवस्थापकाच्या घरासमोर थांबलो. एक लठ्ठ बाई पोर्चमध्ये आली (जेथे कोणे एके काळी बिचाऱ्या दून्याने माझे चुंबन घेतले होते) आणि माझ्या चौकशांना उत्तरे देताना म्हणाली की, म्हातारा व्यवस्थापक एका वर्षापूर्वी वारला होता, त्याचे घर आता बीयर गाळणाऱ्याच्या मालकीचे आहे आणि ती स्वत: बीयरवाल्याची बायको आहे. माझ्या व्यर्थ प्रवासाबद्दल आणि सात रूबलच्या निरर्थक खर्चाबद्दल मला खेद वाटू लागला. "कशामुळं वारला तो?" मी बाईला विचारले. "दारू पिऊन पिऊन," ती उत्तरली. "त्याला कुठं पुरलंय?" "खेड्यापलिकडं, त्याच्या बायकोच्या थडग्याशेजारी." "त्या थडग्यापाशी कुणी मला घेऊन जाईल का?" "का नाही. ए, वान्का! मांजराशी खेळणं पुरे कर! साहेबांना स्मशानापर्यंत सोबत कर आणि व्यवस्थापकाचं थडगं दाखव!"

लाल केसांचा, चकणा, फाटक्या कपड्यांमधला एक पोरगा धावत आला व खेड्याच्या टोकापाशी मला घेऊन गेला.

"मयताला तू ओळखत होतास?" वाटेवर मी त्याला विचारले.

"अर्थात! त्यानं मला शिट्या बनवायला शिकवलं होतं. जेव्हा तो गुत्त्यामधून यायचा (देव त्याच्या आत्म्याला शांती देवो!), तेव्हा आम्ही पोरं त्याच्या पाठी धावत ओरडायचो: 'आजोबा! आजोबा! दाणे दे!' आणि तो आम्हाला दाणे द्यायचा. नेहमी आमच्याबरोबर खेळायचा."

"प्रवासी त्याची आठवण काढतात?"

"आता फारसे प्रवासी येत नाहीत. एखादा फिरता मॅजिस्ट्रेट येतो, पण तो मेलेल्या माणसांचा कधी विचार करत नाही. मात्र ह्या उन्हाळ्यात एक बाईसाहेब आल्या होत्या, त्यांनी म्हाताऱ्या व्यवस्थापकाची चौकशी केली आणि त्याचं थडगं पहायला गेल्या."

"कशा होत्या बाईसाहेब?" मी कुतूहलाने विचारले.

"सुंदर होत्या," पोरगा म्हणाला. "सहा घोड्यांच्या बग्गीतून आल्या होत्या, त्यांच्याबरोबर तीन लहान मुलं होती, एक दाई होती

आणि काळा कुत्रा होता. म्हातारा व्यवस्थापक मेल्याचं ऐकल्यानंतर त्या रडल्या आणि मुलांना म्हणाल्या: 'इथं शांत बसा. मी स्मशानात जाऊन येते.' मी त्यांच्याबरोबर येतो म्हटलं. पण त्या म्हणाल्या: 'मला वाट ठाऊक आहे.' त्यांनी मला चांदीचे पाच कोपेक बक्षीस दिले. फार चांगल्या बाईसाहेब होत्या!"

आम्ही स्मशानात पोहोचलो. ओसाड जागा, कठडे नाहीत, लाकडी क्रूसांचे ठिपके पसरलेले आणि एकाही झाडाची सावली नाही. एवढी भकास स्मशानभूमी मी आयुष्यात कधी पाहिली नव्हती.

"हे पहा म्हाताऱ्या व्यवस्थापकाचं थडगं," वाळूच्या ढिगावर उडी मारत मुलगा म्हणाला. पितळी तसबीर ठोकलेला काळा क्रूस त्या ढिगात खुपसलेला होता.

"त्या बाईसाहेब इथं आल्या?" मी विचारले.

"होय," वान्या उत्तरला. "मी लांबून पहात होतो. इथं खूप वेळपर्यंत त्या पडून होत्या. मग बाईसाहेब खेड्यात गेल्या, त्यांनी पाद्रयाला बोलावून घेतलं, त्याला काही पैसे दिले आणि मला चांदीचे पाच कोपेक दिले—फार चांगल्या बाईसाहेब होत्या!"

मीसुद्धा पोराला पाच कोपेकचे नाणे दिले. आता माझ्या प्रवासाबद्दल अथवा सात रूबलच्या खर्चाबद्दल मला खेद वाटत नव्हता.

१८३०



निकोलाय गोगोल

नाक

निकोलाय गोगोल (१८०९-१८५२)–"प्रत्यक्ष जीवनात कवी," राष्ट्रीय लेखक "ह्या शब्द सर्वार्थाने सार्थ" अशा रीतीने टीकाकार-देमोक्रात वि. बेलीन्स्की यांनी निकोलाय गोगोल यांचे वर्णन केलें होते.

१९ व्या शतकातील चौथ्या व पाचव्या दशकांमध्ये रशियात जेव्हा राजकीय दडपशाहीचे थैमान चालू होते, तेव्हा गोगोलनी भोवतालच्या जीवनातील विकृतींवर संतापून प्रहार केले. दलित मानवाच्या रक्षणार्थ सामाजिक विषमतेविरुद्ध त्यांनी धैर्याने आवाज उठवला.

'दिकान्का खेड्यातील संध्याकाळी' (१८३१-१८३२) ह्या कथासंग्रहाच्या प्रकाशनानंतर गोगोल यांची साहित्यिक म्हणून ख्याती पसरू लागली. 'मीरगोरद' आणि 'आराबेस्की' (१८३५) ह्या संग्रहांच्या प्रकाशनानंतर व 'रेविझोर' ('अंमलदार') हे विनोदी नाटक रंगमंचावर आल्यानंतर, गोगोल यांची सर्वोत्तम रशियन लेंखकांमध्ये गणना होऊ लागली. 'मृतात्मे' ह्या गद्यात गोगोल यांच्या उत्कृष्ट काव्यप्रतिभेचे दर्शन घडलें.

त्यांच्या लेंखनात भावात्मकता व विनोद, काव्य आणि उपहास यांचा संगम आढळतो. अत्यंत चतुराईने हास्यामधून "जगाला न दिसणारे अश्रू" गोगोल दाखवितात.

१

२५ मार्च रोजी पीटरबुर्गमध्ये एक विलक्षण घटना घडली. वोझ्नेसेन्स्की प्रॉस्पेक्तवरील न्हावी इवान याकोवलेविच (त्याचे आडनाव गायब झाले आहे आणि त्याच्या दुकानाच्या पाटीवरसुद्धा आढळत नाही; त्या पाटीवर गालाला भरपूर साबण फासलेल्या एका पुरुषाचे चित्र आहे व त्याखाली मजकूर: "रक्तसुद्धा काढले जाते.") भल्या सकाळीच जागा झाला आणि गरम पावाचा खमंग वास त्याच्या नाकात शिरला. बिछान्यावरून किंचित वर उठून त्याने पाहिले की, त्याची बायको, कॉफीची आवड असलेली एक अत्यंत प्रतिष्ठित महिला, भट्टीमधून नुकतेच भाजलेले पाव बाहेर काढत होती.

"आज मी, प्रास्कोव्या ओसीपोवना, कॉफी पिणार नाही," इवान याकोवलेविच म्हणाला, "त्याऐवजी कांद्याबरोबर गरम गरम पाव खाईन."

(खरे म्हणजे इवान याकोवलेविचला कॉफीसुद्धा हवी होती, पण पाव व कॉफी अशा दोन्ही गोष्टी एकदम मागणे व्यर्थ होते हे त्याला माहीत होते, कारण प्रास्कोव्या ओसीपोवनाला मनाच्या अशा लहरी आवडत नसत.) "मूर्खाला पाव खुशाल खाऊ दे. त्यात माझाच फायदा आहे," बायकोने मनाशी विचार केला, "कॉफीचा जादा वाटा माझ्यासाठी शिल्लक राहील." तिने मेजावर पावाचा एक तुकडा फेकला.

सभ्यतेखातर इवान याकोवलेविचने रात्रीच्या सदऱ्यावर कोट घातला आणि मेजापाशी बसून थोडे मीठ घेतले, दोन कांदे सोलले, हाती सुरी घेतली व अत्यंत गंभीर आव आणून सुरीने पावाच्या फाका कापायला आरंभ केला. अर्धा पाव कापल्यानंतर त्याने पावाच्या आत नजर टाकली

आणि आश्चर्य म्हणजे काहीतरी पांढरी वस्तू आत असल्याचे त्याला आढळले. इवान याकोवलेविचने काळजीपूर्वक सुरीने कोरले व बोटाने ती वस्तू टोचून पाहिली. "घट्ट आहे..." तो स्वतःशी म्हणाला, "काय असावं बरं हे?"

त्याने पावात बोटे खुपसली व ती वस्तू बाहेर खेचून काढली – नाक! .. तात्काळ त्याचे हात लुळे पडले. मग त्याने स्वतःचे डोळे चोळले आणि परत ती वस्तू चाचपून पाहिली : होय, नाकच, मुळीच संशय नव्हता! एवढेच नव्हे तर ते नाक परिचित दिसत होते. इवान याकोवलेविचच्या चेहऱ्यावर भीती उमटली. पण त्याची ही भीती त्याच्या बायकोच्या संतापापुढे अगदीच फिकी पडली.

"अरे जनावरा, कुठं कापलंस तू हे नाक?" चिडून ती किंचाळली. "दुष्ट! दारुडा! मीच जाऊन तुझ्याविरुद्ध पोलीसात तक्रार गुदरते. बदमाश कुठला! आत्तापर्यंत तीन लोकांकडून मी ऐकलंय की, दाढी करताना तू माणसांची नाकं एवढ्या जोरात खेचतोस की ती कशीबशी जागेवर टिकून राहतात."

इवान याकोवलेविच अर्धमेला झाला होता. त्याने ओळखले होते की, दर बुधवारी आणि रविवारी त्याच्याकडे दाढी करून घ्यायला येणाऱ्या न्यायालयीन सल्लागार कोवालेव यांचेच ते नाक होते.

"जरा थांब, प्रास्कोव्या ओसीपोवना! मी त्याला फडक्यात गुंडाळून कोपऱ्यात ठेवतो. थोडा वेळ तिथंच पडू दे, मग घेऊन जातो."

"काही ऐकायची इच्छा नाही माझी! माझ्या खोलीत मी कापलेलं नाक ठेवायला परवानगी देईन? .. ठोंब्या! पट्ट्यावर वस्तऱ्याला धार काढायची फक्त तुला अक्कल आहे, पण शुंभा, लौकरच तुला तुझं कामही नीट करता येणार नाही! मी पोलीसांपुढं तुझी बाजू घेईन असं वाटतं? अरे नीचा, महामूर्खा! घेऊन जा ते! जा घेऊन! कुठं पाहिजे तिकडं ने! पुन्हा माझ्या डोळ्यांना ते दिसता कामा नये!"

इवान याकोवलेविच मुखस्तंभ उभा होता. त्याने खूप खूप विचार केला, पण तरी त्याच्या टाळक्यात प्रकाश पडेना.

"च्यायला, हे कसं काय घडलं," कानामागे खाजवीत अखेर तो म्हणाला. "काल मी झिंगल्या अवस्थेत परतलो अथवा नाही, याबाबत

नक्की सांगू शकत नाही. पण वर वर पाहता हे अगदीच विचित्र दिसतंय: तू पाव भाजतेस, नाक नव्हे. हा घोटाळा मला तरी उलगडत नाही!"

इवान याकोवलेविच एकदम गप्प झाला. पोलीसांना त्याच्यापाशी नाक सापडताच ते त्याला अटक करतील, ह्या विचाराने तो हबकला होता. एव्हाना त्याच्या नजरेसमोर सुरेख रुपेरी फितीची लाल कॉलर दिसत होती, तलवार... त्याचे सर्वांग शहारले. शेवटी त्याने सदरा व बूट उचलले, त्यांना अंगावर चढविले आणि प्रास्कोव्या ओसीपोवनाच्या भडिमाराच्या साथीवर त्या नाकाला फडक्यात गुंडाळून तो रस्त्यावर बाहेर पडला.

त्या नाकाला तो कुठेतरी खुपसू पहात होता: फाटकांपलिकडील पाटथऱ्यांमागे अथवा हळूच कुठेतरी टाकून द्यायचे आणि शेजारच्या गल्लीत पसार व्हायचे. पण त्याचे दुर्दैव म्हणजे त्याला रस्त्यावर सतत ओळखीचे लोक भेटू लागले आणि त्याला प्रश्न विचारून भंडावू लागले: "कुठं निघालास?" किंवा "एवढ्या सकाळी कुणाची दाढी घोटायला निघालास?" त्यामुळे इवान याकोवलेविचला स्वतःची योजना अंमलात आणायला क्षणाची उसंत लाभेना. एकदा त्याने नाक खाली टाकले, पण तेवढ्यात पहाऱ्यावरच्या शिपायाने त्याला हाक मारून स्वतःच्या भालेकुऱ्हाडीने दाखविले: "उचल! तुझ्या हातून ते बघ काहीतरी खाली पडलंय!" इवान याकोवलेविचला मुकाटपणे ते नाक उचलून खिशात लपवावे लागले. तो निराश होऊ लागला होता, कारण आता दुकाने व ठेले उघडू लागल्यामुळे रस्त्यावर माणसांची वर्दळ वाढू लागली होती.

त्याने इसाकीयेवस्की पुलाकडे जाण्याचा निर्णय घेतला: नेवा नदीत भिरकावून देणे जमेल का?.. पण मी थोडा दोषी आहे की, अनेक बाबतीत आदरपात्र ठरलेल्या इवान याकोवलेविचबद्दल मी अजून काहीच सांगितले नाही.

इवान याकोवलेविच प्रत्येक प्रतिष्ठित रशियन कारागिराप्रमाणे भयंकर दारुडा होता. आणि दररोज दुसऱ्यांच्या हनुवटचा घोटत असला, तरी त्याच्या स्वतःच्या हनुवटीवर मात्र दाढीचे खुंट वाढलेले असत. इवान याकोवलेविचचा टेल-कोट (कारण तो कधीही फ्रॉक-कोट वापरीत नव्हता)

रंगीबेरंगी होता, म्हणजे मूळ काळा होता, पण त्यावर पिवळसर तपकिरी, आणि राखाडी डाग पडले होते. कॉलर गुळगुळीत बनली होती आणि पुढच्या तीन बटणांऐवजी फक्त दोरे लोंबत होते. इवान याकोवलेविच दुसऱ्यांना नाक मुरडणाऱ्यांपैकी होता आणि दाढी करतेवेळी जेव्हा न्यायालयीन सल्लागार कोवालेव सवयीनुसार त्याला म्हणत: "इवान याकोवलेविच, तुझ्या हातांना कायम घाण वास येतो," तेव्हा इवान याकोवलेविच पुढील प्रश्नाने उत्तर द्यायचा: "त्यांना कशामुळं वास येत असावा?" "माहीत नाही, बंधू, पण वास येतोय," न्यायालयीन सल्लागार म्हणत आणि त्यावर इवान याकोवलेविच नाकात तपकिरीचा बार भरायचा व त्यांच्या गालांवर, नाकाखाली, कानांमागे व हनुवटीखाली साबणाचा फेस चोपायचा. थोडक्यात, त्याला वाटेल तिथे तो साबण फासायचा.

ह्य प्रतिष्ठित नागरिक एव्हाना इसाकीयेवस्की पुलापाशी पोहोचला होता. प्रथम त्याने सभोवार पाहिले; मग त्या दिवशी नदीत खूप मासे आहेत अथवा नाहीत ह्याचा अंदाज घेण्याच्या बहाण्याने कठड्यांवर तो ओणवा झाला आणि नाक गुंडाळलेली फडक्याची पुरचुंडी त्याने हळूच खाली टाकली. त्याला स्वतःच्या खांद्यांवरचे मणभर ओझे हलके झाल्यासारखे भासले. तो किंचित गालातल्या गालात हसलासुद्धा. नागरी सेवकांच्या हनुवट्या तासायला जाण्याऐवजी तो पुढील पाटीच्या इमारतीकडे वळला: 'खाद्यपदार्थ आणि चहा.' तेथे पंचचा एक ग्लास रिचविण्याचा त्याचा इरादा होता. पण पुलाच्या दुसऱ्या टोकाला भल्या रुंद मिशांचा, तिकोनी टोपीचा, तलवार लटकावलेला एक ऐटबाज पोलीस अंमलदार उभा असलेला अचानक त्याने पाहिला. तो जागच्या जागी थबकला. दरम्यान पोलीस अंमलदाराने बोटाने इशारा करून त्याला बोलावीत म्हटले:

"इकडे ये, भल्या माणसा!"

इवान याकोवलेविचला अशा प्रसंगी कसे वागायचे ह्याचे योग्य ज्ञान असल्यामुळे दूर अंतरावरच त्याने डोक्यावरील टोपी उतरविली व झपझप चालत येत तो म्हणाला:

"नमस्ते दारोगासाहेब!"

"नाही बंधू, दारोगासाहेब वगैरे नको; पुलावर उभा राहून तू काय करत होतास ते सांग पाहू?"

"देवाशपथ सांगतो, साहेब, एका गिऱ्हाईकाची दाढी करायला जात होतो, तेवढ्यात नदीचं पाणी किती वेगात वाहतंय ते पहावंसं वाटलं."

"खोटं बोलतोस! एवढ्यावर तुझी सुटका होणार नाही! खरं सांग बघू!"

"साहेब, आठवड्यातून दोनदा, नव्हे तीनदासुद्धा मी तुमची दाढी मुळीच कुरकुर न करता घोटायला तयार आहे," इवान याकोवलेविच उत्तरला.

"नाही मित्रा, ह्या क्षुल्लक बाबी आहेत! तीन हजाम माझी दाढी करतात आणि तो त्यांचा बहुमान समजतात. आता सांग पाहू, तिथं तू काय करत होतास?"

इवान याकोवलेविच पांढराफटक पडला... पण इथे घडामोडी पूर्णपणे धुक्यात गुरफटून जातात आणि पुढे काय झाले त्याबद्दल काहीही माहिती नाही.

२

न्यायालयीन सल्लागार कोवालेव सकाळी बरेच लौकर जागे झाले आणि त्यांनी ओठांमधून आवाज काढला: "बर्रर्र..." झोपेमधून जागे झाल्यानंतर ते नेहमी असा आवाज काढायचे, पण त्याचे कारण मात्र त्यांचे त्यांनाच ठाऊक नव्हते. कोवालेवनी अंगाला आळोखेपिळोखे दिले आणि टेबलावरील छोटा आरसा देण्याचे फर्मान सोडले. आदल्या संध्याकाळी त्यांच्या नाकावर उमटलेली पुटकुळी पहायची त्यांना इच्छा झाली होती; पण अत्यंत आश्चर्य म्हणजे नाकाऐवजी त्यांना तेथे गुळगुळीत सपाट जागा दिसली! घाबरून कोवालेवनी पाणी मागितले आणि टॉवेलने डोळे पुसले: खरेच, नाक नव्हते! आपण झोपेत नाही याची खात्री पटविण्यासाठी ते स्वतःला चिमटे काढू लागले. नाही, ते झोपेत नव्हते. न्यायालयीन सल्लागार कोवालेव यांनी पलंगावरून खाली उडी मारली व अंगाला झटके दिले: नाकाचा पत्ता नाही! त्यांनी तात्काळ पोषाख मागविला आणि थेट पोलीस कमिशनरांकडे धाव घेतली.

पण दरम्यान कोवालेव यांची वाचकाला ओळख करून दिली पाहिजे, म्हणजे ह्या न्यायालयीन सल्लागार कशा प्रकारचा माणूस होता हे त्याच्या ध्यानात येईल. वेगवेगळ्या शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या साह्याने ज्यांना ह्या पदाचा लाभ होतो त्या न्यायालयीन सल्लागारांची कॉकेशसमध्ये हे पद हस्तगत करणाऱ्या न्यायालयीन सल्लागारांशी मुळीच तुलना करू नये. ह्या पूर्णतया भिन्न जाती आहेत. सुशिक्षित न्यायालयीन सल्लागार... पण रशिया अशी अजब भूमी आहे की, जर तुम्ही एका न्यायालयीन सल्लागाराबद्दल काही उद्‌गार काढलेत, तर रीगापासून कामचात्कापर्यंत सर्व न्यायालयीन सल्लागार ते बोल स्वतःला लावून घेतील. सर्व पदांच्या आणि स्थानांच्या बाबतीत हेच लागू पडते. कोवालेव कॉकेशसमधील न्यायालयीन सल्लागार होते. ते केवळ दोन वर्षे ह्या पदावर होते, त्यामुळे त्याचा त्यांना क्षणभरही विसर पडत नव्हता. स्वतःला आणखी वजन आणि अधिकार लाभावेत म्हणून ते कधीही न्यायालयीन सल्लागार म्हणवून घेत नसत, तर नेहमी मेजर म्हणून स्वतःचा उल्लेख करीत. "ऐक भल्या बाई," रस्त्यावर भेटणाऱ्या सदरे-विक्रेतीला ते म्हणत, "तू माझ्या घरी ये. माझं घर सादोवायावर आहे; फक्त विचार: मेजर कोवालेव इथंच राहतात ना? तुला कुणीही दाखवील." जर एखादी छटेल पोरगी भेटली, तर तिला गुप्तपणे जास्त पैसे देऊन म्हणत: "लाडके, तू मेजर कोवालेवच्या घराचा पत्ता विचार." म्हणून आम्हीसुद्धा इतःपर ह्या न्यायालयीन सल्लागारांना मेजर ह्या नावाने संबोधू.

मेजर कोवालेव यांना दररोज नेवस्की प्रॉस्पेक्तवर फिरायला जायची सवय होती. त्यांच्या सदऱ्याची कॉलर नेहमी पांढरीशुभ्र आणि कडक असायची. त्यांचे कल्ले अशा प्रकारचे होते, जसे प्रांतिक सर्वेक्षकांच्या, वास्तुशिल्पज्ञांच्या, रेजिमेंट डॉक्टरांच्या, या ना त्या प्रकारच्या पोलीसांच्या आणि एकूणच गुबगुबीत, लालबुंद गालवाल्या व बोस्टन खेळायची आवड असलेल्या सर्व सदगृहस्थांच्या गालांवर अजूनही दिसतात; हे कल्ले गालाच्या मध्यभागापर्यंत लांब असतात व तेथून थेट नाकापर्यंत जातात. मेजर कोवालेव छातीवर अनेक पदके लटकावीत. त्यांपैकी काहींवर राजचिन्हे असत व काहींवर कोरलेले होते: बुधवार, गुरुवार, सोमवार, इ. मेजर पीटरबुर्गला विशिष्ट हेतूने आले होते: त्यांना योग्य

असे पद प्राप्त करण्यासाठी. जर यश लाभले तर ते व्हाइसगव्हर्नर बनले असते आणि नाही जमले तर निदान एखाद्या महत्त्वाच्या खात्याचे शासक होण्याचा त्यांचा इरादा होता. विवाह करण्यालासुद्धा मेजर कोवालेव यांचा विरोध नव्हता; पण त्यांच्या भावी पत्नीपाशी दोन लाखांचे भांडवल असले पाहिजे अशी त्यांची अट होती. आता वाचक कल्पना करू शकेल की, योग्य आकाराच्या, दिसायला वाईट नसलेल्या नाका-ऐवजी विचित्र सपाट जागा बघून मेजरच्या मनाची काय अवस्था झाली असेल.

दुर्दैवात आणखी भर म्हणजे रस्त्यावर एकही घोडागाडी आढळत नव्हती आणि मेजरना पायी जावे लागत होते. नाकातून रक्त वाहणारा माणूस जसा तोंडावर रुमाल धरून जातो, तसे ते चेहरा रुमालाने झाकून चालत होते. "कदाचित मला तसा भास झाला असेल: नाक अदृश्य होणं शक्य नाही," त्यांनी मनाशी विचार केला आणि आरशात स्वत:चा चेहरा पाहण्यासाठी मुद्दामच ते मेवामिठाईच्या दुकानात शिरले. सुदैवाने दुकानात कुणीही नव्हते. नोकर झाडलोट करीत होते व खुर्च्या मांडत होते; काहीजण गरम पक्वान्नांच्या थाळ्या वाहून नेत होते. टेबलांवर व खुर्च्यांवर कॉफीचे डाग पडलेली कालची वर्तमानपत्रे इतस्तत: विखुरली होती. "देवाची कृपा, कुणीही नाही," ते म्हणाले, "आता आरशात बघायला हरकत नाही." ते घाबरत आरशापाशी गेले व त्यांनी नजर टाकली. "बापरे, काय भयानक!" ते थुंकत उद्गारले, "निदान नाकाच्या जागी दुसरं काही असायला पाहिजे होतं, पण काहीच नाही!"

संतापाने ओठ चावत ते दुकानातून बाहेर पडले व नित्याच्या सवयीनुसार न वागण्याचा, म्हणजे कुणांकडेही न पाहण्याचा अथवा स्मित न करण्याचा, त्यांनी निर्णय घेतला. अचानक एका घराच्या दाराशी ते स्तंभित होऊन थांबले; त्यांच्या डोळ्यांसमोर एक लोकविलक्षण प्रसंग घडला: प्रवेशद्वारापाशी एक बग्गी येऊन थांबली; दारे उघडली; खाली वाकून गणवेषातील एका गृहस्थाने उडी मारली व जिन्यावरून तो धावत गेला. कोवालेव यांनी जेव्हा ओळखले की, ते त्यांचे स्वत:चे नाक होते, तेव्हा भीतीने व आश्चर्याने त्यांची काय अवस्था झाली असेल याची कल्पना करा! ह्या असाधारण दृश्यामुळे त्यांना

डोळ्यांसमोर चक्कर आल्याचा भास झाला. दोन्ही पायांवर धड उभे राहणे त्यांना अवघड झाले; पण नाक बग्गीपाशी परत येईपर्यंत काय वाट्टेल ते झाले तरी थांबण्याचा त्यांनी निर्णय घेतला व जणू तापाची हुडहुडी भरल्याप्रमाणे थरथर कापत ते उभे राहिले. दोन मिनिटांनंतर नाक खरेच परतले. त्याने सोनेरी फितीचा गणवेष घातला होता, उंच कडक कॉलर वापरली होती; त्याने नमदी विजार घातली होती व कमरेला तलवार लटकावली होती. त्याच्या पिसेदार टोपीवरून त्याचा सरकारी सल्लागाराचा दर्जा स्पष्ट दिसत होता. त्याच्या एकूण थाटा-वरून ते कुणाच्या तरी खास भेटीला निघाले होते. सभोवार नजर टाकीत त्याने गाडीवानाला बोलाविले: "इकडं ये!" आणि बग्गीत बसून ते निघून गेले.

बिचाऱ्या कोवालेवना वेड लागायची पाळी आली. त्या विचित्र घटनेचा अर्थ काय लावायचा हे त्यांना उमजेना. खरोखर, कालपर्यंत त्यांच्या चेहऱ्यावर असलेले, बग्गीत बसून जाण्यास अथवा चालण्यास असमर्थ असलेले त्यांचे नाक आता गणवेषात होते! कोवालेव बग्गीच्या पाठोपाठ धावले आणि सुदैवाने बग्गी फार दूर न जाता कझान कॅथेड्रल-समोरच थांबली.

कोवालेव घाईघाईने कॅथेड्रलमध्ये घुसले. केवळ डोळ्यांच्या दोन फटी उघड्या ठेवून, बाकी चेहरा फडक्यांमध्ये झाकून घेतलेल्या म्हाताऱ्या भिकारणींच्या रांगांमधून धक्काबुक्की करीत त्यांनी वाट काढली. पूर्वी त्यांना ह्या भिकारणींचे हसू येत असे. पण आता त्यांच्याकडे लक्ष न देता चर्चमध्ये त्यांनी प्रवेश केला. आत फारसे भक्तगण नव्हते आणि ते सगळे दाराशीच उभे होते. कोवालेव यांची मन:स्थिती अत्यंत अस्वस्थ असल्यामुळे ते देवाची प्रार्थना करू शकले नाहीत. अधीरपणे त्यांची नजर गणवेषधारी गृहस्थाला शोधत होती. शेवटी एका बाजूला तो उभा असल्याचे त्यांना दिसले. नाकाने स्वत:चा चेहरा कडक कॉलरआड संपूर्ण झाकून घेतला होता आणि अत्यंत भक्तीभावाने ते प्रार्थना करीत होते.

"त्याच्यापाशी कसं जायचं?" कोवालेवनी विचार केला. "त्याच्या एकूण थाटावरून, गणवेषावरून, टोपीवरून, स्पष्ट दिसतंय की, तो सरकारी सल्लागार आहे. सालं काय करावं समजत नाही!"

नाकापाशी जाऊन ते किंचित खोकले ; पण नाकाने क्षणभरही आपली भक्तीमुद्रा बदलली नाही आणि ते वेदीकडे बघत राहिले.

"माननीय सरकार..." मोठ्या कष्टाने धीर एकवटत कोवालेव म्हणाले, "माननीय सरकार..."

"काय पाहिजे तुम्हाला?" त्यांच्याकडे वळून नाकाने विचारले.

"मला आश्चर्य वाटतंय, माननीय सरकार... मला वाटतं... तुम्हाला आपली जागा माहीत असली पाहिजे! पण अचानक मी तुम्हाला कुठं पाहतोय – तर चर्चमध्ये! तुम्ही मान्य केलं पाहिजे..."

"मला माफ करा, पण तुमच्या बोलण्याचा अर्थ मला मुळीच समजत नाही... जरा स्पष्ट खुलासा करा."

"काय खुलासा करू ह्याला?" कोवालेवनी विचार केला व मन घट्ट करून ते बोलू लागले :

"अर्थात, मी... मी मेजर आहे. तुम्ही मान्य कराल की, नाका-विना मी फिरणं शिष्टाचाराला धरून नव्हे. वस्क्रेसेन्स्की पुलापाशी सोल-लेली संत्री विकणाऱ्या एखाद्या बाईला नाकाविना तिथं बसणं एकवेळ ठीक आहे ; पण मी लौकरच बढतीची आशा धरतोय... शिवाय अनेक मोठ्या घरच्या स्त्रियांशी माझ्या ओळखी आहेत : सरकारी सल्लागार चेख्ताऱ्योव यांच्या बायकोशी आणि इतरांशी... तुम्हीच निर्णय घ्या... मला माहीत नाही, माननीय सरकार..." (ह्यावर मेजर कोवालेव यांनी खांदे उडविले.) "मला माफ करा... पण कर्तव्य आणि प्रति-ष्ठेच्या दृष्टिकोनातून काटेकोरपणं जर तुम्ही पाहिलंत... तुम्ही स्वतःच समजू शकता..."

"मला काहीही कळत नाही," नाक उत्तरले. "कृपया स्पष्ट करून सांगा."

"माननीय सरकार..." कोवालेव ऐटदार सुरात म्हणाले, "तुम-च्या शब्दांचा अर्थ काय समजायचा मला कळत नाही... मला तर सर्व स्पष्ट दिसतंय... किंवा तुमची इच्छा आहे... मुद्दा असा की, तुम्ही माझं दस्तुरखुद्द नाक आहात!"

नाकाने मेजरकडे नजर टाकली आणि त्याच्या कपाळाला आठ्या पडल्या.

"तुमची चूक होतेय मेहेरबान. मी स्वतंत्र माणूस आहे. आपल्या दोघांमध्ये कोणतेही निकटचे संबंध असणं शक्य नाही. तुमच्या गणवेषाच्या बटणांवरून स्पष्ट होतंय की तुम्ही दुसऱ्या खात्यात काम करीत असणार."

एवढे बोलून नाक बाजूला वळले व पुन्हा प्रार्थना करू लागले.

आता कोवालेव पुरते गोंधळून गेले. काय करावे आणि कसला विचार करावा हे त्यांना सुचेना. एवढ्यात एका महिलेच्या पोषाखाची प्रसन्न सळसळ त्यांना ऐकू आली. विणलेल्या लेसमध्ये नखशिखांत नटलेली एक वयस्क स्त्री चालत आली आणि तिच्याबरोबर एक सडपातळ बांध्याची, बारीक कंबरेला घट्ट चिकटणारा पांढरा पोषाख केलेली, हलक्याफुलक्या पेस्ट्रीप्रमाणे फिकट पिवळसर टोपी घातलेली एक तरुणी आली. त्यांच्या पाठीमागे मोठ्या कल्ल्यांचा धिप्पाड हुजऱ्या व डझनभर कॉलरवाले तपकिरीची डबी उघडायला उभे होते.

कोवालेव त्यांच्या किंचित जवळ सरकले, स्वतःच्या सदऱ्याची केंब्रिक कॉलर खेचून त्यांनी ताठ केली, सोनेरी साखळीवरील पदकांना नीट केले, दोन्ही बाजूंना स्मित करीत पाहिले व वसंतामधील फुलाप्रमाणे किंचित झुकलेल्या आणि भुवईपाशी पांढऱ्याशुभ्र हाताची पारदर्शी बोटे धरलेल्या सडपातळ तरुणीकडे लक्ष एकवटले. तिच्या टोपीखालील गोल, सायीसारखी हनुवटी आणि वसंतामधील पहिल्या गुलाबाचा रंग लाभलेला तिच्या गालाचा काही भाग दृष्टीला पडताच कोवालेव यांचे स्मित आणखीच रुंदावले. पण एकदम भाजल्याप्रमाणे ते दचकून मागे सरले. त्यांना आठवण झाली की, त्यांच्या नाकाच्या जागी काहीही नव्हते आणि त्यांच्या डोळ्यांमध्ये आसवे तरारली. गणवेषातील सद्गृहस्थाला थेट सांगण्यासाठी की, तो केवळ सरकारी सल्लागाराचे सोंग वठवीत होता, तो तोतया आणि भामटा होता, तो दुसरा-तिसरा कुणी नव्हे तर त्यांचे नाक होता, म्हणून ते बाजूला वळले... पण नाक पसार झाले होते. दरम्यानच्या काळात त्याने काढता पाय घेतला होता आणि निःसंशयपणे दुसऱ्या कुणाच्या तरी भेटीला ते जात होते.

कोवालेव अत्यंत निराश बनले. ते बाहेर गेले व खांबांपाशी क्षणभर थांबून नाकाला शोधण्यासाठी त्यांनी सभोवार न्याहाळून पाहिले. नाकाने

पिसेदार टोपी व सोनेरी फितीचा गणवेष परिधान केला होता, ह्याची त्यांना ठळक आठवण होती. पण त्याचा ओव्हरकोट, त्याच्या बग्गीचा रंग, घोड्यांचा रंग ह्या गोष्टींकडे त्यांनी लक्ष दिले नव्हते. एवढेच नव्हे तर बग्गीमागे हुजऱ्या होता अथवा नाही आणि असलाच तर तो कोणत्या पोषाखात होता, हेसुद्धा त्यांनी लक्षपूर्वक पाहिले नव्हते. शिवाय तेथे अनेक घोडागाड्या एवढ्या वेगाने पळत होत्या, की त्यांच्यातील फरक ओळखणे कोवालेवना अशक्य ठरले होते व कोणत्याही परिस्थि-तीत एकाही बग्गीला थांबविण्यास ते असमर्थ ठरले असते. दिवस छान होता. स्वच्छ ऊन पडले होते. नेवस्कीवर माणसांची खूप गर्दी होती. पोलीत्सेयस्की पुलापासून आनीचकीन पुलापर्यंत पादपथांवरून रंगीबेरंगी पोषाखातील स्त्रियांचा अक्षरशः धबधबा वाहात होता. समोरून ओळ-खीचा शाही सल्लागार येत होता, ज्याला परक्यांसमोर ते मुद्दाम लेफ्टनंट कर्नल म्हणायचे. तिकडून सेनेटमधील खातेप्रमुख यारीगिन जाताना दिसले. ते कोवालेव यांचे चांगले स्नेही होते आणि आठ खेळताना नेहमी बोस्टनमध्ये डोक्यावर कर्जाचा बोजा घ्यायचे. कॉकेशसमध्येच ॲसेसर बनलेल्या आणखी एका मेजरने त्यांना हाताने खूण करून बोला-विले...

"च्यायला!" कोवालेव म्हणाले, "अरे ए, गाडीवान, थेट पोलीस कमिशनरांपाशी घेऊन चल!"

कोवालेव द्रोश्कीत चढले आणि गाडीवानावर ओरडू लागले: "दुप्पट वेगानं पळव!"

"पोलीस कमिशनर घरात आहेत?" बाहेरच्या व्हरांड्यात डोकावीत ते ओरडले.

"नाहीत," पोर्टर उत्तरला, "आत्ताच गेले."

"तुझा सत्यानाश होवो!"

"होय," पोर्टर पुढे म्हणाला, "त्यांना जाऊन फार वेळ झाला नाही, पण ते गेलेत. क्षणभर लौकर आला असतात तर त्यांची भेट झाली असती."

तोंडावरील रुमाल अजिबात न काढता कोवालेव परत द्रोश्कीत बसले आणि निराश आवाजात ओरडले:

"हाकल गाडी!"

"कुठं?" गाडीवानाने विचारले.

"चल, सरळ!"

"सरळ म्हणजे? इथं फाटा आहे: उजवीकडं किंवा डावीकडं?"

ह्या प्रश्नासरशी कोवालेव थांबले व विचार करू लागले. त्यांच्या परिस्थितीत सार्वजनिक सुव्यवस्था खात्याकडे त्यांनी प्रथम जाणे इष्ट ठरले असते. ते खाते पोलीसांशी थेट जोडलेले होते म्हणून नव्हे, तर इतर खात्यांपेक्षा तेथे अधिक लौकर गोष्टींचा निकाल लागत होता. त्यांचे नाक जेथे काम करीत असल्याचा दावा करीत होते, त्याच खात्याच्या अधिकाऱ्यांकडून समाधानाची मागणी करणे अशिष्टपणाचे ठरले असते. खुद्द नाकाच्या विधानांवरून स्पष्ट झाले होते की, ह्या प्राण्याला पावित्र्याची मुळीच चाड नव्हती आणि मेजर कोवालेवना पूर्वी कधी पाहिलेच नाही असे धादांत खोटे पूर्वी जसे ते बोलले होते, तसेच आताही खोटे बोलायला ते कचरले नसते. सार्वजनिक सुव्यवस्था खात्याकडे जाण्याचा गाडीवानाला हुकूम देण्याच्या बेतात कोवालेव होते, तेवढ्यात दुसरा विचार त्यांच्या मनात चमकला. पहिल्याच भेटीत तशा बेशरमपणे वागणारे ते महाडांबीस नाक एव्हाना शहरामधून पळून गेले असण्याची शक्यता होती. तशा परिस्थितीत त्याला शोधण्याचे प्रयत्न व्यर्थ होते किंवा देव वाचवो, पण आख्खा महिनाभर शोधाशोध चालू राहणे शक्य होते. शेवटी जणू त्यांना आकाशातून संदेश मिळाला. वर्तमानपत्राच्या कचेरीत जाऊन नाकाच्या तपशीलवार वर्णनासकट जाहिरात द्यायची आणि ज्याला ते सापडेल त्याने त्यांच्याकडे नाक आणून द्यावे अथवा त्याच्या ठावठिकाण्याची माहिती द्यावी, असे जाहीर करायचा त्यांनी निर्णय घेतला. एकदा हा निर्णय झाल्यावर त्यांनी गाडीवानाला वर्तमानपत्राच्या कचेरीकडे जाण्याचा हुकूम दिला व वाटेत सतत त्याच्या पाठीवर गुद्दे मारीत ते ओरडत होते: "लौकर, नीचा! लौकर, हलकटा!" "काय हे साहेब!" डोक्याला झटका देत गाडीवान म्हणाला आणि केसाळ कुत्र्याप्रमाणे लांब केस असलेल्या घोड्याचे लगाम त्याने उडविले. शेवटी द्रोश्की थांबली आणि कोवालेव धापा टाकीत छोट्या स्वागत-कक्षात धावले. पांढऱ्या केसांचा, चष्मा घातलेला, जुना टेल-कोट घात-

लेला एक कारकून टेबलामागे बसला होता. त्याने पिसांची लेखणी दातांमध्ये धरली होती आणि त्याच्यासमोर ठेवलेली तांब्याची नाणी तो मोजीत होता.

"इथं जाहिराती कोण घेतं?" कोवालेव ओरडले. "अाँ – नमस्ते!"

"नमस्कार!" क्षणभर डोळे वर उचलून पांढरे केसवाला कारकून म्हणाला आणि पुन्हा त्याची नजर नाण्यांच्या ढिगावर खाली वळली.

"मला छापायची इच्छा आहे..."

"जरा थांबा. थोडं थांबायची विनंती करतो," उजव्या हाताने कागदावर आकडा लिहीत व डाव्या हाताने हिशेबाच्या चौकटीत दोन सोंगट्या हलवीत कारकून म्हणाला.

सोनेरी फितीचा कोट घातलेला व उमरावी घराण्यात नोकरी करीत असल्याचे स्पष्ट दिसत असलेला एक हुजऱ्या हातात कागदाचा कपटा घेऊन टेबलापाशी उभा होता. स्वतःच्या मनमोकळ्या स्वभावाचे प्रदर्शन करण्याच्या हेतूने तो म्हणाला:

"माझ्यावर विश्वास ठेवा, साहेब, ते भिकारडं कुत्रं आठ कोपेकच्या लायकीचं नाही, म्हणजे मी त्याला आठ कोपेक दिले नसते; पण काऊंटेसना ते आवडतं, फार आवडतं, म्हणून कुत्रं शोधून देणाऱ्याला शंभर रूबलचं इनाम द्यायला त्या तयार आहेत. जर माझं प्रामाणिक मत तुम्हाला ऐकायचं असेल, फक्त तुमच्या-माझ्यात बोलायचं, तर लोकांच्या आवडींना मोल नाही. एखाद्या शिकाऱ्याचं उदाहरण घ्या: शिकारी कुत्र्यासाठी किंवा छोट्या केसाळ कुत्र्यासाठी पाचशे किंवा हजार द्यायलाही तो तयार असतो, फक्त कुत्रा मात्र चांगला हवा!"

सन्माननीय कारकूनसाहेब हा संवाद ऐकत होते आणि त्याचवेळी त्यांचा हिशेब चालू होता, त्याने आणलेल्या जाहिरातीमधील शब्दांची संख्या मोजीत होते. कारकूनाभोवती हाती चिठ्या धरलेल्या अनेक म्हाताऱ्या बायकांचा, दुकानांमधील नोकरांचा आणि दरवानांचा गराडा पडला होता. कुणाला व्यसने नसलेला गाडीवान पाहिजे होता; कुणाला पॅरिसमध्ये १८१४ साली विकत घेतलेल्या, किंचित वापरलेल्या सापळ्याला विकायचे होते; धोबीकाम शिकलेल्या, पण इतर कामे करू शकणाऱ्या एका भूदास मुलीला नोकरी हवी होती; एक स्प्रिंग नसलेल्या दणकट

द्रोश्कीसाठी, अवघे सतरा वर्षांचे वय असलेल्या उमद्या पंचरंगी घोड्यासाठी, लंडनहून आयात केलेल्या नव्या सलगमच्या व मुळयांच्या बियाण्यांसाठी ग्राहक पाहिजे होते; दोन घोड्यांचा तबेला असलेले, भोजाची किंवा सूचिपर्णी वृक्षांची राई लावण्यास जागा असलेले, खेड्यातील एक घर विकाऊ होते; जुन्या बुटांचे तळवे खरेदी करण्याची इच्छा असलेल्यांनी सकाळी ८ ते दुपारी ३ च्या दरम्यान लिलावांच्या जागी कोणत्याही दिवशी यावे, असे जाहीर करणारी एक नोटीस होती. ह्या जमाव ज्या खोलीत जमला होता, ती खोली आकाराने लहान होती आणि तिच्यातील हवा विलक्षण दाट बनली होती; पण न्यायालयीन सल्लागार कोवालेव यांचे त्या वातावरणाकडे लक्ष नव्हते, कारण त्यांनी तोंडावर रुमाल धरला होता व खुद्द त्यांचे नाक ह्या क्षणी कुठे ते फक्त देवच जाणे!

"महाशय, मी आपल्याला विनंती करतो... मला फार गरज आहे," शेवटी न राहवून कोवालेव म्हणाले.

"जरा थांबा, जरा थांबा! दोन रूबल त्रेचाळीस कोपेक! ताबडतोब! एक रूबल चौसष्ट कोपेक!" म्हाताऱ्या बायांकडे आणि दरवानांकडे कागदाचे कपटे भिरकावीत पांढरे केसवाला गृहस्थ म्हणाला. "काय पाहिजे आपल्याला?" शेवटी कोवालेव यांच्याकडे वळून त्याने विचारले.

"मी विनंती करतो..." कोवालेव म्हणाले, "एक विश्वासघाताचा प्रकार घडलाय, कसा ते अजून मला समजत नाही. मला एवढंच छापायचंय की, त्या डांबीसाला माझ्यापाशी हजर करणाऱ्याला मी चांगलं भरघोस इनाम देईन."

"कृपया सांगा, आपलं आडनाव काय?"

"नको, आडनाव कशाला पाहिजे? ते मला सांगता येणार नाही. माझ्या ओळखीची फार माणसं आहेत: सरकारी सल्लागार चेख्ताऱ्योव यांची बायको, पालागेया ग्रीगोऱ्येवना पोदतोचिना, स्टाफ ऑफिसरांची बायको... अचानक त्यांना समजायचं, देव करो तसं न होवो! तुम्ही फक्त लिहा: न्यायालयीन सल्लागार अथवा त्यापेक्षा अधिक चांगलं, मेजरपदाचा एक गृहस्थ."

"पळालेला इसम तुमचा भूदास होता?"

"भूदास कुठला? त्याहून वाईट! माझ्यापासून पळालंय... नाक!"

"हूं! किती विचित्र आडनाव! आणि ह्या श्रीयुत नाक यांनी मोठी रक्कम चोरलीय तुमच्यापासून?"

"अहो नाक म्हणजे... तुम्हाला नीट समजलं नाही! नाक, खुद्द माझं स्वतःचं नाक कुठंतरी गायब झालंय! सालं माझी थट्टा करू पाहतंय!"

"कोणत्या रीतीनं गायब झालं? मला नीटसं समजत नाही."

"होय, आणि कशा रीतीनं ते गायब झालं ह्याचा मी तुम्हाला खुलासा करू शकत नाही. पण मुख्य म्हणजे ते शहरात फिरतंय आणि स्वतःला सरकारी सल्लागार म्हणवून घेतंय. म्हणून मी तुमच्याकडं जाहिरात देऊ इच्छितोय की, ज्याला ते सापडेल त्यानं ताबडतोब माझ्याकडं आणून द्यावं. तुम्हीच सांगा, माझ्या शरीराच्या त्या महत्त्वाच्या भागाशिवाय मी कसं वावरायचं? माझा काही पायाचा छोटा अंगठा हरवलेला नाही. तो नाही असं कुणाच्या ध्यानात यायच्या आत मी पटकन बुटात पाय लपवू शकेन. दर गुरुवारी सरकारी सल्लागार चेख्ताऱ्योव यांच्या बायकोला भेटायला मी जातो; पालागेया ग्रीगोऱ्येवना पोदतोचिना स्टाफ ऑफीसरच्या पत्नी आहेत, त्यांना एक सुंदर मुलगी आहे आणि दोघी माझ्या चांगल्या स्नेही आहेत, तेव्हा आता तुम्हीच सांगा, मी काय करायचं... आता मी त्यांच्याकडं जाऊ शकत नाही."

कारकूनाच्या घट्ट मुरड पडलेल्या ओठांवरून तो गहन विचारात पडल्याचे दिसले.

"नाही, असली जाहिरात मी वर्तमानपत्रात छापू शकत नाही," खूप वेळ गप्प बसल्यानंतर शेवटी तो म्हणाला.

"काय? का म्हणून?"

"नाही छापू शकणार. वर्तमानपत्राची अब्रू जाईल. कुणीही जर लिहू लागला की, त्याचं नाक पळालंय... तर... आधीच माणसं म्हणतात की, बऱ्याच मूर्ख गोष्टी आणि खोट्या अफवा वर्तमानपत्रात छापताहेत."

"पण ह्यात काय मूर्खपणा आहे? इथं तसं काहीही मूर्खपणाचं नाही."

"तुम्हाला त्यात मूर्खपणा भासत नाही. पण गेल्या आठवड्यात अशीच एक घटना घडली होती. आत्ता तुम्ही आलात तसेच एक अंमलदार आले, त्यांनी एक नोटीस आणली होती, हिशेबानुसार तिचं बिल झालं दोन रूबल त्र्याहत्तर कोपेक आणि जाहिरातीत फक्त म्हटलं होतं की, काळ्या केसांचं छोटं कुत्रं पळालंय. आता त्यात काय विशेष असं वाटेल ना? पण प्रकरणाची अखेर अब्रूनुकसानीच्या खटल्यात झाली: ते कुत्रं कुठल्यातरी संस्थेचं खजिनदार होतं, त्या संस्थेचं नाव आठवत नाही मला!"

"पण मी कुत्र्याबद्दलची जाहिरात देत नाही, तर माझ्या स्वतःच्या नाकाबद्दल देतोय: म्हणजे माझ्याबद्दलच मी जाहिरात देतोय!"

"नाही, तशी जाहिरात मी स्वीकारू शकत नाही!"

"माझं नाक खरोखरच हरवलंय तरीसुद्धा?"

"जर हरवलं असेल, तर ते डॉक्टरांचं काम. असं म्हणतात की, तुम्हाला पाहिजे तसलं नाक बसवून देणारे काही लोक आहेत. पण मला असं दिसतंय की, थट्टा करण्याची आवड असलेले तुम्ही गृहस्थ आहात आणि चारचौघात गंमत करण्याची तुमची इच्छा आहे."

"तुम्हाला मी देवाशपथ सांगतो! ठीक आहे, जर इथवर मजल गेलीय, तर मी तुम्हाला दाखवतोच!"

"कशाला तसदी घेता?" तपकीर हुंगत कारकून म्हणाला. "म्हणजे खरंच जर तसदी नसेल," कुतूहलाने वर पहात तो पुढे म्हणाला, "तर आनंदानं नजर टाकीन!"

न्यायालयीन सल्लागारांनी चेहऱ्यावरील रुमाल बाजूला केला.

"खरंच, फार मोठं आश्चर्य आहे!" कारकून म्हणाला. "जागा अगदी सपाट. जणू आत्ताच भाजलेल्या धिरड्यासारखी. खरंच, आश्चर्यकारक सपाट!"

"आता तरी तुम्ही वाद घालणार नाही ना? तुम्ही स्वतःच पाहता आहात की, जाहिरात छापणं आवश्यक आहे. मी तुमचा अत्यंत ऋणी

राहीन. आणि ह्यामुळं आपली ओळख घडली म्हणून मला खूप आनंद झालाय..."

मेजरनी थोडी अधिक गोडीगुलाबी लावण्याचे ठरविले होते हे ह्या ठिकाणी स्पष्ट दिसत होते.

"छापणं काही अवघड नाही," कारकून म्हणाला, "पण मला ह्यात तुमच्या फायद्याचं काही दिसत नाही. जर छापायचा आग्रहच असेल तर लेखणीची करामत करणाऱ्या कुणातरी माणसाला शोधून काढा आणि एक दुर्मीळ स्वरूपाची घटना म्हणून ह्या हकीकतीवर त्याच्याकडून लेख लिहवून 'उत्तरेची मधमाशी' मध्ये छापा" (इथे त्याने परत तपकिरीची चिमूट नाकात कोंबली), आपल्या तरुणांच्या उपयोगासाठी (इथे त्याने नाक पुसले), किंवा एकूण लोकांच्या कुतूहलासाठी.

न्यायालयीन सल्लागार आता पूर्ण निराश बनले. त्यांची नजर खाली पडलेल्या वर्तमानपत्रातील नाटकाच्या जाहिरातींवर वळली; एका आकर्षक तरुण नटीचे नाव वाचताच त्यांच्या चेहऱ्यावर स्मित उमटायच्या बेतात होते आणि त्यांचा हात खिशात गेला: पाच रूबलची नोट आहे अथवा नाही हे पाहण्यासाठी, कारण स्टाफ ऑफीसरांनी फक्त स्टॉल्समध्येच बसले पाहिजे असे कोवालेव यांचे मत होते—पण नाकाचा विचार मनात येताच त्यांचा नूर बिघडला!

खुद्द कारकूनसुद्धा कोवालेव यांची अवघड परिस्थिती पाहून हेलावला. त्यांचे दु:ख थोडे कमी करण्याच्या इच्छेने त्याने स्वत:ची सहानुभूती योग्य शब्दांमध्ये व्यक्त केली:

"असला विचित्र प्रसंग तुमच्यावर गुदरलाय याचं मला खरोखरीच दु:ख झालंय. आपण थोडी तपकीर ओढता का? त्यामुळं डोकेदुखी थांबते आणि मन उत्साही बनतं. मूळव्याधीवरसुद्धा तपकीर गुणकारी आहे."

असे म्हणून कारकुनाने कोवालेव यांच्यासमोर तपकिरीची डबी धरली आणि ऐटीत तिचे झाकण उघडताच टोपीवाल्या तरुणीचे चित्र दिसले.

ह्या अविचारी कृतीने कोवालेव यांच्या सहनशक्तीचा अंत झाला.

"तुम्ही अशा बाबतीत थट्टा कशी करू शकता मला समजत नाही," त संतापून म्हणाले, "तुम्हाला दिसत नाही का, की तपकीर ओढण्या-

साठी आवश्यक ते इंद्रिय माझ्यापाशी नाही? सैतान घेवो तुमची तप-कीर! आता ती मला डोळयांसमोर सहन होत नाही, अगदी उत्तम प्रकारचीसुद्धा नाही, मग तुमच्या भिकार बेरेझीन्स्की छापाबद्दल बोला-यलाच नको."

एवढे बोलून ते अत्यंत रागारागाने वर्तमानपत्राच्या कचेरीतून बाहेर पडले आणि पोलीस सुपरीटेंडेंटना भेटायला निघाले. पोलीस सुपरीटेंडेंटना साखर फार आवडायची. त्यांच्या घरातील पुढची खोली, तीच त्यांची भोजनाची खोली होती, वेगवेगळया दुकानदारांनी मैत्रीचे प्रतीक म्हणून आणून दिलेल्या साखरेच्या खडयांचे प्रदर्शन-दालन बनली होती. ह्या क्षणाला त्यांची स्वयंपाकीण सुपरीटेंडेंटच्या पायातील बूट ओढून काढ-ण्यात गुंतली होती. त्यांची तलवार आणि इतर सर्व लष्करी सरंजाम एव्हाना खोलीच्या कोपऱ्यात शांतपणे विसावला होता, त्यांचा तीन वर्षांचा मुलगा बापाच्या भयंकर धडकी भरविणाऱ्या त्रिकोणी टोपीशी खेळत होता; तर खुद्द महाशय दिवसभराच्या लढाऊ जीवनानंतर शांत-तेचा आनंद लुटण्याच्या तयारीत होते.

कोवालेव जेव्हा त्यांच्यापाशी आले, त्याचवेळेला त्यांनी अंगाला आळोखेपिळोखे देऊन, घशातून खाकरा काढून जाहीर केले होते: "आहा, आता छानपैकी दोन तास झोपणार!" ह्यावरून समजेल की, न्यायालयीन सल्लागारांचे आगमन अगदी अवेळी घडले होते. आणि जरी त्यांनी ह्यावेळी काही पौंड चहा अथवा साखर भेट म्हणून आणली असती, तरी सुपरीटेंडेंटनी त्यांचे विशेष आनंदाने स्वागत केले नसते. सुपरीटेंडेंट सर्व प्रकारच्या कलांचे आणि व्यापारांचे षौकीन होते. पण त्यांना सर्वांत अधिक आवडत सरकारी बँक-नोटा. "ह्या वस्तूपेक्षा चांगली दुसरी वस्तू नाही," ते नेहमी म्हणत, "खायला मागत नाही, फार जागा अडवत नाही, खिशात नेहमी मावते आणि खाली पडली तर फुटत नाही."

सुपरीटेंडेंटनी कोवालेव यांचे अत्यंत कोरडेपणाने स्वागत केले आणि म्हटले की, जेवणानंतर चौकशीचे काम करण्यास योग्य वेळ नाही, खुद्द निसर्गानेच आज्ञा दिलीय की, जेवल्यानंतर थोडा वेळ विश्रांती घेतली पाहिजे (ह्यावरून न्यायालयीन सल्लागारांना समजले की, प्राचीन

पंडितांच्या उक्तींची सुपरीटेंडेंटना ओळख होती), प्रतिष्ठित माणसांची नाके अशी तोडून नेत नाहीत, जगात अनेक मेजर आहेत, काहींपाशी तर धड एक चांगला सदरा नाही आणि काही अप्रतिष्ठित स्थळांना भेटी देत असतात.

ह्या कोवालेव यांच्यावर अगदी वर्मी घाव होता! नमूद केले पाहिजे की, न्यायालयीन सल्लागार अत्यंत संवेदनाशील माणूस होते. त्यांच्याबद्दल कुणी वैयक्तिक अनुद्‌गार काढले तर एक वेळ त्यांनी क्षमा केली असती, पण त्यांच्या दर्जाबद्दल अथवा पदाबद्दल एक वावगा उद्‌गार त्यांना खपत नसे. त्यांनी वाद घातला होता की, नाटकांमध्ये दुय्यम अधिकाऱ्यांबद्दल वाट्टेल ते बोललेले चालेल, पण स्टाफ-ऑफीसरांबद्दल वावगे उद्‌गार असू नयेत. सुपरीटेंडेंटनी त्यांचे ज्या प्रकारे स्वागत केले, त्याने ते पुरते गोंधळून गेले. डोक्याला झटका देऊन, हात पुढे करून, ऐटदार सुरात ते म्हणाले: "तुम्ही असे अपमानकारक उद्‌गार काढल्यानंतर पुढं त्यावर काही भाष्य करणं मला शक्य नाही..." आणि तेथून ते निघून गेले.

ते घरी परतले तेव्हा पायांवर उभे राहणे त्यांना अशक्य झाले होते. एव्हाना संध्याकाळ झाली होती. त्या प्रदीर्घ, व्यर्थ शोधाशोधींनंतर त्यांचे घर त्यांना भकास आणि पूर्ण नकोसे वाटत होते. जेव्हा ते हॉलमध्ये शिरले तेव्हा त्यांनी पाहिले की, त्यांचा नोकर इवान डागाळलेल्या चामडी वेष्टनाच्या दिवाणावर उताणा निजला होता आणि छतावर एकाच जागी नेम धरून थुंकी उडवीत होता. त्याच्या ह्या वागणुकीचा मेजरना संताप आला. त्यांनी इवानच्या कपाळावर टोपीचा तडाखा मारला व ते ओरडले: "डुकरा, तू नेहमी काहीतरी मूर्ख उद्योगांमध्ये गुंतलेला असतोस!"

इवान ताडकन उठला आणि मालकांचा ओव्हरकोट काढून घ्यायला धावला.

मेजर स्वतःच्या खोलीत आले आणि थकून, भकास मुद्रेने धप्पकन आरामखुर्चीत बसले. अनेक उसासे टाकल्यानंतर अखेरीस ते म्हणाले:

"देवा रे देवा! कशाबद्दल असं दुर्दैव माझ्यावर कोसळलं? मला हात अथवा पाय नसते, तर एक वेळ चाललं असतं; कान नसते, तर फार कठीण गेलं असतं, पण तरीही सहन करणं शक्य झालं असतं; पण नाकाविना माणूस म्हणजे... ना पक्षी ना माणूस! खिडकीतून

फेकून देण्यायोग्य कचरा! त्यातही जर युद्धात अथवा द्वंद्वात मी नाक गमावलं असतं, किंवा स्वतःच्या चुकीपायी गमावलं असतं, तरी एक वेळ समजण्यासारखं आहे. पण काही कारण नसताना ते नाहीसं झालं! एकदम! पण नाही, तसं शक्य नाही", क्षणभर विचार करून ते पुढे म्हणाले, "नाक नाहीसं होणं शक्य नाही, असंभवनीय आहे. मी एक तर स्वप्नात आहे किंवा निव्वळ कल्पना करतोय. कदाचित दाढी केल्या-नंतर मी नेहमी चेहऱ्याला वोदका चोळतो, पाण्याऐवजी चुकीनं वोदका प्यायलो असेन. मूर्ख इवान घेऊन गेला नसेल आणि मी वोदका प्यायलो असेन."

झिंगेत नाही ह्याची खात्री पटवून घेण्यासाठी मेजरनी स्वतःला एवढा जोरात चिमटा काढला, की ते ओरडले. त्या वेदनेने त्यांची खात्री झाली की, ते पूर्ण शुद्धीवर होते. त्यांचे नाक परत नेहमीच्या जागी दिसेल अशा आशेने ते हळूच आरशापाशी डोळे किलकिले करीत गेले. पण स्वतःचे प्रतिबिंब पाहताच एकदम मागे उडी मारीत ते उद्-गारले :

"किती हिडीस दृश्य!"

खरोखरीच ती अनाकलनीय घटना होती. बटण, चांदीचा चमचा, घड्याळ अथवा तत्सम वस्तू हरवली असती तर बाब वेगळी–पण स्वतःचे नाक हरवायचे? आणि स्वतःच्याच घरात? मेजर कोवालेव यांनी सर्व परिस्थितींचा विचार केला आणि निर्णय घेतला की, ह्या मागे स्टाफ ऑफीसर पोदतोचिन ह्यांच्या बायकोचाच हात असला पाहिजे. तिच्या मुलीशी कोवालेव यांनी लग्न करावे अशी तिची इच्छा होती. वस्तुतः त्या मुलीशी प्रणयचेष्टा खेळायला कोवालेवना आवडायचे, पण वचनात न गुंतण्याची त्यांनी अद्यापपर्यंत खबरदारी घेतली होती. जेव्हा स्टाफ ऑफीसरच्या बायकोने स्वतःच्या मुलीचे कोवालेव यांच्याशी विवाह लावण्याचा इरादा व्यक्त केला होता, तेव्हा कोवालेव यांनी अनेक स्तुती-पर शब्दांची उधळण केली होती, पण सावधपूर्वक म्हटले होते की, ते अजून फार तरुण आहेत, आणखी पाच वर्षे त्यांना नोकरी करायची आहे, म्हणजे त्यांचे बेचाळीस वय पूर्ण होईल. म्हणून केवळ सूडाच्या इच्छेपायी स्टाफ ऑफीसरच्या बायकोने कोवालेव यांच्या आयुष्याचा

नाश करायचा ठरविला असावा आणि त्यासाठी चेटक्यांना पैसे दिले असावेत. कारण कोवालेव यांचे नाक कुणी कापून नेले ही असंभवनीय गोष्ट होती. कुणीही त्यांच्या खोलीत प्रवेश केला नव्हता. त्यांचा न्हावी इवान याकोवलेविचने शेवटच्या वेळी बुधवारी त्यांची दाढी केली होती आणि सबंध बुधवारभर, एवढेच नव्हे तर संपूर्ण गुरुवारभर, त्यांचे नाक जागच्या जागी होते. त्यांना हे आठवत होते व त्याबद्दल पूर्ण खात्री होती. शिवाय, नाक कापले असते तर त्यांना वेदना झाली असती, जखम एवढचा लौकर भरून येणे शक्य नाही आणि धिरडचाप्रमाणे गुळगुळीत जागा बनली नसती. कोवालेव योजना आखू लागले: स्टाफ ऑफीसरच्या बायकोला अधिकृत मार्गांनी कोर्टात खेचावे अथवा तिच्या भेटीला जाऊन तिच्या तोंडावर आरोप करावा. दरवाजाच्या फटींमधून प्रकाश उजळल्यामुळे त्यांच्या विचारमालिकेत खंड पडला आणि पुढच्या खोलीत इवानने दिवा पेटविल्याचे त्यांना समजले. लौकरच खुद्द इवान हातात मेणबत्ती घेऊन तेथे आला आणि त्याने सर्व खोली प्रकाशित केली. कोवालेव यांची पहिली प्रतिक्रिया झाली हातरुमाल घेऊन चेहऱ्यावरील मोकळी जागा झाकण्याची, जेथे केवळ आदल्या दिवसापर्यंत नाक होते. त्यांच्या मूर्ख नोकराने त्यांच्याकडे पाहून आश्चर्याने आ वासावा, अशी त्यांची इच्छा नव्हती.

इवान स्वतःच्या खोलीत गेला न गेला एवढचात बाहेरच्या हॉलमधून एक अनोळखी आवाज उमटला:

"न्यायालयीन सल्लागार कोवालेव इथंच राहतात का?"

"आत या. मेजर कोवालेव इथं आहे", कोवालेव म्हणाले आणि दार उघडायला घाईघाईने धावले.

रुबाबदार दिसणारा एक पोलीस कॉन्स्टेबल आत आला. त्याचे कल्ले खूप गडद रंगाचे नव्हते अथवा खूप फिकट नव्हते आणि गाल छान गुबगुबीत होते. कथेच्या आरंभी इसाकीयेवस्की पुलावर हाच पोलीस अंमलदार आपल्याला भेटला होता.

"तुमचं नाक हरवलंय हे खरं का?"

"अगदी बरोबर."

"आता ते सापडलंय!"

"काय म्हणता?" मेजर कोवालेव ओरडले. अत्यानंदापायी त्यांना बोलता येईना. मेणबत्तीच्या प्रकाशात ओठ आणि गाल नाचत असल्याचे भासणाऱ्या, समोर उभ्या राहिलेल्या पोलीस कॉन्स्टेबलकडे ते दोन्ही डोळे विस्फारून बघत राहिले. "तुम्हाला ते कसं सापडलं?"

"फार विचित्र योगायोगानं! ते पळून जायच्या बेतात असताना आम्ही त्याला पकडलं. ते प्रवासी घोडागाडीत बसून रीगाकडं निघालं होतं. कुणा एका अंमलदाराच्या नावाचा जुना पासपोर्ट त्याच्यापाशी होता. आश्चर्याची दुसरी गोष्ट म्हणजे प्रथम मी त्याला माणूस समजलो. पण सुदैवानं माझ्यापाशी चष्मा होता आणि ते नाक असल्याचं मला ताबडतोब समजलं. मला लघुदृष्टीदोष आहे आणि जर तुम्ही माझ्या अगदी समोर उभे राहिलात, तर मला तुमचा चेहरा आहे एवढंच समजेल, पण नाक, दाढी वगैरे तपशील दिसणार नाही. माझ्या सासूला, म्हणजे माझ्या बायकोच्या आईलासुद्धा काही दिसत नाही."

कोवालेव यांचे कुतूहल अनावर झाले होते.

"कुठं आहे ते? कुठं? मी आत्ता चलतो!"

"काळजी करू नका. तुम्हाला त्याची गरज असणार ह्याची जाणीव असल्यामुळं मी ते माझ्याबरोबर घेऊन आलोय. आश्चर्य म्हणजे ह्यात मुख्य गुन्हेगार आहे वोझ्नेसेन्स्काया रस्त्यावरचा न्हावी, जो आता पोलीस चौकीत बसलाय. त्याच्या दारुडेपणाबद्दल आणि चोऱ्या करण्याबद्दल फार पूर्वीपासून त्याचा मला संशय होता. परवाच एका ठेल्यावरून त्यानं बटणांचं कार्ड पळवलं. तुमचं नाक पूर्वीप्रमाणंच पूर्ण शाबूत आहे."

ह्यावर पोलीस कॉन्स्टेबलने खिशात हात घातला व कागदात गुंडाळलेले नाक बाहेर काढले.

"अरेच्चा, हेच ते!" कोवालेव ओरडले. "नक्की, हेच! माझ्याबरोबर आज चहा प्या!"

"मला खूप आनंद वाटला असता, पण अशक्य आहे. इथून सुधारणागृहात मला जायला पाहिजे... सगळ्या वस्तूंच्या किंमती खूप कडाडल्यात... माझ्या घरात माझी सासू राहते, म्हणजे बायकोची आई आणि मुलं आहेत; मोठा खूप आशादायक आहे. फार हुशार पोरगा, पण त्याच्या शिक्षणासाठी आमच्यापाशी काहीच नाही..."

कोवालेवना त्याच्या बोलण्याचा अर्थ समजला आणि त्यांनी टेबला-वरून दहा रूबलची एक नोट उचलून पोलीस कॉन्स्टेबलच्या हातात कोंबली. कॉन्स्टेबलने लवून अभिवादन केले आणि तो दारातून बाहेर गेला. दुसऱ्याच क्षणी रस्त्यावरून त्याचा करडा आवाज कोवालेव यांच्या कानी आला. पादपथावर गाडी घातलेल्या एका मूर्ख शेतकऱ्याची तो कानउघाडणी करीत होता.

कॉन्स्टेबल गेल्यानंतर न्यायालयीन सल्लागार काही क्षणपर्यंत बधीर मन:स्थितीत बसून राहिले. अत्यानंदापायी त्यांची अशी अवस्था झाली होती. थोड्या वेळानंतर त्यांना भोवतालच्या परिस्थितीचे भान आले. मग त्यांनी हातांच्या ओंजळीत परत मिळालेले नाक जपून धरले व पुन्हा एकदा लक्षपूर्वक त्याला न्याहाळले.

"होय, तेच नक्की तेच!" मेजर कोवालेव म्हणाले. "काल उम-टलेली पुटकुळी डाव्या बाजूला दिसतेय."

आनंदापायी खो खो हसायचे तेवढे मेजरनी बाकी ठेवले होते.

पण जगात कोणतीही गोष्ट फार काळपर्यंत टिकून रहात नाही आणि आपल्या आनंदाची उत्कटता पहिल्या मिनिटाएवढी दुसऱ्या मिनि-टाला तीव्र नसते; तिसऱ्या मिनिटाला आनंदाचा बहर ओसरतो व आपला आत्मा पूर्ववत नेहमीच्या स्थितीला येतो. दगड पडल्यामुळे उमट-लेली लाट पाण्याच्या गुळगुळीत पृष्ठभागावर कालांतराने एकजीव होऊन जाते त्याप्रमाणे. कोवालेव विचार करू लागले आणि मामला अजून संपला नसल्याचे त्यांच्या ध्यानात आले: नाक सापडले होते, पण त्याला चिकट-विणे आवश्यक होते, त्याच्या पूर्वीच्या जागी त्याला परत बसवायला पाहिजे होते.

"आणि ते चिकटलं नाही तर?"

हा प्रश्न मेजरनी स्वत:ला विचारला आणि त्यांचा चेहरा पांढरा पडला.

भेदरल्या मनाने ते टेबलापाशी धावले आणि नाक सरळ चिकटविता यावे म्हणून त्यांनी आरसा जवळ ओढला. अत्यंत काळजीपूर्वक नाकाला जागच्या जागी बसविताना त्यांचे हात थरथरत होते. बापरे! नाक चि-कटेना!.. त्यांनी नाकाला तोंडाशी धरून त्याच्यावर वाफ सोडली व

त्याला थोडे उबदार केले आणि दोन गालांदरम्यानच्या सपाट मोकळ्या जागेवर परत ठेवले ; पण नाक क्षणभरसुद्धा स्वतःच्या जागी टिकेना.

"अरेच्चा! मूर्खा, चिकट!" ते नाकाला म्हणाले. पण नाक लाकडासारखे कडक होते आणि टेबलावर पडले तेव्हा बुचासारखा त्याचा विचित्र आवाज झाला. मेजर यांचा चेहरा वेडावाकडा बनला. "खरंच हे चिकटणार नाही काय?" घाबरून ते म्हणाले. त्यांनी खूपदा प्रयत्न केले, पण व्यर्थ!

त्यांनी इवानला बोलाविले आणि त्यांच्याच इमारतीत तळमजल्यावरील सर्वोत्तम फ्लॅटमध्ये राहणाऱ्या डॉक्टरांकडे त्याला धाडले. हे डॉक्टर महाशय काळेभोर कल्ले राखलेले भारदस्त गृहस्थ होते, त्यांची सुरेख तरणीबांड बायको होती, सकाळी ते ताजी सफरचंदे खात, दररोज सकाळी पाऊण तास खळखळा चुळा भरून आणि पाच प्रकारच्या वेगवेगळ्या ब्रशांनी दात घासून त्यांनी स्वतःचे तोंड विलक्षण स्वच्छ ठेवले होते. डॉक्टर ताबडतोब आले. ती दुर्दैवी घटना केव्हा घडली अशी त्यांनी पृच्छा केली, मेजर कोवालेव यांचे डोके त्यांच्या हनुवटीला धरून वर उचलले आणि पूर्वी त्यांचे नाक ज्या जागी होते त्या चेहऱ्यावरील जागेत एवढ्या जोराने अंगठा दाबला, की मेजर एकदम मागे सरकले आणि त्यांचे डोके भिंतीवर धाडदिशी आदळले. हे काही विशेष घडले नाही असे डॉक्टर म्हणाले आणि त्यांनी कोवालेवना भिंतीपासून दूर राहण्याचा सल्ला दिला. मग त्यांनी कोवालेवना उजवीकडे डोके वाकवायला सांगितले आणि पूर्वी नाक होते ती जागा चाचपून ते म्हणाले: "हूं!" मग त्यांनी डावीकडे डोके वाकवायला सांगितले आणि पुन्हा "हूं!" उद्गार काढत नाकाच्या जागी अंगठा दाबला. दातांची तपासणी होताना घोडा जसे डोके हलवितो, तशी मेजर कोवालेव यांच्या डोक्याची हालचाल चालली होती. ह्या चाचणीनंतर डॉक्टर मान हलवीत म्हणाले:

"नाही, शक्य नाही. तुम्ही आहात तसेच राहणं जास्त चांगलं, कारण काही करायला गेलात तर मामला आणखी बिघडेल. अर्थात नाक चिकटवणं शक्य आहे. मी आत्ता तुम्हाला ते चिकटवून देईन. पण तुम्हाला खात्रीनं सांगतो, तुमच्या ते हिताचं नाही."

"अरे वा! मी नाकाशिवाय कसं वावरायचं?" कोवालेव म्हणाले.

"आत्ता आहे त्यापेक्षा आणखी वाईट घडणं शक्य नाही. केवळ सैतानालाच ह्याचा अर्थ ठाऊक! कुठं मी हा माझा असला मुखडा दाखवू? माझ्या ओळखीची फार मोठी मोठी माणसं आहेत; आज संध्याकाळी दोन घरांना भेटी द्यायच्या आहेत. अनेकांशी माझ्या ओळखी आहेत: सरकारी सल्लागार चेख्ताऱ्योव यांची बायको, स्टाफ ऑफीसर यांची बायको... पोदतोचिना... अर्थात तिच्या ह्या असल्या करणीनंतर तिच्याशी मी केवळ पोलीसांमार्फतच व्यवहार करीन. माझ्यावर कृपा करा," कोवालेव विनवणीच्या सुरात म्हणाले, "दुसरा काही उपाय नाही का? काहीही करून नाकाला परत बसवा. गच्च नाही बसलं तरी चालेल, पण निदान ते जागच्या जागी ठेवा. धोक्याच्या क्षणी त्याला मी हळूच हातानं परत बसवीन. मला नाचता येत नाही. म्हणून निष्काळजी हालचालींनी त्याला इजा होणार नाही. खात्री बाळगा, तुमच्या ह्या भेटीचा मोबदला माझ्या कुवतीनुसार मी जास्तीत जास्त देईन..."

"माझ्यावर विश्वास ठेवा," ना मोठ्या ना हळू, पण विलक्षण अधिकारदर्शक आणि मंत्रमुग्ध करणाऱ्या आवाजात डॉक्टर म्हणाले, "मी कधीही वैयक्तिक लाभाचा हेतू ठेवून लोकांवर उपचार करीत नाही. माझ्या व्यवसायाच्या आणि कलेच्या नीतीला ते धरून नाही. माझ्या व्हिजिटबद्दल मी फी स्वीकारतो, पण तेसुद्धा माझ्या पेशंटांना नकार देऊन त्यांचा अपमान करू नये म्हणून. अर्थात मी तुमचं नाक चिकटवू शकतो, पण खात्रीपूर्वक तुम्हाला सांगतो, की जर तुम्ही माझ्या शब्दांवर विश्वास ठेवला नाही, तर परिस्थिती आहे त्यापेक्षा जास्त वाईट होईल. निसर्गाच्या करणीवर विश्वास ठेवा. वारंवार थंड पाण्यानं तोंड धुवा आणि तुम्हाला खात्री देतो की, नाकाविनासुद्धा तुम्ही नाक असल्याप्रमाणं निरोगी रहाल. आणि मी सल्ला देतो की, स्पिरीटच्या बरणीत तुमचं नाक ठेवा अथवा त्यापेक्षा जास्त चांगलं म्हणजे त्यात दोन चमचे मिरचीची वोदका आणि कोमट शिरका मिसळा—मग तुम्हाला त्याची चांगली किंमत मिळू शकेल. जर तुमची किंमत फार चढी नसली, तर मीसुद्धा ते विकत घेईन."

"नाही, नाही! मुळीच विकणार नाही!" मेजर कोवालेव निराश आवाजात ओरडले. "त्यापेक्षा खुशाल ते सडून जावो!"

"माफ करा!" झुकून डॉक्टर म्हणाले, "मी तुम्हाला मदत करू इच्छित होतो... काय करणार! निदान मी प्रयत्न केल्याचं तुम्ही पाहिलंत."

एवढे बोलून डॉक्टर ऐटीत निघून गेले. कोवालेवनी त्यांचा चेहरासुद्धा पाहिला नाही. फक्त त्यांच्या काळया टेल-कोटाच्या बाह्यांमधून पुढे डोकावणाऱ्या सदऱ्याच्या हातांची हिमशुभ्र बटणे तेवढी तंद्रीसमान अवस्थेत त्यांना दिसली.

दुसऱ्याच दिवशी, कायदेशीर तक्रार नोंदविण्यापूर्वी, स्टाफ ऑफीसरच्या बायकोला पत्र लिहून, जी त्यांची वस्तू आहे ती त्या गोडीगुलाबीने परत करायला तयार आहेत अथवा नाहीत, अशी विचारणा करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. पत्र असे होते:

"माननीय बाईसाहेब
अलेक्सानद्र ग्रीगोऱ्येवना!

तुमच्या विचित्र वर्तनाचा अर्थ मला उमगत नाही. खात्री बाळगा, असे वागून तुमचा काहीही लाभ होणार नाही आणि तुमच्या मुलीशी लग्न करण्याची बळजबरी तुम्ही माझ्यावर करू शकणार नाही. विश्वास ठेवा, माझ्या नाकामागील सर्व भानगडीची मला पूर्ण कल्पना आहे. आणि तुमच्याविना दुसऱ्या कुणाचाही तिच्यात हात नाही. त्याचे त्याच्या योग्य जागेपासून अचानक वेगळे होणे, त्याचे पलायन आणि त्याची वेषांतरे—प्रथम सरकारी अंमलदाराचे सोंग आणि नंतर आहे त्या स्वरूपात—ह्या सर्व घडामोडी तुमच्या चेटक्या कारवायांपैकी घडल्यात अथवा तुम्ही त्या कुणामार्फत करविल्यात. तुम्हाला इशारा देणे मी माझे कर्तव्य समजतो की, जर उपरोल्लेखित माझे नाक आज त्याच्या योग्य जागी परत बसले नाही, तर नाइलाजाने मला तुमच्याविरुद्ध कायदेशीर इलाज करावा लागेल.

असे असले तरीही, माझे आदरपूर्वक प्रणाम.

आपला नम्र सेवक,

प्लातोन कोवालेव."

"माननीय प्लातोन कूझ्मिच,

आपले पत्र वाचून मी थक्क झाले. असा प्रांजलपणा मला अपेक्षित नव्हता हे मी कबूल करते, त्याहूनही तुमच्याकडून असे आरोप होतील अशी कल्पना नव्हती. मी खात्रीपूर्वक सांगते की, तुम्ही नमूद केलेल्या अंमलदाराला माझ्या घरात मी वेषांतर-स्वरूपात अगर त्याच्या खऱ्या रूपात कधीही भेटले नाही. मात्र फिलीप इवानोविच पोतान्चिकोव यांनी आमच्याकडे येणे केले होते. आणि खरे आहे की, त्यांनी माझ्या मुलीला मागणी घातली होती, ते स्वतः चांगले, सुस्वभावी आणि खूप शिकलेले गृहस्थ आहेत, पण मी त्यांना त्या दिशेने कधीही उत्तेजन दिलेले नाही. तुम्ही नाकाचाही उल्लेख केलाय. म्हणजे तुम्हाला म्हणायचे असेल की, मी नाक वर करून वावरतेय, तुम्हाला नकार देतेय, तर मला अत्यंत आश्चर्य वाटतेय की तुम्ही स्वतःच हा विषय काढलात, कारण तुम्हाला जाणीव आहे की माझे अगदी उलट मत होते आणि जर तुम्ही माझ्या मुलीला आता रीतसर मागणी घालीत असाल, तर मी तात्काळ संमती देईन, कारण असे घडावे अशी माझी नेहमीच प्रामाणिक इच्छा होती आणि त्या इच्छेनुसार तुमच्या सेवेशी सदैव हजर आहे.

अलेक्सान्द्रा पोदतोचिना."

"नाही", पत्र खाली ठेवीत कोवालेव म्हणाले. "ती नक्कीच दोषी नाही. असे असणं शक्य नाही! कुणीही गुन्हेगार असं पत्र लिहिणं शक्य नाही!" न्यायालयीन सल्लागारांना ह्या गोष्टींची माहिती होती, कारण कॉकेशसमध्ये त्यांनी असले काही खटले चालविले होते. "हे घडलं तरी कसं? केवळ सैतानच जाणे!" हात लोंबकळते सोडीत शेवटी ते म्हणाले.

दरम्यान ह्या लोकविलक्षण घटनेबद्दल राजधानीत अफवा पसरत होत्या आणि अर्थातच मीठ-मसाल्यासह. त्या काळात सर्वांची मने अशा लोकविलक्षण घटना स्वीकारण्यास सज्ज होती: त्याआधी थोड्या काळापूर्वी, सबंध शहर मोहिनीविद्येचे प्रयोग करण्यात गुंतले होते. त्याशिवाय, कोन्यूशेन्नी रस्त्यावरील नाचणाऱ्या खुर्च्यांची अफवा अजून ताजी होती. त्यामुळे कोवालेव यांचे नाक नेवस्की प्रॉस्पेक्तवर बरोब्बर तीन वाजता फिरायला जाते ही अफवा फारशी आश्चर्यजनक नव्हती. दररोज कुतूहल

असणाऱ्या बघ्यांचा मोठा घोळका जमायचा. कुणीतरी म्हणाला की, युंकरांच्या दुकानापाशी नाक दिसले आणि मग त्या दुकानाजवळ लोकांची एवढी झुंबड उडाली, की पोलीसांना बोलवावे लागले. थिएटरपाशी सुका मेवा विकणाऱ्या, प्रतिष्ठित दिसणाऱ्या एका व्यापारी वृत्तीच्या पूर्ण कल्लेवाल्या माणसाने खास दणकट बाके बनविली आणि दर माणशी ८० कोपेक आकारून कुतूहल बाळगणाऱ्या लोकांना उभे रहायला जागा दिली. एक मान्यवर कर्नल घरून मुद्दाम लौकर निघाले आणि गर्दीतून मोठ्या मिनतवारीने त्यांनी वाट काढली. पण दुर्दैवाने त्यांना दुकानाच्या शोभादालनात नाकाऐवजी सामान्य लोकरी स्वेटर व पायमोजा नीट करणाऱ्या मुलीकडे पाठीमागच्या बाजूने झाडाआडून बघणाऱ्या जाकीट-वाल्या आणि छोटी दाढीवाल्या माणसाचे चित्र दिसले. ते चित्र त्याच जागी दहा वर्षांहून अधिक काळ लावलेले होते. तेथून जाताना कर्नल महाशय संतापून म्हणाले: "अशा मूर्ख आणि असंभाव्य अफवा कशा काय पसरवू देतात?"

मग नवी अफवा उठली की, मेजर कोवालेव यांचे नाक नेवस्की प्रॉस्पेक्तवर नव्हे, तर तावरीचेस्की उद्यानात फिरत होते व खूप काळा-पासून ते तेथे होते; आणि जेव्हा इराणी दूत खोझ्रेव-मिर्झा तेथे रहात होते, तेव्हा निसर्गाचा हा चमत्कार बघून ते चकित झाले होते. शल्यशास्त्र प्रबोधिनीचे काही विद्यार्थी तिकडे निघाले. एका उमराव घराण्यामधील महिलेने उद्यानाच्या व्यवस्थापकांना पत्र लिहून विनंती केली की, ही लोकविलक्षण घटना त्यांनी तिच्या मुलांना दाखवावी आणि नव्या पिढीच्या कल्याणासाठी शक्य असल्यास प्रबोधनपर धडा द्यावा.

वेगवेगळ्या स्वागत-समारंभांची आवड असणारे आणि महिलांच्या मनोरंजनात आनंद मानणारे सर्व लोक ह्या घडामोडींवर अत्यंत खूष होते, कारण तोवर त्यांच्याजवळची मनोरंजनाची साधने पूर्ण खलास झाली होती. एका सद्‌गृहस्थाने संतापून जाहीर केले की, सध्याच्या प्रबोधनपर युगात अशा मूर्ख अफवांना स्थान कसे लाभते हे त्यांना समजत नव्हते आणि सरकार अशा बाबींकडे लक्ष पुरवीत नाही याबद्दल त्यांनी आश्चर्य व्यक्त केले होते. सरकारला प्रत्येक बाबतीत गुंतवू पाह-णाऱ्या, बायकोबरोबर रोज घडणाऱ्या भांडणांमध्येसुद्धा, नागरिकांपैकी

हा गृहस्थ होता हे स्पष्ट होते. त्यानंतर... पण इथे पुन्हा सर्व गूढते-च्या धुक्यात गुरफटले आणि नंतर काय घडले ते निश्चित समजले नाही.

३

आयुष्यात अत्यंत विचित्र घटना घडतात. काही वेळा त्या असंभाव्य असतात: सरकारी सल्लागार बनून शहरभर भटकणारे आणि जनतेत खळबळ माजविणारे ते नाक जणू काही घडलेच नाही अशा थाटात स्वतःच्या जागी परतले, अगदी योग्य स्थानी, म्हणजे मेजर कोवालेव यांच्या दोन गालांच्या दरम्यान. ७ एप्रिल रोजी ही घटना घडली. कोवालेव झोपेतून जागे झाले आणि सहज त्यांनी आरशात पाहिले तो काय! नाक! त्यांनी हातांनी चाचपले–खरेच नाक! "एहे!" कोवालेव उद्गारले आणि इवानचे त्याचवेळी खोलीत आगमन झाले नसते, तर आनंदाच्या भरात त्यांनी खोलीमध्ये अनवाणी त्रोपाक नाच केला असता. तात्काळ त्यांनी तोंड धुण्याच्या वस्तू मागविल्या आणि तोंड धुतल्यावर परत आरशात पाहिले: नाक! टॉवेलने तोंड पुसून त्यांनी पुन्हा एकदा आरशात पाहिले: नाक!

"अरे इवान, जरा बघ पाहू, माझ्या नाकावर बहुधा पुटकुळी उमटलीय," ते म्हणाले आणि दरम्यान त्यांनी विचार केला: "जर इवान म्हणाला, नाही साहेब, फक्त पुटकुळीच नव्हे तर खुद्द नाकच नाही, तर आली पंचाईत!"

पण इवान म्हणाला:

"नाही, पुटकुळी वगैरे काही नाही, नाक अगदी स्वच्छ आहे."

"छान, च्यायला!" मेजर स्वतःशी म्हणाले आणि बोटांनी त्यांनी नाक चाचपले. ह्याच क्षणी न्हावी इवान याकोवलेविच दाराशी उपस्थित झाला, पण नुकतीच डुकराची चरबी चोरलेल्या मांजराप्रमाणे तो भ्यायलेला होता.

"आधी सांग: तुझे हात स्वच्छ आहेत?" तो दूर असतानाच कोवालेव त्याच्यावर खेकसले.

"होय, स्वच्छ आहेत."

"खोटं बोलतोस."

"देवाशपथ, स्वच्छ आहेत, साहेब."

"आधी बघ पाहू."

कोवालेव बसले. इवान याकोवलेविचने त्यांना टॉवेल गुंडाळला आणि क्षणात ब्रशाच्या साह्याने त्यांची संपूर्ण दाढी व गालांचा काही भाग यांना क्रीममध्ये झाकून टाकले—व्यापाऱ्यांच्या घरी वाढदिवशी देतात तशा क्रीमसारखे!

"अरे वा, तू!" नाकावर नजर टाकीत इवान याकोवलेविच स्वतः-शी म्हणाला, मग डोके वळवून त्याने एका बाजूने नाकाकडे पाहिले: "पहा त्याच्याकडं! खरंच, कुणी विचार केला असता!" तो खूप वेळ-पर्यंत नाकाकडे पहात राहिला. शेवटी अत्यंत नाजुकपणे व सावधपणे नाकाचा शेंडा धरण्यासाठी त्याने दोन बोटे वर उचलली. इवान याको-वलेविचची ती तऱ्हा होती.

"अरे, अरे, अरे, सांभाळून!" कोवालेव ओरडले.

त्यावर इवान याकोवलेविचने पटकन हात खाली केले. आयुष्यात यापूर्वी एवढा तो कधीही घाबरला नव्हता. शेवटी तो काळजीपूर्वक मेजर-च्या हनुवटीवरून वस्तरा फिरवू लागला; गिऱ्हाईकाच्या शरीराचा वास घेण्याचा भाग चिमटीत न पकडता दाढी घोटणे जरी त्याला कठीण जात होते, तरी सर्व अडचणींवर मात करण्यासाठी त्याने मेजरचा गाल व खालची हिरडी ह्यांच्या दरम्यान स्वतःचा खरबरीत अंगठा दाबून धरला व श्मश्रूकर्म पार पाडले.

जेव्हा दाढी संपली, तेव्हा कोवालेव यांनी घाईघाईने कपडे केले, घोडागाडी मागवली आणि थेट मिठाईचे दुकान गाठले. दुकानाच्या दा-रातून आत शिरतानाच ते ओरडले: "पोऱ्या, एक कप चॉकलेट!" आणि त्याच क्षणी आरशाकडे वळले: नाक आहे! ते आनंदाने मागे वळले आणि डोळे बारीक करून दोन लष्करी अधिकाऱ्यांकडे त्यांनी उपहासपूर्ण कटाक्ष फेकला: त्यांपैकी एकाचे नाक बंडीच्या बटणाएवढे होते! मग व्हाईस-गव्हर्नरपदासाठी अथवा त्यात अपयश आल्यास शासक-पदासाठी ते जेथे प्रयत्न करीत होते, त्या खात्याच्या कचेरीकडे त्यांनी मोर्चा वळविला. आत जाताना स्वागत-कक्षातील आरशावर त्यांनी नजर

टाकली : नाक आहे! मग ते दुसऱ्या एका न्यायालयीन सल्लागाराला, सहकारी मेजरला, भेटायला गेले. तो मोठा टीकाकार होता आणि त्याच्या बोचऱ्या शेऱ्यांवर ते नेहमी उत्तर देत : "अरे, मी तुला ओळखतो, तू विंचवाची नांगी आहेस!" वाटेत जाताना त्यांनी विचार केला : "जर मला पाहताच मेजर पोट दुखेपर्यंत हसला नाही, तर नक्की समजायचं की, सर्व काही जागच्या जागी आहे." पण न्यायालयीन सल्लागाराने काहीच प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. "छान, छान, च्यायला!" कोवालेव स्वतःशी म्हणाले. रस्त्यावर त्यांना मादाम पोदतोचिना तिच्या मुलीसह भेटली. त्यांनी त्या दोघींना लवून अभिवादन केले आणि त्यांचे आनंदपूर्वक आरोळ्यांनी स्वागत झाले : म्हणजे त्यांच्या चेहऱ्यावर काही वावगे नव्हते! त्या दोघींशी ते खूप वेळपर्यंत बोलले, संभाषणाच्या दरम्यान त्यांनी मुद्दाम तपकिरीची डबी काढली आणि दोन्ही नाकपुड्यांमध्ये भरपूर तपकीर कोंबली. त्यांच्या मनात सतत विचार येत होता : "बघा बायांनो, कलकलत्या कोंबड्यांनो! मुलीशी मी मुळीच लग्न करणार नाही. नुसत्या प्रेमाला ठीक आहे!" आणि नंतर मेजर कोवालेव जणू काही घडलेच नव्हते अशा थाटात नेवस्की प्रॉस्पेक्तवरून भटकू लागले, नाटकांना जाऊ लागले, स्वतःचा चेहरा सर्वत्र दाखवू लागले. आणि त्यांचे नाकसुद्धा जणू कधी काही घडलेच नव्हते अशा थाटात त्यांच्या चेहऱ्यावर कायम चिकटून राहिले, कधी ते तेथून निसटले होते ह्याची पुसटती खूणसुद्धा उरली नव्हती. त्यानंतर मेजर कोवालेव सदैव चांगल्या मनःस्थितीत होते; सस्मित मुद्रेने वावरत होते, सुंदर स्त्रियांचा चिकाटीने पाठलाग करीत होते आणि एकदा तर गोस्तीनी द्वोर* पाशी थांबून एक ठेल्यावरून त्यांनी पदकासाठी फीत विकत घेतली. तसे त्यांनी करण्याचे कारण मात्र उमगले नाही, कारण त्यांना कुठल्याही दर्जाच्या सरदारकीचा मान लाभलेला नाही.

तर आमच्या अफाट देशाच्या उत्तरेकडील राजधानीत अशी घटना घडली! संपूर्ण गोष्टीवर विचार केल्यानंतर केवळ आत्ता आमच्या ध्या-

---

*पीटरबुर्गमधील (आताचे लेनिनग्राद) मुख्य बाजारपेठेचे ठिकाण —सं.

नात आले की, तिच्यात खूप असंभाव्यता भरलेली आहे. नाकाचे विचित्रपणे सोडून जाणे आणि सरकारी सल्लागाराच्या सोंगात त्याने वेगवेगळ्या स्थळी वावरणे, ह्या गोष्टी जरी एक वेळ बाजूला ठेवल्या, तरी हरवलेल्या नाकांबद्दल वर्तमानपत्रात जाहिराती देत नाहीत हे कोवालेव यांच्या ध्यानात कसे आले नाही? वृत्तपत्रीय जाहिराती म्हणजे वृथा खर्च असे मला म्हणायचे नाही— तसे समजणे मूर्खपणाचे ठरेल आणि मी कंजूस माणसांपैकी नाही. पण तसे करणे असभ्यपणाचे, अयोग्य, चुकीचे आहे! शिवाय, ताज्या भाजलेल्या पावात नाक कसे आले आणि खुद्द इवान याकोवलेविचचे काय?.. नाही, मला ते समजत नाही, अगदी मुळीच नाही! त्याहून विचित्र म्हणजे आणि समजायला सर्वांत कठीण म्हणजे, लेखक अशा प्रसंगांना कथा-विषय म्हणून का निवडतात? मला कबूल केले पाहिजे की, हे अगदी अनाकलनीय आहे... नाही, नाही, मला अजिबात कळत नाही. पहिली गोष्ट, ह्याचा राष्ट्राला काहीही उपयोग नाही; दुसरी गोष्ट... दुसरीसुद्धा काही फायद्याची नाही. हे काय, मला समजत नाही...

पण तरीसुद्धा, सर्व गोष्टींचा विचार करता, आपण कदाचित ही ना ती बाब मान्य करू शकतो, एवढेच नव्हे तर... विचित्र गोष्टी जगात कुठे घडत नाहीत? आणि विचार केला तर मान्य करावे लागेल, त्यात काहीतरी अर्थ आहे. तुम्ही काहीही म्हणा, अशा गोष्टी घडतात, क्वचित घडतात, पण घडतात.

१८३५-१८४२



अलेक्सान्द्र गेर्त्सेन

चोरटी मैना

अलेक्सान्द्र गेर्त्सेन (१८१२-१८७०)–ह्यांचे कार्य व्यापक आणि बहुविध होते. ते ज्वलंत क्रांतिकारक होते, प्रमुख सार्वजनिक कार्यकर्ते होते, उत्तम तत्त्वज्ञ होते, गुणी लेखक होते, तेजस्वी प्रचारक होते.

१८२५ सालामधील क्रांतिकारक "देकाब्रिस्तां"च्या उठावाचा गेर्त्सेन यांचा जागतिक दृष्टिकोन घडविण्यात फार मोठा प्रभाव पडला. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर "त्या बंडाने त्यांच्या मनातील बालिश स्वप्न जागे केलें." रशियातील भूदास पद्धतीबद्दल गेर्त्सेन यांना लहानपणापासून मनस्वी तिटकारा होता.

गेर्त्सेन यांच्या क्रांतिकारक विचारसरणीमुळे झार सरकार त्यांच्यावर अनेक वर्षेपर्यंत नजर ठेवून होते. प्रदीर्घ काळ त्यांना हद्दपारीत काढावा लागला आणि १८४७ साली कायमचा देशत्याग करावा लागला.

परदेशात जाण्याआधीच गेर्त्सेन यांचे नाव रशियात प्रसिद्धी पावलें होते. 'शास्त्रातील नवखेपणा' आणि 'निसर्गाच्या अभ्यासाबाबतची पत्रें' ह्या त्यांच्या तत्त्वज्ञानपर पुस्तकांनी रशियन तत्त्वज्ञानाच्या भौतिकवादी परंपरेचा पाया घालण्यात व तिचा विकास घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. 'एका तरुण माणसाची टिपणे', 'डॉक्टर क्रूपोव', 'चोरटी मैना', ह्या साहित्यकृती व 'दोषी कोण?' ही कादंबरी रशियन वाचकांमध्ये अमाप लोकप्रिय होती.

मायभूमीपासून दूर राहूनही, गेर्त्सेन यांनी सामाजिक-राजकीय व साहित्यिक सक्रिय कार्य चालू ठेवले होते. १८५३ साली त्यांनी लंडनमध्ये स्वतंत्र रशियन छापखाना स्थापन केला. रशियात बंदी असलेली पुस्तके त्या छापखान्यात छापली जात. १८५५ पासून 'ध्रुवतारा' नियतकालिक सुरू केलें. १८५७ पासून ओगारेव यांच्यासह गेर्त्सेननी 'कोलोकोल' ('घंटा') वर्तमानपत्र सुरू केले. रशियात छापण्यास मनाई असलेले व बेकायदेशीर लेख 'कोलोकोल' मध्ये प्रसिद्ध होऊ लागलें, एकतंत्री राजवटीविरुद्ध लढ्याचे आवाहन देणारे साहित्य छापण्यात येऊ लागले. गेर्त्सेन यांचे साहित्यलेखनही चालू होते. त्यांनी काही दीर्घकथा लिहिल्या व जागतिक साहित्यात एका उत्कृष्ट आत्मचरित्राची भर घातली–'भूतकाळ आणि चिंतन.'

मिखायल सेम्योनोविच श्चेपकिन* यांना अर्पण

वैभवाने नटवलेले तुझे घर,
उघडे सदा सर्व अतिथींना;
येते तिथे तेर्पसिखोरा
आणि सखी तालियासह एरॉस;
प्रेमळ मनाचा यजमान झुकून
करतो त्यांचे आनंदी नजरेने स्वागत.

'युक्रेनी वेस्तनिक', १८१६ साल.

"तुमच्या ध्यानात आलंय," केस डोक्यालगत बारीक कापलेला तरुण आमचे रंगभूमीविषयक संभाषण पुढे चालवीत म्हणाला, "तुमच्या ध्यानात आलंय का, की आपल्याकडं चांगले नट दुर्मिळ असले तरी ते आढळतात, पण चांगल्या नटचा अजिबात नाहीत आणि सेम्योनोवाचं नाव दंतकथेत जमा झालंय. ह्यामागं काहीतरी कारण नक्की असेल."

"कारण शोधायला फार दूर जायला नको. तुम्हाला ते न समजायचं कारण एवढंच," गोलाकार केस कापलेला दुसरा इसम आक्षेप घेत म्हणाला, "की तुम्ही सर्व गोष्टी पश्चिमी चष्म्यातून पाहता. स्लाव बाई रंगभूमीवर पाऊल टाकून लोकांच्या समोर स्वतःचं प्रदर्शन करायला कधीही सरावणार नाही, केवळ तिच्या नवऱ्यासाठी ठेव म्हणून जतन केलेल्या भावनांचा प्रक्षोभ करणार नाही; तिचं स्थान घरात, चव्हाट्यावर नव्हे. ती अविवाहिता – तेव्हा ती मुलगी, स्वतःचं मत नसलेली आज्ञाधारक मुलगी; विवाहिता – तेव्हा आज्ञाधारक पत्नी. कुटुंबात स्त्रीचं हे स्वाभाविक स्थान आहे आणि त्यामुळं चांगल्या नटचा आपल्याला मिळू शकत नाहीत हे खरं असलं, तरी नैतिक विशुद्धतेची जपणूक होते."

"तर मग कशामुळं जर्मनांचं," मुळीच केस न कापलेला तिसरा म्हणाला, "कौटुंबिक जीवन आपल्याएवढंच स्थिर आहे आणि तरीसुद्धा तिथं अनेक चांगल्या नटचा निर्माण व्हायला मुळीच अडथळा येत नाही? शिवाय माझा तुमच्याशी तात्त्विक मतभेद आहे: पश्चिमी स्लाव त्यांच्या चुलीपाशी काय करतात मला माहीत नाही,

---

* श्चेपकिन मिखायल सेम्योनोविच (१७८८-१८६३) – एक अभिनय-निपुण रशियन नट – सं.

पण आम्ही रशियन मात्र तुम्ही म्हणताय तसे पितृसत्ताक राहिलो नाही, ती रूढी झपाट्यानं बंद होत चाललीय."

"कृपा करून सांगा, स्लाव कुटुंबाचं निरीक्षण आणि अभ्यास तुम्ही कुठं केला? वरच्या थरांमध्ये, शहरात वेगळं आयुष्य जगणाऱ्यात? ज्यांनी ग्रामीण चालीरीती टाकून दिल्यात? अथवा हमरस्त्यांवर, जिथं शेतकरी व्यापारी बनलाय, जिथं तुमच्या उद्योगधंद्यांनी वैपुल्यानं त्याला बिघडवून टाकलाय आणि खोट्या गरजा शिकवल्यात? इथं कुटुंब शिल्लक राहिलं नाही. जर कुटुंब पहायची इच्छा असेल, तर हमरस्त्यापासून आडबाजूला असलेल्या छोट्याशा खेड्यात जा."

"आश्चर्य आहे, दुसऱ्यांच्या दृष्टीनं संपन्नतेच्या आणि प्रगतीच्या खुणा ठरलेले मोठे रस्ते, शहरं ह्या गोष्टी स्लावांना मात्र अपायकारक आहेत, असं तुम्ही प्रतिपादन करताय. तुमच्या मतानं, नैतिक विशुद्धता राखण्यासाठी दळणवळण, वाहतूक, व्यापार असू नयेत; एवढंच नव्हे तर प्रगतीची मूलभूत अट असलेली आर्थिक सुस्थितीसुद्धा असू नये. अर्थात, रॉबिन्सन क्रूसो जेव्हा बेटावर एकटा रहात होता, तेव्हा आदर्श माणूस होता. तो कधी पत्ते खेळला नाही, दारूच्या गुत्त्यांमध्ये गेला नाही."

"कुठल्याही गोष्टीला विकृत रूपात दाखविता येतं. विनोद कधी कधी हशा निर्माण करू शकतो, पण विधानाचं खंडन करण्याचा तो मार्ग नव्हे. अशा काही गोष्टी आहेत ज्या तुम्हाला कधी समजणार नाहीत– तुमची पश्चिमी बुद्धी कितीही चपळ असली तरी. कान नसलेल्या माणसाला संगीत समजणार नाही, पण त्यामुळं चांगला चित्रकार होण्यास अथवा आणखी कुणी होण्यास अडथळा येणार नाही, हे न समजणाऱ्यासारखी तुमची अवस्था आहे. दारिद्र्य, नम्रता आणि कष्टाळूपणा ह्या गोष्टी आत्मतुष्ट श्रीमंतीपेक्षा श्रेष्ठ आहेत, हे तुम्हाला कधीही समजणार नाही. तुम्हाला आमचं पितृसत्ताक कौटुंबिक जीवन समजणार नाही, शेतकऱ्याच्या लाकडी झोपडीतलं जीवनही समजणार नाही, जिथं बाप कुटुंबाचा प्रमुख असतो, सबंध खेड्यातही समाजाचा प्रमुख बाप असतो. काटेकोर हक्कांची, लोकांसाठी आणि स्तरांसाठी चौकटी आखण्याची, परस्पर नियंत्रणाची आणि अविश्वासाची–पश्चिमेला आवश्यक असलेल्या

सर्व गोष्टींची – तुम्हाला सवय झालीय. तिथं वैरावर सगळं आधारलंय, तिथं सरकारनं सोडवायची एकमेव समस्या म्हणजे, तुमच्याच कवीच्या शब्दात सांगायचं तर, लढ्यात कौशल्यानं समतोल राखायचा :

इथं प्रखर हल्ला, तिथं कठोर प्रतिकार,
नव्या नागरिकत्वाचे धीट झरे...

"आपल्याकडं चांगल्या नट्या का विरळा आहेत, ह्या प्रश्नाचं उत्तर ह्या वाटेनं मिळेल असं मला वाटत नाही," संभाषणाची सुरुवात करणारा माणूस म्हणाला. "जर आपल्या विषयाला न्याय द्यायचा असेल, तर वाटेवरील सर्व ऐतिहासिक आणि राजकीय प्रश्नांचा विचार केला पाहिजे, तुमच्या आयुष्याची सुमारे चाळीस वर्षं त्यासाठी खर्च केली पाहिजेत आणि तरीही निष्पत्ती शंकास्पद राहील. सन्माननीय स्लाव, तुम्हाला म्हणायचंय की, आपल्याकडं चांगल्या नट्या नसण्याचं कारण स्त्री व्यक्ती म्हणून नव्हे तर कुटुंबाचा एक घटक म्हणून अस्तित्वात आहे आणि त्या कुटुंबात ती पूर्ण मिसळून गेलीय. तुम्ही म्हणताय त्यात बराच सत्याचा भाग आहे. तरीही तुमचं म्हणणं आहे की, कुटुंब फक्त छोट्या खेड्यांमध्ये सापडेल. पण नट्या काही आडवळणाच्या खेड्यांमधून येत नाहीत!"

"इथं मला उत्तर देण्याची परवानगी द्यावी," युरोपीयन म्हणाला (केस न कापलेल्या माणसाला आपण असे नाव ठेवू), "आपल्याकडं एकूणच, हमरस्त्यांवर आणि खेड्यांमधल्या गल्ल्यांमधून, जीवनाच्या सगळ्या पैलूंमध्ये भाग घेण्याचा बाईला हक्क लाभलेला नाही, जसा उदाहरणार्थ, फ्रान्समध्ये आहे. अपवाद आढळतात, पण त्यांच्यासोबत नेहमी गाजावाजा असतो – अपवाद आहेत ह्याचा उत्तम पुरावा मिळतो. आपल्याकडं एखाद्या स्त्रीनं जर सुशिक्षित पुरुषाशी समानतेनं वागायचं ठरवलं, तर ती स्वतःचे हक्क बजावण्यापेक्षा विमुक्तीचं प्रदर्शन जास्त करीत बसेल."

"अर्थात अशी स्त्री राक्षसी अपवाद ठरेल. आणि सुदैवानं," स्लाव प्रत्युत्तर करीत म्हणाला, "आपल्याकडं तशा विमुक्त महिला सापडणार नाहीत. आणि खरोखरच अशा स्त्रीला कुठं शोधावं अथवा नाही, मला

माहीत नाही. मानवी हक्कांबाबत सांगायचं तर ह्या वस्तुस्थितीकडं लक्ष द्या: प्राचीन काळापासून आमच्या स्त्रीला युरोपातल्या स्त्रीपेक्षा जास्त हक्क लाभलेत. तिची इस्टेट नवऱ्याच्या इस्टेटीशी जोडली जात नाही, निवडणुकीत तिला मताचा हक्क आहे आणि भूदासांना ती पदरी बाळगू शकते."

"अर्थात, आपल्या महिलांना लाभलेले सगळे हक्क युरोपीय स्त्रियांना मिळालेले नाहीत हे खरं आहे. पण माफ करा, इथं आपण लिखित हक्कांबद्दल बोलत नाही, अलिखित हक्कांबद्दल, सार्वजनिक मताबद्दल, बोलतोय. आपल्या परिचयाची एखादी स्त्री आपल्या ह्या अत्यंत शांत आणि मुळीच अपमानकारक नसलेल्या संभाषणाच्या दरम्यान अचानक उगवली, तर आपण स्वत: काय म्हणालो असतो बरं? माझी खात्री आहे, आपल्याला आणि तिला, दोघांनाही अवघड वाटलं असतं. स्त्रियांच्या उपस्थितीत आपण अगदी वेगळे वागतो. ह्यातच महिलांविषयीचा आपला अनादर व्यक्त होतो."

"तुम्ही जॉर्ज सँड फार वाचताय. पुरुषानं स्त्रियांशी मुळीच मोकळं वागू नये; आणि कशाला बाईनं पुरुषाच्या संभाषणात भाग घ्यायला जायचं? बायकांचा अडथळा नसलेल्या पुरुषांच्या बैठकी मला भयंकर आवडतात, ह्यात काहीतरी कठोरपणा आहे, कडकपणा आहे."

"आणि घरात ठेवून आलेल्या स्त्रियांविषयी अत्यंत मानवतावादी दृष्टिकोन. मला वाटतं, तुम्ही थोडे आधी जन्माला आला असतात, तर झापोरोझ्येच्या कझाकांमध्ये सामील झाला असतात!"

"तुमचा विचार इतका परका आहे की, तो व्यक्त करायला तुम्हाला एकही रशियन शब्द सापडला नाही. जणू काही घरच्या जीवनाच्या माफक वर्तुळात बाईला कमी कामं आहेत; मातेबाबत तर मी बोलतच नाही, जिची कामं खूप पवित्र आणि खूप अवघड आहेत."

"आहो, हे माफक वर्तुळ! तुमच्या स्लाव सिद्धांतांशी सहमत असलेल्या सम्राट ऑगस्टसनं स्वत:च्या मुलीला घरात ठेवलं होतं आणि कुणी तिच्याबद्दल विचारलं तर हसून म्हणायचा: 'घरात बसलीय, लोकर काततेय.' पण म्हणून तिची नीतीमत्ता पूर्ण शुद्ध राहिली असं समजू नका. माझ्या मते, जर बाईला आपल्या निम्म्या स्वारस्यांमध्ये, छंदांमध्ये,

मनोरंजनांमध्ये सहभागी करून घेतलं नाही, तर ती अर्धशिक्षित राहते आणि खुशाल मला चेक भाषेत शिव्या घाला, पण तिची नीतीमत्तासुद्धा निम्मीच राहील. भक्कम नीतीमत्ता सुजाणतेपासून अविभाज्य आहे."

"आता माझी पाळी तुमचं बोलणं खोडून काढण्याची," संभाषणाचा आरंभकर्ता म्हणाला. "प्रत्येकानं स्वतःच्या डोळ्यांनी पाहिलंय की, आपल्याकडच्या सुशिक्षित स्तरांमधील स्त्रिया त्यांच्या नवऱ्यांपेक्षा कितीतरी पटींनी श्रेष्ठ आहेत. ह्यानंतर जीवनाबद्दलची सार्वत्रिक सूत्रं गुंफून दाखवा. मामला अगदी स्पष्ट आहे. आपल्याकडं पुरुष नुसता पुरुष नाही–तो लष्करी अथवा नागरी सेवक आहे; वयाच्या विसाव्या वर्षापासून तो स्वतःचा रहात नाही, तो कामात गुंतलेला असतो: लष्करी–प्रशिक्षणात, नागरी– कागदपत्रांमध्ये, आणि बायका जर पूर्णतः लोणची-मुरंबे घालण्यात अडकल्या नसतील, तर फ्रेंच कादंबऱ्या वाचत बसतात."

"त्यांचं अभिनंदन करतो. चांगलं शिक्षण मिळत असणार," स्लाव मध्येच म्हणाला, "बाल्झाक, स्यू, दचूमा यांच्यापासून; दुसरं काही करायला शक्ती न राहिल्यामुळं नीतीमत्तेचे धडे द्यायला लागलेल्या ह्या म्हाताऱ्यांच्या वटवटीतून."

"मी तुमच्याशी सहमत आहे, तरीही मी असं म्हटलं नाही की, तुम्ही उल्लेखलेल्या कादंबऱ्या बायका वाचतात; आश्चर्य म्हणजे अत्यंत पोकळ फ्रेंच कांदबऱ्या आपल्या महिलांवर जेवढा प्रबोधक परिणाम घडवतात, त्यापेक्षा अत्यंत महत्त्वाचे उद्योग त्यांच्या नवऱ्यांवर कमी परिणाम घडवतात. आणि हे सर्व काही अंशी तरी फ्रेंचांना दैवानं तसं घडवलं आहे म्हणून! फ्रेंचानं काहीही केलं, तरी तो अखंड शिकत असतो. अत्यंत अनैसर्गिक भावनांबद्दल तो सामान्य कादंबरी लिहितो, तिच्यात गुणी दुर्गुण आणि दुर्गुणी गुण असतात व वाटेवर, अथवा नेमके म्हणजे वाटेबाहेर, तो अशा उदात्त प्रश्नांना स्पर्श करतो की, तुम्ही श्वास रोखून धरता, कमालीचे भेदरून जाता आणि त्या भीतीमधून सुटका करून घेण्यासाठी विचार करू लागता. सर्व प्रश्नांना तुम्हाला उत्तरे मिळतीलच असे नाही, असे आपण धरून चालू, पण तुमच्या भावना चाळवल्या ही साधी वस्तुस्थिती तुम्हाला शिक्षण मिळाल्याचं द्योतक आहे. आपल्या-

कडलं महिलांचं आणि पुरुषांचं शिक्षणामधलं हे नातं मला नट्या नसण्या-पेक्षा जास्त चकित करतं."

"तुम्हाला आणखी काय पाहिजे?" चिडून स्लावने विचारले. "आपल्याकडं नट्या नाहीत याचं कारण म्हणजे स्लाव स्त्रीच्या गुणी नम्रतेला हा व्यवसाय योग्य नाही. तिला गप्प बसायला आवडतं."

"तुम्ही हे केव्हाच सांगून टाकायचं," युरोपीयन मध्येच त्याला अडवून म्हणाला. "इच्छेपेक्षा जास्त खुलासा केलात. आता स्पष्ट झालं, आपल्याकडं नट्या का नाहीत, पण नाचणाऱ्या बाया भरपूर आहेत. पण विनोद बाजूला ठेवू. मला वाटतं, आपल्याकडं नट्या नाहीत याचं कारण त्यांना कधी ठाऊक नसलेल्या भावना व्यक्त करायला त्यांना भाग पाडण्यात येतं, गुणांची कमतरता आहे म्हणून मुळीच नव्हे. कलावंताला व्यक्त करायची प्रत्येक भावना त्याच्या ओळखीची असली पाहिजे, जर त्याला उपहासाविना ती व्यक्त करायची असेल तर. 'अफू आणि शँपेन' मध्ये चिनी माणसाचं सोंग आणणं सोपं आहे, पण चुकून अस्पृश्याला स्पर्श केला म्हणून निराशेच्या खोल गर्तेत बुडालेल्या हिंदुस्थानी ब्राह्मणाची, अथवा खानदानी अभिमानाच्या झटक्यात टेबलाखाली लोळण घेणाऱ्या आणि ज्याला अक्षरशः पायांना खेचून बाहेर काढावे लागले अशा १७व्या शतकातल्या बायाराची भूमिका सार्थपणं वठवणं मला शक्य आहे का? जर आपल्या बायका खरोखरीच व्यक्ती म्हणून अस्तित्वात न राहता पूर्णपणं त्यांच्या कुटुंबांमध्ये गुरफटलेल्या असत्या, तर नट्यांबद्दल विचार करण्याचं कारणच उरलं नसतं. धनगराच्या जीवनात, इतरत्र असतात त्याप्रमाणं, भावनावेग असतील, पण नाटकात असतात तशा प्रकारचे नव्हेत: आंधळा आज्ञाधारकपणा, दुष्ट रहस्यमयता आणि दुटप्पीपणा ह्या गोष्टी नीच खून, वासनामयता ह्यांच्याइतक्याच अस्सल नाटकाला अयोग्य आहेत. अशिक्षित कुटुंब पुरेसे विकसित नसते—पण नाटकात व्यक्तींची गरज असते. सुदैवानं अशी कुटुंबे फक्त दंतकथांमध्ये आणि स्लावांच्या स्वप्नांमध्ये अस्तित्वात असतात. जरी आपण पितृसत्ताक पद्धतीचा अडथळा ओलांडला असला, तरी जिवंत माणसांबद्दल खूप खोलपणं जाणवून घेण्याइतपत आणि इतरांच्या अनुभवाचं दुःख सोसण्याइतपत, आपण अजून तेवढे विविधांगी बनलो नाही, मी तुम्हाला विचारतो,

रशियन नटी 'ऑर्लीन्सची तरुणी' कशी वठवेल? हे तिच्या आवाक्यातलं नाही; अथवा शेक्सपीयरच्या महान आणि उदास, मानी आणि जातिवंत अशा जॉन, रिचर्ड, हेन्री यांच्यासारख्या पूर्ण इंग्लिश व्यक्तिरेखांना रशियन नट कशा उभं करील? डोळ्यांनी वास घेणारा आणि कानांनी गाणारा माणूस जेवढा विचित्र, तेवढ्याच त्या व्यक्तिरेखा त्याला परक्या. फालस्टाफ तो चटकन समजू शकेल, कारण फालस्टाफमधील काही गोष्टी आपण कोणत्याही घरात कुठल्याही प्रांतिक गावात पाहू शकतो..."

"पण अखिल मानवजातीच्या काही सामायिक भावना आहेत ना?"

"आहेत आणि नाहीत. ऑथेल्लो आफ्रिकी रीतीनं मत्सरी होता, त्यानं निष्पाप डेस्डेमोनाचा गळा दाबला आणि नंतर स्वतःला "कुत्रा" म्हणवून स्वतःचा गळा कापून घेतला. पण माझ्या इस्टेटीशेजारीच इस्टेट असलेला माझा एक स्नेही होता, जो कमालीचा मत्सरी होता; एकदा त्याच्या बायकोच्या नावे आलेलं पत्र त्याच्या हाती पडलं आणि पत्रलेखकाच्या व त्याच्या बायकोच्या संबंधांबाबत त्याला काही शंका राहिली नाही. संतापाच्या भरात त्यानं सर्व भूदास मुलींना चाबकानं फोडून काढलं, हुजऱ्याला सैनिक म्हणून पाठवलं—आणि बायकोशी समझोता केला. मत्सर ही एकच समान भावना आहे—पण हब्शाचा संताप आणि माझ्या स्नेह्याची नोकरांना नीतीमत्ता शिकविण्याची तऱ्हा, यांच्यात साम्य आहे का? दुसऱ्याची परिस्थिती, दुसऱ्याच्या भावना, काही एका मर्यादेपर्यंत समजून घेण्याची बळजबरी स्वतःवर करणं शक्य आहे, पण कलेच्या खेळाला हे अपुरं आहे. माझ्यावर विश्वास ठेवा, कवी स्वतःशी जेवढा अधिक प्रामाणिक, जेवढा प्रांजल, तेवढं त्याचं काव्य अधिक वरच्या प्रतीचं, तेवढ्या जास्त जोरानं तो तुमच्या काळजाला हात घालतो; नटाच्या बाबतीत असंच आहे: जे त्याला जाणवत नाही, ते तो व्यक्त करू शकत नाही अथवा केवळ प्रशिक्षणापायी थंडपणं व्यक्त करील. तुम्ही विसरू नका, कवीनं निर्माण केलेल्या व्यक्तिरेखेत तो स्वतःची काही भर घालीत असतो."

"एवढी गरमागरम चर्चा कशाबद्दल चाललीय?" एका नामवंत नटाने खोलीत प्रवेश करीत विचारले.

"अगदी वेळेवर आलात. आम्ही चर्चा करीत असलेल्या प्रश्नाचा

तुम्हीच आता निर्णय करा; आम्ही एकमतानं तुमची कधीही चूक न करणारे न्यायाधीश म्हणून निवड करतो."

"हा माझा मोठा मान समजतो. काय भानगड आहे?"

"सर्वप्रथम सांगा, कलेबाबतच्या तुमच्या सर्व अपेक्षांचं समाधान करू शकली अशी एखादी रशियन नटी तुम्ही पाहिलीय का?"

"मार्स, राशेल यांच्यापेक्षा वाईट नसलेली?"

"निदान आल्लान आणि प्लेस्सीइतकी."

"पाहिलीय," नट उत्तरला, "फार मोठी रशियन नटी पाहिलीय; मात्र मी तिची कुणाशी तुलना करणार नाही. आत्ता तुम्ही नावं घेतलेल्या सर्व नट्या छान आहेत, थोर आहेत, प्रत्येक नटी आपापल्या परीनं चांगली आहे, पण मी जिला पाहिलंय, तिच्याशी ह्या नट्यांच्या कलेची कशी कसोटी लावायची, मला समजत नाही. एवढंच माहीत आहे की, मी फार मोठी नटी पाहिलीय आणि ती रशियन होती."

"मॉस्कोत अथवा पीटरबुर्गमध्ये?"

"ही छान समस्या आपल्या स्लावसाठी," एक संभाषणकर्ता मध्येच म्हणाला, "तुम्हाला काय वाटतं, मॉस्कोपेक्षा पीटरबुर्गचा नाटकांशी अधिक संबंध आहे ना? कुठं होती ती नटी?"

"काही असो, ती मॉस्कोतच असावी," स्लाव ठामपणे म्हणाला.

"शांत व्हा. मी तिला ह्या दोन्ही शहरांमध्ये पाहिलं नाही, तर एका छोट्या प्रांतिक गावी पाहिलं."

"हे तुम्ही वेगळेपणा दाखविण्यासाठी बोलताय. आमच्यावर प्रभाव पाडू पाहताय."

"शक्य आहे. तुम्ही मला कधीही चूक न करणारा न्यायाधीश म्हणून मान्य केलंय—तेव्हा माझ्यावर विश्वास ठेवणं तुमचं काम आहे. पण वीस वर्षांपूर्वी मी एका थोर नटीला पाहिलं, त्यावेळी 'चोरटी मैना' नाटक पाहताना मी रडलो, आणि हे सारं एका छोट्या गावी घडलं, हे तुम्हाला आता मी कसं पटवून देणार?"

"फार सोपं आहे. तिच्याबद्दलचे काही तपशील आम्हाला सांगा. 'चोरटी मैना' नाटकात ती काही एकदम आकाशातून पडली नाही आणि नाटकाच्या प्रयोगानंतर त्या अनैतिक पक्षिणीबरोबर उडून गेली नाही!"

"ठीक आहे, मात्र ह्या आठवणी माझ्या दृष्टीनं आनंददायी नाहीत,

फार वेदना करणाऱ्या आहेत. जर तुमची इच्छा असेल, तर जेवढं आठ-वतंय, तेवढं सांगतो. मला सिगार द्या."

"ही घ्या कॅसाडोर्स क्यूब्रे," युरोपीयनाने स्वतःच्या केसमधून एक लांब, सडपातळ सिगार काढून दिली. तिच्या बाह्य दर्शनावरून स्पष्ट दिसत होते की, ती अत्यंत उच्च दर्जाच्या तंबाखूच्या पानांपासून बन-विलेली होती.

"माणसाचा दुबळेपणा तुम्हाला माहीत आहे—जे काही माणूस आठवतो, त्यात नेहमी प्रथम स्वतःला आठवतो; मी तसाच पापी माणूस आहे, म्हणून माझ्यापासून आरंभ करायची मी परवानगी मागतो."

"अगदी मनापासून परवानगी देतो, मनापासून!"

"नटीबद्दलचे तपशील स्वारस्याचे ठरतील किंवा नाहीत हे माहीत नाही, पण तुमच्याबद्दलचा भाग मात्र नक्की:

«Parlez— nous de Vous, notre grand—pére,
Parlez—nous de vous!»— *

युरोपीयन गुणगुणला.

एखादी हकीकत ऐकायची तयारी करताना लोक जसे वागतात, त्याप्रमाणे सगळे गप्प झाले व जरा अधिक जवळ सरकले. नटाने सां-गितलेली कहाणी माझ्या कुवतीनुसार मी इथे सादर करतोय. अर्थात लिहिताना तिच्यातील बरेच काही गमावते, कारण त्याच्या बोलण्यातील सर्व आवेश लेखनात उमटवता येत नाही आणि कहाणी बोजड बनू नये ह्या भीतीने मी सर्व काही लिहिले नाही. तर अशी आहे ती गोष्ट.

"तुम्हाला ठाऊक आहे की, माझी नटाची कारकीर्द मी एका छोटचा प्रांतिक थिएटरमध्ये सुरू केली होती. आमच्या कंपनीची परिस्थिती बि-घडली. मी एव्हाना लग्न केलं होतं, भविष्यकाळाचा विचार करणं आवश्यक होतं. ह्याच काळात दूरच्या गावी असलेल्या प्रिन्स स्कालीन्स्की यांच्या नाटक कंपनीबद्दल जास्त जास्त सुरेख आख्यायिका पसरत होत्या. उत्तम आयोजित नाटक कंपनी पाहण्याचं कुतूहल, आशा आणि कदाचित

---

*सांगा आम्हाला, अहो आजोबा,
तुमच्याबद्दल सांगा! —सं.

महत्त्वाकांक्षा, ह्या सर्वांपायी मी तिकडं आकर्षित झालो होतो. फार वेळ विचार करीत बसण्याचं काही कारणही नव्हतं. तिकडं जाण्याचा मुळीच इरादा नसलेल्या माझ्या एका सहकारी नटाला मी माझ्याबरोबर चलण्याची सूचना केली आणि एक आठवडयानंतर आम्ही दोघे न. गावी दाखल झालो. प्रिन्स खूप श्रीमंत होते आणि नाटक कंपनीवर खूप खर्च करीत होते. ह्यावरून तुम्ही निष्कर्ष काढू शकता की, कंपनी काही वाईट नव्हती. प्रिन्सचा स्वभाव रशियन धाटणीचा उदार आणि अदम्य उत्साही होता. कलेबद्दल मनस्वी प्रेम, प्रचंड आवडीनिवडी, विलासी राहणी आणि अशा माणसांबाबत नेहमी घडतं त्याप्रमाणं, स्वतःला काहीही नाकारण्याची सवय नव्हती व अमाप खर्च चालायचा. शेवटच्या सवयीबद्दल आपण त्यांना दोष द्यायला नको. आपल्या हे रक्तात आहे. मी श्रीमंत नट नाही, ते श्रीमंत उमराव आणि सर्व कमाई दारूत खर्चणारा गरीब हमाल — आम्ही सगळे एकाच आर्थिक नियमानुसार वागतो; फरक फक्त आकडयांचा."

"आम्ही जर्मनांसारखे हिशोबी नाही," स्लाव समाधानाने म्हणाला.

"हे नाकारण्यात अर्थ नाही," युरोपीयनने भर घातली. "आपल्यापैकी कुणी क्षणभर थांबून जवळ पैसे आहेत अथवा नाहीत ह्याबद्दल कधी विचार केलाय का, जेव्हा चांगली मदिरा प्यायची इच्छा झाली? पूष्कीननं आपल्यासाठी म्हटलंय :

शेवटचं बिचारं नाणं असायचं,
खर्चायचा, आठवतं का रे मित्रांनो?

अगदी उलट : पैसे जेवढे कमी, तेवढे आपण जास्त खर्चतो. तुम्ही बहुधा आपल्या एका मित्राला विसरला नसाल, ज्यानं एकदा वाईट शँपेनचा ग्लास परत करताना म्हटलं होतं की, भिकार दारू पिण्याएवढे आम्ही श्रीमंत नाही!"

"मंडळी, आपण निवेदनात अडथळा आणतोय. तर मग पुढं?"

"काही हरकत नाही. प्रिन्सनी माझ्याबद्दल आधीच ऐकलेलं होतं. जेव्हा मी त्यांना भेटायला गेलो, तेव्हा ते स्वतःच्या कचेरीत तिकीटांचं वाटप करीत होते, जिला तिकीट द्यायचं ती व्यक्ती त्या तिकीटाच्या

विशिष्ट जागेला लायक होती अथवा नव्हती ह्याबाबत खोल विचार करीत होते. 'खूप आनंद झाला, फार आनंद झाला, की अखेरीस आमच्या थिएटरला भेट देण्याचं तुम्ही ठरवलंत, तुम्ही आमचे लाडके पाहुणे म्हणून रहाल,' आणि अनेक स्तुतीपर शब्दांचा वर्षाव; मला नम्रपणं झुकून प्रिन्सचे आभार मानावे लागले. रंगमंचाची आणि निर्मिती-मधील गुपितांची पूर्ण जाण असलेल्या माणसाप्रमाणं प्रिन्स रंगभूमीबद्दल बोलत होते. मला आठवतं, एकमेकांवर खूष होऊन आम्ही निरोप घेतला. त्याच संध्याकाळी मी थिएटरवर गेलो; त्यादिवशी कोणता खेळ होता आठवत नाही, पण मी तुम्हाला खात्री देतो की, तसं वैभव क्वचित पहायला मिळतं. केवढी भव्य नेपथ्ये, कसले पोषाख, तपशी-लांकडं किती बारीक लक्ष! थोडक्यात, सर्व बाह्य गोष्टी अप्रतीम हो-त्या, नटांची अभिनयपठडीही चांगली होती, पण मी थंड राहिलो. प्रिन्सचे भूदास उमरावांच्या आणि राजकन्यांच्या भूमिका वठवीत होते, तेव्हा त्यांचा अभिनय ओढूनताणून केल्यासारखा, कृत्रिम वाटत होता. मग मी माझा पहिला प्रयोग केला, लोकांनी माझं उत्तम स्वागत केलं; प्रिन्सनी माझ्यावर स्तुतीसुमनं उधळली. माझ्या दुसऱ्या प्रयोगाच्या पूर्व-तयारीसाठी मी थिएटरवर गेलो. त्यांचा 'चोरटी मैना' नाटकाचा प्रयोग चालू होता. प्रिन्सची नाटकमंडळी ते नाटक कसं करतात हे पहायची मला इच्छा झाली.

"मी गेलो तेव्हा खेळ सुरू झालेला होता. उशीर झाल्यामुळं मी अस्वस्थ बनलो आणि रंगमंचावर काय चाललंय ते न समजल्यामुळं विमनस्कपणं आजूबाजूला पाहू लागलो, दर्जानुसार खुर्च्यांच्या रांगांवर बसलेल्या प्रेक्षकांना पाहिलं; चित्रविचित्र चेहऱ्यांचं तिथं संमेलन भरलं होतं, एकाही चेहऱ्याचं दुसऱ्या चेहऱ्याशी साम्य नव्हतं, पण सगळ्यांच्या चेहऱ्यांगर भाव मात्र सारखाच होता, प्रांतिक महिलावर्ग अमेरिकन पक्ष्यांप्रमाणं रंगीबेरंगी दिसत होता आणि खुद्द प्रिन्स स्वतःच्या बॉक्समध्ये रुबाबात, अत्यंत चिंतामग्न बसले होते. अचानक एका स्त्रीच्या दुबळ्या आवाजानं मी भानावर आलो; त्या आवाजात विलक्षण भयानक, सखोल वेदना जाणवत होती. मी रंगमंचाकडं डोळे वळवले. सावकाराच्या मोल-करणीनं म्हाताऱ्या भटक्याला ओळखलं होतं, तो तिचा बाप होता,

सैन्यातून पळून आलेला सैनिक होता... मी तिचे शब्द जवळजवळ ऐकतच नव्हतो, फक्त आवाज ऐकत होतो. 'देवा!' माझ्या मनात विचार आला. 'ह्या तरुण छातीत हे ध्वनी कुठून आले? संगीताच्या मेहनतीनं ते निघणं शक्य नाही, त्यांना शोधून काढणं शक्य नाही. खऱ्या यातना भोगल्यामुळं, भयानक अनुभवांची बक्षिसी म्हणून ते असे उमटत असावेत.' ती बापाला तट्टाच्या कुंपणापर्यंत निरोप देते, ती त्याच्यासमोर नुसती, विचारमग्न उभी राहते; त्याला वाचविण्याची मुळीच आशा नाही—आणि जेव्हा म्हातारा निघून जातो, तेव्हा भूमिकेत लिहिलेल्या शब्दांऐवजी तिनं अभावितपणं किंकाळी मारली—अनपेक्षित दुःखाच्या अवजड भाराखाली चिरडलेल्या दुबळ्या, अनाथ व्यक्तीची किंचाळी. आता, वीस वर्षांनंतरसुद्धा, ती गलबलून टाकणारी किंकाळी मला ऐकू येते."

ते बोलायचे थांबले.

"होय मंडळी," काही वेळानंतर ते म्हणाले, "ती फार महान रशियन नटी होती!"

"बहुधा तुम्हा सर्वांना निदान रोस्सीनीच्या ऑपेरावरून 'चोरटी मैना' ची गोष्ट माहीत असावी. फार भयानक नाटक आहे. त्याची अतिरंजित अखेर नसती, तर मनात निराशेविना दुसरी कोणतीही भावना उरली नसती. ॲनेटवर चोरीचा आळ येतो; सगळे पुरावे जणू तिच्या विरुद्ध जाताना भासतात; का तिच्याबद्दल संशय वाटणार नाही? ती गरीब आहे, मोलकरीण आहे. आणि आरोप खोटे ठरले तरी कुठं फारसं बिघडतंय? तिला सांगतील: 'जा लाडके घरी; बघितलंस, किती सुदैव की तू दोषी नाहीस!' ह्या सर्व गोष्टी एका नाजुक जिवाला कोणत्या मर्यादेपर्यंत मोडून टाकतात, नष्ट करतात—हे मी सांगू शकत नाही. त्यासाठी ॲनेटची भूमिका पहायला हवी होती. तिची उलटतपासणी घेणाऱ्यांसमोर ती कशी भेदरून, थरथरत आणि अपमानीत उभी होती हे पहायला हवं होतं. तिचा आवाज आणि तिचा चेहरा जोरदार निषेध व्यक्त करीत होते. तो हृदयभेदक निषेध जगातील खूपसा मूर्खपणा आणि गलिच्छपणा दाखवीत होता, तरीही उबदार, दीनवाण्या स्त्रीत्वापायी त्यांना एक प्रकारचं मऊपण आलं होतं. तिच्या सर्व हाल-

चालींमधून, सर्व शब्दांमधून, स्त्रीत्वाचं मार्दव व्यक्त होत होतं. मी चकित झालो, स्तंभित झालो. असं काही पहायला मिळेल अशी माझी अपेक्षा नव्हती. दरम्यान नाटक पुढं चालू होतं, आरोप मांडण्यात आला होता आणि न्यायाधीश ह्या मानी मुलीला शिक्षा देऊ इच्छित होता. रंगमंचावर न्यायालयातील काळ्या पोषाखांमधील माणसे फिरत होती, सखोल चर्चेत गुंतली होती, निवाडा करीत होती—मग त्यांनी निष्पाप अॅनेटला दोषी ठरवलं आणि पोलीसांचा जथा तिला तुरुंगात घेऊन गेला... होय, आता माझ्या नजरेसमोर ते दृश्य दिसतंय, न्यायाधीश म्हणतो: 'न्यायालयाच्या सेवकांनो, ह्या मुलीला परगण्याच्या तुरुंगात घेऊन जा!' आणि बिचारी जाते! पण ती परत एकदा थांबते: 'रिचर्ड,' ती म्हणते, 'मी निर्दोष आहे, तुझा विश्वास बसत नाही का माझ्या निर्दोषीपणावर!' आणि इथं ह्या अन्याय झालेल्या स्त्रीच्या वेदनेतून संतापाची आणि अभिमानाची आरोळी उमटते. सर्व आशा नष्ट झाल्यानंतर मानहानीच्या अगदी टोकाशी जन्मलेली मोडू न शकणाऱ्या अभिमानाची ती भावना—निराशेच्या खोल गर्तेत प्रतिष्ठेच्या जाणीवेबरोबर निर्माण झालेली. तुम्हाला ती जुनी कथा आठवते—डॉनजुआनला शोधणाऱ्या, खून झालेल्या कमांडरच्या माणसांना वरच्या मजल्यावरचा दयाळू जर्मन ओरडून कसा म्हणाला: 'तो उजवीकडं गल्लीत पळाला!' जेव्हा सैनिक अॅनेटला घेऊन गेले, तेव्हा मी जवळजवळ तसंच केलं. मग न्यायाधीशाबरोबर तुरुंगातलं दृश्य. ती निर्दोष असल्याचं त्या नालायक थेरड्याच्या लक्षात येतं आणि तिची अब्रू लुटण्याच्या मोबदल्यात तो तिला स्वातंत्र्य देऊ करतो. दुर्दैवी मुलगी अधिक उंच झाल्याची भासते, तिचे शब्द जळजळीत आहेत आणि तिच्या मुद्रेवरील सखोल उपहास त्या शब्दांची प्रखरता दुपटीने वाढवितो. ह्या दृश्यादरम्यान मी प्रिन्सकडं योगायोगानं कटाक्ष टाकला. ते कमालीचे भारावून गेले होते, चुळबुळत होते, डोळ्यांवरील चापाचा चष्मा त्यांनी खाली केला, मग परत डोळ्यांवर ठेवला. 'त्यांच्यासारखा जाणकार अशा अभिनयानं हेलावला नाही तरच नवल! अशा नटीची ते नक्की कदर करीत असणार,' माझ्या मनात विचार आला. शांतपणं, डोकं खाली झुकवून, बांधलेल्या हातांनी, सैनिकांच्या घोळक्याबरोबर, ढोल-पिपा-

ण्यांच्या कर्कश्य साथीवर, अॅनेट निघून गेली. तिची पूर्ण आकृती एक प्रकारची सखोल विचारमग्नता आणि आश्चर्य व्यक्त करीत होती. खरंच, एकूण प्रसंगातला विचित्रपणा लक्षात घ्या: ही दुबळी, नम्र, निष्पाप चेहऱ्याची बालिका आणि संगिनी, तलवारींसकट ढोल बडवीत जाणारे फ्रेंच सैनिक; शत्रू आहे कुठं? हा शत्रू त्यांच्यात आहे—ही बालिका—ते तिच्यावर विजय मिळवतील... पण ती चर्चसमोर थांबते, मूकपणं गुडघे जमिनीवर टेकते, विचारमग्न नजर आकाशाकडं उंचावते; त्या नजरेत प्रॉमीथसचा कोप नाही, तीतानचा उर्मटपणा नाही, तसलं काही नाही, फक्त एक साधा प्रश्न आहे: 'कशाबद्दल? खरंच हे सत्य आहे?' तिला घेऊन गेले. मी एखाद्या लहान मुलासारखा रडलो. तुम्हाला 'चोरटी मैना'ची दंतकथा ठाऊक आहे. वास्तवता नाटककारांएवढी दुबळ्या मनाची नसते, ती थेट अखेरपर्यंत जाते: अॅनेटचा वध करण्यात येतो. पण नाटकात दाखवतात की, चोर अॅनेट नव्हती, मैना होती—आणि अॅनेटला वाजतगाजत परत आणतात. पण ह्या अॅनेटनं नाटकका-रापेक्षा नाटकाचा अर्थ जास्त चांगला जाणून घेतला होता. तिच्या छळ सोसलेल्या छातीमधून एकही आनंदी स्वर उमटला नाही; फिकट मुद्रे-ची, थकलेली अॅनेट तिच्याभोवतालचा उत्सव निर्जीव आश्चर्याने पाहात होती. जीवनाची आशावादी बाजू तिच्या परिचयाची भासत नव्हती. मोठा धक्का, कडू अनुभव ह्यांनी ती मुळापासून हादरली होती आणि अजून मंद सुवास येणारं फूल एव्हाना कोमेजू लागलं होतं; त्याला वाच-वणं अशक्य होतं. मला त्या मुलीबद्दल फार फार वाईट वाटलं!..

"हुश्श, देवा," रुमालाने चेहरा पुसत तो पुढे म्हणाला, "माझ्या कल्पनाशक्तीबरोबर आणि आठवणींबरोबर मी फारच वाहवत गेलो, माझी जीभ भलतीच सैल सुटली आणि मला रडू कोसळलंय. ह्या विष-याबाबत मी दुसऱ्या रीतीनं बोलूच शकत नाही. प्रत्येक वेळी हे असंच होतं... तर, पडदा पडला. तो परत वर उचलावा म्हणून मी काय वाट्टेल ते दिलं असतं. त्या कोमेजणाऱ्या सौंदर्याला, त्या अपूर्व वेदनांना, पुन्हा एकदा पहावंसं वाटत होतं. पण तिला परत बोलावण्यात आलं नाही. अॅनेटला न भेटणं मला शक्य नव्हतं. तिच्यापाशी जाऊन, तिचा हात दाबून, मूकपणं एका कलावंतानं दुसऱ्या कलावंताला दाद देणं,

वेगवेगळ्या घाणीपासून मनाला निर्मळ करणाऱ्या सघन भावनांचे पवित्र क्षण दिल्याबद्दल तिचे आभार मानणं—असं करणं हवेइतकंच मला अत्यावश्यक होतं. मी रंगमंचामागं धावलो... वाटेत मला नाटकाच्या एका जाणकारानं थांबवलं. स्वतःच्या रांगेतून बाहेर पडत तो मला ओरडून म्हणाला : 'ॲनेट काही वाईट नव्हती, तुम्हाला कशी वाटली? मुळीच वाईट नव्हती, थोडी भूमिकेला किरकोळ होती.' मी एका शब्दानं त्याला विरोध केला नाही. त्याचं मत मी पालटू शकलो नसतो आणि वेळ गमावायची माझी इच्छा नव्हती. 'कुठं निघालात?' रंगमंचाकडं जाण्याच्या दाराशी दरवानानं मला अडवलं. 'ॲनेटला भेटण्याची माझी इच्छा आहे, आज जिनं मोलकरणीचं काम केलं त्या नटीला.' 'प्रिन्सच्या परवानगीशिवाय मनाई.' 'अरे गृहस्था, मी स्वतः नट आहे, परवा मी नाटकात काम केलं होतं.' 'तुम्हाला आत सोडण्याबद्दल मला हुकूम मिळालेला नाही.' 'कृपा करा,' माझ्या बंडीच्या खिशात ठळकपणे दोन बोटं खुपशीत मी म्हणालो. 'किती धूर्त आहात,' दरवान उत्तरला, 'तुमच्यासाठी मी माझी पाठ शेकून घेऊ?' मी पुढं आग्रह धरला नाही आणि घरी गेलो. पण मी निराशेच्या नजीक होतो, दुःखी होतो आणि हे केवळ वाक्य नव्हे, पोकळ शब्द नव्हेत... जी स्त्री तुमची कुणीही नव्हे अशा स्त्रीच्या मोहात अचानक आणि हेतुनिरपेक्ष तुम्ही कधी ना कधी नक्की पडला असणार, तिच्यावरची नजर काढून घेणं अशक्य ठरलं असणार, तिच्या आवाजाचा आणि स्मिताचा तुम्हाला लळा लागला असणार; भावनांच्या त्या क्षणिक आवर्तात तुम्ही पुरते भोवंडून गेला असणार आणि ती स्त्री अदृश्य झाल्यानंतर त्या भावनांच्या ताकदीबद्दल तुमचं तुम्हालाच आश्चर्य वाटलं असणार. मग तुम्हाला एकाकीपणाची भावना घेरते. मनात कसलातरी कडवटपणा साठतो, सारी संध्याकाळ बिघडून जाते आणि तुम्ही घाईघाईनं घरी येता, पुढच्या खोलीत मेणबत्ती जळून गेलीय, तुमची सिगार बेचव लागतेय, म्हणून तुम्ही चिडता... ह्या सगळ्याचं कारण दीड तासाच्या अवधीत तुम्ही संपूर्ण प्रेमप्रकरण पार पाडलेलं असतं, आरंभापासून अखेरपर्यंत प्रेमकहाणी घडलेली असते. असं तुम्ही काही अनुभवलं असेल, तर त्यावेळी माझ्यासारख्या एका तरुण नटाच्या कोणत्या भावना असतील, ह्याची तुम्ही

कल्पना करू शकाल. अॅनेटच्या ओढीनं मला ताप चढल्यासारखं झालं होतं. आजारी अवस्थेत मी बिछान्यावर पडलो, मी बरळत होतो, झोपत होतो—उठत होतो, दोन्ही अवस्थांमध्ये त्या दुर्दैवी मोलकरणीची प्रतिमा डोळ्यांसमोरून क्षणभरही बाजूला जात नव्हती. क्षणात ती शिक्षा झाल्यानंतरची दिसायची, नुसती चकित झालेली... स्वतःला न्यायाधीश म्हणवून घेणारे वेडे तिच्या भोवती... आणि मला कडवटपणाची भावना; त्यांच्यापैकी कुणालाही समजत नाही की, असा चेहरा आणि असा आवाज असलेली व्यक्ती आरोपी असणं शक्य नाही. क्षणात दिसायचं—तिचे हात बांधून सशस्त्र पहारेकरी तिला वधःस्थळाकडं घेऊन जात आहेत, आपण योग्य काम करतोय अशी त्यांची खात्री आहे... आता तिला आनंदाच्या आरोळ्या ठोकत नेत आहेत, तिला सांगतात, सर्व संपलं, ती स्वतंत्र आहे—पण ती थकलीय, आनंद वाटून घ्यायची तिच्यात शक्ती नाही, ती जणू विचारतेय: 'खरंच, काय घडलं? काहीच घडलं नाही ना?' थोडक्यात, 'चोरटी मैना'च्या विषयाचे हजार वेगवेगळे प्रकार माझ्या मनात सबंध रात्रभर थैमान घालीत होते.

"दुसऱ्या दिवशी सकाळी अकरा वाजता मी प्रिन्सच्या घराकडं निघालो. एक तर तिथं हाडं ठेवायची, किंवा अॅनेटची भेट घ्यायची अशा ठाम निर्धारानं मी गेलो. जेव्हा मी मुख्य कक्षात प्रवेश केला—प्रिन्स यांच्या मालकीच्या सर्व घरांना, छोट्या घरांना व जोडघरांना जायला फक्त एकच प्रवेशद्वार मोकळं ठेवलेलं होतं—तेव्हा दंडधारी चोपदार हजर झाला. प्रश्नोत्तरं सुरू झाली: कुणाकडं आलात, कशाला? मी सांगितलं. चोपदारानं सांगितलं की, प्रिन्स यांच्या लेखी परवानगीविना मला आत सोडणार नाहीत. 'मत्सरी लेकाचा' माझ्या मनात आलं. 'ही परवानगी कशी घेतात?' 'कचेरीत जा, तिथं मॅनेजरसाहेब सरकारसाहेबांना वर्दी देतील.' चोपदारानं घंटा वाजवली. एक दरवान आला आणि कचेरीकडं मला घेऊन गेला. कचेरीत टेबलामागं लठ्ठ मॅनेजर ऐटीत पसरला होता आणि एवढी लौकरची वेळ असूनही, त्यानं केवळ भूकच नव्हे, तर स्वतःची तहानसुद्धा भागवलेली दिसत होती. मी त्याला माझी विनंती सांगितली. लठ्ठ मॅनेजर नक्कीच माझ्यासाठी जागचा हलला नसता, पण प्रिन्स मला त्यांच्या नाटक कंपनीत घेऊ

इच्छित होते हे त्याला माहीत होतं आणि म्हणून, सर्व नकार आणि क्षुल्लक अपमान माझ्यासाठी भावी काळात राखून ठेवून आत्ता माझी विनंती मान्य करण्याचं त्यानं ठरवलं असावं आणि ह्या महत्त्वाच्या बाबीवर चर्चा करायला तो दस्तुरखुद्द गेला. मिनिटभरानंतर तो बातमी घेऊन आला की, प्रिन्स परवानगीच्या कागदावर सही करतील व कचेरीत पाठवून देतील. मला दुसरीकडं कुठंच जायचं नव्हतं, म्हणून मी एका कोपऱ्यात बसलो. कचेरीत कामाची खूप धांदल चालू होती. फ्रेंच नेपथ्यकार धावत आला, मॅनेजरशी जोरात भांडला आणि मोडक्या रशियनमध्ये अगदी बिनरशियन गोष्टी बोलला; त्याच्या अंगात मळका फ्रॉक-कोट होता, पण मॅनेजरएवढाच तो ऐटबाज वागत होता आणि खुद्द प्रिन्स असल्याप्रमाणं तडातडा बोलत होता. मग मॅनेजरनं कुणा मात्यूश्काला आत आणायचा हुकूम दिला; हात बांधलेल्या, अनवाणी आणि जाडयाभरडया कापडाचा भुरकट कफ्तान घातलेल्या एका तरुणाला तिथं आणण्यात आलं. 'चालता हो तुझ्या घरी,' मॅनेजर त्याच्यावर खेकसला, 'जर पुन्हा असली खोडी केलीस, तर तुझा दुसऱ्या रीतीनं पाहुणचार करीन. सेन्काला विसरलात.' अनवाणी माणसानं झुकून नमस्कार केला, सगळ्यांकडं उदास नजर टाकली आणि तो बाहेर गेला. 'हलकट', नेपथ्यकार पुटपुटला आणि खोलीच्या मध्यभागी डोक्यावर टोपी घालून तोही निघून गेला. 'तरुणाचा चेहरा माझ्या ओळखीचा वाटतो,' माझ्या जवळ असलेल्या दरवानाला मी म्हणालो. 'होय, परवा तुमच्या नाटकात तो होता.' 'म्हणजे, लॉर्डची भूमिका ह्यानं केली होती?' 'होय, ह्यानंच.' 'कशाबद्दल त्याला असं बांधून ठेवलं होतं?' मी आवाज खाली करीत विचारलं. दरवानानं तिरप्या नजरेनं मॅनेजरकडं बघितलं आणि मॅनेजर चौकटीतल्या गोटया फिरवीत हिशोबात गुंतलाय असं आढळताच दबत्या आवाजात मला उत्तरला: 'एका नटीला त्यानं पाठवलेली चिठी पकडली. प्रिन्सना अशा गोष्टी आवडत नाहीत... म्हणजे दुसऱ्यांनी अशा गोष्टी केलेल्या आवडत नाहीत; म्हणून त्याला महिनाभर एकटयाला अंधारकोठडीत ठेवायची प्रिन्सनी आज्ञा केली होती.' 'म्हणजे अंधारकोठडीतून त्याला थिएटरात आणलं होतं?' 'होय; त्यांना तिथं त्यांच्या भूमिका पाठ करायला पाठवतात...

मग हात बांधून आणतात थिएटरवर.' 'शिस्त सगळ्यात जास्त मोलाची,' मी उत्तरलो आणि प्रिन्सच्या नाटक कंपनीत दाखल होण्याची माझी इच्छा विझायला आरंभ झाला.

"कचेरीचं दार खाडकन आवाज करीत उघडलं आणि प्रिन्स आत येताच सगळे ताडकन उभे राहिले. दरवानानं माझ्याकडं कटाक्ष फेकला; त्याचा अर्थ मी ओळखला: मी नम्रपणं वागावं अशी ती विनंती होती. प्रिन्स थेट माझ्यापाशी आले आणि परवाना देत म्हणाले की, त्यांच्या कंपनीच्या नटीच्या अभिनयाची माझ्यासारख्याकडून वाहवा ऐकण्यात त्यांना फार आनंद वाटला होता. तिच्याबद्दल काही प्रशंसेची वाक्ये ते बोलले, तिची प्रकृती फारशी चांगली नाही ह्याबद्दल त्यांनी अत्यंत खेद व्यक्त केला आणि त्यांच्या हातच्या परवान्याविना मला भेटण्याची परवानगी देण्यात आली नाही म्हणून माझी माफी मागितली... 'काही इलाज नाही, आमच्या धंद्यात शिस्त म्हणजे निम्मं यश; जरा ढिलाई झाली की, संपलाच कारभार. कलावंत अस्वस्थ माणसं असतात. कदाचित फ्रेंच म्हणतात ते तुम्हाला ठाऊक असेल: नाटक कंपनी चालवण्यापेक्षा आख्ख्या सेनेचं नेतृत्व करणं जास्त सोपं! तुम्ही याबद्दल रागावू नका,' हसून ते पुढं म्हणाले, 'वेगवेगळया झारांच्या, सरदारांच्या भूमिका रंगमंचावर वठवायची तुम्हाला सवय, रंगामंचाबाहेरही तसंच वागायला लागलाय.' मी म्हणालो: 'प्रिन्स, जर फ्रेंच तसं काही म्हणत असतील, तर त्याचं कारण तुमच्या कंपनीची रचना आणि तिचं व्यवस्थापन त्यांना माहीत नाही म्हणून.' 'तुम्हीसुद्धा खुषामत करण्यात पटाईत आहात!' बोटानं दटावीत प्रिन्स म्हणाले आणि प्रसन्नपणं स्मित करून स्वतःच्या अभ्यासिकेकडं गेले. मी ॲनेटकडं निघालो.

"ॲनेट जिथं रहात होती त्या जोडइमारतीपाशी पोहोचेपर्यंत गणवेषातल्या दरवानांनी आणि एका दाढीवाल्या व्यवस्थापकानं निदान तीनदा हटकलं. पण परवान्याच्या कागदानं सगळया अडथळ्यांवर मात केली आणि मला दाखवण्यात आलेल्या दारावर मी धडधडत्या अंतःकरणानं घाबरटपणं टकटक वाजवलं. सुमारे तेरा वर्षांची एक मुलगी बाहेर आली आणि मी माझं नाव सांगितलं. 'यावं,' ती म्हणाली, 'आम्ही आपली वाटच पाहतोय.' एका प्रशस्त छान खोलीत तिनं मला नेलं व दुसऱ्या

दारानं ती निघून गेली. मिनिटभरानंतर दार उघडलं आणि पूर्ण शुभ्र पोषाखातली स्त्री माझ्यापाशी झपझप पावलं टाकीत आली. ती ॲनेट होती. माझ्यापुढं दोन्ही हात पसरीत ती म्हणाली :

" 'कशामुळं मला हा मान मिळतोय... तुमचे मी आभार मानते...' काल ज्या आवाजानं मला हेलावून टाकलं होतं, त्याच आवाजात ती म्हणाली आणि त्यावर मी काही बोलण्यापूर्वीच तिच्या डोळ्यांमधून आसवं वाहू लागली. 'माफ करा,' आसवांमुळं कापऱ्या बनलेल्या आवाजात ती पुटपुटली, 'देवाशपथ, माफ करा... आत्ता हे नाहीसं होईल... मला फार आनंद झाला... मी दुबळी स्त्री आहे, क्षमा करा.'

" 'शांत व्हा, काय झालंय तुम्हाला? शांत व्हा,' मी तिला म्हणालो आणि माझे अश्रू माझ्या बंडीवर टपटप पडले. 'जर मला माहीत असतं की, माझ्या येण्यामुळं...'

" 'नका, असं मुळीच बोलू नका,' तिनं अश्रूंनी भिजलेला हात परत माझ्यापुढं धरला आणि दुसऱ्या हातानं स्वतःचे डोळे झाकले. 'तुमच्या आगमनानं तुम्ही मला किती मदत केलीय, हे तुम्हाला समजणं शक्य नाही... ही फार मोठी कृपा आहे... कृपया मला सहन करा, एक क्षणभर थांबा... मी थोडं पाणी पिते, मग सगळं ठीक होईल,' आणि तिनं माझ्याकडं पाहून एक सुरेख आणि खिन्न स्मित केलं... 'मला खूप दिवसांपासून अस्सल नटाशी बोलायची इच्छा होती, अशा माणसाशी, ज्याला मी सगळं सांगू शकेन. पण असा माणूस खरंच भेटेल अशी मी अपेक्षा धरली नव्हती आणि अचानक तुम्ही आलात... मी तुमची फार आभारी आहे. चला, त्या खोलीत जाऊ, इथं आपलं बोलणं कुणी आडून ऐकू शकतील; मी घाबरतेय असं मात्र समजू नका, देवाशपथ नाही. पण ही पाळत राखणं नीचपणाचं, घाणेरडं वाटतं... आणि तुम्हाला मी जे सांगू इच्छितेय, ते त्यांच्या कानांसाठी नाही.'

"आम्ही शयनखोलीत गेलो; ती पाणी प्यायली आणि मला आरामखुर्चीत बसायची खूण करून स्वतः खुर्चीत धपकन बसली. आधी मी मनाशी योजून ठेवलेली स्तुतीपर वाक्यं कुठं गेली, तिच्यावर प्रभाव पाडण्याच्या हेतूनं सांगायचे सूक्ष्म टीकेचे मुद्दे कुठं गेले? मी अश्रुभरल्या

नजरेनं तिच्याकडं बघत राहिलो, टक लावून पहात राहिलो आणि माझी छाती दाटून आली. तिचा चेहरा सुंदर होता, पण एव्हाना खंगलेला होता, भयानक कथा सांगत होता: काल तिच्या आवाजामधून उमटलेली कबुली तिच्या चेहऱ्याच्या प्रत्येक रेषेमधून वाचता येत होती. ह्या रेषांमध्ये, ह्या चेहऱ्यामध्ये, आणखी काही फार भर घालायची गरज नव्हती: काही व्यक्तींची नावं, काही प्रसंग, तारखा; बाकी सर्व अगदी स्पष्ट लिहिलेलं होतं. खूप टपोरे काळे डोळे पौर्वात्य धुंदीनं चमकत नव्हते, तर त्यांच्यात शोक आणि निराशा दिसत होती. त्यांच्यातील पेटणारी आग जणू तिला भाजत होती. तिचा रोड आणि विश्वास बसणार नाही एवढा थकलेला चेहरा रडण्यामुळं काहीसा अनैसर्गिक, क्षयी रीतीनं लाल झाला होता. तिनं केस कानांमागं झटकले आणि हाताचा कोपर मेजावर टेकून डोक्याला हाताचा आधार दिला. इथं कॅनोवा अथवा थोर्वाल्दसेन* का नव्हता? वेदनांचा ती जिवंत पुतळा होती— खोल अंतरीच्या वेदनांचा! 'किती उदात्त, श्रीमंत स्वभाव,' मी मनाशी विचार केला, 'असं दिमाखानं नष्ट व्हायचं स्वतःचं दुख अशा तीव्रतेनं आणि डौलदारपणं व्यक्त करायचं!' असे काही क्षण होते, जेव्हा माझ्यातल्या माणसापेक्षा कलावंत अधिक वरचढ होता... आणि एक कलाकृती म्हणून मी तिचं कौतुक करीत होतो.

"दरम्यान तिनं स्वतःला सावरलं आणि ती म्हणाली: 'खरंच, किती गंमतीशीर भेट आहे ना? पण अजून अखेर झालेली नाही; मी तुम्हाला माझी हकीकत सांगू इच्छितेय; सांगणं मला आवश्यक आहे; कदाचित साथीदार नटाला दुसऱ्यांदा न भेटताच मी मरेन... तुम्ही बहुधा हसाल—नाही, हे मी मूर्खासारखं बोलले—तुम्ही हसणार नाहीत. तुम्ही फार माणुसकीवाले आहात. तुम्ही फार तर मला वेडी समजाल. आणि खरोखर, परिचय नसलेल्या माणसासमोर आपली सगळी दुःखं उघड करणारी स्त्री कसल्या प्रकारची म्हणायची? पण तुम्ही मला

* १८-१९ व्या शतकातील युरोपीय शिल्पकार.—सं.

अनोळखी नव्हेत, मी तुम्हाला स्टेजवर पाहिलंय: तुम्ही फार मोठे कलावंत आहात!'

"मी तिचा हात दाबला, पण एकही शब्द बोलू शकलो नाही.

"'माझी कहाणी फार लांबलचक नाही, उलट खूप छोटी आहे— मी तुम्हाला हैराण करणार नाही; निदान मी ॲनेटच्या भूमिकेनं तुम्हाला जो काही आनंद दिला, त्याखातर माझी कहाणी ऐका.'

"'सांगा, तुम्ही कृपया, सांगा. मी तुमचा प्रत्येक शब्द आधाशीपणं पितोय, पण स्पष्ट सांगायचं, तर तुमच्याकडून न ऐकता अथवा दुसऱ्या कुणाकडूनही एक शब्द न ऐकता, मी तुमची कहाणी तुम्हाला सांगू शकलो असतो... मला ती ठाऊक आहे.'

"'म्हणूनच ती कहाणी मी तुम्हाला सांगणार आहे. ह्या नाटक मंडळीत मी अलिकडंच आलेय. त्यापूर्वी मी दुसऱ्या एका प्रांतिक नाटक मंडळीत होते, ती हिच्यापेक्षा खूप लहान होती, तिचा कारभार भोंगळ होता, पण मला तिथं आवडायचं. त्याचं कारण कदाचित मी तेव्हा तरुण होते, माझ्यावर कसलीही जबाबदारी नव्हती, अत्यंत मूर्ख होते, जीवनाबद्दल विचार न करता जगत होते. कलाप्रेमात मी एवढी वाहवत गेले की, बाह्य गोष्टींकडं माझं मुळीच लक्ष नव्हतं. एकाच विचारानं मला जास्त जास्त पछाडलं जात होतं—कदाचित तो तुमच्या खूप परिच्याचा असणार—रंगभूमी माझं जीवनकार्य आहे; माझी मनोदेवता मला सांगत होती—मी नटी आहे. माझ्या कलेचा मी अखंड अभ्यास करीत होते; स्वत:मधील उणीवा नाहीशा करण्यासाठी झटत होते आणि एकेक कठीण गोष्ट नाहीशी होताना आनंदानं पाहात होते. आमचे मालक प्रेमळ, साधे आणि प्रामाणिक गृहस्थ होते. ते माझा आदर करीत, माझ्या गुणांचं मोल जाणत, मला फ्रेंच शिकायला त्यांनी संधी दिली, स्वत:-बरोबर मला इटलीला घेऊन गेले, पॅरिसला घेऊन गेले, मी ताल्मा आणि मार्सना* पाहिलंय, पॅरिसमध्ये अर्धं वर्ष राहिलेय आणि काय करणार! मी अजून खूप तरुण होते, जर वयानं नसेन तर अनुभवानं,

*ताल्मा आणि मार्स—१८-१९ व्या शतकातील प्रसिद्ध फ्रेंच नट. —सं.

आणि प्रांतिक छोटचा नाटक मंडळीत परतले. मला भासत होतं की, ज्या माणसानं मला शिकवलं त्याचं मी देणं लागत होते. आणखी फक्त एक वर्ष!.. खूप काही घडलं असतं... ते अचानक वारले; सहा आठवडेपर्यंत आम्ही भयाण भीतीत वाट पहात होतो. ते आठवडे सरले, कागदपत्र उघडण्यात आलं, पण आम्हाला स्वातंत्र्य देणारे कागद गहाळ झाले होते, अथवा मुळातच ते लिहिलेले नव्हते; कदाचित त्यांना लिहायचा त्यांनी आळस केला असावा, पण आम्हाला मात्र आम्ही खूष रहावं म्हणून सांगितलं होतं की, कागद तयार आहेत. ह्या बातमीनं आम्ही स्तंभित बनलो. आम्ही रडत होतो आणि काय करावं ह्याबद्दल विचार करत होतो, तेवढचा दरम्यान आमची जाहीर लिलावात विक्री झाली आणि प्रिन्सनी संपूर्ण नाटक कंपनी विकत घेतली. त्यांनी आमचं चांगलं स्वागत केलं, आमची राहण्याची चांगली व्यवस्था केली, आत्ता तुम्ही पाहताच आहात, आमचे मोठे पगार ठरवले, मात्र त्यांना काटेकोरपणं देण्याची तसदी कधी घेतली नाही. पण हे आता पूर्वीचे प्रेमळ, ढिलाईनं वागणारे डायरेक्टर नव्हते. पहिल्याच क्षणापासून त्यांच्यात आणि त्यांच्या नट-नटयांदरम्यानच्या प्रचंड अंतराची त्यांनी आम्हाला जाणीव करून दिली. आम्ही केवळ त्यांच्या आनंदासाठी अस्तित्वात होतो. इतरांकडून सेवा करून घ्यायची त्यांना सवय झाली होती, त्यांच्या हाताचं चुंबन घेण्यास तयार असलेल्यांपुढं ते हात देत होते. बटलर आणि त्यांचे आवडते लोक त्यांच्या वागण्याची नक्कल करण्यात धन्यता मानीत होते. काळजाला फार कठीण जात होतं, फार जड, पण अजून काही आनंदाचे क्षण लाभत होते. मला माझ्या गुणांबद्दल जपत होते आणि भोवतालच्या सर्व गोष्टींना विसरून कलेत रममाण होण्याची अजून माझ्यात क्षमता होती. आता हसू येतं आणि शरम वाटते, पण तेव्हा नाटक कंपनीची उत्कृष्ट व्यवस्था पाहून माझं मन शांत व्हायचं. जे काही घडून गेलं, ते खरोखर कसं घडलं ह्यावर विश्वास बसत नाही.'

"'माझ्या ध्यानात यायला लागलं की, प्रिन्स माझ्याकडं विशेष लक्ष देत आहेत. त्याचा अर्थ मला समजला आणि मी शस्त्रसज्ज बनले. नाटकात काम करणाऱ्या माणसांकडून नकार ऐकायची प्रिन्सना सवय नव्हती. जणू मला काही समजत नव्हतं, असा मी बहाणा केला. स्वतःचे

इरादे अधिकाधिक स्पष्ट करणं आवश्यक आहे अशी त्यांची समजूत झाली. शेवटी त्यांनी मॅनेजरला माझ्याकडं पाठवलं आणि जर मी त्यांच्या नाटक कंपनीत दहा वर्षं काम करायच्या करारावर सही केली, तर मला स्वतंत्र करायचं त्यांनी आश्वासन दिलं. शिवाय इतर वचनं, प्रलोभनं होतीच. मी त्या मॅनेजरला हाकलून दिलं आणि काही काळ त्यांनी माझा पिच्छा सोडला. एकदा रात्री उशीरा, नाटक करून परतल्यानंतर, 'कावेबाजी आणि प्रेम' ह्या जर्मनमधून नुकत्याच अनुवादित केलेल्या शोकांतिकेतला काही भाग मी एकटीच मोठ्यांदा वाचत होते. तुम्हाला ती कदाचित माहीत असेल. अंतःकरणाला हेलावून टाकेल असं तिच्यात खूप आहे; संतापजनक, दूषणास्पद, लोकांच्या जीवनातील मूर्खपणाचा पुरावा भरपूर आहे. जेव्हा ती शोकांतिका वाचता, तेव्हा तुमच्याच आयुष्यात घडलेल्या गोष्टी आठवल्यासारखं भासतं; त्या नाटकातली सर्व पात्रं दुःखी परिणाम करतात—हॉफमार्शल, लेडी, ज्याची मुलं स्वेच्छेनं अमेरिकेला गेली तो म्हातारा नोकर... आणि लाडकी मुलं—फर्डिनंड आणि लुईझा. मला त्या लुईझाची भूमिका करणं आवडेल विशेषतः वूर्मबरोबरचा प्रसंग, जिथं तो तिला पत्र लिहायला लावतो—तुम्ही इथं असेपर्यंत ती भूमिका वठवायची माझी फार इच्छा आहे. पण प्रिन्सना अशी नाटकं आवडत नाहीत. तर मी 'कावेबाजी आणि प्रेम' वाचत होते आणि नाटकाशी पूर्ण समरस झाले होते, गुंगून गेले होते. अचानक कुणीतरी म्हणालं: 'वाहवा! वाहवा!' आणि माझ्या उघड्या खांद्यावर हात ठेवला. मी घाबरून भिंतीपाशी धावले. ते प्रिन्स होते.'

"'सरकारांची काय आज्ञा आहे?' संतापामुळं आणि तिरस्कारामुळं कापणाऱ्या आवाजात मी विचारलं, 'मी एक अबला आहे, तुम्ही आत्ताच पाहिलंत, पण खात्री देते, मी सबलासुद्धा बनू शकते.'

"('मी तेसुद्धा पाहिलंय,' तिच्या कहाणीतील काही भागांचा संदर्भ धरून मी म्हणालो.)

"'आज्ञेचा प्रश्न नाही,' चेहऱ्यावर मार्दव आणायचा प्रयत्न करीत प्रिन्स म्हणाले. 'अशा डोळ्यांना कुणी आज्ञा करतात का: उलट त्यांनीच आज्ञा करायची.'

"'मी थेट त्यांच्या डोळ्यात रोखून पाहिलं. ते काहीसे गोंधळले, काहीतरी उत्तराची ते अपेक्षा करीत होते. पण लौकरच त्यांनी स्वतःला

सावरलं आणि माझ्यापाशी येत म्हणाले: «Ne Faites dons pas la prude» (उगा आव आणू नको) 'अशा नजरेनं माझ्याकडं पाहू नको. दुसऱ्यांना हे सौभाग्य वाटलं असतं...' त्यांनी माझा हात धरला. मी त्यांना दूर झटकलं.'

"'प्रिन्स,' मी म्हणाले, 'तुम्ही मला परत खेड्यात रहायला धाडू शकता, पण अत्यंत दुबळ्या प्राण्यांनासुद्धा काही हक्क असतात, जे त्यांच्यापासून हिरावून घेत नाहीत, निदान ते जिवंत असेपर्यंत. दुसऱ्यांपाशी जा, त्यांना भाग्यवान करा, जर अशा गोष्टी भाग्याच्या असतात असं वाटायला त्यांना तुम्ही शिकवलं असेल तर!'

"«Mais elle est charmante!» ('किती मोहक आहे ही!') प्रिन्स चिकाटीनं म्हणाले. 'हा राग किती शोभून दिसतो हिला! आता पुरे भूमिका वठवणं!'

"'प्रिन्स,' मी कोरडेपणानं म्हणाले, 'ह्या अशा वेळी माझ्या खोलीत तुमचं काय काम?'

"'तर मग माझ्या खोलीत जाऊ,' प्रिन्स उत्तरले. 'मी पाहुण्यांचं असं रांगडं स्वागत करत नाही, मी तुझ्यापेक्षा अनेकपटींनी प्रेमळ आहे.' आणि त्यांनी माझ्याकडं मधुर भावनाप्रधान नजर लावली. ह्या क्षणाला म्हातारा कमालीचा किळसवाणा दिसत होता, थरथरणारे ओठ, चेहऱ्यावरची ती लालसा... अगदी नीच भाव'.

"'तुमचा हात द्या प्रिन्स, इकडं या.'

"'त्यांनी कोणतीही शंका मनात न बाळगता मला हात दिला. मी त्यांना माझ्या आरशापाशी नेलं, त्यांना त्यांचा चेहरा दाखवला आणि विचारलं':

"'ह्या विचित्र म्हाताऱ्याकडं मी जाईन, ह्या टकल्या सेलादोनकडं जाईन, असं तुम्हाला वाटतं?' आणि खो खो हसले.

"'प्रिन्सचा चेहरा संतापानं पांढराफटक पडला. प्रथम त्यांनी स्वतःचा हात झटकन माझ्या हातून काढून घेतला आणि वर उगारला आणि त्यांचा स्वतःवर संयम नसता, तर त्यांनी माझ्या थोबाडीत मारलं असतं. पण घाणेरड्या शिव्या देण्यापुरतं त्यांनी स्वतःला मर्यादित ठेवलं आणि खोलीतून बाहेर जाताना ते किंचाळले':

" 'मी तुला स्वतःला विसरायला शिकवीन ! कुणाला असं बोलण्याची हिंमत करतेस ? तुला वाटतं, तू नटी आहेस, नाही, तू माझी भूदास पोरटी आहेस, नटी नव्हेस ...'

" 'मी त्यांच्यापाठी धाडदिशी दार बंद केलं. माझ्या वाचनात जेव्हा अडथळा आला होता, तेव्हा कोणताही विचार मनात न बाळगता टेबलावरची सुरी मी उचलली होती आणि नंतर वेळप्रसंगी उपयोगी पडावी म्हणून माझ्या हाताच्या बाहीत लपवून ठेवली होती. आता ती सुरी मी खाली फेकली.'

" 'त्या रात्री माझी मनःस्थिती कशी होती, ती रात्र मी कशी काढली, हे तुम्ही समजू शकता. त्या दिवसापासून सुरू झालेल्या माझ्या बारीकसारीक अपमानांची यादी मी सांगत बसत नाही. माझ्या चांगल्या भूमिका काढून घेण्यात आल्या, मला अनुरूप नसलेल्या भूमिका करायला लावून माझा सतत छळ करण्यात आला, आमची सगळी मॅनेजरमंडळी माझ्याशी उर्मट वागू लागली, मला एकेरी नावानं संबोधू लागली, मला वाईट पोषाख देऊ लागली ; ह्या सगळ्याबाबत तपशीलवार सांगू इच्छित नाही, कारण त्यामुळं प्रिन्सची प्रशंसाच होईल. ते माझ्याशी वेगळ्या रीतीनं वागू शकले असते, पण उदार वागायचा त्यांचा प्रयत्न चालला होता. माझा ते अपमान आणि छळ करीत होते, पण दुसऱ्या रीतीनं मला शासन करणं त्यांना शक्य होतं. आणि खरं सांगायचं तर अशा क्षुद्र उपायांनी ते मला लौकर नमवू शकले नसते... सर्वांत वाईट होते प्रिन्सचे अखेरचे शब्द ; माझ्या मनावर, माझ्या काळजावर ते कोरले गेले. तुम्हाला कसं सांगायचं मला समजत नाही, पण तापाप्रमाणं ते शब्द मला भाजत होते. त्यांना मी झटकून टाकू शकले नाही, विसरू शकले नाही... तेव्हापासून सतत मी तापात आहे, झोप मला ताजीतवानी बनवत नाही, संध्याकाळी डोकं तापतं, सकाळी थंडीनं हुडहुडी भरते. विश्वास ठेवा, त्या दिवसापासून माझे पोषाख दर आठवड्याला दुरुस्तीसाठी नेत आहेत, मला त्याचा आनंद होतोय, पण त्याचवेळी कबूल करते, मला खूप खूप भीती वाटते, वेदना होतात. पण दुसरं काय घडणार होतं ? अर्थातच, काही नाही... तेव्हापासून आजारी आहे, ताप भरल्यासारख्या अवस्थेत स्टेजवर जाते आणि माझा अभिनय

न समजूनही माझ्यावर टाळ्यांचा वर्षाव करतात. तेव्हापासून मी फक्त एकच भूमिका करतेय, प्रेक्षकांना समजलं नाही. माझा अभिनय नष्ट होतोय. मी एकांगी बनत चाललेय. काही भूमिका मी लक्षपूर्वक वठवत नाही, मला त्या असह्य होतात. तर असं सर्व संपलंय – गुण, आयुष्य... अभिनयाला रामराम, माझ्या नाट्यप्रेमाला अखेरचा निरोप! प्रिन्सच्या शब्दांच्या सोबतीनं आणखी एक-दोन वर्षं जिवंत राहीन: माझ्या थड-ग्यावर त्यांना कोरलं पाहिजे.'

"ती गप्प झाली. तिचं सांत्वन करायला मला शब्द सापडले नाहीत. थोडा वेळ गप्प राहून ती पुढे बोलू लागली:

"'दोन महिन्यांपूर्वी मदतीचा नाट्यप्रयोग होता. मी एक पोषाख मागितला, मला देण्यात आला नाही. तेव्हा मी दिग्दर्शकाला सांगितलं की, तसं असेल तर मी माझ्या पैशांनी पोषाख बनवीन. मी डोक्यावर टोपी घातली आणि दुकानात जायला निघाले'.

"'परवानगीविना कुठंही सोडण्याचा हुकूम नाही. कुठं आहे तुमच्या-पाशी परवाना?'

"'मी चिडलेली होते. तशाच मन:स्थितीत कचेरीत गेले. प्रिन्स तिथं होते. त्यांच्यापाशी गेले आणि दुकानात जाण्यासाठी परवानगी मागितली.'

"'तुझे प्रियकर तुला भेटीसाठी भलत्याच वेळा देतात – सकाळच्या!' प्रिन्स म्हणाले. मॅनेजरला आणि हुजऱ्यांना त्यांचे शब्द ऐकून अवर्णनीय आनंद झाला.

"'माझ्या डोक्यात रक्त चढलं. माझं वर्तन नेहमी निष्कलंक होतं. अपमानापायी माझा तोल सुटला.'

"'अस्सं, म्हणजे आमच्या अब्रूला जपण्यासाठी आम्हाला कोंडून ठेवताय? प्रिन्स, हा माझा हात, माझा शब्द देते तुम्हाला, एक वर्षाच्या आत तुम्हाला दाखवून देईन की, तुम्ही योजलेले उपाय कुचकामी आहेत!'

"'आणि ह्यावर त्यांनी काही बोलायच्या आतच मी तिथून निघून गेले.'

"ह्या जागी ती उत्तेजित, थकल्या मन:स्थितीत बोलायची थांबली.

मी तिला शांत होण्याची, आणखी पाणी पिण्याची विनंती केली. तिचा थंड, ओलसर हात माझ्या हाती धरून ठेवला... तिनं डोकं खाली घातलं. पुढं बोलणं तिला कठीण होतं असं भासलं. पण अचानक तिनं पुन्हा डोकं वरती उचललं, अभिमानानं आणि डौलानं, आणि माझ्याकडं नितळ नजरेनं पहात ती म्हणाली :

"'मी माझा शब्द खरा केला!..'

"मी ह्या बाईच्या पायांवर डोकं टेकायला तयार होतो. ह्या कबुली-जबाबाच्या क्षणी मला ती फार मोठी, फार सामर्थ्यवान, फार अद्भुत भासली होती!

"आम्ही दोघंही काही काळ गप्प राहिलो.

"'इतरांना लाभतात तशा छोट्या, मधुर सुखाच्या स्मृती माझ्या त्या प्रणय-प्रकरणानं मला दिल्या नाहीत. त्यात सारा ताप होता, वेड होतं; त्यात प्रेम नव्हतं, तर निराशा होती, नाइलाज होता... त्या-बद्दल मी काही सांगत नाही, कारण सांगण्यासारखं त्यात काही नाही.'

"'प्रिन्सना ठाऊक आहे?' मी विचारलं.

"'बहुधा माहीत असणार. त्यांना सारं ठाऊक असतं... जर त्यांना माहीत नसतं, तर माझी निराशा झाली असती. मला त्यांची भीती वाटत नाही. एक वेळ ह्या खोलीत मी मरेन, पण त्यांच्यापाशी काही विनंती करायला जाणार नाही. हे शब्दसुद्धा मी पाळीन. मला एकच भीती वाटत होती: खऱ्या माणसाला न भेटता मरण्याची... आता तुम्हाला समजेल की, तुमचं आगमन माझ्या दृष्टीनं किती महत्त्वाचं आहे... एकच गोष्ट वाईट आणि सर्वांत वाईट की, याआधी माझ्या ध्यानात ती गोष्ट आली नाही: मूल त्यांच्या मालकीचं असेल आणि ते त्याला सांगतील: 'सर्वांत प्रथम, तू माझा आहेस!' पण मी एवढी दुबळी, एवढी आजारी आहे की, देव दयाळू असेल, तर माझ्या मुला-लाही घेऊन जाईल.'

"'पण काही करणं शक्य नाही का... माझ्यावर जबाबदारी टाका.'

"'नाही; आम्हाला किती कडक बंदोबस्तात ठेवतात हे तुम्ही पाहताय.'

" 'बिचारी नटी !' माझ्या मनात आलं. 'तुझ्या नशीबाचा विचार न करता ह्या मार्गावर कोणत्या वेड्या, गुन्हेगारी माणसानं तुला लोटलं? कशाला तुला जागं केलं ? केवळ ती भयानक, चिरडून टाकणारी बातमी सांगण्यासाठी ? तुझा आत्मा अज्ञानात झोपला असता तर जास्त बरं झालं असतं. तुझा थोर अभिनयगुण तुला समजलाच नसता, तर त्यानं तुला छळलं नसतं. कदाचित मधूनमधून काही अगम्य संवेदना तुझ्या अंतरात खळबळल्या असत्या, पण निदान त्या अगम्यच राहिल्या असत्या.'

" 'आपण आता निरोप घेतला पाहिजे,' ती दुःखानं म्हणाली.

" 'अच्छा, तुमचा आभारी आहे. माझी खूप इच्छा आहे की...'

"तिनं स्मित केलं.

" 'कधी कधी माझी आठवण काढा...'

" 'एक महान रशियन नटी नष्ट झाली ! ..'

"आसवं ढाळीत मी बाहेर गेलो.

" 'तुला आनंदाची वार्ता कळली का ?' जेव्हा मी घरी परतलो, तेव्हा माझा साथीदार मला म्हणाला. 'आत्ता इथं प्रिन्सचा मॅनेजर आला होता, तू अजून घरी आला नाहीस ह्याबद्दल त्याला आश्चर्य वाटलं आणि तुझ्यासाठी निरोप ठेवला की, पुढील अटींवर प्रिन्स तुला नोकरीवर ठेवू इच्छितात.' आणि त्यानं विजयी मुद्रेनं माझ्या हाती कागद ठेवला.

"अटी उत्तम होत्या.

" 'पण तुला बातमी ठाऊक आहे का ?' मी त्याला उत्तरलो. 'घरी परतताना मी गाडीवानाकडं गेलो आणि ज्या त्रोयका* मधून आपण इकडं आलो होतो, तीच भाड्यानं ठरवली. तुझी इच्छा असेल तर तू रहा इथं, पण मी एक तासानंतर जाणार.'

" 'अरे, तुला काय वेड लागलंय ?'

" 'माहीत नाही, पण मी इथं थांबणार नाही : कलावंताला इथली हवा चांगली नाही. काय ? जरा विचार कर आणि आपल्या जुन्या थिएटराकडं परतू, जिथल्या पड्द्यांवर झाडांची दुतर्फा रांग असलेला रस्ता कुठला आणि नदी कुठली हे ओळखणं अवघड जातं, जिथं समुद्र

---

* त्रोयका – रशियन धाटणीची तीन घोड्यांची गाडी – सं.

शांत दिसतो आणि भिंती लाटांप्रमाणं हेलकावतात. जाऊ या ना!'

"'खरं तर परतायला माझी तयारी आहे,' बिनधास्त स्वभावाचा माझा साथीदार म्हणाला, 'पण उपासमारीनं तिथं मरू.'

"'इथं अतिखाण्यानं मरू. उपासमारीला पावाच्या तुकड्यानं बरं करता येतं आणि देवदयेनं आपल्या तब्येतींच्या जोरावर पावाचा तुकडा नक्की कमावू. अतिखाण्यामुळं होणारा आजार तसा लौकर बरा होत नाही.'

"साथीदार विचारात पडला. त्याचं मन वळवत बसायची माझी इच्छा नव्हती. अचानक तो खो खो हसत सुटला.

"'हा-हा-हा! येतो, बंधू, येतो! माझ्या डोक्यात काय कल्पना आली ठाऊक आहे: दोन आठवड्यांनंतर आपण परतलेले पाहून वासिली पेत्रोविच आश्चर्यानं किती थक्क होईल! अगदी साक्षात थक्क होईल!'

"आश्चर्यानं थक्क करण्याच्या ह्या विचारामुळं माझा मित्र अनपेक्षित प्रवासाला कबूल झाला. तरी त्यानं विचारलं:

"'पण मॅनेजरला काय उत्तर द्यायचं?'

"'इथं फार विचारात पडण्याचं कारण नाही. जर आपण आज गेलो, तर उद्या उत्तर देणार नाही. त्याला सांगतील: काल परत गेले. म्हणजे प्रिन्ससुद्धा आश्चर्यानं थक्क होतील, वासिली पेत्रोविचप्रमाणं!'

"'अगदी उत्तम, खरंच उत्तम, कारण देऊ केलेल्या सवलती फाय-द्याच्या होत्या. खुशाल त्यांना समजू दे की, जगात सर्व गोष्टी पैशानं विकत घेता येत नाहीत. आत्ता सामानाची बांधाबांध करतो!' आणि आमच्या माफक सामानाची आवराआवर करताना तो शीळेवर 'बगदाद-चा खलीफा' मधलं गीत वाजवू लागला.

"संपली हकीकत. समारोपादाखल पुढं सांगतो की, आणखी दोन तासांनंतर आम्ही गाडीचे धक्के खात जात होतो. मला फार वाईट वाटत होतं, कसलातरी कडवट संताप काळजात दाटला होता. रस्ता पाहण्याचा, आजूबाजूचा निसर्ग न्याहाळण्याचा, सिगारेटी फुंकण्याचा मी प्रयत्न केला — काही उपयोग झाला नाही. त्यात जणू मला वाकुल्या दाखवण्यासाठी आकाश ढगाळलं होतं, गार वारा सुटला होता, दलदलीतून उमटणाऱ्या धुक्यात दूरवरचं अंतर गुरफटून गेलं होतं. इथं येताना ज्या दृश्यांनी

मला उल्हसित केलं होतं, तीच दृश्यं आता उदास भासत होती. त्याचं कारण मी त्यांना उलट क्रमानं पहात होतो हे असावं, अथवा दुसरं काही कारण असेल, पण त्यांनी मला आनंदित केलं नाही एवढं नक्की. इतकंच नव्हे तर काळवंडलेल्या आणि अर्धवट कोसळलेल्या शेतकऱ्यांच्या दरिद्री झोपड्यांमधून गर्वानं डोकावणारे, उद्यानांचा आणि फुलबागांचा सभोवार थाट उडवणारे श्रीमंतांचे आलीशान प्रासादसुद्धा मला भकास भासले."

"पुढं त्या ॲनेटचं काय झालं? तुम्ही भेटलात तिला?"

"नाही; बाळंतपणानंतर दोन महिन्यांनी ती वारली."

नटमहाशयांनी गालांवरून ओघळणारे अश्रू पुसले. तरुण मंडळी गप्प राहिली; जणू नटमहाशय आणि ते तरुण लोक ॲनेटच्या थडग्यावर उत्तम कोरलेल्या शिल्पाप्रमाणे भासत होते.

"तरीसुद्धा," स्लाव उठता उठता म्हणाला, "तिनं गुप्तपणं लग्न का नाही केलं?"

१८४६

इवान तुर्गेनेव

गायक

इवान तुर्गेनेव (१८१८-१८८३) – यांचे साहित्य म्हणजे एका अर्थाने १९ व्या शतकाच्या मध्याच्या सुमाराचा रशियातील जीवनाचा कलात्मक कालक्रमवृत्तांत. सामाजिक आणि साहित्यिक जीवनामधील किंचित महत्त्वाची एकही घटना लेखकाच्या नजरेतून कधी निसटली नाही. "आधुनिक रशियन समाजातील एकही अशी ठळक घटना नाही, जिला तुर्गेनेव यांनी अद्‌भुत संवेदनाशीलतेने हाताळले नाही, जिला परामर्श घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला नाही," * रशियन लेखक-उपहासकार मि. साल्तीकोव-श्चेद्रिन यांनी नमूद केले होते.

१८४७ सालापासून, 'सोवरेमेन्निक' ('आजचा काळ') नियतकालिकामधून 'शिकाऱ्याची टिपणे' ह्या मथळ्याखाली तुर्गेनेव यांच्या कथा व लेख नियमितपणे प्रसिद्ध होऊ लागले. १८५२ साली ते स्वतंत्र पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले. गेल्या शतकाच्या मध्याच्या सुमाराचे रशियन जीवनाचे विस्तृत चित्र लेखकाने ह्या पुस्तकात रेखाटले होते.

उत्कृष्ट कादंबरीकार म्हणून तुर्गेनेव प्रसिद्ध आहेत. 'रूदीन,' 'उमरावांचे घरटे,' 'वेधकाळी,' 'पिता-पुत्र,' 'धूर,' 'अभुक्त भूमी' अशा सामाजिक-मानसशास्त्रीय कादंबऱ्यांचे लेखक म्हणून ते लोकप्रिय आहेत.

---

* नि. श्चेद्रिन (मि. साल्तीकोव). संपूर्ण लेखसंग्रह, खंड १५, पान ६११.

कोलोतोवका हे छोटे खेडे एके काळी चेटकीण असे टोपणनाव मिळालेल्या जहांबाज स्वभावाच्या बाईच्या मालकीचे होते (तिचे खरे नाव लोक विसरून गेले होते), पण अलीकडच्या वर्षांमध्ये सेंट पीटरबुर्गमध्ये राहणाऱ्या एका जर्मनाची मालमत्ता बनले होते. एका ओसाड टेकडीच्या उतारावर हे खेडे वसले आहे. ही टेकडी वरपासून खालपर्यंत एका प्रचंड दरीने विभागली गेली आहे. ह्या आ वासलेल्या पोकळीच्या कडा वाऱ्याने आणि पाण्याने घासून निघालेल्या आहेत. खेड्याच्या रस्त्याच्या ऐन मध्यभागातून ही पोकळी वळसा घालून जाते आणि एखाद्या नदीपेक्षा अधिक प्रमाणात ह्या खेड्याच्या दोन बाजूंना विभागते, कारण नदीचे दोन तीर निदान पुलाने जोडता येतात. ह्या दरीच्या वालुकामय कडांवर काही रोड वाळुंजी घाबरटपणे पसरलेल्या दिसतात. दरीचा तळ कोरडा आणि तांब्याप्रमाणे पिवळसर दिसतो. तेथे चिकणमातीच्या दगडाच्या मोठमोठ्या लाद्या पडल्या आहेत. हे दृश्य मुळीच आनंददायी नाही, पण तरीही भोवतालच्या पंचक्रोशीत राहणाऱ्या सर्व रहिवाशांना कोलोतोवकाला जाण्याचा रस्ता चांगला ठाऊक आहे. ते तेथे वारंवार आणि स्वेच्छेने जातात.

दरीच्या ऐन माथ्यावर, जिथून जमिनीतील भेग सुरू होते त्या जागेपासून काही पावले अंतरावर, एक छोटी चौकोनी झोपडी उभी आहे. इतर झोपड्यांपासून ती अलग, एकटी उभी आहे. तिचे छप्पर गवताने शाकारलेले आहे आणि छपरातून धुरांडे डोकावते. तिची एक खिडकी दरीवर जणू कडक पहारा देत असते आणि हिवाळी संध्याकाळांना जेव्हा ती आतून प्रकाशित होते, तेव्हा धुरकट गोठलेल्या धुक्यातून ती

दूरवरून दिसते. रस्त्यावरून जाणाऱ्या अनेक शेतकऱ्यांना तिचा चमचमता प्रकाश मार्गदर्शक ताऱ्याप्रमाणे उपयोगी पडतो. दारावरती एक फिकट निळी पाटी खिळ्यांनी ठोकून बसविलेली आहे; ही झोपडी म्हणजे खाणावळ आहे. तिचे नाव: 'आपला निवारा.' ह्या खाणावळीत बहुधा इतर ठिकाणांपेक्षा अधिक स्वस्त दराने दारू विकली जात नाही, पण तरीही आसपासच्या गुत्त्यांपेक्षा लोक ह्या स्थळाला जास्त भेट देतात. ह्याचे कारण खाणावळीचा मालक, निकोलाय इवानिच.

निकोलाय इवानिच—कधी काळी सडपातळ बांध्याचा, कुरळ्या केसांचा आणि गुलाबी गालांचा हा तरुण, आता प्रचंड गलेलठ्ठ, पांढरे केसवाला, गबगबीत चेहऱ्याचा पुरुष बनला होता. धूर्त, प्रेमळ डोळे आणि चकाकणारे कपाळ. त्या कपाळावर अक्षरश: दोऱ्याप्रमाणे रेषांचे जाळे पसरलेले. कोलोतोवकामध्ये तो वीस वर्षांपेक्षा जास्त काळ रहात आहे. निकोलाय इवानिच बहुसंख्य खाणावळवाल्यांप्रमाणे धूर्त, कावेबाज माणूस आहे. लोकांना खूष करण्याचा अथवा त्यांच्याशी बोलण्याचा जरी तो मुद्दाम प्रयत्न करीत नाही, तरी गिऱ्हाईकांना आकर्षून घेण्याची व कायम राखण्याची कला त्याला अवगत आहे. ह्या अतिमंद मालकाच्या शांत, सहानुभूतिपूर्ण, पण तरीही सावध नजरेखाली त्याच्या मद्यालयात बसायला लोकांना विशेष आवडते. त्याला व्यवहाराची चांगली जाण आहे: जमीनदाराच्या जीवनस्थितीची त्याला संपूर्ण माहिती आहे; शेतकऱ्याच्या आणि मध्यमवर्गीयाच्या आयुष्यांचीही त्याला संपूर्ण कल्पना आहे. कठीण प्रसंगी तो हितकर सल्ला देऊ शकतो, पण अत्यंत सावध व अहंकारी स्वभाव असल्यामुळे तो अलिप्त राहणे श्रेयस्कर मानतो. त्याच्या अत्यंत आवडत्या गिऱ्हाईकांच्या बाबतीत अशा वेळी फार तर दूरत्वाने तो उपाय सूचित करील, ज्यावरून अचूक निर्णय घेणे संबंधिताला शक्य व्हावे. रशियनाच्या दृष्टीने स्वारस्याच्या अथवा महत्त्वाच्या अशा प्रत्येक गोष्टीबाबत त्याला इत्थंभूत माहिती आहे: घोडे आणि गुरे-ढोरे, इमारती लाकूड, विटा, काचसामान, लोकरी आणि कातडी वस्तू, गाणी आणि नाच. जेव्हा गिऱ्हाईके नसतात, तेव्हा झोपडीच्या दारासमोर स्वत:चे बारकुळे पाय अंगाखाली मुडपून एखाद्या पोत्याप्रमाणे तो जमिनीवर बसतो आणि जाणाऱ्या-येणाऱ्यांशी मित्रत्वाच्या चार शब्दांची देवघेव

करतो. त्याने आपल्या आयुष्यात खूप काही पाहिले आहे; त्याच्यापाशी "शुद्ध मद्यासाठी" येणारे अनेक छोटे जमीनदार हे जग सोडून गेलेले त्याने पाहिले आहेत; भोवतालच्या शंभर वेर्स्तांमध्ये घडणारी प्रत्येक गोष्ट त्याला ठाऊक असते, पण तो कधीही कुचाळक्या करीत नाही; अत्यंत तीक्ष्ण नजरेच्या पोलीस अंमलदाराला कधी संशयसुद्धा येणार नाही अशा गोष्टी त्याला माहीत असतात, पण त्याबद्दल तो चुकून कधी ओळख दाखविणार नाही. तो गप्प राहतो, किंचित हसतो आणि ग्लास पुसू लागतो. त्याचे शेजारी त्याचा आदर करतात: नागरी जनरल श्चेरेपेतेन्को, ऊयेझ्दमधील सर्वोच्च श्रेणीचे जमीनदार, जेव्हा त्याच्या झोपडीजवळून बग्गीमधून जातात, तेव्हा नेहमी झुकून त्याला अभिवादन करतात. निकोलाय इवानिच वजन असलेला माणूस आहे; त्याच्या एका मित्राच्या तबेल्यामधून एका अट्टल घोडेचोराने एकदा घोडा चोरला होता, तेव्हा त्याने त्या चोराला घोडा परत करायला लावले होते; शेजारच्या खेड्यातील शेतकऱ्यांनी नव्या दिवाणजीला स्वीकारण्यास नकार दिला होता, तेव्हा त्याने शेतकऱ्यांची कानउघाडणी करून त्यांना ताळ्यावर आणले होते. आणखी अशी बरीच कृत्ये त्याने केली होती. मात्र शेजाऱ्याबद्दल ममत्व वाटते अथवा न्यायाची त्याला फार चाड होती, म्हणून तो असे वागतो अशी कल्पना करून घेऊ नका – मुळीच नाही! त्याच्या शांत आणि आरामशीर जीवनात ज्या गोष्टींमुळे बाधा येण्याची शक्यता आहे असे त्याला वाटते, त्यांना टाळण्याचा फक्त तो प्रयत्न करतो. निकोलाय इवानिच विवाहित आहे आणि त्याला मुले आहेत. त्याची चतुर, धारदार नाकाची, तीक्ष्ण नजरेची बायको मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेली आहे. अलीकडच्या काळात तीसुद्धा नवऱ्याप्रमाणेच काहीशी लठ्ठ बनली आहे. तो प्रत्येक बाबतीत तिच्यावर अवलंबून राहतो आणि पैशांच्या पेटीची चावी तिच्यापाशी असते. भांडखोर दारुडे तिला घाबरतात. तिला ते आवडत नाहीत. त्यांच्यापासून फायदा कमी आणि गोंगाट मात्र फार. गप्प राहून उदासपणे पिणारे तिला जास्त आवडतात. निकोलाय इवानिचची मुले अजून लहान आहेत. पहिली सर्व मेली, पण उरलेली आपल्या आई-बापाच्या वळणावर गेलीत. ह्या गुटगुटीत, बुद्धिमान चेहऱ्यांच्या पोरांना पाहून खूप आनंद वाटतो.

कोलोतोवकाच्या दरीच्या कडेने, मंदपणे पाय फरफटत, माझ्या कुत्र्यासह मी 'आपला निवारा' कडे वरती जात होतो, तेव्हा जुलै महिन्यातील असह्य उन्हाळ्याचा तो एक दिवस होता. सूर्य आकाशात प्रखरपणे चमकत होता, कोरडी माती निष्ठुरपणे भाजून काढत होता. घुसमटवून टाकणाऱ्या धुळीने वातावरण दाट बनले होते. डोंबकावळे आणि कावळे चोची उघड्या टाकून येणाऱ्या-जाणाऱ्यांकडे केविलवाण्या नजरांनी पाहून जणू सहानुभूतीची भीक मागत होते; फक्त चिमण्या मात्र मरगळून पडल्या नव्हत्या. पिसे फुलवून कुंपणांवर आपापसात भांडताना त्या नेहमीपेक्षा जास्त चिवचिवाट करीत होत्या अथवा धुळकट रस्त्यावरून एकत्रपणे कळपाने उडून हिरव्या तागाच्या जमिनींच्या तुकड्यावर त्यांचे भुरकट ढग भिरभिरत होते. मी तहानेने व्याकुळ झालो होतो. आसपास पाणी नव्हते: कोलोतोवकामध्ये, त्याचप्रमाणे स्तेपमधील अनेक खेड्यांमध्ये, झरे अथवा विहीरी नसल्यामुळे, तळ्यातील पातळ गाळ शेतकरी पीत. त्या किळसवाण्या पेयाला पाणी म्हणणे शक्य नव्हते. निकोलाय इवानिचकडे बीयरचा अथवा क्वासचा एक ग्लास पिण्याचा माझा विचार होता.

कबूल केले पाहिजे की, वर्षाच्या कोणत्याही काळात कोलोतोवका आल्हाददायक दिसत नसे. पण जुलैमधील प्रखर सूर्याची किरणे निष्ठुरपणे झोपड्यांच्या तपकिरी, अर्धवट उघड्या छपरांवर आणि खोल दरीवर जेव्हा कोसळत असतात, बारीक लांब पायांच्या कोंबड्या भाजक्या, धुळकट खुराड्यापाशी निराशपणे भटकत असतात, खाजकुयल्या, दवणा, रानगवत यांचे जंगल माजलेले, खिडक्यांऐवजी भोके राहिलेले, आता केवळ पोकळ, भुरकट लाकडी चौकटी दाखविणारे इनामदाराच्या जुन्या वाड्याचे अवशेष दिसतात, जणू जळून गेल्याप्रमाणे दिसणारे, हंसांच्या पिसांनी आच्छादलेले, काठाशी अर्धवट सुकलेल्या चिखलाचे तळे आणि त्याचा मोडका बांध दिसतो, त्याच्यापाशी राखेसारख्या मातीवर मेंढ्यांचा कळप उन्हाने कासाविस होऊन धापा टाकीत, डोकी खाली घालून ही असह्य उष्णता केव्हा संपेल ह्याची धीराने वाट पहात अंगाच्या मुटकुळ्या करून एकत्र पडून असतो, तेव्हा मनावर विशेषच निराशाजनक परिणाम घडतो. थकल्या पावलांनी मी निकोलाय इवानिचच्या घरापाशी आलो.

खेड्यातील मुले नेहमीप्रमाणे एकटक, अर्थहीन नजर लावून माझ्याकडे आश्चर्याने पहात होती आणि कुत्री आतडी तुटेपर्यंत जोरजोराने भुंकू लागली होती. भुंकून भुंकून कुत्र्यांना धाप लागली होती आणि अचानक खाणावळीच्या उंबरठ्याशी डोक्यावर टोपी नसलेला, नक्षीदार कोट घातलेला, कमरेखाली फिकट निळा पट्टा आवळलेला एक उंच माणूस मला दिसला. त्याचा अवतार जमीनदाराच्या घराच्या भूदासाप्रमाणे भासला. त्याच्या म्हाताऱ्या, सुरकुतल्या चेहऱ्यावर दाट पांढरे केस अस्ताव्यस्त उगवलेले होते. तो कुणालातरी घाईघाईने हाका मारीत होता, हातवारे करीत होता, पण ज्या व्यक्तीला तो बोलावीत होता ती व्यक्ती त्याच्या टप्प्यापलिकडे गेल्याचे स्पष्ट जाणवत होते. त्याने थोडीशी दारू झोकल्याचे दिसत होते.

"अरे ये, ये!" मोठ्या कष्टाने केसाळ भुवया उंचावीत तो अडखळत म्हणाला. "ये, मिचमिच्या, ये! अरे बंधू, शप्पत, तू सरपटतो आहेस! बंधू, हे चांगलं नव्हे. इथं माणसं तुझी वाट पाहताहेत आणि तू रांगतो आहेस... ये."

"आलो, आलो," एक कर्कश्य आवाज आला व झोपडीमागून उजवीकडे एक बुटका, लठ्ठ आणि लंगडा माणूस उगवला. त्याच्या अंगात बऱ्यापैकी सुती कोट होता व उंच टोकाची टोपी थेट भुवयांपर्यंत घसरली होती. तिच्यामुळे त्याचा गोल वाटोळा चेहरा बेरकी आणि विनोदी दिसत होता. त्याचे छोटे पिवळे डोळे अस्वस्थपणे भिरभिरत होते, त्याच्या पातळ ओठांवर कायम बळेच आणलेले हसू होते आणि त्याचे धारदार लांब नाक उर्मटपणे पंख्यासारखे पुढे आले होते. "आलो, भल्या माणसांनो," खाणावळीकडे लंगडत येत तो ओरडला, "कशाला तू मला बोलावतो आहेस? कोण माझी वाट पाहतोय?"

"कशाला मी तुला बोलावतोय?" नक्षीदार कोटामधील माणूस रागाने म्हणाला. "वा रे मिचमिच्या, तू अजब आहेस बंधो! तुला खाणावळीत बोलावताहेत आणि वर तू विचारतोस, कशाला. सगळी भली माणसं तुझी वाट पाहताहेत. याश्का तुर्क, जंगली मालक आणि झीझ्द्राचा कंत्राटदार. याश्कानं कंत्राटदाराशी पैज लावलीय: भांडभर बीयरची—जो सर्वांत उत्तम गाणं म्हणेल त्याला... समजलं?"

"याश्का गाणार?" मोठ्या उत्साहाने मिचमिच्या म्हणून संबोधला गेलेला माणूस म्हणाला. "तू खोटं बोलत नाहीस ना, चक्रम?"

"मी खोटं नाही बोलत," अत्यंत गंभीरपणे चक्रम उत्तरला, "तू मात्र मूर्खासारखी वटवट करतो आहेस. ज्याअर्थी पैज लावलीय, त्याअर्थी नक्की गाणार. तू अगदी बावळट आहेस, डांबरट मिचमिच्या!"

"बरं, चला साधुबोवा!" मिचमिच्याने उलट टोमणा मारला.

"तर मग निदान एक पापी दे, माझ्या लाडक्या," हात पसरून चक्रम अडखळत बोलला.

"अरे चल, मेणाच्या बाहुल्या!" त्याला कोपराने ढोसत मिचमिच्या तिरस्काराने म्हणाला आणि दोघेही ठेंगण्या दारातून आत गेले.

मला ऐकू आलेल्या संभाषणामुळे माझे कुतूहल जागे झाले होते. याश्का-तुर्क आसपासच्या प्रदेशातील सर्वोत्तम गायक असल्याच्या अफवा माझ्यापर्यंत अनेकदा पोहोचल्या होत्या. आणि आता दुसऱ्या एका पट्टीच्या कलाकाराबरोबर स्पर्धेत त्याचे गाणे ऐकण्याची संधी अचानक चालून आली होती. मी पावलांचा वेग वाढविला आणि खाणावळीत शिरलो.

खेड्यातील खाणावळीवर नजर टाकण्याचा प्रसंग माझ्या फार थोड्या वाचकांच्या वाट्याला आला असेल. पण आम्ही शिकारी सर्वत्र जातो. ह्या खाणावळी अत्यंत साध्या रीतीने बांधलेल्या असतात. सर्वसाधारणपणे त्यांची बाहेरची पडवी काळपट आणि पांढरी लाकडी झोपडी असते. आतील खोलीला आडोसा घालून तिचे दोन भाग केलेले असतात. त्या आडोशापलिकडे कुणाही गिऱ्हाईकाला पाय टाकण्याचा हक्क नसतो. ह्या आडोशात ओकच्या रुंद टेबलावर प्रशस्त मोकळी जागा कोरलेली असते. ह्या टेबलाशी दारू विकण्यात येते. समोर फडताळावर वेगवेगळ्या आकाराच्या सीलबंद बाटल्या उभ्या असतात. खोलीचा पुढचा भाग गिऱ्हाईकांसाठी असतो. तेथे बाकडी, दोन-तीन रिकामी पिंपे व गोल टेबल असते. खेड्यांमधील खाणावळी बहुतेक अंधाऱ्या असतात आणि त्यांच्या ओंडक्यांच्या भिंतींवर क्वचित भडक चित्रे तुम्हाला पहायला मिळतील, ज्यांच्याविना एकही झोपडी सजलेली नसते.

जेव्हा मी 'आपला निवारा' मध्ये प्रवेश केला, तेव्हा तेथे आधीच बरीच मंडळी जमलेली होती.

नेहमीच्या जागी, ओकच्या टेबलामागील मोकळी जागा जवळजवळ संपूर्ण व्यापून, निकोलाय इवानिच पट्टेदार छापाचा सदरा घालून उभा होता. फुगीर गालांवर मंद स्मित पसरवून त्याने नुकत्याच आत आलेल्या मिचमिच्याला व चक्रमला आपल्या पांढऱ्याशुभ्र गुबगुबीत हातांनी मदिरेचे दोन प्याले भरून दिले. त्याच्या पाठीमागे, खिडकीजवळच्या कोपऱ्यात, त्याची तीक्ष्ण नजरेची बायको बसलेली दिसत होती. खोलीच्या मध्यभागी याश्का-तुर्क उभा होता: सडपातळ डौलदार बांध्याचा तेवीस वर्षांचा तरुण. त्याने फिकट निळ्या रंगाचा लांब नानकीन कफ्तान अंगात घातला होता. तो कारखान्यातील चलाख कामगार दिसत होता, पण निरोगी असल्याचा दावा मात्र करू शकला नसता. त्याचे खप्पड गाल, टपोरे अस्वस्थ राखी डोळे, सरळ नाक, पातळ स्फुरणाऱ्या नाकपुड्या, फिकट तपकिरी केस, मागे वळविलेले पांढरे उतरते कपाळ, मोठे पण सुदर भावदर्शी ओठ—त्याचा संपूर्ण चेहरा भावनावेगी आणि संवेदनाक्षम स्वभाव व्यक्त करीत होता. तो अतिशय उत्तेजित मन:स्थितीत होता; तो सतत डोळ्यांची उघडझाप करीत होता, त्याचा श्वासोच्छ्वास जलद चालला होता, जणू तापात असल्याप्रमाणे त्याचे हात थरथरत होते आणि त्याला खरोखरच ताप चढला होता—प्रेक्षकांसमोर ज्यांना बोलायचे अथवा गाणे म्हणायचे असते त्या सर्वांना परिचित असलेला मानसिक उत्तेजनेचा अचानक चढणारा ताप. त्याच्या शेजारी रुंद खांद्यांचा, रुंद जबड्याचा, निमुळत्या कपाळाचा, सुमारे चाळीस वयाचा एक माणूस उभा होता. त्याचे तातार डोळे पिचके होते, नाक आखूड चपटे होते, चौकोनी हनुवटी होती आणि राठ खरखरीत चमकदार काळे केस होते. त्याच्या चेहऱ्यावर—शिसवी छटेच्या काळसर चेहऱ्यावर—आणि विशेषत: त्याच्या फिकट ओठांवर, अगदी पाशवी भाव होता. पण तो शांत आणि विचारमग्न असल्यामुळे पाशवीपण जाणवत नव्हते. तो अजिबात हालचाल करीत नव्हता, फक्त जोखडाखालच्या बैलाप्रमाणे सावकाशपणे सभोवती पहात होता. गुळगुळीत तांब्याची बटणे लावलेला, बराच वापरलेला फ्रॉक-कोट त्याने अंगात घातला होता; त्याच्या भरदार मानेभोवती जुना काळा रुमाल गुंडाळलेला होता. त्याला जंगली-मालक म्हणून सगळे हाक मारीत. त्याच्या अगदी समोर, देवाच्या तसबिरींच्या खालच्या बाकड्यावर,

याश्काचा प्रतिस्पर्धी – झीझ्द्राचा कंत्राटदार – बसला होता. तो तिशीचा बुटका, दणकट माणूस होता. त्याच्या तोंडावर देवीचे वण होते, त्याचे केस कुरळे होते, अपरे नाक होते, बोलके तपकिरी डोळे होते आणि त्याची दाढी विरळ होती. तो सभोवार कुतूहलाने पहात होता, अंगाखाली हात दुमडून बसला होता, बेफिकीरपणे पायांना हेलकावे देत होता आणि नखरेल लांब बुटांनी टकटक आवाज करीत होता. सुरेख राखी कपड्याचा, मऊ रेशमी कॉलरचा नवा कोट त्याने घातला होता आणि बंद गळ्याचा त्याचा किरमिजी सदरा त्यावर ठळक उठून दिसत होता. समोरच्या कोपऱ्यात, दाराच्या उजव्या बाजूला, एक शेतकरी बसला होता. त्याच्या मळकट, आखूड सैल झग्याला खांद्यावर भलेमोठे भोक पडले होते. दोन छोट्या खिडक्यांच्या धुळकट तावदानांमधून ऊन पिवळसर रंगात पाझरत होते, पण खोलीच्या नेहमीच्या अंधाराशी त्याने निष्कारण झटापट केली होती असे भासत होते. खोलीतील सर्व वस्तू मंदपणे, ठिपक्यांनी उजळल्या होत्या. पण खोलीत छान गारवा होता आणि उंबरठा ओलांडून आत शिरताच खांद्यावरील ओझे एकदम उतरावे तसा घुसमटत्या उष्म्याचा माझा त्रास क्षणात नाहीसा झाला.

माझा प्रवेश आरंभी निकोलाय इवानिचच्या ग्राहकांना काहीसा अस्वस्थ करणारा ठरला, असे माझ्या ध्यानात आले. पण त्याने ओळखीच्या माणसाप्रमाणे माझे स्वागत केले हे पाहताच ती मंडळी शांत झाली आणि नंतर त्यांनी माझ्याकडे मुळीच लक्ष दिले नाही. मी बीयर मागवली आणि फाटका झगा घातलेल्या शेतकऱ्याशेजारी बसलो.

"मग काय!" एका घोटात दारूचा ग्लास रिकामा करून चक्रम अचानक उद्गारला आणि त्याने हातांच्या विचित्र हालचाली केल्या. ह्या हालचालींविना तो एकही शब्द उच्चारू शकत नव्हता असे भासले. "आता कशाला वाट पहायची? सुरू करायचं ठरलंय, तर सुरू करा. काय? याशा?"

"सुरू करा, सुरू करा," निकोलाय इवानिचने दुजोरा दिला.

"ठीक आहे, करू सुरुवात," थंडपणे आणि आत्मविश्वासपूर्वक स्मित करीत कंत्राटदार म्हणाला, "मी तयार आहे."

"आणि मीही तयार आहे," याकोव उत्तेजितपणे म्हणाला.

"सुरू करा पोरांनो, सुरू करा," मिचमिच्या ओरडला.

पण एकमताने इच्छा व्यक्त करूनसुद्धा कुणीही सुरुवात केली नाही. कंत्राटदार तर बाकावरून उठलासुद्धा नाही. सगळेजण कशाची तरी वाट पहात होते.

"सुरू कर!" उदासपणे आणि तिखटपणे जंगली-मालक म्हणाला.

याकोव दचकला. कंत्राटदाराने कमरपट्टा खाली खेचला व घसा खाकरला.

"कुणी सुरुवात करायची?" त्याने किंचित वेगळ्या आवाजात जंगली-मालकाला विचारले. जंगली-मालक दोन्ही लठ्ठ पाय फाकून आणि बळकट हात कोपरांपर्यंत तंग तुमानीच्या खिशांमध्ये खुपसून निश्चलपणे खोलीच्या मध्यभागी उभा होता.

"तू, तू, कंत्राटदारा," चक्रम तोतरत म्हणाला, "तू सुरुवात कर, बंधू."

जंगली-मालकाने भुवयांखालून त्याच्यावर नजर टाकली. चक्रमने अस्फुट चीत्कार काढला, गोंधळून छताकडे कुठेतरी पाहिले, खांद्यांना झटका दिला आणि तो गप्प झाला.

"छाप-काटा करा," जंगली-मालक ठामपणे म्हणाला, "आणि बीयरचं भाडं टेबलावर ठेवा."

निकोलाय इवानिच खाली वाकला, घशातून आवाज काढत त्याने फरशीवरचे भांडे वर उचलले आणि टेबलावर ठेवले.

जंगली-मालकाने याकोवकडे दृष्टिक्षेप टाकला आणि तो म्हणाला: "चल!"

याकोवने स्वतःचे खिसे चाचपले, एक कोपेकचे नाणे काढले व दातांनी चावून नाण्यावर खूण केली. कंत्राटदाराने कफ्तानच्या खिशातून चामड्याचा नवा बटवा काढला, सावकाशपणे त्याची दोरी सोडली आणि नाण्यांचा खुर्दा हातावर ओतून त्यामधून एक कोपेकचे नवे नाणे उचलले. चक्रमने मोडके टोक लोंबणारी स्वतःची मळकी टोपी पुढे धरली. याकोवने स्वतःचा कोपेक तिच्यात टाकला आणि कंत्राटदाराने स्वतःचा.

"तू उचल," जंगली-मालक मिचमिच्याला उद्देशून म्हणाला.

मिचमिच्या आत्मतुष्टतेने हसला, दोन्ही हातांमध्ये त्याने टोपी धरली व तिला तो हलवू लागला.

क्षणभर पूर्ण शांतता पसरली. कोपकची नाणी एकमेकांवर आदळताना मंद किणकिण करीत होती. मी लक्षपूर्वक सभोवार नजर टाकली. प्रत्येक चेहऱ्यावर तीव्र अपेक्षा उमटली होती. जंगली-मालक खुद्द ताठरलेला दिसत होता. माझ्या शेजारच्या फाटक्या झग्यावाल्या शेतकऱ्यानेसुद्धा उत्सुकपणे मान लांबवली होती. मिचमिच्याने टोपीत हात घातला आणि कंत्राटदाराचे नाणे त्याच्या हाती आले. सर्वांनी दीर्घ श्वास घेतला. याकोव लाल झाला आणि कंत्राटदाराने केसांवरून हात फिरविला.

"मी म्हणालो होतो ना, तू सुरुवात कर," चक्रम ओरडला, "मी म्हणालो होतो."

"बरं, बरं, बोंबलू नको," जंगली-मालक तिटकाऱ्याने म्हणाला. "सुरू कर", कंत्राटदाराला मानेने इशारा देऊन तो पुढे म्हणाला.

"कुठलं गाणं म्हणू मी?" अस्वस्थ होत कंत्राटदाराने विचारले.

"तुला पाहिजे ते म्हण," मिचमिच्या म्हणाला. "तुला आवडेल ते म्हण."

"अर्थात, तुला पाहिजे ते म्हण," निकोलाय इवानिच सावकाशपणे छातीवर हातांची घडी घालीत म्हणाला. "याबाबत तुला स्वातंत्र्य आहे. तुला हवं ते गाणं म्हण; मात्र चांगलं गा; आम्ही नंतर योग्य तो निर्णय देऊ."

"अर्थात, योग्य निर्णय देऊ," चक्रमने री ओढली आणि रिकाम्या ग्लासाची कडा चाटली.

"बंधूनो, जरा घसा खाकरतो," कफ्तानाच्या कॉलरशी बोटे चाळवीत कंत्राटदार म्हणाला.

"आता उगीच टंगळमंगळ करू नको, सुरुवात कर!" जंगली-मालक दम देत म्हणाला आणि त्याने नजर जमिनीला खिळविली.

कंत्राटदाराने थोडासा विचार केला, मान झटकली आणि दोन पावले पुढे टाकली. याकोव त्याच्याकडे एकटक पहात होता...

पण खुद्द स्पर्धेचे वर्णन करण्यापूर्वी, माझ्या कथेतील प्रत्येक पात्राची थोडी ओळख करून देणे अवाजवी ठरणार नाही, असे मला वाटते.

त्यांना 'आपला निवारा' मध्ये भेटण्यापूर्वी, काहींची आयुष्ये मला आधीच ठाऊक होती. बाकीच्यांबद्दल मी नंतर माहिती करून घेतली.

चक्रमपासून आरंभ करू. ह्या माणसाचे खरे नाव होते एवग्राफ इवानोव. पण सबंध पंचक्रोशीत त्याला सगळेजण चक्रम ह्याच नावाने ओळखत होते आणि तो स्वतःही त्या टोपणनावाने स्वतःचा उल्लेख करायचा. ते नाव त्याला अगदी चपखल शोभत होते. ह्या सामान्य, सदा अस्वस्थ चेहऱ्याच्या माणसाला याहून दुसरे नाव योग्य ठरले नसते. तो भटक्या, अविवाहित भूदास होता; त्याच्या मालकांनी केव्हाच त्याला टाकून दिले होते आणि नोकरी नसूनही, एका कोपेकची मिळकत नसूनही, दुसऱ्यांच्या खर्चाने झिंगण्याची कला त्याने साध्य केली होती. त्याच्या ओळखीची अनेक माणसे त्याला दारू आणि चहा स्वखर्चाने पाजत, पण तसे ती का करीत हे मात्र त्यांना ठाऊक नव्हते. कारण त्याच्या संगतीत मनोरंजन होणे दूरच, उलट मूर्ख बडबड करून, अतिसलगी दाखवून, विचित्र हातवारे करून व सतत कृत्रिम हसून तो लोकांना कंटाळा आणायचा. त्याला ना नाचता येत होते, ना गाता. सबंध आयुष्यात त्याच्या तोंडून एकही चतुर अथवा निदान शहाणा शब्द कधी बाहेर पडला नव्हता. सर्व बाबतीत तो सतत थापा मारायचा — साक्षात चक्रम! आणि तरीसुद्धा, भोवतालच्या चाळीस वेर्स्तांमध्ये एकही मद्यपानाची मैफल ह्या लंबू माणसाच्या उपस्थितीविना घडत नसे. आता सर्वांना त्याची सवय झाली होती आणि एक अटळ पीडा म्हणून त्याचा त्यांनी स्वीकार केला होता. एवढे खरे, सर्वजण त्याला तिटकाऱ्याने वागवत. पण त्याच्या मूर्ख चाळ्यांना आवर कसा घालायचा हे एकटा जंगली-मालक जाणायचा.

मिचमिच्या मात्र चक्रमपेक्षा अगदी वेगळा होता. त्याचे टोपणनाव त्यालाही पूर्ण योग्य होते, पण प्रत्यक्षात त्याचे डोळे इतर माणसांएवढीच उघडझाप करीत. रशियन शेतकरी योग्य टोपणनावे शोधून काढण्यात पटाईत असतात, ही गोष्ट जगजाहीर आहे. ह्या माणसाच्या भूतकाळाबद्दल अधिक तपशीलवार माहिती काढण्याचे खूप प्रयत्न करूनसुद्धा, त्याच्या आयुष्यातील अनेक जागा माझ्या दृष्टीने आणि कदाचित इतर लोकांच्या दृष्टीनेही कोऱ्या राहिल्या आहेत. अनेक लेखकांच्या भाषेत

सांगायचे तर त्याच्या आयुष्यातील अनेक प्रसंग अंधारात गाडले गेले आहेत. मला फक्त एवढेच समजले की, एकेकाळी एका निपुत्रिक बाईकडे गाडीवान म्हणून तो काम करीत होता. त्याच्या ताब्यातील तीन घोड्यां-सकट पळून गेला होता, वर्षभर गायब होता आणि भटक्या जीवनातील तोटयांची व कष्टांची निःसंशयपणे अनुभवाने त्याला खात्री पटली होती. तो त्या बाईकडे परत गेला, पण दरम्यान तो लंगडा बनला होता. त्याने तिच्या पायांवर लोटांगण घातले. पुढे अनेक वर्षे आदर्श वर्तन राखून त्याने स्वतःच्या अपराधाला धुवून काढले. हळूहळू त्याने मालकि-णीची मर्जी संपादन केली, अखेरीस तिचा पूर्ण विश्वास प्राप्त केला व तिने त्याला इस्टेटीचा कारभारी म्हणून नेमले. तिच्या मृत्यूनंतर असे आढळले—कोणत्या रीतीने माहीत नाही—की तिने त्याला मुक्त केले होते. तो मध्यमवर्गीयांमध्ये सामील झाला, शेजाऱ्यांचे भाजीपाल्यांचे वाफे त्याने खंडाने घेतले, श्रीमंत बनला आणि आता आरामशीर आयुष्य जगत होता. हा माणूस अनुभवी आहे, अकलेने वागायचा, रागाच्या अथवा औदार्याच्या आहारी जायचा नाही, हिशेबी आहे. माणसांची त्याला चांगली पारख होती आणि त्यांचा योग्य वापर करून घेणे त्याला अवगत होते. तो सावध वागायचा, पण त्याचवेळी कोल्ह्यासारखा धूर्त आहे. म्हातारीसारखा वटवटया आहे, पण स्वतःबाबत कधी अवाक्षर काढायचा नाही, उलट इतरांना बोलते करून त्यांच्या भानगडी इत्थंभूत माहीत करून घ्यायचा. अनेक धूर्त माणसांप्रमाणे भोळेपणाचा आव मात्र तो आणत नसे. भोळेपणाने वागणे त्याला अवघड गेले असते. त्याच्या-एवढे तीक्ष्ण आणि बुद्धिमान डोळे मी पूर्वी कधीही पाहिले नव्हते. ओरेल-वासी म्हणतात तशी छोटी, धूर्त "भोके". त्याचे डोळे नुसते कधी पहात नसत; ते नेहमी वस्तूंचा आणि माणसांचा भेद घेत. बाह्यतः सामान्य दिसणाऱ्या एखाद्या धंद्याबाबत मिचमिच्या काहीवेळा अनेक आठवडेपर्यंत विचार करीत बसायचा आणि ज्यात सर्वनाश घडेल असे भा-सणाऱ्या एखाद्या धाडसी उद्योगाबाबत अचानक झटपट निर्णय घ्यायचा. पण शेवटी सर्व सुरळीत घडायचे, सर्व छान पार पडायचे. तो नशीब-वान आहे, स्वतःच्या सुदैवावर त्याचा विश्वास आहे, शकुनांवर त्याचा विश्वास आहे. एकूण तो कमालीचा भाविक आहे. कुणाच्याही गोष्टी

तो मनाला लावून घेत नसे, म्हणून तो लोकांना आवडायचा नाही, पण त्याच्याबद्दल लोक आदर बाळगत. त्याला फक्त एक लहान मुलगा होता. त्या मुलावर त्याचा जीव होता आणि अशा बापाकडून संगोपन घडणारा तो मुलगा आयुष्यात नक्कीच दूरवर पोहोचणार आहे. "पोरगा बापाच्या वळणावर गेला," असे म्हातारे लोक उन्हाळ्यात संध्याकाळी घरांसमोर शिळोप्याच्या गप्पा मारताना त्याच्याबद्दल खालच्या आवाजांमध्ये बोलत. सगळ्यांना ह्याचा अर्थ समजतो आणि त्यावर आणखी एकही शब्द बोलत नाहीत.

याकोव-तुर्क आणि कंत्राटदार ह्यांच्याबद्दल अधिक सांगण्याची गरज नाही. याकोवला तुर्क म्हणत, कारण युद्धात कैदी म्हणून आणलेल्या एका तुर्की बाईच्या पोटी तो जन्मला होता, स्वभावाने पूर्णतः कलावंत होता आणि एका व्यापाऱ्याच्या कागदाच्या गिरणीत कामगार होता. कंत्राटदाराबद्दल मला काहीही माहीत नाही हे मी कबूल करतो. मला तो चतुर मध्यमवर्गीय व्यापाऱ्यांमधील वाटला. पण जंगली-मालकाबद्दल खूप तपशीलवार सांगितले पाहिजे.

ह्या माणसाला पाहताक्षणी प्रथम जाणीव होते राकट, दणकट, अदम्य ताकदीची. त्याचा बांधा वेडाबागडा होता, आमच्या भाषेत "एकसंध" होता. पण त्याच्यात अविनाशी जोम होता आणि आश्चर्य म्हणजे त्याच्या अस्वली आकृतीतही एक डौल होता. कदाचित स्वतःच्या ताकदीमधील त्याच्या ठाम विश्वासापायी असा डौल त्याला प्राप्त झाला होता. हा हर्क्युलस समाजातील कोणत्या वर्गातील होता हे आरंभी ठरविणे अवघड होते. तो भूदास दिसत नव्हता अथवा मध्यमवर्गीय व्यापारी दिसत नव्हता; बेकार दरिद्री कारकून वाटत नव्हता किंवा सर्वनाश पावलेला कुत्र्यांचा आणि मारामाऱ्यांचा षौकिन छोटा जमीनदार दिसत नव्हता; त्याचे व्यक्तित्व स्वतंत्र होते. तो कुठून आला होता आणि आमच्या ऊयेझ्दमध्ये कशासाठी आला होता, कुणालाही माहीत नव्हते. लोक म्हणत की, तो खानदानी कुळातील होता आणि कधीकाळी सरकारी नोकरीत होता. पण त्याच्याबद्दल नक्की माहिती नव्हती, कुणाकडूनही समजण्यासारखी नव्हती आणि खुद्द त्याच्याकडून तर नक्कीच नाही. तो अत्यंत गप्प आणि दुर्मुखला माणूस होता. त्याचे निर्वाहाचे

साधन काय होते, ह्याबद्दलही कुणी निश्चितपणे सांगू शकला नसता. कोणताही धंदा तो करीत नव्हता, कुणालाही जाऊन भेटत नव्हता, जवळजवळ कुणाशीही सलगी ठेवत नव्हता. तरीही खर्चायला त्याच्यापाशी पैसे होते. अर्थात जास्त नव्हेत, पण तरीही होते; त्याचे वागणे साधे-पणाचे म्हणता आले नसते—त्याच्यात साधेपणा मुळीच नव्हता—पण तो शांत होता. जणू भोवती कुणी अस्तित्वात नाही आणि कुणाची त्याला फिकीर नाही, असा तो वागायचा. जंगली-मालकाचा (त्याला देण्यात आलेले हे टोपणनाव; त्याचे खरे नाव पेरेव्लेसोव) सबंध परि-सरात दबदबा होता. जरी कुणाला काही हुकूम देण्याचा त्याला मुळीच हक्क नव्हता आणि सहज संपर्कात आलेल्या लोकांवर अधिकार गाजवि-ण्याचा तो कधी यत्किंचितही प्रयत्न करीत नव्हता, तरीही त्याच्या आज्ञा लोक तत्परतेने पाळत. तो म्हणायचा—ते आज्ञा पाळतात: ताकद नेहमी बोलते. तो जवळजवळ कधीही मद्य पीत नसे, बायकांचा त्याला नाद नव्हता, पण गाण्यांचा मात्र विलक्षण छंदी होता. ह्या माणसाबद्दल खूप काही गूढ होते; त्याच्यात अफाट ताकदी दबून बसल्या होत्या असे भासायचे आणि जर त्या जाग्या झाल्या असत्या, एकदा का उमाळून बाहेर फुटल्या असत्या, तर त्यांनी त्याला नक्की चिरडून टाकले असते, त्यांच्या संपर्कात येणाऱ्या सर्व गोष्टींना त्यांनी चिरडून टाकले असते. ह्या माणसाच्या आयुष्यात असा बांध कधीतरी नक्की फुटला असणार, असा माझा कयास आहे. त्या अनुभवावरून धडा घेतल्यामुळेच, सर्वना-शापासून थोडक्यात बचावल्यामुळे, आता तो स्वतःला स्वतःच्या घट्ट मुठीत ठेवत होता. जन्मजात नैसर्गिक क्रूरता आणि तेवढीच जन्मजात उदारता, ह्यांचे अपूर्व मिश्रण ह्या माणसात झाल्याचे मला आढळले. अशा प्रकारचा दुसरा माणूस अजून मला कधी भेटला नव्हता.

तर कंत्राटदार पुढे झाला आणि डोळे अर्धवट मिटून त्याने वरचा फाल्सेट्टो गायला आरंभ केला. त्याचा आवाज किंचित घोगरा असला तरी मधुर आणि प्रसन्न होता. स्वतःच्या आवाजाशी तो खेळत होता, भोवऱ्याप्रमाणे त्याला गरगर फिरवत होता, आरोह-अवरोह देत होता. तानांची भेंडोळी फेकत होता, पुनःपुन्हा वरच्या ताना दीर्घ काळपर्यंत मारत होता. मग तो एकदम तान तोडायचा, पुन्हा धडाडीने पहिला

सूर पकडायचा. त्याचे स्वरांचे चढउतार काही वेळा काहीसे धीट होते, काही वेळा रंजक होते. जाणकाराला त्यांनी खूप समाधान दिले असते, पण जर्मन माणूस मात्र संतापला असता. तो रशियन भावात्मक टेनोर गात होता. तो उल्हासी नृत्यगीत गात होता आणि वेगवेगळ्या तानां-मधून, पुनरुक्तींमधून मला समजू शकलेले गाण्यातील शब्द असे होते :

धरतीचा लहाना तुकडा, साजणी
तुझ्यासाठी नांगरीन ग...
लाल लहानी फुलं, साजणी
तुझ्यासाठी लावीन ग.

तो गात होता. सगळे त्याचे गाणे लक्षपूर्वक ऐकत होते. जाण-कारांसमोर गात आहोत ही जाणीव त्याला असल्याचे भासत होते आणि म्हणून तो उत्तम गाण्याची शर्थ करीत होता. आमच्या प्रदेशातील माणसे खरोखरीच संगीतातील दर्दी आहेत. ओरेल हमरस्त्यावरील सेर्गियेवस्कोये खेडे वृंदगानासाठी सबंध रशियात ख्याती पावलेले आहे. कंत्राटदार खूप वेळपर्यंत गाऊनही श्रोत्यांवर विशेष परिणाम घडवू शकला नाही. त्याला साथीची उणीव भासत होती. पण शेवटी एका धीट ताने-नंतर जंगली-मालकाच्या मुद्रेवरसुद्धा स्मित उमटले आणि चक्रमने न राहवून आनंदप्रदर्शक आरोळी मारली. प्रत्येकजण उत्तेजित बनला. चक्रम आणि मिचमिच्या खालच्या आवाजात दाद देऊ लागले : "वा-हवा... चल ये, डांबरटा... अरे गा, गा, सापा! जरा थांब! परत म्हण, कुत्र्या! दाब नरडं तुझ्या आत्म्याचं!" इत्यादी, इत्यादी. बार-मागे बसलेला निकोलाय इवानिच संमतीदर्शक माना डोलवीत होता. चक्रम आता पायांना झोके देत होता, पावलांनी ठेका धरत होता, खां-द्याला झटके देत होता; तर याकोवचे डोळे निखाऱ्यांप्रमाणे चमकत होते, त्याचे सर्वांग कापत होते, घाबरटपणे तो स्मित करीत होता. फक्त जंगली-मालकाचा चेहरा मुळीच बदलला नव्हता आणि तो पूर्वी-प्रमाणेच स्तब्ध उभा होता. पण कंत्राटदारावर खिळलेले त्याचे डोळे थोडे सौम्य बनले होते. त्याच्या ओठांवरील तिरस्कृत भाव मात्र कायम होता. श्रोत्यांची वाहवा मिळाल्यामुळे अधिक धीर आलेल्या कंत्राटदाराने

तानावर ताना मारणे सुरू केले, त्याची जीभ वळवळू लागली आणि त्याने घशाच्या विलक्षण करामती दाखविल्या. शेवटी दमलेल्या, फिकट चेहऱ्याने, घामाघूम अवस्थेत, त्याने अखेरची तान मारली, त्याचा पूर्ण देह मागे झुकला. सर्वांनी आरोळ्या ठोकून त्याचे कौतुक केले. चक्रमने त्याच्या मानेभोवती मिठी मारली व स्वतःच्या लांबोडचा, हडकुळ्या हातांनी त्याला घुसमटून टाकले. निकोलाय इवानिचच्या तेलकट चेहऱ्यावर लाली पसरली, तो अधिक तरुण झाल्यासारखा भासला. याकोव वेडचाप्रमाणे ओरडला: "शाबास! शाबास!" माझ्या शेजारी बसलेल्या फाटक्या झग्यातील शेतकऱ्याचासुद्धा संयम सुटला आणि टेबलावर मूठ आपटीत तो ओरडला: "आहा! काय छान, च्यायला! फार छान!" आणि तो जोरात थुंकला.

"वा बंधू, तू आमची खूप करमणूक केलीस," कंत्राटदाराला घातलेली मिठी न सोडता चक्रम ओरडला, "खरंच छान करमणूक केलीस! बंधू, तू जिंकलास, जिंकलास! अभिनंदन – बीयरचं भांडं तुझं! तुला गाठायला याश्काला फार वेळ लागेल... मी तुला ठाम (सांगतो... फार दूर आहे तो... तू माझ्यावर विश्वास ठेव!" (आणि त्याने परत कंत्राटदाराला घट्ट मिठी मारली.)

"अरे, सोड त्याला, सोड, चिकटगुंडचा..." चिडून मिचमिच्या म्हणाला. "त्याला बाकावर बसायला तरी दे; बघ, तो दमलाय... तू महामूर्ख आहेस, भाऊ, महामूर्ख! एवढी त्याची खुषामत काय चालवली आहेस?"

"खुशाल बसू देत, मी त्याच्या आरोग्यासाठी पितो," चक्रम म्हणाला व बारपाशी गेला. "तुझ्या खर्चानं, बंधू," कंत्राटदाराला उद्देशून तो पुढे म्हणाला.

कंत्राटदाराने मान हलवून संमती दिली, तो बाकावर बसला, टोपीमधून त्याने रुमाल काढला आणि चेहरा पुसायला आरंभ केला. चक्रमने घाईघाईने आधाशीपणे ग्लास रिकामा केला आणि अस्सल दारुडचांच्या सवयीनुसार घशातून खाकरल्याचा आवाज काढून गंभीर चिंतायुक्त मुद्रा केली.

"छान गातोस बंधू, छान," निकोलाय इवानिच सौम्यपणे म्हणा-

ला. "आता तुझी पाळी, याशा. बघ, घाबरू नको. कोण कुणावर मात करतो, आम्ही बघू... कंत्राटदार छान गातो, देवाशप्पत छान गातो."

"खूप्प छान," निकोलाय इवानिचची बायको म्हणाली आणि याकोव-कडे तिने सस्मित कटाक्ष टाकला.

"छान-हा!" माझ्या शेजाऱ्याने खालच्या आवाजात दुजोरा दिला.

"अरे ए जंगली!" अचानक चक्रम खेकसला आणि खांद्यावर भोक पडलेल्या शेतकऱ्यापाशी धावला, त्याच्याकडे बोट रोखून नाचत, कर्कश्य हसला. "जंगली रे जंगली! हा-हा! इथं कशाला आलास?" हसता हसता तो किंचाळला.

बिचारी शेतकरी गोरामोरा झाला आणि पटकन निघून जाण्यासाठी उठायच्या बेतात होता, तेवढ्यात जंगली-मालकाचा खणखणीत आवाज आला:

"हा असह्य पशू कधी सुधारणार?" दात आवळून तो म्हणाला.

"मी काही नाही केलं," चक्रम पुटपुटला, "मी काही नाही केलं... मी सहज..."

"ठीक आहे, आता गप्प बसा!" जंगली-मालकाने दम भरला. "याकोव, सुरू कर!"

याकोवने स्वतःच्या घशावर हात ठेवला.

"बंधूनो, खरंच... काय सांगू... हं... शप्पत, माहीत नाही... काय ते..."

"पुरे झालं. कच खाऊ नको. शरम नाही वाटत? उगीच काय आढेवेढे घेतोस?.. म्हण गाणं, देवानं तुला दान केलंय तसं!"

आणि जंगली-मालक अपेक्षेने पाहू लागला.

याकोव मिनिटभर गप्प बसला. त्याने सभोवार पाहिले आणि हाताने चेहरा झाकला. सर्वांचे डोळे त्याच्यावर खिळले होते, विशेषत: कंत्राट-दाराचे; त्याच्या नेहमीच्या आत्मविश्वासू चर्येमधून आणि यशामधूनही, त्याच्या चेहऱ्यावर फिकट काळजी उमटलेली दिसत होती. तो भिंतीशी टेकला व परत त्याने दोन्ही हात अंगाखाली दुमडले, पण पूर्वीप्रमाणे आता तो पाय हलवत नव्हता. अखेरीस याकोवने चेहऱ्यावरील हात

बाजूला केला, तेव्हा त्याचा चेहरा प्रेताप्रमाणे निस्तेज दिसत होता. त्याच्या झुकलेल्या पापण्यांखालील डोळे मंद चमकत होते. त्याने एक खोल सुस्कारा टाकला आणि गाणे म्हणायला सुरुवात केली... त्याच्या आवाजाचा पहिला ध्वनी फिका आणि कापरा होता त्याच्या छातीतून तो निघत होता असे वाटत नव्हते, तर दुरून कुठून तरी तरंगत येत होता, असे भासत होते. जणू तो योगायोगाने खोलीत तरंगत आला होता, असे भासत होते. त्या कापऱ्या, थरथरत्या आवाजाने आम्हा सर्वांवर एक विलक्षण परिणाम घडविला होता. आम्ही एकमेकांकडे नजरा टाकल्या आणि निकोलाय इवानिचची बायको सावरून बसली. पहिल्या तानेपाठोपाठ दुसरी अधिक धीट आणि प्रदीर्घ तान आली, पण हीसुद्धा कापरी होती. तारेला अचानक बोटाने आघात केल्यानंतर ती वेगाने थरथरत परत स्थिरावते, तशी भासली. दुसरीपाठोपाठ तिसरी तान आली आणि हळूहळू तापत व विस्तारत त्या सुरांमधून शोकाकुल गीत उमटले. "मैदानात ती एकटीच पाऊलवाट नव्हती," तो गाऊ लागला आणि आम्हाला सर्वांना मधुर व गूढ भीती वाटली. मला कबूल केले पाहिजे की, असा आवाज मी क्वचित ऐकला होता. तो किंचित घोगरा आणि चिरका होता. आरंभी त्यात काहीसे आजारपणही जाणवले. पण त्यात भावनावेगाची आणि यौवनाची, ताकदीची आणि मधुरतेची खोली होती. मन वेधून टाकणारी, बेफिकीर करुण वेदना होती. त्या आवाजातून रशियाचा प्रामाणिक आणि उकळता आत्मा घुमत होता. त्या आवाजाचे श्वसन थेट तुमच्या काळजाला जाऊन भिडत होते, त्यातील सर्व रशियन तारे थेट भिडत होते. गाणे उसळत होते, वाहात होते. याकोव गाण्यात गुंगला होता. आता तो बिचकत नव्हता, स्वतःच्या कलेच्या उन्मादात त्याने पूर्णतः बुडवून घेतले होते. इतःपर त्याचा आवाज कापत नव्हता. तो थरथरत होता, पण ती थरथर श्रोत्यांच्या काळजात बाणाप्रमाणे घुसणाऱ्या अंधुक आंतरिक आवेगाची होती. हळूहळू त्याच्या आवाजात ताकद आली, ठामपणा आणि विस्तार आला. मला आठवते, एका सपाट वाळवंटी किनाऱ्यावरून एकदा मी सूर्यास्त पाहिला होता. तेव्हा ओहटी होती आणि समुद्रगर्जना भरदार, धडकी भरविणारी भासत होती. एक मोठा शुभ्र सागरपक्षी मावळत्या सूर्याच्या किरमिजी गोळ्या-

कडे स्वतःची रेशीमपोती छाती करून निःस्तब्ध बसला होता. फक्त अधूनमधून त्याला परिचित असलेल्या सागराचे स्वागत करायला, मावळत्या किरमिजी सूर्याला अभिवादन करायला स्वतःचे प्रचंड पंख पसरीत होता. याकोवचे गाणे ऐकताना मला त्या दृश्याची आठवण झाली. याकोव त्याच्या प्रतिस्पर्ध्याला आणि आम्हा सर्वांना विसरून गात होता. पट्टीच्या पोहणाऱ्याला लाटांचा जसा आधार मिळतो, तसा त्याला आमच्या मूक, आवेगी सहानुभूतीचा अर्थातच आधार होता. तो गात होता आणि त्याच्या आवाजाच्या प्रत्येक ध्वनीमधून काहीतरी खूप जवळीक भासत होती, विस्तार आणि अंतर जाणवत होते; जणू परिचित स्तेप आमच्या नजरेसमोर उलगडत जात होते आणि असीम अंतरापर्यंत विस्तारले होते. माझ्या छातीत अश्रू दाटले व डोळ्यांपर्यंत ते चढू लागल्याचे मला जाणवले. अचानक मंद, घुसमटलेले हुंदके कानी आले... मी भोवती पाहिले—खाणावळवाल्याची बायको खिडकीच्या चौकटीला छाती दाबून रडत होती. याकोवने तिच्याकडे ओझरता दृष्टिक्षेप टाकला व तो पूर्वीपेक्षा जास्त मधुरपणे, जास्त सुरेलपणे गाऊ लागला. निकोलाय इवानिच खाली पाहू लागला; मिचमिच्याने तोंड फिरविले; गहिवरलेला चक्रम तोंडाचा आ वासून बावळटासारखा उभा राहिला; साधा शेतकरी कोपऱ्यात मुसमुसू लागला आणि व्याकुळपणे मान हलवीत पुटपुटू लागला; आणि जंगली-मालकाच्या करारी मुद्रेवर, भुवयांच्या झुपक्यांखालून, सावकाशपणे अश्रूचा एक भलामोठा थेंब ओघळला; कंत्राटदाराने गच्च आवळलेली मूठ स्वतःच्या भुवईपाशी धरली व तो निश्चल बसला. एका उंच, विलक्षण कर्कश्य तानेवर, जणू आवाज तुटल्याप्रमाणे, याकोवने जर अचानक गाणे थांबविले नसते, तर एकूण वातावरणाची कशी अखेर झाली असती, मला माहीत नाही. कुणीही आरोळ्या ठोकल्या नाहीत अथवा जागचा हलला नाही; याकोव आणखी पुढे गाणार अथवा नाही, अशा अपेक्षेने प्रत्येकजण वाट पहात होता. जणू आमच्या मौनाचे आश्चर्य वाटल्याप्रमाणे त्याने डोळे उघडले आणि प्रश्नार्थक मुद्रेने आमच्याकडे पाहिले... त्याचा विजय झाल्याचे त्याला समजले.

"याशा," जंगली-मालक म्हणाला आणि त्याने याकोवच्या खांद्यावर हात ठेवला. पुढे त्याला बोलवेना.

आम्ही सगळे दगडी पुतळ्यांप्रमाणे उभे होतो. कंत्राटदार हळूच उठला आणि याकोवपाशी गेला. "तू... तुझा... तू जिंकलास!" अखेरीस तो मोठ्या कष्टाने उद्गारला आणि खोलीमधून वेगाने बाहेर निघून गेला.

त्याच्या वेगवान, निर्णायक कृतीने समाधी भंगली. आम्ही सारे अचानक उत्साहाने बडबडू लागलो. चत्रम उड्या मारीत होता, तोतरत होता, चक्कीच्या पंख्यांप्रमाणे हातवारे करीत होता. मिचमिच्या लंगडत याकोवपाशी गेला आणि त्याची चुंबने घेऊ लागला. निकोलाय इवानिच उठला व त्याच्यातर्फे आणखी बीयरचे एक भांडे दिल्याचे त्याने गंभीरपणे जाहीर केले. मी कधी अपेक्षा केली नव्हती असे प्रेमळ हास्य जंगली-मालकाच्या चेहऱ्यावर झळकले. साधाभोळा शेतकरी त्याच्या बाह्यांवर डोळे, नाक, गाल, दाढी पुसत होता आणि कोपऱ्यात बसून पुटपुटत होता: "आहा, छान, देवाशप्पत छान! मी च्यायला कुत्तरडीचा, पण छान!" आणि रडून रडून चेहरा लालबुंद झालेली निकोलाय इवा-निचची बायको ताडकन उठली व निघून गेली. याकोव लहान मुलाप्रमाणे विजयाचा आनंद उपभोगत होता. त्याचा चेहरा संपूर्ण बदलून गेला होता, त्याचे डोळे विशेष आनंदाने चमकत होते. त्यांनी त्याला बारपाशी खेचत नेले; त्याने रडणाऱ्या शेतकऱ्याला बारकडे येण्याची हाताने खूण केली व कंत्राटदाराला शोधून आणण्यासाठी खाणावळवाल्याच्या छोट्या मुलाला पिटाळले. अर्थात कंत्राटदार सापडला नाही. उत्सव सुरू झाला. "तू आम्हाला आणखी गाऊन दाखव. तू संध्याकाळपर्यंत गाणी म्हणाय-ची," हात हवेत उडवीत चत्रम ठामपणे म्हणाला.

मी परत एकदा याकोववर नजर टाकली व बाहेर गेलो. मला तेथे अधिक थांबायची इच्छा नव्हती—माझ्या मनावरील परिणाम पुसून जाईल अशी मला भीती वाटत होती. पण बाहेर ऊष्मा पूर्वीसारखाच असह्य होता. धरतीवर उष्णतेचा दाट थर सखल ओठंगल्याचा भास होत होता. गडद निळ्या आकाशातील छोटे, तेजस्वी दिवे जणू सूक्ष्म, काळ्या धुळी-तून डोकावीत होते. सर्वत्र स्तब्धता नांदत होती. थकलेल्या निसर्गातील ह्या गहन स्तब्धतेत काहीतरी निराशेची आणि दडपणाची भावना जाण-वत होती. मी गवताच्या गंजीकडे गेलो आणि ताज्या कापलेल्या, पण

एव्हाना सुकलेल्या गवतावर अंग टाकले. खूप वेळपर्यंत मला झोप येत नव्हती. खूप वेळपर्यंत याकोवचा अदम्य आवाज माझ्या कानांमध्ये घुमत होता. शेवटी उकाड्याने आणि थकव्याने माझ्यावर कुरघोडी केली. मला गाढ झोप लागली. जेव्हा मी जागा झालो, तेव्हा सर्वत्र काळोखाचे साम्राज्य नांदत होते. भोवताली विखुरलेल्या गवताचा उग्र दर्प येत होता व ते किंचित ओलसर बनले होते. अर्धवट उघड्या छपराच्या निमुळत्या वाशांमधून फिकट तारे मंद चमकत होते. मी बाहेर गेलो. सूर्यास्ताची आभा केव्हाच विरली होती आणि क्षितिजावर तिची शेवटची खूण फिकट मंदपणे दिसत होती. पण रात्रीच्या ताजेपणात अद्याप सूर्याने नुकत्याच भाजलेल्या वातावरणाची उष्णता जाणवत होती आणि थंड वाऱ्याच्या झुळूकेसाठी जीव तगमगत होता. वारा अजिबात नव्हता, आकाशात ढगही नव्हते. संपूर्ण आकाश निरभ्र आणि पारदर्शी काळोखे होते, त्यात असंख्य, पण अस्पष्ट दिसणारे तारे मंदपणे चमकत होते. खेड्यात दिवे लुकलुकत होते. जवळच्या झगमगत्या खाणावळीतून लोकांचा बेसूर गोंगाट ऐकू येत होता. त्यात याकोवचा आवाज ओळखल्याचा मला भास झाला. काहीवेळा तेथून जोरदार हशा उमटत होता. मी छोट्या खिडकीपाशी गेलो आणि तावदानाला चेहरा लावला. अत्यंत निरुत्साही, पण वेगळे आणि जिवंत दृश्य मला दिसले. सगळे झिंगले होते—याकोव-पासून सगळे. छाती उघडी टाकून तो बाकड्यावर बसला होता, दाट आवाजात धीट नृत्यगीत म्हणत होता, गिटारच्या तारा मंद आळशी-पणाने छेडत होता. त्याच्या भयानक फिकट चेहऱ्यावर ओलसर केसांच्या बटा विखुरल्या होत्या. खोलीच्या मध्यभागी पूर्णपणे "कामातून गेलेला"-चक्रम राखाडी झगेवाल्या शेतकऱ्याभोवती कोटाविना नाचत होता. शेतकरी मोठ्या कष्टाने पाय आपटून ताल देत होता आणि विस्कटल्या दाढीतून अर्थशून्य हसत होता. अधूनमधून हात हलवून जणू तो म्हणत होता: "कुठं गेला!" त्याचा चेहरा अत्यंत विचित्र दिसत होता. त्याने भुवया कितीही उंचावल्या, तरी त्याच्या जाड पापण्या मुळीच वर होत नव्हत्या; त्याच्या जेमतेम दिसणाऱ्या, मंद, दुबळ्या डोळ्यांवर त्या पडून होत्या. पूर्णपणे झिंगलेल्या अशा सुरेख अवस्थेत तो होता की, जवळून जाणाऱ्या प्रत्येकाने त्याला पाहून म्हटले असते: "छान, बंधू,

छान झिंगला आहेस!" खेकड्याप्रमाणे लालभडक बनलेला मिचमिच्या नाकपुड्या फुगवून एका कोपऱ्यात छद्मी हसत होता. फक्त निकोलाय इवानिच, आदर्श खाणावळवाल्याला साजेलशा रीतीने स्वत:चा थंडपणा कायम राखून होता. खोलीत अनेक नव्या चेहऱ्यांची गर्दी दिसत होती. पण जंगली-मालक तेथे दिसत नव्हता.

मी मागे वळलो आणि कोलोतोवका ज्या टेकडीवर वसले होते, त्या टेकडीच्या उतारावरून झपझप चालू लागलो. पायथ्याशी रुंद मैदान पसरलेले आहे. सायंकालीन धुक्याच्या लाटांमध्ये बुडाल्यानंतर ते अधिकच मोठे भासते आणि काळोख्या आकाशात मिसळून जाते. दरीलगतच्या रस्त्याने लांब ढांगा टाकीत मी जात असताना अचानक दूर मैदानातून एका मुलाचा स्पष्ट आवाज ऐकू आला: "आंत्रोपका! आंत्रोपका... आ... आ..!" तो आत्यंतिक निराशेने, रडव्या आवाजात ओरडत होता, शेवटचा स्वर लांबवीत होता.

काही क्षण तो गप्प झाला. मग पुन्हा ओरडू लागला. स्तब्ध, किंचित पेंगुळल्या वातावरणात त्याचा आवाज स्पष्ट घुमत होता. निदान तीस वेळा त्याने आंत्रोपका ह्या नावाचा ओरडून उच्चार केला आणि अचानक मैदानाच्या विरुद्ध टोकाकडून, जणू दुसऱ्या जगामधून, एक जेमतेम ऐकू येणारे उत्तर उमटले:

"का... आ... य?"

मुलाचा आवाज तात्काळ आनंदाने ओरडला:

"इकडं ये, सैताना... आ.. आ!"

"क.. शा.. ला...?" खूप वेळ थांबून त्याने विचारले.

"कारण बाबा तुला झोडपून काढणार आहेत...!" पहिला आवाज घाईघाईने म्हणाला.

दुसरा आवाज परत उमटला नाही आणि मुलगा परत आंत्रोपकाच्या नावाने ओरडू लागला. त्याच्या आरोळ्या अधिक मंदपणे आणि कमी कमी प्रमाणात माझ्या कानांपर्यंत तरंगत येत असतानाच पूर्ण काळोख पडला आणि कोलोतोवकापासून चार वेर्स्ता अंतरावर असलेल्या माझ्या खेड्याला वेढा घालणाऱ्या जंगलाच्या कोपऱ्याशी मी वळलो...

"आंत्रोपका... आ... आ!" रात्रीच्या सावल्यांनी भरलेल्या वातावरणात तो आवाज अद्याप घुमत होता.

१८५०

मिखायल साल्तीकोव-श्चेद्रिन

एका शेतकऱ्याने दोन जनरलना कसे खाऊ घातले त्याची गोष्ट

मिखायल साल्तीकोव-श्चेद्रिन (१८२६–१८८९)– १९ व्या शतकातील एक नामवंत लेखक-उपहासकार. "गोगोल यांचे वारस" असे त्यांना सार्थपणे म्हणण्यात येते.

श्चेद्रिन यांचा जन्म व त्यांचे संगोपन जमीनदार कुटुंबात झाले. स्थानिक उमरावांचे जीवन आणि रीतीरिवाज लेखकाच्या अनेक पुस्तकांचे विषय बनले.

अलेक्सान्द्रोवस्की जिम्नाशियममधून शिक्षण पूर्ण केल्यानंतर (त्सारस्कोये सेलोमधील जिम्नाशियम – रशियातील एक उत्कृष्ट शिक्षणसंस्था – पूष्कीन यांचे शिक्षण येथेच झाले होते), लष्करी चॅन्सेलरीत श्चेद्रिन नोकरी करू लागले. ह्याच काळात क्रांतिकारक विचारांच्या तरुणांचा त्यांना सहवास लाभला, फ्रान्समधून रशियात आलेल्या मनोराज्यवादी समाजवादाच्या विचारांनी ते धुंद बनले. समाजरचनेवर कडक टीका करणाऱ्या 'गडबडलेला मामला' (१८४८) नामक कादंबरिकेच्या प्रकाशनाबद्दल श्चेद्रिन यांना व्यातका गावी हद्दपार करण्यात आले. तेथे त्यांना सुमारे आठ वर्षे घालवावी लागली.

हद्दपारीहून परत आल्यानंतर देशाच्या सामाजिक जीवनात लेखक हिरीरीने भाग घेऊ लागला: सरकारी पदावर राहून जनतेची सेवा करण्याचा, लाचलुचपत आणि अफरातफर यांच्या विरुद्ध संघर्ष करण्याचा, हक्कविहीन गरीबांचे हितसंबंध राखण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण श्चेद्रिन यांच्या साहित्यनिर्मितीने त्याहून कितीतरी पटींनी मोठा आवाज उठविला.

झारकालीन रशियातील नोकरशाही यंत्रणेचे आणि ठाम कार्य करण्यास नालायक ठरलेल्या उदारमतवादी बुद्धिजीवी वर्गाचे उपहासात्मक चित्रण करणारी श्चेद्रिन यांची पुस्तके सर्वोत्तम ठरली: 'प्रांतिक चित्रणे' (१८५६-५७), 'एका शहराची कथा' (१८६९, १८८२-८६). 'परीकथा'मध्ये लेखकाच्या सामाजिक-राजकीय विचारांचे विशेष ठळक दर्शन घडले.

कोणे एके काळी रहात होते दोन जनरल. ते दोघेही एवढ्या चंचल वृत्तीचे होते की, लौकरच काही समजायच्या आत एका निर्जन बेटावर जाऊन पोहोचले.

जनरलांनी सर्व आयुष्यभर कुठल्यातरी नोंदणी-कचेरीत नोकरी केली होती. तेथेच त्यांचा जन्म झाला, त्यांचे संगोपन झाले, ते म्हातारे बनले आणि साहजिकच त्यांना काहीही समजत नव्हते. "खात्री देतो की,..." ह्या शब्दांशिवाय दुसरे शब्दसुद्धा त्यांना माहीत नव्हते.

काही काळानंतर, नोंदणी-कचेरीचा निरुपयोगीपणा ध्यानात घेऊन ती बंद करण्यात आली व जनरलांना मुक्त करण्यात आले. नोकरी नाहीशी झाल्यानंतर ते पीटरबुर्गला आले व पोद्याचेस्काया रस्त्यावर त्यांनी वेगवेगळी बिऱ्हाडे थाटली; प्रत्येकापाशी एक स्वयंपाकीण होती व त्यांना पेन्शन मिळत होती. पण अचानक ते निर्जन बेटावर दाखल झाल्याचे त्यांना आढळले. झोपेतून जागे होऊन पाहतात: दोघे एकाच पांघरुणाखाली झोपलेले. अर्थात प्रथम त्यांना काहीच उलगडा झाला नाही व जणू काही विशेष घडले नाही अशा थाटात ते गप्पा मारू लागले.

"महामहीम, मला एक विचित्र स्वप्न पडलं..." एक जनरल म्हणाला, "मी एका निर्जन बेटावर राहतोय असं मला आढळलं..."

असे तो म्हणाला आणि एकदम उठला! दुसरा जनरलही ताडकन उठला. "देवा! हे रे काय! कुठं आहोत आम्ही?" दोघे विचित्र आवाजांमध्ये ओरडले.

आपण झोपेत नाही ह्याची खात्री करून घेण्यासाठी त्यांनी एकमेकांना

चिमटे घेतले. ते स्वप्न होते असे मानून घेण्याचा त्यांनी खूप यत्न केला, तरी शेवटी दु:खद वस्तुस्थिती स्वीकारणे त्यांना भाग पडले.

त्यांच्यासमोर एका बाजूला समुद्र पसरला होता, दुसऱ्या बाजूला जमिनीचा छोटा तुकडा होता आणि त्यापलिकडे पुन्हा अथांग समुद्र पसरला होता. नोंदणी-कचेरी बंद झाल्यानंतर प्रथमच जनरल रडले.

त्यांनी एकमेकांकडे न्याहाळून पाहिले आणि त्यांच्या ध्यानात आले की, ते रात्रीच्या पोषाखांमध्ये होते व प्रत्येकाच्या गळ्यात पदक लटकत होते.

"आता कॉफी प्यायला मिळाली तर किती छान होईल!" एक जनरल उसासा टाकीत म्हणाला, पण एवढ्यात त्याला आठवण झाली की, त्याच्या बाबतीत एक अश्रुत क्रूर थट्टा घडली होती व तो दुसऱ्यांदा रडला.

"आता आपण काय करायचं?" रडत रडत तो पुढे म्हणाला, "आत्ताचा अहवाल लिहून काढला, तर त्यापासून काय फायदा?"

"असं करू," दुसरा जनरल उत्तरला, "तुम्ही, महामहीम, पूर्वेला जा आणि मी पश्चिमेला जातो. संध्याकाळी परत ह्याच जागी भेटू; कदाचित काहीतरी सापडेल."

पूर्व आणि पश्चिम दिशा कुठे होत्या हे दोघे शोधू लागले. त्यांचा मुख्य साहेब एकदा काय म्हणाला होता ते त्यांना आठवले: "जर पूर्व दिशा शोधायची असेल तर उत्तरेकडे तोंड करून उभा रहा, म्हणजे उजव्या हाताला पूर्व सापडेल." मग ते उत्तर दिशा शोधू लागले, वेगवेगळ्या रीतींनी त्यांनी उभे राहून पाहिले, पण सबंध आयुष्य नोंदणी-कचेरीत त्यांनी नोकरी केली होती, त्यामुळे त्यांना काहीही सापडले नाही.

"असं करा महामहीम: तुम्ही उजवीकडं जा आणि मी डावीकडं जातो. असं करणं उत्तम ठरेल!" एक जनरल म्हणाला. त्याने नोंदणी-कचेरीशिवाय सैनिकांच्या अनाथ मुलांच्या शाळेत हस्ताक्षराच्या मास्तराची नोकरी केली होती, त्यामुळे तो जरा जास्त बुद्धिमान होता.

बोलल्याप्रमाणे ते तात्काळ वागले. एक जनरल उजवीकडे गेला आणि त्याला दिसले: झाडे उभी होती आणि झाडांवर वेगवेगळी फळे.

निदान एक तरी सफरचंद खावे असे जनरलला वाटले, पण सगळी फळे खूप उंचावर होती, झाडावर चढणे आवश्यक होते. त्याने झाडावर चढण्याचा प्रयत्न केला, पण सदरा फाटण्यापलिकडे पदरी दुसरे काही पडले नाही. जनरल चालत एका ओढ्यापाशी आला. पाहतो: तेथे भरपूर मासे होते, अगदी फोन्तान्कावरल्या तळ्यातळ्याप्रमाणे.

"माझ्या पोद्याचेस्कायावरल्या घरात असे मासे मिळाले तर किती छान होईल!" जनरलच्या मनात विचार आला आणि त्याच्या तोंडाला पाणी सुटले.

जनरल रानात गेला. तेथे ग्राऊज पक्षी शीळ घालत होते, तीतर बागडत होते, ससे पळत होते.

"देवा! किती भरपूर आहेत खायला!" जनरल भुकेने व्याकुळ होत म्हणाला.

पण काही करणे शक्य न झाल्यामुळे रिकाम्या हातांनी ठरल्या जागी परतणे भाग पडले. तो परत आला, तेव्हा दुसरा जनरल आधीच वाट पहात उभा होता.

"मग काय, महामहीम, काही सापडलं?"

"होय, सापडला हा जुना अंक 'मस्कोवस्कीये वेदोमोस्ती'चा, दुसरं काही नाही."

जनरल परत झोपले, पण भुकेपायी झोप येईना. कधी विचार सतावायचा की, त्यांच्यासाठी पेन्शन कोण घेईल, तर कधी आठवण व्हायची दिवसभरात पाहिलेल्या फळांची, मासळीची, ग्राऊजची, तीतरांची, सशांची.

"महामहीम, कुणाला कल्पना असेल की, माणसाचं खाद्य सर्वप्रथम स्वरूपात उडतं, पोहतं आणि झाडांवर वाढतं?" एक जनरल म्हणाला.

"होय," दुसरा जनरल उत्तरला, "मी कबूल करतो की, सकाळी कॉफीबरोबर देतात त्याच स्वरूपात बनपाव जन्मतात असं मला ह्या क्षणापर्यंत वाटत होतं!"

"ह्याचा अर्थ जर कुणाला तीतर खायची इच्छा झाली, तर आधी तीतर पकडला पाहिजे, ठार मारला पाहिजे, त्याची पिसं उपटून काढली पाहिजेत, त्याला भाजलं पाहिजे... पण हे सगळं कसं करायचं?"

"हे सगळं कसं करायचं?" दुसरा जनरल अगदी प्रतिध्वनी उमट-ल्याप्रमाणे बोलला.

ते गप्प झाले व झोपण्याचा प्रयत्न करू लागले. पण भुकेने त्यांची झोप पार पळवली. ग्राऊज, पाणकोंबडे, डुकरांची पिले त्यांच्या डोळयां-समोर नाचत होती – रसदार, हलका लाल रंग आलेली, काकडया, लोणची व कोशिंबिरींसकट!

"मी आता स्वतःचा बूटसुद्धा खाईन!" एक जनरल म्हणाला.

"खूप काळ वापरलेले हातमोजेसुद्धा चांगले असतात!" दुसऱ्या जनरलने उसासा टाकत म्हटले.

अचानक दोघा जनरलांनी एकमेकांकडे पाहिले: त्यांच्या डोळयांमध्ये खुनशी चमक उमटली होती, दात करकरा वाजत होते, छातींमधून गुरकावण्याचे आवाज येत होते. ते दोघे एकमेकांच्या दिशेने हळू हळू सरपटत जाऊ लागले व निमिषार्धात एकमेकांना भिडले. सदऱ्यांचे तुकडे सर्वत्र उधळले, आरोळया आणि फिस्कारणे घुमू लागले. हस्ताक्षराचा मास्तर असलेल्या जनरलने त्याच्या साथीदाराच्या पदकाचा चावा घेतला व ते तात्काळ गिळून टाकले. पण गळणाऱ्या रक्ताला पाहताच ते का-हीसे भानावर आले.

"कमाल आहे!" दोघे एकदम म्हणाले. "जर असंच वागत राहि-लो, तर एकमेकांना खाऊन टाकू! आणि आपण इथं कसे काय आलो? आपली अशी क्रूर थट्टा कुणी केली?"

"महामहीम, काहीतरी संभाषण चालू ठेवून आपण मन दुसरीकडं गुंतवलं पाहिजे, नाही तर इथं खून पडतील!" एका जनरलने सुचविले.

"सुरू करा!" दुसरा जनरल उत्तरला.

"तुम्हाला काय वाटतं, सूर्य प्रथम उगवतो आणि नंतर मावळतो कशामुळं, त्याउलट का घडत नाही?"

"तुम्ही फार विचित्र माणूस आहात, महामहीम. प्रथम तुम्ही झो-पेतून जागे होता, मग कचेरीत जाता, तिथं लिहिता, नंतर झोपता, होय ना?"

"पण हा क्रम का बदलू नये? प्रथम झोपतो, वेगवेगळी स्वप्नं पाहतो आणि मग उठतो?"

"हूं... होय... मी कबूल करतो की, कचेरीत काम करताना मनात नेहमी यायचं : आता सकाळ आहे, मग दुपार होईल, मग जेवण देतील आणि झोपायची वेळ होईल!"

पण जेवणाचा उल्लेख होताच दोघांनाही निराशेने घेरले आणि संभाषणाला खीळ पडली.

"एका डॉक्टरकडून मी ऐकलं होतं की, माणूस खूप काळपर्यंत स्वतःच्या रसांवर जगू शकतो," एका जनरलने परत संभाषण सुरू केले.

"कसं काय?"

"असंच. स्वतःचे रस बहुधा दुसरे रस निर्माण करतात आणि ते पुढं आणखी नवे रस निर्माण करतात आणि हे चक्र रस संपेपर्यंत थांबत नाही."

"रस संपल्यावर काय करायचं?"

"तेव्हा काहीतरी अन्न खाल्लं पाहिजे..."

"थू:!"

थोडक्यात, जनरलांनी कोणत्याही विषयावर संभाषण सुरू केले, तरी अन्नाची आठवण काढण्यावर संभाषणाचा ओघ सतत वळायचा व त्यामुळे भूक आणखीच खवळायची. त्यांनी संभाषणे थांबविली आणि 'मस्कोवस्कीये वेदोमोस्ती'च्या सापडलेल्या अंकाची आठवण होताच, ते वर्तमानपत्र आधाशीपणे वाचू लागले.

"काल," एक जनरल कापऱ्या आवाजात वाचू लागला, "आमच्या प्राचीन राजधानीच्या सन्माननीय प्रमुखांनी अधिकृत मेजवानी दिली. शंभर लोकांसाठी टेबल शानदार सजविले होते. ह्या मेजवानीच्या स्थळी सर्व देशांची पक्वान्ने भेटीला एकत्र जमल्याप्रमाणे भासली. इथे शेक्स्नाचा सोनेरी मासा होता, कॉकेशसच्या जंगलातील तीतर होते, आणि आमच्या उत्तरेत फेब्रुवारीत दुर्मीळ दिसणारी स्ट्रॉबेरीची फळे होती..."

"थू:, च्यायला! काय हो महामहीम, दुसरा विषय सापडला नाही?" दुसरा जनरल निराशेने खेकसला आणि साथीदाराकडून वर्तमानपत्र खेचून घेऊन पुढील मजकूर त्याने वाचला:

"तूलाहून लिहितात—कालच्या तारखेला, ऊपा नदीत स्टर्जन मासा

सापडल्याबद्दल (शहरातील सर्वांत जुन्या रहिवाशालासुद्धा ही घटना आठवत नाही, विशेषत: स्टर्जन म्हणजे स्थानिक पोलीस ब. असल्याचे ओळखल्यापासून), स्थानिक क्लबात उत्सव साजरा करण्यात आला. उत्सवमूर्तीला प्रचंड मोठ्या लाकडी बशीवर ठेवून आणण्यात आले, त्याच्या भोवती काकड्या मांडल्या होत्या व तोंडात हिरव्या सलाडचे पान कोंबले होते. मेजवानीचे संयोजक डॉ. प. यांनी प्रत्येकाला स्टर्जन-चा तुकडा मिळेल अशी खबरदारी घेतली. हरतऱ्हेच्या चटण्या चवीला होत्या..."

"अहो महामहीम, तुम्ही वाचनाचा विषय निवडण्यात सावधगिरी बाळगलेली दिसत नाही!" पहिल्या जनरलने वाचन बंद पाडले आणि वर्तमानपत्र खेचून तो वाचू लागला:

"व्यातकाहून लिहितात: एका सर्वांत जुन्या स्थानिक रहिवाशाने माशाचे सार बनविण्याची नवी रीत शोधून काढलीय: जिवंत मासा घ्यायचा, त्याला प्रथम झोडपून काढायचा; जेव्हा वेदनांपायी त्याचं यकृत मोठं होईल..."

जनरलांनी माना खाली घातल्या. त्यांची नजर जेथे पडेल तेथे अन्नाचा संबंध येत होता. त्यांचे विचार त्यांच्याविरुद्ध जणू कट करीत होते, कारण कबाबांचा विचार दूर सारण्याचा त्यांनी कितीही प्रयत्न केला; तरी कबाबांची प्रतिमा बळजबरीने त्यांच्या मन:चक्षूंसमोर उभी रहात होती.

पण अचानक हस्ताक्षर शिकविणाऱ्या जनरलला एक कल्पना सुचली...

"महामहीम, आपण जर एक शेतकरी शोधून काढला तर?" तो आनंदाने म्हणाला.

"शेतकरी? कशाला?"

"होय, एक साधा शेतकरी... साधेसुधे शेतकरी असतात त्यांपैकी एक! त्यानं आत्ता आपल्याला बनपाव दिला असता, पाखरं आणि मासळी पकडली असती!"

"हूं... शेतकरी... पण त्याला कुठून आणायचा, जेव्हा शेतकरी नाही?"

"नाही कसा शेतकरी—शेतकरी सर्वत्र असतो. फक्त त्याला शोधून काढलं पाहिजे! कदाचित तो कुठंतरी लपून बसला बसेल, काम चुकवण्यासाठी!"

ह्या विचारासरशी जनरल खूप आनंदले, उडी मारून ते उठले आणि शेतकऱ्याच्या शोधात निघाले.

खूप वेळपर्यंत ते बेटावर भटकले, पण त्यांना यश लाभले नाही. अखेर कोंड्याच्या पावाच्या व मेंढकातडीच्या उग्र दर्पाने त्यांना अचूक माग लागला. डोक्याखाली हाताची मूठ उशीला धरून झाडाखाली उताणा निजलेला एक प्रचंड देहाचा शेतकरी त्यांना सापडला. अत्यंत उघडपणे व उर्मटपणे तो कामचुकारपणा करीत असलेला दिसत होता. जनरलांच्या संतापाला सीमा उरल्या नाहीत.

"झोपतोस, आळशा!" ते त्याच्यावर तुटून पडले. "इथं दोन जनरल दोन दिवस उपासानं व्याकुळ झालेत हे तुला दिसलं नाही? ताबडतोब कामाला लाग!"

शेतकरी उठला. जनरल कडक असल्याचे त्याच्या ध्यानात आले. पळून जायचा त्याचा इरादा होता, पण त्यांनी त्याला घट्ट पकडून धरले होते.

तेव्हा तो कामाला लागला.

सर्वांत प्रथम झाडावर चढला आणि अत्यंत छान पिकलेली दहा-बारा सफरचंदे तोडून त्याने जनरलांना दिली, स्वतःसाठी मात्र एक आंबट फळ घेतले. मग जमीन खणून त्याने बटाटे काढले; त्यानंतर लाकडाच्या दोन ढलप्या एकमेकींवर घासून आग पेटविली. मग स्वतःच्या केसांचे जाळे बनवून त्यात त्याने ग्राऊज पक्षी पकडला. अखेर मोठा जाळ पेटवून त्याने एवढे विविध पदार्थ बनविले, की जनरलांच्या मनात विचार आला: "ह्या आळशाला एक घास द्यावा का?"

त्या शेतकऱ्याच्या खटपटी पाहताना जनरलांची हृदये आनंदाने उचंबळत होती. काल भुकेपायी मरता मरता ते थोडक्यात वाचले होते, ह्या गोष्टीचासुद्धा त्यांना विचार पडला. त्यांच्या मनात विचार आला: "जनरल असणं किती छान! कुठंही अडणार नाही!"

"जनरलसाहेबांनो, तुमचं समाधान झालं?" दरम्यान आळशी शेतकऱ्याने विचारले.

"होय, भल्या मित्रा, तुझी मनःपूर्वक खटपट आम्ही पाहतोय," जनरल उत्तरले.

"आता मी थोडी विश्रांती घेऊ?"

"आराम कर मित्रा, मात्र त्याआधी एक दोर वळून दे."

शेतकऱ्याने ताबडतोब जंगली अंबाडी गोळा केली, पाण्यात भिजवली, तिला चोपून पायांखाली तुडविली आणि संध्याकाळपर्यंत दोर तयार झाला. जनरलांनी ह्या दोराने शेतकऱ्याला झाडाशी बांधून ठेवले, तो पळून जाऊ नये म्हणून, व स्वतः झोपले.

एक दिवस उलटला, दुसरा दिवस सरला; शेतकरी एवढा चपळ बनला होता की, हातांच्या ओंजळीत सार बनवू लागला. आपले जनरल अत्यंत आनंदी, छान व गुबगुबीत बनले. ते म्हणू लागले की, इथे त्यांना हव्या त्या सर्व गोष्टी मिळत आहेत आणि त्याचवेळी पीटरबुर्गमध्ये त्यांच्या पेन्शनींची रक्कम फुगत चालली आहे.

"महामहीम, बाबीलोनच्या मनोऱ्याची कथा खरोखरीच सत्य आहे का, अथवा नुसतीच दंतकथा?" एक जनरल दुसऱ्या जनरलला न्याहारी करताना विचारायचा.

"महामहीम, ती सत्यकथा होती असं मला वाटतं, अन्यथा जगात भिन्न भाषा आहेत ह्याचा खुलासा कसा करायचा?"

"आणि महाप्रलय घडला हे खरं?"

"आणि महाप्रलय घडला होता, कारण महाप्रलयापूर्वीच्या जनावरांच्या अस्तित्वाचा खुलासा नाही तर कसा करायचा? शिवाय 'मस्कोवस्कीये वेदोमोस्ती' म्हणते..."

"वर्तमानपत्र आता वाचू या?"

ते अंक शोधून काढीत, झाडाच्या सावलीत बसत आणि अथपासून इतिपर्यंत सर्व वर्तमानपत्र वाचून काढीत—मॉस्कोत कशा मेजवान्या झाल्या, तूलामध्ये, पेन्झामध्ये अथवा ऱ्याझानमध्ये कशी जेवणे झाली... आणि त्यांना मुळीच मळमळत नव्हते.

थोडक्यात, लौकरच जनरलांना कंटाळा आला. पीटरबुर्गमधल्या

त्यांच्या स्वयंपाकीणींच्या त्यांना वारंवार आठवणी येत व ते गुपचूप रडतसुद्धा.

"महामहीम, आता पोद्याचेस्कायावर काय चाललं असेल?" एक जनरल दुसऱ्याला विचारायचा.

"नका बोलू, महामहीम! काळजात कळ उमटते!" दुसरा जनरल उत्तर द्यायचा.

"इथं छानच आहे–त्याबद्दल प्रश्न नाही! पण तरीही, शेळ्यांविना बकऱ्यानं राहणं काही खरं नाही! गणवेषांबद्दलही वाईट वाटतं!"

"वाईट वाटण्याचं वर्णन करणं अशक्य! विशेषतः चौथ्या श्रेणीच्या. नुसती फीत पाहून चक्कर येते!"

आणि शेतकऱ्याचे मन वळविण्याचा ते प्रयत्न करू लागले; त्यांना पोद्याचेस्कायाला घेऊन जाण्याचा आग्रह करू लागले. आणि काय आश्चर्य! शेतकऱ्याला पोद्याचेस्काया ठाऊक होता, तो तिथे राहिला होता, मध-बीयर प्यायला होता, पण मिशांवरून ती ओघळली होती, तोंडात मात्र पडली नव्हती.

"आम्हीसुद्धा पोद्याचेस्कायाचे जनरल आहोत!" जनरल आनंदून म्हणाले.

"तुम्ही जर पाहिलं असेल–दोरीच्या टांगलेल्या पाळण्यात उभा राहून घराची भिंत रंगवणारा किंवा माशीप्रमाणं घराच्या छपरावर रांगणारा... तो मी होतो!" शेतकरी म्हणाला.

आणि जनरलांच्या दयाळूपणाबद्दल, गरीब माणसाकडून सेवा करवून घेण्याचा मान दिल्याबद्दल, त्यांचे आभार मानायला शब्द शोधत शेतकरी डोके खाजवू लागला. त्याने गलबत बांधले–म्हणजे गलबत नव्हे, पण महासागर आणि सागर पार करून थेट पोद्याचेस्कायापर्यंत पोहोचेल असे जहाज बांधले.

"लक्षात ठेव, हरामखोरा, आम्हाला बुडवू नको!" हेलकावणाऱ्या लाटांकडे पहात जनरल ओरडले.

"शांत रहा, जनरलसाहेबांनो, तुम्ही पहिले नव्हेत!" शेतकरी उत्तरला आणि प्रवासाची तयारी करू लागला.

शेतकऱ्याने हंसांची मऊ पिसे गोळा केली आणि होडीच्या तळाशी

त्यांना पसरले. मग जनरलांना होडीत बसविले, देवापाशी आशीर्वाद मागितले आणि जलप्रवासाला तो निघाला. वादळांमध्ये आणि तुफानां-मध्ये जनरलांची भीतीने खूप गाळण उडाली, शेतकऱ्याला त्यांनी नाही ती दूषणे दिली – लेखणीने त्यांचे वर्णन लिहिणे शक्य नाही, कथन करणे शक्य नाही! पण शेतकरी सतत होडी वल्हवीत राहिला, जनरलांना मासे खाऊ घालत राहिला.

शेवटी नेवा नदी दृष्टीला पडली, येकातेरीनीन्स्की कालवा दिसला, पोद्याचेस्काया आले! जनरलांना आनंदी, गुबगुबीत बनलेले पाहून स्वयं-पाकिणी आ वासून बघत राहिल्या. जनरलांनी कॉफी घेतली, मऊ बन-पाव खाल्ले, स्वतःचे गणवेष चढविले. मग ते खजिन्याकडे गेले आणि किती पैशाचे ढीग त्यांनी तेथे गोळा केले – कोणतीही कथा सांगू शकणार नाही, लेखणी वर्णन करू शकणार नाही!

मात्र शेतकऱ्याचा त्यांना विसर पडला नाही. त्यांनी त्याला वोद-काचा ग्लास आणि चांदीचे नाणे दिले: मजा कर, शेतकऱ्या!

१८६९

व्लादीमिर कोरोलेन्को

जगावेगळी

१८८० सालानंतरची कथा

व्लादीमिर कोरोलेन्को (१८५३–१९२१)–ह्या थोर लेखकाने आपले साहित्यगुण सक्रिय सामाजिक कार्याच्या कारणी लावले.

कोरोलेन्को यांचे वडील तालुक्याच्या गावी न्यायाधीश होते. युक्रेनमधील एका छोटया गावात नोकरी करूनही त्यांनी बहुविध सांस्कृतिक छंद जोपासले होते व अत्यंत प्रामाणिकपणे जीवन व्यतीत केले होते. त्यांच्या मृत्यूनंतर कुटुंब संपूर्ण निराधार बनले आणि वयाच्या १५व्या वर्षी कोरोलेन्को यांना स्वानुभवाने दारिद्र्याचा अर्थ समजला. हा तरुण मॉस्कोला आला व पेत्रोवस्की कृषि आणि वन प्रबोधिनीत दाखल झाला. १८७६ साली क्रांतिकारक विद्यार्थी चळवळीत सक्रिय भाग घेतल्याबद्दल कोरोलेन्कोना अटक झाली आणि मॉस्कोतून हाकलून देण्यात आले. १८७९ साली क्रांतिकारक साहित्य छापून त्याचे वाटप केल्याबद्दल त्यांना पुन्हा अटक झाली व हद्दपार करण्यात आले. त्याच वर्षी त्यांची पहिली कथा प्रसिद्ध झाली–'संशोधकाच्या जीवनातील प्रसंग.'

१ मार्च १८८१ रोजी नरोदवाद्यांनी दुसऱ्या अलेक्सांद्रचा खून केला. नव्या झारशी निष्ठा व्यक्त करणारी खास लेखी निवेदने हद्दपारीच्या कैद्यांकडून मागण्यात आली. कोरोलेन्को यांनी असे निष्ठापत्र लिहून देण्याचे नाकारले.

तिसऱ्या अलेक्सांद्रशी निष्ठा व्यक्त करण्यास नकार दिल्याबद्दल कोरोलेन्कोना परत अटक झाली व अत्यंत धोकेबाज गुन्हेगार म्हणून सैबेरियात पाठविण्यात आले. तेथे ते तीन वर्षे राहिले. सैबेरियात त्यांच्या उत्तम कथा लिहिल्या गेल्या. पण ह्या कथा प्रसिद्ध करण्याची लेखकाला परवानगी नव्हती.

१

"गाडीवान, टप्प्याचं स्टेशन केव्हा येणार?"

"अजून लांब आहे. बर्फाच्या वादळापूर्वी तिथवर पोहोचू असं वाटत नाही. पहा, बर्फ कसं भिरभिरतंय, उत्तरेचं वारं येतंय!"

होय, बर्फाच्या वादळाआधी मुक्कामाला पोहोचणार नाही हे दिसत होते. संध्याकाळच्या सुमाराला थंडी वाढते. धावपट्ट्यांखाली बर्फ चुरडत होते, हिवाळी वारे—उत्तरेचे—काळसर जंगलात घुमत होते, देवदारांच्या फांद्या अरुंद जंगलवाटेत आडव्या येत होत्या आणि लौकर होणाऱ्या हिवाळी संध्येच्या काळोखात भयानकपणे डोलत होत्या.

थंडी वाजत होती आणि त्रासदायक वाटत होते. घसरगाडी ऐसपैस नव्हती, कुशीत रेटत होती; त्यात भरीला सोबतीच्या पोलीसांच्या तलवारींची व रिवॉल्वरांची अडचण होत होती. घसरगाडीची घंटा रटाळ एकसूरी गाणे गात होती, वाढत्या हिमवादळाच्या सुराला सूर लावत होती.

सुदैवाने, घुमणाऱ्या जंगलाच्या टोकाशी टप्प्याच्या स्टेशनाचा एकुलता एक दिवा लुकलुकू लागला.

माझ्या सोबतीच्या दोन पोलीसांनी स्वतःच्या शस्त्रांचा भरपूर खणखणाट करीत काळपट, अतितापविलेल्या, धुराची काजळी धरलेल्या खोपटाच्या दाराजवळचे बर्फ झाडून काढले. खोपट दरिद्री आणि उदास होते. मालकिणीने धूर ओकणारा ढलपा चिमटयात ठेवला.

"मालकीणबाई, तुझ्यापाशी काही खायला आहे?"

"आमच्याकडं काहीही नाही..."

11—1985

"मासे? नदी जवळ आहे इथून."

"होते मासे, पण पाणमांजरांनी सगळे खाल्ले."

"तर मग, बटाटे..."

"काय सांगू सायबांनो! यंदा आमचा सगळा बटाटा गोठला अति-थंडीनं!"

काही उपाय नव्हता; आश्चर्य म्हणजे समोवार घेऊन आली. चहा पिऊन अंगात ऊब आणली. खोपटाच्या मालकिणीने टोपलीतून पाव आणि कांदे आणले. बाहेर वादळाचा जोर वाढला होता, खिडकीवर भुकटीसारख्या हिमाचे तडाखे बसत होते आणि मधून मधून दिव्याची वात थरथर कापत होती.

"आता तुम्ही पुढच्या प्रवासाला जाऊ नका, इथंच रात्रीचा मुक्काम करा!" म्हातारी म्हणाली.

"ठीक आहे, राहतो इथंच. साहेब, तुम्हाला कुठंच जायची घाई नाही. पहा, इथला प्रदेश कसा आहे! .. तिथं आणखीच वाईट, माझ्या शब्दावर विश्वास ठेवा," एक पोलीस म्हणाला.

खोपटात पूर्ण शांतता होती. मालकिणीनेसुद्धा स्वतःचा हातमाग बाजूला ठेवला आणि दिवा मालवून ती झोपली. अंधाराचे आणि मौनाचे साम्राज्य पसरले, फक्त घोंघावणारा वारा दारावर थपडा मारीत होता.

मला झोप येत नव्हती. वादळाच्या घोंघावण्यात मनामध्ये एकाहून एक भयानक विचार भिरभिरत होते.

"झोप लागत नाही वाटतं, साहेब?" त्याच पोलीसाने विचारले. हा वरिष्ठ अंमलदार खूप चांगला होता, प्रसन्न आणि बुद्धिमान चेहऱ्याचा होता, स्वतःच्या कामाची चांगली जाण असलेला होता आणि त्यामुळेच कर्मठ नव्हता. प्रवासात त्याने अनावश्यक अडचणींना आणि औपचारिकतांना टाळले होते.

"होय, नाही लागत झोप."

आणखी काही काळ मौनात सरला, पण मला चाहूल लागत होती की, माझा शेजारी झोपला नव्हता. त्याला झोप येत नव्हती, त्याच्या डोक्यात कसल्यातरी विचारांचे काहूर माजले होते, ह्याची जाणीव मला होत होती. दुसरा पोलीस, तरुण "कनिष्ठ" अंमलदार, मात्र गाढ

झोपला होता. निरोगी, पण खूप थकलेल्या माणसाची ती झोप होती. अधूनमधून झोपेत बरळत होता.

"तुमचं मला आश्चर्य वाटतं," परत त्या वरिष्ठाचा संथ, घनगंभीर आवाज ऐकू आला, "तरुण माणसं, चांगल्या घरची, शिकलेली, पण स्वतःचं आयुष्य असं का घालवता..."

"कसं?"

"अहो, काय साहेब! आम्हाला काय समजत नाही?.. चांगलं ठाऊक आहे, तुमच्या लहानपणापासून असल्या प्रकारच्या आयुष्याची तुम्हाला कधी सवय नाही..."

"तुमच्या बोलण्याला अर्थ नाही... त्या आयुष्याला विसरण्याचाही काळ होता..."

"गंमत वाटते ह्यात?" शंकेच्या स्वरात तो विचारतो.

"तुम्हाला गंमत वाटते?.."

मौन. गावरीलोव (माझ्या संभाषणकर्त्याला आपण हे नाव ठेवू), कसलातरी विचार करण्यात गुंतला होता.

"नाही साहेब, आम्हाला गंमत वाटत नाही. माझ्या शब्दावर विश्वास ठेवा: कधी कधी वाटतं, जगाकडं पाहूच नये... कशामुळं असं वाटतं, माहीत नाही. पण कधी कधी वाटतं–धारदार सुरा घ्यावा आणि संपवावं स्वतःचं आयुष्य!"

"नोकरी कठीण जातेय?"

"नोकरी ही नोकरीच... अर्थात ती काही मौज नव्हे. शिवाय कबूल करतो, वरिष्ठ फार कडक आहेत. पण ही कारणं नव्हेत..."

"मग कशामुळं तसं वाटतं?"

"कुणाला माहीत?"

परत मौन.

"नोकरी म्हणजे काय? स्वतः शिस्तशीर वागलं म्हणजे सगळं ठीक. त्यात आता लौकरच मी घरी परतेन. मी रंगरूट आहे, लौकरच मुदत पुरी होईल. वरिष्ठ म्हणताहेत: 'रहा, गावरीलोव, खेड्यात जाऊन तू काय करणार? तुझं रेकॉर्ड चांगलं आहे...'"

"मग, राहणार?"

"नाही. एवढं खरं की, घरीसुद्धा... शेतकरी कामाची सवय सुटलीय... जेवणाचीसुद्धा. रांगडी राहणी आता मानवायची नाही..."

"मग कशात अडलंय?"

त्याने विचार केला आणि नंतर तो म्हणाला:

"साहेब, जर तुम्हाला कंटाळा येत नसेल, तर एक कहाणी सांगतो... माझ्या आयुष्यात घडलेला प्रसंग आहे..."

"सांगा..."

२

"१८७४ साली थेट रंगरूटांमधून घोडदळात नोकरीला दाखल झालो. नोकरी चांगली करत होतो असं म्हणायला हरकत नाही, अगदी मनापासून. विशेष करून कधी कवायतींवर, तर कधी थिएटरांवर मी असायचा—ते काम कसं असतं तुम्हाला माहीतच आहे. लिहा-वाचायला शिकलो होतो आणि वरिष्ठ माझी दखल घेत होते. आमचे मेजर माझे गाववाले होते. माझी धडपड बघून एक दिवस त्यांनी मला बोलावून घेतलं आणि म्हणाले: 'गावरीलोव, मी तुला सार्जंट बनवतो... तू कधी हद्दपारीवरच्या लोकांना घेऊन गेला आहेस?' मी म्हणालो—'कधीही नाही, साहेब.' तेव्हा म्हणाले: 'ठीक आहे, पुढच्या वेळी तुझी कनिष्ठ अंमलदार म्हणून नेमणूक करतो—तुला अनुभव मिळावा ह्यासाठी. काम सोपं आहे.' मी म्हणालो: 'जशी आपली आज्ञा, साहेब. ते काम करायला मला आनंद वाटेल.'

"हद्दपारीच्या लोकांना घेऊन जाण्याचं काम त्यापूर्वी मी खरंच कधी केलं नव्हतं—म्हणजे तुमच्यासारख्यांना नेण्याचं. ते काम अवघड नाही हे खरं, पण सगळ्या कागदपत्रांना नीट माहीत करून घ्यावं लागतं, जागच्या जागी निर्णय घ्यावे लागतात. तर...

"आठवड्यानंतर ऑर्डर्लीनं मला आणि माझ्याबरोबर एका सार्जंट-ला मेजरसाहेबांकडं जायला सांगितलं. आम्ही हजर झालो. मेजर म्हणाले: 'तुम्हाला कामगिरीवर जायचं आहे.' त्या सार्जंटला उद्देशून म्हणाले: 'हा तुला मदतनीस. अजून कधी अशा कामगिरीवर गेलेला नाही. लक्षात ठेवा, झोपा काढू नका. तुम्ही चलाख पोरं आहात,

छानपणं काम पार पाडा. तुरुंगातून एका तरुण मुलीला तुम्ही घेऊन जायचंय, मोरोझोवा तिचं नाव. राजकीय हद्दपारीवर. हे घ्या कागदपत्र, उद्या पैसे घ्या आणि निघा!'

"सार्जंट इवानोव माझा वरिष्ठ होता आणि मी त्याचा मदतनीस— आत्ता माझ्याबरोबर दुसरा पोलीस आहे तसा. वरिष्ठापाशी सरकारी थैली देतात, पैसे आणि कागदपत्र त्याच्या हाती देतात; तो सह्या करतो, हिशेब ठेवतो आणि त्याच्याबरोबरचा सैनिक त्याला मदत करतो: कुठं निरोप घेऊन जाणं, वस्तूंवर लक्ष ठेवणं आणि इतर कामं.

"तर सकाळी उजाडता उजाडता आम्ही साहेबांच्या कचेरीतून निघालो. बघतो: माझ्या इवानोवनं एवढ्या वेळात कुठंतरी दारू ढोसली होती. स्पष्ट सांगायचं तर माणूस कामाला लायक नव्हता—आता नोकरीत खालच्या पदावर टाकलंय त्याला... साहेबलोकांच्या समोर लाळ घोटायचा, स्वतःच्या फायद्यासाठी बरोबरच्या लोकांबद्दल खोट्यानाट्या गोष्टी वरिष्ठांना सांगायचा. पण वरिष्ठांच्या नजरेआड झाला की, दुसऱ्या क्षणाला त्याचा नूर बदलायचा आणि धावायचा—दारू प्यायला!

"आम्ही तुरुंगात आलो, रीतीप्रमाणं कागदपत्र दिले आणि वाट पहात उभे राहिलो. मला कुतूहल होतं— कुठल्या तरुणीला आम्ही घेऊन जाणार होतो दूरच्या हद्दपारीवर. ह्याच मार्गावरून गेलो, फरक एवढाच की, तिला प्रांतिक शहर नेमून दिलं होतं आणि तुम्हाला तालुक्याचं गाव दिलंय, तर पहिल्या वेळी मला कुतूहल होतं: अशी राजकीय कैदी पोरगी कशी असते?

"तिचं सामान बांधून होईपर्यंत आम्ही सुमारे तासभर थांबलो; तिचं सामान म्हणजे एक छोटं गाठोडं— एक स्कर्ट आणि काही किरकोळ वस्तू. पुस्तकंही होती. आणखी काहीही नव्हतं. मी मनाशी म्हटलं— हिचे आई-बाप बहुधा गरीब असावेत. जेव्हा तिला घेऊन आले, तेव्हा बघितलं: वयानं खूपच तरुण होती, मला तर लहान मुलगी भासली. एका वेणीत बांधलेले सोनेरी केस, गाल लाल झालेले. पण नंतर मी पाहिलं—सबंध प्रवासात तिचा चेहरा अगदी फटफटीत पांढरा पडला होता. मला एकदम तिची दया आली... अर्थात मनात विचार आला... साहेबलोक माफ करा... उगीच कुणाला शिक्षा देत नाहीत... म्हणजे

हिनं काहीतरी राजकीय गुन्हा केला असावा... पण तरीसुद्धा... वाईट वाटलं, फार फार वाईट वाटलं!

"ती कपडे घालू लागली: ओव्हरकोट, रबरी बूट... तिच्या वस्तू आम्हाला दाखविण्यात आल्या–नियमानुसार. आदेशाप्रमाणं कैद्याच्या वस्तूंची आम्ही तपासणी केली पाहिजे. आम्ही तिला विचारलं: 'तुमच्या-पाशी पैसे आहेत?' एक रूबल आणि वीस कोपेक होते तिच्याजवळ. सार्जंटनं ते पैसे स्वतःपाशी ठेवले. मग तो तिला म्हणाला: 'बाई साहेब, आता मी तुमची अंगझडती घेणार."

"ती एकदम भयंकर भडकली. तिच्या डोळ्यांमधून आग पेटत होती, चेहरा आणखीच लालबुंद झाला होता. रागानं ओठ गच्च आवळले होते... आमच्याकडं तिनं नुसती नजर टाकली आणि काय सांगू: मी पुरता घाबरलो. तिच्याजवळ जायची माझी हिंमत होईना. पण सार्जंट अर्थातच झिंगलेला होता. सरळ तिच्यापाशी गेला आणि म्हणाला: 'माझं ते काम आहे. मला तसा हुकूम आहे!..'

"तिनं किंचाळी फोडली आणि इवानोवसुद्धा दोन पावलं मागं सरला. मी तिच्याकडं नजर टाकली–चेहरा पांढराफटक, रक्ताचा मागमूस नाही, डोळे गडद बनलेले आणि संतापानं नुसती धूमसत होती. पाय आपटून तावातावानं बोलत होती. पण मी कबूल करतो, ती काय बोलत होती ते मी नीट ऐकलं नाही... तुरुंगाचा वॉर्डनसुद्धा घाबरला आणि त्यानं तिला ग्लासभर पाणी आणून दिलं. 'शांत व्हा', त्यानं तिला विनंती केली, 'कृपा करून स्वतःची दया करा!' पण तिनं त्याच्यावरही सरबत्ती केली: 'रानटी आहात तुम्ही, लाळघोटे हुजरे!' आणखी असेच वाईट वाईट शब्द ती आम्हाला बोलली. काही म्हणा: वरिष्ठांविरुद्ध असं बोलणं चांगलं नाही. मनाशी म्हटलं, अरे वा, विषारी फूत्कार टाकतेय... मोठ्या घरची कारटी!

"शेवटी आम्ही तिची अंगझडती घेतली नाही. वॉर्डननं तिला शेजारच्या खोलीत नेलं आणि लौकरच एका महिला-पोलीससकट ते बाहेर आले. 'तिच्यावर काही सापडलं नाही!' वॉर्डन म्हणाला. तिनं त्याच्याकडं नजर टाकली. जणू त्याच्या तोंडावर ती त्याला हसत होती. तिच्या डोळ्यांमध्ये संताप मावत नव्हता. इवानोवला अर्थातच त्या अव-

ंथेत समुद्र गुडघाभर खोल वाटत होता. तो सारखा पुटपुटत होता: 'हे कायद्याला धरून नाही. मला हुकूम आहे!' पण वॉर्डननं त्याच्याकडं दुर्लक्ष केलं. अर्थात त्याला समजलं होतं की, इवानोव झिंगलेला होता. झिंगलेल्या माणसावर कोण विश्वास ठेवील!

"आम्ही निघालो. शहरामधून जात होतो—ती बग्गीच्या खिडकी-मधून बाहेर पहात होती. बहुधा ओळखीच्या लोकांना बघू पहात होती किंवा शहराचा निरोप घेत होती. पण इवानोवनं खिडकीचे पडदे खाली पाडले आणि खिडकी बंद केली. ती कोपऱ्यात अंग चोरून बसली आणि आमच्याकडं पहायचं टाळू लागली. मी कबूल करतो, मला ते सहन झालं नाही: जणू काही मला स्वतःला बाहेर पहायचं होतं असा बहाणा करून मी एका पडद्याचा कोपरा अशा रीतीनं वर उचलला, की तिला बाहेरचा देखावा दिसावा... पण तिनं मुळीच पाहिलं नाही. ओठ चावत, संतापानं फणफणत ती कोपऱ्यात बसून राहिली... मला वाटलं, आता तिच्या ओठांमधून रक्त ठिपकणार.

"आगगाडीचा प्रवास सुरू झाला. त्या दिवशी हवा छान पडली होती—शरदाचा मोसम होता, सप्टेंबर महिना. ऊन पडलं होतं, शरदाचा ताजा वारा वहात होता. तिनं डब्याची खिडकी उघडली आणि वारा हातांमध्ये धरायचा प्रयत्न करीत ती बसली. पण हुकूमाप्रमाणं खिडकी उघडी ठेवायला परवानगी नाही आणि माझा इवानोव तर डब्यात शिर-ताच घोरायला लागला होता. खिडकी बंद कर असं तिला सांगायचा मला धीर होईना. मग धिटाई करून तिच्यापाशी गेलो आणि म्हणालो: 'बाईसाहेब, खिडकी बंद करा.' ती गप्प. जणू तिला उद्देशून बोलत नव्हते. मी तिथं तसाच थोडा वेळ उभा राहिलो आणि मग परत म्हणालो: "'थंडी बाधेल, बाईसाहेब, वारा गार आहे!'

"तिनं माझ्याकडं तोंड फिरवलं आणि डोळे विस्फारले, जणू आश्चर्य वाटल्याप्रमाणं... मला न्याहाळून म्हणाली: 'मला एकटीला राहू दे!' आणि परत खिडकीबाहेर डोकं काढून बसली. मी हात झटकला आणि तिच्यापासून दूर झालो.

"ती थोडी शांत झाल्यासारखी वाटली. तिनं खिडकी झाकली आणि अंगाभोवती ओव्हरकोट गुंडाळून ऊब आणू लागली. वारा ताजा आणि

झोंबरा होता! मग परत खिडकीपाशी बसली आणि वारा खाऊ लागली – तुरुंगात गेल्यापासून बाहेरचं जग बघायला मिळालं नव्हतं, हे दिसत होतं. आनंदी बनली, स्वत:शी स्मित करू लागली. तशा स्थितीत तिला बघण्यात फार मजा होती!... शप्पत..."

निवेदक गप्प झाला आणि विचारात गढला. मग काहीशा शरमिंद्या स्वरात पुढे बोलू लागला:

"अर्थात ह्या कामाची मला अजून सवय झाली नव्हती... पुढं अनेकांना घेऊन गेलो, सवय झाली. पण तेव्हा मला विचित्र भासलं. मनात आलं... ह्या लहानग्या पोरीला आम्ही कुठं घेऊन जातोय... आणि मग... साहेब, तुमच्यापाशी कबूल करतो, माझा निवाडा करू नका: मनात आलं, हिच्याशी लग्न करायची साहेब लोकांपाशी परवानगी मागावी... म्हणजे तिच्या डोक्यातलं हे वेड तरी मी नाहीसं करीन. तसा मी चांगला नोकरदार माणूस होतो... अर्थात तरुण बुद्धी... मूर्ख... आता समजू शकतो... तेव्हा पाद्र्यापाशी कबुली दिली होती. पाद्री म्हणाला: 'हा तुझा विचार तुला वाईटाकडं घेऊन गेला असता. कारण ती नक्कीच देवाला मानत नाही...'

"कस्त्रोमापासून त्रोयका*मधून जाणं भाग होतं. माझा इवानोव सदा झिंगलेला. खूप प्यायचा आणि डाराडूर झोपायचा. आगगाडीच्या डब्यातून हेलपटत बाहेर पडला. मनात विचार आला, हे वाईट. चुकून सरकारी पैसे कुठंतरी हरवून बसायचा. टपालगाडीत धडपडत चढला आणि ताबडतोब घोरायला लागला. त्याच्याशेजारी ती अवघडून बसली होती. त्याच्याकडं तिटकाऱ्यानं पहात होती. त्याचा स्पर्श न होईल अशा रीतीनं कोपऱ्यात अंग चोरून बसली होती. मी गाडीवानाशेजारी बसलो. प्रवासाला सुरुवात केली. उत्तरेचा वारा सुटलेला. मीसुद्धा काकडलो. ती जोरात खोकत होती, रुमाल ओठांवर दाबून धरत होती. रुमालावर मी रक्ताचे डाग पाहिले. माझ्या काळजात कुणीतरी टाचणी खुपसल्या-सारखी मला वेदना झाली. म्हणालो: 'काय हे बाईसाहेब! तुम्ही

---

* त्रोयका – रशियन धर्तीची तीन घोड्यांची गाडी – अनु.

आजारी आहात आणि अशा प्रवासाला निघालात! शरदाचे दिवस! गारठा! .. हे बरोबर नाही!'

"तिनं डोळे वर करून माझ्याकडं पाहिलं आणि परत ती आतल्या आत संतापू लागली.

"मला म्हणाली: 'तुम्ही मूर्ख आहात काय? मी माझ्या इच्छेनं जात नाही हे समजत नाही? छान! स्वतःच घेऊन जातोय आणि वर दया दाखवतोय!'

"मी म्हणालो: 'तुम्ही साहेबलोकांना सांगायचं—अशा गारठ्यातून प्रवास करण्यापेक्षा इस्पितळात निजून राहणं जास्त बरं ठरलं असतं. प्रवास फार दूरचा आहे!'

"'कुठं जाणार आहोत?' तिनं विचारलं.

"गुन्हेगारांना कुठं घेऊन जाण्याचा हुकूम आहे हे त्यांना सांगायची आम्हाला कडक मनाई असते. मी घुटमळल्याचं तिनं पाहिलं आणि तोंड फिरवलं. म्हणाली: 'नका सांगू, मी सहज विचारलं... काही बोलू नका आणि माझ्या भानगडीत नाक खुपसू नका!'

"मला सोसलं नाही. मी तिला शहराचं नाव सांगितलं आणि म्हणालो: 'तिथं जायचंय तुम्हाला! जवळ नव्हे!' तिनं ओठ आवळले, भुवया आकसल्या आणि ती गप्प बसली. मी मुंडी हलवली... 'बाईसाहेब, तुम्ही तरुण आहात,' मी म्हणालो, 'ह्याचा अर्थ अजून तुम्हाला समजत नाही!'

"मला फार दुःख झालं होतं.. राग आला होता... तिनं परत माझ्याकडं पाहिलं आणि ती म्हणाली:

"'निष्कारण तुम्ही गैरसमज करून घेत आहात. मला ह्याचा अर्थ चांगला ठाऊक आहे आणि तरीही इस्पितळात झोपायची माझी इच्छा नव्हती. धन्यवाद! त्यापेक्षा तुरुंगाबाहेर, स्वतःच्या माणसांमध्ये मरणं जास्त चांगलं. कदाचित मी आजारामधून बरीसुद्धा होईन, तेसुद्धा तुमच्या तुरुंगाच्या इस्पितळात नव्हे, तर बाहेर. वाऱ्यामुळं किंवा थंडी बाधल्यामुळं मी आजारी झालेय असं तुम्हाला वाटतं? मुळीच नाही!' 'तुमचे तिथं नातेवाईक आहेत?' **स्वतःच्या माणसांमध्ये** ती बरी होऊ इच्छित आहे, असं ती म्हणाली म्हणून मी विचारलं.

"'नाही, तिथं माझे नातेवाईक नाहीत किंवा ओळखीचे लोकही नाहीत,' ती म्हणाली. 'ते शहर मला परकं आहे. पण माझ्यासारखी हद्दपारी भोगणारी माणसं तिथं नक्की असणार, कॉम्रेड मंडळी.' परक्या माणसांना ती स्वतःची म्हणत होती ह्याचं मला आश्चर्य वाटलं. पैसे नसताना कोण तिला फुकट खाऊ-पिऊ घालणार? शिवाय बिनओळखी-ची! मी तिला आणखी प्रश्न विचारले नाहीत, कारण तिच्या कपाळाला आठ्या पडलेल्या मी पाहिल्या. उगीच कशाला प्रश्न विचारू?

"मनाशी म्हटलं, ठीक आहे... तुझ्या इच्छेप्रमाणं होवो! अजून कष्टाचं आयुष्य पाहिलेलं नाही. दुःखाची झळ लागली म्हणजे समजेल, परका मुलूख ही काय चीज असते...

"संध्याकाळी आकाश ढगाळलं, गार वारा सुटला आणि पाऊस पडू लागला. आधीच चिखल सुकलेला नव्हता आणि आता तर रस्ता राहिलाच नाही, नुसती घाण-बरबट! माझ्या पाठीवर चिखल उडत होता, पण तिलाही चिखलाचा प्रसाद मिळू लागला. थोडक्यात म्हणजे तिच्या दुर्दैवानं हवा अगदीच बिघडली होती. तोंडावर पावसाचा मारा बसत होता. आमची गाडी टपाची होती हे खरं आणि अधिक सुरक्षिततेसाठी मी टपावर चटई पांघरली होती, पण तरीही पाणी गळत होतं. ती थंडीनं काकडून गेलेली मी पाहिली. तिचं अंग थरथर कापत होतं आणि डोळे मिटून ती बसली होती. तिच्या तोंडावर पावसाचे थेंब टपकत होते, गाल पांढरेफटक पडले होते आणि मुळीच हालचाल करत नव्हती— जणू बेशुद्ध! मी घाबरलो. परिस्थिती कठीण होती... इवानोव झिंगून घोरत होता, त्याला कसलीच फिकीर नव्हती... माझी पहिलीच खेप, त्यामुळं काय करावं सुचेना...

"यारोस्लावल शहरात ऐन संध्याकाळी पोहोचलो. इवानोवला मी गदगदा हलवून जागं केलं. आम्ही स्टेशनावर गेलो आणि समोवार गरम करायची मी आज्ञा दिली. ह्या शहरातून आगबोटी जातात, पण आगबोटीमधून हद्दपारीच्या कैद्यांना घेऊन जाण्यास आम्हाला वरच्या हुकूमानुसार सक्त मनाई होती. खरं तर आम्हाला बोटीनं जाणं फायद्याचं होतं, भाडं कमी पडायचं, पैसे वाचायचे. पण आमच्यासारखेच पोलीस बोटीच्या धक्क्यांवर फिरत असतात. आमच्याबद्दल चुगली करू शकले असते.

ती मुलगी आम्हाला म्हणाली: 'टपाल-गाडीतून मी पुढचा प्रवास करणार नाही. काय वाटेल ते करा, पण बोटीतून न्या.' सतत दारू ढोसल्यामुळं इवानोवचे डोळे जेमतेम उघडत होते. तो चिडला. म्हणाला: 'ह्या बाबतीत निवाडा करायचा तुम्हाला हक्क नाही. जिकडं नेऊ, तिकडं यावं लागेल!' ती त्याला काहीच बोलली नाही, पण मला म्हणाली:

"'मी काय म्हटलं ते ऐकलंत: येणार नाही.'

"मी इवानोवला एका बाजूला बोलवून घेतलं. म्हणालो: 'बोटीनं घेऊन जाणं भाग आहे. तुमचाच फायदा, पैसे वाचतील!' तो कबूल झाला, पण घाबरत होता. म्हणाला: 'इथं कर्नल आहेत, तेव्हा काही भानगड होऊ नये. तू जाऊन त्यांना विचार, माझी तब्येत ठीक नाही.' कर्नलांच घर जवळच होतं. मी म्हणालो: 'आपण दोघं एकत्र जाऊ आणि ह्या पोरीलाही बरोबर नेऊ.' मी घाबरत होतो, इवानोव झिंगून झोपला असता आणि नसती भानगड उदभवली असती. ही पोरगी कुठंतरी निघून जायची किंवा स्वतःचं काही बरं-वाईट करून घ्यायची. पुढं मला निस्तरावं लागलं असतं. तर आम्ही कर्नलांकडं निघालो. ते आम्हाला भेटायला बाहेर आले. त्यांनी विचारलं: 'काय पाहिजे?' तिनं त्यांना खुलासा केला, पण त्यांच्याशीही व्यवस्थित बोलली नाही. तिनं नम्रपणं विनंती करायला हवं होतं: असं असं आहे आणि मेहेरबानी करावी. पण ती आपली तिच्याच ठेक्यात! 'कोणत्या हक्कानुसार...' अशी सुरुवात करून तिनं त्यांच्यावर सरबत्ती केली. तुम्हा राजकीय मंडळींना तसली भाषा वापरायला फार आवडते. पण वरिष्ठांना नम्रपणा आवडतो. कर्नलांनी तिचं सगळं बोलणं मुकाट ऐकून घेतलं आणि सभ्यपणं उत्तर दिलं: 'मला शक्य नाही, इथं मी काहीही करू शकत नाही. कायदा आहे... परवानगी नाही!' मी पाहिलं—मुलीचा चेहरा परत लाल झाला होता, डोळे निखारे बनले होते. 'कायदा!' म्हणाली आणि तुच्छपणं मोठ्यांदा हसली. कर्नल तिला म्हणाले: 'अगदी बरोबर—कायदा!'

"मी क्षणभर स्वतःला विसरलो हे कबूल करतो आणि म्हणालो: 'कायदा आहे ठीक, पण साहेब, ह्या बाई आजारी आहेत!' त्यांनी

माझ्याकडं कठोर नजरेनं पाहिलं. 'तुझं आडनाव काय?' त्यांनी विचारलं. आणि मुलीला म्हणाले: 'तुम्ही जर आजारी आहात, तर तुरुंगाच्या इस्पितळात दाखल होणं ठीक नाही का?' तिनं तोंड फिरवलं आणि एकही शब्द न बोलता ती तिथून निघून गेली. आम्ही तिच्या पाठोपाठ. इस्पितळात जायची तिची इच्छा नव्हती. हो, आणखी एक सांगितलं पाहिजे: जर तिथं ती थांबली नव्हती, तर इथं परक्या मुलखात पैशाविना तिला कसं ठेवणार?

"आता काही उपाय नव्हता. इवानोव माझ्यावर उखडला: 'आता काय होणार! मूर्खा, तुझ्यापायी दोघांना उत्तर द्यावं लागणार!' त्यानं घोडे जुंपायचा हुकूम दिला. रात्रीपुरता मुक्काम करायलाही तो तयार झाला नाही. रात्रीच पुढच्या प्रवासाला निघावं लागलं. आम्ही तिच्यापाशी जाऊन म्हटलं: 'चला बाईसाहेब, घोडे तयार आहेत.' ती नुकतीच दिवाणावर आडवी होऊन ऊब घेत होती. उडी मारून ती उठली आणि नजरेला नजर भिडवून आमच्यासमोर ताठ उभी राहिली. मला तिची भीती वाटली. 'पशू आहात तुम्ही' ती म्हणाली आणि आम्हाला न समजण्यासारखं आणखी बरंच काही रागारागानं बोलली. जरी ती रशियनमधून बोलत होती, तरी काहीही समजलं नाही. फक्त राग आणि दुःख समजत होतं. म्हणाली: 'आता मी तुमच्या ताब्यात आहे. माझा छळ तुम्ही करू शकता—काय वाटेल ते करा! येते तुमच्याबरोबर!' समोवार मेजावर तसाच उभा होता, अजून ती चहा प्यायली नव्हती. इवानोवनं आणि मी आमचा चहा उकळला, मी तिलाही चहा ओतला. आमच्यापाशी पांढरा पाव होता, मी तिच्यासाठी पावाचा तुकडा कापून दिला. म्हणालो: 'प्रवासाआधी थोडं खाऊन घ्या. अंगात जरा ऊब येईल.' पायात रबरी बूट घालता घालता ती थांबली, माझ्याकडं वळून टक लावून तिनं पाहिलं, मग खांदे उडवून म्हणाली: 'काय विचित्र माणूस आहे! तुम्ही पूर्ण वेडे दिसताय! तुमचा चहा मी पिईन असं वाटलं?' तेव्हा तिचं बोलणं माझ्या जिव्हारी झोंबलं होतं. आत्तासुद्धा आठवण झाली तर रक्त डोक्यात चढतं. तुम्ही आमच्याबरोबर मीठ-भाकर खाणं कमीपणाचं मानत नाही. रूबानोव नावाच्या माणसाला घेऊन गेलो होतो—लष्करातल्या मोठ्या ऑफीसरचा मुलगा—पण त्यांनीही कमीपणा मानला नाही.

पण तिनं कमीपणा मानला. नंतर दुसऱ्या मेजावर स्वत:साठी वेगळा समोवार तापवायला तिनं सांगितलं आणि अर्थातच चहा-साखरेसाठी दुप्पट पैसे मोजले. स्वत:पाशी एकूण रक्कम फक्त एक रूबल वीस कोपेक असताना!"

३

निवेदक गप्प झाला आणि खोपटात काही वेळपर्यंत शांतता पसरली. फक्त झोपलेल्या पोलीसाचा नियमित श्वासोच्छ्वास आणि खिडकीबाहेरच्या हिमवादळाचा सळसळाट त्या शांततेचा भंग करीत होते.

"झोपलात काय?" गावरीलोवने मला विचारले.

"नाही, पुढं सांगा, मी ऐकतोय."

"'तिच्यापायी,' निवेदक थोडा वेळ गप्प राहून पुढे बोलू लागला, 'तिच्यापायी खूप यातना सहन केल्या त्यावेळी मी. वाटेत सबंध रात्र पाऊस पडत होता, हवा अगदी वाईट होती... जंगलामधून जात होतो, जंगल भयानक कण्हत होतं. मला तिचा चेहरा दिसत नव्हता, कारण रात्र काळोखी, काहीही दिसत नव्हतं. पण विश्वास ठेवा – अगदी दिवसाउजेडी पाहिलं होतं, तशी ती मला नजरेसमोर दिसत होती: तिचे डोळे, संतापलेला चेहरा, तिची गारठलेली मूर्ती, दूर कुठंतरी खिळवलेली नजर, जणू मनातले विचार पुन:पुन्हा घोळवत होती. स्टेशनावरून निघताना मी तिच्या खांद्यांवर मेंढकातडी कोट पांघरू लागलो. म्हणालो: 'कोट घाला, ऊब येईल.' तिनं अंगावरून कोट फेकून दिला. म्हणाली: 'तुमचा कोट तुम्हीच वापरा.' कोट खरंच माझा होता, पण मी युक्तीनं म्हणालो: 'माझा नाही हा कोट, सरकारी आहे. कायद्यानुसार कैद्यांच्या वापरासाठी देतात.' तेव्हा तिनं कोट घातला...

"पण कोटाचा फारसा उपयोग झाला नाही. दिवस उजाडताच मी तिच्यावर नजर टाकली – ती भयानक दिसत होती. पुढच्या स्टेशनावरून पुढं निघालो तेव्हा तिनं इवानोवला गाडीवानापाशी बसायला सांगितलं. त्यानं कुरकुर केली, पण उलट वागण्याचा त्याला धीर झाला नाही, कारण एव्हाना त्याची झिंग थोडी उतरली होती. मी त्याच्याशेजारी बसलो.

"तीन दिवस आम्ही न थांबता सतत प्रवास करीत होतो. हुकूमांमध्ये कडक ताकीद होती: रात्रीच्या मुक्कामाला कुठंही थांबायचं नाही, फक्त 'फार थकल्याचा' अपवाद वगळून आणि तेसुद्धा केवळ उत्तम बंदोबस्ताच्या शहरांमध्ये. पण तुम्हाला माहीतच आहे, ह्या प्रवासात कुठं आहेत शहरं!

"अखेर आम्ही ठरल्या मुक्कामावर पोहोचलो. तिला नेमून दिलेलं शहर पाहताच अक्षरशः माझ्या खांद्यावरचा प्रचंड भार उतरल्यासारखं वाटलं. आणि तुम्हाला सांगितलं पाहिजे: प्रवासाच्या शेवटी ती जवळजवळ माझ्या हातांवर निजूनच आली. मी पाहिलं—ती गाडीच्या कोपऱ्यात बेशुद्ध पडली होती. रस्त्यावरच्या प्रत्येक दणक्याबरोबर गाडीच्या कडेला तिचं डोकं आदळत होतं. मी तिला उजव्या हातावर उचललं आणि तसंच आणलं त्या हातावर तिचा सगळा भार पेलून. प्रथम मला तिनं ढकललं. म्हणाली: 'दूर हो, अंगाला हात लावू नको!' मग मात्र काही नाही. कदाचित तिची परत शुद्ध हरपली असावी... तिचे डोळे मिटलेले होते, पापण्या काळवंडल्या होत्या आणि चेहरा अधिक चांगला बनला, पूर्वीसारखा संतापलेला नव्हता. काहीवेळा तर झोपेत हसतसुद्धा होती आणि ऊब घ्यायला माझ्याजवळ सरकत होती. बिचारीला झोपेत चांगल्या गोष्टी दिसत असाव्यात. आम्ही शहरापाशी येऊ लागलो तेव्हा ती शुद्धीवर आली, उठून बसली... हवा स्वच्छ बनली होती, सूर्य डोकावला— वातावरण आनंदी बनलं... पण गुबेर्नियातून तिला आणखी पुढं धाडण्यात आलं, गुबेर्नियाच्या शहरात राहू दिलं नाही आणि तिला पुढं घेऊन जाण्याची कामगिरी आमच्यावरच पडली. स्थानिक पोलीस स्वतःच्या कामगिऱ्यांवर गेलेले होते. आम्ही जाण्यासाठी निघालो तेव्हा पोलीस चौकीत लोकांची गर्दी जमलेली बघितली: तरुण मुली, विद्यार्थी, हद्दपारीवरची दिसत होती... सगळे तिच्याशी जणू जुनी ओळख असल्याप्रमाणं बोलत होते, हस्तांदोलन करत होते, प्रश्न विचारत होते... त्यांनी तिला काही पैसे दिले, प्रवासात उबेसाठी लोकरी रुमाल दिला आणि निरोप दिला...

"पुढच्या प्रवासात मजेत होती, मात्र सारखी खोकत होती. आमच्याकडं तिनं ढुंकून पाहिलं नाही.

"तिच्यासाठी नेमून दिलेल्या ऊयेझ्दच्या गावी पोहोचलो. तिला तिथल्या पोलीसांच्या हवाली केलं. तिनं कुठलंतरी आडनाव घेऊन विचारलं: 'तो इथं राहतो का?' 'इथंच,' तिला उत्तर मिळालं. स्थानिक पोलीस अंमलदार आला. त्यानं तिला विचारलं: 'कुठं राहणार आहात?' म्हणाली: 'माहीत नाही. पण आत्ता ऱ्याझान्त्सेवकडं जाते.' त्यानं मान डोलावली आणि ती स्वतःचं गाठोडं घेऊन निघून गेली. आमच्याशी निरोपाचा एक शब्दही बोलली नाही."

४

निवेदक गप्प झाला व मी झोपलोय अथवा नाही ह्याचा त्याने कानोसा घेतला.

"तर त्यानंतर तुम्ही तिला परत कधी भेटला नाहीत?"

"भेटलो, पण भेटलो नसतो तर जास्त बरं झालं असतं..."

"...त्यानंतर लौकरच मी तिला परत पाहिलं. त्या कामगिरीवरून आम्ही परतलो न परतलो तोच पुन्हा त्याच मार्गावर आमची पाठवणी झाली. एका विद्यार्थ्याला घेऊन गेलो, झाग्र्याझस्की नावाच्या. फार आनंदी प्राणी होता, छान गाणी म्हणायचा आणि दारू पिण्यातही पटाईत होता. त्याला आणखी लांब पाठवलं होतं. तिला ज्या गावात ठेवलं होतं त्या गावामधून आम्ही गेलो आणि ती कशी काय राहतेय ते पाहण्याचं मला कुतूहल वाटलं. मी तिच्याबद्दल चौकशी केली, तेव्हा स्थानिक पोलीस म्हणाले: 'होय, ती इथंच आहे. पण फार विचित्र. आल्यानंतर लगेच एका हद्‌पाराकडं गेली आणि तेव्हापासून कुणाला दिसलीच नाही. त्याच्याकडंच राहतेय. कुणी म्हणतात, ती आजारी आहे. कुणी म्हणतात, ती त्याची रखेली म्हणून राहते. अर्थात लोकांच्या जिभा नेहमीच लळवळतात...' मला तिचं बोलणं आठवलं: '**माझ्या माणसांपाशी** मरायची माझी इच्छा आहे.' माझं कुतूहल आणखीच वाढलं... केवळ कुतूहल नव्हतं, तर तिला भेटायची मला ओढ लागली होती. मी तिला भेटण्याचा निर्धार केला. माझ्यात तिला वाईट वर्तन दिसलं नव्हतं आणि मी तिच्याशी वाईट वागल्याचं स्मरत नाही.

"गेलो—भल्या माणसांनी वाट दाखवली. ती शहराच्या दुसऱ्या

टोकाला रहात होती. छोटंसं घर होतं, दार ठेंगणं. हद्दपाराकडं मी गेलो. त्याची खोली स्वच्छ, उजेडी होती. कोपऱ्यात पलंग होता आणि पडद्यानं कोपरा झाकलेला होता. पुस्तकं खूप होती, मेजावर, फडताळां-वर... जवळच छोटी कार्यशाळा आणि तिथं बाकड्यावर दुसरा बिछाना अंथरलेला.

"मी आत गेलो तेव्हा ती बिछान्यावर पाय अंगाखाली मुडपून, शाल पांघरून काहीतरी शिवत बसली होती. हद्दपार... न्याझान्सेव त्याचं नाव... जवळच्या बाकड्यावर बसला होता आणि पुस्तकातला काहीतरी मजकूर तिला वाचून दाखवत होता. तो चष्मेवाला माणूस गंभीर दिसत होता. शिवणकाम करता करता ती ऐकत होती. मी दार ठोठावलं. मला पाहताच ती किंचित वर उठली, तिनं त्याचा हात पकडला आणि थिजून जागच्या जागी ती उभी राहिली. तिचे डोळे मोठे, काळे, भयानक दिसत होते... बाकी सारं पूर्वीसारखंच होतं, फक्त तिचा चेहरा मला जास्त फिकट भासला. तिनं त्याचा हात गच्च आवळून धरला. तो घाबरला आणि तिच्याकडं झुकून म्हणाला: 'काय झालं तुम्हाला? शांत व्हा!' त्यानं मला पाहिलं नव्हतं. मग तिनं त्याचा हात सोडला आणि बिछान्यावरून उठण्याचा प्रयत्न केला. त्याला म्हणाला: 'तुमचा निरोप घेते. असं दिसतंय, मी सुखानं मरावं अशी त्यांची इच्छा नाही.' तेव्हा त्यानं मागं वळून पाहिलं आणि मी त्याच्या नजरेला पडताच ताडकन तो उभा राहिला. मला वाटलं, माझ्या अंगावर धावून येणार... बहुतेक मला ठार मारणार. माणूस उंचापुरा आणि दणकट होता...

"त्यांची समजूत झाली होती की, परत तिला घेऊन जायला मी आलो होतो... मी अर्धमेल्या अवस्थेत जागच्या जागी एकटाच उभा राहिलेला त्यानं पाहिलं. तिच्याकडं वळून तिचा हात पकडून म्हणाला: 'शांत व्हा!' आणि मग मला म्हणाला: 'तरुण शिलेदार, इथं आपण यायचं कारण काय?.. काय पाहिजे आपल्याला?'

"मी खुलासा केला की, मला काहीही नको होतं, सहज भेटायला म्हणून आलो होतो. बाईसाहेबांना या शहरात घेऊन आलो तेव्हा त्या आजारी होत्या, म्हणून त्यांच्या प्रकृतीची चौकशी करायला आलो...

तो नरम झाला. पण ती मात्र तशीच चिडलेली, फणफणत होती. कशाबद्दल असं वाटतं? अर्थात इवानोव सभ्य माणूस नव्हता, पण मी सतत तिची बाजू घेऊन वागलो होतो...

"आता सगळा प्रकार त्याच्या ध्यानात आला आणि हसून तिला तो म्हणाला: 'पाहिलंत, मी तुम्हाला बोललो होतो.' यापूर्वी त्यांनी माझ्याविषयी चर्चा केली असावी, असं माझ्या ध्यानात आलं... प्रवासाबद्दल तिनं त्याला सगळं सांगितलेलं दिसत होतं.

"मी म्हणालो: 'माफ करा, जर मी तुम्हाला घाबरवलं असेल तर... मी यायला चुकीची वेळ निवडली... मी जातो. अच्छा, माझ्याबद्दल वाईट समजूत करून घेऊ नका.'

"तो उठला, माझा चेहरा त्यानं न्याहाळला आणि हात पुढं केला.

"म्हणाला: 'परतीच्या वाटेवर सवड सापडली तर येऊन भेटा.' ती आमच्याकडं पाहून उपहासानं हसत होती.

"'कशाला त्यांनी परत इथं यायचं? कशाबद्दल त्यांना बोलावताय?' ती त्याला म्हणाली. तो त्यावर म्हणाला: 'काही बिघडत नाही! त्यांची इच्छा असेल तर स्वतःच परत येतील... जरूर या, जरूर या, काही हरकत नाही!'

"मी कबूल करतो की, त्यांचं आणखी बरंच बोलणं मला समजलं नाही. तुम्ही मंडळी आपापसात कधी कधी फार पंडिती बोलता... तसंच थांबून आणखी काही वेळ त्यांचं बोलणं ऐकावंसं वाटत होतं... पण प्रशस्त वाटेना. कदाचित त्यांना माझा संशय वाटायला लागला असता. म्हणून तिथून निघालो.

"तर श्रीमान झाग्र्याझस्कींना आम्ही त्यांच्या मुक्कामावर पोहोचवलं आणि बघता बघता आम्ही परत तिच्या शहरापर्यंत आलो. तिथं माझ्या सार्जंटला पोलीस अंमलदारांनी बोलावून घेतलं आणि सांगितलं: 'पुढचा हुकूम येईपर्यंत तुम्ही इथंच थांबायचंय. तार आलीय. टपालामधून तुमच्यासाठी कागदपत्र येत आहेत.' आम्ही अर्थातच तिथं थांबलो.

"मी परत त्यांच्याकडं गेलो. मनाशी विचार केला – निदान घरमालकापाशी जाऊन तिच्याबद्दल चौकशी करावी. घरमालक म्हणाला: 'फार वाईट अवस्था आहे तिची, मरणाच्या पंथाला लागलीय. ती माणसं

पाद्रयाला बोलावणार नाहीत आणि मी मात्र संकटात येईन.' आम्ही उभे राहून बोलत होतो, तेवढ्यात ऱ्याझान्त्सेव तिथं आला. मला पाहताच त्यानं अभिवादन केलं आणि म्हणाला: 'परत आलास? तर मग आत ये.' मी हळूच आत गेलो आणि तो माझ्या पाठोपाठ. मला पाहून तिनं विचारलं: 'परत हा विचित्र माणूस! तुम्ही त्याला बोलावून घेतलंत काय?' तो उत्तरला: 'नाही, मी नाही बोलावलं, तो स्वतःच आलाय.' मला ते सहन झालं नाही आणि तिला म्हणालो:

"'बाईसाहेब, माझ्याविरुद्ध तुमच्या मनात एवढा कशाबद्दल आकस आहे? तुमचा मी शत्रू आहे काय?'

"ती म्हणाली: 'होय, शत्रूच आहात. हे तुम्हाला माहीत नाही? अर्थातच तुम्ही शत्रू!' तिचा आवाज दुबळा, हळू बनला होता, गाल तसेच लाल दिसत होते. तिचा चेहरा खूप गोड दिसत होता... सतत पहावासा वाटत होता. मनात विचार आला: ही फार दिवस जगणार नाही, मला क्षमा कर अशी हिला विनंती केली पाहिजे. मला क्षमा न करता ही मेली तर? 'मला क्षमा करा', मी म्हणालो, 'जर मी तुमचा काही अपराध केला असेल तर!' आमच्या ख्रिश्चन धर्माला अनुसरून मी तसं बोललो होतो... ती परत संतापलेली दिसली... 'क्षमा! अरे वा! कधीही क्षमा करणार नाही आणि कधी तशी अपेक्षा धरू नका! लौकरच मी मरीन... पण लक्षात ठेवा, मी तुम्हाला क्षमा केली नाही!'"

निवेदक पुन्हा गप्प झाला व विचारात गढला. मग अधिक हळू आणि तीव्रपणे पुढे बोलू लागला:

"परत त्यांचं आपापसात संभाषण सुरू झालं. तुम्ही शिकलेले गृहस्थ आहात, त्यांची भाषा तुम्हाला समजत असणार. तर माझ्या आठवणीत असलेले त्यांचे काही शब्द मी सांगतो. शब्द माझ्या स्मरणात पक्के बसले, पण त्यांचा अर्थ माहीत नाही. तो म्हणाला:

"'हे पहा, तुमच्यापाशी आत्ता पोलीस आलेला नाही... पोलीसानं तुम्हाला आणलं, दुसऱ्यालाही तो घेऊन येईल, पण ते सारं तो वरिष्ठांच्या हुकूमांनुसार करतो. पण इथं काय तो हुकूमानुसार आलाय?

तुमचं काय म्हणणं आहे, श्रीयुत शिलेदार, तुमचं नाव मला माहीत नाही...'

"'स्तेपान,' मी म्हणालो.

"'वडलांचं नाव काय?'

"'पेत्रोविच.'

"'तर स्तेपान पेत्रोविच, तुम्ही इथं का आलात? माणुसकीपायी? खरं ना?'

"मी म्हणालो, 'अर्थात, माणुसकीपायी. तुम्ही अगदी बरोबर खुलासा केलात. आमच्या हुकूमांप्रमाणं असं वागायला मनाई आहे— कारण नसताना तुमच्याकडं येणं. वरिष्ठांना समजलं तर माझी गय करणार नाहीत.'

"'पाहिलंत,' तो म्हणाला आणि त्यानं तिचा हात हातात घेतला. तिनं हात झटकन मागं घेतला.

"ती म्हणाली: 'मला काहीही दिसत नाही. तुम्हाला सगळं दिसतं, नसलेलंसुद्धा. पण आम्ही (म्हणजे ती आणि मी) साधी माणसं. शत्रू म्हणजे शत्रू! त्यांचं काम—नजर ठेवायचं, आमचं काम—त्यांची नजर चुकवायचं. बघा, तो उभा राहून ऐकतोय. त्याला आपलं बोलणं समजत नाही, एरवी शब्द न शब्द लिहून वरिष्ठांना त्यानं अहवाल दिला असता...'

"तो माझ्या दिशेनं वळला आणि चष्म्यातून माझ्याकडं रोखून पाहू लागला. त्याचे डोळे भेदक, पण प्रेमळ होते. मला म्हणाला: 'ऐकलंत? तुमचं काय म्हणणं आहे? नको, काहीही खुलासा नको. मला वाटतं, तुम्हाला हे अपमानकारक जाणवतंय.'

"अर्थात खरं होतं... हुकूमांनुसार आणि माझ्या नोकरीच्या जबाब-दारीनुसार—ज्या हितसंबंधाची मी सेवा बजावत होतो त्याच्या विरुद्ध काही घडल्यास—माझ्या जन्मदात्या बापाविरुद्धसुद्धा वरिष्ठांकडं अहवाल देणं माझं कर्तव्य होतं... पण मी त्या हेतूनं तिथं आलो नव्हतो, त्या-मुळं तिचं बोलणं मला अपमानकारक वाटलं, जिव्हारी झोंबलं. मी दाराकडं वळलो, पण ऱ्याझान्त्सेवनं मला थोपवलं.

"म्हणाला: 'जरा थांब, स्तेपान पेत्रोविच, एवढ्यात जाऊ नको.'

आणि तिला म्हणाला: 'हे चांगलं नाही... क्षमा करू नका आणि समेटही करू नका. ह्याबाबत काय बोलायचं. जर त्याला हे सगळं समजलं असतं तर त्यानं स्वतः क्षमा केली नसती... पण शत्रूसुद्धा माणूस असू शकतो... पण तुम्ही हे मान्य करत नाही. तुम्ही संप्रदायवादी आहात!'

"'असूं दे,' ती त्याला म्हणाली, 'आणि तुम्ही भावनाशून्य माणूस... तुम्हाला फक्त पुस्तकं वाचायला...'

"तिनं तो शब्द वापरताच त्यानं जागच्या जागी उडी मारली. जणू तिनं त्याला चपराक मारली होती. ती घाबरलेली दिसली.

"'भावनाशून्य?' तो म्हणाला. 'तुम्हाला माहीत आहे, तुम्ही खरं बोलला नाहीत.'

"'शक्य आहे,' ती उत्तरली... 'आणि तुम्ही मला सत्य सांगितलंत?..'

"तो म्हणाला: 'मी सत्य बोललो. तुम्ही अस्सल बायारीन्या मोरोझोवा...'

"ती विचारात पडली आणि तिनं त्याच्यासमोर हात धरला. त्यानं तिचा हात आपल्या हाती घेतला. त्याच्या चेहऱ्याकडं तिनं टक लावून पाहिलं आणि म्हणाली: 'होय, तुमचं खरं आहे!' मी उभा राहून बावळटासारखा त्यांच्याकडं पहात होतो. माझ्या घशात आवंढा दाटला. मग ती माझ्याकडं वळली, रागाविना माझ्याकडं तिनं पाहिलं आणि हात पुढं धरला. म्हणाली: 'मी तुम्हाला सांगत्ये: आपण मरणांतिक शत्रू आहोत... पण तुम्हाला हात देते—कधीतरी तुम्ही माणूस व्हाल अशी इच्छा व्यक्त करते—हुकूमानुसार नव्हे... मी थकलेय,' ती त्याला म्हणाली.

"मी बाहेर पडलो. ऱ्याझान्त्सेवसुद्धा माझ्या पाठोपाठ बाहेर आला. आम्ही अंगणात उभे राहिलो आणि मी पाहिलं: त्याच्या डोळयात आसवं चमकत होती.

"म्हणाला: 'तर, स्तेपान पेत्रोविच, तुम्ही इथं आणखी बराच काळ राहणार आहात?'

"मी म्हणालो: 'माहीत नाही. कदाचित आणखी तीन दिवस, टपाल येईपर्यंत.'

"'इच्छा झाली तर या इकडं,' तो म्हणाला, 'जरूर या. तुम्ही भले माणूस आहात, तुमचं काम लक्षात घेता...'

"'मला माफ करा, मी निष्कारण घाबरवलं,' मी म्हणालो...

"'होय-होय,' तो म्हणाला, 'पुढच्या वेळी प्रथम घराच्या मालकिणीला सांगा.'

"'मला एक विचारायची इच्छा आहे,' मी त्याला म्हणालो, 'तुम्ही आत्ता बायारीन्या मोरोझोवाचा उल्लेख केलात. म्हणजे त्या बायार घराण्यातल्या आहेत?'

"'बायार घराण्यातली आहे अथवा नाही हे माहीत नाही, पण तिचं कूळ अशापैकी आहे: मोडू शकाल तिला...' तो म्हणाला, 'खरं म्हणजे तुम्ही लोकांनी तिला एव्हाना मोडलंय... पण वाकवू शकणार नाही. तुम्ही स्वतःच पाहिलंत: अशी माणसं कधीही वाकणार नाहीत!'

"आणि आम्ही एकमेकांचा निरोप घेतला."

५

"...नंतर लौकरच ती वारली. तिचा अंत्यविधी कसा झाला, मी पाहिला नाही – मी पोलीस ठाण्यावर खूप कामात होतो. मात्र दुसऱ्या दिवशी ऱ्याझान्त्सेवशी भेट झाली. तो फार भयानक दिसत होता...

"तो उंचापुरा होता, गंभीर चेहऱ्याचा होता. पूर्वी माझ्याकडं प्रेमळ नजरेनं पहायचा, पण ह्यावेळी त्यानं हिंस्र नजरेनं मला पाहिलं. त्यानं हात पुढं केला, पण मग अचानक माझा हात झटकून टाकला आणि तोंड फिरवलं. मला म्हणाला: 'आता तुझं तोंड पाहवत नाही मला. जा, बंधू, देवाशपथ, जा इथून! ..' त्यानं मान खाली घातली आणि तो निघून गेला. मी ठाण्यावर परतलो. मला खूप वाईट वाटलं होतं. दोन दिवस अन्न खाववलं नाही. तेव्हापासून मला दुःखानं झपाटलंय.

"दुसऱ्या दिवशी ठाण्याच्या अंमलदारानं आम्हाला बोलावून सांगितलं: 'आता तुम्ही प्रवासाला निघू शकता. कागद आलाय, पण उशीरा!'

म्हणजे परत तिला घेऊन जायची कामगिरी आमच्यावर पडली होती, पण देवानं तिच्यावर दया केली: तोच तिला घेऊन गेला होता.

"...पण इथंच कहाणी संपली नाही–त्यानंतर आणखी एक घटना घडली. परतीच्या प्रवासात आम्ही एका स्टेशनावर थांबलो होतो... खोलीत शिरलो तेव्हा मेजावर समोवार होता, खाण्याचे जिन्नस होते आणि कुणी एक म्हातारी बसली होती, मालकिणीला चहा देत होती. नीटनेटकी, छोटया चणीची म्हातारी आनंदी आणि बडबडी होती. मालकिणीला स्वतःबद्दलची सगळी हकीकत सांगत होती: 'वारसानं मिळालेलं घर विकून टाकलं, सामान गुंडाळलं आणि माझ्या छोटया कबूतराकडं निघालेय. खूप आनंद होईल तिला! प्रथम खूप चिडेल, मला माहीत आहे–पण तरीही तिला आनंद वाटेल. मी तिच्याकडं येऊ नये असं तिनं लिहिलं होतं. कोणत्याही परिस्थितीत मी तिच्यापाशी यायचं नाही असं बजावलं होतं. पण काही बिघडत नाही!'

"माझं काळीज लकाकलं. मी स्वयंपाकघरात गेलो. तिथल्या तरुण मोलकरणीला विचारलं: 'कोण आहे ही म्हातारी?' मोलकरीण म्हणाली: 'तुम्ही ज्या मुलीला इथून घेऊन गेला होतात, त्या मुलीची ही आई.' मी हबकलो. माझ्या हबकलेल्या चेहऱ्याकडं पाहून पोरीनं विचारलं: 'अरे शिपाया, तुला काय झालंय?' मी म्हणालो: 'हळू, उगीच ओरडतेस कशाला... ती मुलगी तर वारली.'

"त्यावर ती कारटी–खरं सांगायचं तर ती कारटी छिनाल होती, प्रवाशांबरोबर प्रेमाचे चाळे करायची–छातीवर हात आपटत, मोठमोठ्यानं विव्हळत खोपटाबाहेर धावली. मी टोपी उचलली आणि बाहेर गेलो. आतल्या खोलीत म्हातारी अजूनही मालकिणीशी गप्पा मारत होती. मला त्या म्हातारीबद्दल फार फार वाईट वाटलं. मला काय वाटत होतं त्याचं वर्णन करता येत नाही. मी रस्त्यावरून थेट चालू लागलो–नंतर इवानोवनं गाडीतून मला गाठलं आणि मी गाडीत बसलो."

६

"...अशी आहे हकीकत!.. तिथल्या ठाण्यावरच्या अंमलदारानं वरिष्ठांपाशी चुगली केली होती की, हद्दपारांच्या घरी मी गेलो होतो

आणि मी तिची कशी बाजू घेतली होती ह्याबद्दल कस्त्रोमाच्या कर्नल-नीसुद्धा वरती कळवलं होतं. माझ्याविरुद्ध एका पाठोपाठ एक कागाळ्या गेल्या. माझे वरिष्ठ माझी सार्जंटपदासाठी शिफारस करायला तयार नव्हते. ते म्हणाले: 'तू कसला सार्जंट–म्हातारी बाई आहेस! मूर्खा, तुला अंधारकोठडीत फेकलं पाहिजे!' दरम्यान मी भावनाशून्य बनलो होतो आणि माझ्या कर्माचा मला मुळीच पश्चात्ताप वाटत नव्हता.

"त्या संतापलेल्या तरुणीला मी विसरू शकत नव्हतो आणि आत्तासुद्धा तसंच: डोळ्यांसमोर स्पष्ट उभी राहते.

"काय ह्याचा अर्थ? कोण मला समजावून सांगील? अहो साहेब, तुम्ही झोपलात काय?"

मी झोपलो नव्हतो–जंगलातल्या त्या खोपटामधील मिट्ट काळोखाने माझा जीव कासावीस केला होता आणि वादळाच्या दबत्या विव्हळण्यात मृत तरुणीची खिन्न प्रतिमा अंधारात दिसत होती...

१८८०

ल्येव तल्स्तोय

बॉलनृत्यानंतर

ल्येव तल्स्तोय (१८२८-१९१०) – जगातील एक श्रेष्ठ लेखक. लेनिन यांच्या शब्दात सांगायचे तर त्यांचे साहित्य म्हणजे "एकूण मानवजातीच्या कला-विकासातील पुढचे पाऊल."

तल्स्तोय यांच्या लेखनात रशियन साहित्यातील सर्वोत्तम परंपरा एकवटल्या होत्या: मानवतावाद, देशभक्ती, वास्तववादी चित्रण आणि साधेपणा.

'बालपण', 'पौगंडावस्था' ह्या पहिल्याच कादंबऱ्यांमध्ये, 'सेवास्तोपोलच्या कथा' व 'युद्धकथा' कथासंग्रहांमध्ये तल्स्तोय यांचे स्वयंभू साहित्यगुण प्रकट झाले होते. माणसाच्या आंतरिक जीवनातील परस्पर प्रवृत्तींना जाणून सूक्ष्म रीतीने त्यांचे शब्दांमध्ये वर्णन करण्याची त्यांची क्षमता तेव्हाच दिसून आली होती. तल्स्तोय यांच्या ह्या सर्व खास गुणांचा पुढे त्यांच्या विख्यात कादंबऱ्यांमध्ये विकास झालेला दिसतो: 'युद्ध आणि शांतता,' 'आन्ना कारेनिना,' 'पुनरुत्थान,' अनेक कथा व दीर्घकथा, नाटके.

रशियन आणि जागतिक साहित्याच्या विकासात तल्स्तोय यांनी प्रचंड भरीव कामगिरी केली. माक्सिम गोर्की यांच्या शब्दात ल्येव तल्स्तोय यांचे लेखन म्हणजे "१९ व्या शतकात रशियन समाजाने जगलेल्या सर्व जीवनाचा आढावा आणि एका प्रतिभावंताने केलेल्या अपार श्रमांचे स्मारक म्हणून त्यांची पुस्तके शतकानुशतके टिकून राहतील..."*

---

*मा. गोर्की, रशियन साहित्याचा इतिहास, मॉस्को, १९३९, पान २९६.

"तुमचं म्हणणं असं आहे की, चांगलं काय आणि वाईट काय हे माणसाला स्वतंत्रपणं ठरवता येत नाही, ते परिस्थितीवर अवलंबून आहे—म्हणजे माणूस हा परिस्थितीवर अवलंबून आहे. पण माझा असा दावा आहे की, हे सर्व योगायोगावर अवलंबून आहे. माझ्याबद्दलच सांगतो..."

व्यक्तीमध्ये सुधारणा घडविण्याची भाषा करण्यापूर्वी माणसे ज्या वातावरणात राहतात, ज्या परिस्थितीत राहतात, ती बदलणे आवश्यक आहे याबाबत आम्ही चर्चा करीत होतो तेव्हा अखेरीस आमचे मान्यवर मित्र इवान वासिल्येविच उपरोक्त शब्द बोलले. खरे म्हणजे चांगले आणि वाईट स्वतंत्रपणे निर्णित करण्याच्या शक्यतेविषयी कुणीही उच्चार केला नव्हता, पण चर्चेतून आपल्या मनात उद्भवलेल्या विचारांना उत्तर देण्याची व ह्या विचारांपायी सुचलेल्या स्वतःच्या जीवनातील अनुभवांच्या आठवणी सांगण्याची इवान वासिल्येविच यांना सवय होती. अनेकदा ते आपल्या कथेत एवढे रमून जात, की ती सांगण्याच्या कारणाचाच त्यांना विसर पडे. असे घडण्याचे विशेष कारण म्हणजे ते नेहमी खूप तावा-तावाने आणि प्रामाणिकपणे बोलत. सद्यःपरिस्थितीतही नेमके तसेच घडले.

"निदान माझ्याबाबतीत मी असा दावा करू शकतो. माझं स्वतःचं आयुष्य परिस्थितीनुरूप घडलं नाही, तर अगदी वेगळ्याच गोष्टींनी घडलं."

"कशानं?" आम्ही विचारले.

"ती एक फार मोठी कहाणी आहे. तुम्हाला समजून घ्यायचं असेल, तर मला ती संपूर्ण सांगावी लागेल."

"तर मग सांगा."

इवान वासिल्येविच यांनी क्षणभर विचार केला आणि नंतर आपली मान हलविली.

"होय," ते म्हणाले, "एका रात्रीनं, किंवा नेमकं म्हणजे एका सकाळीनं माझं संपूर्ण आयुष्य बदलून टाकलं."

"असं? काय घडलं?"

"त्यांचं असं घडलं की, मी खूप प्रेमात पडलो होतो. त्यापूर्वीही मी अनेकदा प्रेमात पडलो होतो, पण एवढा खोल कधी बुडालो नव्हतो. खूप काळापूर्वी हे घडलं—तिच्या मुली आता विवाहित स्त्रिया आहेत. तिचं नाव ब. वारेन्का. वयाच्या पन्नाशीलासुद्धा तिचं सौंदर्य ठळकपणं डोळ्यात भरायचं. पण तिच्या तारुण्यात, जेव्हा ती अठरा वर्षांची होती तेव्हा तर केवळ स्वप्न होती... उंच, सडपातळ, डौलदार आणि भव्य. होय, भव्य. ती नेहमी एवढी ताठ वावरायची, की जणू तिला वाकणं अशक्य होतं. तिचं डोकं किंचित मागं झुकलेलं असायचं. ह्याचा तिच्या सौंदर्याशी आणि उंचीशी मिलाफ झाल्यामुळं, जरी ती अगदी हडकुळी होती तरी तिला एकूण राणीचा दिमाख प्राप्त झाला होता. आणि जर तिच्या मुखावर प्रसन्न, दुसऱ्यांना जिंकून घेणारं स्मित नसतं, तिच्या सुंदर डोळ्यांमध्ये चमक नसती, पाहणाऱ्याला मुग्ध करणारं यौवन नसतं, तर तिची दहशतच वाटली असती."

"इवान वासिल्येविच अगदी ठेवणीतल्या विशेषणांनी वर्णन करताहेत!"

"मी कितीही रसदार वर्णन केलं तरी ती कशी दिसत होती याची पूर्ण कल्पना तुम्हाला येणार नाही. पण तो मुद्दा नाही. मी ज्या घडामोडी सांगणार आहे त्या चाळीसनंतरच्या काळात घडल्या. त्यावेळी मी एका प्रांतिक विद्यापीठात शिकत होतो. चांगलं की वाईट ते मला ठाऊक नाही, पण त्या काळात आमच्या विद्यापीठात तुमची अभ्यास मंडळं नव्हती, किंवा विचारप्रणालींवर चर्चा झडत नव्हत्या. आम्ही तरुण होतो आणि तरुणांसारखं जगत होतो. अभ्यास करायचा आणि खूप मौज करायची. मी अगदी आनंदी आणि तगडा तरुण होतो, शिवाय श्रीमंतही होतो. एक दमदार घोडा माझ्या मालकीचा होता आणि पोरींना

बरोबर घेऊन मी सहलींना जात असे (स्केटिंगचं वेड तेव्हा नव्हतं); माझ्या बरोबरीच्या विद्यार्थ्यांबरोबर मी दारूच्या पाटर्यांना जायचा (त्यावेळी आम्ही फक्त शँपेन पीत असू. आमच्याजवळचे पैसे संपले तर काहीही पीत नसू, पण आता लोक वोदका पितात तशी वोदका मात्र आम्ही कधीही प्यायलो नाही); पण सर्वांत जास्त मला आवडायच्या पाटर्या आणि बॉलनृत्याचे समारंभ. मी चांगला नाचायचा आणि दिसायला वाईट नव्हतो."

"तुम्ही फार नम्रपणानं बोलताय," एक बाई म्हणाली. "आम्ही सर्वांनी तुमचं दागेरा पद्धतीनं चित्र पाहिलंय. तुम्ही देखणे तरुण होतात."

"कदाचित मी देखणा असेन, पण मला ते सांगायचं नव्हतं. माझं प्रेम ऐन भरात होतं तेव्हा लेंटच्या सणाआधीच्या दिवशी प्रांत-प्रमुखांनी निमंत्रित केलेल्या बॉलनृत्याच्या समारंभाला मी हजर राहिलो होतो. प्रांत-प्रमुख सुस्वभावी म्हातारे गृहस्थ होते, श्रीमंत होते आणि लोकांना बोलावून समारंभ साजरे करण्याची त्यांना आवड होती. त्यांची बायकोही त्यांच्याचसारखी प्रेमळ होती. आमच्या स्वागताला ती दोघेही उभी होती. तिने मखमालीचा लांब झगा परिधान केला होता आणि केसात रत्नजडित शिरोभूषण माळले होते. तिची मान आणि तिचे खांदे उघडे होते. वृद्धत्वाकडं झुकलेले ते गुबगुबीत आणि शुभ्र अवयव सम्राज्ञी येलिझावेता पेत्रोवनाच्या चित्रांच्या धर्तीचे दिसत होते. बॉलनृत्याचा समारंभ सुरेख होता. नृत्यदालन मोहक होतं. संगीताची आवड असलेल्या एका जमीनदाराच्या घरचे प्रसिद्ध भूदास गायक आणि वादक तिथं हजर होते. खायला भरपूर होतं, शँपेनच्या नद्या वाहात होत्या. मला जरी शँपेन खूप आवडत होती तरी मी मुळीच प्यायलो नाही. मला प्रेमाची झिंग चढली होती. मात्र थकून खाली कोसळेपर्यंत मी नाचलो. क्वाड्रिल, वॉल्तझ, पोलोनेज हे सगळे नृत्यप्रकार मी नाचलो आणि त्यातील जास्तीत जास्त वेळा मी वारेन्काबरोबर नाचलो हे सांगणे न लगे. तिनं पांढरा पोषाख केला होता, तिचा कमरबंद गुलाबी होता. तिच्या बारीक, टोकदार कोपरापर्यंत जेमतेम पोचणारे पांढरे कातडी हातमोजे तिनं घातले होते आणि पांढऱ्या सॅटिनच्या सपाता तिच्या पायात होत्या. अनीसीमोव नांवाच्या एका दुष्ट इंजिनिअरनं मला फसवून तिला माझूर्का

नृत्यासाठी पटकावलं. त्याबद्दल मी त्याला कधीही क्षमा केलेली नाही. नृत्यदालनात ती आली तेव्हा ताबडतोब त्यानं तिला पाचारण केलं. केशभूषाकाराकडं आणि हातमोजे घेण्यात मला थोडा उशीर झाला होता. त्यामुळं तिच्याबरोबर माझूर्का न नाचता एक जर्मन मुलीबरोबर मी नाचलो. एकेकाळी ती जर्मन पोरगी मला आवडायची. पण त्या संध्याकाळी मात्र मी तिच्याकडं अगदी दुर्लक्ष करत होतो. ना मी तिच्याशी चार शब्द बोललो, ना तिच्याकडं नीट पाहिलं. कारण माझं सारं अवधान एकवटलं होतं पांढऱ्याशुभ्र पोषाखातल्या, गुलाबी कमरबंद बांधलेल्या, लालबुंद, चमकणाऱ्या खळीदार गालांच्या, मृदु, प्रेमळ डोळयांच्या, उंच आणि सडपातळ मुलीकडं! आणि तसं पाहणारा मी काही एकटाच नव्हतो. प्रत्येकजण तिच्याकडं पहात होता आणि तिच्या सौंदर्याचं कौतुक करत होता. अगदी बायकासुद्धा तिच्याकडं कौतुकानं पहात होत्या. तिनं त्यांना आपल्या तेजानं फिकं पाडलं होतं तरीही! तिचं कौतुक न करणं अशक्य होतं.

"तसं पाहिलं तर माझूर्का नाचाला मी तिचा जोडीदार नव्हतो, पण प्रत्यक्षात मात्र मीच तिच्याबरोबर माझूर्का नाचलो. निदान नाचाचा बराचसा भाग. अजिबात न लाजता सबंध दालनभर नाचत सरळ ती माझ्यापाशी आली आणि आमंत्रणाची वाट न पाहता मी जेव्हा तिच्या भेटीला झेपावलो तेव्हा तिला काय हवं होतं याचा मी अचूक तर्क केल्याबद्दल तिनं स्मित केलं. जेव्हा आम्हाला तिच्यापाशी नेण्यात आलं आणि माझा इरादा न उमजून तिनं आपल्या नाजुक खांद्यांना झटका देऊन दुसऱ्या माणसाचा हात धरला, पण नंतर मागं वळून तिनं खेदाचं आणि सांत्वनाचं एक स्मित मला बहाल केलं.

"माझूर्कामधून नृत्यमुद्रा बदलल्या आणि वॉल्तझ सुरू झाला तेव्हा खूप वेळपर्यंत मी तिच्या बरोबर वॉल्तझ नाचत राहिलो. सस्मित चेहऱ्यानं धापा टाकीत ती पुटपुटत होती : 'आणखी!' आणि मी आणखी आणखी वॉल्तझ नाचत राहिलो, देहाचं भान हरपून!"

"देहाचं भान हरपून? माझी खात्री आहे की तिच्या कमरेभोवती तुमच्या हाताचा विळखा घातल्यानंतर तुम्हाला नक्की जाणीव झाली

असणार – केवळ तुमच्याच देहाची नव्हे, तर तिच्यासुद्धा!" एक पाहुणा म्हणाला.

इवान वासिल्येविच एकदम लालबुंद झाले आणि जवळ जवळ चिडून ओरडले :

"ते तुम्हा आजच्या तरुणांना लागू पडेल! तुम्ही फक्त शरीराचा विचार करता. आमच्या काळी गोष्टी वेगळया होत्या. एखाद्या मुलीवर जेवढा अधिक मी प्रेम करायचा, तेवढी अधिक देहरहित ती मला भासायची. आज तुम्हाला पाय, पोटऱ्या आणि आणखी काही बरंच दिसत राहतं. ज्या स्त्रियांच्या तुम्ही प्रेमात असता त्यांना तुम्ही विवस्त्र करता. पण माझ्या दृष्टीनं मात्र आल्फोन्स कार ह्या लेखकानं म्हटल्याप्रमाणं माझा प्रेमविषय सदैव ब्रॉंझच्या वस्त्रांमध्ये झाकलेला होता. नोहाच्या भल्या पुत्राप्रमाणं आम्ही नग्नता झाकण्याचाच अधिक प्रयत्न केला, तिला अधिक उघड करण्याचा नव्हे! पण तुम्हाला हे समजू शकत नाही."

"त्याच्याकडं लक्ष देऊ नका. तुमची कहाणी सांगा पुढं," दुसरा एक श्रोता म्हणाला.

"तर मी बहुतेक वेळ तिच्याबरोबर नाचलो आणि वेळ कसा उलटला ते माझ्या ध्यानात आलं नाही. वादक एवढे दमले होते – बॉलनृत्याच्या अखेरी काय घडतं ते तुम्हाला माहीतच आहे – की ते पुन:पुन्हा माझूर्का वाजवत राहिले. दिवाणखान्यामधून सगळया माता आणि सगळे पिता पत्त्यांचे डाव सोडून जेवणासाठी उठू लागले होते. हुजऱ्यांची लगबग चालू होती. तीन वाजत आले होते. उरलेल्या काही मिनिटांचा फायदा आम्ही घ्यायला हवा होता. मी पुन्हा एकदा तिला आमंत्रण केलं आणि शंभराव्या वेळेला आम्ही दालनभर नाचत गेलो.

"'जेवणानंतर क्वाड्रिलला मी तुझा जोडीदार होऊ ना?' तिच्या जागेपाशी तिला परत नेताना मी विचारले.

"'नक्की. मात्र त्यांनी मला घरी नेलं नाही तर,' स्मित करून ती म्हणाली.

"'मी त्यांना नेऊ देणार नाही,' मी म्हणालो.

"'माझा पंखा द्या,' ती म्हणाली.

"'परत द्यायला मला वाईट वाटतं,' तिचा छोटा शुभ्र पंखा तिच्या हाती देत मी म्हणालो.

"'तर मग हे घ्या, वाईट वाटायला नको म्हणून,' ती म्हणाली व पंख्यातून एक पीस उपटून तिने ते मला दिले.

"मी ते पीस घेतले. माझा आनंद आणि कृतज्ञभाव केवळ नजरेनंच मी व्यक्त केला. मी नुसता आनंदी आणि तृप्त नव्हतो, तर सुखी होतो, हर्षभरित होतो, उदार होतो. इतःपर माझा मी राहिलो नव्हतो, तर ज्याला वाईट माहीतच नाही आणि जो फक्त भलंच करू शकतो असा परलोकीचा कुणी प्राणी बनलो होतो.

"ते पीस मी माझ्या हातमोजात खोवले आणि तिच्यापासून दूर जाण्यास असमर्थ ठरल्यामुळे जागच्या जागी खिळून उभा राहिलो.

"'पहा, पपांना नाच करायला सांगताहेत,' एका उंच, भव्य माणसाकडे बोट दाखवीत ती म्हणाली. कर्नलच्या हुद्द्यावरचे, रुपेरी खांदफिती लावलेले तिचे वडील यजमानीणबाई आणि काही इतर महिलांबरोबर दारापाशी उभे होते.

"'वारेन्का, इकडं या,' रत्नजडित शिरोभूषणांमधील यजमानीणबाईने हाक मारली.

"वारेन्का दरवाजाच्या दिशेने निघाली आणि तिच्या पाठोपाठ मी निघालो.

"'तुमच्या वडलांना नृत्यासाठी बोलवा बाई. प्योत्र व्लादीस्लाविच, ऐकणार ना माझं,' यजमानीण कर्नलना म्हणाली.

"वारेन्काचा बाप उंच, देखणा, भव्य आणि उत्तम तब्येत राखलेला म्हातारा होता. त्यांचा चेहरा लालबुंद होता आणि पहिल्या निकोलससारख्या पिळलेल्या पांढऱ्या मिशा त्यांनी राखल्या होत्या. त्यांचे पांढरे कल्ले त्यांच्या मिशांना भिडलेले होते, कपाळावरून केस मागे विंचरलेले होते. आणि त्यांच्या मुलीप्रमाणंच त्यांनी स्मित केलं म्हणजे त्यांचे डोळे आणि ओठ उजळत होते. त्यांचा बांधा भक्कम होता, लष्करी थाटात त्यांची रुंद छाती पुढं आलेली होती, त्यांचे खांदे बळकट होते आणि त्यांचे पाय लांब, सुरेख होते. निकोलस पठडीच्या लष्करी बाण्याचे ते जुन्या पद्धतीचे अंमलदार होते.

"आम्ही दारापाशी गेलो तेव्हा कर्नल विरोध करून म्हणत होते की, नाच कसा करायचा हे ते विसरले होते. पण तरीही त्यांनी स्मित केलं, तलवारीला हात घालून म्यानातून तिला बाहेर उपसलं आणि त्यांच्या सेवेला तत्परतेनं उभ्या असलेल्या एका तरुणाच्या हाती तलवार सोपविली. नंतर उजव्या हातावर नमदी हातमोजा ओढून, 'सर्व काही नियमाप्रमाणं' असं स्मितपूर्वक म्हणत त्यांनी आपल्या मुलीचा हात धरला आणि योग्य तालाची वाट पहात ते नृत्याच्या पवित्र्यात उभे राहिले.

"माझूर्काचे सूर सुरू होताच त्यांनी एक पाय दाणदिशी आपटला आणि दुसऱ्या पायावर गिरकी घेतली. त्यांची उंच धिप्पाड आकृती नृत्यदालनात भिरभिरू लागली. कधी सावकाशपणं आणि डौलानं, तर कधी वेगानं आणि दमदारपणं ते आपलं एक पाऊल दुसऱ्या पावलावर आपटत होते. वारेन्काची लवचिक आकृती त्यांच्याशेजारी तरंगत होती. त्यांच्या पावलांबरोबर आपल्या छोट्या शुभ्र सॅटिनच्या पावलांना नकळतपणं आणि नेहमी योग्य वेळेला कमी-अधिक मापात ती जुळवून घेत होती. त्या जोडीच्या प्रत्येक हालचालीला सर्व पाहुणे निरखून पहात होते. मी केवळ कौतुकाची भावना अनुभवत नव्हतो, तर एक गहिरी उन्माद-भावना मला जाणवत होती. कर्नलांचे बूट पाहून तर मला अंतःकरणात गलबलून आले. ते चांगले कमावलेल्या कातड्याचे बूट होते, पण त्यांना उंच टाचा नव्हत्या आणि नव्या फॅशनच्या टोकदार अंगठ्यांऐवजी ते पुढील अंगास फताडे होते. बटालियनच्या चांभारानं ते बूट बनवले होते हे उघड होतं. 'आपल्या लाडक्या मुलीला छानदार पोषाख घालून समाजात मिरवता यावं म्हणून ते फॅशनेबल बुटांऐवजी सामान्य बूट वापरत आहेत,' मी मनाशी विचार केला आणि म्हणून त्यांचे फताडे बूट पाहून मला छातीत गदगदून आल्यासारखं झालं. एकेकाळी ते सुंदर नाचत असावेत हे कुणालाही सहज दिसत होतं, पण आता त्यांचं शरीर बोजड बनलं होतं आणि मोठ्या सायासांनी ते घेऊ पहात असलेल्या झटपट आणि सुंदर वळणांना साकार करायला आता त्यांचे पाय तेवढे लवचिक राहिले नव्हते. पण त्यांनी दालनामध्ये दोन चकरा सुरेख मारल्या. त्यांनी जेव्हा झटकन पावलं पसरली, मग परत एकत्र जुळवली आणि एका गुडघ्यावर जरा जोरातच ते खाली पडले तेव्हा तिनं स्मित करीत

आपला अडकलेला झगा सोडवून घेतला आणि त्यांच्याभोवती डौलानं तरंगत गिरकी मारली. सर्वांनी टाळ्यांचा कडकडाट केला. जेव्हा ते धडपडत परत नीट उभे झाले तेव्हा त्यांनी प्रेमानं आपल्या मुलीच्या कानांवर आपले हातांचे पंजे ठेवले आणि तिच्या कपाळाचं चुंबन घेतलं. मग तिला घेऊन ते माझ्यापाशी आले. मी तिचा नाचातला जोडीदार होतो असा त्यांचा समज झाला होता. पण मी तिचा त्या नाचातला जोडीदार नाही असं मी त्यांना सांगितलं.

"'काही हरकत नाही, आता तुम्ही तिची साथ करा,' प्रेमानं स्मित करीत ते म्हणाले आणि आपली तलवार त्यांनी परत म्यानात सरकवली.

"ज्याप्रमाणं बाटलीमधून पहिला थेंब ओतला म्हणजे त्या पाठोपाठ सबंध ओघच्या ओघ वाहतो, त्याप्रमाणं वारेन्काबद्दल वाटणाऱ्या प्रेमानं माझ्या अंतःकरणामधला सर्व प्रेमाचा लोंढा मोकळा सुटला. साऱ्या जगाला मी प्रेमानं कवटाळलं. रत्नजडित शिरोभूषण घातलेल्या यजमानीण-बाईबद्दल, तिच्या नवऱ्याबद्दल, तिच्या पाहुण्यांबद्दल, तिच्या हुजऱ्यांबद्दल, एवढंच नव्हे तर माझ्यावर चिडलेल्या दुष्ट अनीसीमोवबद्दलसुद्धा मला प्रेम वाटू लागलं होतं. फताडे बूट घातलेल्या आणि तिच्यासारखंच स्मित करणाऱ्या तिच्या वडिलांविषयी तर मला विलक्षण ममता वाटत होती.

"माझूर्का संपला आणि आमच्या यजमानांनी आम्हाला जेवणासाठी पाचारण केलं. पण कर्नल ब. यांनी मात्र नकार दिला, कारण त्यांना सकाळी लौकर उठणं आवश्यक होतं. वारेन्काला ते आपल्याबरोबर घेऊन जातील अशी मला भीती वाटली, पण ती आपल्या आईबरोबर मागं राहिली.

"जेवणानंतर मी कबूल केलेला क्वाड्रिल तिच्याबरोबर नाचलो. दरम्यान माझं सुख त्याहून अधिक मोठं असू शकणार नाही असं भासत असताना ते वाढतच जात होतं. प्रेमाविषयी आम्ही काहीही बोललो नाही. तिचं माझ्यावर प्रेम होतं अथवा नाही असं मी तिला विचारलं नाही, किंवा स्वतःलाही तसा प्रश्न केला नाही. मी तिच्यावर प्रेम करत

होतो एवढंच पुरेसं होतं. पण काहीतरी कारणानं माझ्या सुखात विघ्न येईल एवढीच एक भीती मला वाटत होती.

"जेव्हा मी घरी आलो, स्वतःचे कपडे उतरवले आणि बिछान्यावर अंग टाकण्याचा विचार केला, तेव्हा मला जाणीव झाली की, झोपणं सर्वथा अशक्य आहे. माझ्या एका हातात मी तिच्या पंख्याचं पीस धरलं होतं आणि तिला व तिच्या आईला त्यांच्या घोडागाडीपाशी निरोप द्यायला गेलो होतो तेव्हा तिनं मला दिलेला एक हातमोजाही मी हातात धरला होता. त्या स्मरणवस्तूंकडे टक लावून पहात असताना परत तिचा चेहरा माझ्या नजरेसमोर उभा राहिला. दोनपैकी एका जोडीदाराला निवडण्याच्या क्षणी माझ्या स्वभावाचा अंदाज घेऊन मधुर आवाजात ती म्हणाली होती: 'एवढा अभिमान?' आणि मग आनंदानं आपला हात तिनं माझ्यापुढं धरला होता. किंवा जेवणाच्या टेबलापाशी शँपेनचे घुटके घेताना आपल्या ग्लासावरून प्रेमळ नजरेनं टक लावून ती मला पहात होती. पण सर्वांत मला ती आवडली होती तिच्या वडलांबरोबर नाच-ताना. त्यांच्या शेजारून ती डौलानं तरंगत होती, आपल्या वडिलांवि-षयी आणि स्वतःविषयीही वाटणाऱ्या अभिमानानं आणि आनंदाच्या भा-वनेनं सभोवतालच्या रसिक प्रेक्षकांकडं ती पहात होती. नकळतपणं ती दोघं माझ्या मनात एकरूप झाली होती आणि त्यांच्याबद्दलच्या अतीव मायेनं माझं अंतःकरण भरून गेलं होतं.

"त्यावेळी माझा भाऊ—जो आता जिवंत नाही—आणि मी एकटेच रहात होतो. माझ्या भावाला चार माणसात मिसळायला आवडत नसे आणि बॉलनृत्यांना तो कधीही जात नसे. कँडिडेट पदवीपरीक्षेची तयारी तो करीत होता आणि अगदी किता घेण्याजोगं आयुष्य जगत होता. तो झोपला होता. उशीत खुपसलेलं आणि पांघरुणानं अर्धं झाकलेलं त्याचं डोकं पाहून मला त्याच्याबद्दल वाईट वाटलं. तसं वाटायचं कारण माझं सुख त्याला ठाऊक नव्हतं आणि त्यात तो वाटेकरी होत नव्हता. आमचा भूदास हुजऱ्या पेत्रूशा मेणबत्ती पेटवून माझ्या दिमतीला आला होता. माझे कपडे उतरवायला तो मला मदत करू इच्छित होता पण मी त्याला रजा दिली. त्याचा पेंगलेला चेहरा आणि विस्कटलेले केस पाहून मला दया आली होती. आवाज न करण्याचा प्रयत्न करीत चोरपावलांनी मी

माझ्या खोलीत गेलो आणि बिछान्यावर बसलो. मला एवढा आनंद झाला होता की, त्यापायी झोप येत नव्हती. खोलीत फार गरम होऊ लागले. म्हणून गणवेष न उतरवताच मी गुपचूप हॉलमध्ये गेलो, अंगात मोठा कोट चढविला, बाहेरचं दार उघडलं आणि घराबाहेर पडलो.

"बॉलनृत्याचं ठिकाण जेव्हा मी सोडलं होतं तेव्हा जवळ जवळ पाच वाजले होते. तेव्हापासून सुमारे दोन तास लोटले होते. मी घराबाहेर पडलो त्यावेळी उजाडलं होतं. लेन्टच्या सणावेळची वैशिष्टयपूर्ण हवा होती. धुकं पसरलेलं, रस्त्यावर वितळत असलेलं ओलं बर्फ आणि सगळ्या छपरांवरून टपटप गळणारं पाणी. त्यावेळी ब. कुटुंब शहराच्या सीमेपाशी रहात होतं. तिथं मोकळ्या मैदानाच्या एका टोकाला मुलींची शाळा होती आणि दुसऱ्या टोकाला लोक फिरायला जात. आमच्या निवांत छोटया गल्लीला ओलांडून मी हमरस्त्यावर आलो. माणसांची वर्दळ सुरू झाली होती. इमारती लाकूड लादलेल्या घसरगाडया धावत होत्या आणि त्यांच्या पट्ट्या बर्फातून घुसून थेट फरसबंदीपर्यंत घासत होत्या. रोगण लावलेल्या जोखडांमधल्या घोडयांची डोकी तालात डुलत होती, खांद्यांवर तागाच्या चटया पांघरलेले आणि पायात प्रचंड बूट घातलेले गाडीवान आपल्या घसरगाडयांशेजारून पाणथळ बर्फ तुडवीत चालत होते, रस्त्याच्या दोन्ही बाजूंची उंच घरं धुक्यात गुरफटलेली होती आणि ह्या सर्व गोष्टी मला विशेष प्रिय वाटत होत्या, महत्त्वाच्या वाटत होत्या.

"त्यांचं घर जिथं उभं होतं त्या मैदानापाशी मी पोहोचलो तेव्हा फिरण्याच्या जागेवर मला काहीतरी मोठं आणि काळं दिसलं. रणवाद्याचे आणि ड्रमचे आवाज मला ऐकू आले. हा सारा वेळ माझं हृदय गाणं गात होतं आणि मधून मधून माझूर्काचे सूर मनात उमटत होते. पण हे वेगळं संगीत होतं, कठोर होतं आणि अभद्र होतं.

"'काय असावं बरं हे?' मी नवल करत होतो. मैदानातून आडव्या जाणाऱ्या निसरडया गाडीरस्त्यानं मी त्या आवाजांच्या दिशेनं चालू लागलो. सुमारे शंभर पावलं अंतर चालून गेल्यावर धुक्यामधून माणसांचा घोळका मला स्पष्ट दिसू लागला. ते सैनिक होते. 'कवायत' मी मनाशी म्हटलं आणि तेलकट डाग पडलेला झगा आणि जाकीट घातलेल्या,

एक मोठं गाठोडं घेऊन जाणाऱ्या एका लोहाराच्या संगतीनं वाटचाल करत राहिलो. काळे कोट घातलेल्या शिपायांची दुहेरी ओळ एकमेकां-समोर तोंड करून स्तब्ध उभी होती आणि त्यांनी आपल्या बंदुका बाजूला धरल्या होत्या. त्यांच्यामागं रणवाद्य वाजवणारा आणि ड्रम वाजवणारा पोरगे उभे होते. तो कर्कश्य सूर ते पुन्हा पुन्हा वाजवत होते.

"'त्यांचं काय चाललंय?' माझ्याशेजारी उभ्या असलेल्या लोहा-राला मी विचारलं.

"'पळून जायचा प्रयत्न केल्याबद्दल एका ताताराला ओळीमधून फिरवताहेत,' दुहेरी ओळीच्या दूर टोकाला निरखून पहात लोहार तुटकपणं म्हणाला.

"मीसुद्धा त्याच दिशेनं पाहिलं आणि ओळींमधून माझ्या दिशेनं काहीतरी भयंकर येत असलेलं दिसलं. कमरेपर्यंत उघडचा केलेल्या माण-साला बंदुकीच्या दोन टोकांना आडवं बांधलेलं होतं आणि दोन शिपायांनी बंदुकीची दोन टोकं धरलेली होती. त्याच्या शेजारून मोठ्या पायघोळ कोटातला आणि टोपी घातलेला एक उंच अधिकारी चालत होता. ती आकृती माझ्या परिचयाची भासली. त्या कैद्याचं सगळं अंग थरथरत होतं, वितळणाऱ्या बर्फामधून त्याचे पाय फरफटत जात होते आणि रांगे-च्या दोन्ही बाजूंनी त्याच्यावर बुक्क्यांचा वर्षाव होत होता. तो कैदी मागं झुकला की शिपाई त्याला पुढं लोटत होते आणि पुढं झुकला की मागं लोटत होते, पण त्याला खाली पडू मात्र देत नव्हते. आणि त्याच्या शेजारून कधीही मागं न राहता तो उंच अधिकारी खंबीरपणं चालत होता. तांबडचा चेहऱ्याचा, पांढऱ्या मिशांचा आणि कल्ले राखलेला तो अधिकारी म्हणजे तिचे वडील होते.

"प्रत्येक प्रहारासरशी तो कैदी वेदनेनं वाकडा झालेला चेहरा जणू चकित झाल्याप्रमाणं जेथून प्रहार झाला त्या दिशेला वळवत होता आणि पांढऱ्या दातांना आवळून सतत काहीतरी पुटपुटत होता. तो माझ्या जवळ येईपर्यंत त्याचे शब्द मला समजले नाही. बोलण्यापेक्षा तो हुंदकेच देत होता: 'बंधूंनो, दया करा; दया करा बंधूंनो.' पण बंधू दया दाखवत नव्हते. जेव्हा ती मिरवणूक अगदी थेट माझ्यासमोर आली तेव्हा मी पाहिलं की, एक शिपाई ठामपणं पाऊलभर पुढं आला आणि त्या ताता-

राच्या पाठीवर त्यानं आपला चाबूक एवढ्या जोरानं उडवला की, चाबकाची वादी हवा कापताना सळसळ आवाज करत गेली. तातार पुढं कोसळला, पण शिपायांनी हिसका देऊन त्याला वर उचललं, मग दुसऱ्या बाजूनं आणखी एक प्रहार, मग आणखी एक... कर्नल त्या कैद्याजवळून चालत होते. कधी ते स्वतःच्या पावलांवर नजर टाकत होते, कधी कैद्याकडं कटाक्ष फेकत होते. ते खोल श्वास घेत होते, त्यांचे गाल फुगत होते आणि मुरडलेल्या ओठांमधून सावकाशपणं हवा बाहेर टाकत होते. मी उभा होतो तिथून मिरवणूक पुढं गेली तेव्हा शिपायांच्या रांगेमधून त्या कैद्याची पाठ मला ओझरती दिसली. तिचं वर्णन करणं अशक्य होतं: पट्टेदार, ओली, लाल, ओळखू न येणारी. तो मानवी देहाचा एक भाग होता ह्यावर माझा विश्वासच बसत नव्हता.

"'देवा रे देवा!' माझ्याशेजारी उभा असलेला लोहार पुटपुटला.

"मिरवणूक पुढं सरकत होती. त्या आकसणाऱ्या, धडपडणाऱ्या प्राण्यावर दोन्ही बाजूंनी प्रहार घडत होते, ड्रम वाजत होता, रणवाद्य कर्कश्य आवाज करत होते आणि उंच, भव्य कर्नल त्या कैद्याजवळून ठामपणं चालत होते. अचानक कर्नल थांबले आणि एका शिपायापाशी झपझप चालत गेले.

"'चुकवलास? थांब, तुला दाखवतो!' संतापल्या आवाजातील त्यांचे शब्द मला ऐकू आले. 'हा बघ! घे! आणि हा घे!' नमदी मोजामधला भक्कम हात त्या छोट्या दुबळ्या शिपायाच्या तोंडावर फडा-फडा प्रहार करताना मला दिसला. ताताराच्या लालबुंद पाठीवर त्या शिपायानं पुरेशा ताकदीनं चाबूक उडवला नव्हता म्हणून त्याला ही शिक्षा मिळाली होती.

"'ताजे चाबूक आणा!' कर्नल ओरडले. ते गर्रकन मागं वळले आणि मी त्यांच्या दृष्टीला पडलो. मला न ओळखल्याचा बहाणा करून त्यांनी रागानं डोळे वटारले आणि चटकन पाठ फिरवली. जणू काही-तरी लज्जास्पद कृत्य करताना पकडले गेल्यासारखं मला वाटलं आणि नजर कुठं वळवावी ते न उमगून मी कमालीचा ओशाळलो. मान खाली घालून मी घाईघाईनं घरी परतलो. वाटेत सबंध वेळ ड्रमचा आवाज माझ्या कानात घुमत होता, कर्कश्य तुतारी वाजत होती, 'दया करा,

बंधू' शब्द ऐकू येत होते, 'हा घे! हा घे!' असा कर्नलांचा रागीट, आत्मविश्वासू ओरडण्याचा आवाज ऐकू येत होता. माझ्या काळजाची वेदना इतकी तीव्र होती की जणू ती शारीरिक वेदना बनत होती, आणि ओकारीच्या भावनेनं वाटेत अनेक वेळा मला थांबावं लागलं. त्या दृश्या-मुळं माझ्यात भरलेली सर्व भीती मी फेकून दिली पाहिजे असं वाटत होतं. घरी मी कसा पोहोचलो आणि बिछान्यात पडलो ते मला आठवत नाही, पण ज्या क्षणी झोप लागत होती त्या क्षणी मला ते सर्व काही पुन्हा दिसू लागलं आणि ऐकू येऊ लागलं. मी ताडकन उठलो.

"'मला माहीत नाही असं काहीतरी त्यांना माहीत असलं पाहिजे,' कर्नलांविषयी विचार करताना माझ्या मनात आलं. 'त्यांना जे माहीत होतं ते जर मला माहीत झालं, तर मला समजेल आणि जे मी पाहिलं त्यामुळं मला एवढी वेदना होणार नाही.' पण कितीही डोकं फोडलं तरी कर्नलना माहीत असलेलं मला समजू शकलं नाही. संध्याकाळपर्यंत मला झोप लागली नाही. शेवटी एका मित्राला भेटायला म्हणून मी गेलो आणि शुद्ध हरपेपर्यंत दारू प्यायलो.

"मी जे पाहिलं होतं ते वाईट होतं असा निष्कर्ष मी काढला असं तुम्हाला वाटतं? मुळीच नाही. 'जे मी पाहिलं होतं ते जर एवढ्या खात्रीपूर्वक करण्यात आलं होतं आणि ते आवश्यक समजून प्रत्येकानं मान्य केलं होतं, त्याअर्थी मला माहीत नसलेलं असं काहीतरी त्यांना ठाऊक होतं,' अशा निष्कर्षाप्रत मी आलो आणि ते काय ह्याचा शोध घ्यायचा प्रयत्न केला. पण मला ते कधीच गवसलं नाही. आणि ते न गवसल्यामुळं माझा इरादा असूनही लष्करी नोकरीत मी दाखल होऊ शकलो नाही. केवळ लष्करीच नव्हे तर कुठल्याच नोकरीत मी जाऊ शकलो नाही आणि तुम्ही पाहता त्याप्रमाणं एक कुचकामी माणूस बनलो."

"तुम्ही किती कुचकामी ठरलात ते आम्हाला चांगलं ठाऊक आहे," एक पाहुणा म्हणाला. "त्यापेक्षा असं बोलणं योग्य ठरेल की, तुम्ही नसता तर किती लोक कुचकामी बनले असते!"

"छे:, हे अगदी मूर्खपणाचं बोलणं झालं," इवान वासिल्येविच सात्त्विक संतापाने उद्गारले.

"आणि तुमच्या प्रेमाचं काय झालं?" आम्ही विचारले.

"माझ्या प्रेमाचं? त्या दिवसापासून माझं प्रेम झुरत गेलं. जेव्हा जेव्हा ती आपलं विचारमग्न स्मित करायची, तेव्हा तेव्हा माझ्या मनात अपरिहार्यपणं मैदानात पाहिलेल्या कर्नलांची आठवण यायची. त्यामुळं मला अवघडल्यासारखं आणि खिन्न वाटायचं. हळूहळू मी तिला भेटणं बंद केलं. माझं प्रेम संपून गेलं.

"तर काही वेळा असं घडतं आणि अशासारखा प्रसंग माणसाचं सबंध आयुष्य बदलून टाकतो, त्याला वेगळी दिशा देतो. आणि तुम्ही परिस्थितीची भाषा करता..." ते म्हणाले.

१९०३

वसेवोलोद गार्शिन

लाल फूल

(इवान सेर्गेयेविच तुर्गेनेव यांच्या स्मृतीला)

व्सेवोलोद गार्शिन (१८५५-१८८८)—रशियन तालुक्याच्या गावी विशेष सधन नसलेल्या उमराव कुटुंबात जन्म झाला.

बाल्कनच्या स्लावांना स्वतंत्र करण्यासाठी १८७७ साली तुर्कस्तानशी सुरू झालेल्या युद्धामुळे पीटरबुर्गमधील इन्स्टिटयूटच्या शिक्षणात खंड पडला. गार्शिन स्वेच्छेने सैन्यात भरती झालें. रशियन-तुर्की युद्धाच्या आठवणी ताज्या असतानाच लिहिलेल्या 'चार दिवस' कथेमुळे गार्शिन यांचे नाव गाजलें. सर्वसामान्य माणसावर युद्धाचे कोणते अनैसर्गिक आणि वाईट परिणाम घडतात, ह्याचे वर्णन त्या कथेत केलें होते.

सोविएत टीकाकार ब्याली यांच्या मते गार्शिन यांचा नायक म्हणजे "विवेकबुद्धी हादरलेला आणि कडवट बनलेला माणूस. केवळ हीच माणसे अत्याचारी जगाविरुद्ध खंबीरपणे उभो राहू शकतात आणि जीवनाच्या कोंडींमधून माणसाला योग्य वाट शोधण्यास मदत करतात."

गार्शिन यांच्या कथांचे नायक सद्यःकालीन दुष्ट प्रश्नांना सोडविणे स्वतःचे वैयक्तिक कार्य मानतात. देशाच्या भवितव्याबाबतीची ही विलक्षण तळमळ गार्शिन यांचे तुर्गेनेव यांच्याशी साम्य दाखविते. १८८० साली तुर्गेनेव यांनी गार्शिनना लिहिले होते: "स्वतःच्या कार्यावर प्रामाणिक प्रेम करणाऱ्या प्रत्येक वृद्ध लेखकाला जेव्हा स्वतःचे वारस सापडतात, तेव्हा त्याला खूप आनंद होतो. तुम्ही त्या वारसांमधील एक आहात."

अकाली मृत्यूमुळे ह्या आशादायी साहित्यिकाचे लेखन तुटले. गार्शिन यांचे शेवटचे पुस्तक बालकांसाठी लिहिले गेलें: 'प्रवासी बेडकी.'

१

"महान सम्राटांच्या नावानं सार्वभौम सम्राट प्योत्र पहिले यांच्या वतीनं, मी जाहीर करतो की हे वेडयांचं घर तपासणीला उघडं आहे!"

हे शब्द मोठ्या, भसाड्या आवाजात उच्चारले गेले. शाईचे डाग पडलेल्या मेजावरील कोपरे दुमडलेल्या मोठ्या नोंदणीवहीत रुग्णाची नोंद करणाऱ्या इस्पितळातील कारकुनाला हसू आवरले नाही. पण रुग्णाबरोबर आलेले दोघे तरुण मात्र हसले नाहीत: आत्ताच आगगाडी-मधून ज्याला ते घेऊन आले होते त्या वेड्या माणसाबरोबर संपूर्ण दोन दिवस आणि रात्री झोपेविना काढल्यामुळे त्यांना धड उभे राहणे अशक्य झाले होते. अलीकडच्या स्टेशनावर तो एवढा बेफाम बनला होता की, त्याच्या मुसक्या बांधणारा वेड्याचा सदरा त्याला घालावा लागला होता. त्यासाठी कंडक्टरची आणि पोलीसाची मदत घ्यावी लागली होती. तशा बांधल्या अवस्थेत त्याला शहरात आणण्यात आले होते व इस्पित-ळात दाखल करण्यात आले होते.

तो भयानक दिसत होता. त्याच्या वेडाच्या झटक्यावेळी चिंध्या बनलेल्या त्याच्या राखाडी वस्त्रावर गळ्याशी रुंद शिवणीचे, जाड्या-भरड्या कॅन्व्हासचे घट्ट जाकीट घातलेले होते. लांब बाह्यांनी त्याचे हात छातीवर आडवे जखडून टाकले होते व त्यांची टोके त्याच्या पाठीशी बांधलेली होती. त्याचे विस्फारलेले लालबुंद डोळे (दहा दिवस तो झोपला नव्हता) विलक्षण चमकत होते; त्याचा खालचा ओठ अधूनमधून झटके देत होता; त्याचे कुरळे विस्कटलेले केस त्याच्या कपाळावर आयाळी-सारखे पडले होते; कचेरीत एका कोपऱ्यापासून दुसऱ्या कोपऱ्यापर्यंत तो भराभरा, दाणदाण पावले टाकीत येरझाऱ्या घालीत होता; जुन्या

कागदपत्रांच्या फडताळांकडे आणि मेणकापडी आवरणांच्या खुर्च्यांकडे स्थिर नजरेने पहात होता व अधूनमधून त्याच्या बरोबर आलेल्या माणसांकडे कटाक्ष फेकीत होता.

"त्याला आत घेऊन जा. उजवीकडं."

"मला माहीत आहे. गेल्या वर्षी मी इथं होतो. इस्पितळाची आम्ही पाहणी केली होती. मला सर्व माहीत आहे आणि मला फसवणं फार अवघड जाईल," रुग्ण म्हणाला.

तो दाराकडे वळला. त्याला जाऊ देण्यासाठी दरवानाने दार उघडले. कचेरीमधून तो तसाच वेगवान, ठाम चालीने, पाय दणदण आपटत बाहेर पडला. त्याने आपले वेडे डोके ताठ राखले होते. उजवीकडील वेड्यांच्या विभागात तो अक्षरशः पळत गेला. त्याच्या बरोबरच्या लोकांना त्याच्याशी वेग राखणे अवघड ठरले.

"घंटी वाजव. मला शक्य नाही. तुम्ही माझे हात बांधले आहेत."

दरवानाने दार उघडले आणि रुग्ण व त्याच्या बरोबर आलेली माणसे इस्पितळात शिरली.

जुन्या धर्तीच्या बांधणीची ती मोठी दगडी इमारत होती. दोन मोठे हॉल – एक भोजनाचा व दुसरा शांत रुग्णांसाठी सामायिक. काचेच्या दाराचे प्रशस्त कॉरीडॉर फुलांच्या बागेपर्यंत गेले होते. खालच्या मजल्यावर रुग्णांसाठी वीस स्वतंत्र खोल्या होत्या. त्याच मजल्यावर दोन अंधाऱ्या खोल्या होत्या – एकीला गाद्यागिरद्या बसवल्या होत्या व दुसरीला फळ्या – बेभान रुग्णांसाठी. आणि कमानदार छताची एक मोठी कळकट खोली – न्हाणीघर. वरच्या मजल्यावर स्त्रिया होत्या. मधून मधून आरोळ्या आणि किंचाळ्या उमटणारी गोंधळलेली गजबज तेथून ऐकू यायची. इस्पितळात वस्तुतः ऐंशी रुग्णांची सोय होती, पण आसपासच्या गुबेर्नियांमध्ये अशा प्रकारचे हे केवळ एकमेव इस्पितळ असल्यामुळे प्रत्यक्षात तेथे तीनशे रुग्णांना कोंबलेले होते. त्या छोटया छोटया खोल्यांमध्ये चार किंवा पाच खाटासुद्धा टाकलेल्या होत्या. हिवाळ्यात रुग्णांना जेव्हा बागेत जाऊ देत नसत आणि लोखंडी गज लावलेल्या सर्व खिडक्या घट्ट बंद केल्या जात, तेव्हा इस्पितळात असह्य गुदमरायला व्हायचे.

नव्या रुग्णाला न्हाणीघरात नेण्यात आले. निरोगी माणूसही ह्या

खोलीला पाहून मनाने खचला असता. आजारी, बिघडलेल्या मनाला तर अधिकच वेदना होत. कमानदार छताच्या, चिकट दगडी फरशीच्या त्या मोठ्या खोलीत खिडकी फक्त कोपऱ्यात होती व तेथूनच प्रकाश येत होता. भिंतींना आणि कमानींना काळपट तांबड्या तैलरंगाने रंगविलेले होते. घाणीने काळवंडलेल्या फरशीच्या पातळीशी येतील असे दोन लांबट आकाराचे पाण्याने भरलेले दगडी हौद जमिनीत पुरलेले होते. खिडकीसमोरच्या कोपऱ्यात पाणी तापविण्यासाठी नळकांड्याच्या आकाराचा बंब आणि तांब्याचा प्रचंड चुलाणा होता. तेथे तांब्याच्या नळ्यांचे व नळांचे जाळे विखुरले होते. आजारी मेंदूला हे दृश्य फार अशुभ भासायचे आणि न्हाणीघराचा गलेलठ्ठ, सदा घुम्या स्वभावाचा युक्रेनी राखणदार त्या भीतीमध्ये आणखीच भर घालायचा.

जेव्हा रुग्णाला आंघोळ घालण्यासाठी ह्या भयानक खोलीत आणले आणि इस्पितळाच्या मुख्य डॉक्टरांनी नेमून दिलेल्या उपचारपद्धतीनुसार रुग्णाच्या मानेवर फोडाचा लेप लावला, तेव्हा तर दहशतीने आणि संतापाने रुग्णाने थयथयाट केला. एकाहून एक विचित्र, राक्षसी विचार त्याच्या मेंदूमध्ये भिरभिरू लागले. हे काय? चौकशी? त्याच्या शत्रूंनी त्याचा निकाल लावण्यासाठी ठरविलेली वधाची गुप्त जागा? किंवा हाच तो प्रत्यक्ष नरक? शेवटी त्याच्या डोक्यात प्रकाश पडला की, ही एक प्रकारची कसोटी होती. त्याच्या निकराच्या प्रतिकाराला न जुमानता त्याला विवस्त्र करण्यात आले. आजारपणापायी दुप्पट ताकद आल्यामुळे तो सहजपणे अनेक राखणदारांच्या हातून निसटला व ते भुईसपाट कोसळले. शेवटी चौघांनी त्याला खाली पाडले, त्याचे हातपाय पकडून धरले व उबदार पाण्यात त्याला सोडले. त्याला ते उकळते भासले आणि त्याच्या आजारी मेंदूत उकळत्या पाण्याने व तापल्या लोखंडाने होणाऱ्या छळांविषयीच्या वेडपट विचारांची गर्दी उसळली. पाण्याने श्वास घुसमटत असताना, राखणदारांच्या पकडीमधून सुटण्यासाठी जोरदार धडपडत असताना, अर्धवट दाबलेल्या आवाजात त्याने असंबद्ध भाषण ओरडून म्हटले. प्रत्यक्षात ते भाषण ऐकणाऱ्यालाच केवळ त्याचे स्वरूप समजले असते. प्रार्थना आणि शिव्या यांचे ते मिश्रण होते. पूर्ण थकून जाईपर्यंत तो किंचाळत व धडपडत राहिला. मग अगदी शांतपणे,

तोंडावरून गरम आसवे ओघळवीत त्याने जे वाक्य उच्चारले, ते त्याच्या पूर्वीच्या भाषणापेक्षा पूर्ण वेगळे होते.

"पवित्र हुतात्म्या संत गीओर्गी! तुझ्या हाती माझा देह सोपवतोय. पण आत्मा – नाही, नाही!"

तो शांत झाला होता तरीही राखणदारांनी त्याला अजून धरून ठेवले होते. गरम पाण्याची आंघोळ व त्याच्या डोक्यावर ठेवलेली थंड बर्फाची पिशवी ह्यांनी आपली कामगिरी बजावली होती. पण जवळ-जवळ बधीर अवस्थेत त्याला पाण्यामधून बाहेर काढून फोडाचा लेप लावण्यासाठी स्टूलावर बसविण्यात आले, तेव्हा त्याने अंगातील अखेरची ताकद एकवटली व त्याच्या वेडचा मेंदूत परत स्फोट झाला.

"कशाबद्दल? कशाबद्दल?" तो किंचाळला. "मी कुणाचंही वाईट चिंतलं नाही. कशाबद्दल मला ठार मारताय? ओय-ओय-ओय! देवा! माझ्या आधी छळ झालेल्यांनो! तुमची प्रार्थना करतो, मला सोडवा..."

मानेवर लेपाचा जळता चटका बसताच त्याने जोरात धडपड केली. राखणदार त्याला आवरू शकेनात आणि काय करावे हे त्यांना सुचेना.

"त्याला काही इलाज नाही," लेप लावणारा सैनिक म्हणाला. "तो चोळला पाहिजे."

ह्या साध्या शब्दांचा रुग्णाने वेगळा अर्थ लावला व त्याचा थरकाप झाला. "चोळला पाहिजे? काय चोळला पाहिजे? कुणाला चोळला पाहिजे? मला!" त्याच्या मनात विचार आले व घाबरून त्याने डोळे घट्ट मिटले. सैनिकाने एका खरबरीत टुवालाची दोन टोके हातात धरली व रुग्णाच्या मानेवर टुवाल जोरजोराने घासला. फोडाच्या लेपाचा कागद मानेपासून अलग निघाला व कातडी सोलून निघाली. त्याजागी तांबडा-भडक चट्टा पडला. शांत आणि शहाण्या माणसालासुद्धा ह्या क्रियेपायी असह्य यातना झाल्या असत्या, रुग्णाला तर जगाची अखेर भासली. मनस्वी प्रयत्नांती त्याने स्वतःला पकडींमधून मोकळे केले आणि त्याचा नागडा देह फरशीवर धाडदिशी आपटला. त्याचे मुंडके तोडले होते अशी त्याची भावना झाली. त्याला मोठ्यांदा ओरडावेसे वाटले, पण जमले नाही. बेशुद्ध अवस्थेतच त्याला त्याच्या खाटेवर नेऊन ठेवण्यात आले. शुद्धीवर न येता तेथेच तो खूप वेळपर्यंत मेल्यागत गाढ झोपला.

२

रात्री त्याला जाग आली. सारे शांत होते. शेजारच्या मोठ्या खोलीत झोपलेल्या रुग्णांचे श्वासोच्छ्वास स्पष्ट ऐकू येत होते. दूरवर कुठेतरी, गाद्यागिरद्या लावलेल्या अंधाऱ्या खोलीत कोंडलेला वेडा विचित्र एकसुरी आवाजात स्वतःशीच बडबडत होता, तर वरच्या मजल्यावर बायकांच्या विभागात एक घोगरा आवाज कसलेतरी जंगली गाणे गात होता. आजारी माणूस हे सगळे आवाज ऐकत पडला होता. त्याच्या दुखऱ्या अवयवांमध्ये त्याला कमालीचा दुबळेपणा जाणवत होता व त्याच्या मानेत फार वेदना होत होत्या.

"मी कुठं आहे? मला काय झालंय?" त्याच्या मनात विचार आला. अचानक त्याच्या आयुष्यातील गेला महिना त्याच्या नजरेसमोर अत्यंत ठळकपणे उभा राहिला व तो आजारी आहे आणि त्याचा आजार कसला आहे, ह्याची त्याला जाणीव झाली. स्वतःच्या वेगवेगळया वेडपट विचारांची, शब्दांची आणि कृतींची त्याला आठवण झाली व त्याच्या देहातून शहारा गेला.

"ते सगळं संपलं, देवाची कृपा, सगळं संपलं!" तो पुटपुटला व परत झोपला.

लोखंडी गजांची उघडी खिडकी ज्या दिशेला होती, त्या दिशेला मोठ्या इमारती व दगडी कुंपण ह्यांच्या दरम्यानची छोटी मोकळी जागा होती. त्या जागेत कुणीही कधी जात नसे व जंगली झुडुपांचे आणि आत्ता वर्षाच्या ह्या काळात बहर आलेल्या फिकट जांभळया फुलांच्या झाडांचे जंजाळ माजले होते. खिडकीच्या थेट समोर, झुडुपांपलिकडे, उंच काळया कुंपणाची भिंत उभी होती व त्या भिंतीपलिकडून मोठ्या बागेतील झाडांचे चांदण्यात न्हालेले शेंडे डोकावत होते. उजवीकडे आतून प्रकाशित केलेल्या गजांच्या खिडक्यांची इस्पितळाची पांढरी इमारत उभी होती. डावीकडे शवगृहाची कोरी भिंत चांदण्यात शुभ्र चमकत होती. गजांच्या खिडक्यांमधून चांदणे खोलीत घुसले. बिछान्याचा काही भाग व त्यावर डोळे मिटून निजलेल्या रुग्णाचा रोड, फिकट चेहरा चांदण्यात उजळले. त्या चेहऱ्यावर वेडेपणाचा आत्ता लवलेश नव्हता. थकलेल्या माणसाची

ती गाढ निद्रा होती ; त्या निद्रेत स्वप्ने नव्हती, किंचितसुद्धा हालचाल घडत नव्हती, श्वाससुद्धा जाणवत नव्हता. काही सेकंदपर्यंत तो पूर्ण निरोगी अवस्थेत, जणू निरोगी असल्यागत जागा झाला. पण सकाळी उठला तेव्हा पूर्वीसारखाच तो वेडा होता.

३

"तुम्हाला कसं वाटतंय?" दुसऱ्या दिवशी डॉक्टरनी त्याला विचारले.

रुग्ण नुकताच झोपेतून जागा झाला होता आणि अजून पांघरुणाखाली निजून होता.

"उत्तम!" ताडकन उठून पायात सपाता घालीत व गाऊन ओढून घेत तो उत्तरला. "सुरेख! फक्त एकच त्रास : इथं!"

त्याने डोक्याची मागील बाजू बोटाने दाखविली.

"मी मान वळवली की खूप दुखतं. पण ते काही विशेष नाही. जेव्हा तुम्ही समजून घेता, तेव्हा सारं छान असतं ; आणि मी समजून घेतोय."

"तुम्ही कुठं आहात, माहीत आहे?"

"अर्थात, डॉक्टर! मी वेड्यांच्या घरात आहे. पण एकदा समजून घेतलं म्हणजे मग काही फरक पडत नाही. अगदी मुळीच नाही."

डॉक्टरांनी त्याच्या डोळ्यांमध्ये शोधकपणे पाहिले. व्यवस्थित राखलेल्या सोनेरी दाढीचा त्याचा मुलायम देखणा चेहरा आणि सोनेरी फ्रेमच्या चष्म्यामागील त्याचे शांत फिकट निळे डोळे अगदी शांत व अगम्य होते. तो निरीक्षण करीत होता.

"माझ्याकडं असं रोखून काय पाहताय? माझ्या आत्म्यात काय आहे, ते तुम्ही वाचू शकणार नाही," रुग्ण पुढे बोलू लागला, "पण मी तुमच्या मनातलं सगळं वाचू शकतोय. कशाला दुष्ट वागता? कशाला ह्या सगळ्या कमनशिबींना गोळा केलंय आणि त्यांना इथं पकडून ठेवताय? मला काहीच फरक पडत नाही : मला सर्व समजतं आणि मी शांत आहे. पण ते? कशाला हे छळ? ज्या माणसाच्या आत्म्यात

महान विचार, सार्वजनिक विचार येण्यापर्यंत मजल गेलेली आहे, त्याला तो कुठं राहतोय, त्याला काय जाणवतंय, ह्या गोष्टी महत्त्वाच्या नसतात. तो जगतोय अथवा नाही, ह्याचीही त्याला पर्वा नसते... खरं ना?"

"शक्य आहे," डॉक्टर उत्तरले. खोलीच्या एका कोपऱ्यापासून दुसऱ्या कोपऱ्यापर्यंत वेगाने येरझाऱ्या घालणाऱ्या, घोड्याच्या कातडीपासून बनविलेल्या प्रचंड आकाराच्या सपाता घासत चालणाऱ्या, रुंद किरमिजी पट्ट्यांच्या आणि मोठ्या फुलांच्या छापाच्या सुती गाऊनला फडकावणाऱ्या रुग्णाला नीट पाहता यावे म्हणून डॉक्टर कोपऱ्यातील खुर्चीवर बसले. डॉक्टरांबरोबर आलेले वैद्यकीय मदतनीस व परिचारक दारापाशीच दक्ष उभे होते.

"आणि माझ्यापाशी ती जाणीव आहे!" रुग्ण किंचाळला. "जेव्हा मला ती सापडली, तेव्हा माझा नव्यानं जन्म झाल्यासारखं मला वाटलं. संवेदना तीव्र बनल्या, कधी नव्हता एवढा मेंदू तल्लखपणं काम करू लागला. पूर्वी तर्कांच्या आणि निष्कर्षांच्या लांब मार्गानं जे साध्य व्हायचं, ते आता अंतर्ज्ञानानं समजतं. तत्त्वज्ञानानं सिद्धांतरूपानं जे मांडलंय, ते प्रत्यक्षात मी साध्य केलंय. माझ्यात महान विचार मी अनुभवतोय की, अंतर आणि काळ म्हणजे निव्वळ कल्पना. मी सगळ्या शतकांमध्ये राहतो. मी अंतराविना जगतो, सर्वत्र अथवा कुठंच नाही, तुमच्या मर्जीनं ठरवा. म्हणून तुम्ही मला इथं धरून ठेवताय अथवा मोकळं सोडून देताय, मी स्वतंत्र अथवा बंधनात, ह्याबाबत मला काहीच फिकीर वाटत नाही. इथं माझ्यासारखेच आणखी काहीजण आहेत, असं माझ्या ध्यानात आलंय. पण बाकीच्या जमावाला अशी परिस्थिती फार भयानक आहे. त्यांना तुम्ही सोडून का देत नाही? कुणाला पाहिजे..."

"तुम्ही म्हणालात," डॉक्टरांनी त्याचे बोलणे मध्येच तोडले, "की तुम्ही काळ आणि अंतराच्या पलीकडं राहता. तरीही तुम्हाला मान्य करावं लागेल की, आपण ह्या खोलीत आहोत आणि आत्ता," डॉक्टरांनी खिशातून घड्याळ बाहेर काढून पाहिले, "साडेदहा वाजलेत, ६ मे १८** साल. काय म्हणणं आहे ह्यावर तुमचं?"

"काही नाही. मी कुठं आणि केव्हा राहतोय, माझ्या दृष्टीनं बिन-

महत्त्वाचं. जर **मला** हे बिनमहत्त्वाचं, तर **मी** सर्वत्र आणि नेहमी राहतोय असं सूचित होत नाही काय?"

डॉक्टरांनी स्मित केले.

"अचूक तर्कशास्त्र," ते उठत म्हणाले. "मी कबूल करतो, तुमचं बरोबर आहे. पुन्हा भेटू. तुम्हाला सिगार पाहिजे?"

"धन्यवाद," तो थांबला, त्याने सिगार घेतली आणि भेदरट अधीरतेने तिचे टोक चावून तोडले. "विचार करायला हिच्यामुळं मदत होते," तो म्हणाला. "हे जग सूक्ष्म आहे. एका टोकाला अल्कली, दुसऱ्या टोकाला आम्लं... जगाचा असा समतोल आहे आणि त्याची परस्परविरुद्ध टोकं तटस्थ केलीत. अच्छा, डॉक्टर!"

डॉक्टर पुढे निघाले. अनेक रुग्ण स्वतःच्या खाटांपाशी ताठ उभे राहून त्यांची वाट पहात होते. मानसोपचारतज्ज्ञाला त्याच्या वेड्या रुग्णांपासून जसा आदर लाभतो, तसा कुणाही साहेबाला त्याच्या हाताखालच्या लोकांपासून आदर लाभत नाही.

एकटा राहिलेला रुग्ण स्वतःच्या खोलीत जोरजोराने फेऱ्या मारीत होता. त्याला चहा देण्यात आला; त्याने उभ्या उभ्याच तो मोठा कप दोन घुटक्यात रिकामा केला, पांढऱ्या पावाचा भलामोठा तुकडा निमिषार्धात गट्ट केला. मग तो बाहेर गेला आणि कित्येक तास अखंडपणे इमारतीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत लांब ढांगा टाकीत भराभरा फेऱ्या मारीत राहिला. पावसाळी दिवस असल्यामुळे रुग्णांना बागेत जाऊ देत नव्हते. जेव्हा डॉक्टरांचा मदतनीस नव्या रुग्णाला शोधू लागला, तेव्हा कॉरीडॉरच्या टोकाकडे त्याला बोट दाखविण्यात आले. बागेच्या दाराच्या काचेच्या तावदानाला चेहरा दाबून फुलांचा ताटवा बघत रुग्ण उभा होता. एका असाधारण भडक लाल रंगाच्या फुलाने, पॉपीच्या एका जातीच्या फुलाने, त्याचे लक्ष वेधून घेतले होते.

"कृपया वजन करून घ्यायला या," त्याच्या खांद्याला स्पर्श करीत मदतनीस म्हणाला.

जेव्हा रुग्णाने त्याच्याकडे चेहरा वळविला, तेव्हा भीतीने तो एकदम दचकला: रुग्णाच्या चमकत्या डोळ्यांमध्ये जंगली दुष्टपणा आणि तिटकारा काठोकाठ भरला होता. डॉक्टरांच्या मदतनीसाला पाहताच त्याने

तात्काळ चेहऱ्यावरील भाव बदलला आणि जणू खोल विचारात गढल्या-प्रमाणे, एकही शब्द न उच्चारता, मदतनीसामागून आज्ञाधारकपणे चालत गेला. डॉक्टरांच्या खोलीत ते गेले. रुग्ण स्वतःच वजनाच्या काट्यावर जाऊन उभा राहिला. मदतनीसाने त्याचे वजन पाहिले व नोंदणीवहीत त्याच्या नावासमोर लिहिले – १०९ पौंड. दुसऱ्या दिवशी वजन १०७ पौंड भरले आणि तिसऱ्या दिवशी १०६.

"जर पुढं असंच होत गेलं, तर तो फार काळ जगणार नाही," डॉक्टर म्हणाले आणि रुग्णाला अधिक चांगले खाऊ घालण्याची त्यांनी आज्ञा दिली.

पण डॉक्टरांनी आज्ञा देऊन आणि रुग्णाची असाधारण भूक असून-ही, दर दिवसागणिक रुग्णाचे वजन घटत होते आणि मदतनीस दर दिवसाला नोंदवहीत पौंडांची संख्या कमी कमी लिहीत होता. रुग्ण जवळ-जवळ झोपत नव्हता आणि सगळे दिवस अखंडपणे हालचाली करीत होता.

४

तो वेड्यांच्या घरात आहे ह्याची त्याला जाणीव होती; तो आजारी आहे हेसुद्धा त्याला समजले होते. त्या पहिल्या रात्रीप्रमाणे काही वेळांना रात्रीच्या स्तब्धतेत त्याला अचानक जाग यायची. दिवसभराच्या सतत फेऱ्या मारण्यामुळे त्याचे सर्वांग ठणकत असायचे, डोके जड शिसाप्रमाणे त्याला भासायचे, पण एरवी तो पूर्ण निकोप असायचा. कदाचित रात्री-च्या शांततेत आणि अर्धवट अंधारात मनावर कोणतेही ठसे उमटत नसत म्हणून, अथवा झोपेतून नुकत्याच जाग्या झालेल्या माणसाचा मेंदू पटकन काम करीत नाही म्हणून, तशा क्षणांना त्याला स्वतःची परिस्थिती स्पष्ट समजायची आणि जणू तो निरोगी भासायचा. पण उजाडणाऱ्या दिवसा-बरोबर इस्पितळातील जीवनाला जाग यायची आणि परत ठशांची लाट त्याला गुरफटून टाकायची. त्याचा आजारी मेंदू त्या सर्व विचारांना सामावू शकायचा नाही व परत तो वेडा बनायचा. सूज्ञ युक्तिवाद व मूर्खपणा यांचे वैशिष्ट्यपूर्ण मिश्रण त्याच्यात झाले होते. त्याच्याभोवताल-ची सर्व माणसे इस्पितळातील रुग्ण होती हे त्याला समजत होते;

पण तरीही प्रत्येकात एक गुप्तपणे लपलेला अथवा अज्ञातवेषधारी माणूस त्याला दिसायचा; त्या माणसाबद्दल त्याने पूर्वी कुठेतरी ऐकल्याचे किंवा वाचल्याचे त्याला भासायचे. इस्पितळात सर्व वयांची अणि सर्व देशांची माणसे होती. इथे जिवंत होती व मृत होती. इथे जगातील सर्व प्रसिद्ध आणि सामर्थ्यवान लोक, गेल्या युद्धात ठार झालेले सैनिक पुनर्जन्म घेऊन रहात होते. पृथ्वीवरील सर्व बळ एकवटणाऱ्या एका अद्भुत वर्तुळात आपण आहोत असे त्याला भासत होते आणि त्या वर्तुळाच्या केंद्रभागी आपण आहोत अशी त्याची अभिमानी धारणा होती. त्याचे इस्पितळातील सर्व साथीदार त्याच्यासह एका कार्याची पूर्ती करायला इथे जमले होते; त्या कार्याबद्दल त्याची संदिग्ध कल्पना अशी होती की, जगातील वाईटपणा नष्ट करण्याचा तो महाप्रचंड उद्योग होता. तो उद्योग कोणता आकार घेईल हे त्याला माहीत नव्हते, पण तो उद्योग पार पाडण्यास आपण खंबीर आहोत असा त्याला पूर्ण विश्वास होता. माणसांची मने तो वाचू शकत होता; वस्तूंमध्ये त्यांचा सर्व इतिहास त्याला दिसायचा; इस्पितळाच्या बागेतील मोठे एल्म वृक्ष त्याला भूतकालीन दंतकथा सांगायचे; बरीच जुनी असलेली इमारत महान प्योत्रच्या काळात बांधली होती असे त्याचे मत होते आणि पोल्तावाच्या लढाईवेळी खुद्द झार ह्या इमारतीत राहिला होता, अशी त्याची खात्री झाली होती. भिंतींवर, तुटून पडलेल्या प्लास्टरच्या तुकड्यांवर, बागेत सापडणाऱ्या विटांच्या व फरशांच्या तुकड्यांवर त्याने हे वाचले होते; ह्या घराचा आणि बागेचा संपूर्ण इतिहास त्यांच्यावर लिहिलेला होता. शवगृहाच्या छोट्या इमारतीत खूप पूर्वीच मेलेल्या शेकडो लोकांची त्याने वस्ती केली होती व बागेच्या कोपऱ्याकडे उघडणाऱ्या त्या इमारतीच्या तळघराच्या छोट्या खिडकीकडे टक लावून पाहताना, तिच्या जुन्या, सप्तरंगी व मळकट काचेमधून बाहेर पडणाऱ्या धुरकट प्रकाशात कधीतरी आयुष्यात अगर चित्रांमध्ये पाहिलेले परिचित चेहरे त्याला दिसत.

दरम्यान हवा सुरेख आणि सूर्यप्रकाशित बनली व इस्पितळातील रुग्ण संपूर्ण दिवस बागेत मोकळ्या हवेत घालवू लागले. बागेतील त्यांच्या हिश्शाच्या छोट्या भागात झाडांची खूप दाटी होती व जागा सापडेल तेथे फूलझाडे लावलेली होती. काम करण्यास लायक असलेल्या प्रत्येकाला

वॉर्डन तेथे कामाला जुंपत होता. सबंध दिवसभर रुग्ण तेथील पाऊलवाटा झाडून काढत, त्यांच्यावर वाळू शिंपडत, फुलांच्या वाफ्यांमधील तण उपटून काढत आणि पाणी घालत. स्वतःच्या हातांनी त्यांनी लावलेल्या काकडीच्या, कलिंगडांच्या व टरबुजांच्या वाफ्यांना ते पाणी घालत. बागेच्या कोपऱ्यात चेरीच्या झाडांची दाटी झाली होती. एल्मच्या झाडांच्या दुतर्फा रांगा तिच्यात उभ्या होत्या. मध्यभागी एका छोटया कृत्रिम उंचवटयावर फुलांचा एक ताटवा लावलेला होता. सबंध बागेत तो सर्वांत सुंदर ताटवा होता. वरच्या कडेशी भडक रंगांची फुले वाढली होती, तर ताटव्याच्या केंद्रभागाला तांबडया ठिपक्यांच्या भव्य पिवळ्या डेलीयांनी नटविले होते. सबंध बागेचे ते केंद्रस्थान होते, सबंध बागेवर त्याचे वर्चस्व होते आणि अनेक रुग्णांनी त्याला गूढ महत्त्व दिल्याचे निरीक्षणास येत होते. नव्या रुग्णालासुद्धा जाणवले होते की, ती खास जागा होती, बागेची व इमारतीची राखण होणारी जागा होती. सर्व पाऊलवाटांच्या कडांशीसुद्धा रुग्णांनी फूलझाडे लावली होती. युक्रेनमधील घरांसमोर आढळणारी फुले तेथे दिसत होती: उंच गुलाब, भडक जांभळी फुले, छोटया गुलाबी फुलांचे तंबाखूच्या झाडांचे उंच झुबके, पुदिना, झेंडू, मोहरीसारखी बारीक पिवळी फुले आणि पॉपीची फुले. इथेच, दारापाशी, खास जातीच्या पॉपींचे तीन झुबके उगवले होते. सामान्य पॉपीपेक्षा ते खूपच लहान होते; पण त्यांच्या विलक्षण गडद तांबडया रंगामुळे त्यांचे वेगळेपण उठून दिसत होते. इस्पितळातील पहिल्याच दिवशी रुग्ण जेव्हा काचेच्या दारामधून बागेकडे पहात होता, तेव्हाच ह्या फुलाने त्याचे लक्ष वेधून घेतले होते.

बागेत प्रवेश करताच, पायऱ्या उतरण्यापूर्वी प्रथम त्याने त्या गडद फुलांकडे नजर टाकली. फक्त दोनच फुले तेथे उभी होती. तण न काढलेल्या जागी, इतर फुलांपासून काहीशी अलगपणे, हंसपाद वनस्पतींच्या आणि इतर झाडोऱ्याच्या गर्दीत ती अर्धवट लपली होती.

दारामधून रुग्ण एकापाठोपाठ एक येत होते आणि दरवान प्रत्येकाला रेड क्रॉसचा छाप मारलेली विणलेली पांढरी जाड टोपी देत होता. ह्या टोप्या युद्धातील होत्या व लिलावात विकत घेतलेल्या होत्या. पण रुग्णाने स्वाभाविकपणे त्या रेड क्रॉसला खास गूढ अर्थ दिला होता. त्याने स्वतः-

च्या डोक्यावरील टोपी काढून क्रॉस न्याहाळला आणि नंतर पॉपीच्या फुलांकडे पाहिले. फुले क्रॉसपेक्षा अधिक गडद होती.

"तो जिंकतोय," रुग्ण म्हणाला, "पण आम्ही पाहून घेऊ."

आणि तो पायऱ्या उतरला. सभोवार नजर टाकून आणि त्याच्या मागेच उभ्या असलेल्या दरवानाला न पाहता तो थेट फुलांच्या ताटव्यापाशी चालत गेला व त्याने फुलापर्यंत हात ताणला, पण फूल तोडण्याचा धीर त्याला झाला नाही. त्या ताणलेल्या हातात आणि नंतर सबंध शरीरात त्याला जळती, खुपसती वेदना जाणवली. जणू फुलाच्या तांबड्या पाकळ्यांमधून प्रभावी गुप्त प्रवाह निर्माण होऊन त्याच्या शरीरात घुसला होता. तो फुलाच्या आणखी जवळ गेला, त्याच्या हाताचा आता फुलाला ओझरता स्पर्श घडत होता, पण फूल स्वतःचे रक्षण करीत होते, त्याच्यातून विषारी फूत्कार बाहेर पडत होते, असे त्याला भासले. त्याचे डोके गरगरले; निकराच्या प्रयत्नाने त्याने फुलाचा देठ पकडला, पण अचानक त्याच्या खांद्यावर जड हात पडला. दरवानाने त्याला पकडले होते.

"फुलं तोडायला मनाई आहे," म्हातारा युक्रेनी दरवान म्हणाला. "आणि ताटव्यांवरून चालायचं नाही. इथं तुम्ही खूप वेडे आहात; प्रत्येकानं एकेक जरी फूल तोडलं, तरी बाग उजाड होईल," अजूनही रुग्णाच्या खांद्यावर हात ठेवून तो समजावणीच्या स्वरात म्हणाला.

रुग्णाने दरवानाच्या चेहऱ्याकडे पाहिले, मुकाटपणे त्याचा हात खांद्यावरून बाजूला सारला आणि अत्यंत अस्वस्थ मनःस्थितीत बागेतील पाऊलवाटेवरून तो चालत गेला. "दुर्दैवी!" त्याच्या मनात विचार आला. "तुम्हाला दिसत नाही, तुम्ही एवढे आंधळे आहात, की त्याचं रक्षण करताय. पण काहीही होवो, मी त्याचा अंत करीन. आज नाही तर उद्या, आम्ही एकमेकांची ताकद पणाला लावू. आणि जर त्यात मी मेलो, तर काय फरक पडणार..."

थेट संध्याकाळपर्यंत तो बागेत फिरत होता, नव्या ओळखी करून घेत होता, विचित्र संभाषणे करीत होता, ज्यांच्यात प्रत्येक संभाषणकर्त्याला स्वतःच्या वेडपट विचारांना व्यक्त करणाऱ्या विचित्र गूढ शब्दांमार्फत केवळ उत्तरे मिळत होती. रुग्ण प्रथम एकाबरोबर फिरला,

मग दुसऱ्याबरोबर फिरला आणि दिवसअखेरी त्याची खात्री पटली होती व स्वतःशीच तो म्हणाला होता: "सगळी तयारी झालीय!" आता अगदी लौकरच लोखंडी गज कोसळून पडणार आहे, इथं बंदिवान असलेले सगळे लोक मुक्त होणार आहेत व पृथ्वीच्या सर्व कोपऱ्यांना धावणार आहेत, जग स्वतःचे जुने मळके आच्छादन फेकून देणार आहे आणि नव्या वैभवशाली चमकत्या सौंदर्यात अवतरणार आहे. बागेतून बाहेर जाण्यासाठी पायऱ्या चढेपर्यंत फुलाबद्दल तो संपूर्ण विसरून गेला होता, तेवढ्यात दाट, काळवंडलेल्या आणि एव्हाना दंवाचा शिडकावा झालेल्या गवतात त्याला दोन जळते निखारे झगमगताना दिसले. रुग्ण मुद्दाम लोकांच्या जमावाच्या मागे घुटमळत राहिला आणि दरवानाची पाठ वळताच त्याने फुलांच्या वाफ्यावर उडी घेतली, झटकन फूल तोडले आणि घाईघाईने सदऱ्याखाली लपविले. जेव्हा ताज्या दंवाने माखलेल्या पानांचा त्याच्या देहाला स्पर्श झाला, तेव्हा तो मेल्याप्रमाणे पांढराफटक पडला आणि त्याचे डोळे भीतीने विस्फारले. त्याच्या कपाळावर दरदरून घाम फुटला.

इस्पितळात दिवे पेटले; रात्रीच्या जेवणाची वाट पहात बहुतेक रुग्ण आपापल्या बिछान्यांवर पडून होते; मात्र काही अस्वस्थ आत्मे कॉरीडॉरमध्ये आणि दालनांमध्ये भराभरा येरझाऱ्या घालत होते. त्यांच्यात फूलवाल्या रुग्णाचा समावेश होता. तो छातीवर हातांची घडी घालून फेऱ्या मारत होता. जणू छातीआड लपवलेली वनस्पती चुरगाळून तो नष्ट करू इच्छित होता. दुसरे लोक वाटेत आडवे येताच तो तात्काळ त्यांच्यापासून दूर जात होता, स्वतःच्या पोषाखाच्या किनारीचा त्यांना स्पर्श होऊ न देण्याची खबरदारी घेत होता. "दूर व्हा, दूर व्हा!" तो ओरडत होता. पण असल्या उद्‌गारांकडे इस्पितळात कुणी लक्ष देत नसे. तो अधिकाधिक वेगाने फेऱ्या मारत होता, जास्त जास्त मोठ्या ढांगा टाकत होता, कसल्यातरी धुंदीत तास दोन तास फिरत होता.

"मी तुला दमवून टाकीन. तुझा गळा दाबीन!" हिंस्रपणे तो पुटपुटत होता.

काहीवेळा तो दात करकरत होता.

भोजनकक्षात जेवण वाढण्यात आले. आच्छादनविरहित मोठ्या

मेजांवर पातळ पेज भरलेली अनेक लाकडी रंगीत व मुलामेदार भांडी ठेवण्यात आली. रुग्ण बाकड्यांवर बसले. त्यांना काळ्या पावाचे तुकडे देण्यात आले. प्रत्येक भांड्यातून आठ लोक लाकडी चमच्यांनी खात होते. ज्यांना सुधारीत शिधा नेमलेला होता, त्यांना अलगपणे वाढण्यात आले. आपल्या रुग्णाने त्याच्या खोलीत सेवकाने आणून दिलेले जेवण भराभरा फस्त केले आणि तेवढ्यावर समाधान झाले नाही म्हणून तो सामायिक भोजनकक्षात गेला.

"मला इथं खायची परवानगी द्या," तो वॉर्डनला म्हणाला.

"तुमचं जेवण झालंय ना?" भांड्यात जादा पेज ओतीत वॉर्डनने विचारले.

"मला खूप भूक लागलीय. आणि मला अंगात खूप ताकद आणली पाहिजे. माझी सगळी भिस्त अन्नावर आहे. तुम्हाला ठाऊक आहे, मला अजिबात झोप येत नाही."

"भल्या माणसा, भरपूर खा. तारास, त्याला चमचा आणि पाव दे."

तो एका भांड्यापाशी बसला आणि त्याने भरपूर पेज फस्त केली.

"आता पुरे, खूप झालं," अखेरीस वॉर्डन म्हणाला, कारण बाकी सर्वांचे जेवण संपले तरी आपला रुग्ण भांड्यापाशी बसून एका हाताने पेज ओरपतच होता आणि दुसरा हात त्याने छातीवर गच्च दाबून धरला होता. "तुम्हाला अजीर्ण होईल."

"अरेरे, मला किती ताकदीची गरज आहे ह्याची तुम्हाला कल्पना नाही! अच्छा, निकोलाय निकोलाइच," मेजापासून उठत आणि वॉर्डनचा हात घट्ट दाबत रुग्ण म्हणाला. "अच्छा!"

"कुठं निघालात?" वॉर्डनने स्मित करीत विचारले.

"मी? कुठंही नाही. मी इथंच राहतोय. पण कदाचित उद्या आपली भेट होणार नाही. तुमच्या उदारपणाबद्दल मी तुमचे आभार मानतो."

आणि त्याने पुन्हा वॉर्डनचा हात घट्ट दाबला. त्याच्या आवाजात कंप होता, डोळ्यात आसवे तरारली होती.

"शांत व्हा, शांत व्हा," वॉर्डन म्हणाला. "असे उदास विचार

कशाला ? जा आणि छानपैकी झोपा. तुम्ही जास्त झोपलं पाहिजे. जर छान झोपलात, तर लौकर बरे व्हाल."

रुग्ण रडत होता. उष्टी-खरकटी लौकर स्वच्छ करा असा सेवकांना हुकूम द्यायला वॉर्डनने तोंड फिरविले. अर्ध्या तासानंतर इस्पितळात एव्हाना सर्व झोपले होते, फक्त कोपऱ्यामधील खोलीत दिवसभराचे कपडे तसेच अंगावर ठेवून एक माणूस न झोपता नुसता पडून होता. ताप भरावा तशी त्याला हुडहुडी भरली होती आणि छातीशी तो हात गच्च आवळीत होता. तेथे अश्रुत असे मरणघातक विष भरले होते, असे त्याला भासत होते.

५

सबंध रात्र तो झोपला नाही. त्याने ते फूल तोडण्याचे कारण तसे करण्यात त्याला पराक्रम वाटला होता व पराक्रम करणे त्याचे कर्तव्य होते. काचेच्या दारामधून त्याने बाहेर पाहिले होते त्या क्षणीच लाल पाकळ्यांनी त्याचे लक्ष वेधून घेतले होते आणि त्याच क्षणाला ह्या जगातील स्वतःच्या कार्याची त्याला जाणीव झाली होती. ह्या गडद लाल फुलात जगातील सर्व दुष्टपणा सामावला होता. पॉपीच्या फुलापासून अफू बनवितात हे त्याला माहीत होते; कदाचित ह्या विचाराने त्याच्या मनात महाप्रचंड आकार धारण केला होता आणि भयानक काल्पनिक पिशाच निर्माण केले होते. त्याच्या नजरेत ते फूल म्हणजे मूर्तिमंत दुष्टपणा ठरले होते; मानवजातीचे सर्व निष्पाप रक्त त्या फुलाने शोषले होते (म्हणून ते असे लाल बनले होते); मानवजातीच्या अश्रूंनी आणि वेदनांनी ते फूल चिंब भिजलेले होते. आरीमान देवाच्या विरुद्ध साधे, निष्पाप रूप घेतलेला हा गूढ, भयानक प्राणी होता. त्याला तोडून ठार मारणे आवश्यक होते. तेवढ्यावरच भागणार नव्हते—मरताना त्याला स्वतःचा दुष्टपणा जगात पसरवायची संधी द्यायची नव्हती. म्हणूनच त्याने त्याला स्वतःच्या छातीशी लपविले होते. सकाळपर्यंत फूल स्वतःची सगळी ताकद गमावून बसेल, अशी त्याला आशा वाटली होती. त्याच्यातील दुष्टपणा त्याच्या छातीत, त्याच्या आत्म्यात जाईल आणि तेथे त्याचा जय अथवा पराजय घडेल—मग कदाचित तो

नाश पावेल, मरेल, पण प्रामाणिक लढवय्या म्हणून, मानवजातीचा पहिला लढवय्या म्हणून त्याला मरण येईल; कारण आत्तापर्यंत जगातील सर्व दुष्टपणाशी एकाकी झुंज घेण्याचे धाडस कुणीही केलेले नव्हते.

"त्यांनी त्याला पाहिलं नाही. पण मी पाहिलंय. मग त्याला मी जिवंत कसा ठेवणार? त्यापेक्षा मृत्यू अधिक चांगला."

आणि तो निजून होता; काल्पनिक, अस्तित्वात नसलेल्या लढ्यात थकून पडला होता. सकाळी डॉक्टरांच्या मदतनीसाला तो अर्धमेल्या अवस्थेत आढळला. तरीसुद्धा, काही काळानंतर, मानसिक उत्तेजनेने वर्चस्व प्रस्थापित केले, तो बिछान्यावरून ताडकन उठला आणि पूर्वी-प्रमाणेच इस्पितळभर धावू लागला, रुग्णांशी व स्वतःशी अधिक मोठ्यांदा आणि तावातावाने बोलू लागला. त्याला बागेत जाऊ दिले नाही. त्याचे वजन सतत खालावत होते, तो अजिबात झोपत नव्हता आणि सतत फेऱ्या मारीत होता, हे पाहून त्याला मॉर्फियाच्या मोठ्या डोसाचे इंजेक्शन देण्याचा डॉक्टरांनी हुकूम केला होता. त्याने विरोध केला नाही. सुदैवाने त्याचे वेडपट विचार ह्यावेळी ह्या कारवाईशी सुसंगत होते. लौकरच तो झोपला. त्याच्या माथेफिरू हालचाली थंडावल्या आणि त्याच्या भरभर पडणाऱ्या पावलांचा डोके फिरविणारा मोठा आवाज त्याच्या कानांमध्ये विरून गेला. ह्या सगळ्या गोष्टी तो विसरला आणि विचार करण्याचा थांबला. एवढेच नव्हे तर तोडणे आवश्यक असलेल्या दुसऱ्या फुलाचाही त्याला विसर पडला.

पण तीन दिवसांनंतर म्हाताऱ्या दरवानाच्या डोळ्यांदेखत त्याने ते फूल तोडले. त्याला थोपविण्याची दरवानाला संधीच मिळाली नाही. दरवान त्याच्या पाठी धावला. प्रचंड मोठी दिग्विजयी आरोळी ठोकून रुग्ण इस्पितळात धावला आणि स्वतःच्या खोलीत जाऊन त्याने ते फूल छातीशी दडविले.

"तू फुलं का तोडतोस?" त्याच्या पाठी धावताना दरवानाने विचारले. पण रुग्ण एव्हाना स्वतःच्या बिछान्यावर नेहमीच्या सवयीनुसार छातीवर हातांची घडी घालून निजला होता आणि त्याने अत्यंत मूर्ख वटवट सुरू केली. बिचाऱ्या दरवानाने मुकाटपणे धावण्याच्या धांदलीत रुग्णाच्या डोक्यावर तशीच राहिलेली रेडक्रॉसची टोपी काढून घेतली व

तो निघून गेला. आणि छायारूपी लढा परत सुरू झाला. रुग्णाला भासले की, फुलामधून लांब, वळवळणाऱ्या सापांसारखे दुष्टपणाचे फवारे उडत होते. त्यांनी त्याच्या अंगाभोवती विळखे घातले होते, त्याच्या अवयवांना दाबून ते मोडून टाकीत होते, घातकी विष त्याच्या अंगात भिनवीत होते. शत्रूला शिव्याशाप घालताना तो अधूनमधून रडत होता व देवाची प्रार्थना करीत होता. संध्याकाळच्या दरम्यान फूल सुकून गेले. रुग्णाने त्या काळवंडलेल्या फुलाला पायदळी तुडविले, जमिनीवरून त्याचे अवशेष गोळा केले आणि न्हाणीघरात त्यांना तो घेऊन गेला. चुलाण्यातील धगधगत्या निखाऱ्यांवर त्याने त्या तुडविलेल्या आकारहीन पाकळ्या फेकल्या आणि फुस्स फुस्स आवाज करीत जळून हिमशुभ्र राखेच्या छोट्या ढिगामध्ये शत्रूचे रूपांतर होईपर्यंत तो तेथे पहात उभा राहिला. त्या ढिगावर त्याने फुंकर मारली व राख नाहीशी झाली.

दुसऱ्या दिवशी रुग्णाची प्रकृती जास्त बिघडली. भयानक फिकट आणि खप्पड मुद्रेने, खोल गेलेल्या चमकत्या डोळ्यांनी तो जोरजोरात फेऱ्या मारीत होता, त्याचा सारखा तोल जात होता आणि अखंडपणे तो वटवट करीत होता.

"बळाचा वापर करणं मला आवडत नाही," वरिष्ठ डॉक्टर त्यांच्या मदतनीसाला म्हणाले.

"पण हा मामला थांबवला पाहिजे. आज त्याचं वजन ९३ पौंड भरलं. जर असंच पुढं चालू राहिलं, तर दोन दिवसांनंतर हा मरेल."

वरिष्ठ डॉक्टर विचारात पडले.

"मॉर्फिया? क्लोरल?" अर्धवट प्रश्नात्मक ते म्हणाले.

"काल मॉर्फियाचा उपयोग झाला नाही."

"त्याला बांधून ठेवायचा हुकूम द्या. तरीही, तो जिवंत राहील असं मला वाटत नाही."

६

रुग्णाला बांधून ठेवण्यात आले. वेडाच्या सदऱ्यात तो बिछान्यावर निजून होता, लोखंडी पलंगाशी रुंद पट्ट्यांनी त्याला घट्ट आवळून ठेवलेले होते. पण त्याचे वेड कमी होण्याऐवजी अधिकच वाढले. कित्येक तास-

पर्यंत स्वतःला मुक्त करण्याची त्याची धडपड चालू होती. शेवटी खूप जोर लावून त्याने एक पट्टा तोडला, पाय मोकळे केले आणि मग इतर पट्ट्यांमधून मुक्त होऊन बांधल्या हातांनी तो खोलीत फेऱ्या मारू लागला, असंबद्ध भाषणे मोठमोठ्याने ओरडू लागला.

"काय पाहतोय मी!" आत येणारा दरवान ओरडला. "सैतान तुला मदत करतोय! ग्रीत्स्को! इवान! लौकर या, हा मोकळा सुटलाय!"

तिघेजण रुग्णावर तुटून पडले आणि खूप वेळपर्यंत झटापट चालली. हल्ला करणारे दमून गेले आणि रक्षण करणाऱ्याचे खूप हाल झाले. त्याच्या अंगातील उरलीसुरली शक्ती संपली. अखेर त्याला परत बिछान्यावर आडवे पाडण्यात आले व पूर्वीपेक्षा जास्त करकचून बांधण्यात आले.

"तुम्ही काय करताय, तुम्हाला समजत नाही!" धापा टाकीत रुग्ण किंचाळला. "तुमचा नाश होतोय! नुकतंच उगवणारं मी तिसरं पाहिलंय. आता ते तयार झालंय. माझं काम मला पूर्ण करू द्या! त्याला ठार मारलं पाहिजे, ठार! ठार! तेव्हाच सगळं संपेल, सगळे वाचतील. मी तुम्हाला पाठवलं असतं, पण हे काम फक्त एकटा मीच करू शकतो. नुसत्या स्पर्शानं तुम्ही मराल!"

"चूप रहा, साहेब, चूप रहा!" बिछान्यापाशी पहारा देत थांबलेला म्हातारा दरवान म्हणाला.

रुग्ण एकदम गप्प झाला. दरवानाला फसवायचे त्याने ठरविले. सबंध दिवसभर त्याला बांधून ठेवण्यात आले व रात्रीही त्याच अवस्थेत ठेवण्यात आले. त्याला रात्रीचे जेवण खाऊ घालून दरवानाने त्याच्या पलंगापाशीच स्वतःची पथारी पसरली. लौकरच दरवानाला गाढ झोप लागली आणि रुग्ण कामाला लागला.

पलंगाखालील लोखंडी दांड्यापर्यंत पोहोचण्यासाठी त्याने सबंध अंगाची मुरकुंडी केली आणि लांब बाहीखालचे मनगट दांड्याशी टेकवून जोरजोराने बाही दांड्यावर घासायला सुरुवात केली. काही वेळानंतर जाड कॅन्व्हासचा पट्टा फाटला आणि त्याने स्वतःची तर्जनी मुक्त केली. नंतर सर्व गोष्टी वेगात घडल्या. निरोगी माणसालासुद्धा जमणार नाही अशा

अचूकपणे आणि चपळपणे त्याने बाह्यांची पाठीशी बांधलेली गाठ सोडवली आणि मग बराच वेळपर्यंत दरवानाचे घोरणे ऐकत तो मुकाट बसून राहिला. म्हातारा गाढ झोपला होता. रुग्णाने वेड्याचा सदरा अंगातून काढला व पलंगाशी त्याला जखडून ठेवणारे पट्टे सोडले. तो मुक्त झाला होता. त्याने दार ढकलून पाहिले. ते आतून बंद केलेले होते आणि किल्ली अर्थातच दरवानाच्या खिशात होती. दरवान जागा होईल ह्या भीतीने त्याचे खिसे चाचपण्याचा त्याला धीर झाला नाही व खिडकीवाटे खोलीबाहेर पसार होण्याचा त्याने निर्णय घेतला.

रात्र शांत, उबदार आणि अंधारी होती; खिडकी उघडी होती; काळ्या नभात तारे चमकत होते. त्याने त्यांच्याकडे पाहिले आणि परिचित नक्षत्रगणांना ओळखताच त्याला आनंद वाटला. ते तारे त्याला समजून घेत होते आणि सहानुभूती दाखवीत होते, असे त्याला भासले. ताऱ्यांपासून येणाऱ्या अखंड प्रकाशकिरणांकडे त्याने डोळे आकुंचित करून पाहिले व त्याचा वेडा निर्धार ठाम बनला. खिडकीच्या जाड लोखंडी जाळीतील एक गज वाकवायला पाहिजे होता, मोकळ्या अरुंद जागेतून सरपटत बाहेर जाऊन दगडाची उंच भिंत चढायची होती. तेथे शेवटची लढाई होती – आणि मग – मरणाची पर्वा नव्हती.

नुसत्या हातांनी गज वाकविण्याचा त्याने प्रयत्न केला, पण लोखंड वाकले नाही. तेव्हा त्याने वेड्याच्या सदऱ्याच्या बळकट बाह्यांना पीळ घालून त्यांचा दोर बनविला व गजाच्या सांध्याला तो दोर गच्च बांधून त्यावर सगळ्या शरीराचा भार टाकला. निकराच्या प्रयत्नांती गज वाकला व अरुंद फट निर्माण झाली, पण ह्या उद्योगात त्याच्या अंगातील उरलेसुरले बळ खलास झाले होते. त्या फटीमधून त्याने स्वतःचे शरीर कोंबले. बाहेर निघताना त्याच्या खांद्यावरील, हातांच्या कोपरांवरील आणि गुडघ्यांवरील सालडी निघाली. झुडूपांमधून सरपटत तो कुंपणाच्या भिंतीपाशी जाऊन थांबला. सारे काही शांत होते. मोठ्या इमारतीच्या खिडक्या रात्रीच्या दिव्यांच्या प्रकाशात मंद उजळल्या होत्या. तेथे चिटपाखरू नव्हते. त्याला कुणीही पहात नव्हते; त्याच्या पलंगापाशी पहारा देणारा म्हातारा बहुधा गाढ झोपेत होता. तारे प्रेमळपणे चमकत होते, त्यांचे किरण थेट त्याच्या हृदयापर्यंत जाऊन भिडत होते.

"मी तुमच्यापाशी येतोय," नभाकडे पहात तो पुटपुटला.

भिंतीवर चढण्याच्या पहिल्या प्रयत्नात त्याचे पाय निसटले, बोटांची नखे तुटली. रक्ताळल्या हातांनी व फुटलेल्या ढोपरांनी तो अधिक सोयी-स्कर जागा हुडकू लागला. बागेची भिंत जेथे शवगृहाच्या भिंतीशी जोडली गेली होती, तेथे काही विटा निसटलेल्या होत्या. रुग्णाने भिंती-मधील ही भोके शोधली व पायांना आधार म्हणून त्यांचा वापर केला. तो भिंतीवर चढला, दुसऱ्या बाजूकडे जवळ आलेली एल्मची फांदी त्याने पकडली आणि सावकाशपणे झाडाच्या बुंध्यावरून तो खाली उतरला.

पायऱ्यांजवळच्या परिचित जागेकडे तो धावला. दंवमाखल्या गवतात मिटल्या पाकळ्यांचे गडद फूल स्पष्ट दिसत होते.

"शेवटचा!" रुग्ण पुटपुटला. "शेवटचा! आज विजय अथवा मृत्यू! पण माझ्या दृष्टीनं आता काहीच फरक पडत नाही. थांबा," नभाकडे नजर टाकून तो म्हणाला: "लौकरच मी तुमच्यापाशी येईन."

त्याने फूल तोडले, चुरडले, त्याचा चोळामोळा केला व हातात धरून पूर्वीच्याच वाटेने तो स्वतःच्या खोलीत परतला. म्हातारा झोपलेला होता. रुग्ण कसाबसा बिछान्यापर्यंत पोहोचला आणि बेशुद्ध झाला.

सकाळी तो मृत आढळला. त्याचा चेहरा शांत आणि पवित्र दिसत होता. पातळ ओठांचा आणि खोल गेलेल्या बंद डोळ्यांचा त्याचा खंगला चेहरा एक प्रकारचा अभिमान व्यक्त करीत होता. जेव्हा त्याला स्ट्रे-चरवर ठेवण्यात आले, तेव्हा लाल फूल काढून घेण्यासाठी त्याच्या हा-ताची मूठ सोडविण्याचे प्रयत्न करण्यात आले. पण मेल्यानंतर त्याचा हात ताठरला होता आणि स्वतःचे जयचिन्ह घेऊनच तो थडग्याकडे गेला.

१८८३

आन्तोन चेखोव

कारकुनाचा मृत्यू

आन्तोन चेखोव (१८६०-१९०४)–श्रेष्ठ रशियन लेखक यांचे आयुष्य व लेखन रशियाच्या इतिहासामधील एका अत्यंत कठीण कालखंडात घडलें. रशियातील भूदास पद्धती रद्द होण्याच्या जरा आधी त्यांचा जन्म झाला आणि १९०५ सालातील पहिली रशियन क्रांती घडण्याच्या एक वर्ष आधी त्यांना मृत्यू आला. लेंनिन यांच्या शब्दात ह्या काळात "सर्व जुन्या गोष्टींचा अटळ नाश झाला आणि नव्या गोष्टींची नुकतीच सुरुवात झाली होती."* क्रांतिकारक नरोद-वादी चळवळीच्या पाडावानंतरच्या देशातील "संधि-काला"ला चेखोव साक्षीदार होते; भांडवलदारी संबं-धांच्या वादळी विकासाला, १९०५ च्या क्रांतीला कारणीभूत ठरलेल्या तीव्र वर्गकलहांना साक्षीदार होते.

लेंखकाच्या आरंभीच्या कथा अत्यंत मजेदार आणि अखंड विनोदाने भरलेंल्या होत्या. चेखोवनी वाचकाला केवळ हसविलें नाही, तर त्याच्या आयुष्याभोवतालच्या हीणपणाविषयी विचार करायला लावले. "जगातील सर्वसामर्थ्यवानां"च्या मुजोरीला, लेंखकाने कडवट उपहासाने चित्रित केले. लाचारी, परपुष्टता आणि विनयहीनतेचा उपहास केला. त्यांच्या लेंखनामधून मानवाच्या हीनतेबद्दल वेदना उमटत होती.

चेखोव यांच्या कथा व कादंबरिका केवळ आशय-घनतेमुळेच चकित करतात असे नव्हे, तर साहित्याच्या कलाप्रकारातील त्यांची तांत्रिक काटेकोरता व त्यांच्या-तील सौंदर्यही वाचकाला चकित करतात. "गद्यातील पूष्कीन" असे ल्येव तल्स्तोयनी चेखोव यांच्याबद्दल उद्गार काढलें होते. मा. गोर्कीनी लिहिलें होते: "शैलीकार म्हणून चेखोव अजोड होते."

चेखोव केवळ अप्रतिम गद्यलेंखक नव्हते, तर एक श्रेष्ठ नाटककार होते. 'सागरपक्षी', 'काका वान्या', 'तीन बहिणी', 'चेरीचा बाग' ह्या त्यांच्या नाटकांनी जागतिक नाट्यशास्त्राच्या विकासात नवे पान उघडलें आणि अनेक देशांच्या रंगमंचांवर अजूनही त्यांचे खेळ होत आहेत.

---

*व्ला. इ. लेनिन, संपूर्ण लेख-संग्रह, खंड १७, पान ३१.

रात्र झकास होती आणि झकास कारकून इवान द्मित्रिच चेर्व्याकोव * स्टॉल्सच्या दुसऱ्या रांगेत बसून, डोळ्यांना दुर्बीण लावून «Les Cloches de Corneville» (कार्नेवीलच्या घंटा – अनु.) ऑपेरा मोठ्या मजेने पहात होता. रंगमंचाकडे पहात असताना त्याच्या मनात विचार आला की, त्या क्षणाला तो सर्वांत सुखी माणूस आहे आणि अचानक... "अचानक" हा शब्द तसा शिळा झाला आहे, पण आयुष्य अनेक आश्चर्यांनी गच्च भरलेले असताना ह्या शब्दाचा वापर न करणे लेखकांना कसे बरे शक्य आहे? तर अचानक त्याच्या चेहऱ्याला चुण्या पडल्या, त्याचे डोळे वर फिरले, त्याचा श्वास रोधला गेला... दुर्बीणीपासून त्याने आपला चेहरा बाजूला वळविला आणि पुढे झुकून... ऑक् छी ! म्हणजे तो शिंकला. आता खरे म्हणजे प्रत्येकाला पाहिजे त्या ठिकाणी शिंकण्याचा हक्क आहे. शेतकरी, पोलीस इन्स्पेक्टर तर शिंकतातच, पण प्रिव्ही कौन्सिलरसुद्धा शिंकतात. प्रत्येकजण शिंकतो – हो, अगदी प्रत्येकजण! चेर्व्याकोव मुळीच शरमला नाही. खिशातील रुमाल बाहेर काढून त्याने आपले नाक पुसले आणि आपल्या शिंकेने कुणाला त्रास तर झाला नाही ना हे पाहण्यासाठी सुसंस्कृत माणसाप्रमाणे सभोवार नजर टाकली. आणि त्याला एकदम लाज वाटली. त्याने पाहिले की अगदी त्याच्याच पुढच्यात, पहिल्या रांगेमध्ये एक छोटा म्हातारा गृहस्थ बसला होता व आपल्या हातमोजाने आपले टक्कल आणि मान काळजीपूर्वक पुशीत काहीतरी पुटपुटत होता. त्या गृहस्थाला चेर्व्याकोवने ओळखले. दळणवळण मंत्रालयाचे ते जनरल ब्रीझालोव होते.

---

*रशियन भाषेत चेर्व्याक म्हणजे किडा. – अनु.

"बापरे! मी त्यांच्या अंगावर शिंकलो!" चेर्व्याकोवच्या मनात विचार आला. "ते माझे साहेब नाहीत हे खरं, पण तरीसुद्धा हे फार विचित्र घडलं. मी त्यांची क्षमा मागितली पाहिजे."

किंचित खाकरत चेर्व्याकोव पुढे झुकला आणि जनरलच्या कानात कुजबुजला:

"मला माफ करा, साहेब, मी शिंकलो... पण माझा तसा हेतू नव्हता..."

"ठीक आहे, ठीक आहे."

"मला क्षमा करा. मी... म्हणजे ते हेतूपूर्वक नव्हतं!"

"कृपा करून तुम्ही शांत रहाल का? मला ऐकूं दे!"

काहीसा गोंधळलेला चेर्व्याकोव केविलवाणा हसला आणि रंगमंचाकडे लक्ष केंद्रित करण्याचा त्याने प्रयत्न केला. तो नटांकडे पहात होता, पण जगातील सर्वांत सुखी माणूस असल्याची भावना आता त्याच्या मनात नव्हती. पश्चात्तापाने तो पोळत होता. मध्यांतराच्या वेळी तो ब्रीझालोव यांच्यापाशी चालत गेला, थोडा वेळ त्यांच्या सभोवती घुटमळला आणि सरतेशेवटी आपल्या भित्रेपणावर मात करून तो कसेबसे पुटपुटला:

"मी तुमच्या अंगावर शिंकलो साहेब... मला क्षमा करा... खरं म्हणजे माझा तसा हेतू नव्हता..."

"अरेच्चा, मी तर ते विसरून गेलो... तुम्ही त्याबद्दल बोललंच पाहिजे का?" आपला रागाने फडफडणारा खालचा ओठ चावीत जनरल म्हणाले.

"आपण विसरलो असं ते म्हणाले खरं, पण त्यांच्या डोळ्यांमधला भाव मला आवडला नाही," जनरल गेले त्या दिशेला अविश्वासाने कटाक्ष फेकीत चेर्व्याकोव मनाशी म्हणाला. "त्यांना माझ्याशी बोलायची इच्छा नाही... पण माझा तसा हेतू नव्हता ह्याचा त्यांच्यापाशी खुलासा केला पाहिजे... शिंकणं हा एक निसर्गधर्म आहे असं समजावलं पाहिजे. नाहीतर त्यांना वाटायचं की, मला त्यांचा मुद्दाम अपमान करायचा होता! आणि आत्ता जरी त्यांना तसं वाटत नसलं, तरी नंतर वाटेल!.."

घरी आल्यानंतर चेर्व्याकोवने आपल्या असभ्य वर्तनाविषयीची हकीकत

आपल्या बायकोला सांगितली. त्याचे बोलणे त्याच्या बायकोने थोडे चेष्टेवारीच नेले अशी त्याची कल्पना झाली. क्षणभर तीसुद्धा घाबरली होती हे खरे! पण ब्रीझालोव "आपले" साहेब नाहीत हे समजताच ती बिनधास्त झाली.

"तरीपण तुम्ही जाऊन त्यांची माफी मागावी हे बरं," ती म्हणाली. "नाही तर चार लोकांमध्ये कसं वागायचं याची तुम्हाला अक्कल नाही असं त्यांना वाटायचं!"

"तेच तर सांगतोय! मी त्यांची क्षमा मागायचा प्रयत्न केला, पण ते फार विचित्र वागले. एक शब्द नीट बोलले नाही. शिवाय, तिथं बोलायला वेळही नव्हता."

दुसऱ्या दिवशी चेर्व्याकोवने कचेरीत जाण्याचा आपला नवा पोषाख परिधान केला, आपले केस व्यवस्थित कापून घेतले आणि आपल्या वर्तनाचा खुलासा करण्यासाठी तो ब्रीझालोव यांच्याकडे गेला. जनरलसाहेबांच्या स्वागत कक्षामध्ये अर्जदारांची चिक्कार गर्दी होती आणि खुद्द जनरल जातीने लोकांच्या तक्रारी ऐकून घेत होते. काही मुलाखती झाल्यानंतर जनरलनी आपली नजर वर उचलली आणि चेर्व्याकोवच्या चेहऱ्यावर स्थिर केली.

"काल रात्री, 'अर्कादिया' मध्ये... साहेब, तुम्हाला जर आठवत असेल," कारकून अडखळत बोलू लागला, "...मी—अं.. शिंकलो... आणि... मी आपली..."

"छी:! काय मूर्खपणा!" जनरल म्हणाले आणि दुसऱ्या इसमाकडे वळून त्यांनी विचारले: "आपल्यासाठी मी काय करू शकतो?"

"माझं ऐकूनसुद्धा घ्यायला तयार नाहीत!" चेहरा पांढराफटक पडलेला चेर्व्याकोव मनाशी म्हणाला. "म्हणजे त्यांना राग आलाय... मी तसंच सोडून चालणार नाही... मला खुलासा केलाच पाहिजे..."

शेवटची तक्रार ऐकून घेतल्यानंतर आपल्या खाजगी दालनाकडे जाण्यासाठी जनरल जेव्हा निघाले, तेव्हा चेर्व्याकोव त्यांच्या पाठीमागे धावत गेला आणि पुटपुटला:

"माफ करा साहेब! खरोखर मला मनापासून पश्चात्ताप झालाय म्हणून मी आपल्याला तसदी देण्याचं धाडस करतोय..."

जनरलनी कारकुनाकडे पाहिले. हातानेच कारकुनाला झटकल्यासारखे करीत ते म्हणाले:

"मेहेरबान, तुम्ही माझी चेष्टा करताय!" आणि धाडदिशी त्यांनी दरवाजा लावून घेतला.

"चेष्टा?" चेर्व्याकोव मनाशी म्हणाला. "मला तर यात काही गंमत दिसत नाही. एवढी साधी गोष्ट त्यांना समजत नाही? जनरल असूनसुद्धा? ठीक आहे. ह्या भल्या गृहस्थाला माझ्या क्षमायाचनांनी मी इतःपर त्रास देणार नाही. त्यापेक्षा मी त्यांना पत्र लिहितो. आता पुन्हा त्यांच्यापाशी जाणार नाही! बस्स. हे ठरलं!"

घरी परतताना चेर्व्याकोवच्या मनात हे असे विचार येत होते. पण त्याने पत्र लिहिले नाही. त्याने खूप खूप विचार केला, पण पत्रासाठी त्याच्या मनात शब्दच जुळेनात. म्हणून ती भानगड मिटविण्यासाठी दुसऱ्या दिवशी त्याला परत जनरलसाहेबांकडे जावे लागले.

जनरलनी जेव्हा त्याच्याकडे प्रश्नार्थक कटाक्ष टाकला तेव्हा कारकून बोलू लागला: "साहेब, काल मी आपल्याला तसदी देण्याचं धाडस केलं... पण आपण सुचवलंत त्याप्रमाणं मला आपली चेष्टा करायची नव्हती. शिंकून मी आपली गैरसोय केली त्याबद्दल माफी मागायला मी आलो होतो... आपली थट्टा करण्याचं माझ्या स्वप्नातसुद्धा कधी येणार नाही. अशी कशी हिंमत होईल माझी? लोकांची थट्टा करण्याचे विचार जर आपल्या डोक्यात बसले तर आदरभावनाच उरायची नाही... वरिष्ठांबद्दल आदर रहायचा नाही..."

"चालते व्हा इथून!" संतापाने काळेनिळे होत आणि थरथर कापत जनरल ओरडले.

"का... काय म्हणालात?" घाबरून बधीर होत चेर्व्याकोव दबत्या आवाजात बोलला.

"चालते व्हा!" पाय आपटीत जनरल पुन्हा किंचाळले.

आपल्या आत काहीतरी खट्ट झाल्याचा भास चेर्व्याकोवला झाला, दाराशी तो मागे सरला, रस्त्यावर गेला आणि खूप भटकला. पण हा सारा वेळ त्याला काहीही ऐकू येत नव्हते किंवा दिसतही नव्हते. यांत्रिकपणे तो स्वतःच्या घरी येऊन पोहोचला. तसाच कचेरीच्या पोषाखात तो सोफ्यावर लवंडला आणि... मेला!

१८८३

अलेक्सान्द्र कूप्रिन

आलेस्या

अलेक्सान्द्र कूप्रिन (१८७०-१९३८)– १९ व्या शतकाच्या अखेरीचे आणि २० व्या शतकाच्या आरंभीचे एक अत्यंत गुणी रशियन लेखक-वास्तववादी अलेक्सान्द्र कूप्रिन यांचे जीवन खडतर गेले. फार लौकर त्यांचे पित्याचे छत्र हरपले आणि बालपणीच त्यांनी गरीबीचा व टंचाईचा पुरेपूर अनुभव घेतला. कूप्रिन यांचे आरंभी अनाथाश्रमात संगोपन झाले, नंतर कॅडेट कोअर व युंकर विद्यालयात ते वाढले. तब्बल चौदा वर्षे त्यांनी त्या कठोर भिंतींआड शिक्षण घेतलें आणि आयुष्याच्या अखेरीपर्यंत तेथील अधिकाऱ्यांच्या कठोर व अमानुष शिस्तीच्या, निष्कारण सोसाव्या लागलेल्या अपमानांच्या व शिक्षांच्या आठवणी त्यांच्या मनात कडवटपणे जाग्या राहिल्या. 'कॅडेट' आणि 'युंकर' ह्या आत्मचरित्रात्मक पुस्तकांमध्ये कूप्रिन यांनी पुढे ह्याबद्दल कथन केले.

युंकर विद्यालयातील शिक्षणानंतर कूप्रिन यांनी चार वर्षे लष्करात सेवा केली. तेथील कठोर लष्करी जीवनाचा, दंडुक्याच्या शिस्तीचा व निरर्थक कवायतीचा त्यांनी अनुभव घेतला. पहिली संधी मिळताच कूप्रिन यांनी लष्करी नोकरीचा राजीनामा दिला व त्यांच्याच शब्दात सांगायचे तर "आधाशीपणाने... हावरेपणाने जीवनावर व पुस्तकांवर झडप घातली." सबंध रशियाभर ते फिरले, अनेक व्यवसाय त्यांनी हाताळून पाहिलें, जीवनाचा सर्वांगांनी अनुभव घेतला.

कूप्रिन यांच्या पहिल्याच पुस्तकांमधून ओळख पटली की, जीवनाचे भरपूर निरीक्षण केलेला, जगाकडे तीक्ष्ण दृष्टीने पाहणारा, जीवनामधील संघर्षाचे सत्य चित्रण करणारा एक नवा लेखक साहित्यक्षेत्रात अवतरला होता.

कूप्रिन यांनी स्वतःच्या पुस्तकांमध्ये अत्यंत विविध प्रकारचे नायक रेखाटले. पण साध्या माणसांचे चित्रण त्यांनी विशेष ममतेने आणि सहानुभूतीने केले. लेखकाला त्या माणसांमध्ये मनाचे सौंदर्य दिसले, उच्च नैतिक गुण दिसलें, हरहुन्नरीपणा, प्रामाणिकपणा व कृतज्ञपणा यांचे दर्शन घडलें.

१

माझा नोकर, आचारी, शिकारीमधील सोबती, जंगलनिवासी यार्मोला लाकडांच्या भाऱ्याखाली वाकलेल्या अवस्थेत खोलीत आला, त्याने तो भारा खाली दाणदिशी टाकला व गोठलेल्या हाताच्या बोटांना ऊब आणण्यासाठी तो त्यांच्यावर फुंकरी मारू लागला.

"बाहेर जबरदस्त वारा आहे, मालक", चुलाण्याच्या दारापाशी खाली बसत तो म्हणाला. "चुलाणा दणाणून पेटवला पाहिजे. तुमचा पेटव्या द्या."

"तर मग उद्या सशांच्या शिकारीला जायचं नाही? तुला काय वाटतं, यार्मोला?"

"नाही... शक्य नाही... ऐकताय वाऱ्याचा आवाज? ससे मुकाट दडून बसलेत... उद्या एकसुद्धा खूण सापडणार नाही."

योगायोगाने पोलेस्येच्या सीमेवरील वोलीन्स्की गुबेर्नियामधील पेरेब्रोद नामक एका दूरच्या खेड्यात तब्बल सहा महिने मला रहावे लागले होते आणि शिकार हाच माझा एकमेव उद्योग व छंद होता. मी कबूल करतो की, खेड्यात जाण्यासंबंधीचा प्रस्ताव जेव्हा प्रथम माझ्यापुढे ठेवण्यात आला होता, तेव्हा तेथे असह्य कंटाळवाणे आयुष्य जगावे लागेल ह्याची मला मुळीच कल्पना नव्हती. उलट मी जायला उत्सुक होतो. "पोलेस्ये... दूरचा प्रदेश... निखळ निसर्ग... साध्या चालीरीती.. प्रारंभिक अवस्थेतील माणसे," मी आगगाडीत बसताना विचार केला होता. "मला अजिबात परिचयाची नसलेली माणसे... त्यांचे विचित्र रिवाज, वेगळी भाषा आणि निश्चितच, काव्यात्म दंतकथांचा, गीतांचा अमाप खजिना!" एव्हाना माझी (आता सांगायचे तर सगळे सांगितले

पाहिजे) एक लघुकथा एका छोटया वर्तमानपत्रात छापून आली होती – दोन खून व एक आत्महत्या यांच्याबाबत – आणि निदान सैद्धांतिकरीत्या मला माहीत होते की, लेखकाने लोकांच्या रीतीरिवाजांचे निरीक्षण करणे त्याच्या फायद्याचे असते.

पण... एक तर पेरेब्रोदच्या शेतकऱ्यांचे विशेष हट्टीपणाने अलिप्त वागणे हे वैशिष्टय होते, अथवा त्यांच्याशी कसे वागावे ते मला समजले नव्हते, त्यामुळे त्यांचा-माझा संबंध एवढयापुरताच मर्यादित बनला होता की, दुरून मला पाहताच ते स्वतःच्या डोक्यांवरील टोप्या खाली घेत व माझ्याजवळ येताच दुर्मुखल्या मुद्रेने पुटपुटत : "गाय-बूग," म्हणजे "देवा, मदत कर!" जेव्हा मी त्यांच्याशी संभाषण सुरू करायचा प्रयत्न करी, तेव्हा ते माझ्याकडे चकित डोळयांनी टक लावून पहात, मी विचारलेले अत्यंत साधे प्रश्न समजून घ्यायचे नाकारत व पुनःपुन्हा माझ्या हातांचे चुंबन घ्यायचा प्रयत्न करीत – पोलीश भूदास पद्धतीच्या काळातील ती जुनी रीत होती.

माझ्यापाशी असलेली थोडीफार पुस्तके मी केव्हाच वाचून काढली होती. केवळ कंटाळयापायी मी स्थानिक बुद्धिजीवींपैकी काहींची ओळख करून घेण्याचा प्रयत्न केला – वस्तुतः आरंभी ही कल्पना मला फारशी आवडली नव्हती; माझ्यापासून पंधरा वेर्स्ता अंतरावर राहणारा एक पोलीश पाद्री, त्याचा ऑर्गनवादक, स्थानिक पोलीस अंमलदार, शेजारच्या इस्टेटीची व्यवस्था पाहणारा एक सेवानिवृत्त बिनसनदी अधिकारी. पण ह्या ओळखींमधून काहीही निष्पन्न झाले नाही.

मग मी पेरेब्रोदच्या रहिवाशांवर उपचार करण्याचे प्रयत्न केले. माझ्यापाशी एरंडेल तेल, कार्बोलिक ॲसिड, बोरीक ॲसिड व आयोडिन एवढया वस्तू होत्या. माझे वैद्यकीय ज्ञान तर जुजबी होतेच, शिवाय कोणतेही रोगनिदान करणे अशक्य ठरले, कारण माझे सगळे रुग्ण एकच एक तक्रार करीत : "आत दुखतंय," आणि "खाता-पिता येत नाही."

उदाहरणार्थ, माझ्यापाशी एक म्हातारी येते. शरमून, उजव्या तर्जनीने नाक पुसून, छातीखालून दोन अंडी काढते – तिच्या तपकिरी त्वचेचे मला क्षणिक दर्शन घडते – आणि माझ्या मेजावर ठेवते. मग माझ्या हातांचे चुंबन घेण्याच्या इराद्याने त्यांना पकडू पाहते. मी पटकन

हात मागे घेऊन तिला दटावतो : "पुरे झालं आजीबाई... नको... मी पाद्री नाही... ह्या गोष्टी माझ्यासाठी नाहीत... तुझं काय दुखतंय ?"

"माझ्या आत दुखतंय, मालक, थेट आत, काही खाता-पिता येत नाही."

"केव्हापासून दुखतंय ?"

"मला काय माहीत ?" ती प्रश्नानेच उत्तर देते. "सारखं जळजळतं. खाता-पिता येत नाही."

आणि मी कितीही प्रयत्न केले तरी ह्याहून अधिक रोगाची लक्षणे जाणून घेण्यात मला अपयश येते.

"तुम्ही चिंता करू नका," एके दिवशी इस्टेटीच्या कारभाऱ्याने मला सल्ला दिला, "ते स्वतःच बरे होतील. कुत्री बरी होतात त्याप्रमाणं. मी फक्त एकच औषध वापरतो — अमोनियाक्षार. माझ्यापाशी शेतकरी येतो. 'तुला काय होतंय ?' 'मी आजारी आहे...' ताबडतोब मी अमोनियाची बाटली त्याच्या नाकाखाली धरतो. 'हुंग !' तो हुंगतो... 'आणखी हुंग ! जोरात !' तो हुंगतो... 'काय, हलकं वाटलं ?' 'मला वाटतं, मला जरासं बरं वाटलं...' — 'तर मग जा आता शांतपणं'."

शिवाय ती हाताचे चुंबन घेण्याची रीत मला किळस आणायची (माझे काही रुग्ण तर चक्क लोटांगण घालत आणि माझे बूट चाटू पहात). कृतज्ञतेपायी ते असे वागत नसत, तर शतकानुशतकांच्या गुलामीतून व बळजबरीतून त्यांच्या अंगी बाणलेली ती एक अमंगळ सवय होती. स्वतःचे गुबगुबीत लालबुंद पंजे अत्यंत ठाम गंभीरपणाने खेडुतांच्या ओठांवर खुपसणाऱ्या सेवानिवृत्त बिनसनदी अधिकाऱ्याकडे व पोलीस अंमलदाराकडे मी नेहमी चकित नजरेने पहायचा.

केवळ शिकार करणे एवढा एकच उद्योग माझ्यासाठी उरला. पण जानेवारीअखेरी हवा एवढी बिघडली की, शिकार करणेही अशक्य ठरले. रोज दिवसा भयानक वारा सुटायचा आणि रात्रीच्या वेळी हिमावर बर्फाचा घट्ट थर बसायचा व कोणत्याही खुणा मागे न ठेवता ससे त्यावरून पसार होत. बंद घरात बसून वाऱ्याचे घोंघावणे ऐकणे मला कमालीचे कंटाळवाणे झाले होते. म्हणून यार्मोलाला लिहा-वाचायला

शिकविण्याचा निष्पाप उद्योग मी अत्यंत आधाशीपणाने पत्करला.

त्याची सुरुवात फार वेगळी झाली. एके दिवशी मी पत्र लिहीत होतो, तेव्हा कुणीतरी माझ्या पाठीशी उभे असल्याची मला जाणीव झाली. मी मागे वळून पाहिले आणि मला यार्मोला दिसला. त्याच्या मऊ सालीच्या बुटांमध्ये तो नेहमीप्रमाणे गुपचूप, आवाज न करता आत आला होता.

"काय रे, यार्मोला?" मी विचारले.

"तुम्ही कसं लिहिताय ते पाहतोय. मला जर असं लिहिता आलं... नाही, नाही... तुम्ही लिहिता तसं नव्हे," मी हसतोय असे पाहून घाईघाईने तो गोंधळून म्हणाला... "मला फक्त माझं नाव लिहिता यावं..."

"कशाला हवं तुला हे?" मी आश्चर्याने विचारले... (नोंद केली पाहिजे की, यार्मोला हा सबंध पेरेब्रोदमध्ये अत्यंत दरिद्री आणि अत्यंत आळशी शेतकरी समजला जात होता; त्याची मजुरी व शेतीचे उत्पन्न तो दारूमध्ये खर्च करायचा; त्याच्याएवढी बैलांची वाईट जोडी आख्ख्या पंचक्रोशीत नव्हती. माझ्या मते, त्याला आता कोणत्याही परिस्थितीत साक्षर होण्याची गरज नव्हती.) मी परत एकदा शंकित सुरात विचारले: "कशासाठी तुला तुझं नाव लिहिता आलं पाहिजे?"

"त्याचं असं आहे मालक," यार्मोला अत्यंत मऊ आवाजात उत्तरला, "आमच्या खेड्यात एकही माणूस लिहू-वाचू शकत नाही. जेव्हा एखाद्या कागदावर सही करायची असते, किंवा तालुक्याच्या कचेरीत काही काम असतं, तेव्हा कुणालाही काहीही करता येत नाही... गावचा म्हातारा म्होरक्या त्यावर शिक्का मारतो, पण त्या कागदात काय लिहिलंय हे मात्र त्याला माहीत नसतं... जर कुणाला सही करता आली, तर सर्वांच्या दृष्टीनं ते छान होईल."

यार्मोला हा कुप्रसिद्ध चोरटा शिकारी होता, चैनी भटक्या होता आणि त्याचे मत खेडुतांनी कधीही विचारात घेतले नसते; तरीही स्वतःच्या गावकऱ्यांविषयीची त्याची कळकळ माझ्या मनाला भिडून गेली. मी त्याला धडे देण्याची तयारी दाखविली. पण त्याला लिहा-वाचायला शिकविणे महाकठीण कर्म होते! त्याला जंगलाचा प्रत्येक तुकडा ठाऊक

होता, त्यातील जवळजवळ प्रत्येक झाड माहीत होते, दिवसा अथवा रात्री तो जंगलातून अचूक वाट काढू शकायचा, आसपासच्या सर्व लांडग्यांना, सशांना, कोल्ह्यांना त्यांच्या खुणांवरून सांगू शकायचा; पण हाच यार्मोला समजू शकत नव्हता की, "आ" आणि "ई" ही दोन अक्षरे एकत्र केल्यास "आई" असा शब्द का बनतो. अशा समस्येवर तो सुमारे दहा मिनिटेपर्यंत डोकेफोड करीत बसून रहायचा; त्याच्या खोल काळ्या डोळ्यांमध्ये आणि खरबरीत काळ्या दाढीत व मोठ्या मिशांमध्ये लपून गेलेल्या काळपट रोड चेहऱ्यावर त्याचा विलक्षण मानसिक ताण स्पष्ट दिसू लागायचा.

"बोल यार्मोला, आई. तू नुसतं म्हण – आई," मी त्याला म्हणायचा. "कागदावर बघू नको, माझ्याकडं पहा – अस्सं! आता म्हण – आई..."

तेव्हा यार्मोला खोल उसासा टाकायचा, टेबलावर तर्जनी टेकवायचा आणि दुःखपूर्वक ठाम म्हणायचा:

"नाही... नाही जमत...."

"असं कसं नाही जमत? हे किती सोपं आहे. नुसतं म्हण – आई, जसं मी म्हणतो."

"नाही... नाही जमत, मालक... विसरलो..."

त्याच्या ह्या राक्षसी मठ्ठपणापुढे सर्व रीतींनी, तुलनांनी हात टेकले होते. पण त्याची शिकण्याची तळमळ मात्र मुळीच कमी झाली नव्हती.

"मला फक्त माझं नाव लिहिता यावं!" तो माझ्यापाठी लकडा लावायचा. "त्यापेक्षा अधिक काहीही नको. फक्त नाव: यार्मोला पाप्रूझूक – त्याहून आणखी काही नको."

त्याला हुशारीने लिहा-वाचायला शिकविण्याची कल्पना अखेर मी सोडून दिली व यांत्रिकपणे सही करायला त्याला शिकवू लागलो. आश्चर्य म्हणजे नवी रीत त्याला अधिक सोपी गेली व दुसऱ्या महिन्याच्या अखेरी त्याचे आडनाव तो लिहू लागला. पण त्याचे स्वतःचे नाव मात्र, त्याचा बोजा हलका करण्याच्या दृष्टीने, आम्ही वगळायचे ठरविले.

संध्याकाळच्या वेळांना चुलाणा पेटविण्याचे काम पार पाडल्यानंतर, माझ्या बोलावण्याची वाट पहात यार्मोला अधीरपणे बसून रहायचा.

"चल यार्मोला, अभ्यास सुरू करू," मी म्हणायचा.

तो टेबलाच्या कोपऱ्याशी यायचा, त्यावर कोपरे टेकायचा, त्याच्या काळ्या, कडक, गाठाळ बोटांमध्ये लेखणी खुपसायचा आणि भुवया उंचावून मला विचारायचा:

"लिहायचं?"

"लिही."

यार्मोला अत्यंत आत्मविश्वासपूर्वक पहिले अक्षर लिहायचा "प"; मग तो माझ्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पहायचा.

"पुढं का लिहीत नाहीस? विसरलास?"

"विसरलो..." यार्मोला खेदाने डोके हलवायचा.

"असा कसा रे तू! एक दांडा आणि त्यावर शेंडी काढ."

"आ... दांडा आणि त्यावर शेंडी! माहीत आहे..." यार्मोला उत्साही बनायचा आणि रेघ व मात्रा गिरवू लागायचा. हे काम पूर्ण झाल्यावर तो मुकाटपणे काही काळपर्यंत त्याचे निरीक्षण करायचा, डावी-उजवीकडे डोके हलवीत डोळे किलकिले करून पहायचा.

"थांबलास का? पुढं लिही."

"जरा थांबा, मालक... थोडं थांबा."

सुमारे दोन मिनिटे तो विचार करायचा आणि मग घाबरत विचारायचा:

"पहिल्यासारखंच ना?"

"होय. लिही."

अशा रीतीने हळूहळू आम्ही शेवटच्या "क" अक्षरापर्यंत जाऊन ठेपलो.

"तुम्हाला काय वाटतं, मालक," स्वतःची कामगिरी पूर्ण करून व तिच्याकडे अभिमानाने नजर टाकून यार्मोला कधीकधी म्हणायचा, "जर मी आणखी पाच किंवा सहा महिने शिकलो, तर मला छान जमेल. तुमचं काय म्हणणं आहे?"

२

चुलाण्यातील कोळशांची हलवाहलव करीत यार्मोला बसला होता व मी खोलीत येरझाऱ्या घालीत होतो. मोठ्या जमीनदाराच्या हवेली-च्या बारा खोल्यांपैकी फक्त एक खोली, पूर्वीचा दिवाणखाना, मी व्या-पली होती. बाकीच्या खोल्यांना कुलूपे घातली होती व रेशमी कापडाची आच्छादने घातलेल्या प्राचीन फर्निचरवर, परकी ब्राँझवर आणि अठ-राव्या शतकातील तैलचित्रांवर बुरशी चढली होती.

हवेलीबाहेर थरथर कापणाऱ्या सैतानासारखा वारा सुटला होता, त्याच्या गर्जनांमधून कण्हण्याचे, किंचाळ्यांचे व जंगली हसण्याचे आवाज ऐकू येत होते. संध्याकाळच्या दरम्यान हिमवादळाचा जोर वाढला. खिडक्यांच्या तावदानांवर कुणीतरी मुठी मुठी भरून कोरड्या हिमाची भुकटी फेकत होते असे भासत होते. जवळचे जंगल अखंडपणे सळसळत होते, घुमत होते, गुप्त भीती दाखवीत होते.

रिकाम्या खोल्यांमध्ये वारा घुसायचा, धुरांड्यांमधून घुमायचा व मग खिळखिळे झालेले ते जुने घर अचानक विचित्र आवाजांनी सजग बनायचे. नकळत भीतीने मी ते आवाज ऐकत होतो. शुभ्र दालनात उसासा ऐकू यायचा – एक खोल, तुटणारा, दुःखी उसासा. मग कुज-लेल्या तक्तपोशीच्या फळ्या कुणाच्यातरी दणकट पावलांखाली करकराय-च्या. पुढच्याच क्षणी मला भास व्हायचा की, माझ्या खोलीलगतच्या पॅसेजमध्ये कुणीतरी दाराच्या मुठीशी सावधपणे खुडबूड चालवली होती, मग अचानक संतापून तो सबंध घरभर धावू लागायचा, सगळ्या झड-पांना व दारांना रागाने गदागदा हलवायचा अथवा धुरांड्यात सरपटत जाऊन तेथे अखंडपणे विव्हळत रहायचा, काहीवेळा करुण किंकाळ्या फोडायचा, तर काहीवेळा श्वापदासारखा फूत्कारायचा. काहीवेळा अज्ञा-तामधून येणारा भयानक पाहुणा धाडकन माझ्या खोलीत घुसायचा, माझ्या पाठीवर अचानक थंड स्पर्श करून जायचा, जळक्या शेंड्याच्या हिरव्या कागदी आच्छादनाखालील मंदपणे प्रकाशणाऱ्या दिव्याच्या ज्यो-तीला हलवायचा.

मला एका विचित्र, अनिश्चित चिंतेने ग्रासले होते. मी विचार करीत होतो : जंगलात आणि बर्फखंडांमध्ये लपलेल्या खेड्यातील एका जुनाट

पडक्या घरात अंधाऱ्या, वादळी हिवाळी रात्री मी बसून आहे; शहरी जीवनापासून, समाजापासून, स्त्रियांच्या हसण्यापासून व मानवी संभाषणापासून शेकडो वेर्स्ता दूर... आणि मला वाटू लागले की, ती वादळी रात्र वर्षानुवर्षे व दशकानुदशके तशीच चालू राहणार, माझ्या मरणापर्यंत; आणि बाहेर वारा असाच भयाण गर्जना करीत राहणार, मळकट हिरव्या आच्छादनाखालील दिवा असाच मंद पेटत राहणार, मी माझ्या खोलीत अशाच अस्वस्थ फेऱ्या मारत राहणार, कुढणारा यार्मोला चुलाण्यापुढे असाच गप्प बसून राहणार: मला परका असणारा व जगातील सर्व गोष्टींशी निर्विकार वागणारा विचित्र माणूस. त्याच्या कुटुंबापाशी खायला काही नव्हते, बाहेर सोसाट्याचा वारा होता, मी एका अनिश्चित, कुरतडणाऱ्या दुःखाच्या मनःस्थितीत होतो, ह्या वस्तुस्थितीबाबत यार्मोला निर्विकार होता.

ही दडपणारी शांतता मानवी आवाजाने भंगली जावी अशी अचानक मला इच्छा झाली, म्हणून मी विचारले:

"तुला काय वाटतं यार्मोला, आज हा असा वारा कुठून आला?"

"वारा?" सुस्तपणे डोके वर उचलीत यार्मोला म्हणाला. "मालकांना ठाऊक नाही?"

"अर्थातच नाही. मला कुठून ठाऊक असणार?"

"खरंच माहीत नाही?" अचानक यार्मोलात चैतन्य आले. "तर मी सांगतो तुम्हाला," रहस्यमय आवाजात तो पुढे म्हणाला, "मी सांगतो तुम्हाला: एक तर चेटकीण जन्माला आली, किंवा चेटक्या आनंद साजरा करतोय."

मी यार्मोलावर आधाशासारखा तुटून पडलो. "कोण जाणे," मी मनाशी विचार केला, "कदाचित मी त्याच्याकडून जादूटोण्याविषयी, गुप्त खजिन्यांविषयी अथवा मानवरूपी लांडग्यांविषयी एखादी कहाणी काढून घेईन."

"तुमच्या इथं, पोलेस्येमध्ये, चेटकिणी आहेत?" मी विचारले.

"माहीत नाही... कदाचित आहेत," यार्मोला पूर्वीप्रमाणेच निर्विकार उत्तरला व पुन्हा चुलाण्यावर वाकला. "म्हातारी माणसं म्हणतात, कधी काळी होत्या... कदाचित खरं नसेल..."

माझी निराशा झाली. यार्मोला किती हट्टी अबोल होता हे मला माहीत होते आणि त्या रसदार विषयावर त्याच्यापासून आणखी काही वदवून घेण्याची माझी आशा मावळली होती. पण आश्चर्य म्हणजे अचानक तो सुस्त निर्विकार आवाजात बोलू लागला. जणू तो माझ्याशी नव्हे, तर पेटणाऱ्या चुलाण्याशी बोलत होता:

"पाच वर्षांपूर्वी आमच्याकडं अशी एक चेटकीण होती... पण पोरांनी तिला पळवून लावलं."

"कुठं पळवून लावलं?"

"कुठं!.. अर्थातच जंगलात... आणखी कुठं? आणि तिची झोपडी पाडून टाकली, तिच्या नतद्रष्ट घरट्यात सुतळीचा तुकडासुद्धा शिल्लक राहू नये म्हणून... खुद्द तिला चेरीच्या बागांपलिकडं पिटाळून लावलं."

"कशाबद्दल तिला अशी वागणूक दिली?"

"तिच्यापासून फार नुकसानी झाली. ती सर्वांशी भांडायची, घरांवर चेटूक करायची, पेंढ्यांमध्ये खुंट मारायची... एकदा एका तरुण बाईपाशी तिनं एक झ्लोतीचं नाणं मागितलं... ती बाई म्हणाली: 'नाही माझ्यापाशी झ्लोती, चालती हो.' तेव्हा चेटकीण म्हणाली: 'ठीक आहे, तू मला झ्लोती नाकारलीस ह्याबद्दल एक दिवस तुला पश्चात्ताप होईल.' आणि तुम्हाला काय वाटतं, मालक: त्या क्षणापासून त्या तरुण बाईचं पोर आजारी पडलं. त्या आजारातच ते मेलं. तेव्हा पोरांनी चेटकिणीला हाकलून लावलं, वाईट नजरेची म्हणून!"

"आता ही चेटकीण कुठं आहे?" कुतूहलाने मी पुढचा प्रश्न विचारला.

"चेटकीण?" यार्मोलाने स्वतःच्या सवयीनुसार सावकाशपणे परत प्रश्न केला. "मला कसं माहीत असणार?"

"खेड्यात तिचे कुणी नातेवाईक उरले नाहीत?"

"नाहीत. ती परकी होती—रशियन किंवा जिप्सी... जेव्हा ती आमच्या खेड्यात रहायला आली, तेव्हा मी छोटा पोरगा होतो. तिच्याबरोबर एक छोटी मुलगी होती: तिची मुलगी किंवा नात... दोघींनाही पळवून लावलं..."

"आता तिच्यापाशी कुणीही जात नाही? भविष्य जाणून घ्यायला किंवा जडीबुटी मागायला?"

"बायका जातात," यार्मोला तिरस्काराने सूर लांबवीत म्हणाला.

"अच्छा! म्हणजे ती कुठं राहते हे माहीत आहे?"

"मला माहीत नाही... माणसं म्हणतात की, ती कुठंतरी सैताना-च्या कोपऱ्यात राहते... इरीनोवो रस्त्यापलिकडचा दलदली भाग माहीत आहे? तिथं ती राहते, हलकट थेरडी!"

"म्हणजे माझ्या घरापासून काही दशक वेर्स्ता अंतरावर राहतेय... पोलेस्येची अस्सल जिवंत चेटकीण!" ह्या विचाराने मी थरारलो आणि उत्तेजित बनलो.

"हे बघ यार्मोला, त्या चेटकिणीशी मी कशी ओळख करून घेऊ?"

"थू:!" यार्मोला तिरस्काराने थुंकला. "हे काय नवं खूळ डोक्यात घेतलंत?"

"खूळ म्हण नाहीतर आणखी काही म्हण, पण मी तिच्याकडं जाणारच. हवा जराशी उबदार बनली, की ताबडतोब तिकडं जायला निघतो. अर्थात, तू माझ्या सोबतीला येशील?"

शेवटच्या शब्दांनी यार्मोला एवढा चकित झाला, की त्याने टुणकन उडी मारली.

"मी?" संतापाने तो ओरडला. "मुळीच नाही! कोणत्याही परि-स्थितीत मी येणार नाही!"

"मूर्खपणा करू नकोस. अर्थात येशील!"

"नाही मालक, नाही येणार... काही दिलंत तरी नाही येणार... मी तिच्याकडं जाऊ?" रागाच्या नव्या झटक्यासरशी तो परत ओरडला. "मी चेटकिणीच्या घरट्यात जाऊ? देवा रे देवा! मालक, तुम्हीसुद्धा जाऊ नका असा सल्ला देतो."

"तुझी मर्जी... पण मी जाणारच. तिला पहायचं मला फार कुतूहल आहे."

"काही नाही तिथं पाहण्यासारखं," चुलाण्याचे दार रागाने आपटून बंद करीत यार्मोला गुरगुरला.

तासाभरानंतर, अंधाऱ्या पॅसेजमध्ये बसून यार्मोलाने चहा प्यायल्या-नंतर, जेव्हा तो घरी जायला निघाला, तेव्हा मी विचारले:

"त्या चेटकिणीचं नाव काय?"

"मानुयलीखा," यार्मोला कर्कश्यपणे उत्तरला.

जरी कधी त्याने उघडपणे दाखविले नव्हते, तरी मला जाणवत होते की, त्याचा माझ्यावर फार जीव जडला होता. आम्हा दोघांचा शिकारीचा समान नाद, माझे त्याच्याशी साधे वागणे, कायम उपासमार सोसणाऱ्या त्याच्या कुटुंबाला कधीमधी मी देत असलेली मदत, ही त्यामागील कारणे होती. पण त्यापेक्षा महत्त्वाचे कारण म्हणजे मी कधीही त्याच्या दारूच्या व्यसनाबाबत त्याची खरडपट्टी काढत नव्हतो. त्याच्या व्यसनाबाबत कुणी बोललेले त्याला मुळीच आवडत नसे. म्हणून चेटकिणीला भेटण्याच्या माझ्या निर्धाराचा त्याला फार राग आला होता व नाकाची जोरजोरात फुरफुर करून, बाहेर व्हरांड्यातून जाताना त्याच्या कुत्र्याच्या – ऱ्याबचिकच्या – पेकाटात लाथ मारून, त्याने आपला राग व्यक्त केला होता. ऱ्याबचिकने केविलवाणी आरोळी फोडली व बाजूला उडी मारली, पण तरीही यार्मोलाच्या पाठोपाठ केकाटत तो धावला.

३

तीन दिवसांनंतर वातावरण उबदार बनले. एके सकाळी खूप लौकरच्या प्रहरी यार्मोला माझ्या खोलीत आला आणि सहजपणे म्हणाला :

"बंदूका स्वच्छ केल्या पाहिजेत, मालक."

"काय झालं?" पांघरुणाखाली अंग ताणीत मी विचारले.

"रात्री ससे खूप धावलेत: भरपूर खुणा उमटल्यात. शिकारीवर जायचं?"

मी पाहिले की, यार्मोला जंगलात जायला अधीर बनला होता, पण निर्विकारपणाच्या बहाण्याखाली शिकाऱ्याची उत्सुकता दडवीत होता. खरे तर त्याची लहान बंदूक बाहेरच्या पॅसेजमध्ये आधीच उभी होती. त्या बंदूकीतून उडालेला एकही बार कधी वाया गेलेला नव्हता, जरी चापापाशी गंजाने व बंदूकीच्या दारूच्या भुकटीमधून बाहेर पडणाऱ्या वायूंनी धातू कुरतडल्यामुळे पत्र्याची अनेक ठिगळे लावलेली होती.

आम्ही जंगलात प्रवेश केला न केला तोच सशाच्या खुणा आम्हाला आढळल्या: दोन पावलांचे ठसे शेजारी शेजारी आणि दोन मागे, एका पाठोपाठ. ससा रस्त्यावर आला होता, सुमारे दोनशे साझेन धावला होता आणि मग प्रचंड उडी मारून पाईनच्या कोवळ्या झाडांमध्ये गुडूप झाला होता.

"आता त्याच्याभोवती वेढा घालू," यार्मोला म्हणाला. "झटक्यात त्याला आडवा पाडू. तुम्ही, मालक जा..." केवळ त्यालाच माहीत असलेल्या खुणांवरून मला कुठे पाठवायचे ह्याबद्दल त्याने क्षणभर विचार केला. "...तुम्ही जुन्या गुत्त्यापाशी जा. आणि मी झाम्लीनकडून येतो. कुत्र्यानं त्याचा पाठलाग धरला रे धरला की, मी तुम्हाला हाळी घालतो."

दाट झुडुपांमध्ये उडी घालून तो क्षणात अदृश्य झाला. मी कान टवकारले, पण त्याच्या चोरट्या शिकाऱ्या हालचालींचा मुळीच आवाज आला नाही, एकही डहाळी त्याच्या पावलांखाली वाजली नाही.

मी सावकाशपणे जुन्या गुत्त्यापाशी गेलो. ते एक निर्जन, मोडकळीला आलेले खोपट होते. जंगलाच्या कडेशी उभ्या असलेल्या, बोडक्या बुंध्याच्या एका उंच पाईनच्या झाडाखाली मी थांबलो. बिनवाऱ्याच्या हिवाळी दिवशी जंगल जसे शांत असते, तशी शांतता होती. फांद्यांवर लटकलेले हिमाचे अवजड पुंजके त्या फांद्यांना अद्भुत, उत्सवी रूप देत होते. मधूनच एखादी फांदी झाडाच्या शेंड्यावरून मोडायची आणि इतर फांद्यांवर आघात करीत खाली पडताना होणारा तिचा कडकड आवाज मला स्पष्ट ऐकू यायचा. हिम उन्हात गुलाबी दिसत होते व सावलीत फिकट निळे. त्या पवित्र, थंड्या शांततेच्या जादूने मी भारून गेलो आणि काळ माझ्याजवळून आवाज न करता पसार होत होता असे मला भासले.

अचानक दूर झुडुपांमध्ये ऱ्याबचिकचे भुंकणे घुमले. सावजापाठी धावणाऱ्या कुत्र्याचे ते विशिष्ट भुंकणे होते—वरच्या पट्टीतील, केकाटण्याशी जवळीक साधणारा ध्वनी. त्यानंतर तात्काळ यार्मोलाचा कुत्र्यावर खेकसणारा आवाज ऐकू आला—"ऊ-बीय! ऊ-बीय!" पहिला स्वर उंच लांबवलेला होता आणि दुसरे अक्षर खर्जात होते (खूप काळानंतर

मला समजले की, पोलेस्येमधील शिकाऱ्यांची ही आरोळी "ऊबीवात" [ठार मारणे–अनु.] ह्या क्रियापदापासून निर्माण झाली होती).

भुंकण्याच्या दिशेवरून मला वाटले की, माझ्या डाव्या बाजूने कुत्रा सशाचा पाठलाग करीत असावा. म्हणून त्याला अडविण्यासाठी मी उघडच्या मैदानातून धावलो. पण मी वीस पावले धावलो नाही, तेवढ्यात एका खुंटामागून भल्या मोठ्या भुऱ्या सशाने उडी मारली. जणू काही घाई नाही अशा थाटात, स्वतःचे लांब कान खाली पाडून त्याने दोन मोठ्या उड्यांमध्ये रस्ता ओलांडला व झुडुपात तो नाहीसा झाला. सशापाठोपाठ ऱ्याबचिक धावत आला. मला पाहताच त्याने शेपूट किंचित हलविली, भराभरा बर्फाची काही ढेकळे दातांखाली रगडली व परत सशाच्या पाठलागावर तो धावला.

अचानक झुडुपांमधून मुळीच आवाज न करता यार्मोला उगवला.

"तुम्ही त्याला रस्त्यावर अडवला का नाही, मालक?" तो ओरडला आणि संतापाने त्याने जिभेचा आवाज केला.

"पण तो फार लांब होता... दोनशे पावलांपेक्षा जास्त."

मी गोंधळल्यामुळे यार्मोला थोडा नरमला.

"जाऊं दे... तो आपल्या तावडीतून सुटणार नाही. इरीनोवोच्या रस्त्यावर जा–तो आत्ता तिथं बाहेर पडेल."

मी इरीनोवोच्या रस्त्याच्या दिशेने निघालो आणि अवघ्या दोन मिनिटांनंतर, सावजापाठी धावणाऱ्या कुत्र्याचे भुंकणे माझ्यापासून जवळच मला ऐकू आले. आता शिकाऱ्याचा उत्साह माझ्या अंगी संचारला आणि हाती बंदूक सज्ज धरून, वाटेत आडव्या येणाऱ्या फांद्यांच्या प्रहारांची पर्वा न करता, दाट झुडुपांमधून मी धावू लागलो. थोडा वेळपर्यंत मी तसा धावत राहिलो, मला धाप लागली होती, तेवढ्यात कुत्र्याचे भुंकणे थांबले. मी वेग कमी केला. मी जर सरळ समोर जात राहिलो, तर इरीनोवा रस्त्यावर यार्मोलाशी माझी गाठ पडेल, अशी माझी अटकळ होती. पण लौकरच माझ्या ध्यानात आले की, झुडुपांना व खुंटांना टाळून दिशेचा विचार न करता धावताना मी वाट चुकलो होतो. मग मी यार्मोलाला हाळी दिली. पण त्याचे प्रत्युत्तर आले नाही.

यांत्रिकपणे मी चालत राहिलो. हळूहळू जंगल विरळ होत गेले

आणि दलदली जमीन सुरू झाली. बर्फावरील माझ्या पावलांचे ठसे पटकन काळपट बनू लागले आणि त्यांच्यात पाणी भरू लागले. अनेकदा माझे पाय गुडघ्यांपर्यंत दलदलीत रुतले. एका उंचवट्यावरून दुसऱ्या उंचवट्यावर मला उड्या माराव्या लागत होत्या ; मऊ गालीचात पाय रुतावेत तसे तपकिरी शेवाळात माझे पाय बुडत होते.

लौकरच झुडुपे संपली. माझ्यासमोर विस्तीर्ण, गोलाकार, हिमाच्छादित दलदलीचा प्रदेश पसरला होता. त्यात अधूनमधून गवताचे पुंजके वर डोकावत होते. दलदलीच्या दुसऱ्या टोकाला झाडांदरम्यान उभ्या असलेल्या झोपडीच्या पांढऱ्या भिंती दिसत होत्या. "बहुधा इथं इरीनोवोचा जंगलतोड्या रहात असावा," माझ्या मनात विचार आला. "झोपडीत जाऊन त्याला माझ्या परतीचा रस्ता विचारला पाहिजे."

पण झोपडीपर्यंत पोहोचणे सोपे नव्हते. दर क्षणाला मी नव्याने दलदलीत अडकत होतो. माझ्या उंच बुटांमध्ये पाणी भरले होते आणि दर पावलागणिक पचक् पचक् आवाज होत होता. बुटांसह फरफटत चालणे अधिकाधिक अवघड बनत होते.

शेवटी मी दलदल पार केली व एका उंच टेकाडावर उभा राहिलो. तेथून झोपडी स्पष्ट दिसत होती. परीकथेतील चेटकिणीच्या झोपडीप्रमाणे ती भासत होती. जमिनीपासून उंचावर, फळ्यांवर ती उभारली होती. बहुधा इरीनोवोच्या जंगलात वसंतामध्ये नेहमी पाणी भरत असावे. पण काळाच्या ओघात झोपडीची एक बाजू खचली होती व त्यामुळे ती लंगडी, उदास भासत होती. खिडक्यांची काही तावदाने गायब होती ; त्यांच्याऐवजी कोंबलेल्या मळक्या चिंध्या लोंबत होत्या.

मी मूठ फिरवून दार उघडले. आत खूप अंधार होता. खूप काळपर्यंत बर्फाकडे पाहिल्यामुळे माझ्या डोळ्यांसमोर वर्तुळे नाचू लागली. आत कुणी होते अथवा नव्हते ह्याचा अंदाज घ्यायला मला थोडा अवधी लागला.

"भल्या माणसांनो, तुमच्यापैकी कुणी आत आहे का?" मी मोठ्यांदा विचारले.

चुलाण्यापाशी हालचाल झाली. मी चुलाण्याच्या जवळ गेलो, तेव्हा जमिनीवर बसलेली एक म्हातारी मला दिसली. तिच्यासमोर कोंबडीच्या

पिसांचा भला मोठा ढिगारा होता. ती एकामागून एक पीस उचलत होती, त्यांची लव तोडून टोपलीत टाकत होती व दांड्यांना जमिनीवर फेकत होती.

"अरेच्चा, ही मानुयलीखा असावी – इरीनोवोची चेटकीण!" म्हातारीला न्याहाळून पाहताच हा विचार माझ्या मनात चमकून गेला. परीकथेत वर्णन करतात तशा बाबा यागा*प्रमाणे तिचा हुबेहूब अवतार होता: आत गेलेले खप्पड गाल, बाकदार नाकाच्या टोकाला जवळ जवळ टेकणारी निमुळती हनुवटी; सतत चघळत असल्याप्रमाणे तोंडाचे दंतहीन बोळके; एकेकाळी निळे असलेले, पण आता फिके पडलेले, थंड बटबटीत डोळे त्यांच्या अपऱ्या लाल पापण्यांसह एखाद्या अपशकुनी पक्ष्याच्या डोळ्यांप्रमाणे भासत होते.

"नमस्कार, आजीबाई!" शक्य तितक्या स्नेहल आवाजात मी म्हणालो. "तुझंच नाव मानुयलीखा आहे का?"

म्हातारीच्या छातीत खडखडाट आणि घरघराट झाला; धापा टाकणाऱ्या म्हाताऱ्या कावळ्याच्या ओरडण्यासारखे विचित्र आवाज तिच्या दंतहीन, बोबड्या बोळक्यातून उमटले. काहीवेळा त्या आवाजांमधून चिरका तारस्वर निघत होता.

"पूर्वी कधीतरी भली माणसं मानुयलीखा म्हणत... पण आता मला ना नाव, ना गाव. तुला काय पाहिजे?" तिच्या विचारण्यात तुसडेपणा होता आणि स्वतःचे एकसुरी काम तिने चालू ठेवले.

"आजीबाई, मी वाट चुकलोय. कदाचित, तुझ्यापाशी दूध मिळेल?"

"दूध नाही," म्हातारी ताडकन उत्तरली. "तुमच्यासारखे जंगलात खूप भटकतात... सगळ्यांना खाऊ-पिऊ घालणं शक्य नाही..."

"आजीबाई... पाहुण्यांशी तुझं वागणं प्रेमळ नाही."

"अगदी बरोबर, साहेबा, मुळीच प्रेमळ नाही. तुमच्यासाठी अन्न शिजवत नाही. दमलास तर बैस थोडा वेळ. कुणीही तुला झोपडीतून हाकलणार नाही. एक म्हण माहीत आहे का: "आमच्या सणाच्या घंटा

---

*बाबा यागा – रशियन लोककथांमधील चेटकिणीची व्यक्तिरेखा – अनु.

ऐकायला आमच्याकडं येऊन बसा, पण जेवणाला मात्र आम्ही तुमच्याकडं येऊ. तर असं आहे..."

ह्या भाषेच्या ढंगावरून ताबडतोब माझी खात्री पटली की, म्हातारी ह्या प्रदेशामधील नव्हती; उत्तरेकडील लोकांना बोलायला आवडणारी तिखट, झणझणीत भाषा येथील लोकांना आवडत नव्हती. दरम्यान म्हातारी यांत्रिकपणे काम करीत होती, तिचे स्वतःशी पुटपुटणे मात्र कमी कमी ऐकू येत होते. मला अधूनमधून तुटकी वाक्ये समजायची: "ही बघ आजी मानुयलीखा... पण तू कोण, माहीत नाही... माझं वय आता खूप झालंय... पाय लटपटतात आणि मैनेसारखी सतत वटवट..."

काही काळपर्यंत मी तिचे पुटपुटणे मुकाट ऐकत राहिलो आणि माझ्यासमोर बसलेली बाई ठार वेडी असावी असा विचार अनपेक्षितपणे मनात येताच भीतीने माझी गाळण उडाली व मला किळस आली.

तरीही मी सभोवती नजर टाकली. झोपडीचा बहुतेक भाग ढासळ-लेल्या चुलाण्याने व्यापला होता. पुढच्या कोपऱ्यात देवाच्या तसबिरी नव्हत्या. जांभळ्या कुत्र्यांसकटच्या हिरव्या मिशांवाल्या शिकाऱ्यांच्या व कुणालाही माहीत नसलेल्या जनरलांच्या नेहमीच्या चित्रांऐवजी, भिंतींवर सुकलेल्या औषधी गवतांचे पुंजके, सुरकुतल्या मुळांचे गड्डे व स्वयंपाकाची भांडी, अशा वस्तू टांगलेल्या होत्या. एखादे घुबड अथवा काळे मांजर मला दिसले नाही, पण दोन ठिपकेदार सारिका मात्र चुलाण्यावर बसून माझ्याकडे चकित व संशयी नजरांनी पहात होत्या.

"आजीबाई, तुमच्याकडं निदान पाणी प्यायला मिळेल?" मी आवाज चढवून विचारले.

"ते बघ, बादलीत," ती म्हणाली.

पाण्याला दलदली चव होती. मी म्हातारीचे आभार मानले (तिने तिकडे मुळीच लक्ष दिले नाही), मी तिला परतायची वाट विचारली.

तिने एकदम डोके वर उचलले, स्वतःच्या थंड पक्ष्याच्या डोळ्यांनी माझ्याकडे टक लावून पाहिले आणि घाईघाईने ती पुटपुटली:

"जा, जा तुझ्या वाटेनं तरुण माणसा. इथं तुझं काही काम नाही. बोलावलं असलं तर तो चांगला पाहुणा... जा साहेबा, जा."

खरोखरीच जाण्याशिवाय माझ्यापुढे दुसरा पर्याय नव्हता. पण त्या कडक म्हातारीला मऊ करण्याचा एक शेवटचा प्रयत्न करावा असे मला वाटले. मी खिशातून एक नवेकोरे चांदीचे नाणे काढले व तिच्यापुढे धरले. माझा अंदाज खरा ठरला; पैसे पाहताच तिचे डोळे विस्फारले आणि नाणे घेण्यासाठी तिने तिची वाकडी, गाठाळ, थरथरती बोटे पुढे पसरली.

"ए आजीबाई मानुयलीखा, फुकट देणार नाही," नाणे लपवीत मी तिला चिडवले. "प्रथम माझं भविष्य सांग."

चेटकिणीचा तपकिरी सुरकुतला चेहरा नाराज बनला. नाणे असले-ल्या माझ्या बंद मुठीकडे पाहताना तिच्या मनाची घालमेल चाललेली मला स्पष्ट दिसत होती. शेवटी लोभाने वर्चस्व प्रस्थापित केले.

"ठीक आहे, चल," कष्टाने उठत ती पुटपुटली. "आजकाल मी कुणाचं भविष्य पहात नाही... विसरले... म्हातारी झालेय, डोळ्यांना दिसत नाही. पण फक्त तुझ्या खुषीसाठी सांगत्ये."

भिंतीचा आधार घेऊन टेबलापर्यंत जाताना तिची वाकलेली आकृती दर पावलाला थरथरत होती. प्रदीर्घ काळ वापरल्यामुळे विसविशीत बनलेला पिवळसर तपकिरी पत्त्यांचा जोड तिने घेतला, पिसला व माझ्यापुढे धरला.

"काप... तुझ्या डाव्या हातानं काप तुझ्या काळजाजवळच्या."

ती स्वतःच्या बोटांवर थुंकली व पाने मांडू लागली. पाने जणू पिठाची असल्यागत आवाज करीत टेबलावर पडत होती. त्यांचा अष्ट-कोनी तारा बनला. जेव्हा शेवटचे पान राजाच्या तोंडावर पालथे पडले, तेव्हा मानुयलीखाने माझ्यापुढे हात धरला.

"साहेबा, दे ते नाणं... सुखी होशील, श्रीमंत बनशील," वि-शिष्ट जिप्सी सुरात तिने भीक मागितली.

मी आधीच तयार ठेवलेले नाणे तिच्या हाती खुपसले. म्हातारीने माकडाच्या चपळाईने ते गालाआड दडविले.

"लांबच्या प्रवासातून तुझा मोठा फायदा होणार आहे," तिने सवयीनुसार टकळी सुरू केली. "तुझी चौकटच्या राणीशी गाठ पडेल आणि एका महत्त्वाच्या घरात तुला **प्रिय संभाषण** घडेल. लौकरच तुला

किलवरच्या राजाकडून अनपेक्षित बातमी मिळेल. तुझ्यावर काही संकटं कोसळतील आणि नंतर थोडे पैसे मिळतील. मोठ्यांच्या संगतीत राहशील, दारुडा बनशील... फार मोठा दारुडा होणार नाहीस, पण पिणारा होशील. तुला खूप आयुष्य आहे. जर सदुसष्टाव्या वर्षी मेला नाहीस, तर..."

ती थांबली व जणू कानोसा घ्यायला तिने डोके वर उचलले. मीही कान टवकारले. कुणा एका बाईचा ताजा, खणखणीत आणि दमदार आवाज गाणे गात झोपडीपाशी येत होता. मधुर युक्रेनी गीतामधील शब्द मी ओळखले :

बहरली फांदी फुलांची
गुलाबाला वाकवते का हो?
स्वप्नाची धुंदी माझ्या
मस्तकाला वाकवते का हो?

"आता जा माझ्या सोन्या," माझा हात टेबलापासून बाजूला झटकून म्हातारी चुळबुळत घाबरून म्हणाली. "परक्यांच्या घरात रेंगाळायचं तुला काही कारण नाही. जिथं जायचं होतं तिकडं जा..."

तिने माझी बाहीसुद्धा पकडली व ती मला दाराकडे ओढू लागली. तिच्या चेहऱ्यावर घायाळ जनावराचा भाव होता.

अचानक झोपडीपाशी गाणे थांबले; लोखंडी मूठ फिरली, दार सताड उघडले आणि एक उंच, हसरी मुलगी दारात अवतरली. दोन्ही हातांनी तिने स्वतःच्या पट्टेदार मलवस्त्राचा ओचा काळजीपूर्वक धरला होता, त्यातून लाल मानांच्या व काळ्या चकचकीत डोळ्यांच्या तीन छोट्या पाखरांची डोकी डोकावत होती.

"बघ आजी, ही पाखरं परत माझ्यापाशी आली," मनापासून हसत ती ओरडली. "बघ, किती मजेदार आहेत... अगदी उपाशी आहेत. माझ्यापाशी नेमका पाव नव्हता."

पण मला पाहताच ती एकदम बोलायची थांबली व लाजली. तिच्या काळ्या भुवया तिरस्काराने आकुंचन पावल्या आणि म्हातारीकडे तिने प्रश्नार्थक चेहऱ्याने पाहिले.

"साहेब आला होता... वाट विचारत होता," म्हातारीने खुलासा केला. "बरं साहेबा," ठाम निश्चयाने माझ्याकडे वळून ती म्हणाली, "आधीच वेळ वाया गेलाय तुझा. पाणी पिऊन झालं, बोलून झालं, आता तू जाणं ठीक होईल. आम्ही काही तुझ्या सोबतीची माणसं नव्हे..."

"ऐक, सुंदरी," मी त्या तरुणीला म्हणालो. "कृपया मला इरीनोवोचा रस्ता दाखव, नाही तर तुमच्या ह्या दलदली प्रदेशातून जन्मात बाहेर पडणं शक्य नाही."

माझ्या सौम्य, विनवणीच्या स्वराचा तिच्यावर प्रभाव पडला असावा. तिने काळजीपूर्वक त्या पाखरांना सारिकांजवळ ठेवले, आधीच अंगातून काढलेला कोट बाकड्यावर फेकला आणि मुकाटपणे ती बाहेर चालत गेली.

मी तिच्या पाठोपाठ निघालो.

"तुझी ही पाखरं माणसाळलेली आहेत?" तरुणीला गाठत मी विचारले.

"होय," माझ्याकडे वळूनसुद्धा न पाहता ती तुटकपणे उत्तरली. "ती पहा," काठ्यांच्या कुंपणापाशी थांबत ती म्हणाली. "ती पहा पाईनच्या झाडांमधून गेलेली पाऊलवाट दिसते? पाहिलीत?"

"हो..."

"त्या वाटेनं अगदी समोर चालत जा. जेव्हा ओकच्या ओंडक्याशी पोहोचाल, तेव्हा डावीकडं वळा. मग थेट सरळ जंगलातून चालत जा. तिथं तुम्हाला इरीनोवोचा रस्ता दिसेल."

उजवा हात लांबवून जेव्हा ती रस्ता दाखवीत होती, तेव्हा नकळत मी तिचे सौंदर्य न्याहाळीत होतो. डोक्यावरून कपाळापर्यंत आणि खालून हनुवटी व तोंड रुमालात गचाळपणे झाकून घेणाऱ्या, सतत भेदरलेल्या चेहऱ्यांच्या स्थानिक पोरींपेक्षा ती अगदी वेगळी होती. माझी अनोळखी तरुणी छान उंच, काळया केसांची, वीस-पंचवीस वयाची, सहज आणि डौलदार वागणारी होती. तिच्या तरुण, घाटदार स्तनांना रुंद गळयाच्या सदऱ्याने झाकले होते. तिच्या चेहऱ्याचे आगळे सौंदर्य एकदा पाहिल्यानंतर, पुन्हा कधी विसरणे शक्य नव्हते. पण त्या सौंदर्याचा परिचय

झाल्यानंतरही त्याचे वर्णन करणे अवघड होते. त्या सौंदर्याची मोहकता तिच्या टपोऱ्या, चमकदार, काळ्या डोळ्यांमध्ये सामावली होती. मधो-मध दुभंगलेल्या तिच्या सुरेख कमानदार भुवयांखालील ते डोळे ओझरत्या धूर्ततेची, ऐटबाजपणाची आणि भाबडेपणाची छटा व्यक्त करीत होते; तिच्या काळसर गुलाबी त्वचेमधून, तिच्या निर्धारी ओठांमधून – तिचा खालचा ओठ जरा जास्त मोठा होता – तिचा ठाम व लहरी स्वभाव जाणवत होता.

"एवढ्या दूर जंगलात एकटं रहायची तुम्हाला भीती वाटत नाही?" कुंपणाशी थांबत मी विचारले.

तिने बेफिकीरपणे खांदे उडविले.

"कशाला भ्यायचं आम्ही? इकडं लांडगे येत नाहीत."

"भीती काय फक्त लांडग्यांची असते... बर्फाखाली गाडून जाल, किंवा वणवा पेटेल... काय वाट्टेल ते घडू शकतं. तुम्ही इथं एकटच्या, तुम्हाला कुणी मदतसुद्धा वेळेवर देऊ शकणार नाही."

"तेच छान!" तिने तिरस्काराने हात झटकला. "आजीला आणि मला त्यांनी कायमचं शांत राहू दिलं तर बरं होईल, नाही तर..."

"नाही तर काय?"

"फार माहिती करून घेतलीत तर लौकर म्हातारे व्हाल," ती तुटकपणे म्हणाली. "खरंच, तुम्ही स्वतः कोण आहात?" अस्वस्थपणे तिने विचारले.

म्हातारीला आणि ह्या तरुणीला सरकारी अंमलदारांकडून छळ होईल अशी भीती वाटत होती, ह्याची मला जाणीव झाली होती व म्हणून मी घाईघाईने तिला शांत करायचा प्रयत्न केला:

"अग, तू घाबरू नको! मी पोलीस अधिकारी नव्हे, कोर्टाचा कारकून नव्हे, जकात अधिकारी नव्हे, थोडक्यात – मी सरकारी अंमलदार नाही."

"तुम्ही खरं बोलताय?"

"शपथेवर सांगतो. देवाशपथ, मी इथं अगदी परका माणूस आहे. काही महिन्यांपुरता इथं रहायला आलोय, मग मी परत जाईन. जर तुझी इच्छा नसेल, तर मी इथं आलो होतो आणि तुमची भेट झाली,

याबद्दल कुणाला अक्षरानं सांगणार नाही. तू माझ्यावर विश्वास ठेवतेस?"

तरुणीचा चेहरा काहीसा उजळला.

"म्हणजे तुम्ही खोटं सांगत नसाल, तर खरं असावं. तुम्ही आमच्याबद्दल पूर्वी काही ऐकलं होतं अथवा चुकून इकडं आलात?"

"माझं मलाच माहीत नाही, तुला कसं सांगावं... पूर्वी मी तुमच्याबद्दल ऐकलं होतं हे खरं आणि कधीतरी तुमच्याकडं येण्याचा माझा इरादा होता, पण आज अगदी योगायोगानं आलो—वाट चुकलो... आता सांग, माणसांना तुम्ही का भिता? ती काय तुमचं वाईट करतात?"

तिने अविश्वासाने मला न्याहाळले. पण मी पूर्ण प्रामाणिक होतो आणि तिच्या भेदक नजरेला मी धीटपणे माझी नजर भिडविली. तेव्हा ती वाढत्या आवेगाने बोलू लागली:

"माणसांमुळं आमचं जगणं फार अवघड बनत चाललंय... सामान्य माणसांचं विशेष काही नाही, पण सरकारी अधिकारी... पोलीस अधिकारी येतो—काहीतरी उचलून नेतो, तालुक्याचा पोलीस अंमलदार येतो—तो काहीतरी घेऊन जातो. तेवढ्यावरच भागत नाही. आजीला नाही नाही ती नावं ठेवतात: चेटकीण म्हणतात, सैतानीण म्हणतात, तुरुंगवाली म्हणतात... काय उपयोग बोलून!"

"तुला त्रास देत नाहीत?" माझ्या तोंडून बेसावधपणे प्रश्न बाहेर निसटला.

आत्मविश्वासाने तिने डोक्याला मागे झटका दिला आणि तिच्या किलकिल्या डोळयांमध्ये दुष्ट विजयाची चमक तरळली...

"नाही देत मला त्रास! एकदा एका जमीन सर्वेक्षकानं माझी पाठ धरली होती... त्याला माझ्याकडून गोंजारून पाहिजे होतं... त्याला मी कसं गोंजारलं ते अजून तो विसरला नसणार."

तिच्या ह्या उपहासगर्भ, पण विशिष्ट मानी शब्दांमधून रांगडी स्वतंत्रता एवढी उमटत होती, की नकळत माझ्या मनात विचार आला: "पोलेस्येच्या रानात तू काही उगीच वाढली नाहीस—तुझ्याशी कुणी थट्टा करणं धोक्याचं आहे."

"आम्ही कुणाच्या वाटेला जातो का?" ती पुढे बोलू लागली.

माझ्याबद्दलचा तिचा विश्वास वाढू लागला होता. "आम्हाला माणसांची गरज नाही. वर्षातून फक्त एकदा शहरात जाते साबण आणि मीठ विकत घ्यायला... आणि आजीसाठी चहा. तिला चहा फार आवडतो. एरवी कुणाचं तोंडसुद्धा पाहिलं नसतं मी!"

"मला दिसतंय, तू आणि तुझी आजी लोकांचा पाहुणचार करत नाही... पण मी कधी घटकाभरासाठी आलो तर चालेल?"

ती हसू लागली आणि आश्चर्य म्हणजे अनपेक्षितपणे तिचा सुंदर चेहरा बदलला! पूर्वीच्या उग्रतेचा मागमूससुद्धा त्यावर उरला नाही: तो एकदम चमकदार, लाजरा, बालिश बनला.

"तुमचं आमच्यापाशी काय काम? मी आणि आजी कंटाळवाण्या आहोत... इच्छा असेल तर या खुशाल, जर खरंच भले गृहस्थ असाल! मात्र एक सांगते... पुन्हा जर कधी आमच्याकडं आलात, तर बंदुकी-शिवाय येणं जास्त बरं..."

"तू घाबरतेस?"

"मी कशाला घाबरू? मला कसलीही भीती वाटत नाही." तिच्या आवाजात मला परत तिच्या स्वतःच्या सामर्थ्यावरील विश्वास जाणवला. "पण मला एकूण हे आवडत नाही. पक्ष्यांना किंवा सशांना का मारा-यचं? ते कुणालाही अपाय करत नाहीत आणि आपल्याप्रमाणंच त्यांनाही जगावंसं वाटतं. मला ते फार आवडतात: किती छोटे, मूर्ख असतात... बरं, आता निरोप घेते," एकदम ती घाईने म्हणाली, "तुमचं नाव मला माहीत नाही... आजी माझी खरडपट्टी काढेल अशी भीती वाटते."

डोके खाली घालून, वाऱ्याने उडणाऱ्या केसांना सावरीत, अत्यंत चपळपणे व वेगाने ती झोपडीकडे पळाली.

"थांब, थांब!" मी ओरडलो. "तुझं नाव काय? रीतसर ओळख करून घेऊ."

ती क्षणभर थांबली आणि माझ्याकडे वळली.

"आल्योना माझं नाव... इथं मला आलेस्या म्हणतात."

मी खांद्यावर बंदूक टाकली आणि तिने दाखविलेल्या दिशेने निघा-लो. जेथून पुसट जंगलवाट फुटत होती अशा टेकाडावर चढून मी मागे नजर टाकली. वाऱ्याबरोबर किंचित हेलकावणारा आलेस्याचा लाल

घागरा अजून झोपडीच्या व्हरांड्यात दिसत होता. पांढऱ्याशुभ्र झगझगणाऱ्या बर्फावर झोपडीचा काळा ठिपका उठून दिसत होता.

माझ्यानंतर तासाभराने यार्मोला घरी आला. निष्कारण न बोलण्याच्या त्याच्या सवयीनुसार त्याने माझ्या वाट चुकण्याबद्दल अक्षराने विचारले नाही. फक्त सहजपणे म्हणाला :

"तिथं... स्वयंपाकघरात ससा ठेवलाय... भाजायचा अथवा कुणाला पाठवणार आहात?"

"यार्मोला, आज मी कुठं गेलो होतो माहीत आहे?" त्याचे आश्चर्य आधीच अपेक्षून मी विचारले.

"माहीत नसायला काय झालं?" यार्मोला गुरगुरला. "अर्थातच, चेटकिणीपाशी गेला होतात..."

"तुला कसं समजलं?"

"न समजायला काय झालं? माझ्या हाकेला तुमचं उत्तर येईना, म्हणून तुमच्या खुणांवरून मी मागं परतलो... काय हे मालक!" संतापून दूषणास्पद आवाजात तो पुढे म्हणाला. "अशा भानगडींमध्ये तुम्ही गुंतणं चांगलं नव्हे... पाप आहे!.."

४

त्या वर्षी वसंताचे आगमन लौकर झाले व पोलेस्येत नेहमी घडायचे त्याप्रमाणे अनपेक्षित झाले. खेड्यातील रस्त्यांवरून गढूळ पाण्याचे ओहोळ धावत होते, आडव्या येणाऱ्या दगडांवर आपटून फेसाळत होते, स्वतः-बरोबर ढलपे व हंसांची पिसे भिरभिरत नेत होते; मोठमोठ्या डबक्यांमध्ये गोलाकार शुभ्र ढगांसहित निळ्या आकाशाची प्रतिबिंबे पडली होती. आकाशातून ढग तरंगत जात असताना आकाश भिरभिरल्याचा भास होत होता. छपरांवरून पाण्याचे थेंब टप टप आवाज करीत खाली कोसळत होते. रस्त्याकडेच्या वाळुंजींवर चिमण्यांच्या थव्यांनी एवढा प्रचंड चिवचिवाट चालविला होता, की त्यांच्या गलक्यात बाकीचे सारे आवाज बुडून गेले होते. जाग येणाऱ्या जीवनाची आनंदी धांदल सर्वत्र जाणवत होती.

बर्फ वितळून गेले होते. फक्त खळग्यांमध्ये आणि झाडांच्या झुपक्यांच्या छायांखाली चिखलमाखल्या स्पंजांच्या तुकड्यांच्या स्वरूपात कुठे कुठे रेंगाळत होते. बर्फ वितळून गेल्यामुळे उबदार, ओली जमीन उघडी पडली होती. हिवाळ्यात भरपूर विश्रांती घेऊन आता ती ताज्या रसांनी रसरसली होती, पुनश्च मातृत्वाला आसुसली होती. काळ्या शेतांवर हलक्या वाफेच्या सुरळ्या उमटत होत्या आणि शहरातसुद्धा इतर शंभर वासांमध्ये ओळखू येणारा ओल्या मातीचा ताजा, सूक्ष्म, गुंगी आणणारा वासंतिक गंध वातावरणात दरवळत होता. मधुर आणि नाजुक, अस्वस्थ अपेक्षांनी आणि अंधुक आशांनी काठोकाठ भरलेली वासंतिक उदासीनता त्या गंधाबरोबर माझ्या अंतःकरणात वाहात होती असे मला भासत होते. त्या काव्यात्म उदासीनतेत तुमच्या नजरेला प्रत्येक स्त्री सुंदर दिसते आणि पूर्वीच्या वसंतांमधील अनिश्चित खंती मनाला झोंबतात. रात्री अधिक उबदार बनल्या होत्या आणि त्या दाट, ओल्या काळोखात निसर्गाचे सृजनशील उद्योग घाईघाईने चालू असल्याचे जाणवत होते.

त्या वासंतिक दिवसांमध्ये आलेस्याची प्रतिमा माझ्या मनात सतत जागी होती. एकटा असलो म्हणजे मी स्वस्थ पडून रहायचा, मन अधिक एकाग्र व्हावे म्हणून डोळे मिटून घ्यायचा आणि सतत कल्पनेने तिची मुद्रा अंतःचक्षूंसमोर उभी करायचा : कधी कठोर अथवा धूर्त, कधी नाजुक स्मित, कोवळ्या भोजाच्या झाडाप्रमाणे सडपातळ व कणखर असा उघड्या रानावनात स्वातंत्र्यात पोसलेला तिचा तरुण देह, विलक्षण खर्ज, मखमाली सुरावटींचा तिचा ताजा आवाज... "तिच्या सगळ्या हालचालींमध्ये, सर्व शब्दांमध्ये," मी मनाशी विचार करायचा, "काहीतरी खानदानी आहे (अर्थात ह्या अतिसामान्य शब्दातील सर्वोत्तम अर्थाने), काहीतरी जन्मजात डौल आहे..." आलेस्याकडे मी आकर्षित होण्याची आणखी कारणे म्हणजे तिच्याभोवती असलेले गूढतेचे वलय, दाट अरण्यात आणि ऐन दलदलीत राहणाऱ्या चेटकिणीची भाविक कीर्ती व माझ्याशी तिने बोललेल्या थोडक्या शब्दांमधून ध्वनित होणारा तिचा स्व-सामर्थ्यावरील दुर्दम्य विश्वास.

जंगलवाटा थोड्याशा कोरड्या बनताच मी चेटकिणीच्या झोपडीकडे प्रस्थान ठेवले ह्यात आश्चर्य मुळीच नव्हते. वटवट्या म्हातारीला शांत

करण्याची वेळ पडली तर उपयोग व्हावा म्हणून मी सोबत अर्धा पौंड चहा व साखरेचे काही तुकडे घेतले.

दोघी बायका घरात आढळल्या. मानुयलीखा धगधगणाऱ्या चुलाण्याशी खुडबुडत होती आणि आलेस्या उंच बाकड्यावर बसून ताग कातत होती. किंचित आवाज करीत मी प्रवेश केला, तेव्हा ती मागे वळली, तिच्या हातातील धागा तुटला आणि चाती खाली गडगडली.

म्हातारीने काही वेळपर्यंत माझ्याकडे रागाने टक लावून पाहिले. चुलाण्याची धग लागू नये म्हणून तिने तिच्या सुरकुतल्या चेहऱ्यावर हाताचा पंजा आडवा धरला होता.

"नमस्कार, आजीबाई!" आनंदी आवाजात मी मोठ्यांदा म्हणालो. "बहुधा मला ओळखलं नाहीस ना? गेल्या महिन्यात इथं मी वाट विचारायला आलो होतो, आठवतं? तू माझं भविष्यसुद्धा पाहिलं होतं?"

"काही आठवत नाही, साहेबा," नाखुषीने मान हलवीत म्हातारी पुटपुटली, "काही आठवत नाही. आणि तुझं आमच्यापाशी काय विसरलं होतं, काही समजत नाही. आम्ही कसली तुझ्या तोलाची माणसं? आम्ही साधी माणसं, अडाणी... आमच्यापाशी तुझं काही काम नाही. जंगल मोठं आहे, भरपूर जागा आहे, खुशाल भटक... तेव्हा..."

तिने असे विचित्र स्वागत केल्यामुळे मी एकदम भांबावलो, मला काही सुचेना, मी मूर्ख आहे असे वाटू लागले. तिचे बोलणे थट्टेवारी घ्यायचे, अथवा चिडून प्रत्युत्तर करायचे, अथवा एकही शब्द न बोलता निघून जायचे: कसे वागायचे ते मला समजेना. मी हताशपणे आलेस्याकडे वळलो. किंचित उपहासाने तिने स्मित केले, चरख्यापासून ती उठली आणि म्हातारीपाशी चालत गेली.

"घाबरू नको आजी," सांत्वनपर सुरात ती म्हणाली, "हा वाईट माणूस नाही, आपल्याला तो अपाय करणार नाही. कृपया आपण बसा," पुढील कोपऱ्यातील बाकाकडे बोट दाखवून व म्हातारीच्या बडबडीकडे इतःपर लक्ष न देता ती पुढे मला म्हणाली.

तिच्या ह्या वागण्यामुळे मला धीर आला आणि अत्यंत निर्णायक माध्यमांचा वापर करण्याचा मी विचार केला.

"किती चिडकी आहेस तू आजीबाई... पाहुणा अजून उंबरठ्यापाशी

आला नाही, तोच त्याच्यावर सरबत्ती करतेस. पण मी तुला भेटवस्तू घेऊन आलो होतो," पिशवीतून पुडकी बाहेर काढत मी म्हणालो.

म्हातारीने चटकन पुडक्यांवर एक कटाक्ष फेकला, पण तात्काळ ती चुलाण्याकडे वळली.

"तुझ्या भेटवस्तूंची मला मुळीच गरज नाही," रागाने निखाऱ्यांमध्ये चिमटा खुपसत ती फिस्कारली. "ठाऊक आहेत आम्हाला तुझ्यासारखी माणसं. प्रथम गोड बोलून मन काबीज करतात आणि मग... काय आहे तुझ्या पिशवीत?" अचानक माझ्याकडे वळून तिने विचारले.

मी ताबडतोब चहा व साखरेचे पुडे तिच्या हाती दिले. म्हातारी थोडी नरमली. जरी तिची कुरकुर चालू राहिली, तरी पूर्वीचा कडवा विरोध स्वरातून उमटत नव्हता.

आलेस्या परत चरखा फिरवू लागली व मी तिच्याशेजारी एका सखल, आखूड आणि अत्यंत डगमगत्या बाकड्यावर आसन ठोकले. डाव्या हाताने ती शुभ्र, रेशमी धागा वेगाने गुंडाळत होती, तर तिचा उजवा हात चाती घरघर फिरवत होता. चातीला ती थेट जमिनीपर्यंत खाली जाऊ द्यायची, मग चपळपणे पकडायची आणि बोटांच्या छोट्या हालचालीने तिला गोल गती द्यायची. प्रथमदर्शनी सोपे वाटणारे ते काम प्रत्यक्षात फार अवघड होते. प्रदीर्घ काळ सराव करून कसब प्राप्त करणे आवश्यक होते. ती मात्र अत्यंत सहजपणे ते काम करीत होती. तिच्या हातांकडे माझे लक्ष वेधले: श्रमांमुळे ते खरबरीत व काळे बनले होते; पण ते छोटे आणि एवढे सुंदर होते की, अनेक श्रीमंताघरच्या पोरींनी तिचा हेवा केला असता.

"आजीनं तुमचं भविष्य पाहिलं होतं हे तेव्हा तुम्ही मला सांगितलं नव्हतं," आलेस्या म्हणाली. मी दचकलेला पाहून ती पुढे म्हणाली, "काही नाही, काही नाही, तिला चांगल ऐकू येत नाही, थोडी बहिरी आहे. फक्त माझा आवाज तिला कळतो."

"होय, तिनं भविष्य पाहिलं होतं. का बरं?"

"सहज... फक्त विचारलं... तुमचा विश्वास आहे?" माझ्याकडे तिने ओझरता तिरपा कटाक्ष फेकला.

"कशावर? तुझ्या आजीनं माझं जे भविष्य सांगितलं त्याच्यावर अथवा एकूण?"

"नाही, एकूण..."

"कसं सांगू, खरं तर माझा विश्वास नाही, पण कुणास ठाऊक? काही वेळा खरं ठरतं म्हणे भविष्य... मोठमोठ्या विद्वानांनी पुस्तकांमधून हा विषय हाताळलाय. पण तुझ्या आजीनं जे सांगितलं, त्यावर मात्र माझा विश्वास नाही. खेड्यातली कुठलीही बाई तसलं भविष्य सांगील."

आलेस्याने स्मित केले.

"होय, आता तिला भविष्य नीट सांगता येत नाही हे खरं आहे. म्हातारी झालीय आणि फार घाबरते. पत्त्यांनी तुम्हाला काय सांगितलं?"

"काही खास नव्हतं. मला आता त्यातलं काही आठवतसुद्धा नाही. नेहमी सांगतात तेच! दूरचा प्रवास, जुगारात लाभ... मी विसरलो, खरंच."

"होय, होय, आता ती भविष्य व्यवस्थित सांगत नाही. म्हातारपणामुळं अनेक शब्द विसरलीय... कसं जमणार तिला? शिवाय, ती भिते. फक्त पैशासाठी कधी कधी कबूल होते."

"कशाला भिते ती?"

"अर्थात, सरकारी अधिकाऱ्यांना. पोलीस अधिकारी इथं आला म्हणजे नेहमी धमकावतो: 'कुठल्याही दिवशी तुला डांबून ठेवीन' असं म्हणतो. 'तुला ठाऊक आहे,' म्हणतो, 'जादूटोण्याबद्दल तुम्हा चेटकिणींना काय शिक्षा मिळते? साकालीनी बेटांवर जन्मभर सक्तमजुरी'. तुम्हाला काय वाटतं, तो खोटं बोलतो ना?"

"नाही, त्याच्या बोलण्यात काही खरा भाग आहे. ह्या जादूटोण्याबद्दल शिक्षा करतात हे खरं आहे, पण एवढी भयंकर शिक्षा होत नाही... आलेस्या, तुला सांगता येतं भविष्य?"

ती काहीशी अडखळली, पण क्षणभरच.

"होय, सांगता येतं... मात्र पैशासाठी नव्हे," ती घाईने पुढे म्हणाली.

"माझ्यासाठी पत्ते मांडशील?"

"नाही," डोके हलवीत हळू, पण ठाम स्वरात ती उत्तरली.

"का नाही तुझी इच्छा? आत्ता नव्हे, नंतर कधीतरी... का कुणास ठाऊक, पण तू मला सगळं खरं सांगशील असं वाटतं."

"नाही. नाही सांगणार. कोणत्याही परिस्थितीत नाही."

"हे बरं नव्हे, आलेस्या. निदान पहिल्या ओळखीखातर नकार देणं योग्य नव्हे... का नाही तू कबूल?"

"कारण, तुमच्यासाठी मी एकदा आधीच पत्ते मांडले होते, दुसऱ्यांदा मांडायचे नसतात..."

"का बरं? मला हे समजत नाही."

"नाही, नाही, पुन्हा मांडायचे नसतात... नसतात..." श्रद्धापूर्ण धास्तीने ती पुटपुटली. "दैवाचा दोनदा कौल पहायचा नसतो... ते योग्य नव्हे... दैवाला माहीत होतं, ते आडून ऐकतं... दैवाला प्रश्न केलेले आवडत नाहीत. म्हणूनच भविष्य सांगणारी सगळी माणसं असुखी असतात."

आलेस्याला काहीतरी विनोदी उत्तर द्यायची माझी इच्छा होती, पण मला ते शक्य झाले नाही. तिच्या शब्दांमध्ये फार प्रामाणिक श्रद्धा सामावली होती आणि दैवाचा उल्लेख करताच तिने विचित्र धास्तीने दरवाजाकडे पाहिले. मीसुद्धा नकळतपणे तसेच केले.

"जर माझं भविष्य पाहण्याची आता तुझी इच्छा नसेल, तर सांग मला—त्यावेळी तू काय पाहिलंस?" मी तिला विनंती केली.

आलेस्याने एकदम चाती खाली फेकली आणि माझ्या हाताला तिच्या हाताने स्पर्श केला.

"नाही... न सांगणं जास्त बरं," ती म्हणाली आणि तिच्या डोळ्यांमध्ये बालिश विनवणीचा भाव उमटला. "कृपा करून विचारू नका... तुमचं भविष्य चांगलं नव्हतं... तुम्ही त्याबद्दल न विचारणं जास्त चांगलं!"

पण मी आग्रह धरला. तिचा नकार आणि दैवाबद्दलचे संदिग्ध उल्लेख म्हणजे भविष्य सांगणाऱ्या बाईचे केवळ नखरे होते अथवा ती जे काही बोलली होती त्यावर खरोखरीच तिचा विश्वास होता, ह्यातील भेद मला समजू शकत नव्हता. पण माझ्या मनात मात्र एका अनामिक भीतीने ठाण मांडले.

"ठीक आहे, मी सांगते," अखेरीस आलेस्या कबूल झाली. "मात्र ध्यानात ठेवा, सौदा हा सौदा. जरी तुम्हाला काहीतरी त्यातलं आवडलं नाही, तरी तुम्ही चिडायचं नाही. तुमचं भविष्य असं निघालं: तुम्ही भले माणूस असलात, तरी दुबळे आहात... तुमचं भलेपण चांगलं नाही, ते अंतःकरणापासून निर्माण होत नाही. तुम्ही स्वतःचा शब्द पाळत नाही. लोकांवर वरचष्मा गाजवायला तुम्हाला आवडतं, पण तुमची इच्छा असो वा नसो, तुम्ही त्यांच्या दडपणाखाली जाता. मदिरा आवडते, त्याचप्रमाणं... काही फरक पडत नाही, आता बोलतेच आहे, तर सारं संगतवार सांगते... तुम्हाला आम्हा बायकांची फार आवड आहे आणि त्यातून तुमचं खूप नुकसान होईल... पैशाची किंमत तुम्हाला वाटत नाही आणि पैसा राखणं तुमच्या स्वभावात नाही—कधीही श्रीमंत होणार नाही... पुढं सांगू?"

"सांग, सांग! जेवढं माहीत आहे, तेवढं सगळं सांग!"

"पुढं असं आढळलं की, तुमचं आयुष्य फारसं सुखाचं होणार नाही. तुम्ही अंतःकरणापासून कुणावरही प्रेम करणार नाही, कारण तुम्ही थंडचा आणि आळशी काळजाचे आहात. तुमच्यावर जे प्रेम करतील, त्यांना तुम्ही फार दुःख द्याल. तुमचं लग्न कधीही होणार नाही, तुम्ही अविवाहित अवस्थेतच मराल. तुम्हाला आयुष्यात आनंद लाभणार नाही, खूप वैराण आणि कष्टी आयुष्य जगावं लागेल... अशी एक वेळ येईल, जेव्हा आत्महत्या करण्याचे विचार तुमच्या मनात घोळतील... तसं वाटण्याजोगी एक घटना घडेल... पण प्रत्यक्षात आत्महत्या करण्याचं धाडस तुमच्यानं होणार नाही, तुम्ही ते दुःख सहन कराल... तुम्हाला विलक्षण आर्थिक चणचण भासेल पण तुमच्या आयुष्याच्या अखेरी तुमच्याजवळच्या नातेवाईकाच्या मृत्यूमुळं तुमची परिस्थिती पालटेल आणि ते फार अनपेक्षित घडेल. मात्र हे सर्व आणखी खूप खूप वर्षांनंतर घडेल, पण ह्या वर्षी... नेमकं केव्हा मला माहीत नाही, पत्ते म्हणतात की, लौकरच... कदाचित ह्या महिन्यातसुद्धा..."

"काय घडणार ह्या वर्षात?" जेव्हा ती परत थांबली, तेव्हा मी विचारले.

"पुढं बोलायलासुद्धा आता मला भीती वाटते. एका किलवरच्या

राणीचं तुमच्यावर प्रेम जडेल. पण ती विवाहित आहे अथवा कुमारिका, हे मला जाणता येत नाही, मात्र तिचे केस काळे आहेत एवढं मला ठाऊक आहे..."

नकळत मी आलेस्याच्या डोक्यावर ओझरता कटाक्ष फेकला.

"काय बघताय?" काही स्त्रियांमध्ये स्वभावगत असलेल्या अंतःप्रेरणेने माझ्या कटाक्षाचा अर्थ जाणून ती एकदम लाजली. "होय, माझ्यासारखे, यांत्रिकपणे स्वतःचे केस सारखे करीत ती पुढे म्हणाली आणि लाजेने तिचा चेहरा आणखीच लाल बनला.

"किलवरच्या राणीचं माझ्यावर प्रेम बसणार म्हणतेस?" मी थट्टा केली.

"हसू नका, हसायचं नाही," गंभीरपणे, जवळजवळ कठोरपणे आलेस्याने ताकीद दिली. "मी तुम्हाला सर्व केवळ सत्य सांगतेय."

"बरं, बरं, नाही हसणार! पुढं काय?"

"पुढं... ह्या किलवरच्या राणीचं तुमच्यापायी वाटोळं होणार आहे, मृत्यूपेक्षा वाईट घडणार आहे. तुमच्यामुळं तिची फार मोठी बेअब्रू होईल, तिच्या सबंध आयुष्यभर, खूप काळपर्यंत त्या बेअब्रूचा तिला विसर पडणार नाही... पण तुम्हाला मात्र तिच्यापासून कोणताही अपाय होणार नाही."

"ए आलेस्या, पत्त्यांनी तुला चकवलं तर नसेल? त्या किलवरच्या राणीचं एवढं वाईट मी कशाला करीन? मी शांत, साधा माणूस आहे, पण तू खूप भयानक गोष्टी माझ्याबद्दल बोललीस."

"ते मला माहीत नाही. शिवाय असं आढळलं की, तुम्ही स्वतः तिचं वाईट करणार नाही, म्हणजे मुद्दाम वाईट वागणार नाही, पण तुमच्यामुळं पुढची सारी संकटं तिच्यावर कोसळतील... जेव्हा माझे शब्द खरे ठरतील, तेव्हा तुम्ही माझी आठवण कराल."

"हे सगळं तुला पत्त्यांनी सांगितलं, आलेस्या?"

तिने ताबडतोब उत्तर दिले नाही. नंतर काहीशा संदिग्धपणे आणि अनिच्छेने ती म्हणाली:

"पत्त्यांनी सांगितलंच... पण त्यांच्याविनासुद्धा मी खूप जाणू शकते, चेहऱ्यावरून. उदाहरणार्थ, जर एखाद्या माणसाला लौकरच वाईट

मृत्यू येणार असेल, तर तात्काळ मी त्याच्या चेहऱ्यावर हे वाचते, त्याच्याशी बोलण्याचीसुद्धा मला गरज पडत नाही."

"त्याच्या चेहऱ्यावर तुला काय दिसतं?"

"ते मला स्वतःला ठाऊक नाही. एकदम मला भीती वाटते, जणू तो माझ्यासमोर जिवंत उभा नाही असं भासतं. तुम्ही आजीला विचारा, तीसुद्धा सांगेल की मी खरं बोलतेय. गेल्या वर्षी चक्कीवाल्या त्रोफीमनं गळफास लावून आत्महत्या केली. त्या घटनेआधी दोनच दिवस मी त्याला पाहिलं होतं आणि आजीला म्हटलं होतं: 'बघ आजी, लौकरच त्रोफीमला भयानक मरण येईल.' नेमकं तसंच झालं. गेल्या नाताळात घोडेचोर याश्का आमच्याकडं आला आणि आजीला त्यानं भविष्य विचारलं. आजीनं पत्ते मांडले आणि ती सांगू लागली. त्यानं गंमतीनं विचारलं: 'आजी, तू मला सांग, कोणत्या प्रकारचं मला मरण येईल?' आणि हसायला लागला. मी त्याच्याकडं पाहिलं आणि जागच्या जागी थिजले: याकोव बसला होता आणि त्याचा चेहरा मृत होता, हिरवागार... डोळे मिटलेले, ओठ काळे... एका आठवड्यानंतर ऐकलं की, याकोव घोडे चोरत असताना शेतकऱ्यांनी त्याला पकडलं... सबंध रात्रभर त्यांनी त्याला झोडपलं... इथली माणसं फार दुष्ट आहेत, क्रूर आहेत... त्याच्या टाचांमध्ये त्यांनी खिळे ठोकले, काठ्या मारून त्याच्या बरगड्या तोडल्या, सकाळी तो मेला."

"संकट त्याची वाट पाहतंय, असं तू त्याला का सांगितलं नाहीस?"

"कशाला बोलायचं?" आलेस्याने विरोध केला. "दैवात जे आहे, त्यापासून थोडंच पळता येणार? फक्त माणसाचे शेवटचे दिवस निष्कारण चिंतेत जातात... मला स्वतःला स्वतःची किळस येते, मी तशा गोष्टी पाहू शकते ह्याबद्दल स्वतःचा तिरस्कार वाटतो... पण काय करणार? दैव माझं. माझी आजी जेव्हा तरुण होती, तेव्हा तिला लोकांचं मरण आधी कळायचं आणि माझ्या आईलासुद्धा. माझ्या पणजीलाही... हे आमच्या चुकीपायी घडत नाही, आमच्या ते रक्तात आहे."

तिने कातणे थांबविले आणि गुडघ्यांवर हात टेकवून, डोके खाली घालून ती शांत बसून राहिली. तिच्या बाहुल्या विस्फारलेल्या स्थिर डोळ्यांमध्ये कसलीतरी भयानक धास्ती उमटली होती, तिच्या आत्म्यावर

कबजा करणाऱ्या गूढ शक्तींसमोर आणि अमानुष ज्ञानासमोर ती अनिच्छेने वाकली होती.

५

दरम्यान मानुयलीखाने टेबलावर स्वच्छ कपडा अंथरला आणि त्यावर वाफाळणारे चिनी मातीचे मडके ठेवले. कपडयाच्या किनारींना भरतकाम केलेले होते.

"जेवायला ये आलेस्या," तिने नातीला बोलाविले. क्षणभर घुटमळून पुढे ती मला म्हणाली, "तुम्ही आमच्याबरोबर खाणार का? तुमच्या पंगतीचा लाभ मिळावा अशी विनंती करते... मात्र आमचं अन्न अगदीच साधं आहे... कणेरीची पातळ पेज..."

तिच्या निमंत्रणात मुळीच आग्रह नव्हता आणि मी नकार देण्याच्या बेतात होतो, तेवढयात आलेस्याने एवढया मधुर साधेपणाने व स्नेहल स्मिताने मला निमंत्रण दिले की, होकार देणे मला क्रमप्राप्त ठरले. डुकराची चरबी, कांदा, बटाटे आणि कोंबडीचे तुकडे यांचे अत्यंत स्वादिष्ट व पौष्टिक सार तिने स्वतः बशी भरून मला वाढले. आजीने आणि नातीने अशा दोघींनीही जेवणावर बसताना क्रूस-चिन्हे केली नाहीत. जेवताना मी दोन्ही स्त्रियांकडे मधून मधून लक्षपूर्वक पहात होतो, कारण माणसे खात असतात तेव्हा इतर कोणत्याही वेळपेक्षा त्या वेळेला त्यांचा खरा स्वभाव अधिक स्पष्टपणे व्यक्त होतो, असे माझे मत आहे. मानुयलीखा आधाशीपणे सार फस्त करीत होती, मोठयांदा मचमच आवाज करीत होती, पावाचे मोठे तुकडे तोंडात कोंबत होती व त्यामुळे तिच्या थलथलीत गालांमध्ये फुगवटे दिसत होते. याउलट आलेस्याच्या खाण्यातही तिचा जन्मजात खानदानीपणा उमटत होता.

जेवणानंतर तासाभराने चेटकिणीच्या झोपडीच्या मालकिणींचा मी निरोप घेतला.

"मी तुम्हाला थोडया अंतरापर्यंत सोडायला येऊ?" आलेस्याने विचारले.

"हे काय नवीनच खूळ डोक्यात घेतलंस?" मानुयलीखा रागाने ब्रडबडली. "तुला एका जागी स्वस्थ बसवत नाही, चंचल कारटे..."

पण दरम्यात आलेस्याने डोक्यावर लाल काश्मिरी रुमाल गुंडाळला होता. ती एकदम आजीपाशी धावत गेली, तिने आजीला मिठी मारली व जोरात आवाज करीत तिचे चुंबन घेतले.

"आजी! माझ्या लाडके... मी फक्त एक मिनिटापुरती, ताबड-तोब परत येते."

"ठीक आहे, ठीक आहे, धांदरट कुठली," म्हातारीने दुबळा विरोध दाखविला. "साहेब, तुम्ही तिच्याकडं लक्ष देऊ नका. ती अगदी मूर्ख आहे."

अरुंद पाऊलवाटेवरून चालत आम्ही जंगलातील चिखलाने काळ्या बनलेल्या रस्त्यापर्यंत आलो. घोड्यांच्या टापांनी तो रस्ता तुडविला गेला होता, गाड्यांच्या चाकांच्या खोल खुणा त्यावर उमटल्या होत्या, चाको-ऱ्यांच्या खळग्यांमध्ये पाणी भरले होते व त्या पाण्यात झगझगता सूर्यास्त प्रतिबिंबित झाला होता. बर्फ वितळून गेल्यानंतर अजूनही ओलसर असलेल्या गेल्या वर्षीच्या तपकिरी पानांनी दुतर्फा आच्छादलेल्या रस्त्या-वरून आम्ही चालत होतो. मृत पिवळ्या पानांमधून अधेमधे घंटासुराच्या फुलांची जांभळी डोकी डोकावत होती. पोलेस्येत ही फुले सर्वांत प्रथम फुलत.

"हे बघ आलेस्या," मी बोलू लागलो, "तुला कशाबद्दल तरी विचारायची माझी फार इच्छा आहे, पण तू रागावशील अशी भीती वाटते... लोक म्हणतात ते खरं का... तुझी आजी म्हणे... कसं बरं सांगू?"

"चेटकीण आहे?" आलेस्याने शांतपणे मला मदत केली.

"नाही... चेटकीण नव्हे..." मी अडखळलो. "अं.. हो, चेट-कीण म्हणता येईल... माणसं काय वाट्टेल ते बोलतात. तिला काही गावठी औषधांची, उपचारांची, मंत्रांची माहिती असली, तर काय बिघडलं? पण हा विषय तुला अप्रिय असेल, तर उत्तर नको देऊ."

"का नाही?" ती साधेपणाने उत्तरली. "ह्यात अप्रिय असं काय आहे? होय, ती खरंच चेटकीण आहे. पण आता ती म्हातारी झालीय आणि पूर्वी जे करू शकत होती, ते करू शकत नाही."

"ती काय करू शकायची?" मी कुतूहलाने विचारले.

"वेगवेगळ्या गोष्टी. लोकांना आजारांमधून बरं करायची, दात-दुखी थांबवायची, रक्तस्त्राव बंद करायची, कुणाला पिसाळलेलं कुत्रं चावला किंवा सर्पदंश झाला तर मंत्रानं विषबाधा उतरवायची, गुप्त धनांच्या जागा दाखवायची... तिला असंख्य गोष्टी करता येत होत्या."

"तुला माहीत आहे आलेस्या?.. तू मला माफ कर, पण माझा ह्या सर्व गोष्टींवर विश्वास नाही. कृपया माझ्याशी प्रांजल वाग, मी त्याबद्दल कुणालाही सांगणार नाही. हे सगळं लोकांना फसवण्यासाठी असतं ना?"

तिने निर्विकारपणे खांदे उडविले.

"तुमच्या इच्छेप्रमाणं तुमचं मत बनवा. अर्थात, खेड्यातल्या बाईला फसवणं अगदी सोपं आहे, पण तुम्हाला फसवणं मी कधी मनातसुद्धा आणलं नसतं."

"म्हणजे चेटुकावर तुझा पक्का विश्वास आहे?"

"का बरं नसणार माझा विश्वास? आमच्या घराण्यात मंत्र-तंत्र चालत आलंय... मला स्वत:ला त्यातल्या अनेक विद्या अवगत आहेत."

"आलेस्या, लाडके... मला ह्यात किती स्वारस्य वाटतंय ह्याची तुला कल्पना नाही... तू मला त्यातलं कधी काही दाखवणार नाहीस?"

"का नाही, दाखवीन, तुमची इच्छा असेल तर," आलेस्याने तात्काळ संमती दिली. "आत्ता इच्छा आहे?"

"हो, जर शक्य असेल, तर आत्ता!"

"तुम्ही घाबरणार नाही?"

"किती मूर्खपणा. कदाचित रात्रीच्या वेळी घाबरलो असतो, पण आत्ता अजून उजेड आहे."

"ठीक आहे. द्या तुमचा हात."

मी आज्ञा पाळली. आलेस्याने भराभरा माझ्या ओव्हरकोटाची बाही वरती गुंडाळली आणि मनगटपट्टीचे बटण सोडले; मग तिने स्वत:-च्या खिशातून सुमारे पाच इंच लांबीची छोटी कटयार बाहेर काढली व तिचे चामडी आवरण वेगळे केले.

"तू काय करणार आहेस?" मी विचारले. माझ्या मनात कुठेतरी वाईट भीती थरारली.

"जरा थांबा... तुम्ही घाबरणार नाही असं म्हटलं होतं!"

अचानक तिच्या हाताची ओझरती हालचाल झाली आणि माझ्या मनगटावर, नाडी पाहतात त्या जागेच्या जरा वरती, धारदार पात्याचा स्पर्श मला जाणवला. कापलेल्या जागेतून तात्काळ रक्त बाहेर उसळले, माझ्या मनगटावरून रक्ताचा ओघळ जमिनीवर टपकू लागला. तोंडून उमटणारी किंचाळी मी कशीबशी दाबून धरली. मला वाटते, माझा चेहरा पांढराफटक पडला होता.

"घाबरू नका, तुम्ही मरणार नाही", आलेस्या हसून म्हणाली.

जखमेच्या वरती तिने माझा हात घट्ट पकडला, त्यावर तिने स्वतःचे डोके खूप खाली झुकविले आणि भराभरा काहीतरी पुटपुटू लागली. तिचा गरम श्वास माझ्या त्वचेला भाजत होता. जेव्हा ती ताठ उभी झाली आणि तिने माझा हात सोडला, तेव्हा जखमेच्या जागी फक्त एक लाल ओरखडा मला दिसला.

"काय? झालं समाधान तुमचं?" कटचार लपवून ठेवीत, धूर्त स्मित करीत तिने विचारले. "आणखी इच्छा आहे?"

"अर्थात, आहे. मात्र शक्य असेल तर एवढं भयंकर नको आणि कृपया रक्तपात न करता!"

"काय बरं दाखवावं तुम्हाला?" ती विचारात पडली. "ठीक आहे... माझ्या पुढं रस्त्यावरून चालत जा... मात्र लक्षात ठेवा, मागं वळून पहायचं नाही."

"हे काहीतरी भयानक असणार नाही ना?" काहीतरी अप्रिय आश्चर्याची अपेक्षित भीती स्मिताखाली लपविण्याचा प्रयत्न करीत मी विचारले.

"नाही, नाही... अगदी क्षुल्लक... चालू लागा."

मी पुढे चालू लागलो. ह्या प्रयोगात मला खूप कुतूहल वाटत होते आणि आलेस्याची तीव्र रोखलेली नजर माझ्या पाठीला जाणवत होती. सुमारे वीस पावले चालल्यानंतर, अगदी सपाट जागी अचानक मी अड-खळलो आणि पालथा पडलो.

"चालत रहा, चालत रहा!" आलेस्या ओरडली. "मागं बघू नका! ह्यात काही विशेष नाही, पुन्हा ठणठणीत व्हाल... जेव्हा खाली पडाल तेव्हा जमिनीला घट्ट पकडा."

मी आणखी पुढे चालत गेलो. दहा पावलांनंतर पुन्हा एकदा मी जमिनीवर आडवा पडलो.

आलेस्या खदखदा हसू लागली व टाळ्या पिटू लागली.

"काय? पुरे झालं?" स्वतःचे शुभ्र दात चमकावीत तिने ओरडून विचारले. "आता विश्वास ठेवता? काही विशेष नाही–तुम्ही वरती उडाला नाहीत, खाली पडलात!"

"तू हे कसं काय केलंस?" मी आश्चर्याने विचारले आणि माझ्या कपडयांवर चिकटलेल्या डहाळ्यांना व वाळक्या गवताच्या पात्यांना झटकले.

"ह्यात काही रहस्य नाही. मी तुम्हाला आनंदानं सांगेन. पण तुम्हाला समजणार नाही अशी भीती वाटते... खुलासा करणं मला जमत नाही..."

खरोखरीच मला तिचे बोलणे मुळीच समजले नाही. पण जर माझी चूक होत नसेल, तर त्या जादूची मख्खी त्यात होती की, ती माझ्या-मागून पावलावर पाऊल टाकत होती, अंतर कायम राखत होती, माझ्या-वरची नजर मुळीच ढळवत नव्हती, माझ्या प्रत्येक हालचालीची–अगदी सूक्ष्मसुद्धा–नक्कल करत होती, माझ्याशी एकरूप होत होती. काही पावले चालल्यानंतर ती कल्पना करू लागली की, माझ्यासमोर काही अंतरावर जमिनीपासून दहा इंच उंचीवर एक दोरी आडवी बांध-लेली होती. त्या काल्पनिक दोरीला माझ्या पायाचा स्पर्श घडणार होता त्या क्षणाला तिने अचानक खाली पडण्याचा आविर्भाव केला आणि तिच्या शब्दात अत्यंत भक्कम माणूससुद्धा तेव्हा पडतो... त्यानंतर अनेक वर्षांनी आलेस्याच्या गोंधळलेल्या खुलाशाची मला आठवण झाली, जेव्हा उन्माद-वायूने आजारी असलेल्या दोन व्यावसायिक चेटकिणींवर केलेल्या प्रयोगां-बाबतचा वृत्तांत डॉ. शार्को यांच्या पुस्तकात मी वाचला. मला अत्यंत आश्चर्य वाटले की, पोलेस्येमधील सुंदर चेटकीण ज्या प्रकारे जादू करीत होती, नेमक्या त्याच प्रकारे फ्रेंच चेटकिणी जादू करीत होत्या.

"मला आणखी खूप काही येतं," आत्मविश्वासाने आलेस्या म्हणाली. "उदाहरणार्थ, मी तुम्हाला घाबरवू शकते."

"ह्याचा अर्थ काय?"

"असं काही करीन की, तुम्हाला भीती वाटू लागेल. उदाहरणार्थ, संध्याकाळच्या वेळेला तुम्ही तुमच्या खोलीत बसला आहात आणि अचानक तुम्हाला अशी भयंकर भीती घेरून टाकील की, तुमचा थरकाप उडेल आणि मागं वळून पाहण्याचं धाडस तुम्हाला होणार नाही. मात्र त्यासाठी तुम्ही कुठं राहता हे मला माहीत पाहिजे आणि तुमची खोली मी आधी पाहिली असली पाहिजे."

"हे अगदीच साधं आहे," मी थट्टेत म्हणालो, "माझ्या खिडकीपाशी येशील, ठोठावशील आणि काहीतरी ओरडशील."

"नाही, नाही... त्यावेळी मी जंगलात असेन, माझ्या झोपडीतून कुठंही बाहेर जाणार नाही... पण मी बसून विचार करत राहीन की, मी रस्त्यावरून चालतेय, तुमच्या घरापाशी येते, दार उघडते, तुमच्या खोलीत शिरते... तुम्ही खोलीत कुठंतरी बसला आहात... बहुधा टेबलापाशी... मी हळूच चोरपावलांनी तुमच्या पाठीशी येते... तुम्हाला माझी चाहूल लागत नाही... मी एकदम तुमचे खांदे माझ्या हातांनी पकडते आणि त्यांना दाबू लागते... खूप जोरात, खूप खूप जोरात... आणि तुमच्याकडं टक लावून पाहते... ही अशी — पहा..."

अचानक तिच्या कोरीव भुवया आकुंचित पावल्या आणि माझ्या चेहऱ्यावर तिचे डोळे भयानक व मादक नजरेने टक लावून पाहू लागले, तिच्या बाहुल्या विस्फारल्या व त्यांना गडद निळी छटा प्राप्त झाली. तात्काळ मला मॉस्कोतील त्रेत्याकोव चित्रसज्जात पाहिलेल्या मेदूसाच्या डोक्याच्या चित्राची आठवण झाली — मात्र चित्रकाराचे नाव आठवत नाही. त्या एकटक, विचित्र नजरेखाली मला थंडचा अमानुष भीतीने घेरले.

"पुरे, पुरे, आलेस्या..." मी बळेच हसत म्हणालो. "जेव्हा तू स्मित करतेस तेव्हा मला शतपटींनी जास्त आवडतेस. तेव्हा तुझा चेहरा खूप गोड, लहान मुलासारखा असतो."

आम्ही आणखी पुढे चालत गेलो. मला अचानक आलेस्याच्या बोल-

ण्याची ढब आठवली : ती खूप बोलकी होती आणि अशिक्षित मुलीच्या दृष्टीने फारच सुसंस्कृत होती. मी म्हणालो :

"तुझ्यात मला आश्चर्याची बाब कोणती वाटते, माहीत आहे तुला आलेस्या? तू जंगलात लहानाची मोठी झालीस, कुणालाही न भेटता... अर्थात, तुझं वाचनसुद्धा फार झालं नसणार..."

"हो, मला मुळीच वाचता येत नाही."

"बघितलंस! .. पण तरीही तुझं बोलणं फार छान आहे, अस्सल खानदानी घरातल्या मुलीसारखं. कुठून तुझ्या ठायी आलं हे? मी कशा-बद्दल विचारतोय हे तुला समजतं?"

"होय, समजतं. हे सगळं आजीकडून... तिच्या दिसण्यावरून तुम्ही तिच्याबद्दल मत बनवू नका. ती फार चतुर आहे! कदाचित पुढं जास्त सवय झाली म्हणजे तुमच्याशीही ती गप्पा मारील... तिला सर्व माहीत आहे, जगातल्या सर्व गोष्टींबद्दल तुम्ही तिला प्रश्न विचारू शकता. एवढं खरं, आता ती फार म्हातारी झालीय."

"म्हणजे तिनं तिच्या आयुष्यात खूप पाहिलंय? ती मूळची कुठली? पूर्वी कुठं रहात होती?"

आलेस्याला हे प्रश्न आवडले नाहीत असे भासले. तिने ताबडतोब उत्तरे दिली नाहीत. संदिग्धपणे आणि अनिच्छेने ती उत्तरली :

"माहीत नाही... ह्याबद्दल बोलणं तिला आवडत नाही. जर कधी काही बोललीच, तर विसरून जा आणि पुन्हा आठवण करू नको, अशी नेहमी विनंती करते... आता मला जायला पाहिजे," आलेस्या गडबडीने म्हणाली, "आजी रागावेल. पुन्हा भेटू... माफ करा, तुमचं नाव मला माहीत नाही."

मी माझे नाव सांगितले.

"इवान तीमोफेयेविच? छान. तर पुन्हा भेटू, इवान तीमोफेये-विच! आमची झोपडी विसरू नका, जरूर या."

निरोपादाखल मी तिच्यापुढे हात धरला आणि तिच्या छोट्या, बळकट हाताने गच्च, स्नेहपूर्ण पकडीने प्रतिसाद दिला.

६

त्या दिवसापासून चेटकिणीच्या झोपडीकडे मी वारंवार जाऊ लागलो. दर वेळी माझे आगमन झाले की, आलेस्या तिच्या नेहमीच्या दिमाखाने माझे स्वागत करायची. पण माझ्या नेहमी ध्यानात आले होते की, मला पाहिल्यानंतर तिची पहिली स्वाभाविक प्रतिक्रिया आनंदाची असायची. मानुयलीखा स्वतःशी सतत बडबडत रहायची, पण अन्यथा माझ्याशी तुसडेपणा मुळीच दाखवीत नसे. त्याचे कारण कदाचित तिच्या नातीने माझ्या गैरहजरीत तिला समज दिली असावी. शिवाय, अधूनमधून मी तिला उबदार शाल, मुरंब्याचा डबा, चेरीची दारू अशा वस्तू भेट देत असल्यामुळे माझ्याबद्दलचा तिचा राग बराच कमी झाला होता. जणू काही अलिखित करार केल्याप्रमाणे, मी घरी परतताना आलेस्याने इरीनोवो रस्त्यापर्यंत माझ्यासोबत येण्याचा प्रघात पडला होता. आणि आमचे नेहमी स्वारस्यपूर्ण संभाषण सुरू होत असल्यामुळे, शक्य तेवढी चालण्याची गती कमी करून नकळतपणे जंगलाच्या निवांत सीमेलगतचे आमचे चालणे लांबविण्याचा आम्ही प्रयत्न करीत असू. रस्त्याशी पोहोचल्यानंतर मी अर्धा वेर्स्ता अंतर परत तिच्याबरोबर चालत जायचा, पण तरीही, एकमेकांपासून अलग होण्यापूर्वी पाईनच्या फांद्यांच्या सुगंधी आडोशाखाली उभे राहून आम्ही खूप वेळ बोलत रहात होतो.

आलेस्याच्या केवळ सौंदर्यामुळे मी तिच्यावर मोहित झालो नव्हतो; तिचा ध्येयवादीपणा, तिची आगळी व मोकळी वागणूक, तिचे सुस्पष्ट पण तरीही अचल वंशपरंपरागत श्रद्धेत गुरफटलेले मन, त्या मनाची बालसुलभ निष्पापता आणि त्याचबरोबर सुंदर स्त्रीचे धूर्त विभ्रम, ह्या सर्व गोष्टींचीही मला भुरळ पडली होती. तिच्या आदिमानवी, ठळक कल्पनाशक्तीला आकर्षित करणाऱ्या व बांधून ठेवणाऱ्या सर्व गोष्टींबद्दल ती अथकपणे मला तपशीलवार प्रश्न विचारायची: देश आणि माणसे, निसर्गातील घडामोडी, पृथ्वीची आणि विश्वाची रचना, विद्वान माणसे, मोठी शहरे व इतर अनेक गोष्टींबद्दल... अनेक गोष्टी तिला अद्भुत, अफाट, अशक्य भासायच्या. पण तिच्याशी संभाषण करताना मी नेहमी प्रामाणिक, साधा आणि कळकळीने वागत असल्यामुळे, मी

सांगितलेल्या कोणत्याही गोष्टीवर ती तात्काळ आणि निर्विवादपणे विश्वास ठेवायची. काहीवेळा तिच्या अर्ध-रानटी मनाला फार अवघड वाटेल असा एखादा खुलासा असायचा (किंवा मला स्वत:लाच एखादी गोष्ट स्पष्ट समजलेली नसायची), तेव्हा तिच्या उत्सुक चौकशांना उत्तरादाखल मी म्हणायचा: "हे बघ... ह्याचा खुलासा मी तुला करू शकत नाही... तुला माझं बोलणं समजायचं नाही."

तेव्हा ती माझी विनवणी करू लागायची:

"नाही, कृपा करून, सांगा, मी प्रयत्न करते... तुम्ही निदान काहीतरी सांगा... न समजण्यासारखं असलं तरी..."

राक्षसी तुलना अथवा अत्यंत धाडसी उदाहरणे द्यायला ती मला भाग पाडायची, जर मी योग्य वाक्यासाठी अडखळलो, तर तोतरे बोलणारा अडखळल्यानंतर त्याच्यावर जसा अधीर प्रश्नांचा वर्षाव करतात, तसा ती माझ्यावर प्रश्नांना पाऊस पाडून मला उत्तेजन द्यायची. आणि अध्यापकी कसबाच्या अभावावर अखेरीस तिचे चौकस आणि सर्वलक्षी मन व तिची ताजी टवटवीत कल्पनाशक्ती मात करीत. मला अनिच्छेने कबूल करावे लागले होते की, तिचा परिसर आणि तिचे शिक्षण (अचूक बोलायचे तर तिच्या शिक्षणाचा अभाव) ह्यांचा विचार करता तिच्या क्षमता आश्चर्यजनक होत्या.

एकदा मी पीटरबुर्गचा ओझरता उल्लेख केला. आलेस्याचे कुतूहल तात्काळ जागे झाले;

"पीटरबुर्ग म्हणजे काय? छोटं गाव आहे?"

"नाही, हे छोटं गाव नाही. हे सर्वांत मोठं रशियन शहर आहे."

"सर्वांत मोठं? म्हणजे सर्वांत मोठ्ठं? त्यापेक्षा दुसरं मोठं नाही?" भाबडेपणाने तिने मला विचारले.

"त्यापेक्षा दुसरं मोठं शहर नाही... सगळे मोठे सरकारी अंमलदार तिथं राहतात... मोठी माणसं... तिथं सगळी घरं दगडी, लाकडी नाहीत."

"आमच्या स्तेपानपेक्षा अनेक पटींनी मोठी आहेत ना?" तिने आत्मविश्वासाने विचारले.

"होय, थोडीशी मोठी... पाचशे पटींनी. तिथं काही घरांमध्ये

सबंध स्तेपानमध्ये आहेत त्याच्या दुप्पट संख्येनं माणसं राहतात."

"अग बाई! ही घरं आहेत तरी कशी?" जवळजवळ भेदरून आलेस्याने विचारले.

सवयीप्रमाणे तुलनेचा आधार मला घ्यावा लागला.

"भयानक घरं. पाच, सहा किंवा सात मजली. ते पाईनचं झाड दिसतंय?"

"सर्वांत मोठं? दिसतंय."

"तर तेवढी उंच घरं आहेत. आणि वरपासून खालपर्यंत त्यांच्यात माणसं गच्च भरलेली. पिंजऱ्यामधल्या पाखरांप्रमाणं ही माणसं छोटचा छोटचा खोल्यांमध्ये राहतात, दर खोलीत सुमारे दहा माणसं, त्यामुळं सर्वांना हवा पुरत नाही. बाकीची माणसं खाली राहतात, जमिनीखाली, दमट आणि थंड वातावरणात; काहींना तर सबंध वर्षभर खोलीत सूर्यदर्शन घडत नाही."

"माझं रान सोडून तुमच्या ह्या शहरात मी बाई कधी गेले नसते," डोके हलवीत आलेस्या म्हणाली. "मी बाजारहाट करायला स्तेपानमध्ये जाते, तेव्हासुद्धा मला भयानक काहीतरी होतं. धक्के मारतात, गोंगाट करतात, भांडतात... मग मला जंगलाची फार ओढ लागते... हातचं सगळं फेकून द्यावं आणि मागं वळून न पाहता पळत सुटावं, असं वाटतं... तुमचं शहर तुम्हालाच लखलाभ होवो... मी तिथं कधीही राहिले नसते."

"पण तुझा नवरा शहरचा असला तर?" हलके स्मित करीत मी विचारले.

तिच्या भुवया आकुंचित झाल्या आणि तिच्या पातळ नाकपुड्या थरथरल्या.

"हे काय आणखी!" तिटकाऱ्याने ती म्हणाली. "मला कुठलाही नवरा नको."

"हे तू आत्ता आपलं असं बोलते आहेस, आलेस्या. जवळजवळ सगळ्या मुली असंच बोलतात आणि सगळ्याजणी लग्न करतात. थोडी थांब: कुणीतरी भेटेल, त्याच्यावर तुझं प्रेम जडेल. तेव्हा केवळ शहरातच नाही, तर जगाच्या दुसऱ्या टोकाला त्याच्याबरोबर जाशील."

"छे:, मुळीच नाही... कृपया, ह्या विषयावर बोलायचं नाही आपण," चिडून ती म्हणाली. "कशाला हे संभाषण? तुम्हाला विनंती करते, नका बोलू."

"किती मजेशीर आहेस, आलेस्या. सबंध आयुष्यात पुरुषावर तू कधीच प्रेम करणार नाहीस, असं खरंच तुला वाटतं? तू तरुण आहेस, सुंदर आणि बळकट आहेस. एकदा रक्त तापलं म्हणजे सगळ्या प्रतिज्ञांचा विसर पडेल."

"अर्थात–प्रेमात पडेन!" प्रत्युत्तर करताना तिचे डोळे चमकले. "कुणाचीही परवानगी विचारत बसणार नाही..."

"म्हणजे तू लग्नही करशील," मी तिला चिडविले.

"तुम्ही चर्चबद्दल बोलताय?" तिने तर्काने विचारले.

"अर्थात, चर्चबद्दल... पाद्री तुला वेदीभोवती फिरवील, डीकन गाऊ लागेल: 'येसू, आनंदी हो!' तुझ्या डोक्यावर मुकुट ठेवील..."

आलेस्याने पापण्या खाली केल्या व म्लान स्मित करीत डोके नकारार्थी हलविले.

"नाही, मित्रा... कदाचित माझं बोलणं तुम्हाला आवडणार नाही, पण आमच्या घराण्यात कुणीही चर्चमध्ये लग्न केलेलं नाही; आजी आणि आई त्यांशिवायच जगल्या... आम्हाला चर्चमध्ये पाय ठेवायलासुद्धा मनाई आहे..."

"तुमच्या चेटुकापायी?"

"होय, आमच्या चेटुकापायी," शांतपणे, गंभीरपणे आलेस्या उत्तरली. "जर जन्मापासून माझा आत्मा त्याला विकलाय, तर मी चर्चमध्ये तोंड दाखवायचं धाडस कसं करीन?"

"आलेस्या... लाडके... माझ्यावर विश्वास ठेव, तू स्वत:ची फसवणूक करून घेते आहेस... तुझं बोलणं विपरीत आहे, हास्यास्पद आहे."

स्वत:च्या गूढ नशीबासमोर शरण जाण्याचा विचित्र भाव–यापूर्वीही मी तो पाहिला होता–आलेस्याच्या मुद्रेवर परत उमटला.

"नाही, नाही... तुम्हाला हे समजणार नाही, पण मला ते जाणवतं... इथं," तिने स्वत:च्या छातीवर जोरात हात दाबला,

"काळजात जाणवतं. आमचं घराणं कायम शापित आहे. तुम्ही स्वतःच निर्णय घ्या : **तो** सोडून दुसरं कोण आम्हाला मदत करतंय? जे मी करू शकते, ते सामान्य माणसाला शक्य होईल करणं? आमचं सारं बळ **त्याच्यापासून** येतं."

दर वेळी हा जगावेगळा विषय निघाला म्हणजे आमचे संभाषण त्या रीतीने संपायचे. निष्कारण मी वेगवेगळे युक्तिवाद आलेस्याला पटवायचा प्रयत्न केला, निष्कारण मी साध्या शब्दप्रयोगांचा वापर करून मोहिनीविद्या, सूचकता, मानसोपचारतज्ज्ञ व हिंदुस्थानी फकीरांबद्दल बोललो, तिच्या काही प्रयोगांचा शरीरशास्त्रीय खुलासा देण्याचा मी निष्कारण प्रयत्न केला; उदा. रक्तस्त्राव थांबविणे : शीर दाबून कौशल्याने रक्तस्त्राव थांबविता येतो. इतर सर्व बाबतीत आलेस्या माझ्यावर विश्वास ठेवत असली, तरी माझे सर्व खुलासे मात्र तिने हट्टाने नाकारले... "ठीक आहे, रक्त थांबवण्याबाबतचा तुमचा खुलासा मी मान्य करते, पण बाकीच्या गोष्टी कुठून आल्या?" आवाज चढवून ती वाद घालू लागायची, "फक्त रक्त थांबवण्याची एकच विद्या मला माहीत आहे का? एका दिवसात, तुमच्या घरातले सगळे उंदीर आणि झुरळं पळवून लावू दाखवू? सगळ्या डॉक्टरांनी उपचाराचा नाद सोडून दिलेल्या आजारी माणसाचा अत्यंत वाईट ताप साध्या पाण्यानं दोन दिवसात उतरवून दाखवू? एखाद्या शब्दाचा तुम्हाला पूर्ण विसर पडेल अशी किमया करू? स्वप्नांचा अर्थ मी का लावू शकते? भविष्यकाळात काय घडेल हे मला का समजतं?"

ह्या वादाची अखेर नेहमी मी व आलेस्याने विषय बदलण्यात व्हायची, पण एकमेकांबद्दल मनात राग साचून रहायचा. तिच्या चेटुकामधील अनेक गोष्टींचा माझ्या तुटपुंज्या ज्ञानावर खुलासा मिळत नव्हता. आलेस्या ज्या आत्मविश्वासाने तिला अवगत असलेल्या गुप्त विद्यांबद्दल बोलायची, त्यांपैकी निम्मी रहस्ये तरी तिला आत्मसात होती अथवा नाही, मला माहीत नव्हते. पण मला वारंवार जे पहायला मिळाले होते त्यावरून माझी खात्री पटली होती की, योगायोगाच्या अनुभवातून तिने अंतःप्रेरक, गूढ, विचित्र ज्ञान प्राप्त केले होते; ह्या ज्ञानाने विज्ञानाला अनेक शतके थोपवून धरले आहे, अडाणी जनतेच्या जीवावर

ते जगते, ह्या ज्ञानात वेडगळ आणि राक्षसी भाबडचा श्रद्धा मिसळल्या आहेत व महान गुपित म्हणून त्याला एका पिढीकडून दुसऱ्या पि-ढीकडे सुपूर्द केले जाते.

ह्या एका मुद्द्यावर तीव्र मतभेद असूनही आम्ही दोघे एकमेकांमध्ये अधिकाधिक गुंतत चाललो होतो. अद्यापपर्यंत आम्ही प्रेमाच्या एकाही शब्दाची देवघेव केली नव्हती, पण एकत्र असणे आम्हाला अत्यावश्यक बनले होते. अनेकदा, मूक क्षणी आमच्या नजरा एकमेकींना भिडत, तेव्हा आलेस्याच्या डोळयांमध्ये पाणी तरळल्याचे आणि तिच्या कानशी-लावरील पातळ निळी शीर ताडताड उडू लागल्याचे मला दिसत असे...

याउलट यार्मोलाशी माझे संबंध पुरते बिघडले. चेटकिणीच्या झोपडी-कडील माझ्या भेटी व आलेस्याबरोबरचे माझे सायंकालीन फिरणे, ही त्याच्या दृष्टीने उघडी गुपिते होती. त्याच्या जंगलात काय काय घडायचे ह्याबाबत त्याला नेहमी आश्चर्यकारक अचूक माहिती असायची. तो मला टाळू लागला होता. जेव्हा जेव्हा मी जंगलात जायच्या तयारीला लागायचा, तेव्हा तेव्हा त्याचे काळे डोळे दुरून माझ्याकडे रागाने व नारा-जीने पहायचे, मात्र नापसंतीचा एकही शब्द त्याने कधी उच्चारला नाही. आमचे विनोदी गंभीर अभ्यास थांबले होते. कधीतरी संध्याकाळी मी शिकविण्याची सूचना केली, तर तो हात झटकून नकार द्यायचा.

"काय उपयोग? फुकट उद्योग, मालक," सुस्त तिरस्काराने तो म्हणायचा.

शिकारीला जाणेसुद्धा आम्ही थांबविले. जेव्हा मी शिकारीला जा-ण्याचा प्रस्ताव मांडायचा, तेव्हा दर वेळी यार्मोला काहीतरी बहाणा शोधून नकार द्यायचा: कधी बंदूक मोडलेली असे, कधी कुत्रा आजारी, तर कधी त्याला फुरसतच नसे. "वेळ नाही, मालक... आज नांगरट करायचीय," माझ्या प्रस्तावाला यार्मोला वारंवार असे उत्तर द्यायचा; मला उत्तम ठाऊक असायचे की, तो मुळीच "नांगरट" करणार नाही, तर आख्खा दिवस दारूच्या गुत्त्यापाशी घोटाळत राहणार व कुणी त्याला दारू पाजेल ह्या आशेने तिथे तो बसून राहणार. त्याचे हे कट्टर, धुमसते वैर मला शिणवू लागले होते आणि त्याला कामावरून काढून टाकण्याची संधी मी शोधत होतो... पण त्याच्या मोठ्या कुटुंबाबद्दल वाटणारी

दया मला तसे वागण्यापासून परावृत्त करीत होती. माझ्याकडून यार्मो-लाला मिळणारा चार रूबलचा पगार त्या कुटुंबाला भुकेने मरण्यापासून वाचवीत होता.

७

एके दिवशी नेहमीप्रमाणे सूर्यास्ताआधी थोडा वेळ मी चेटकिणीच्या झोपडीपाशी आलो, तेव्हा तेथील निवासी उदास मन:स्थितीत बसलेल्या मला आढळल्या. अंगाखाली पाय मुडपून, मागे-पुढे डोलत, स्वत:शी पुटपुटत, हातांमध्ये डोके गच्च धरून, मानुयलीखा बिछान्यावर बसली होती. माझ्या नमस्काराकडे तिने दुर्लक्ष केले. आलेस्याने नेहमीच्या स्नेहाने प्रतिसाद दिला, पण आमचे संभाषण रंगले नाही. ती विमन-स्कपणे ऐकत असावी, कारण तिची उत्तरे पूर्णपणे मुद्द्यांना सोडून होती. तिचा सुंदर चेहरा आंतरिक चिंतेने झाकोळला होता.

"आलेस्या, तुमच्याकडं काहीतरी वाईट घडलंय असं मला दिस-तंय," बाकावरील तिच्या हाताला हळूच स्पर्श करीत मी म्हणालो.

आलेस्या पटकन खिडकीबाहेर पहायला वळली. शांत राहण्याचा ती प्रयत्न करीत होती, पण तिच्या आकुंचित भुवया थरथरत होत्या व तिचे दात तिच्या खालच्या ओठात गच्च रुतले होते.

"नाही... आमच्याकडं विशेष काय घडणार?" निर्विकार आवा-जात ती म्हणाली. "जसं होतं, तसंच सारं आहे."

"आलेस्या, मला तू खोटं का सांगतेस? तुझं हे वागणं चांगलं नाही... मला वाटलं होतं की, आपण दोघं छान मित्र बनलोय."

"खरंच, काही नाही... अशाच... आमच्या काळज्या, क्षुल्लक..."

"नाही आलेस्या, तुमच्या काळज्या क्षुल्लक नसणार. पहा—तुझा चेहरा किती बदललाय."

"तुम्हाला उगीच भास होतोय."

"माझ्याशी मोकळेपणानं बोल, आलेस्या. तुला मी मदत करू शकेन अथवा नाही, मला माहीत नाही, पण निदान काहीतरी सल्ला देईन... जेव्हा दु:ख बोलून दाखवशील, तेव्हा किमानपक्षी तुला हलकं वाटेल."

"खरंच, त्याबद्दल बोलण्यात काही अर्थ नाही," संयम सुटून आलेस्या म्हणाली. "तुम्ही आम्हाला त्याबाबत काहीही मदत करू शकणार नाही."

म्हातारीने अचानक विलक्षण संतापाने आमच्या संभाषणात खंड पाडला :

"काय मूर्खपणा चालवला आहेस कारटे! तुला मदत करू पाहताहेत, तर तू नाक वर करतेस! जणू तुझ्यापेक्षा हुशार ह्या जगात दुसरं कुणी नाही! साहेब, ही सगळी हकीकत मी तुम्हाला संगतवार सांगते," म्हातारी माझ्या दिशेला वळली.

मानी आलेस्याच्या शब्दांवरून सूचित झाले होते, त्याहून कितीतरी पटींनी संकट मोठे होते. काल संध्याकाळी चेटकिणीच्या झोपडीत स्थानिक पोलीस अधिकारी आला होता.

"प्रथम तो छान बसला आणि त्यानं वोदका मागितली," मानुयलीखा म्हणाली, "मग तो मोकाट सुटला. म्हणाला, चोवीस तासांच्या आत सामानसुमान आवरून झोपडीतून चालत्या व्हा. म्हणाला, पुढच्या वेळी मी आलो तेव्हा जर तू इथं दिसलीस, तर नक्की तुझी पाठवणी करीन. दोन सैनिकांबरोबर तुझी घरी रवानगी करीन! बाप्पा, माझं घर इथून खूप दूर आहे– आमचेन्स्क शहर... तिथं आता माझ्या ओळखीचंसुद्धा कुणी नाही, शिवाय आमच्या पासपोर्टांची मुदत केव्हाच संपून गेलीय. मुळातच ते कायदेशीर नव्हते. देवा रे, किती मी दुर्दैवी!"

"पूर्वी त्यानं तुला इथं रहायला परवानगी दिली होती आणि आताच का त्यानं विचार बदलला?" मी विचारले.

"तेच मला समजत नाही... तो काहीतरी बडबडला, पण मला कळलं नाही त्याचं बोलणं. बाब अशी आहे: आम्ही राहतो ही झोपडी आमची नाही, जमीनदाराची आहे. पूर्वी आलेस्या आणि मी खेड्यात रहात होतो, नंतर..."

"माहीत आहे मला आजी, ऐकलंय मी त्याबद्दल... शेतकरी तुझ्यावर चिडले..."

"होय, तेच कारण. तेव्हा म्हाताऱ्या जमीनदारापाशी, श्रीमान आब्रोसीमोवपाशी, ही झोपडी रहायला मागितली. आता बहुधा नव्या

जमीनदारानं जंगल विकत घेतलंय आणि दलदलीचा भाग कोरडा बनवायची त्याची इच्छा आहे म्हणे. पण त्यांना मी कसला अडथळा केलाय ?"

"आजीबाई, कदाचित ह्या सगळ्या थापा असतील ?" मी म्हणालो. "पोलीसाला तुझ्यापासून पैसे उकळायची इच्छा झाली असावी."

"दिले बाबा त्याला, पैसे दिले. घेत नाही! हीच तर भानगड... पंचवीस रूबलची नोट देत होते, घेतली नाही त्यानं... काय करणार! माझ्यावर एवढा चिडला, की काय करावं ते मला सुचेना. त्यानं एकच पाढा लावला होता: इथून चालती हो! आता आम्ही दुर्दैवी अनाथ बायांनी काय करायचं? बाप्पा, लाडक्या, तू काही मदत कर, त्या लोभी कुत्र्याला चार समजुतीचे शब्द सांग. तुझे कायम उपकार मानीन."

"आजी!" रागाने आलेस्या उद्गारली.

"काय – आजी?" म्हातारी चिडली. "गेली पंचवीस वर्षं मी तुझी आजी आहे. आपण भीक मागत फिरायचं, असं तुझं म्हणणं आहे? नाही, साहेब, तुम्ही तिचं ऐकू नका. कृपा करून शक्य असेल तर मदत करा."

त्यांची तरफदारी करण्याचे मी संदिग्ध वचन दिले, पण खरे सांगायचे तर आशेला फार कमी जागा होती. ज्याअर्थी पोलीसाने लाच नाकारली होती, त्याअर्थी मामला गंभीर होता. त्या संध्याकाळी आलेस्याने मला थंडा निरोप दिला व नेहमीप्रमाणे ती माझ्याबरोबर चालत आली नाही. माझा हस्तक्षेप त्या मानी मुलीला आवडला नव्हता आणि तिच्या आजीच्या केविलवाण्या वर्तनाची तिला लाज वाटली होती, असे मला दिसले होते.

८

भुरकट, उबदार सकाळ होती. तुमच्या डोळ्यांदेखत नव्या गवताला उगविणाऱ्या आणि ताज्या कोंबांना वर आणणाऱ्या उपकारक मोठ्या थेंबांच्या पावसाच्या काही सरी आधीच पडून गेल्या होत्या. प्रत्येक सरीनंतर सूर्य क्षणभर ढगांआडून डोकावायचा आणि माझ्या बागेत दाटी करणाऱ्या पांढरफुलीच्या नाजुक हिरव्या, पावसात धुवून निघाले-

त्या पानांना चमकावून जायचा. परसदारीच्या उकरलेल्या भाजीच्या वाफ्यांवर चिमण्यांचा कलकलाट चालायचा. पॉपलरच्या चिकट तपकिरी कळ्यांमधून उग्र गंध दरवळायचा. यार्मोला आत आला, तेव्हा मी जंगलच्या दाचाचे रेखाचित्र काढत होतो.

"पोलीस आलाय," उदासपणे तो म्हणाला.

जर पोलीस अधिकारी आला, तर मला सांग असे दोन दिवसांपूर्वी मी यार्मोलाला म्हटले होते, ह्याची मला मुळीच आठवण राहिली नव्हती. त्यामुळे त्या सरकारी अधिकाऱ्याचे माझ्यापाशी काय काम होते ह्याचा क्षणभर मला उलगडा होईना.

"काय भानगड आहे?" मी गोंधळून विचारले.

"मी म्हणालो की, पोलीस आलाय," यार्मोला परत म्हणाला. गेल्या काही दिवसात ह्याच शत्रुत्वाच्या स्वरात तो माझ्याशी बोलत होता. "आत्ताच मी त्याला बांधापाशी पाहिलं. इकडं येतोय."

रस्त्यावर चाके खडखडली. मी घाईने खिडकीपाशी गेलो व खिडकी उघडली. एक मरतुकडा, चॉकलेटी रंगाचा, लोंबत्या ओठाचा, दु:खी मुद्रेचा घोडा दुडक्या चालीने उंच, खिळखिळी गाडी ओढत होता. त्याला गाडीशी एकाच दांड्याने बांधले होते व दुसऱ्या दांड्याऐवजी भक्कम दोर लावला होता. (स्थानिक कुचाळखोर म्हणत की, निष्कारण अफवा पसरायला नकोत, म्हणून पोलीस अधिकारी मुद्दाम अशा "दयनीय अवतारात" फिरायचा). पोलीस अधिकारी स्वत:च गाडी हाकत होता. भारी किंमतीच्या राखी कपड्याच्या ओव्हरकोटात गुंडाळलेल्या त्याच्या राक्षसी आकृतीने दोन आसनांची जागा व्यापली होती.

"नमस्ते, येवप्सीखी आफ्रिकानोविच!" खिडकीतून बाहेर वाकत मी ओरडलो.

"आ–माझाही नमस्कार! कशी आहे प्रकृती?" वरिष्ठाच्या घनगंभीर खर्जात त्याने स्नेहाने प्रतिसाद दिला.

त्याने घोड्याचा लगाम खेचला, मला रामराम ठोकला आणि डौलात तो पुढे झुकला.

"मिनिटभरासाठी आत या. तुमच्यापाशी माझं एक छोटं काम आहे."

पोलीस अधिकाऱ्याने हात पसरले आणि नकारार्थी डोके हलविले.

"शक्य नाही! आत्ता मी कामावर आहे. वोलोशाला एका प्रेताची पाहणी करायला निघालोय– तिथं एक माणूस बुडून मेला."

पण ग्रेवप्सीखी आफ्रिकानोविचच्या स्वभावातील दुबळ्या जागा एव्हाना मला माहीत झाल्या होत्या, म्हणून मी बळेच निर्विकारपणा आणून म्हटले:

"अरेरे, फार वाईट... आणि मी काऊंट वोर्त्सेल यांच्या इस्टेटीवरून दोन फक्कड बाटल्या घेऊन आलो होतो..."

"शक्य नाही. नोकरी आहे..."

"तिथल्या एका माणसानं ओळखीखातर मला त्या विकल्या. पोटच्या पोरांप्रमाणं त्यानं त्या बाटल्या तळघरात जपून ठेवल्या होत्या... आलात तर बरं होईल... तुमच्या घोड्याला ओट खायला घालायचा मी हुकूम देतो."

"तुम्ही म्हणजे खरंच..." पोलीस म्हणाला, "नोकरी सर्वांत आधी हे काय तुम्हाला माहीत नाही? त्या बाटल्यांमध्ये काय आहे? जर्दाळूचा अर्क?"

"जर्दाळू अर्क कुठला आलाय!" मी हात झटकला. "स्तारका वोदका आहे बाप्पा!"

"खरं तर आम्ही आधीच काहीतरी घेतलंय," तोंड वाकडे करीत व गाल खाजवीत पोलीस अधिकारी खेदाने म्हणाला.

मी पूर्वीच्याच थंडपणाने पुढे म्हणालो:

"खरं-खोटं मला माहीत नाही, पण तो माणूस देवाची शपथ घेऊन म्हणाला की, वोदका दोनशे वर्षांची आहे. वास अगदी थेट कोन्याकचा आणि रंग तृणमण्यासारखा पिवळाजर्द."

"छ्या:! तुम्ही काय माझा छळ करताय!" पोलीस अधिकारी विनोदी अगतिकपणे म्हणाला. "माझ्या घोड्याचा ताबा कोण घेईल?"

माझ्यापाशी जुन्या वोदकाच्या अनेक बाटल्या होत्या, पण मी बढाई मारली होती तेवढी जुनी वोदका अर्थातच माझ्यापाशी नव्हती. केवळ माझ्या बोलण्याच्या जोरावर तिचे वय काही दशकांनी वाढेल अशी मी अटकळ बांधली होती. कोणत्याही परिस्थितीत ती अत्यंत कडक घरगुती

बनावटीची वोदका होती, एका दरिद्री बनलेल्या धनपतीच्या तळघराचा मानबिंदू होती. (पाद्रयाच्या घरात जन्मलेल्या पोलीस अधिकाऱ्याने थंडी बाधू नये ह्या सबबीवर तात्काळ एक बाटली माझ्याकडून हस्तगत केली...) माझ्याजवळ खाण्याचे पदार्थ अत्यंत चवदार होते: नुकत्याच घुसळून काढलेल्या लोण्याबरोबर कोवळा मुळा.

"काय काम आहे तुमचं?" पाचवा प्याला रिचविल्यानंतर जुन्या आरामखुर्चीत पाठ टेकवून बसत पोलीस अधिकाऱ्याने विचारले. त्याच्या वजनाखाली खुर्ची करकरली.

म्हातारीच्या संकटाची मी त्याला हकीकत सांगितली, तिच्या असहाय स्थितीचा व निराशेचा उल्लेख केला व अस्थायी औपचारिकपणाचा ओझरता संदर्भ दिला. मान खाली घालून, तांबड्या कडक मुळ्याचे बुडखे पद्धतशीरपणे तोडून दमदारपणे कुडुम कुडुम आवाज करीत खात, तो माझे बोलणे ऐकत होता. त्याच्या निर्विकार, धुंद डोळ्यांनी – त्यांचा रंग निळा होता व ते कमालीचे लहान होते – अधूनमधून तो माझ्याकडे वरती पहात होता, पण त्याच्या प्रचंड लाल चेहऱ्यावर सहानुभूतीचा अथवा निषेधाचा लवलेशही मला आढळत नव्हता. शेवटी मी बोलायचा थांबलो, तेव्हा त्याने विचारले:

"तुमची माझ्यापासून काय अपेक्षा आहे?"

"काय म्हणजे?" मी अस्वस्थपणे विचारले. "कृपया त्यांच्या संकटाचं निवारण करा. दोन गरीब, असहाय बायका राहताहेत..."

"त्यातली एक गुलाबाच्या कळीसारखी सुरेख आहे!" उपहासाने पोलीस अधिकारी म्हणाला.

"कळी अथवा आणखी काही, तो मुद्दा वेगळा. पण मला सांगा, तुम्ही त्यांना मदत का करत नाही? त्यांची ताबडतोब उचलबांगडी करणं तुम्हाला खरंच अत्यावश्यक आहे? निदान काही काळ थांबा, तोवर मी स्वत: त्या जमीनदारापाशी बोलतो. एखाद-दुसरा महिना थांबलात, तर तुमचं काय नुकसान होणार आहे?"

"काय नुकसान?" तो खुर्चीतून ताडकन उठला. "अहो, सगळंच नुकसान होईल आणि सर्वांत प्रथम माझी नोकरी जाईल. हा नवा जमीनदार श्रीयुत इल्याशेविच कसा आहे, एकटा देवच जाणे! कदा-

चित, जरा काही खुस्स झालं म्हणजे पीटरबुर्गला कागद धाडणाऱ्यांपैकी असला तर? अशी माणसं आम्हाला बरीच भेटतात!"

संतापलेल्या पोलीस अधिकाऱ्याला शांत करण्याचा मी प्रयत्न केला.

"पुरे आता, येवप्सीखी आफ्रिकानोविच. तुम्ही ह्या प्रकरणाचा उगीच फार मोठा बाऊ करता. शेवटी काय? त्यात धोका असला, तरी भलेपणा मिळेल."

"थू:!" तो उद्गारला आणि रुंद विजारीच्या खिशांमध्ये त्याने खोलवर हात खुपसले. "म्हणे भलेपणा! तुम्हाला काय वाटतं, फत्रूड पंचवीस रूबलसाठी मी माझी नोकरी पणाला लावीन? नाही, तुम्ही मला नीट ओळखलं नाही."

"अहो असे चिडता काय, येवप्सीखी आफ्रिकानोविच? इथं रकमेचा प्रश्न नाही... निदान माणुसकी म्हणून..."

"मा-णु-स-की म्हणून?" उपहासाने प्रत्येक शब्द अलग उच्चारीत तो म्हणाला. "ही माणुसकी माझ्या इथं बसलीय!"

त्याच्या कॉलरवरील गुबगुबीत, केशविहीन मानेच्या वळकटीवर जोराने त्याने हाताच्या थापट्या मारल्या.

"तुम्ही फारच अतिशयोक्ती करताय, येवप्सीखी आफ्रिकानोविच!"

"मुळीच नाही. सुप्रसिद्ध नीतीकथाकार श्रीयुत क्रीलोव यांच्या भाषेत सांगायचं तर, "ह्या प्रदेशातला हा रोग आहे." ह्या दोन बायका कोण आहेत! हिज हायनेस प्रिन्स ऊरूसोव ह्यांचं 'पोलीस अधिकारी' नावाचं सुरेख पुस्तक तुम्ही वाचलंय?"

"नाही."

"फार वाईट. सुरेख आणि फार वरच्या दर्जाचं पुस्तक. फावल्या वेळात जरूर वाचा..."

"ठीक, ठीक, मी नक्की वाचेन. पण त्या दोन गरीब बायांशी ह्या पुस्तकाचा काय संबंध येतो, हे मात्र मला अजून समजलं नाही."

"काय संबंध? फार थेट संबंध येतो. पहिला मुद्दा (येवप्सीखी आफ्रिकानोविचने डाव्या हाताची जाडजूड, केसाळ तर्जनी वाकविली): 'प्रत्येक माणूस देवाच्या मंदिरात नेमानं जातो अथवा नाही आणि ह्या कामाचं तो ओझं मानत नाही, ह्यावर कडक लक्ष ठेवणं पोलीस अधि-

काऱ्याचं कर्तव्य आहे.' आता तुम्हीच सांगा, ही... काय तिचं नाव... मानुयलीखा... जाते देवळात? कधीतरी ती चर्चमध्ये जाते?"

चर्चेला अनपेक्षित वेगळे वळण लागलेले पाहून मी गप्प झालो. त्याने माझ्याकडे दिग्विजयी नजरेने पाहिले व दुसरे बोट मुडपले.

"मुद्दा दुसरा: 'खोट्या भविष्यकथनाला आणि खोट्या शकुनकथनाला सर्वत्र बंदी आहे.' समजलं साहेब? मग तिसरा मुद्दा 'चेटुकविद्येस अथवा मांत्रिकीस स्वतःला वाहून घेण्यास आणि तत्सम फसव्या व्यवहारास मनाई आहे.' ह्यावर तुम्ही काय सांगणार? हे एकदम सारं उघडकीला आलं अथवा वरच्या साहेबांपर्यंत पोहोचलं तर? जबाबदार कोण? — मी. कुणाच्या नोकरीवर गदा? — माझ्या. पाहिलात कमा मामला आहे."

तो परत आरामखुर्चीत बसला. त्याचे वर झालेले डोळे शून्यपणे भिंतींवर भिरभिरत होते, तर बोटांनी टेबलावर मोठा ठेका धरला होता.

"पण जर मी तुम्हाला खास विनंती केली तर, येवप्सीखी आफ्रिकानोविच?" मी परत आर्जवी सुरात बोलू लागलो. "अर्थात तुमची जबाबदारी फार अवघड आणि कटकटीची आहे, पण मला माहीत आहे, तुमचं काळीज फार उदार, सोन्याचं काळीज आहे. ह्या बायकांना त्रास देणार नाही, असं वचन तुम्ही मला दिलं तर काय बिघडेल?" पोलीस अधिकाऱ्याचे डोळे एकदम माझ्या डोक्यावर स्थिरावले.

"तुमची बंदूक छान आहे," बोटांचा ताशा अजूनही बडवीत तो सहजपणे म्हणाला. "फार सुरेख बंदूक. मागच्या वेळी जेव्हा मी तुमच्याकडं आलो होतो आणि तुमची भेट झाली नाही, तेव्हा खूप वेळ मी तिला निरखून पहात बसलो होतो... अद्भुत बंदूक!"

मीसुद्धा डोके मागे वळविले आणि बंदुकीवर नजर टाकली.

"होय, बंदूक छानच आहे," मी कौतुक केले. "पण ती जुनी आहे, हास्टीन-रेन्नेटा कंपनीची. गेल्याच वर्षी मी तिला सेंटर-फायर करून घेतली. बॅरलसवर नजर टाका."

"अर्थात, त्यांच्यावरच तर माझं प्रामुख्यानं लक्ष खिळलं होतं. अप्रतिम वस्तू... साक्षात खजिना."

आमच्या नजरा एकमेकींना भिडल्या आणि पोलीस अधिकाऱ्याच्या ओठांच्या कोपऱ्यांशी हलकेच, अर्थपूर्ण स्मित खेळत असल्याचे मी पाहिले. मी जागेवरून उठलो, भिंतीवरून बंदूक काढली व तिच्यासह येवप्सीखी आफ्रिकानोविचपाशी गेलो.

"पाहुणा ज्या वस्तुचं कौतुक करील, त्या सगळ्या वस्तू त्याला भेट म्हणून देण्याची चेर्केस लोकांमध्ये एक छान रीत आहे," मी सौम्यपणे म्हणालो. "आपण दोघं चेर्केस नाही, येवप्सीखी आफ्रिकानोविच, तरीही आठवण म्हणून ही वस्तू आपण माझ्याकडून स्वीकारावी, अशी विनंती करतो."

पोलीस अधिकाऱ्याने देखाव्यासाठी शरमेचे नाटक केले.

"छे:, छे:, एवढी छान वस्तू! नाही, नाही, ही औदार्याची परि-सीमा झाली!"

त्याला फार वेळपर्यंत आग्रह करण्याची माझ्यावर पाळी आली नाही. पोलीस अधिकाऱ्याने बंदूक स्वीकारली, काळजीपूर्वक स्वत:च्या गुडघ्यांमध्ये धरली व स्वच्छ हातरुमालाने चापावरील धूळ पुसून काढली. मला एवढेच समाधान वाटत होते की, माझी बंदूक निदान जाणकाराच्या हाती गेली होती. येवप्सीखी आफ्रिकानोविच तात्काळ उठला आणि जाण्याची घाई करू लागला.

"काम खोळंबून चालणार नाही आणि इथं मी तुमच्यापाशी गप्पा मारत बसलोय," रबरी बूट पायात चढविताना मोठ्यांदा पाय आपटीत तो म्हणाला. "जेव्हा आमच्या भागात याल, तेव्हा जरूर माझ्याकडं या."

"मग, मानुयलीखाच काय, पोलीस साहेब?" मी हलकेच आठवण करून दिली.

"बघू, पाहू..." येवप्सीखी आफ्रिकानोविच मोघम गुरगुरला. "आणखी एक वस्तू मी मागणार होतो... तुमचा मुळा फार चवदार आहे..."

"मी स्वत: पैदास केलीय."

"विलक्षण मुळा! माझ्या बायकोला भाज्या फार आवडतात. तर कृपया तुम्ही... मुळ्याची निदान एक जुडी दिलीत.."

"आनंदानं देतो. माझा तो सन्मान समजतो... आजच माणसाबरोबर करंडी पाठवून देतो. आणि थोडं लोणी... माझ्याकडचं लोणी दुर्मिळ आहे."

"आणि लोणीसुद्धा..." आनंदाने त्याने संमती दिली. "त्या बायांना तुम्ही सांगा, त्यांना तात्पुरता मी हात लावणार नाही. पण त्यांनी लक्षात ठेवावं," एकदम त्याचा आवाज चढला, "नुसत्या आभारावर त्या माझ्या तावडीतून सुटणार नाहीत. आता चलतो. पुन्हा एकदा भेटवस्तूंबद्दल आणि पाहुणचाराबद्दल आभार."

लष्करी पद्धतीने त्याने टाचा खडाकन वाजविल्या आणि पुष्ट खाणाऱ्या वजनदार माणसाच्या चालीने तो त्याच्या घोडागाडीपाशी गेला. तेथे खेड्यातील पोलीस, गावचा वडीलधारा व यार्मोला आदराने हातात टोप्या धरून उभे होते.

९

पोलीस अधिकाऱ्याने स्वतःचा शब्द पाळला आणि जंगलातील झोपडीमधील निवासींना काही काळपर्यंत सतावले नाही. पण आलेस्याबरोबरचे माझे नाते एकदम विचित्ररीत्या बदलले. पूर्वीच्या विश्वासू आणि अकृत्रिम मित्रत्वाने आता ती माझ्याशी वागत नव्हती. सुंदर तरुणीचे चंचल विभ्रम आणि खट्याळ मुलाची खिलाडू वृत्ती यांचा मनोहारी संगम पूर्वीसारखा आता तिच्या ठायी आढळत नव्हता. आमच्या संभाषणात अवघडलेपणाची अलंघ्य भिंत निर्माण झाली होती. आमच्या कुतूहलाला विशाल व्याप्ती देणाऱ्या सर्व सजग विषयांना आलेस्या घाईघाईने, घाबरटपणाने टाळायची.

माझ्या उपस्थितीत ती मुद्दाम स्वतःच्या कामावर लक्ष केंद्रित करायची, पण तिचे हात तिच्या मांडीवर निर्जीवपणे पडलेले आणि तिची नजर जमिनीवर खिळलेली, मी वारंवार पहात असे. अशा क्षणी जर मी तिला नावाने हाक मारली अथवा तिला प्रश्न विचारला, तर ती दचकायची आणि सावकाशपणे माझ्याकडे भेदरल्या चेहऱ्याने पहायची. माझ्या शब्दांचा अर्थ जाणून घेण्याचा प्रयत्न त्या चेहऱ्यावर उमटलेला

असायचा. माझी उपस्थिती तिला त्रासदायक अगर बोजा वाटायची, असे काही वेळांना मला जाणवायचे. माझ्या प्रत्येक भाष्यात, माझ्या प्रत्येक शब्दात अवघ्या काही दिवसांपूर्वी तिला प्रचंड स्वारस्य वाटत होते अशी वस्तुस्थिती असताना, हा बदल आश्चर्यकारक वाटत होता. पोलीस अधिकाऱ्यापाशी मी रदबदली केली होती, तिच्या स्वातंत्र्याच्या भावनेचा माझ्या उपकारी कृत्याने मी अपमान केला होता व त्याबद्दल ती मला क्षमा करू शकत नव्हती, अशी मी स्वतःची समजूत करून घेतली. पण ह्या समजुतीने माझे समाधान होत नव्हते, कारण जंगलात वाढलेली एक सामान्य मुलगी एवढी आढ्यताखोर गर्विष्ठ कशी?

ह्याचा खुलासा घडणे आवश्यक होते, पण मनमोकळ्या संभाषणाची प्रत्येक संधी आलेस्या हट्टाने टाळत होती. आमचे संध्याकाळचे फिरणे थांबले. निरोप घेऊन परतायच्या वेळी दररोज मी तिच्याकडे आर्जवाने, विनवणीच्या नजरेने पहायचा—पण ती अडाणीपणाचे सोंग घ्यायची. याउलट, म्हातारी बहिरी असूनही, तिची उपस्थिती मला जाचक वाटायची.

आलेस्याला दररोज भेटायला जाण्याची माझी सवय मी मोडू शकत नव्हतो, ह्याचा काही वेळा मला संताप यायचा. ह्या आकर्षक, मला अनाकलनीय तरुणीशी माझे हृदय बळकट, अदृश्य धाग्यांनी किती जखडले होते, ह्याची मला स्वतःलाच नीटशी जाणीव नव्हती. प्रेमाबद्दल अजून मी विचार करीत नव्हतो, पण प्रेमाआधीच्या अस्वस्थ कालखंडामधून एव्हाना मी जात होतो—संदिग्ध, पीडादायी दुःखद संवेदनांनी भरलेला कालखंड. मी कुठेही असलो आणि मन दुसरीकडे वळविण्याचे मी कितीही प्रयत्न केले, तरी परत परत आलेस्याची प्रतिमा डोळ्यांसमोर उभी रहायची, माझे तन-मन तिच्याकडे ओढ घ्यायचे; तिच्या शब्दांची—काही वेळा अत्यंत बिनमहत्त्वाच्या—तिच्या हालचालींची अथवा तिच्या स्मिताची आठवण होताच माझ्या हृदयात सौम्य, मधुर कळ उमटायची. मग संध्याछाया पडायच्या आणि बैठ्या, खिळखिळ्या बाकावर तिच्याशेजारी मी तासन्तास बसून रहायचा. मला अधिकच भेदरली भावना झपाटायची, अधिक अवघड आणि मूर्खासारखे वाटायचे व ह्या जाणीवांचा मनोमन राग यायचा.

एकदा आलेस्याबरोबर मी सबंध दिवस तसा बसून घालविला. सकाळपासूनच मला बरे वाटत नव्हते, पण नेमके काय बिनसले होते त्याचा मला स्वतःलाच अंदाज लागत नव्हता. संध्याकाळच्या दरम्यान माझी प्रकृती जास्तच बिघडली. माझे डोके जड बनले, माझ्या कानात आवाज येऊ लागले आणि कुणीतरी मऊ, बळकट हाताने दाबावे तशी एक मंद ठणक डोक्यामागे जाणवू लागली. माझे तोंड कोरडे पडले होते आणि माझ्या सबंध अंगभर एक दुबळी सुस्ती पसरली होती, मला सतत जांभया येत होत्या व अंग ताणून द्यावेसे वाटत होते. एखाद्या चकचकीत वस्तूकडे खूप वेळ ताणून पाहिल्याप्रमाणे माझे डोळे चुरचुरत होते.

त्या संध्याकाळी उशीरा घरी परतताना अचानक मला हुडहुडी भरली. झिंगलेल्या माणसाप्रमाणे अडखळत मी चालत होतो, कुठे जात होतो ह्याचे मला भान नव्हते आणि माझे दात कडाकडा वाजत होते.

मला घरी कुणी आणले हे मला आजपर्यंत ठाऊक नाही. सहा दिवसपर्यंत पोलेस्येच्या भयानक, निर्दय तापाने मी हुडहुडत होतो. दिवसा आजाराला उतार पडल्यासारखा भासायचा आणि मी शुद्धीवर यायचा. तापाने माझी शक्ती नष्ट केली होती, गुडघे दुबळे बनले होते, ठणकत होते आणि मी खोलीत अक्षरशः रांगत वावरत होतो. जरा जोरदार हालचाल केली, तर एकदम डोक्यात रक्त चढायचे आणि डोळयांसमोर अंधारी यायची. संध्याकाळी, सर्वसाधारणपणे साताच्या सुमाराला, मला परत ताप चढायचा आणि भयानक रात्र मला एखाद्या शतकाप्रमाणे भासायची. त्या दरम्यान कधी मला जबरदस्त हुडहुडी भरायची, तर कधी असह्य ताप फणफणायचा. तापामुळे किंचित ग्लानी यायची आणि भयानक स्वप्ने माझ्या तापल्या मेंदूला छळायची. त्या स्वप्नांमधील बारीक, सूक्ष्म तपशील हिडीसपणे एकमेकांना चिकटायचे व त्यांचा मोठा ढीग बनायचा. मला भास व्हायचा की, प्रचंड आकाराची काही रंगीत खोकी मी उपसत होतो, मोठ्या खोक्यांमधून छोटी खोकी बाहेर काढत होतो, छोटचा खोक्यांमधून आणखी छोटी खोकी काढत होतो आणि मला तिरस्करणीय वाटणारे ते अखंड काम थांबविण्यास असमर्थ होतो. मग भिंतीच्या कागदाच्या लांब रंगीत पट्ट्या

भयानक वेगाने माझ्या डोळ्यांसमोरून उडत जायच्या, आणि नक्षीऐवजी वेगवेगळ्या माणसांचे चेहरे त्यांच्यावर मला ठळकपणे दिसायचे–काही चेहरे हसरे, प्रेमळ, देखणे असत; काही भयानक तोंडे वेडीवाकडी करीत, जिभा बाहेर काढत, दात विचकत अथवा डोळे प्रचंड मोठे वटारत. मग माझा आणि यार्मोलाचा अत्यंत गुंतागुंतीचा अमूर्त वाद सुरू व्हायचा. आमचे युक्तिवाद अधिकाधिक धूर्त आणि सखोल असत. काही शब्दांना आणि अक्षरांनासुद्धा अचानक गूढ, गहन अर्थ प्राप्त व्हायचा. एका अज्ञात, अमानुष शक्तीच्या भीतीने मी अधिकाधिक झपाटला जायचा व ती शक्ती माझ्या डोक्यातून किळसवाणे खोटे युक्तिवाद एकापाठोपाठ एक बाहेर काढायची; केव्हाचा तिरस्करणीय बनलेला वाद मला थांबवू द्यायची नाही...

मानवी आणि पशूंच्या आकृतींचा, निसर्गदृश्यांचा, अत्यंत आश्चर्यकारक आकारांच्या व रंगांच्या वस्तूंचा, ज्यांचा अर्थ सर्वेंद्रियांमार्फत मला जाणवत होता अशा शब्दांचा व वाक्यांचा, तो एक झंझावात होता. आश्चर्य म्हणजे त्याच वेळी, हिरव्या जळक्या आच्छादनाच्या दिव्यामधून छतावर पडणारे प्रकाशाचे वर्तुळ मी पहात रहायचा. अंधुक कडांच्या त्या शांत प्रकाशवर्तुळात एक मूक, गूढ, भयानक जीवन लटकते आहे असे मला जाणवायचे. माझ्या स्वप्नांच्या भिरभिऱ्या गोंधळापेक्षा अधिक भयानक, दडपून टाकणारे.

मग मला जाग यायची किंवा मी जागा आहे असे अचानक मला जाणवायचे. मला तात्काळ शुद्ध यायची, मी आजारी आहे व बिछान्यात पडून आहे असे समजायचे, नुकतीच मला ग्लानी आली होती हे ध्यानात यायचे, तरीही छतावरचे प्रकाशवर्तुळ मला दहशत घालत रहायचे. क्षीणपणे मी घड्याळ पहायचा आणि माझी ती हिडीस स्वप्नमालिका फक्त दोन-तीन मिनिटे चालली होती असे ध्यानात येताच मनाला अधिक वेदना व्हायच्या. "देवा! केव्हा उजाडणार!" निराश होऊन, गरम उशांवर डोके घुसळत, धपापणारा गरम श्वास ओठांवर जाणवत मी मनाशी म्हणायचा... मग एक हलकी निद्रा मला परत घेरायची, माझा मेंदू दुःस्वप्नांचे खेळणे बनायचा, दोन मिनिटांनंतर मी पुन्हा जागा व्हायचा, मर्त्य वेदनेचे भक्ष्य बनायचा.

सहा दिवसांनंतर, माझ्या मूळच्या दणकट प्रकृतीमुळे व क्विनाईन आणि केळ्यासदृश फळाच्या अर्काच्या मदतीने, मी आजारावर मात केली. मी बिछान्यातून उठलो तेव्हा पूर्ण खलास झालो होतो, माझे पाय लटपटत होते. पण माझी प्रकृती वेगाने सुधारली. सहा दिवसांच्या तापातील भ्रमांमुळे थकलेल्या माझ्या डोक्यात आता कोणतेही विचार सुदैवाने खेळत नव्हते. माझी भूक दुप्पट वाढली, तर तासागणिक माझ्या शरीरात ताकद येत होती, देहाचा प्रत्येक कण आरोग्याला आणि जीवनाच्या आनंदाला शोषत होता. जंगलातील त्या मोडक्या खोपटाकडे जाण्याची नवी ऊर्मी मला आली. माझ्या नसा आजारातून अजून पूर्ण बऱ्या झाल्या नव्हत्या आणि जेव्हा जेव्हा आलेस्याचा चेहरा व आवाज यांची मला आठवण व्हायची, तेव्हा तेव्हा मी हळवा बनायचा, मला रडावेसे वाटायचे.

१०

आणखी पाच दिवस उलटले आणि कोणतीही थकलेपणाची भावना न जाणवता चेटकिणीच्या झोपडीपर्यंत जाण्याइतपत मी सशक्त बनलो. झोपडीच्या उंबरठ्यापाशी माझी छाती धडधडली. सुमारे पंधरवडाभर मी आलेस्याला पाहिले नव्हते आणि ती मला किती प्रिय होती हे आता अधिक स्पष्टपणे जाणवले होते. दाराच्या मुठीवर हात ठेवून काही क्षण मी श्वास रोधून उभा राहिलो. मनात विलक्षण चलबिचल माजली होती. दार ढकलण्यापूर्वी काही क्षण मी माझे डोळेसुद्धा मिटून घेतले...

माझ्या प्रवेशानंतरच्या भावना मांडणे अवघड आहे. माता आणि पुत्र, नवरा व बायको अथवा दोन प्रेमिक यांच्यामधील भेटीच्या पहिल्या क्षणांचे शब्द आठवणे खरोखर शक्य आहे काय? त्यावेळी उच्चारलेले शब्द अत्यंत सामान्य असतात, जर त्यांची कागदावर अचूक नोंद केली, तर ते हास्यास्पद वाटतील. पण तरीही प्रत्येक शब्द योग्य आणि अपार मौल्यवान असतो, कारण पृथ्वीवरील आपल्या अत्यंत जिवलग व्यक्तीच्या आवाजातून तो उमटलेला असतो.

मला अत्यंत ठळकपणे आठवते की, आलेस्याने तिचा फिकट चेहरा पटकन माझ्याकडे वळविला आणि मला नव्या भासणाऱ्या त्या गोड

चेहऱ्यावर क्षणात गोंधळाचे, भीतीचे, प्रेमळ भाव उमटले. माझ्याभोवती घोटाळत म्हातारी काहीतरी पुटपुटली, पण तिचे शब्द मी ऐकले नाहीत. आलेस्याचा आवाज मंजुळ संगीताप्रमाणे भासला:

"काय झालं होतं तुम्हाला? आजारी होतात? बाई ग, किती हडकुळे झालात, बिच्चारे!"

बराच वेळपर्यंत मी उत्तर देऊ शकलो नाही. एकमेकांचे हात गुंफवून, एकमेकांच्या नजरा गुंफवून, आम्ही मूकपणे उभे राहिलो. ते काही मूक क्षण माझ्या आयुष्यातील अत्यंत सुखाचे होते, असे मी मानतो. त्यापूर्वी किंवा त्यानंतर असा विशुद्ध, पूर्ण एकाग्र प्रेमोन्माद कधीच अनुभवला नाही. आलेस्याच्या टपोऱ्या काळ्या डोळ्यांमध्ये मी वाचत होतो—भेटीचा भावनावेग, माझ्या प्रदीर्घ अनुपस्थितीबद्दलचा कोप, प्रेमाची आवेगपूर्ण कबुली! त्या नजरेबरोबरच ती मला आनंदाने सर्वस्व देऊ करीत होती असे भासले—कोणत्याही अटीविना, कोणत्याही चलबिचलीविना.

पापण्यांची सावकाश हालचाल करून मानुयलीखाच्या उपस्थितीची तिने जाणीव दिली व आमच्या तंद्रीचा प्रथम भंग केला. आम्ही शेजारी शेजारी बसलो व माझ्या आजाराबद्दल, औषधोपचारांबद्दल, डॉक्टरांच्या निदानांबद्दल (शहरातून दोनदा डॉक्टर मला तपासायला आले होते) ती मला आस्थेने प्रश्न विचारू लागली. डॉक्टरांबद्दलची हकीकत तिने मला अनेकदा सांगायला लावली. त्यावेळी अधूनमधून तिच्या ओठांवर उपहासगर्भ स्मित थरथरल्याचे मी पाहिले.

"अरेरे, तुम्ही आजारी पडलात हे मला का बरं कळलं नाही!" कळवळून खंतीने ती उदगारली. "एका दिवसात मी तुम्हाला तुमच्या पायांवर उभं केलं असतं... त्या लोकांना काहीही, अगदी का-ही-ही समजत नाही, तेव्हा त्यांच्यावर तुम्ही विश्वास कसा टाकलात? तुम्ही मला बोलावणं का धाडलं नाहीत?"

मी अडखळलो.

"त्याचं असं झालं आलेस्या... हे फार अनपेक्षितपणं घडलं... शिवाय, तुला त्रास द्यायची मला भीती वाटली. अलीकडच्या काळात तू माझ्याशी काहीशी विचित्र वागतेस, जणू तुला माझा कशाबद्दल तरी

राग आलाय, किंवा माझा कंटाळा आलाय असं भासतं... हे बघ आलेस्या," आवाज खाली करीत मी पुढे म्हणालो, "आपल्या दोघांना खूप खूप बोलणं आवश्यक आहे... एकांतात... समजलं?"

संमतीदाखल तिने सावकाशपणे पापण्या खाली झुकविल्या, मग आजीकडे घाबरट कटाक्ष टाकला आणि पटकन पुटपुटली:

"होय... माझीही तशीच इच्छा होती... मग... थांबा..."

सूर्य मावळला न मावळला तोच आलेस्या मला घरी जाण्याची घाई करू लागली.

"आवरा, लौकर आवरा," बाकावरून माझा हात खेचत ती म्हणाली. "जर आत्ता तुम्हाला दमट हवा लागली, तर परत आजारी पडाल."

"तू कुठं निघालीस, आलेस्या?" नातीने डोक्यावर मोठा राखाडी लोकरी रुमाल घाईघाईने गुंडाळलेला पाहून मानुयलीखाने अचानक विचारले.

"ह्यांना थोड्या अंतरापर्यंत पोचवायला जाते," आलेस्या उत्तरली.

आजीकडे न पाहता, खिडकीबाहेर नजर लावून, काहीशा निर्विकारपणे ती हे म्हणाली, पण तिच्या आवाजातील किंचित कंप माझ्या ध्यानात आला.

"म्हणजे अखेरीस जातेस तर?" म्हातारीने ठासून परत विचारले.

आलेस्याचे डोळे चमकले व मानुयलीखाच्या चेहऱ्यावर स्थिरावले.

"होय, जातेय!" ती उर्मटपणे म्हणाली. "ह्यावर फार पूर्वीच खूप बोलून झालंय... हा माझा प्रश्न आहे, माझीच जबाबदारी राहील."

"अग वा!" संतापाने म्हातारी उद्गारली.

ती आणखी काही बोलू इच्छित होती, पण तिने नुसताच हात झटकला, थरथरत्या चालीने ती कोपऱ्यात गेली व करंडीशी खटपटू लागली.

माझ्या ध्यानात आले की, आत्ता माझ्यासमोर घडलेला हा जलद असमाधानी संवाद म्हणजे यापूर्वी झालेल्या अनेक भांडणांचा व संघर्षांचा पुढील भाग होता. आलेस्याबरोबर झाडांच्या राईत उतरल्यानंतर मी तिला विचारले:

"माझ्याबरोबर तू फिरायला जाऊ नये अशी आजीची इच्छा आहे? होय ना?"

आलेस्याने रागाने खांदे उडविले.

"कृपया तिकडं लक्ष देऊ नका. होय, तिची इच्छा नाही... म्हणून काय?... मला आवडतं तसं करायचा मला हक्क नाही?"

आलेस्याला तिच्या पूर्वीच्या कठोर वर्तनाबद्दल खडसून जाब विचारावा, असे अचानक मला तीव्रतेने वाटले.

"म्हणजे पूर्वी, माझ्या आजारापूर्वीसुद्धा तू येऊ शकली असतीस, पण माझ्याबरोबर एकटं राहण्याची तुझी इच्छा नव्हती... आलेस्या, तू मला किती वेदना दिल्यास, ह्याची तुला कल्पना नाही... रोज संध्याकाळी मी तुझी वाट पहायचा, माझ्याबरोबर परत फिरायला येशील म्हणून वाट बघायचा... पण तू दुर्लक्ष करायचीस, उदासीनता दाखवायचीस, चिडलेली असायचीस... तू फार फार छळलंस मला, आलेस्या!"

"आता गप्प बसा गडे... विसरा ते," आवाजात मार्दव आणून आलेस्याने विनवणी केली.

"नाही, मी तुझ्यावर ठपका देत नाही, सहज तोंडून शब्द बाहेर पडले... तसं का घडलं हे आता मला समजतंय... पण प्रथम—आता त्याबद्दल विचार केला तर हसू येतं—मला वाटलं की, पोलीसाच्या प्रकरणापायी माझ्यावर तू चिडलीस. त्या विचारानं मला फार यातना दिल्या. मला वाटलं की, तू मला एवढा दूरचा, परका मानतेस, की साधी मैत्रीची मदत माझ्याकडून स्वीकारायलासुद्धा तुला जड वाटतं... मला त्याचं फार दु:ख झालं... ते सारं आजीपायी घडत होतं ह्याची मला मुळीच शंका आली नाही, आलेस्या..."

आलेस्याच्या चेहऱ्यावर एकदम लाली पसरली.

"आजीपायी नव्हे! माझीच इच्छा नव्हती!" आवेगाने ती उद्गारली.

मी तिच्याकडे तिरपा कटाक्ष टाकला. तिचे किंचित खाली झुकलेले डोके व विशुद्ध, नाजुक चेहरा मला दिसला. केवळ आत्ता माझ्या ध्यानात आले की, तीसुद्धा रोडावली होती आणि तिच्या डोळ्यांखाली

निळसर वर्तुळे उमटली होती. मी तिच्याकडे टक लावून पहात असल्याचे तिला जाणवले व तिने वर पाहिले, पण तात्काळ डोळे खाली वळविले आणि तोंड वळवून लाजरे स्मित केले.

"तुला का इच्छा नव्हती, आलेस्या? का?" मी विचारले. भावनावेगाने माझा आवाज कापत होता. तिचा हात पकडून मी तिला थांबविले.

बाणासारख्या सरळ अशा एका लांबलचक, अरुंद वाटेवरून आम्ही जंगलातून चाललो होतो. आमच्या दुतर्फा उंच, सडपातळ पाईनची झाडे उभी होती. त्यांच्या सुगंधी फांद्यांनी खूप दूरपर्यंत आमच्यावर कमान धरली होती. मावळत्या सूर्यकिरणांनी बोडक्या बुंध्यांना किरमिजी रंग माखला होता...

"का? का, आलेस्या?" दबत्या आवाजात मी तिला पुन्हा पुन्हा विचारीत होतो, तिच्या हातावरील माझी पकड जास्त आवळत होतो.

"मला शक्य झालं नाही... भीती वाटत होती," अस्फुटपणे आलेस्या म्हणाली. "दैवापासून पळून जाता येईल असं मला वाटलं होतं... पण आता... आता..."

तिचा श्वास घुसमटला आणि अचानक तिने माझ्या गळ्याभोवती हातांची गच्च मिठी घातली. तिच्या जलद, कापऱ्या दबत्या आवाजाचा जळता गोडवा माझ्या ओठांना जाणवला:

"आता मला पर्वा नाही, मुळीच पर्वा नाही! कारण माझं तुझ्यावर प्रेम आहे लाडक्या, माझ्या सुखा, माझ्या प्राणा!"

ती मला अधिकच बिलगली. तिच्या रसरशीत, उबदार कायेची थरथर माझ्या हातांना जाणवत होती, माझ्या छातीशी तिचे हृदय वेगात स्पंदत होते. तिच्या आवेगपूर्ण चुंबनांची कडक मदिरेप्रमाणे माझ्यावर धुंदी चढली, माझ्यात अजून आजाराचा अशक्तपणा होता, आणि माझा स्वतःवरील ताबा सुटू लागला.

"आलेस्या, देवाखातर, नको... सोड मला," तिच्या मिठीतून स्वतःला सोडवून घेण्याचा प्रयत्न करीत मी म्हणालो: "आता मला भीती वाटतेय... स्वतःचीच भीती वाटतेय... सोड मला, आलेस्या."

तिने स्वतःचा चेहरा वर उचलला. त्यावर धुंद मंद स्मित उजळले.

"घाबरू नकोस माझ्या लाडक्या," वर्णन करण्यास अशक्य अशा मधुरपणे आणि हृदयस्पर्शी धिटाईने ती म्हणाली. "मी तुला कधीही दोषी ठरवणार नाही, कुणाचाही मत्सर करणार नाही... फक्त एवढंच सांग: माझ्यावर प्रेम करतोस ना?"

"होय आलेस्या, होय. केव्हाचा मी तुझ्या प्रेमात पडलोय, घट्ट प्रेमात पडलोय. पण... माझं आणखी चुंबन घेऊ नको... मी दुबळा बनतोय, माझं डोकं गरगरतंय, मला स्वतःची खात्री वाटत नाही..."

तिच्या ओठांनी माझ्या ओठांचे प्रदीर्घ, झिणझिणणारे मधुर चुंबन घेतले आणि तिचे शब्द ऐकण्याऐवजी मी तर्काने जाणले:

"तर मग घाबरू नको आणि कशाबद्दलही इतःपर विचार करू नको... आजचा दिवस आपला आहे आणि तो कुणीही आपल्यापासून हिरावून घेऊ शकणार नाही..."

आणि ती संपूर्ण रात्र एक जादूमय परीकथा बनली. चंद्र उगवला आणि जंगलाला त्याने अद्भुत ठिपक्यांनी व गूढ रंगांनी माखून टाकले. गाठाळलेल्या बुंध्यांवर, वाकडचा फांद्यांवर आणि शेवाळाच्या मऊ गालीचावर चांदण्याचे फिकट निळे ठिपके पडले. भोजाच्या झाडांच्या सडपातळ बुंध्यांच्या रूपरेषा ठळकपणे उठून दिसत होत्या, तर त्यांची विरळ पाने रुपेरी जाळीत अवगुंठित झाल्याप्रमाणे भासत होती. पाईनच्या कमानदार फांद्यांमधून जेथे चांदण्याला आत घुसणे अशक्य ठरले होते, तेथे अंधार पूर्ण व अभेद्य होता. फक्त एकच प्रकाश-शलाका मधोमध भेदून पार जमिनीपर्यंत पोहोचली होती—झाडांची दुतर्फा रांग आणि सरळ पाऊलवाट तिने उजळून काढली होती. जणू वनदेवतांनी ओबेरॉन व तितानियाच्या उत्सवी मिरवणुकीसाठी तो रस्ता बनविला होता असे भासत होते. त्या सजीव, हसऱ्या आख्यायिकेमधून आम्ही हातात हात गुंफून चालत होतो. सुखाच्या अतिवर्षावापायी आणि जंगलातील भयाण स्तब्धतेपायी, आमच्या तोंडून एकही शब्द बाहेर फुटत नव्हता.

"लाडक्या, मी पूर्ण विसरून गेले होते की, तुला लौकर घरी गेलं पाहिजे," आलेस्या अचानक म्हणाली. "किती नीच आहे मी! तू नुकता आजारातून उठला आहेस आणि मी तुला अजून जंगलात थांबवून धरलंय."

मी तिला मिठी मारली, तिच्या काळ्या केसांवरून रुमाल किंचित मागे सारला व अगदी अस्फुट आवाजात तिच्या कानात विचारले:

"तुला पश्चात्ताप होत नाही ना, आलेस्या? खेद नाही वाटत?"

तिने सावकाशपणे डोके हलविले.

"नाही, नाही... नंतर काहीही घडलं तरी मी पश्चात्ताप करून घेणार नाही. मला खूप छान वाटतंय..."

"काहीतरी नंतर निश्चित घडणार?"

माझ्या परिचयाची झालेली गूढ भीती तिच्या डोळ्यांमध्ये चमकलेली मी पाहिली.

"होय, नक्की... आठवतं, किलवरच्या राणीबद्दल मी तुला बोलले होते? ती किलवरची राणी म्हणजे मी आणि पत्त्यांनी भाकीत केलेलं संकट माझ्यावर कोसळेल... तुला माहीत आहे, मी तुला विनंती करणार होते की, तू आमच्याकडे यायचं कायमचं थांबव. तेवढ्यात तू आजारी पडलास आणि मी तुला जवळजवळ पंधरवडाभर पाहिलं नाही... आणि तुझ्याबद्दल मला एवढी विलक्षण ओढ लागली, एवढ्या दुःखानं मला घेरलं, की तुझ्या संगतीत निदान मिनिटभर रहावं म्हणून जगातली कोणतीही वस्तू द्यायला माझी तयारी होती... तेव्हा मी निर्णय केला. विचार केला, जे होईल ते होईल, पण मी माझा आनंद कुणालाही देणार नाही..."

"तुझं बरोबर आहे, आलेस्या. माझ्या बाबतीत तसंच झालं," तिच्या कानशीलांवर माझे ओठ ठेकवीत मी म्हणालो. "जोवर तुझा वियोग घडला नव्हता, तोवर माझं तुझ्यावर प्रेम जडल्याचं मला ठाऊक नव्हतं. कुणी म्हटलंय ते काही खोटं नाही: वारा आगीला जे करतो, तेच वियोग प्रेमाच्या बाबतीत घडवतो; छोट्या प्रेमाला तो विझवतो, पण मोठ्या प्रेमाला आणखीच भडकवतो."

"काय म्हणालास तू? परत सांग, परत सांग," आलेस्या म्हणाली.

ते वचन कुणाचे मला माहीत नाही, पण मी ते पुन्हा म्हटले. आलेस्या विचारमग्न बनली आणि तिच्या ओठांच्या हालचालीवरून मला दिसले की, माझ्या शब्दांचा ती पुनरुच्चार करीत होती.

तिच्या वर उचललेल्या चेहऱ्याकडे, चांदण्याची चमक दर्शविणाऱ्या

तिच्या टपोऱ्या काळ्या डोळ्यांकडे, मी निरखून पाहिले आणि आगामी अशुभाच्या पुसट जाणीवेने अचानक माझे काळीज गोठून गेले.

११

आमची भाबडी, चित्ताकर्षक प्रेमाची परीकथा जवळजवळ महिनाभर चालू होती. ते झळाळते सूर्यास्त, मधाच्या आणि फुलांच्या दरवळाने भरलेल्या, ताज्या टवटवीत आणि पाखरांच्या किलबिलाटाने भरलेल्या, त्या दवमाखल्या सकाळी, उबदार आणि सुस्ती आणणारे ते जूनमधील आळसभरले दिवस–आलेस्याच्या अद्भुत प्रतिमेबरोबर ह्या सर्व गोष्टी माझ्या अंतःकरणात अजून ठळकपणे वसताहेत... त्या काळात कंटाळ्याने, थकव्याने अथवा कायम भटकंती करण्याच्या इच्छेने माझ्या काळजात मुळीच प्रवेश केला नव्हता. एखाद्या रानटी देवाप्रमाणे अथवा तरण्याताठ्या बळकट जनावराप्रमाणे, मी प्रकाशात व उबेत मनसोक्त डुंबत होतो, जीवनाच्या जाणीवपूर्ण आनंदात आणि माझ्या निवांत, निकोप शारीरिक सुखात डुंबत होतो.

मी आजारातून बरा झाल्यानंतर म्हातारी मानुयलीखा फार तुसडी बनली होती, माझा उघड तिरस्कार करू लागली होती आणि जेव्हा मी झोपडीत बसलेला असे, तेव्हा भांड्यांची आदळआपट करू लागली होती, म्हणून मी व आलेस्या रानातच भेटणे श्रेयस्कर मानू लागलो होतो... हिरव्या पाईन वृक्षांचे भव्य सौंदर्य आमच्या निर्मळ प्रेमाला मौल्यवान सजावटीची पार्श्वभूमी देत होते.

दर दिवसागणिक मी वाढत्या आश्चर्याने पहात होतो की, रानात वाढलेल्या आणि निरक्षर असलेल्या आलेस्याला संवेदनाक्षम नाजुकपणाची व खास जन्मजात चतुर वागण्याची कला अवगत होती. प्रेमाचे काही थेट, रांगडे पैलू घाबरट, कलात्मक स्वभावांना नेहमीच काही प्रमाणात किळसवाणे वाटतात. पण त्यांना कसे टाळावे ह्याची आलेस्याला उत्तम जाण होती, आणि अत्यंत भाबड्या चतुरपणे ते हे काम पार पाडायची, त्यामुळे एकाही किळसवाण्या तुलनेने अथवा विपरीत क्षणाने आमच्या नात्याचा अपमान घडला नाही.

दरम्यान माझ्या जाण्याचा दिवस जवळ येत चालला होता. वस्तुतः

पेरेब्रोदमधील माझी अधिकृत कामे संपली होती व शहरात परतण्याचे मी मुद्दाम लांबणीवर टाकत होतो. आलेस्याला त्याबद्दल अजून चकार शब्दाने मी बोललो नव्हतो आणि माझ्या आगामी प्रयाणाची बातमी ऐकल्यानंतर तिची कोणती प्रतिक्रिया घडेल, ह्याबद्दल नुसती कल्पना करायलासुद्धा मी भीत होतो. मी संकटात पडलो होतो. सवय एव्हाना माझ्यात खोल मुरली होती. दररोज आलेस्याला भेटणे, तिचा मधुर आवाज व खळाळते हसणे ऐकणे, तिच्या स्पर्शाचा आनंद लुटणे – ह्या गोष्टी नुसत्या गरजेपेक्षाही जास्त आवश्यक बनल्या होत्या. जेव्हा पावसामुळे आम्हाला भेटणे अशक्य ठरायचे अशा दुर्मिळ दिवशी मला एकाकी वाटायचे, जणू माझ्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाची गोष्ट कुणी माझ्यापासून हिरावून घेतली असे भासायचे. कोणताही उद्योग कंटाळवाणा आणि निरर्थक वाटायचा; जंगलाची, प्रकाशाची आणि उबेची, आलेस्याचा मधुर परिचित चेहरा पाहण्याची मला तीव्र ओढ लागायची.

आलेस्याशी लग्न करण्याचा विचार माझ्या मनात वारंवार येऊ लागला होता. सर्वांत प्रथम ही कल्पना कधीमधी डोक्यात यायची, आमच्या नात्यावरील शक्य असा अखेरचा प्रामाणिक उपाय म्हणून. फक्त एक परिस्थिती मला ह्या विचारापासून परावृत्त करायची: ऐटबाज पोषाख करून माझ्या दिवाणखान्यात माझ्या सहकाऱ्यांच्या बायकांबरोबर आलेस्या गप्पा मारीत बसलीय, असे चित्र डोळ्यांसमोर आणण्याचा धीर मला होत नसे. आख्यायिकांनी आणि गूढतेने भरलेल्या जुन्या अरण्याच्या आकर्षक पार्श्वभूमीवरून आलेस्याला दुसरीकडे नेणे अशक्य वाटे.

पण माझ्या प्रयाणाचा दिवस जसजसा जवळ येत चालला, तसतसे खोल दुःखाने आणि एकाकीपणाच्या वाढत्या भीतीने मला घेरले. आलेस्याशी लग्न करण्याचा माझा निर्धार प्रतिदिनी पक्का बनत होता आणि तसे करण्यात मी समाजाला धाडसी आव्हान देत होतो, असे मला वाटेनासे झाले होते. "चांगली आणि शिकलेली माणसं शिंपीणींशी आणि मोलकरणींशी लग्न करतात ना?" मी स्वतःचे सांत्वन करायचा. "आणि आयुष्याच्या अखेरीपर्यंत छान एकत्र राहतात, स्वतःच्या निर्णयापायी पदरी पडलेल्या दैवाचे आभार मानतात. इतरांपेक्षा मी दुर्दैवी थोडाच ठरेन?"

जूनच्या मध्यास एके दिवशी, बहरलेल्या झुडुपांमधून वळसे घेत जाणाऱ्या अरुंद पाऊलवाटेच्या टोकाशी मी नेहमीप्रमाणे आलेस्याची वाट पहात उभा होतो. तिची हलकी, जलद पावले मी दुरून ओळखली.

"नमस्कार, माझ्या लाडक्या," मला आलिंगन देत आलेस्या म्हणाली. तिला धाप लागली होती. "खूप वेळ वाट पहावी लागली? मी मोठ्या मुष्कीलीनं सुटका करून घेतली... आजीबरोबर जोरदार भांडण झालं."

"अजून ती शांत झाली नाही?"

"छे:! म्हणते, 'त्याच्यापायी तुझा नाश होणार... तुझ्याबरोबर मजा मारेल आणि मग टाकून देईल. त्याचं तुझ्यावर मुळीच प्रेम नाही...'"

"ती माझ्याबद्दल असं म्हणाली?"

"तुझ्याबद्दल, लाडक्या... पण माझा तिच्या एकाही शब्दावर विश्वास नाही."

"तिला सगळं माहीत आहे?"

"नक्की सांगता येणार नाही... बहुधा माहीत आहे. मी मात्र ह्याबद्दल तिच्याशी मुळीच बोलत नाही. ती स्वत:च तर्कानं जाणते. कशाला ह्याबद्दल उगीच विचार करायचा... चल."

पांढऱ्या फुलांनी लगडलेली एक फांदी तिने तोडली व केसांमध्ये खोवली. सायंकालीन सूर्याने गुलाबी छटा दिलेल्या पाऊलवाटेवरून आम्ही रमतगमत चालू लागलो.

आदल्या रात्री मी ठरविले होते की, ह्या संध्याकाळी काय वाट्टेल त्या परिस्थितीत सगळे सांगून टाकायचे. पण एका विचित्र भीतीने माझी जीभ बांधून टाकली. माझ्या प्रयाणाबद्दल आणि तिच्याशी लग्न करण्याच्या माझ्या निर्णयाबद्दल मी सांगितले, तर आलेस्याचा माझ्यावर विश्वास बसेल अथवा नाही, याबद्दल मला शंका वाटत होती. तिच्यावर मी करीत असलेल्या पहिल्या आघाताची वेदना कमी जाणवावी म्हणून केवळ मी लग्नाचा प्रस्ताव मांडतोय, असे तर ती समजणार नाही? "त्या सोलपटलेल्या मेपलच्या झाडाशी जाताच मी सुरुवात करतो," मी स्वत:शी म्हणालो. आम्ही त्या झाडापाशी आलो आणि मनातील

खळबळीपायी माझा चेहरा फिका पडला; बोलण्यासाठी मी खोल श्वास घेतला, पण अनपेक्षितपणे माझे धैर्य गळाले, माझ्या छातीत धडधड वाढली आणि तोंडात थंडगार संवेदना झाल्या. "सत्तावीस ही माझी सुदैवी संख्या आहे," काही मिनिटांनंतर मी विचार केला. "मी सत्तावीसपर्यंत आकडे मोजेन आणि मग— " आणि मी मनात आकडे मोजू लगलो, पण सत्तावीसपर्यंत पोहोचल्यानंतर मला जाणवले की, माझा निर्धार अजून पक्का झाला नव्हता. "नाही," मी स्वतःला बजावले, "त्यापेक्षा साठपर्यंत मोजेन, म्हणजे बरोबर एक मिनिट होईल आणि मग मी नक्की सुरुवात करीन."

"आज तुला काय झालंय?" एकदम आलेस्याने विचारले. "तू कसल्यातरी अप्रिय गोष्टीचा विचार करतो आहेस. काय झालंय?"

तेव्हा मी बोललो, पण तो सूर मलाच तिरस्करणीय वाटला. जणू काही क्षुल्लक प्रश्नाची मी चर्चा करतोय अशा कृत्रिम, अनैसर्गिक बेपर्वाईने मी बोललो.

"खरोखरच एक छोटी अप्रिय बाब आहे... तू बरोबर ओळखलंस, आलेस्या... माझी इथली नोकरी संपलीय आणि मला साहेब लोक शहरात परत बोलावताहेत."

मी हलकेच आलेस्याकडे तिरपा कटाक्ष टाकला. तिच्या चेहऱ्यावरील लाली एकदम ओसरली आणि तिचे ओठ थरथरले. पण तिने एका शब्दाने मला उत्तर केले नाही. काही मिनिटे मी तिच्याबरोबर मुकाट चालत राहिलो. गवतावर नाकतोडे जोरात ओरडत होते आणि दूरवर एका पक्ष्याचा एकसुरी टाहो ऐकू येत होता.

"अर्थात, आलेस्या, तुला स्वतःलाच समजतं," मी परत बोलू लागलो, "मला इथंच राहणं सोयीस्कर नाही आणि रहायला कुठंही जागा नाही. शिवाय नोकरीकडं दुर्लक्ष करून चालणार नाही..."

"नाही... ह्याबाबत बोलायचंच कारण नाही," आलेस्या शांतपणे म्हणाली, पण तिच्या आवाजातील निर्जीवपणा मला जाणवला आणि कसेसेच झाले. "जर नोकरी आहे, तर अर्थातच... गेलं पाहिजे..."

ती झाडापाशी थांबली व बुंध्याला पाठ टेकून उभी राहिली. तिचा चेहरा फिका पडला होता, हात निर्जीवपणे लोंबत होते, तिच्या ओठांवर

अगदी केविलवाणे, वेदनादायी स्मित होते. तिची ती पांढरी पडलेली मुद्रा बघून मी घाबरलो. मी तिच्यापाशी धावलो आणि तिचे हात घट्ट धरले.

"आलेस्या... काय झालं तुला? आलेस्या... लाडके!"

"काही नाही... मला माफ करा... जाईल हे. जरा... डोकं गरगरलं..."

तिने स्वतःचा हात सोडवून न घेता प्रयत्नपूर्वक एक पाऊल पुढे टाकले.

"आलेस्या, आता तू माझ्याबद्दल फार वाईट मत करून घेतलं असणार," मी दुखावून म्हणालो. "शरम वाटली पाहिजे! तुला टाकून मी जाऊ शकेन असं वाटलं कसं तुला? नाही, माझ्या लाडके. मी एवढ्याकरताच हा विषय काढला, कारण आजच तुझ्या आजीशी भेटून तिला सांगणार आहे की, तू माझी बायको होणार आहेस."

माझ्या शब्दांचे आलेस्याला मुळीच आश्चर्य वाटले नाही. मला हे मुळीच अपेक्षित नव्हते.

"तुझी बायको?" ती सावकाशपणे म्हणाली आणि खिन्नपणे तिने मान हलविली. "नाही, लाडक्या वान्या, हे शक्य नाही!"

"का शक्य नाही, आलेस्या? का?"

"नाही, नाही... तुला स्वतःलाच माहीत आहे की, ह्याबद्दल विचार करणंसुद्धा हास्यास्पद आहे. मी कसली तुझी बायको होणार? तू मोठ्या घरचा, हुशार, शिकलेला, आणि मी? मला वाचतासुद्धा येत नाही, कसं वागावं माहीत नाही... माझ्यामुळं तुझी फक्त बेअब्रू होईल..."

"हा सगळा मूर्खपणा आहे, आलेस्या!" मी जोरदार निषेध केला. "सहा महिन्यांनंतर तुझी तुला तू ओळखू येणार नाहीस. तुझ्यात किती जन्मजात बुद्धिमत्ता आणि निरीक्षणशक्ती सामावलीय, ह्याची तुला कल्पना नाही. आपण दोघं एकत्र मिळून खूप चांगली पुस्तकं वाचू, चांगल्या, विद्वान माणसांच्या ओळखी करून घेऊ, दोघं मिळून सारं जग बघू, आलेस्या... आत्ता हातात हात गुंफून चालतोय तसे म्हातार-

पणापर्यंत, मरणापर्यंत, एकमेकांच्या हातात हात घालून चालू आणि तुझी मला लाज वाटणार नाही, तर तुझा अभिमान वाटेल आणि तुझा मी कृतज्ञ राहीन!"

माझ्या आवेशपूर्ण भाषणानंतर आलेस्याने भावभराने माझा हात दाबला, पण ती स्वतःच्या मताला घट्ट चिकटून राहिली.

"पण एवढ्या एकच गोष्टीवर कुठं संपतंय? तुला कदाचित अजून माहीत नाही? मी तुला कधी बोलले नाही... मला बाप नाही... मी अनौरस आहे..."

"पुरे कर, आलेस्या... मला ह्याची मुळीच पर्वा नाही. जर तू मला माझ्या आई-वडिलांपेक्षा जास्त प्रिय वाटतेस, सगळ्या जगापेक्षा जास्त प्रिय वाटतेस, तर तुझ्या सग्यासोयऱ्यांशी मला काय करायचंय? नाही, ह्या सगळ्या क्षुल्लक बाबी आहेत, बाष्कळ वटवटी आहेत!"

आलेस्याने हळूच अत्यंत लाडिकपणे माझ्या खांद्याला खांदा घासला.

"लाडक्या... ह्याबद्दल तू मुळातच चर्चा सुरू केली नसतीस तर जास्त बरं झालं असतं... तू तरुण आहेस, स्वतंत्र आहेस... सबंध आयुष्यभर तुझे हात-पाय बांधून ठेवण्याची बुद्धी मला कशी होईल?.. नंतर कदाचित तुला दुसरी एखादी आवडली तर? तेव्हा तुला मी नजरे-समोर नकोशी होईन, मी तुला लग्नाची संमती दिली त्या घटकेच्या नावानं बोटं मोडशील. रागावू नको, माझ्या लाडक्या!" तिचे हे शब्द मला आवडत नव्हते हे माझ्या मुद्रेवरून ताडून ती विनवणीच्या सुरात म्हणाली. "तुला दुखवायची माझी इच्छा नाही. मी फक्त तुझ्या सुखाचा विचार करतेय. शिवाय, तू अखेरीस आजीला विसरलास. तूच विचार कर, तिला एकटीला मी इथं टाकून देणं चांगलं ठरेल?"

"...आजी आपल्यापाशी राहील. (कबूल करतो, आजीच्या विचारानं मला जोरात धक्का बसला.) जर तिला आपल्याबरोबर रहायचं नसेल, तर कुठल्याही शहरात तसल्या घरांची व्यवस्था आहे... त्यांना भिक्षा-घरं म्हणतात... तिथं म्हाताऱ्यांना चांगली विश्रांती मिळते आणि त्यांची काळजी वाहतात..."

"छे:, काय बोलतोस! ती जंगलातून कुठंही दुसरीकडं जाणार नाही. ती लोकांना घाबरते."

"तर मग चांगलं काय ह्याचा तू स्वतःच विचार कर, आलेस्या. माझी किंवा आजीची, ह्यांपैकी एकाची तुला निवड करावी लागणार. मात्र एक लक्षात ठेव–तुझ्याविना माझं आयुष्य फार भयानक होईल!"

"माझ्या लाडक्या!" अत्यंत हळुवारपणे आलेस्या म्हणाली. "प्रथम तुझ्या ह्या केवळ शब्दांबद्दल तुझे आभार मानते... माझ्या काळजाला तू ऊब दिलीस... तरीही मी तुझ्याशी लग्न करणार नाही... जर मी तुला खरंच हवी असेन, तर तशीच तुझ्याबरोबर येईन... मात्र कृपा करून घाई करू नको, माझी धांदल उडवू नको. मला दोन दिवसांची मुदत दे, मी ह्याचा नीट विचार करीन... आजीशीसुद्धा मला बोललं पाहिजे."

"हे बघ आलेस्या," माझ्या डोक्यात एक नवी कल्पना आली. "कदाचित, तू पुन्हा... चर्चला भितेस?"

मला वाटते, ह्याच प्रश्नाने मी सुरुवात करायला पाहिजे होते. आलेस्याशी जवळजवळ रोज मी वाद घालत होतो, त्यांना अवगत असलेल्या जादूच्या शक्तींमुळे त्यांच्या घराण्यावर असलेल्या तथाकथित शापाच्या खोटेपणाबाबत तिची खात्री पटवायचा प्रयत्न करीत होतो. प्रत्येक रशियन बुद्धिजीवी हा काही प्रमाणात प्रबोधनकार आहे. गेल्या काही दशकांमधील रशियन साहित्याने हा गुण आमच्या रक्तात भिनविला आहे. जर आलेस्या अत्यंत धार्मिक वृत्तीची असती, जर कडक उपास-तापास पाळत असती व चर्चमधील एकही पूजा चुकवीत नसती, तर तिच्या धर्मश्रद्धेची मी टिंगल केली असती–थोडीशी, कारण मी स्वतः धार्मिक प्रवृत्तीचा होतो–आणि तिच्यात चौकस, टीकात्म बुद्धी निर्माण करण्याचा प्रयत्न केला असता. पण वस्तुस्थिती अशी होती की, काळ्या शक्तींबरोबरचा सहयोग आणि देवाशी फारकत ती ठाम व भाबड्या निष्ठेने कबूल करीत होती, देवाचा उल्लेख करायला सुद्धा भीत होती.

तिच्या भाबड्या श्रद्धा नाहीशा करण्याचे माझे प्रयत्न अयशस्वी ठरले होते. तिच्या गूढ आणि घातकी जीवितकार्यावरील आत्यंतिक श्रद्धेसमोर माझ्या तर्कांच्या, माझ्या उपहासाच्या– कधी कधी रांगड्या व क्रूर–पार ठिकऱ्या उडाल्या होत्या.

"तुला चर्चची भीती वाटते, आलेस्या?" मी परत विचारले.

मुकाटपणे तिने डोके खाली घातले.

"तुला वाटतं, देव तुझा स्वीकार करणार नाही?" वाढत्या आवेशाने मी बोलू लागलो. "'तुझ्यासाठी दया त्याच्यापाशी शिल्लक नाही? ज्याच्याकडं लक्षावधी देवदूतांचं नेतृत्व होतं असा तो देव, स्वतः पृथ्वीवर उतरला आणि सगळ्या मानवांच्या मुक्तीसाठी भयानक, लज्जास्पद मरण त्यानं पत्करलं, तो तुझ्यावर दया करणार नाही? ज्यानं अत्यंत नीच स्त्रीच्या पश्चात्तापाचा तिटकारा केला नाही आणि दरोडेखोर खुन्याला त्याच दिवशी स्वर्गात भेटायचं वचन दिलं?.."

ह्या सगळ्यात आलेस्याला नवीन काही नव्हते–आम्ही ह्यावर पूर्वी बोललो होतो. पण ह्यावेळी ती माझे बोलणे नुसते ऐकायलाही तयार नव्हती. झटक्यात तिने स्वतःच्या डोक्यावरील रुमाल ओढला, त्याचा बोळा केला व माझ्या तोंडावर फेकला. एक मजेदार झगडा सुरू झाला. मी तिच्या केसांमधील फुलांचा गुच्छ खेचायचा प्रयत्न केला. मला प्रतिकार करताना ती खाली पडली, पडताना तिने स्वतःबरोबर मला ओढले व हसत हसत धपापणारे तिचे विलग ओलसर ओठ माझ्या ओठांवर टेकविले.

त्या रात्री खूप उशीरा, निरोप घेऊन आम्ही एकमेकांपासून खूप दूर गेल्यानंतर, अचानक आलेस्याची हाक मी ऐकली:

"वान्या! जरा थांब... तुला काहीतरी सांगायचंय!"

मी मागे वळलो व तिच्या भेटीला गेलो. आलेस्या लगबगीने माझ्यापाशी धावत आली. आकाशात चंद्राची नवी रुपेरी कोर चमकत होती आणि तिच्या उजेडात आलेस्याच्या डोळ्यातील टपोरे अश्रू मी पाहिले.

"आलेस्या, काय झालं?" घाबरून मी विचारले.

तिने माझे हात पकडले आणि आळीपाळीने त्यांची चुंबने घेतली.

"लाडक्या... तू किती चांगला आहेस! किती उदार आहेस!" कापऱ्या आवाजात ती बोलत होती. "आत्ता जाता जाता मी विचार केला: किती माझ्यावर प्रेम करतोस!.. तुला आवडेल असं काहीतरी करण्याची माझी फार फार इच्छा आहे."

"आलेस्या... माझ्या लाडक्या पोरी, शांत हो..."

"ऐक माझं, मला सांग," ती पुढे म्हणाली, "जर कधी मी चर्च-मध्ये गेले, तर तुला खूप आवडेल? मात्र खरं, अगदी खरं सांग."

मी विचारात पडलो. अचानक माझ्या डोक्यात भाबडी शंका डो-कावली: ह्यातून काही संकट तर कोसळायचं नाही ना?

"गप्प काय राहिलास? लौकर बोल, तुला ह्यामुळं आनंद होईल किंवा काहीच वाटणार नाही?"

"कसं सांगू तुला, आलेस्या?" मी अडखळत बोलू लागलो. "होय, ह्यामुळं मला आनंद होईल. मी अनेकदा तुला बोललोय की, पुरुषाने एक वेळ धर्मावर विश्वास नाही ठेवला, शंका काढल्या किंवा टिंगल केली, तरी चालतं. पण बाईनं... बाईनं निर्विवाद धार्मिक असलं पाहिजे. ज्या साध्या आणि नाजुक विश्वासानं ती देवाच्या आधीन होते, त्यात काहीतरी हृदयस्पर्शी, स्त्रीसुलभ आणि सुंदर आहे असं मला वा-टतं."

मी गप्प झालो. आलेस्यासुद्धा गप्प राहिली. माझ्या छातीशी डोके टेकून ती उभी होती.

"कशाबद्दल तू मला हे विचारलंस?" मी कुतूहलाने विचारले.

ती दचकली.

"सहज... सहज विचारलं... तू लक्ष देऊ नको. अच्छा, लाड-क्या. उद्या ये."

ती नाहीशी झाली. माझ्यापासून झपझप दूर जाणाऱ्या पावलांचा आवाज ऐकत, अंधाराकडे टक लावून पहात मी आणखी खूप वेळ तेथे उभा राहिलो. अचानक भयानक संकटाच्या चाहुलीने मला घेरले. आले-स्याच्या पाठोपाठ धावावे, तिला गाठून विनवावे, चर्चला जाऊ नको अशी तिला विनंती करावी, गरज पडली तर मागणी करावी, अशी मला तीव्र इच्छा झाली. पण मी माझी ऊर्मी दाबली व मला आठवते की, घरी परतायच्या वाटेवरून चालताना मोठ्यांदा म्हणालो:

"अहो प्रिय महाशय, माझ्या लाडक्या वान्या, शकुन-अपशकुनांवर विश्वास ठेवण्याची तुम्हालाच बाधा झालीय!"

देवा! तेव्हा माझ्या हृदयातील अंधुक हाकेला मी का ऐकले नाही? आता तिच्यावर माझा नितांत विश्वास बसवलाय! हृदयात नि-

र्माण झालेल्या क्षणिक, गुप्त, भविष्यकाळाबद्दलच्या चाहुली कधीही खोट्या ठरत नाहीत.

१२

आमच्या भेटीनंतरचा दिवस नेमका त्रिमूर्ती रविवार होता. त्या वर्षी हा सण नेमका हुतात्मा तीमोफी दिनादिवशी आला होता व लोकापवादानुसार ते दुष्काळाचे चिन्ह होते. पेरेब्रोद खेड्यात चर्च होते, पण पाद्री नव्हता आणि लेंट सणाच्या दिवशी व इतर प्रमुख सणांच्या दिवशी वोल्चे खेड्यातून एक पाद्री पूजेसाठी यायचा.

त्या दिवशी काही कामानिमित्त मला शेजारच्या गावी जायचे होते व हवेत अजून गारवा होता, तोवरच सकाळी आठ वाजता मी घोड्यावरून निघालो होतो. माझ्या अशा सफरींसाठी मी पूर्वीच एक सात-आठ वर्षांचा छोटा घोडा विकत घेतला होता. स्थानिक पैदाशीमधील तो सामान्य घोडा होता, पण त्याच्या पूर्वीच्या मालकाने, जमीन सर्वेक्षकाने, त्याची काळजीपूर्वक जोपासना केली होती. घोड्याचे नाव होते तारान्चिक. बळकट, घाटदार पायांच्या, केसाळ झुलुपाखाली चमकणाऱ्या रागीट व अविश्वासू डोळ्यांच्या आणि घट्ट ओठ मिटणाऱ्या ह्या छान जनावराच्या मी प्रेमात पडलो होतो. त्याचा रंग दुर्मिळ आणि मजेदार होता: राखाडी उंदरासारखा. पण त्याच्या फऱ्यावर पांढरे-काळे ठिपके होते.

मला सबंध खेडे ओलांडावे लागले. चर्च आणि खाणावळ यांच्या दरम्यानचा भलामोठा हिरवा चौक वोलोशा, झूल्या, पेचालोवका ह्या शेजारच्या खेड्यांमधील सणानिमित्त बायका-मुलांसकट आलेल्या शेतकऱ्यांच्या गाड्यांनी भरून गेला होता. गाड्या माणसांनी खच्चून भरल्या होत्या. सकाळची वेळ असूनही व कडक कायदे असूनही, अनेकजण एव्हाना झिंगलेले होते (सणासुदीला पूर्वीचा गुत्तेवाला स्रूल रात्रीच्या वेळी गुपचूप वोदका विकायचा). सकाळी वारा पडला होता, उकडत होते. हवेत दमटपणा होता आणि दिवसा असह्य उकाड्याची लक्षणे होती. रुपेरी धुळीने झाकलेल्या तापल्या आकाशात एकही ढग दिसत नव्हता.

गावातील काम आटोपून मी खाणावळीत गेलो, यहुदी पद्धतीने बनविलेले मासळीचे जेवण भयानक गढूळ बीयरबरोबर पोटात घाईने ढकलले आणि घराकडे परत निघालो. पण लोहारशाळेजवळून जाताना मला आठवण झाली की, तारान्चिकच्या पुढच्या डाव्या पायाचा नाल ढिला झाला होता आणि तो नीट करण्यासाठी मी थांबलो. त्यात माझा दीड तास मोडला आणि पेरेब्रोदमध्ये मी दुपारी चार ते पाचच्या सुमारास पोहोचलो.

झिंगलेल्या मस्तवाल माणसांनी चौक गजबजला होता. धक्काबुक्की करणाऱ्या आणि एकमेकांना चिरडणाऱ्या गिऱ्हाईकांनी खाणावळीचे आवार अक्षरशः दुथडी भरून वाहात होते. शेजारच्या खेड्यांमधून आलेल्या पाहुण्यांबरोबर मिसळून पेरेब्रोदचे शेतकरी गाड्यांच्या सावल्यांमध्ये बसले होते. सगळीकडे मागे झुकलेली डोकी व उंच केलेल्या बाटल्या दिसत होत्या. एकही माणूस शुद्धीवर नव्हता. एकूण धुंदी अशा टोकाला पोहोचली होती, जेव्हा शेतकरी स्वतःच्या दारू पिण्याच्या अतिरेकी फुशारक्या मारू लागतो, जेव्हा तो झुलू लागतो आणि मान डोलावण्याऐवजी मांड्यांमधून वाकतो, गुडघे वाकवतो आणि अचानक तोल सुटून मागे झोकांडतो. निर्विकारपणे गवत चघळणाऱ्या घोड्यांच्या पायांशी पोरे हुंदडत व किंचाळत होती. स्वतःच्या पायांवर जेमतेम उभी राहू शकणारी, आक्रोश करणारी व शिव्या घालणारी एखादी बाई तिच्या तुफान झिंगलेल्या नवऱ्याच्या बाहीला ओढत घरी घेऊन जाण्याच्या प्रयत्नात असलेली अधूनमधून दिसत होती... कुंपणाच्या सावलीत सुमारे वीस शेतकरी स्त्री-पुरुषांनी एका आंधळ्या गायकाभोवती कोंडाळे केले होते. त्याचा कापरा खर्ज आणि त्याला मिळणारी एकसुरी वाद्याची साथ, एकूण गोंगाटामधून स्पष्टपणे ऐकू येत होते. पोवाड्याचे परिचित शब्द मी ऐकले :

अहो, सूर्य मावळतीला बुडाला
रात्र काळोखी पडली.
अहो, तुर्कांच्या झुंडी धावून आल्या
काळ्या मेघावानी नरकातल्या...

पोचायेव मठ सरळ हल्ल्याने घेता येईना, तेव्हा तुर्कांनी दगाबाजीचा कसा अवलंब केला होता, ह्याबाबत तो पोवाडा होता. दारूची भुकटी भरलेली एक प्रचंड मेणबत्ती त्यांनी मठाला भेट म्हणून पाठवून दिली. बारा बैलांच्या जोडयांनी ओढलेल्या गाडीतून ती मेणबत्ती धाडण्यात आली होती आणि आनंदित झालेले संन्यासी त्या मेणबत्तीला पोचायेव मेरीच्या तसबिरीसमोर पेटविण्याच्या बेतात होते, पण देवाने तो हिडीस गुन्हा घडू दिला नाही.

म्हाताऱ्या उपासकाला स्वप्न पडले :
ती मेणबत्ती घ्यायची नाही,
मोकळ्या मैदानात घेऊन जायची
तलवारीने तिची खांडोळी करायची.

संन्याशांनी तसे केले :

मोकळ्या मैदानात तिला घेऊन गेले,
खांडोळी तिची करू लागले,
आतून तिच्या गोळ्या आणि गोळे
चहू दिशांना विखरू लागले...

वोदका, कांदे, मेंढकातडी कोट, घरची तंबाखू आणि मानवी घाम ह्यांच्या संमिश्र उग्र दर्पाने तापली हवा काठोकाठ भरून गेली होती. गर्दीतून काळजीपूर्वक वाट काढताना आणि बेचैन तारान्चिकचा लगाम सतत ओढताना, चारही बाजूंनी लोकांच्या दुष्ट, चौकस नजरा माझ्याकडे पहात असल्याचे मला जाणवले. रीतीच्या अगदी विरुद्ध, कुणीही डोक्यावरील टोपी काढत नव्हता, पण माझ्या आगमनासरशी गोंगाट थोडा कमी व्हायचा. अचानक जमावातून एक झिंगलेली आरोळी उमटली; मला शब्द समजले नाहीत, पण त्यानंतर एक बारीक हशा पिकला. एका घाबरलेल्या बाईचा आवाज त्या ओरडणाऱ्याला थोपवू पहात होता :

"चूप बैस, मूर्खा... काय ओरडतोस! ऐकेल..."

"ऐकलं तर माझं काय बिघडतंय?" शेतकरी उर्मटपणे पुढे म्हणाला. "तो काय माझा साहेब आहे? तो फक्त जंगलात स्वतःच्या...

. . . .

एक लांबलचक, गलिच्छ वाक्य हवेत उमटले आणि त्याच्याबरोबर जबरदस्त हशा उसळला. मी पटकन घोडा वळविला आणि माझ्या चाबकाची मूठ घट्ट पकडली. विचाराला थारा न देणाऱ्या आणि कुणालाही न भिणाऱ्या आंधळ्या संतापाने मला पछाडले. अचानक एक विचित्र वेदनादायी विचार मनात चमकून गेला: "माझ्या आयुष्यात हे सगळं केव्हातरी खूप खूप वर्षांपूर्वी घडून गेलंय... असाच सूर्य तापत होता... असाच लोकांच्या गजबजाटानं चौक भरून गेला होता... असाच संतापानं आंधळा होऊन मी मागं वळलो होतो... पण हे कुठं घडलं होतं? केव्हा?.." मी चाबूक खाली केला व घराकडे दौड मारली.

यार्मोला मंदपणे स्वयंपाकघरातून बाहेर आला, त्याने माझ्याकडून घोडा घेतला व रांगडेपणाने म्हणाला:

"मालक, मारीनोवस्की इस्टेटीचे व्यवस्थापक तुमच्या खोलीत बसलेत."

तो पुढे आणखी काहीतरी बोलू इच्छित होता, काहीतरी महत्त्वाचे व मला न आवडणारे असे काही सांगू इच्छित होता, असे मला जाणवले. त्याच्या चेहऱ्यावर दुष्ट हास्याची रेषा चमकून गेल्याचा मला भास झाला. मी मुद्दाम दारात घोटाळलो व त्याच्याकडे वळून पाहिले. पण एव्हाना तो तोंड फिरवून लगाम ओढत होता आणि घोडा मान ताणून अनिच्छेने त्याच्या मागून जात होता.

शेजारील इस्टेटीचा व्यवस्थापक माझ्या खोलीत बसलेला मला आढळला – निकिता नझारीच मीश्चेन्को. प्रचंड तांबूस चौकटचांचा राखाडी कोट, निळसर गवताच्या रंगाची अरुंद विजार आणि लालभडक टाय, असा त्याचा पोषाख होता. त्याच्या तेलकट केसांना मधोमध भांग पाडलेला होता व पर्शियन फुलांचा त्याला घमघमाट येत होता. मला पाहताच तो ताडकन उठला आणि झुकून अभिवादन करण्याऐवजी साक्षात कमरेत अर्धा वाकू लागला व स्मित करताना तोंडातील खालच्या-वरच्या पांढरट हिरड्यांचे दर्शन घडवू लागला.

"नमस्ते, साहेब," निकिता नझारीच आदरपूर्वक म्हणाला. "आपल्याला भेटून फार आनंद झाला... मी इथं थेट चर्चच्या प्रार्थनेपासून तुमची वाट पाहतोय. तुम्हाला पाहून फार दिवस झाले, तुम्हाला भेटायची जीवाला अगदी ओढ लागली. आमच्याकडं कधीच का डोकावत नाही तुम्ही? आमच्या स्तेपानच्या तरुणी तुम्हाला हसतात."

एकदम कसलीतरी आठवण होऊन तो खो खो हसू लागला.

"आज काय गंमत झाली म्हणून सांगू!" हसण्याने घुसमटत तो उद्‌गारला. "हा-हा-हा-हा...! हसून हसून माझ्या बरगड्या मोडल्या!"

"काय घडलं? एवढी कसली गंमत?" स्वतःची नाराजी न लपविता मी तुसडेपणाने विचारले.

"चर्चमधल्या प्रार्थनेनंतर इथं फार मोठी दंगल माजली," हास्याच्या लाटा अधूनमधून उमटवीत निकिता पुढे बोलू लागला. "पेरेब्रोदच्या पोरी... नाही, देवाशपथ, नाही आवरत... पेरेब्रोदच्या पोरींनी इथं चौकात चेटकिणीला पकडलं... अर्थात त्या अडाणी खेडवळ पोरी तिला चेटकीण मानतात... त्यांनी तिला चांगली झोडपून काढली! तिला डांबर फासणार होत्या, पण ती त्यांच्या तावडीतून निसटली..."

एक भयानक विचार माझ्या मनात चमकून गेला. मी व्यवस्थापकावर धावून गेलो आणि भान हरपून त्याचे खांदे गच्च पकडले.

"काय बोलताय तुम्ही!" संतापाने मी ओरडलो. "थांबा हसायचे, नालायक! कोणत्या चेटकिणीबद्दल तुम्ही बोलताय?"

तो एकदम हसायचा थांबला आणि भेदरल्या विस्फारीत डोळ्यांनी माझ्याकडे पाहू लागला.

"मी... मला... खरंच माहीत नाही," गोंधळून चाचरत तो म्हणाला. "मला वाटतं, कुणी सामुयलीखा... मानुयलीखा... किंवा... थांबा... मानुयलीखाची मुलगी बहुधा? शेतकरी काहीतरी बडबडत होते, पण खरं तर मला आठवत नाही."

त्याने पाहिलेल्या आणि ऐकलेल्या सर्व गोष्टी मी त्याला आरंभापासून शेवटपर्यंत सांगायला लावल्या. तो मूर्खासारखा बोलत होता, असंबद्ध बोलत होता, तपशीलांचा घोटाळा करीत होता आणि दर मिनिटाला अधीरपणे प्रश्न विचारून, अथवा उद्‌गारून मी त्याच्या निवेदनात अड-

थळा आणत होतो, त्याला शिव्या घालत होतो. त्याच्यापासून मला फार थोडी हकीकत समजली. केवळ दोन महिन्यांनंतर, त्या दिवशी चर्चमधील प्रार्थनेला हजर असलेल्या जंगल अधिकाऱ्याच्या बायकोकडून, त्या दुर्दैवी घटनेचा संपूर्ण वृत्तांत मला समजला.

माझ्या आंतरिक संवेदनेने मला फसविले नव्हते. भीतीवर मात करून आलेस्या चर्चमध्ये गेली होती. प्रार्थना अर्धी संपल्यानंतर तिचे आगमन झाले होते. चर्चमध्ये एका आडोशापाशी ती उभी राहिली, पण तेथे हजर असलेल्या सर्व शेतकऱ्यांनी तात्काळ तिला पाहिले. सबंध पूजेभर बायका आपापसात कुजबुजत होत्या व तिच्याकडे कटाक्ष फेकत होत्या.

तरीसुद्धा, पूजा संपेपर्यंत चर्चमध्ये थांबून राहण्याचा आलेस्याने धीर केला. कदाचित तिला त्या शत्रुत्वाच्या नजरांचा अर्थ समजला नाही, अथवा अभिमानापायी तिने त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. पण जेव्हा ती चर्च-बाहेर पडली, तेव्हा बायकांच्या एका घोळक्याने तिला कुंपणापाशी वेढा घातला. दर मिनिटागणिक बायकांची संख्या वाढत होती आणि आलेस्या-भोवतीचा वेढा आवळत चालला होता. प्रथम भेदरलेल्या आलेस्याकडे त्या बाया उर्मटपणे पहात होत्या. मग हेटाळणीच्या आरोळ्यांचा, तिखट शब्दांचा, शिव्यांचा वर्षाव सुरू झाला, जोडीला हशा उमटत होता. वेगवेगळ्या आरोळ्यांचे कानठळ्या बसविणाऱ्या गोंगाटात रूपांतर झाले आणि बायकांच्या रागात आणखी भर पडली. त्या भयानक सजीव कड्याला तोडण्याचा आलेस्याने अनेकदा प्रयत्न केले, पण तिला परत परत मध्यभागी ढकलण्यात आले. अचानक जमावामागून एक म्हातारी किंचाळली: "कुलटेला डांबर माखा!" (युक्रेनमध्ये एखाद्या मुलीच्या घराच्या कुंपणालासुद्धा डांबर माखणे तिच्या दृष्टीने अत्यंत मानहानीचे समजले जाते.) त्या संतापल्या बायकांच्या डोक्यांवर तात्काळ डांबराची बादली व कुंचला अवतरले आणि हातोहात त्यांना पुढे देण्यात आले.

संताप, भीती आणि निराशा ह्यांनी घेरलेल्या आलेस्याने एका बाईवर झडप घालून तिला खाली पाडले. मारामारी जुंपली, डझनावरी बायका जमिनीवर झोंबाझोंबी करू लागल्या. केवळ चमत्काराने आलेस्याने त्या गुंतवळ्यातून स्वतःची सुटका करून घेतली आणि ती रस्त्यावरून

पळू लागली. तिचा रुमाल हरवला होता, अंगावरचा पोषाख फाटला होता व तिच्या देहाचे नग्न दर्शन ठायी ठायी घडत होते. लोकांचा जमाव तिला शिव्या घालत होता, हसत होता, टवाळी करीत होता व तिच्यावर दगड फेकत होता. फार थोड्यांनी तिचा पाठलाग केला, पण लौकरच ते मागे पडले... सुमारे पन्नास पावले धावल्यानंतर आलेस्या थांबली, तिचा फिकट पडलेला, खरचटलेला रक्ताळ चेहरा तिने जमावाकडे वळविला आणि एवढ्या मोठ्यांदा ती ओरडली, की तिचा प्रत्येक शब्द चौकापर्यंत स्पष्ट ऐकू गेला :

"ठीक आहे! ह्याबद्दल तुम्ही परत एकदा माझी आठवण कराल! तुम्हाला ह्याबद्दल धाय मोकलून रडावं लागेल!"

तेथे हजर असलेल्या त्या बाईने मला सांगितले की आलेस्याने ती धमकी एवढ्या त्वेषाने, ठाम निर्धाराने, भविष्यवाणीसारखी उच्चारली, की क्षणभर सबंध जमाव भीतीने थिजून गेला; पण ती स्थिती केवळ क्षणभर टिकली आणि दुसऱ्याच क्षणी नव्या शिव्यांचा वर्षाव झाला.

मी पुन्हा सांगतो की, त्या घटनेचे अनेक तपशील मला नंतर खूप उशीरा समजले. मीश्चेन्कोची हकीकत शेवटपर्यंत ऐकण्याची माझ्यात ना ताकद होती, ना धीर होता. मी विचार केला की, घोड्याचे खोगीर उतरवायला यार्मोलाला अजून सवड मिळाली नसेल आणि स्तंभित झालेल्या व्यवस्थापकाला खोलीतच सोडून मी बाहेर अंगणात धावलो. माझा अंदाज खरा ठरला—यार्मोला अजून तारान्चिकला कुंपणाजवळ फेऱ्या मारायला लावत होता. मी पटकन घोड्याला लगाम घातला, खोगीराचे पट्टे आवळले आणि पुन्हा झिंगलेला माणसांचा जमाव बघायला नको म्हणून आडवाटेने जंगलाकडे दौड मारली.

१३

ह्या बेभान दौडीमधील माझी अवस्था वर्णनातीत आहे. मी कुठे दौडत होतो आणि का, ह्याचासुद्धा काही क्षणी मला विसर पडत होता. काहीतरी कधीही दुरुस्त न करण्यासारखे, विचित्र आणि भयंकर घडले होते अशी मला पुसट जाणीव होत होती. अत्यंत भयानक दुःस्वप्नात

काहीवेळा तुम्हाला एक खोल निराधार भीती ग्रासते, त्याप्रमाणे ती जाणीव मला ग्रासत होती. आणि विचित्र म्हणजे घोड्याच्या टापांच्या आवाजाबरोबर माझ्या मनात त्या आंधळया गायकाच्या ओळी घुमत होत्या :

> अहो, तुर्कांच्या झुंडी धावून आल्या
> काळया मेघावानी नरकातल्या...

मानुयलीखाच्या झोपडीपर्यंत थेट जाणाऱ्या अरुंद पाऊलवाटेपाशी पोहोचल्यानंतर मी तारान्चिकवरून खाली उतरलो व त्याचा लगाम धरून चालू लागलो. त्याच्या खोगीराच्या कपड्याच्या कडा व जोखडाखालील शरीराचे भाग फेसाने माखले होते. दिवसभराची तीव्र उष्णता आणि वेगवान घोडदौड, ह्यामुळे माझ्या डोक्यात घण बसत होते. एखाद्या प्रचंड पंपामधून रक्त डोक्याकडे लोटले जात होते असे भासत होते.

कुंपणाशी घोड्याला बांधून मी झोपडीत चालत गेलो. प्रथम आलेस्या तेथे नाही असे मला वाटले व भीतीने काळीज गोठले. पण मिनिटानंतर मला ती दिसली : भिंतीकडे तोंड वळवून, उशीत डोके खुपसून, ती बिछान्यावर निजली होती. दार उघडल्याचा आवाज झाला तरी तिने डोके वळविले नाही.

तिच्या बिछान्याशेजारी जमिनीवर बसलेल्या मानुयलीखाने उठायची धडपड केली आणि माझ्या दिशेने हातवारे केले :

"हळू! आवाज करू नको, नीचा!" दरडावणीच्या सुरात ती पुटपुटली व माझ्यापाशी आली. माझ्या डोळयांना स्वतःचे मंद झालेले थंड डोळे भिडवून ती संतापाने फूत्कारली : "काय? खेळून झालं तुझं लाडक्या?"

"ऐक आजीबाई," मी कठोरपणे उत्तरलो, "हिशेब घालण्याची आणि दोष हुडकत बसण्याची ही वेळ नव्हे. आलेस्या कशी आहे?"

"श्शू... हळू! बेशुद्ध पडलीय आलेस्या... नको तिथं तुझं नाक खुपसलं नसतंस, भलभलत्या गोष्टी पोरीपाशी बरळला नसतास, तर असं संकट कधी कोसळलं नसतं. आणि मी मूर्ख तिकडं बघूनही डोळेझाक करत राहिले... खरं तर माझ्या काळजाला अशुभाची चाहूल लागली

होती... त्याच दिवशी चाहूल लागली होती, जेव्हा तू आमच्या झोपडीत बळजबरीनं प्रथम घुसलास. काय? तू आता मला सांगणार की, चर्चमध्ये जायचा तू तिला आग्रह केला नाहीस?" अचानक म्हातारी माझ्यावर कडाडली. तिचा चेहरा तिटकाऱ्याने विद्रूप बनला होता. "तूच केलंस ना हरामखोरा? खोटं बोलू नको आणि कोल्हचाच्या शेपटीसारखा हलू नको, बेशरम्या! तिला चर्चमध्ये पाठवण्याची तुला काय गरज होती?"

"मी तिला पाठवलं नाही, आजीबाई... शपथेवर सांगतो. तिलाच इच्छा होती."

"अरे दुष्टा, माझ्या कर्दनकाळा!" मानुयलीखाने हात उडविले. "तिथून पळत आली... चेहरा बघवत नव्हता, अंगावरच्या कपड्यांच्या चिंध्या झालेल्या... केस विसकटलेले... हकीकत सांगायला लागली... आणि कधी हसतेय, तर कधी रडतेय... साक्षात वेडी... बिछान्यावर आडवी झाली... सारखी रडायला लागली आणि मग मी बघितलं, तेव्हा तिला डुलकी लागली असं भासलं. मी मूर्ख म्हातारी आनंदले... मनाशी म्हटलं, झोपेत सगळं निघून जाईल, विसरेल. तिचा हात खाली लोंबताना दिसला... म्हटलं, हात नीट ठेवला पाहिजे, नाही तर बधीर होईल... तिच्या हाताला मी हात लावला तो काय... तापानं फणफणलेला... म्हणजे तिला ताप चढायला लागला होता... तासभर न थांबता बरळत होती, वेगानं आणि केविलवाणं... अवघ्या मिनिटापूर्वी गप्प झालीय. काय केलंस तू हे? तिची काय दशा बनवलीस तू?" निराशेच्या नव्या झटक्यात ती ओरडली.

अचानक तिच्या तपकिरी चेहऱ्यावर भयानक राक्षसी रडू उमटले: तिचे ओठ ताणले गेले व कोपऱ्यांशी लोंबू लागले, तिच्या चेहऱ्यावरील सर्व स्नायू ताणले गेले व थरथरू लागले, तिच्या भुवया उंचावल्या व कपाळावर खोल रेषांचे जाळे उमटले आणि वाटाण्याएवढ्या आकाराचे अश्रू तिच्या डोळ्यांमधून विलक्षण वेगाने ओघळू लागले. डोके हातांनी गच्च आवळून व हातांचे कोपरे टेबलावर टेकवून ती सबंध देहाला मागे-पुढे झोके देऊ लागली.

"मा-झ्या... पो-री-ग! ला-ड-क्या... ना... ती... ग! काय... ग... तुझी... दशा झाली!"

"विव्हळू नको, म्हातारे!" मी उर्मटपणे तिला अडविले. "तिला जागी करशील!"

म्हातारी गप्प झाली, पण तिची मुद्रा तशीच भयाण राहिली, तिचे डोलणे चालू राहिले आणि टपोरी आसवे टेबलावर टपकत राहिली... अशी सुमारे दहा मिनिटे उलटली. मी मानुयलीखापाशी बसून होतो आणि खिडकीच्या तावदानावर पुन्हा पुन्हा आपटणाऱ्या माशीची एकसुरी गुणगुण दुःखाने ऐकत होतो...

"आजी!" आलेस्याचा दुबळा, अगदी अस्पष्ट आवाज अचानक उमटला. "आजी, आपल्याकडं कोण आलंय?"

मानुयलीखा तात्काळ धडपडत पलंगाकडे गेली व विव्हळू लागली:

"हाय... माझ्या लाडक्या नाती... ग! मला म्हातारीला फार दुःख होतंय ग!.."

"आजी, चूप रहा!" आलेस्या म्हणाली. तिच्या आवाजात केविलवाणी विनवणी व वेदना होती. "आपल्या झोपडीत कोण बसलंय?"

मी चोरपावलांनी तिच्या पलंगापाशी गेलो. माझ्या मनात माझ्या निकोप प्रकृतीबद्दल अपराधी जाणीव कुरतडत होती. आजारी माणसाच्या सान्निध्यात अशी जाणीव मनात नेहमी निर्माण होते.

"मी आहे, आलेस्या," खालच्या आवाजात मी म्हणालो. "मी नुकताच खेड्यातून घोड्यावरून आलो... सबंध सकाळ मी शहरात होतो... तुला खूप त्रास होतोय, आलेस्या?"

उशांमधून तोंड बाहेर न काढता तिने आपला उघडा हात मागे ताणला, जणू ती हवा चाचपडत होती. मी समजलो आणि माझ्या दोन्ही हातांमध्ये तिचा तापला हात पकडला. तिच्या शुभ्र नाजुक त्वचेवर एक मनगटापाशी व एक कोपरापाशी, असे दोन मोठे निळे डाग ठळकपणे दिसत होते.

"मा-झ्या ला-ड-क्या," मंदपणे, एकेक अक्षर कष्टाने उच्चारीत आलेस्या म्हणाली. "तुला... पाहण्याची... खूप इच्छा आहे माझी... पण शक्य नाही... माझा चेहरा त्यांनी... विद्रूप केलाय... आठ-

वतं... तुला... माझा चेहरा किती आवडायचा? खरंच, तुला आवडायचा ना लाडक्या?.. मला ह्याचा नेहमी खूप आनंद व्हायचा... आता तुला किळस येईल... माझा चेहरा बघून... म्हणून... माझी इच्छा नाही..."

"आलेस्या, मला क्षमा कर," तिच्या कानांपाशी वाकून मी पुटपुटलो.

तिच्या तापलेल्या हाताने माझा हात खूप वेळ गच्च दाबून धरला.

"असं काय बोलतोस! लाडक्या, काय बोलतोस? असा विचार मनात आणायला तुला शरम कशी वाटत नाही? इथं तुझा काय अपराध? माझा एकटीचाच सगळा मूर्खपणा... कशाला मी जावं? खरंच? नाही लाडक्या, तू स्वतःला दोष देऊ नको..."

"मला परवानगी दे, आलेस्या... पण आधी वचन दे, की मी सांगीन तसं करशील..."

"वचन देते लाडक्या... काय पाहिजे तुला..."

"कृपा करून मला परवानगी दे... डॉक्टरना आणायला. तुला विनंती करतो! त्यानं सांगितलेले उपचार तू केलेच पाहिजेस अशी मी सक्ती करणार नाही. पण निदान माझ्यासाठी कबूल हो, आलेस्या."

"हाय... लाडक्या... कसल्या सापळ्यात तू मला पकडलंस! नाही, उलट माझं वचन न पाळण्याची तूच मला परवानगी दे. जर मी खरंच आजारी असते, अगदी मरणाच्या पंथाला लागले असते, तरी डॉक्टरला बोलावू दिलं नसतं. पण आत्ता मी आजारी थोडीच आहे? माझी ही अवस्था केवळ भीतीपायी झालीय, संध्याकाळपर्यंत सगळं जाईल निघून. आणि नाही गेलं, तर आजी मला रानफुलांचा अर्क देईल किंवा रासबेरींसकट चहा उकळून देईल. कशाला पाहिजे डॉक्टर? तूच माझा सर्वांत उत्तम डॉक्टर. बघ, तू आलास आणि मला ताबडतोब हलकं वाटू लागलं.... हाय, फक्त एकच गोष्ट वाईट: निदान एका डोळ्यानं तुझ्याकडं पहावंसं वाटतंय, पण भीती वाटते..."

मी अलगदपणे तिचे डोके उशीवरून उचलले. तिचा चेहरा तापामुळे लालबुंद बनला होता, तिच्या डोळ्यांमध्ये अनैसर्गिक चमक होती, तिचे तडकलेले ओठ थरथरत होते. तिच्या चेहऱ्यावर आणि मानेवर लांब

जखमांचे वळ उठले होते. तिच्या कपाळावर आणि डोळयांखाली खरचटण्याचे काळे डाग उमटले होते.

"माझ्याकडं पाहू नको... तुला विनवते... आता मी भयाण दिसते," माझ्या डोळयांवर हाताचा पंजा झाकण्याचा प्रयत्न करीत आलेस्या कळवळून पुटपुटली.

माझे अंत:करण करुणेने थबथबले. पांघरुणावर निपचित पडलेल्या तिच्या हातावर मी ओठ टेकले आणि प्रदीर्घ, सौम्य चुंबनांनी तिचा हात भरून टाकला. यापूर्वीही मी तिच्या हातांची चुंबने घेतली होती, पण तिने नेहमी लाजून हात ओढून घेतले होते. आता मात्र तिने माझ्या कुरवाळण्याला विरोध केला नाही, उलट तिचा दुसरा मोकळा हात माझ्या केसांवरून मायेने फिरत राहिला.

"तुला सारं माहीत आहे?" दबत्या आवाजात तिने विचारले.

मी मूकपणे डोके होकारार्थी हलविले. खरे तर निकिता नझारीचच्या निवेदनावरून मला सर्व हकीकत समजलेली नव्हती. माझी एवढीच इच्छा होती की, सकाळच्या घटनेची आठवण करून आलेस्याला पुन्हा मन:स्ताप घडू नये. तरीही, तिच्यावर घडलेल्या अत्याचाराच्या जाणीवेने माझ्या मनात अनावर संताप पेटला.

"अरेरे! का बरं मी तिथं हजर नव्हतो त्या वेळी!" ताठ बसत मी किंचाळलो आणि मुठी दाणदाण आपटल्या. "मी... मी..."

"पुरे आता... पुरे... चिडू नको लाडक्या," आलेस्याने मला आवरण्याचा दुबळा प्रयत्न केला.

केव्हापासून माझ्या कंठाशी दाटलेले आणि डोळयांना जाळणारे अश्रू आवरून धरणे इत:पर मला अशक्य ठरले. आलेस्याच्या खांद्यावर डोके टेकवून मी आवाज न करता गदगदून रडू लागलो.

"तू रडतोस? तू रडतोस?" तिच्या आवाजात आश्चर्य होते, हळुवारपणा होता, सहानुभूती होती. "माझ्या लाडक्या... अरे पुरे आता... थांब ना... स्वत:चा असा छळ करून घेऊ नको... तुझ्याजवळ मला खूप छान वाटतंय. आपण एकत्र आहोत तोवर रडायचं नाही. निदान शेवटचे दिवस मजेनं घालवू, म्हणजे वियोगाचं दु:ख जड जाणार नाही."

मी आश्चर्याने वर पाहिले. एक अंधुक अशुभाची भावना मनाला घेरू लागली.

"शेवटचे दिवस, आलेस्या? का–शेवटचे? कशाला आपण वेगळं व्हायचं?"

आलेस्याने डोळे मिटले व काही सेकंद ती गप्प राहिली.

"आपल्याला एकमेकांपासून वेगळं होणं आवश्यक आहे, वान्या," ती ठामपणे म्हणाली. "मी जराशी बरी झाले की, आजी आणि मी ताबडतोब इथून निघून जाऊ. यापुढं आम्ही इथं राहणं योग्य नाही..."

"तुला कशाची तरी भीती वाटते?"

"नाही, माझ्या लाडक्या, वेळ पडली तर मी कशालाही भिणार नाही. पण कशाला लोकांना पाप करायला लावायचं? तुला कदाचित माहीत नाही... पण तिथं पेरेब्रोदमध्ये रागाच्या आणि शरमेच्या भरात... मी धमकी घातली... आता जरासं काही वेडंवाकडं घडलं, तर ताबडतोब आमच्यावर आळ घालतील: गुरं मरू लागली किंवा कुणाचं घर जळलं–सगळ्याला आम्ही दोषी ठरू. आजी," मानुयली-खाकडे वळून आवाज चढवीत म्हणाली, "मी खरं बोलतेय ना?"

"तू काय म्हणालीस, नाती? मी ऐकलं नाही ग, कबूल करते!" पाय घासत म्हातारी जवळ आली आणि तिने कानावर हाताचा पंजा धरला.

"मी म्हणते, आता पेरेब्रोदवर काहीही संकट कोसळलं, तरी आपल्या दोघींच्या डोक्यांवर त्याचं खापर फोडतील!"

"होय, खरं ग पोरी, खरं... सगळा दोष आपल्यावर लादतील... आपल्याला शांतपणं जगू देणार नाहीत, आपल्या दोघींना इथून पळवून लावतील, नतद्रष्ट मेले... तेव्हा कसं त्यांनी मला खेड्यातून पळवून लावलं... काय? असंच घडलं होतं ना? मी धमकी दिली... अशीच रागाच्या भरात... एका मूर्ख बाईला... आणि नेमकं तिचं पोर मेलं! त्यात माझा काही एक अपराध नव्हता, पण नीच मला ठार मारायलाच निघाले होते... दगड मारायला लागले... त्यांच्यापासून मी धावत सुटले... तू लहान होतीस... तुला इजा होऊ नये म्हणून सांभाळत होते... विचार केला, खुशाल मला दगडांचा मार बसो, पण निर-

पराध पोरीला कशाबद्दल दुखवायचं? ... थोडक्यात, रानटी आहेत... फासावर चढवलं पाहिजे मेल्यांना!"

"कुठं जाणार तुम्ही? तुमचे कुठंही नातेवाईक नाहीत, ओळखीचे लोक नाहीत... शिवाय, नव्या जागी जम बसवायचा तर पैसे लागतील..."

"निभवू कसं तरी," आलेस्या बेफिकीरीने म्हणाली. "आजीजवळ पैसे मिळतील. तिनं साठवलेत थोडे."

"ते काय पैसे म्हणायचे!" पलंगापासून दूर जात म्हातारी नाराजीने उद्गारली. "आसवात भिजलेले थोडे कोपेक!"

"आलेस्या... आणि माझं काय? माझा विचारसुद्धा करत नाहीस?" आलेस्याविरुद्ध कडवट, वाईट संतापाने मी ओरडलो.

आलेस्या उठून बसली आणि मानुयलीखाच्या उपस्थितीची लाज न बाळगता तिने माझे डोके स्वतःच्या हातांमध्ये धरले व माझ्या कपाळाची आणि गालांची अनेकवार चुंबने घेतली.

"तुझ्याबद्दल तर मी सर्वांत जास्त विचार करतेय, माझ्या लाडक्या. फक्त... तू पाहतोस ना... आपण एकत्र राहणं नशीबात नाही!.. आठवतं तुला, मी तुझ्यावर पत्ते मांडले होते? तेव्हा त्यांनी सांगितलं होतं, तसंच सगळं घडलं. म्हणजे, दैवाला आपलं एकत्र सुख मान्य नाही... जर असं नसतं, तर मी कशाला घाबरले असते असं वाटतं तुला?"

"आलेस्या, परत तू स्वतःच्या दैवाबद्दल?" मी संयम सुटून ओरडलो. "नाही ठेवायचा मला त्यावर विश्वास... आणि कधीही विश्वास ठेवणार नाही!.."

"अरे नको, नको... असं बोलू नको," घाबरून आलेस्या पुटपुटली. "मी माझ्यासाठी नव्हे, लाडक्या, तुझ्यासाठी भिते. नाही, आता तू कृपया ह्यावर चर्चा करू नको."

निरर्थकपणे मी आलेस्याचे मन वळवायचा प्रयत्न केला, दैवाला किंवा रांगड्या, क्रूर माणसांना आमच्या सुखात बिब्बा घालता येणार नाही अशा आमच्या सुखी जीवनाचे चित्र मी तिच्यासमोर निष्कारण रेखाटले. आलेस्याने दुबळेपणाने माझे हात चुंबले आणि नकारार्थी डोके हलविले.

"नाही... नाही... नाही... मला माहीत आहे, मला दिसतंय," ती ठामपणे म्हणाली. "दु:खाशिवाय आपल्या वाट्याला काहीही येणार नाही... काहीही नाही..."

तिच्या ह्या भाबड्या हट्टापायी निराश होऊन गोंधळून, अखेर मी तिला विचारले:

"निदान तू केव्हा जाणार तो दिवस तरी मला सांगशील?"

आलेस्या विचारात पडली. तिच्या ओठांवर अचानक किंचित स्मित तरळले.

"ह्यावर मी तुला एक छोटी परीकथा सांगते... एकदा लांडगा जंगलातून पळत जात होता तेव्हा त्यानं सशाला पाहिलं आणि तो म्हणाला: 'सशा, सशा, मी तुला खाणार!' सशानं विनंती केली: 'लांडग्या, माझ्यावर दया कर, मला अजून जगायची इच्छा आहे, माझ्या घरी लहान बाळं आहेत!' लांडगा कबूल होईना. तेव्हा ससा म्हणाला: 'मग मला निदान आणखी तीन दिवस जिवंत राहू दे, नंतर खा. म्हणजे मरणं मला सोपं जाईल.' लांडग्यानं त्याला तीन दिवस दिले, खाल्लं नाही, पण सतत त्याच्यावर पहारा ठेवला. एक दिवस संपला, दुसरा दिवस संपला,. शेवटी तिसरा दिवसही संपत आला. 'आता तयार हो,' लांडगा म्हणाला, 'आता मी तुला खायला सुरुवात करतो.' इथं माझा ससा धाय मोकलून रडू लागला: 'अरे, लांडग्या, कशाला तू मला हे तीन दिवस दिलेस? त्यापेक्षा, पाहिलंस तेव्हाच ताबडतोब खाऊन टाकायचंस. कारण हे तीन दिवस मी जगलो नाही, नुसता थरथर कापत राहिलो!' माझ्या लाडक्या, त्या सशानं किती सत्य सांगितलं! तुला काय वाटतं?"

आगामी एकलेपणाच्या दु:खाची चाहूल लागून मी गप्प बसलो. आलेस्या अचानक उठली व बिछान्यावर बसली. तिचा चेहरा एकदम गंभीर बनला.

"वान्या, ऐक..." ती ठामपणे म्हणाली. "सांग मला, जोवर तू माझ्याबरोबर होतास, तोवर तू सुखी होतास? तुला छान वाटत होतं?"

"आलेस्या! तू आणखी विचारतेस!"

"थांब... माझी ओळख झाली म्हणून तुला पश्चात्ताप तर झाला नाही? माझ्या संगतीत असताना दुसऱ्या बाईबद्दलचा विचार तुझ्या कधी डोक्यात आला?"

"एक क्षणभरसुद्धा नाही! केवळ तुझ्याच उपस्थितीत नव्हे, तर मी एकटा असतानासुद्धा, फक्त तुझ्याविना दुसऱ्या कुणाचाही विचार माझ्या कधी मनात आला नाही."

"माझा तुला मत्सर वाटला? माझ्यावर तू कधी नाराज बनला होतास? माझ्या संगतीत तुला कधी कंटाळा आला?"

"कधीही नाही, आलेस्या! कधीही नाही!"

तिने तिचे दोन्ही हात माझ्या खांद्यांवर ठेवले आणि अवर्णनीय प्रेमाने माझ्या डोळ्यांमध्ये पाहिले.

"तर मग ध्यानात ठेव माझ्या लाडक्या, तू कधीही माझ्याबद्दल वाईट अथवा दुष्ट विचार मनात आणणार नाहीस," जणू काही माझ्या डोळ्यांमध्ये माझे भविष्य वाचत असल्याप्रमाणे ती ठाम सुरात म्हणाली. "आपण एकमेकांपासून वेगळे होऊ, तेव्हा पहिल्या काळात तुला खूप त्रास होईल, भयानक त्रास होईल... रडत बसशील, काय करावं सुचणार नाही. मग सगळं नाहीसं होईल, परत घडी बसेल. आणि दु:खाविना माझ्या आठवणी काढशील, तुला त्यात सुख वाटेल."

तिने परत उशीवर डोके टेकले आणि दुबळ्या आवाजात ती पुटपुटली:

"आता जा, माझ्या लाडक्या... घरी जा माझ्या कबूतरा... मी थोडी थकलेय. थांब... माझं चुंबन घे... तू आजीला भिऊ नको... ती परवानगी देईल. आजी, परवानगी देतेस ना?"

"होय, आता निरोप घेतोस तर रीतीनं घे," मानुयलीखा नाराजीने बडबडली. "माझ्यासमोर काय लपवताय?.. केव्हाच माहीत आहे..."

"माझं इथं चुंबन घे, आणि इथं आणखी... आणि इथं," स्वत:च्या डोळ्यांवर, गालांवर, तोंडावर बोट ठेवीत आलेस्या म्हणत होती.

"आलेस्या! तू माझा असा काही निरोप घेते आहेस, जणू आपली पुन्हा कधी भेट होणार नाही!" मी घाबरून ओरडलो.

"माहीत नाही, माहीत नाही, माझ्या लाडक्या. काहीही माहीत नाही. आता जा, देव तुझं रक्षण करो. नाही... थांब... आणखी एक मिनिट... माझ्यापाशी कान आण... मला कशाबद्दल वाईट वाटतंय माहीत आहे?" माझ्या गालांना ओठांचा स्पर्श करीत ती पुटपुटली. "तुझ्यापासून मला बाळ झालं नाही ह्याचं! आह्! किती आनंद झाला असता मला त्या गोष्टीचा!"

मानुयलीखाच्या संगतीने मी बाहेर पडलो. कंगोरेदार काळ्या मेघानें अर्धे आकाश झाकून टाकले होते, पण पश्चिमेकडे बुडणारा सूर्य अजून प्रकाशत होता. प्रकाश आणि आगामी अंधार ह्यांच्या मिश्रणात काहीतरी अशुभ होते. म्हातारीने डोळ्यांवर हाताचा आडोसा धरून वर पाहिले व सूचकपणे डोके हलविले.

"आज पेरेब्रोदवर वादळी पाऊस कोसळणार," ती ठाम स्वरात म्हणाली. "कदाचित गारासुद्धा पडतील!"

१४

मी पेरेब्रोदच्या जवळ पोहोचलो आणि तेवढ्यात अचानक रस्त्यावर धुळीचे लोट उठले. पावसाचे पहिले टपोरे, अवजड थेंब टपकले.

मानुयलीखा चुकली नव्हती. सबंध दिवसभर तापल्या, उकडत्या वातावरणात एकवटणारा वादळी पाऊस पेरेब्रोदवर सर्व ताकदीनिशी कोसळू लागला. विजा सतत चमकत होत्या, मेघगर्जनांमुळे माझ्या खिडक्यांच्या काचा खडखडत होत्या. संध्याकाळी आठाच्या सुमाराला काही मिनिटांपुरते वादळ शमले, पण पुन्हा त्याचे थैमान सुरू झाले. अचानक जुन्या घराच्या छपरावर आणि भिंतीवर तडतडाट ऐकू आला. मी खिडकीपाशी धावलो. मोठमोठ्या गारांचा ताडताड वर्षाव घडत होता. घराजवळच्या मलबेरीच्या झाडावर मी नजर टाकली. ते पूर्ण बोडके बनले होते, गारांच्या तडाख्यात त्याची सर्व पाने गळून पडली होती... खिडकीखालील अंधारात यार्मोलाची काळी आकृती मी पाहिली. झडपा बंद करण्यासाठी डोक्यावर व खांद्यांवर कोट पांघरून तो स्वयंपाकघरातून बाहेर धावत आला होता. पण त्याला फार उशीर झाला होता. बर्फाचा

एक भला मोठा तुकडा तावदानावर एवढ्या जोरात आपटला, की काचेच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या आणि माझ्या खोलीच्या फरशीपर्यंत काचेचे तुकडे येऊन पडले.

थकल्यामुळे मी कपडे न काढता तसाच बिछान्यावर आडवा झालो. मला वाटले होते की, त्या रात्री झोप येणे मला शक्य नसेल व सारी रात्र तळमळत काढावी लागणार आहे म्हणून मी कपडे काढले नव्हते आणि खोलीत येरझाऱ्या मारून स्वतःला दमवून नंतर झोपण्याचा माझा इरादा होता. पण अगदी विचित्र गोष्ट घडली. मी केवळ क्षणभरच डोळे मिटले असे मला वाटले होते; पण जेव्हा मी परत डोळे उघडले, तेव्हा झडपांच्या फटींमधून सूर्याची चकचकीत किरणे खोलीत तिरपी घुसली होती आणि त्यांच्या उजेडात असंख्य सोनेरी धूलीकण भिरभिरताना दिसत होते.

अत्यंत चिंताक्रांत मुद्रेने आणि अधीरपणे माझ्याकडे पहात यार्मोला बिछान्याशेजारी उभा होता. माझ्या जागे होण्याची तो खूप वेळापासून वाट पहात असावा.

"मालक," त्याच्या बसक्या आवाजात भीती जाणवत होती. "मालक, तुम्ही इथून ताबडतोब निघून जा."

मी पाय खाली सोडले व त्याच्याकडे आश्चर्याने पाहिले.

"निघून जाऊ? कुठं? कशाला? तुझं डोकं फिरलंय?"

"माझं डोकं मुळीच फिरलेलं नाही," यार्मोला फिस्कारला. "कालच्या गारांनी काय केलं माहीत आहे? निम्मी पिकं पायांनी तुडवावी तशी खलास झाली. एकडोळ्या माक्सिमची, कोझ्योलची, मूतची, प्रोकोपचूकची, गोर्दी ओलेफीरची... साल्या चेटकिणीनं राडा केला!.. वाट्टोळं होवो तिचं!"

क्षणार्धात मला कालची घटना संपूर्ण आठवली, आलेस्याने चर्चजवळ ओरडून दिलेली धमकी आणि तिला जाणवलेला धोका आठवला.

"आता सगळी जमात खवळलीय," यार्मोला पुढे सांगत होता. "सकाळपासून सगळे पिऊन तर्रर्र झालेत... आणि मालक, तुमच्याविरुद्ध वाईट वाईट गोष्टी ओरडताहेत... आमची माणसं कशी आहेत, तुम्हाला ठाऊक आहे? जर त्यांनी चेटकिणींना काही केलं तर ते ठीकच,

त्यांची लायकीच तशी! पण मालक, तुम्हाला मी एवढंच सांगतो: लौकरात लौकर पसार व्हा!"

म्हणजे आलेस्याची भीती खरी ठरली होती. आगामी संकटाची तिला व मानुयलीखाला मी ताबडतोब वर्दी देणे आवश्यक होते. घाई-घाईने मी कपडे केले, तोंडावर पाण्याचे सपकारे मारले आणि अर्ध्या तासानंतर एव्हाना मी सैतानी कोपऱ्याकडे वेगाने दौडत होतो.

चेटकिणीची झोपडी जसजशी जवळ येऊ लागली, तसतशी माझ्या मनात अंधुक, वेदनादायी चिंता वाढू लागली. एक नवे अनपेक्षित दुःख मला लौकरच अनुभवावे लागणार, असे मी स्वतःला बजावीत होतो.

वाळवंटी उताराला वळसा घालणारी वाट मी धावतच पार केली. झोपडीच्या खिडक्या उघड्या होत्या, दार उघडे होते.

"देवा! असं काय घडलं इथं?" गोठल्या काळजाने झोपडीत प्रवेश करीत मी पुटपुटलो.

झोपडी रिकामी होती. घाईघाईच्या प्रयाणानंतरचे करुण दृश्य तेथे दिसत होते. जमिनीवर घाणीचे व चिंध्यांचे ढीग पडले होते, पलंगाची रिती लाकडी चौकट कोपऱ्यात उभी होती...

माझे हृदय जड बनले होते, त्यात आसवे दाटत होती. मी झोप-डीतून बाहेर पडायच्या बेतात होतो, तेवढ्यात खिडकीच्या चौकटीत एक चकचकीत वस्तू लोंबत असलेली मला दिसली. ती मुद्दामच तेथे टांगली असावी. पोलेस्येमध्ये "पोवळे" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्वस्त लाल मण्यांची ती माळ होती. आलेस्याची, तिच्या नाजुक, उदार प्रेमाची आठवण देणारी तेवढी एकच वस्तू आता आठवणीदाखल माझ्या-पाशी उरली होती.

१८९८

इवान बूनिन

हलका निःश्वास

इवान बूनिन (१८७०-१९५३)–"आधुनिक काळातील सर्वोत्कृष्ट शैलीकार", मा. गोर्की यांनी बूनिनबद्दल लिहिले होते. ह्या शब्दांमध्ये मुळीच अतिशयोक्ती नव्हती. ललित गद्यलेखनात बूनिन खरेच अजोड होते. त्यांच्या लेखनकृती परिपूर्ण आणि सुंदर आहेत.

बूनिन यांचा गरीब जमीनदार कुटुंबात जन्म झाला. आर्लोव प्रांतातील एका छोट्या गावी त्यांचे बालपण गेले. बूनिन यांच्या शब्दात त्या प्रदेशात "अत्यंत संपन्न रशियन भाषा बनली आणि तिथूनच तुर्गेनेव व तल्स्तोय यांच्यासह बहुतेक सारे थोर रशियन लेखक निर्माण झाले."

बूनिन यांनी साहित्यप्रांतात प्रथम कवी म्हणून पाऊल टाकले आणि नंतर गद्याकडे मोहरा वळविला. पण जीवनाच्या अखेरीपर्यंत त्यांनी कविता लिहिल्या. त्यांच्या लेखणीतून केवळ अस्सल कविताच उतरल्या असे नव्हे, तर वेगवेगळ्या देशांमधील अनेक कवींच्या कवितांचे त्यांनी सुंदर अनुवाद केले.

रशियातील भटकंतींमधून आणि परदेश प्रवासांमधून बूनिन यांनी संपन्न जीवनानुभव गोळा केला. त्यामुळे लेखकाला स्वतःच्या लेखनविषयांची व्याप्ती बरीच वाढविता आली. त्यांच्या अनेक पुस्तकांमधून भांडवलशाही संस्कृतीवर कठोर प्रहार केलेले आढळतात.

महान ऑक्टोबर क्रांतीचे बूनिननी स्वागत केले नाही. १९२० साली त्यांनी फ्रान्सला स्थलांतर केले आणि आयुष्याच्या अखेरीपर्यंत तेथेच वास्तव्य केले. परदेशी राहूनसुद्धा बूनिन गाढे रशियन लेखक राहिले आणि पूर्वीप्रमाणेच मायदेशाच्या सौंदर्याचे व थोर रशियन माणसाचे स्वतःच्या साहित्यातून गोडवे गायले. मायदेशापासून दूर राहून लिहिलेल्या त्यांच्या कथा-कादंबऱ्यांमधून करुण दुःखाचा सूर उमटतो. रशियाबद्दल आणि स्वतःच्या माणसांबद्दल लेखकाला वाटणारे असीम प्रेम त्यांच्यातून ऐकू येते.

स्मशानात मातीच्या ताज्या ढिगावर ओकच्या लाकडाचा भक्कम, अवजड, गुळगुळीत क्रूस उभा आहे.

एप्रिलमध्ये दिवस मळभलेले असतात. पर्णहीन झाडांमधून ह्या प्रशस्त प्रांतिक स्मशानभूमीतील थडगी दूरवरूनसुद्धा दिसतात आणि थंडगार वारा क्रूसाच्या पायथ्याशी असलेल्या चिनी मातीच्या पुष्पचक्रात घूं घूं घुमतोय.

क्रूसावर चिनी मातीच्या बहिर्गोलावर एका हसतमुख, कमालीच्या जिवंत डोळ्यांच्या शाळकरी मुलीचे छायाचित्र आहे.

ही ओल्गा मेश्चेर्स्काया.

लहानपणी तपकिरी फ्रॉकवाल्या शाळकरी मुलींच्या घोळक्यात ती मुळीच वेगळी उठून दिसत नव्हती. ती सुंदर, श्रीमंत आणि सुदैवी मुलींपैकी एक मुलगी होती, हुशार होती, पण वात्रट होती आणि वर्ग-शिक्षिकेच्या धमक्यांना मुळीच भीक घालत नव्हती, याहून अधिक ति-च्याबद्दल काय सांगण्यासारखे आहे? आणि मग ती उमलू लागली, तिचा दर दिवसागणिक नव्हे तर दर तासागणिक विकास होऊ लागला. चौदाव्या वर्षी तिच्या बारीक कंबरेच्या आणि लांबसडक पायांच्या आकृ-तीवर ज्यांची मोहकता अजून मानवी शब्दांमध्ये व्यक्त झालेली नाही अशी स्तनमंडळे व इतर कमनीय गोलाकार उमटले. पंधराव्या वर्षी ती सुंदरी ठरली. तिच्या काही मैत्रिणी किती काळजीपूर्वक केशरचना करायच्या, स्वतःच्या दिसण्याची किती खबरदारी घ्यायच्या, प्रत्येक हालचाल किती तोलूनमापून करायच्या! पण तिला कशाचीच भीती नव्हती — ना बोटांवरील शाईच्या डागांची, ना लालबुंद चेहऱ्याची,

ना विस्कटलेल्या केसांची, ना धावता धावता अचानक पडल्यास उघ-ड्या पडणाऱ्या गुडघ्याची! गेल्या दोन वर्षांत ती इतर मुलींपेक्षा पूर्ण वेगळी ठरेल अशा सर्व गोष्टी तिने हळूहळू अगदी सहजपणे अवगत केल्या – डौल, सफाई, चपळता, डोळ्यांमध्ये तेजस्वी चमक... ओल्गा मेश्चेर्स्काया बॉलनृत्यांच्या वेळी जसे सुंदर नाचायची, तसे नाचणे कुणा-लाही जमत नसे; तिच्यासारखे स्केटिंग इतर कुणालाही यायचे नव्हते; नृत्यप्रसंगी तिच्याएवढी लोकप्रियता दुसऱ्या कुणालाही लाभायची नव्हती आणि का कोण जाणे, पण छोटया वर्गांचे तिच्यावर प्रेम होते तसे इतर कुणावरही नव्हते. नकळतपणे तिचे युवतीमध्ये रूपांतर घडले, नकळतपणे तिची शाळेत कीर्ती पसरली आणि अफवा उठू लागल्या की, ती चंचल होती, तिच्या चाहत्यांविना राहू शकत नव्हती, शाळेतील शेन्शीन ना-वाचा मुलगा तिच्या आकंठ प्रेमात पडला होता व तिचेही बहुधा त्याच्या-वर प्रेम होते, पण तिचे त्याच्याशी वागणे एवढे बेफिकीरीचे होते की त्याने एकदा आत्महत्येचा प्रयत्न केला होता म्हणे...

तिच्या शेवटच्या हिवाळ्यात ओल्गा मेश्चेर्स्काया आनंदी वागण्याच्या भरात पुरतीच वेडी बनली होती, असे शाळेत म्हणत. हिवाळ्यात भरपूर हिमवर्षाव झाला होता, स्वच्छ ऊन पडत होते, गोठविणारा गारठा होता. हिमाचे अवगुंठन पडलेल्या क्रीडांगणावरील फरच्या उंच झाडांपलि-कडे सूर्य लौकर मावळत होता; तो संथ आणि हसरा दिसायचा, दुसऱ्या दिवशी गोठविणारी थंडी व तेजस्वी ऊन पडण्याचे आश्वासन द्यायचा; सोबोर्नाया रस्त्यावर भटकंती करण्याच्या, शहरातील उद्यानात स्केटिंग करण्याच्या, सायंकालीन आकाशात गुलाबी रंग उधळण्याच्या, संगीताच्या, स्केटिंग करणाऱ्या घोळक्यांच्या तरंगत्या हालचालींच्या खात्री पटवायचा आणि ह्या सगळ्या गोष्टींमध्ये ओल्गा मेश्चेर्स्कायाएवढी बिन-धास्त, अत्यंत सुखी व्यक्ती दुसरी कुणीही नव्हती असे भासत होते. पण एक दिवस मधल्या सुटीत असेंब्ली हॉलमध्ये आनंदाने चीत्कारणाऱ्या पहिलीच्या वर्गातील मुलींच्या घोळक्यापासून जेव्हा ती पुढे धावत होती, तेव्हा अचानक तिला हेडमास्तरीणबाईंकडून बोलावणे आले. ती धावा-यची थांबली, तिने एक खोल श्वास घेतला, झटकन आणि एव्हाना खास स्त्रीसुलभ बनलेल्या हालचालीने केस सारखे केले, खांद्यावर एप्रनचे

कोपरे खेचून घेतले आणि चमकत्या डोळयांनी ती वरच्या मजल्यावर धावली. वयाने तरुण, पण केस पांढरे झालेल्या हेडमास्तरीणबाई हातात विणकामाच्या सुया धरून शांतपणे मेजापाशी बसल्या होत्या. त्यांच्या पाठीशी वरच्या बाजूस झारचे चित्र टांगलेले होते.

"नमस्ते, मादमोझेल मेश्चेस्कीया," विणकामावरील नजर वर न उचलता त्या फ्रेंचमध्ये म्हणाल्या. "तुमच्या वर्तनाबद्दल बोलण्यासाठी तुम्हाला मी इथं बोलावण्याची दुर्दैवानं ही काही पहिलीच वेळ नाही."

"मी ऐकतेय तुमचं, मादाम," टेबलापाशी येत ओल्गा उत्तरली. तिची नजर तेजस्वी आणि जिवंत होती, पण मुद्रेवर मात्र काहीही भाव नव्हता. केवळ तिलाच जमू शकायचे अशा सहजपणे आणि डौलाने तिने झुकून अभिवादन केले.

"तुम्ही माझं बोलणं नीट ऐकून घेणार नाही, दुर्दैवानं ह्याबाबत माझी एव्हाना खात्री पटलीय," हेडमास्तरीणबाई म्हणाल्या आणि लोकरीला त्यांनी झटका दिला. लोकरीचा गुंडा पॉलीश केलेल्या तक्तपोशीवर पडला आणि ओल्गा त्याच्याकडे कुतूहलाने पाहू लागली. हेडमास्तरीणबाईंनी नजर वर उचलली व त्या म्हणाल्या: "मी पुन्हा पुन्हा त्याच गोष्टी बोलणार नाही, विस्तारानं बोलणार नाही."

मेश्चेस्कीयाला ही अत्यंत स्वच्छ आणि प्रशस्त खोली खूप आवडायची. गारठ्याच्या दिवसात ऊब देणारा चकचकीत फरशांचा चुलाणा तेथे होता आणि मेजावरील लिलीची पांढरी फुले मंद सुवास पसरवीत होती. कुठल्यातरी आलीशान दालनात उभ्या असलेल्या तरुण झारच्या पूर्णाकार चित्राकडे तिने पाहिले, मग हेडमास्तरीणबाईंच्या व्यवस्थित कुरळ्या बनविलेल्या केसांमधल्या भांगावर नजर टाकली व अपेक्षापूर्वक पहात ती गप्प राहिली.

"तुम्ही आता लहान नाही," गर्भितपूर्वक हेडमास्तरीणबाई म्हणाल्या. त्यांच्या आवाजात हळूहळू चीड उमटू लागली होती.

"होय, मादाम," मेश्चेस्कीयाने साधेपणाने, अगदी उल्हसितपणे उत्तर दिले.

"पण अजून पूर्ण स्त्रीही नव्हे," अधिक सूचकपणे हेडमास्तरीणबाई म्हणाल्या आणि त्यांचा निस्तेज चेहरा शरमेने किंचित लाल बनला.

"सर्वात पहिली गोष्ट – काय ही केसांची पद्धत? ही मोठ्या बाईसारखी केशरचना आहे!"

"मादाम, माझे केस चांगले आहेत हा काही माझा दोष नव्हे," मेश्चेस्कीया उत्तरली व स्वतःच्या सुंदर रचलेल्या केसांना तिने दोन्ही हातांनी हलकासा स्पर्श केला.

"अस्सं, म्हणजे तुम्ही दोषी नाही!" हेडमास्तरीणबाई म्हणाल्या. "केशरचनेबाबत तुम्ही दोषी नाही, ह्या महागड्या कंगव्यांबाबत तुम्ही दोषी नाही, वीस रूबलच्या सँडल्सचा तुमच्या आई-वडिलांना भुर्दंड घालण्यात तुमचा दोष नाही! मी परत एकदा सांगत्ये, तुम्ही अजून फक्त एक शालेय विद्यार्थिनी आहात इकडं पूर्ण डोळेझाक करता आहात..."

आणि इथे मेश्चेस्कीयाने साधेपणा व शांतपणा न गमावता अचानक सभ्यपणे त्यांचे बोलणे तोडले:

"माफ करा मादाम, तुमची चूक होतेय. मी स्त्री आहे. आणि ह्याला जबाबदार कोण – माहीत आहे तुम्हाला? माझ्या बाबांचे मित्र आणि शेजारी, तुमचे बंधू अलेक्सेय मिखायलोविच माल्यूतिन. गेल्या उन्हाळ्यात खेड्यात ही गोष्ट घडली..."

ह्या संभाषणानंतर एक महिन्याने, एका अनाकर्षक चेहऱ्याच्या आणि सामान्य कुळातील दिसणाऱ्या, ओल्गा मेश्चेस्कीया ज्या समाजात वावरत होती त्या समाजाशी कोणताही संबंध नसलेल्या कझाक ऑफीसरने आगगाडीतून उतरून स्टेशनच्या फलाटावर लोकांच्या ऐन गर्दीत ओल्गावर गोळ्या झाडल्या. हेडमास्तरीणबाईंना अवाक् करणारा ओल्गाचा अविश्वसनीय कबुलीजबाब खरा ठरला. कझाक ऑफीसरने न्यायालयात निवेदन केले की, मेश्चेस्कीया त्याला भूल घालत होती, त्यांचे फार निकटचे संबंध होते, त्याच्याशी लग्न करण्याचे तिने त्याला वचन दिले होते आणि खुनाच्या दिवशी, तो नोवोचेर्कास्कला जाणार होता म्हणून त्याला निरोप द्यायला रेल्वे स्टेशनवर ती आली होती तेव्हा अचानक म्हणाली होती की, त्याच्यावर प्रेम करण्याचा विचार तिच्या मनाला कधीच शिवला नव्हता, लग्नाच्या सगळ्या चर्चा म्हणजे तिने त्याच्याशी

केलेला एक खेळ होता आणि माल्यूतिनबाबत तिने जेथे लिहिले होते ते तिच्या दैनंदिनीचे पान त्याला वाचायला दिले होते.

"त्या ओळी मी भराभरा वाचल्या आणि माझे वाचन पूर्ण होण्याची वाट पहात फलाटावर येरझाऱ्या घालणाऱ्या तिच्यावर मी तात्काळ गोळ्या झाडल्या," ऑफीसर म्हणाला. ही पहा दैनंदिनी, गेल्या वर्षीच्या १० जुलैला तिनं काय लिहिलं होतं पहा."

दैनंदिनीत पुढील मजकूर होता :

"आत्ता रात्रीचे जवळजवळ दोन वाजलेत. मला गाढ झोप लागली होती, पण तात्काळ जाग आली... आज मी स्त्री बनले! बाबा, आई आणि तोल्या सगळे शहरात गेले व मी एकटी राहिले. एकटी असल्याचा मला खूप आनंद झाला होता! सकाळी मी बागेत फिरले, मैदानात फिरले, जंगलात जाऊन आले. सर्व जगात मी फक्त एकटीच आहे असा मला भास झाला आणि आयुष्यात इतके छान कधीच नव्हते असे मला वाटले. दुपारी मी एकटीच जेवले, मग आख्खा तासभर पियानो वाजवला. संगीताच्या प्रभावाखाली मला वाटले की, मी अखंड जगत राहणार आणि माझ्याएवढी सुखी दुसरी कुणीही व्यक्ती असणार नाही. मग बाबांच्या अभ्यासिकेत मला झोप लागली. चार वाजता कात्याने मला जागे केले, म्हणाली की अलेक्सेय मिखायलोविच आलेत. त्यांना पाहून मला खूप आनंद झाला, त्यांचा पाहुणचार करायला मला खूप आवडले. देखण्या घोड्यांची जोडी जुंपलेल्या बग्गीतून ते आले होते. पोर्चमध्ये घोडे सारा वेळ उभे होते. पाऊस पडत होता म्हणून ते थांबले. संध्याकाळच्या दरम्यान रस्ते थोडे कोरडे होतील अशी त्यांना आशा होती. बाबा भेटले नाहीत म्हणून त्यांना खेद वाटला होता. पण माझ्याशी ते खूप उल्हासाने आणि आदबीने वागत होते, खूप काळापासून माझ्या प्रेमात पडले होते असा आव आणून थट्टा-विनोद करीत होते. चहापूर्वी जेव्हा आम्ही बागेत फिरलो, तेव्हा परत हवा फार सुरेख पडली होती, ओल्या बागेवर ऊन चमचमत होते, पण गारवा मात्र चांगलाच जाणवत होता. त्यांनी माझा दंड धरला आणि ते म्हणाले की, आम्ही फाऊस्त व मार्गारीता. त्यांचे वय छप्पन आहे, पण अजून ते खूप देखणे दिसतात आणि नेहमी रुबाबदार पोषाख करतात. फक्त ते केप घालून आले होते

हे मला आवडले नव्हते. इंग्लिश ओ-दे-कलोनचा त्यांना वास येत होता, त्यांचे काळे डोळे तरुण दिसत होते, मात्र मधोमध दुभंगलेली त्यांची ऐटदार दाढी संपूर्ण रुपेरी होती. काचेची तावदाने लावलेल्या व्हरांड्यात आम्ही चहा घेतला. मला काहीतरी अस्वस्थ वाटले म्हणून मी सोफ्यावर लवंडले आणि ते धूम्रपान करीत बसले. मग माझ्यापाशी येऊन बसले, परत गोड गोड गोष्टी बोलू लागले, मग माझा हात निरखू लागले व त्याची चुंबने घेऊ लागले. रेशमी रुमालाने मी माझा चेहरा झाकून घेतला होता आणि त्यांनी रुमालाआडून अनेकदा माझ्या ओठांची चुंबने घेतली... ते कसे घडले मला समजत नाही, मला वेड लागले असावे, मी तशी असेन असे मला कधीही वाटले नव्हते! आता मला एकच वाट मोकळी... मला त्यांच्याबद्दल अत्यंत किळस वाटतेय, सहन होत नाही! .."

ह्या एप्रिलच्या दिवसात शहर खूप स्वच्छ, कोरडे बनले होते, त्याच्या फरसबंदी शुभ्र रस्त्यांवरून चालणे सोपे आणि आल्हादक बनले होते. दर रविवारी चर्चनंतर शोकप्रदर्शक काळा पोषाख केलेली, नरम कातड्याचे काळे हातमोजे ल्यायलेली आणि काळ्या लाकडाच्या मुठीची छत्री घेतलेली एक छोट्या चणीची स्त्री सोबोर्नाया रस्त्यावरून शहराच्या बाहेरच्या दिशेने चालू लागते. धुराने काळवंडलेल्या अनेक लोहार-. शाळांनी वेढलेला आणि मैदानांमधून ताजा वारा जेथपर्यंत वाहात येतो असा घाणेरडा चौक ती ओलांडते; पुढे संन्याशांचा मठ आणि तुरुंग यांच्या दरम्यान आकाशात ढगांची पांढरी रेषा दिसते व वासंतिक शेतांचा भुरा पट्टा दिसतो. नंतर मठाच्या भिंतीलगत पाण्याच्या डबक्यांमधून वाट जाते, डावीकडे वळते आणि तेथे एक मोठे बैठे उद्यान आहे. त्याच्याभोवती पांढरे कुंपण आहे आणि फाटकावर पवित्र मेरी मातेचे चित्र आहे. ती छोटी स्त्री पटकन क्रूस-चिन्ह करते आणि सवयीनुसार मुख्य आळीमधून चालत जाते. ओकच्या लाकडाच्या क्रूसासमोरील बाकापर्यंत ती जाते आणि हलक्या बुटांमधील तिचे पाय व पातळ मोजांमधील तिचे हात जोवर गारठून बधीर होत नाहीत, तोवर त्या वासंतिक थंड्या वाऱ्यात तास दोन तास बसून राहते. गारव्यात पक्ष्यांची गोड गाणी ऐकताना आणि चिनी मातीच्या पुष्पचक्रामधून घुमणारा वाऱ्याचा आवाज

ऐकताना काहीवेळा तिच्या मनात येते की, समोरचे निःष्प्राण पुष्पचक्र डोळ्यांपुढे कधी दिसू नये म्हणून स्वतःचे निम्मे आयुष्यसुद्धा तिने दिले असते. ते पुष्पचक्र, तो फुगीर उंचवटा, तो ओकचा क्रूस! त्या क्रूसावरील चिनी मातीच्या चित्रावरून जिचे डोळे अमरपणे चमकत आहेत, ती त्या क्रूसाखाली निजलीय, हे शक्य आहे का? त्या डोळ्यांमधील विशुद्धता आणि आता ओल्गा मेश्चेस्कर्यायाच्या नावाशी जडलेली भयानकता, ह्यांचा मेळ कसा घालायचा? पण उराशी एखादे स्वप्न मनस्वीपणे कवटाळून जगणाऱ्या सर्व माणसांप्रमाणे ती छोटी स्त्री मनात सुखी आहे.

ही स्त्री म्हणजे ओल्गा मेश्चेस्कर्यायाची वर्गशिक्षिका. वय झालेली प्रौढ कुमारिका, प्रत्यक्ष आयुष्याऐवजी एखाद्या स्वप्नात खूप काळापासून जगणारी. तिचे पहिले स्वप्न तिच्या भावाबद्दल होते–तो गरीब आणि एक सामान्य कनिष्ठ अंमलदार होता. तिने स्वतःच्या सर्व आशा त्याच्यावर केंद्रित केल्या होत्या, त्याचे भवितव्य तेजस्वी असेल असे का कुणास ठाऊक, पण तिला ठाम वाटत होते. जेव्हा तो मूकदेनच्या लढाईत ठार झाला, तेव्हा तिने स्वतःच्या मनाला पटविण्याचा प्रयत्न केला की, ती विचारासाठी खपत होती. ओल्गा मेश्चेस्कर्यायाच्या मृत्यूमुळे तिला नवे स्वप्न लाभले. आता ओल्गा तिच्या चिवट विचारांचे व जाणीवांचे केंद्र बनली. दर सणादिवशी ती ह्या थडग्यापाशी येते, ओकच्या क्रूसावर तासचे तास नजर खिळवून बसते, फुलांनी वेढलेल्या शवपेटीमधील ओल्गाचा फिकट चेहरा आठवत राहते, एकदा कानांवर आलेले ओल्गाचे शब्द आठवते. एकदा मधल्या सुटीत शाळेच्या बागेत भटकताना ओल्गा तिच्या सर्वांत आवडत्या, उंच, गुबगुबीत मैत्रिणीला सूब्बोतिनाला, भरभर सांगत होती:

"बाबांच्या एका पुस्तकात–त्यांच्यापाशी खूप खूप जुनी, गंमतीदार पुस्तकं आहेत–एकदा मी वाचलं, सुंदर होण्यासाठी बाईपाशी काय काय गोष्टी असल्या पाहिजेत... तिथं एवढ्या गोष्टी सांगितल्या होत्या, की सगळ्या लक्षात ठेवणं कठीण! अर्थात काळेभोर, अगदी उकळत्या डांबरासारखे तिचे डोळे असले पाहिजेत, शप्पत, तस्संच लिहिलं होतं–उकळत्या डांबरासारखे! रात्रीसारख्या काळ्या पापण्या, गालांवर हलकी

पसरणारी नाजुक लाली, सडपातळ अंगयष्टी, हात वाजवीपेक्षा जास्त लांब, – समजलं, वाजवीपेक्षा जास्त लांब! छोटी पावलं, बऱ्यापैकी मोठे स्तन, योग्य बाकदार पोटऱ्या, शिंपल्यांच्या रंगाचे गुडघे, उतरते खांदे – ह्यांपैकी खूप मी तोंडपाठ केलं, हे सगळं खरं आहे! पण सर्वांत महत्त्वाचं काय, माहीत आहे? हलका श्वासोच्छ्वास! तो माझ्यापाशी आहे – तू ऐक, मी कसा निःश्वास टाकते – अगदी हलका, खरं ना?"

आता हा हलका निःश्वास जगात वाफेत विरून गेलाय, अभ्राच्छादित आकाशात, थंड वासंतिक वाऱ्यात मिसळून गेलाय.

१९१६

माक्सिम गोर्की

म्हातारी इझेरगिल

मॅक्सिम गोर्की (१८६८-१९३६)—ह्या महान कामगारवर्गीय लेखकाची साहित्यनिर्मिती १९ व्या शतकाच्या अखेरी सुरू झाली. स्वतःच्या लेखनामधून त्यांनी रशियन साहित्याच्या उत्कृष्ट परंपरा पुढे चालू ठेवल्या.

जनतेच्या ऐन तळागाळातून गोर्की निर्माण झाले. विविधांगी रशियन जीवन लेंखकाच्या दृष्टीने एक प्रकारची "विद्यापीठे" ठरलें. सबंध रशिया ते पायी फिरले, शेकडो माणसांना भेटले, त्यांच्या जीवनाचे, विचारांचे, आकांक्षांचे त्यांनी बारकाईने निरीक्षण केले. ह्या अपूर्व जनसंपर्कात त्यांचे साहित्यगुण वाढले, परिपक्व बनले.

गोर्की यांच्या आरंभीच्या लेखनांमधून स्पष्ट झाले की, स्वतंत्र आणि सुखी माणसाला पाहण्याचे स्वप्न उरात बाळगणारा हा तळमळीचा लेखक होता. 'मकार चूद्रा' (१८९२) आणि 'म्हातारी इझेरगिल' (१८९४) ह्या रोमांचवादाने भरलेल्या कथांमधून गोर्कींनी विशालहृदयी आणि सुंदर मनाच्या, धैर्यशील व मानी नायकांचे चित्रण केले.

जीवनातील शौर्याचेच केवळ गोर्कींनी गोडवे गायले नाहीत. "आयुष्याच्या मालकां"चे खरे रूप उघड करणाऱ्या अनेक कथाही त्यांनी लिहिल्या. लोकांना पांगळे आणि विद्रूप बनविणाऱ्या एकतंत्री वास्तवाविरुद्धचा निषेध त्यांच्यातून ध्वनित होत होता.

'आई' (१९०६) कादंबरीने गोर्कींना जागतिक कीर्तीचा लाभ करून दिला. कामगारवर्गाबद्दलच्या ह्या पहिल्याच पुस्तकात लेंखकाने कामगारांच्या अटळ विजयावर विश्वास व्यक्त केला होता. "अत्यंत कालोचित पुस्तक" असे 'आई' कादंबरीविषयी लेनिन म्हणाले होते.

गोर्की केवळ लेंखक नव्हते, तर क्रियाशील सार्वजनिक कार्यकर्ते होते. १९०५ सालाच्या क्रांतीत त्यांनी भाग घेतला होता, एकतंत्री राजवटीविरोधी लढ्यात

रशियन लेखकांची त्यांनी एकजूट बनविली होती.

सोविएत सत्तेच्या आरंभीच्या वर्षांमध्ये समाजसत्तावादी संस्कृतीच्या उभारणीत गोर्कींनी सक्रिय भाग घेतला. अनेक पुस्तकांच्या व नियतकालिकांच्या प्रकाशनात त्यांनी पुढाकार घेतला, कलात्मक व ऐतिहासिक मूल्यांच्या जतनाचे कार्य केले, सांस्कृतिक आणि शास्त्रीय क्षेत्रात काम करणाऱ्या माणसांची काळजी वाहिली, सोविएत तरुण लेखकांना मदत केली.

१९२१ साली गोर्की फार आजारी पडले आणि लेनिन यांच्या आग्रहानुसार परदेशात उपचारांसाठी गेले. परदेशात त्यांनी काही वर्षे वास्तव्य केलें. पण परमुलुखात राहूनसुद्धा स्वदेशातील सर्व घडामोडींचा गोर्की सतत भाग घेत होते, सोविएत कलेच्या विकासात हरतऱ्हेने मदत करीत होते.

सोविएत काळात 'क्लिम सामगिनचे जीवन' (१९२५-१९३६) ही महाकादंबरी गोर्कींनी लिहिली. १९ व्या शतकाच्या अखेरीपासून १९१७ च्या क्रांतीपर्यंतचा रशियन जीवनाचा संपूर्ण आलेख ह्या कादंबरीत चितारला आहे. 'आर्तामोनोवांचे काम' (१९२५) ही कादंबरी, आत्मचरित्रात्मक त्रयीतील अखेरचे पुस्तक ('माझी विद्यापीठे', १९२२), 'येगोर बूलीच्योव आणि इतर' (१९३२), 'दस्तीगायेव आणि इतर' (१९३४) ही नाटके.

साहित्यिक-सामाजिक प्रचंड कार्याशी गोर्की यांनी लेखनाचा मेळ घातला होता. सोविएत लेखकांच्या पहिल्या अखिल संघ काँग्रेसचे गोर्की संयोजक आणि अध्यक्ष होते (१९३४). गोर्कींनी एका नव्या कलाप्रकाराची स्थापना केली – समाजसत्तावादी वास्तववाद. हा कला-प्रकार संपूर्ण सोविएत साहित्याचा पाया ठरला आहे.

१

ह्या कथा मी आक्केरमानपाशी, बेस्साराबियात, सागरकिनाऱ्यावर ऐकल्या. एका संध्याकाळी द्राक्षे तोडण्याचे दिवसभराचे काम संपल्यावर, ज्यांच्याबरोबर मी काम करीत होतो तो मोल्दावियनांचा गट समुद्रकिनाऱ्यावर गेला. फक्त मी आणि इझेरगिल नावाची एक म्हातारी बाई द्राक्षवेलींच्या दाट सावलीत मागे राहिलो होतो. समुद्रकिनाऱ्यावर गेलेल्या माणसांच्या शिलोटी रात्रीच्या निळया सावल्यांमध्ये कशा एकरूप होत होत्या ते आम्ही जमिनीवर पडल्या पडल्या मुकाटपणे पहात होतो.

ती माणसे जाता जाता गात होती, हसत होती. पुरुषांना उन्हात रापून ब्राँझचा रंग आला होता, त्यांच्या मिशा दाट, काळयाभोर होत्या व त्यांचे कुरळे केस खांद्यांपर्यंत रुळत होते. त्यांनी आखूड जाकीटे घातली होती आणि पायांच्या घोटयांशी घट्ट आवळणाऱ्या रुंद विजारी चढविल्या होत्या. बायका आणि मुली उल्हसित होत्या, त्यांचे डोळे गडद निळे होते, त्यांच्या आकृती डौलदार होत्या व पुरुषांप्रमाणेच त्यांची कांतीही ब्राँझसारखी बनली होती. त्यांनी आपले रेशमी काळे केस सैल सोडले होते, उबदार वारा त्यांच्याशी खेळत होता व त्यांच्यात गुंफलेल्या नाण्यांचा किणकिण आवाज करीत होता. वाऱ्याचा प्रचंड झोत आमच्यावरून सतत वाहात होता, पण अधूनमधून त्याला काहीतरी अडथळा येत असावा आणि मग एकदम जोरात झुळूक यायची व बायकांचे केस उडवायची. अशा वेळी त्यांच्या डोक्यांवर अद्भुत आयाळी दिसायच्या. त्यामुळे बायका परीकथांमधील अद्भुत प्राण्यांप्रमाणे भासायच्या. ती माणसे आमच्यापासून अधिकाधिक दूर जात होती, रात्र आणि माझी कल्पनाशक्ती त्यांना वाढत्या सौंदर्यात अवगुंठित करीत होती.

कुणीतरी व्हायोलीन वाजवीत होता... एक तरुणी खर्ज सुरात गात होती, हसण्याचे आवाज ऐकू येत होते...

हवेत समुद्राचा उग्र दर्प भरला होता आणि रात्र पडण्याच्या जरा आधी पावसाने भिजवलेल्या मातीमधून वाफा उमटत होत्या. अजूनसुद्धा विस्कळीत मेघ वेगवेगळ्या आकारात आणि रंगात आकाशामधून तरंगत जात होते. काही ठिकाणी धुराच्या लोटांप्रमाणे ते अंधुक, भुरे आणि राखाडी निळे भासायचे; तर काही ठिकाणी तीक्ष्ण खडकांच्या सुळक्यां-प्रमाणे ठिपकेदार काळे व तपकिरी दिसायचे. आणि त्यांच्या दरम्यान सोनेरी ताऱ्यांनी सुशोभित केलेले काळसर-निळे आकाश लडिवाळपणे चमकत होते. ह्या सर्व गोष्टी—ध्वनी व गंध, मेघ आणि माणसे—अत्यंत सुंदर आणि उदास भासत होत्या, जणू एखाद्या परीकथेच्या आरं-भासारख्या भासत होत्या. जणू प्रत्येक गोष्ट वाढायची थांबली होती आणि नाश पावत होती. आवाजांचा गोंगाट विरत गेला व केवळ शोक-विव्हल सुस्कारे उरले.

"का नाही गेलास तू त्यांच्याबरोबर?" डोके समुद्राच्या दिशेने हलवून म्हाताऱ्या इझेरगिलने विचारले.

काळाने तिला कमरेतून अर्धे वाकविले होते, एकेकाळी काळेभोर चमकणारे तिचे डोळे आता निस्तेज बनले होते, त्यांच्यातून पाणी झिर-पत होते. तिचा कोरडा आवाज फार विचित्र ऐकू यायचा. म्हातारी जणू हाडांच्या जिभेने बोलतेय असा तो कडकड वाजायचा.

"माझी इच्छा नाही," मी तिला उत्तर दिले.

"तुम्ही रशियन जन्मतःच म्हातारे निपजता. सगळे पिशाचांसारखे उदास... आमच्या पोरी तुला भितात... खरं तर तू तरुण आणि भक्कम आहेस..."

चंद्र उगवला. त्याची थाळी मोठी, रक्तासारखी लाल होती. मानवी रक्त-मांसाला प्रचंड प्रमाणात फस्त केलेल्या स्तेपच्या गर्भातून वरती आल्याप्रमाणे तो भासत होता. स्तेप म्हणूनच कदाचित असे संपन्न व सुपिक बनले होते. आमच्यावर पानांच्या जाळीदार सावल्या पडल्या. मी आणि म्हातारी जणू जाळ्यात अडकल्याप्रमाणे भासत होतो. आमच्या

डावीकडे पसरलेल्या स्तेपवर ढगांच्या सावल्या सरकत होत्या, निळसर चांदण्यामुळे त्या फिक्या व पारदर्शी बनत होत्या.

"बघ, लारा चाललाय!"

म्हातारीने थरथरते वाकडे बोट जिकडे दाखविले त्या दिशेला मी पाहिले: तेथे सावल्या सरकत जात होत्या, त्या खूप होत्या आणि इतर सावल्यांपेक्षा अधिक दाट व काळपट असलेली एक सावली जास्त वेगाने जात होती. इतर ढगांपेक्षा जमिनीपासून अधिक जवळ असलेल्या आणि अधिक वेगाने जाणाऱ्या एका छोटया ढगाची ती सावली होती.

"तिथं कुणीही नाही!" मी म्हणालो.

"तू माझ्यासारख्या म्हातारीपेक्षा जास्त आंधळा आहेस! बघ – तो पहा काळसर धावतोय स्तेपवरून!"

मी परत पाहिले आणि केवळ सावल्यांविना पुन्हा दुसरे काहीही दिसले नाही.

"ती सावली आहे! तिला तू लारा का म्हणतेस?"

"कारण ती सावली म्हणजेच तो आहे. आता तो सावलीसारखा बनलाय! हजारो वर्षं तो जगतोय, सूर्यानं त्याच्या शरीराला, रक्ताला, हाडांना सुकवून टाकलं; वाऱ्यानं त्यांना धुळीसारखं विखरून टाकलं. पहा, गर्विष्ठपणाबद्दल माणसाला देव कशी शिक्षा करतो!"

"हे कसं घडलं, मला सांग!" मी म्हातारीला विनंती केली. स्तेपमध्ये जन्मलेली एक सुरेख कथा आता ऐकायला मिळणार ह्याची मला जाणीव झाली होती.

आणि तिने मला ही कहाणी सांगितली.

"ह्या घटनेनंतर हजारो वर्षांचा काळ उलटलाय. समुद्रापलिकडे दूर अंतरावर, उगवत्या सूर्याच्या दिशेला असलेल्या एका देशात खूप मोठी नदी आहे. त्या देशातील झाडाचे प्रत्येक पान आणि गवताचे प्रत्येक पाते माणसाला सूर्यापासून लपवू शकेल एवढी सावली टाकते, कारण तेथे सूर्य फार प्रखरतेने तळपत असतो.

"त्या देशातील माती अत्यंत सुपिक आहे!

"प्रबळ लोकांची टोळी एके काळी तेथे रहात होती. ते लोक स्वतःच्या गुरांच्या कळपांची राखण करीत व जंगली जनावरांच्या शिकारी

शौर्याने आणि धैर्याने करीत. शिकार संपली म्हणजे गाणी गात, मुलीं-बरोबर नाचत ते मेजवानी साजरी करीत.

"एके दिवशी, अशीच मेजवानी रंगात आली असताना, आकाशातून एक गरुड खाली झेपावला व निशेप्रमाणे काळ्या कुंतलाची सुंदर युवती उचलून घेऊन गेला. त्या पक्ष्यावर माणसांनी बाण मारले, पण गरुडाला एकही बाण लागला नाही. माणसे त्या तरुणीच्या शोधाला निघाली, पण त्यांना ती सापडली नाही. कालांतराने तिचा सर्वांना विसर पडला, जसा इतर गोष्टींचा पृथ्वीवर विसर पडतो."

म्हातारीने एक दीर्घ सुस्कारा टाकला व ती गप्प झाली. जेव्हा ती कडकडत्या आवाजात बोलत होती, तेव्हा तिच्या छातीत वसणाऱ्या सर्व विस्मृत युगांच्या आठवणींच्या सावल्यांबद्दलच्या भावना जणू ती प्रकट करीत होती. कदाचित ह्याच किनाऱ्यावर आरंभ झालेल्या ह्या प्राचीन दंतकथेच्या उपोद्घाताला सागराने हळूवार प्रतिसाद दिला.

"पण वीस वर्षांनंतर ती स्वतःच परतली. ती थकलेली आणि सुक-लेली होती, पण तिच्याबरोबरचा तरुण मात्र बळकट आणि देखणा होता – वीस वर्षांपूर्वी जशी ती दिसायची, तसा दिसत होता. ती कुठे होती ह्याबद्दल लोकांनी तिला जेव्हा विचारले, तेव्हा ती उत्तरली की गरुड तिला पर्वतांमध्ये घेऊन गेला होता आणि तिला त्याने स्वतःची पत्नी बनविले होते. हा त्यांचा मुलगा होता. गरुड आता जिवंत नव्हता. ताकद संपत चालल्याची जाणीव होताच त्याने आकाशात शेवटची भरारी घेतली व नंतर पंख मिटवून टोकदार सुळक्यांवर मृत्यूला मिठी मारली.

"गरुडाच्या मुलाकडे प्रत्येकजण चकित नजरेने पहात होता. त्यांना आढळले की, तो त्यांच्यापेक्षा अजिबात वेगळा दिसत नव्हता, फक्त त्याच्या डोळ्यांमध्ये पक्ष्यांच्या राजाची गर्विष्ठ थंड चमक होती. जेव्हा ते त्याला उद्देशून बोलत, तेव्हा काहीवेळा तो उत्तर द्यायची तसदी घ्यायचा नाही आणि टोळीतील वडीलधारी माणसांशी समानतेच्या नात्याने बोलायचा. टोळीवाल्यांना त्याचे हे वागणे अपमानास्पद वाटायचे; बोथट टोकाचा पिसे नसलेला बाण, असे त्यांनी त्याला नाव ठेवले होते. त्या-च्यासारख्या हजारोंनी आणि त्याच्यापेक्षा दुप्पट वयाच्या हजारोंनी त्यांना वंदन केले होते व त्यांचे आज्ञापालन केले होते; असे त्यांनी त्याला

सांगितले. पण तो धीटपणे त्यांच्या नजरेला नजर भिडवून उत्तरला की, त्याच्यासारखा दुसरा कुणीही अस्तित्वात नाही. ज्यांची इच्छा असेल ते खुशाल त्यांना वंदन करोत, पण त्याची इच्छा नव्हती. तेव्हा मात्र वडीलधाऱ्यांना खरोखर राग आला व संतापून ते म्हणाले :

"'ह्याला आपल्यात जागा नाही. ह्याची इच्छा असेल तिकडं ह्याला जाऊ दे.'

"तो हसला आणि इच्छा होईल तिकडे गेला : त्याच्याकडे रोखून पाहणाऱ्या एका सुंदर युवतीपाशी तो गेला आणि त्याने तिला आपल्या बाहुपाशात धरले. त्याची कानउघाडणी करणाऱ्या एका वडीलधाऱ्याची ती मुलगी होती. जरी तो देखणा होता, तरी युवतीने त्याला झिडकारले, कारण स्वतःच्या वडिलांची तिला भीती वाटत होती. तिने त्याला दूर ढकलले व ती चालू लागली. त्याने तिला जोरात तडाखा मारला व ती जेव्हा जमिनीवर पडली, तेव्हा त्याने तिच्या स्तनांना पायांखाली चिरडले. तिच्या मुखातून थेट आकाशापर्यंत उंच रक्ताची चिळकांडी उडाली. युवतीने एक मोठा सुस्कारा टाकला व सापाप्रमाणे वळवळत, तडफडत प्राण सोडला.

"ज्यांनी ही घटना प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिली, ते भीतीने अवाक बनले. एखाद्या स्त्रीचा असा पाशवी रीतीने खून झालेला यापूर्वी त्यांनी कधीही पाहिला नव्हता. सताड उघडे डोळे पडलेल्या, रक्ताळलेल्या मुखाच्या तिच्या अचेतन देहाकडे व तिच्यापासून जवळच एकाकी, उन्मत्त-पणे उभ्या असलेल्या त्याच्याकडे ते लोक खूप वेळपर्यंत मुकाट पहात राहिले. तो ताठ मानेने उभा होता, जणू शिक्षेची मागणी करीत होता. शेवटी आश्चर्याच्या धक्क्यातून भानावर आल्यानंतर लोकांनी त्याला धरले आणि त्याच्या मुसक्या बांधून तेथेच टाकले. त्याला ताबडतोब ठार मारणे अगदी साधे ठरले असते आणि त्यांना सूडाचे पुरते समाधान मिळाले नसते, असा त्यांनी विचार केला."

रात्र वाढली आणि अधिक काळोखी बनली. अनेक छोटे छोटे विचित्र आवाज वातावरणात भरले. खारीच्या जातीचे प्राणी स्तेपमध्ये करुण आवाज काढत होते, द्राक्षवेलींमधून नाकतोड्यांची घरघर चालू होती, पाने उसासत एकमेकांशी कुजबुजत होती आणि मघाशी लालभडक

असलेली चंद्राची थाळी आता पृथ्वीपासून दूर गेल्यानंतर फिकुटली होती व स्तेपला निळसर प्रकाशात न्हाऊ घालत होती...

"मग त्या गुन्ह्याला साजेशी शिक्षा कोणती द्यावी ह्याबाबत विचार-विनिमय करायला वडीलधारे एकत्र जमले. घोड्यांकडून त्याला फाडावे असा प्रथम त्यांनी विचार केला, पण ही शिक्षा फारच सौम्य वाटत होती. प्रत्येकाने त्याच्या अंगात एक बाण घुसवावा, असाही त्यांनी विचार केला, पण नंतर तो नाकारला. एक सूचना झाली की त्यांनी त्याला जिवंत जाळावे, पण आगीच्या धुरापायी त्याच्या यातना त्यांना पहायला मिळाले नसते. अशा अनेक सूचना करण्यात आल्या, पण प्रत्येकाचे समाधान होईल अशी एकही सूचना नव्हती. हा सारा वेळ त्याची आई मुकाटपणे त्याच्यासमोर गुडघे टेकवून उभी होती. ती गप्प होती, तिच्या डोळ्यात ना अश्रू होते, ना क्षमायाचनेचे शब्द तिच्या तोंडून उमटत होते. खूप वेळपर्यंत टोळीचे लोक एकत्र चर्चा करीत राहिले आणि बऱ्याच विचारांती त्यांच्यातील एक शहाणा माणूस म्हणाला:

"'त्याला विचारू, त्यानं असं का केलं?'

"त्याला हा प्रश्न विचारण्यात आला. तो म्हणाला:

"'माझी बंधनं सोडा! बंदिस्त अवस्थेत मी बोलणार नाही!'

"जेव्हा त्याला बंधमुक्त करण्यात आले, तेव्हा त्याने विचारले:

"'तुम्हाला काय पाहिजे?'—त्याने अशा थाटात विचारले की, जणू ते त्याचे गुलाम होते...

"'तू ऐकलं आहेस...' शहाणा माणूस म्हणाला.

"'माझ्या कृत्यांचा खुलासा मी तुम्हाला कशाबद्दल देऊ?'

"'आम्हाला कारण समजावं म्हणून. अरे गर्विष्ठा, ऐक! तुझं मरण तर अटळ आहे... तेव्हा तू असं का वागलास हे आम्हाला समजावून सांग. आम्ही पुढं जगणार आहोत आणि अधिक ज्ञान करून घेणं आम्हाला हितकर आहे...'

"'ठीक आहे, मी सांगतो, पण कदाचित जे काही घडलं त्याचं कारण मला स्वतःलाच नीट माहीत नाही. मी तिला ठार मारलं, कारण मला वाटतं—तिनं मला ढकलून दिलं... आणि मला ती हवी होती.'

"'पण ती तुझी नव्हती!' त्याला ते म्हणाले.

"'फक्त तुमच्याच गोष्टींचा तुम्ही वापर करता? मला दिसतंय की, प्रत्येक माणसापाशी फक्त हात, पाय आणि बोलायला जीभ आहे... पण तरीही तो प्राण्यांवर, बायकांवर, जमिनीवर मालकी गाजवतो... आणखी खूप गोष्टींवर...'

"ह्यावर ते उत्तरले की, माणूस ज्या गोष्टी घेतो, त्यांच्याबद्दल त्यानं मोबदला दिला पाहिजे–हा मोबदला बुद्धीच्या अगर ताकदीच्या रूपानं आणि काहीवेळा आयुष्याच्या रूपानंही. तो उत्तरला की, तो स्वत:ला धडधाकट राखू इच्छित होता.

"त्याच्याबरोबर खूप वेळपर्यंत बोलल्यानंतर त्या लोकांच्या ध्यानात आले की, तो स्वत:ला त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ समजत होता, स्वत:विना त्याला इतर कुणाबद्दलही आस्था नव्हती. सबंध जगापासून त्याने स्वत:ला अलिप्त बनविले होते ह्याची जाणीव होताच ते धसकले. त्याला ना टोळी होती, ना आई होती, ना गुरे होती, ना बायको. ह्यांपैकी कोणत्याही गोष्टीची त्याला इच्छाही नव्हती.

"ही वस्तुस्थिती ध्यानात येताच पुन्हा ते सुयोग्य शिक्षेबाबत चर्चा करू लागले. पण आता त्यांनी फार काळ चर्चा केली नाही. आत्तापर्यंत चर्चेत भाग न घेतलेल्या त्याच पूर्वीच्या शहाण्या माणसाने म्हटले:

"'थांबा! शिक्षा सुचलीय. आणि ही फार भयानक शिक्षा आहे. अशी शिक्षा हजार वर्षातसुद्धा तुम्हाला सुचणार नाही! शिक्षा त्याच्यातच सामावलीय! सोडा त्याला, खुशाल राहो तो मोकळा. हीच त्याला शिक्षा!'

"तेवढ्यात एक चमत्कार घडला. निरभ्र आकाशातून वीज कडाडली. स्वर्गीय शक्तींनी अशा रीतीने शहाण्या माणसाच्या निर्णयाला दुजोरा दिला. प्रत्येकाने तो निर्णय मान्य केला आणि सगळे पांगले. आता लारा असे नाव लाभलेला–म्हणजे तिरस्कारीत, नाकारलेला–तो तरुण त्याला टाकून गेलेल्या लोकांना हसला. आपण एकाकी आहोत आणि आपल्या बापाप्रमाणे मुक्त आहोत असे आढळताच तो मोठमोठ्यांदा हसला. पण त्याचा बाप माणूस नव्हता, याउलट हा माणूस होता. तरीही पक्ष्याप्रमाणे स्वच्छंद जीवन तो जगू लागला. टोळीवाल्यांपासून तो गुरे

चोरायचा, मुली चोरायचा, इच्छा होईल त्या वस्तू लुटायचा. टोळीवाले त्याला बाण मारायचे, पण सर्वोच्च शिक्षेच्या अदृश्य चिलखताने त्याच्या देहाचे रक्षण केले असल्यामुळे त्यांचे बाण त्याला अपाय करू शकत नव्हते. तो चपळ होता, हिंस्र होता, बळकट होता, क्रूर होता आणि लोकांना समोरासमोर कधीही भेटत नसे. ते केवळ दुरून त्याला पहात. अशा रीतीने मानवी समूहांच्या आसपास तो खूप काळपर्यंत एकाकी वावरत राहिला. मग एक दिवस तो माणसांच्या अगदी जवळपर्यंत गेला आणि लोक जेव्हा त्याच्यावर हल्ला करायला धावले, तेव्हा तो जागच्या जागी थांबला आणि स्वतःचे रक्षण करण्याचा त्याने मुळीच प्रयत्न केला नाही. तेव्हा एका माणसाच्या ध्यानात त्याचा हेतू आला व तो ओरडला :

"'त्याला हात लावू नका! त्याची मरायची इच्छा आहे!'

"सगळ्यांनी हात मागे घेतले. ज्याने त्यांचे वाईट केले होते त्याला ठार मारून त्याची मुक्तता करायची त्यांची इच्छा नव्हती. त्यांनी हात मागे घेतले व ते हसले. त्यांच्या हसण्याच्या आवाजाने त्याचा थरकाप उडाला आणि कशाचातरी शोध घ्यायला त्याने स्वतःची छाती गच्च आवळली. मग एक धोंडा उचलून अचानक तो लोकांवर धावून गेला. पण त्यांनी त्याचे प्रहार हुकविले, त्याच्यावर उलट प्रहार केले नाहीत. शेवटी थकून त्याने आत्यंतिक निराशेने किंकाळी फोडली व जमिनीवर अंग झोकून दिले. माणसे मागे सरली व त्याला न्याहाळू लागली. तो धडपडत उठला. आणि त्याच्याबरोबरील झटापटीत जमिनीवर पडलेला कुणाचातरी सुरा त्याने उचलला व स्वतःच्या छातीत खुपसला. पण दगडावर आपटावा त्याप्रमाणे सुऱ्याचे दोन तुकडे झाले. पुन्हा त्याने जमिनीवर अंग झोकले आणि तो जमिनीवर डोके आपटू लागला. पण जमीनही त्याच्यापासून दूर सरकली व जेथे त्याचे डोके आपटले होते, तेथे एक पोकळी निर्माण झाली.

"'तो मरू शकत नाही!' माणसे आनंदाने म्हणाली.

"सगळे लोक त्याला एकट्याला टाकून निघून गेले. तो उताणा पडून आकाश न्याहाळत होता. बलाढ्य गरुडांचे काळे ठिपके खूप उंच उंच भरारत असलेले त्याने पाहिले. साऱ्या जगाला दुःखी करील एवढा

केविलवाणेपणा त्याच्या डोळयांमध्ये भरलेला होता. तेव्हापासून आत्ता-पर्यंत तो एकटा आहे, मोकाट फिरतोय, मरणाची वाट पाहतोय. पृथ्वी-वर भटकण्याविना तो दुसरे काहीही करीत नाही... तू स्वतःच पा-हिलंस, तो कसा सावलीसारखा बनलाय आणि काळाच्या अंतापर्यंत तो सावली म्हणूनच राहणार. त्याला काहीही समजत नाही, ना माणसाची भाषा, ना त्याची वागणूक. तो फक्त सतत कशाचातरी शोध घेत फिर-तोय. त्याला आयुष्य नाही आणि मृत्यू त्याला ठार करीत नाही. माण-सांमध्ये त्याला स्थान नाही... गर्विष्ठपणाचे माणसाला काय फळ मि-ळाले पहा!"

म्हातारीने सुस्कारा टाकला, ती गप्प झाली आणि काहीवेळा डोक्या-ला विचित्र झटके देऊन तिने ते छातीवर झुकविले.

मी तिच्याकडे पाहिले. म्हातारीला झोप घेरत होती असे मला भासले. का कुणास ठाऊक, पण मला तिची विलक्षण दया वाटू लागली. कहाणीचा शेवट तिने काहीशा वरच्या, दटावणीच्या सुरात सांगितला होता, पण तरीही मला त्यात भीती आणि गुलामी जाणवली होती.

किनाऱ्यावरची माणसे गात होती, फार विचित्र गात होती. प्रथम स्त्रीचा खोल गाण्याचा सूर उमटत होता, तिने दोन-तीन स्वर गाताच दुसरा आवाज आरंभापासून सूर धरीत होता, तर पहिला आवाज पुढे गात होता. तिसरा, चौथा आणि पाचवा आवाज त्याच पद्धतीने सामील झाले व अचानक तेच गाणे अनेक पुरुष एकाचवेळी गाऊ लागले.

प्रत्येक बाईचा आवाज स्वतंत्रपणे ऐकू येत होता. वेगवेगळया रंगांचे पाण्याचे निर्झर खडकांवरून खळखळत, उडया मारत, चमकत जावेत तसे त्यांचे आवाज भासत होते. पुरुषांच्या उसळत्या आवाजांमध्ये मिसळून जायला बायकांचे आवाज धावत होते, पुरुषांच्या आवाजात बुडत होते, पुन्हा त्यांच्यातून उसळून बाहेर पडत होते, परत बुडत होते आणि मग एकेक आवाज स्वतंत्रपणे, निखळपणे उंच उंच चढत जात होता.

गाणाऱ्यांच्या आवाजांपायी लाटांचा ध्वनी ऐकू येत नव्हता...

२

"अशी गाणी गायलेली तू दुसरीकडं कुठं ऐकलीस?" डोके वर उचलीत इझेरगिलने विचारले व तोंडाचे बोळके दाखवीत ती हसली.

"नाही ऐकली. कधीही ऐकली नाहीत..."

"आणि कधी ऐकणारही नाहीस. गाणी गायला आम्हाला आवडतं. फक्त सुंदर माणसं छान गाऊ शकतात–ज्यांना जगायला आवडतं अशी सुंदर माणसं. आम्हाला जगायला आवडतं. आता बघ, तिथं जी माणसं गात आहेत, ती दिवसभराच्या कामानं दमलेली नाहीत काय? सूर्य उगवल्यापासून तो मावळेपर्यंत ती काम करत होती, आता चंद्र उगवला आणि गात आहेत! ज्यांना जगण्याची अक्कल नाही, ते झोपलेत. ज्यांना आयुष्य प्रिय आहे, ती पहा–गाताहेत!"

"पण आरोग्य..." मी बोलू लागलो.

"आरोग्य नेहमी आयुष्याला पुरून उरतं. आरोग्य! तुझ्याजवळ पैसे असते, तर ते तू खर्चले नसतेस? आरोग्यसुद्धा सोनं आहे. मी तरुणपणी काय काय केलं माहीत आहे? सकाळपासून संध्याकाळपर्यंत न उठता एका जागी बसून गालीचे विणायची. सूर्याच्या किरणासारखी मी चटपटीत होते, पण दगडासारखं एका जागी न हलता बसून रहावं लागायचं. बसून बसून काही वेळा माझी सगळी हाडं दुखायची. पण रात्र पडताच माझं ज्याच्यावर प्रेम होतं, त्याच्याकडं धावायची, त्याची चुंबनं घ्यायला. तशी तीन महिनेपर्यंत धावत होते, जोवर प्रेम टिकून होतं; त्या काळात सबंध रात्री मी त्याच्यापाशी असायची. आणि बघ कुठवर मी जगलेय–रक्त पुरलं! आणि किती प्रेम केलं! किती चुंबनं घेतली आणि किती दिली!.."

मी तिच्या चेहऱ्याकडे पाहिले. तिचे काळे डोळे अजूनही निस्तेज होते. आठवणीसुद्धा त्यांच्यात चमक आणू शकल्या नव्हत्या. तिच्या सुकलेल्या, तडकलेल्या ओठांवर, पांढऱ्या केसांचे खुंट उगवलेल्या तिच्या टोकदार हनुवटीवर आणि घुबडाच्या चोचीप्रमाणे बाकदार असलेल्या तिच्या सुरकुतल्या नाकावर चांदणे प्रकाशत होते. तिच्या गालांच्या जागी काळे खड्डे पडले होते आणि तिने डोक्याभोवती गुंडाळलेल्या तांबड्या फडक्यामधून सुटलेला पांढऱ्या केसांचा झुपका त्यांपैकी एका खळग्यात पडला होता. तिच्या चेहऱ्यावर, मानेवर आणि हातांवर सुरकुत्यांचे जाळे पसरले होते. तिच्या दर हालचालीगणिक असे वाटायचे की, आता तिची ही सुकलेली कातडी फाटणार, तिचे तुकडे तुकडे पडणार

आणि माझ्यासमोर निस्तेज काळ्या डोळ्यांचा हाडांचा नुसता सापळा उभा राहणार.

कडकडत्या आवाजात ती पुन्हा कथन करू लागली:

"बिर्लादा नदीच्या ऐन किनाऱ्यावर फाल्चीजवळ मी आईबरोबर रहात होते. आणि आमच्या मळयावर तो पहिल्यांदा आला तेव्हा मी पंधरा वर्षांची होते. तो चांगला उंचापुरा, रुबाबदार, काळ्या मिशांचा आणि आनंदी स्वभावाचा होता. होडीत बसून आमच्या खिडकीपाशी खणखणीत ओरडला: 'ए, तुमच्यापाशी दारू आहे का... आणि मला काही खायला?' मी खिडकीतून अॅश झाडाच्या फांद्यांमधून पाहिलं: चांदण्यामुळं नदी सगळी फिकट निळी दिसत होती आणि तो कमरेला रुंद पट्टा आवळलेल्या पांढऱ्या सदऱ्यात एक पाय होडीत आणि दुसरा पाय किनाऱ्याला टेकवून उभा होता. होडीला डोलवत गाणं गात होता. मला पाहताच म्हणाला: 'किती सुंदर पोरगी राहतेय इथं!.. मला हे माहीत नव्हतं!' जणू याआधी जगातल्या सगळ्या सुंदर पोरी त्याला माहीत होत्या! मी त्याला दारू आणि उकडलेलं डुकराचं मांस दिलं... आणि चार दिवसांनंतर स्वतःला पूर्णपणं दिलं... आम्ही रात्र रात्र त्याच्या होडीतून भटकत होतो. घरापाशी येऊन तो हळूच शीळ घालायचा आणि मी माशाप्रमाणं खिडकीतून नदीत उडी मारायची. आणि भटकंती सुरू... तो प्रूतचा मच्छीमार होता आणि जेव्हा माझ्या आईला सगळं समजलं आणि तिनं मला भरपूर चोपलं, तेव्हा त्यानं मला आग्रह केला की, दोब्रूजापर्यंत आणि त्याहीपुढं दान्यूबच्या फाटयापर्यंत मी त्याच्याबरोबर पळून जावं. पण एव्हाना मला तो आवडेनासा झाला होता — नुसता गाणी म्हणायचा आणि चुंबनं घ्यायचा, दुसरं काही नाही! कंटाळा आला होता. दरम्यान आमच्या भागात गुत्सूलांची टोळकी भटकत आली होती आणि त्यांच्या काही प्रेयसी इथं होत्या... त्या पोरींची खूप मजा चालली होती. एखादी वाट बघायची, स्वतःच्या कार्पाथियाच्या तरुणाची वाट पहायची, तिला वाटायचं की, एव्हाना तो तुरुंगात बसलाय किंवा मारामारीत ठार झालाय — आणि अचानक आकाशातून कोसळावा त्याप्रमाणं तो एकटा किंवा दोन-तीन मित्रांना घेऊन तिच्यासमोर हजर व्हायचा. भारी भारी भेटवस्तू आणायचा — त्यांना सगळ्या

वस्तू सहज मिळायच्या! तिच्याकडं मेजवान्या झोडायचे, आपल्या मित्रां-समोर तो तिची कौतुकं करायचा. तिला हे सगळं आवडायचं. अगा गुत्सूल प्रेमिक असलेल्या माझ्या एका मैत्रिणीला मी विनंती केली... गुत्सूलांची ओळख करून देण्याची... काय बरं तिचं नाव? विसरले... आता सगळं विसरायला होतं. त्या गोष्टी घडून फार काळ लोटला, सगळं विसरतं! तिनं माझी एका तरुणाशी ओळख करून दिली. छान होता... तांबडकेशा होता, संपूर्ण—मिशा आणि कल्लेसुद्धा! डोकं लालभडक पेटल्यासारखं दिसायचं. कधी खूप दु:खी व्हायचा, कधी प्रेमळ बनायचा, तर कधी जनावरासारखा डरकाळ्या फोडायचा आणि भांडा-यचा. एकदा त्यानं माझ्या थोबाडीत मारली... मी मांजरीप्रमाणं त्याच्या छातीवर झेपावले आणि त्याच्या गालाचा कडकडून चावा घेतला... तेव्हापासून त्याच्या गालावर खळी पडली आणि जेव्हा मी त्या खळीचं चुंबन घ्यायची, तेव्हा त्याला फार आवडायचं..."

"पण त्या मच्छीमाराचं काय?" मी विचारले.

"मच्छीमार? हं हं... तो ... तो गुत्सूलांच्या टोळीत सामील झाला आणि तिथंच राहिला. प्रथम माझं मन वळवण्याचा त्यानं खूप प्रयत्न केला आणि त्याच्याबरोबर जायला नकार दिला तर मला पाण्यात फेकून देईन अशा त्यानं धमक्या घातल्या... पण नंतर काही नाही—त्यांच्या टोळीत दाखल झाला आणि त्यानं दुसरी प्रेयसी शोधली... त्या दोघांना एकत्र फासावर टांगलं—मच्छीमाराला आणि गुत्सूलला. त्यांना फाशी कसं देतात हे बघायला मी गेले होते. दोब्रूजामध्ये ते घडलं. फासावर जाताना मच्छीमाराचा चेहरा पांढरा पडला होता आणि तो रडला. पण गुत्सूल पाईप ओढत होता. चालताना पाईप ओढत होता, हात खिशात घातलेले, त्याची एक मिशी खांद्यावर टेकलेली, दुसरी छातीवर. मला बघताच तोंडातून पाईप बाहेर काढला आणि ओरडला: 'अच्छा!..' मी सबंध वर्षभर त्याचा शोक करत होते. ते स्वत:च्या कार्पाथियाला जायला निघाले होते, तेव्हा ती घटना घडली. निरोपाच्या वेळी एका रूमानियनाच्या घरी मेजवानीला गेले होते. तिथं त्यांना पकडलं. फक्त दोघांना, अनेकांना ठार केलं, बाकीचे निसटले... नंतर रूमानियनाला त्याच्या कृत्याचा मोबदला देणं भाग पडलं...

त्याचा मळा, त्याची चक्की आणि सगळं पीक जाळण्यात आलं. भिकारी बनला अखेर."

"हे तू केलंस?" मी तर्कानं विचारले.

"गुत्सूलांचे अनेक मित्र होते, मी एकटीच नव्हे... जो त्यांचा सर्वांत जिवलग मित्र होता, त्यानं त्यांच्या आठवणीखातर ते केलं..."

समुद्रकिनाऱ्यावरील गाणे एव्हाना थांबले होते आणि म्हातारीच्या कहाणीला फक्त लाटांची हलकी कुजबुज साथ देत होती. त्या अस्वस्थ जीवनकहाणीला लाटांची अस्वस्थ आणि उदास कुजबुज अगदी योग्य साथ होती. रात्र अधिक मऊ बनली होती, चांदणे गडद निळे बनले होते आणि वाऱ्याचा जोर वाढल्यामुळे सागराच्या वाढत्या गाजेत रात्रीच्या अदृश्य निवासींचे संदिग्ध ध्वनी बुडून जात होते.

"आणखी एका तुर्काच्या प्रेमात मी पडले होते. त्या स्कूतारीमधल्या जनानखान्यात मी होते. आख्खा आठवडाभर तिथं राहिले – विशेष नाही... पण मग कंटाळले... नुसत्या बायकाच बायका... त्याच्या तिथं आठ बायका होत्या... सारा दिवस खायच्या, झोपायच्या आणि मूर्ख गप्पा मारायच्या... किंवा भांडायच्या, कलकल करणाऱ्या कोंबड्यांप्रमाणं... तो तुर्क एव्हाना तरुण राहिला नव्हता. केस जवळजवळ पांढरे झालेले आणि रुबाबदार, श्रीमंत. सम्राटासारखा बोलायचा... डोळे काळे काळे... भेदक... थेट काळजाचा ठाव घ्यायचे. प्रार्थना करणं खूप आवडायचं त्याला. मी त्याला बूखारेस्तमध्ये प्रथम पाहिलं होतं... झारप्रमाणं बाजारात फिरत होता मोठ्या ऐटीत. मी त्याच्याकडं बघून हसले. त्याच संध्याकाळी मला रस्त्यावर धरण्यात आलं आणि त्याच्यापाशी नेण्यात आलं. तो चंदन आणि ताड विकायचा. बुखारेस्तमध्ये काहीतरी खरेदीसाठी आला होता. मला त्यानं विचारलं – 'माझ्याकडं येशील?' 'होय, येते.' 'छान!' आणि मी त्याच्याकडं गेले. हा तुर्क खूप श्रीमंत होता. त्याचा मुलगा सोळा वर्षांचा होता – काळ्या केसांचा, सडपातळ... त्याला बरोबर घेऊन मी तुर्कापासून पळाले. बल्गारियात लोम-पालान्काला गेले... तिथं एका बल्गारियन बाईनं माझ्या छातीत सुरा खुपसला, तिच्या प्रेमिकाबद्दल किंवा नवऱ्याबद्दल – नेमकं कुणाबद्दल आता आठवत नाही.

"त्यानंतर एका मठात मी खूप दिवसपर्यंत आजारी होते. जोगिणींचा मठ होता. एक पोलीश मुलगी माझी काळजी घेत होती... तिचा भाऊ, तोसुद्धा संन्यासी होता, तिला भेटायला यायचा... आठवतं, आरत्सेर-पालान्काजवळच्या दुसऱ्या मठातून... माझ्यासमोर किड्या-सारखा वळवळायचा... जेव्हा मी बरी झाले, तेव्हा त्याच्याबरोबर निघून गेले... त्याच्या पोलंडमध्ये."

"जरा थांब! .. आणि छोटा तुर्क कुठं?"

"पोरगा? तो पोरगा मेला. घराच्या आठवणीपायी किंवा प्रेमापायी... उन्हात करपून निघालेल्या रोपट्याप्रमाणं तो सुकत गेला... पुरता सुकून गेला... मला आठवतंय, निळसर आणि पारदर्शी बर्फासारखा पडून होता, पण अजून त्याच्यात प्रेम पेटत होतं... त्याच्यावर वाकून मी त्याचं चुंबन घ्यावं अशी सारखी विनवणी करायचा... माझं त्याच्यावर प्रेम होतं आणि आठवतंय, त्याची खूप चुंबनं घेतली... नंतर त्याची अवस्था फारच वाईट झाली – जवळ जवळ मुळीच हालचाल करत नव्हता. नुसता पडून रहायचा आणि भीक मागितल्याप्रमाणं विनवायचा – त्याच्याजवळ मी निजून त्याला ऊब द्यावी म्हणून. मी त्याच्याशेजारी निजायची. ज्या क्षणी त्याच्याजवळ निजायची, त्याक्षणी तो संपूर्ण पेटून उठायचा. एकदा मी जागी झाले, तेव्हा तो एव्हाना थंडगार... मेलेला... मी त्याच्याबद्दल खूप रडले. कोण जाणे? कदाचित मी त्याला ठार मारलं होतं. तेव्हा मी त्याच्या दुप्पट वयाची होते. आणि खूप ताकदवान होते, मुसमुसलेली होते... पण तो – काय सांगू? कोवळा पोरगा! .."

तिने उसासा टाकला आणि मी प्रथमच पाहिले – तिने तीनदा क्रूसचिन्ह केले व सुकल्या ओठांमध्ये ती काहीतरी पुटपुटली.

"तर तू पोलंडला गेलीस..." मी तिच्या निवेदनाचा धागा परत जोडून दिला.

"होय... त्या छोट्या पोलीश माणसाबरोबर. तो फार विचित्र आणि नालायक होता. जेव्हा त्याला बाई हवी असायची, तेव्हा तो बोक्यासारखा माझ्याशी लगट करायचा, त्याच्या जिभेवरून गरम मध ओघळायचा; पण जेव्हा मी त्याला नको व्हायची, तेव्हा चाबकासारखे

शब्दांचे तडाखे मारायचा. एकदा आम्ही नदीकिनाऱ्यावर फिरायला गेलो होतो आणि तो मला गर्वानं काहीतरी अपशब्द बोलला. बाई ग! मी खूप चिडले! डांबरासारखी उकळू लागले! मी त्याला लहान बाळा-सारखं वर उचललं—तो खूप लहान होता— आणि त्याचा चेहरा निळा पडेपर्यंत कुशीत दाबला. मग गरागरा गोल फिरवला आणि किनाऱ्या-वरून नदीत फेकून दिला. तो किंचाळला. अगदी मजेशीर किंचाळला. मी वरून त्याला पहात होते आणि तो पाण्यात गटांगळ्या खात होता. तेव्हा मी निघून गेले. पुन्हा त्याची-माझी कधी भेट झाली नाही. ह्या-बाबत मी नेहमी भाग्यवान होते: ज्यांच्यावर मी कधीकाळी प्रेम केलं होतं, त्यांना परत कधीही भेटले नाही. तशा भेटी चांगल्या ठरल्या नसत्या—मेलेल्यांशी भेटण्यासारख होतं!"

म्हातारी गप्प झाली. तिच्या कथेतील माणसांना मी मनःचक्षूमधून पाहिले. मृत्यूला सामोरे जाताना शांतपणे पाईप ओढत जाणारा तांबड्या केसांचा व मिशांचा तिचा गुत्सूल प्रेमिक मला दिसला. मला त्याचे डोळे थंड, निळे भासत होते, त्याची नजर ठाम व तीव्र भासत होती. त्याच्या शेजारून काळ्या मिशांचा प्रूतचा मच्छीमार चालत होता. मरण्या-ची इच्छा नसल्यामुळे तो रडत होता, मरणाच्या चाहुलीमुळे त्याचा चेहरा फिका पडला होता, एकेकाळचे त्याचे उल्हासी डोळे निस्तेज बनले होते आणि त्याच्या वाकड्या तोंडाच्या कोपऱ्यांशी अश्रूंनी भिजलेल्या त्याच्या मिशा शोकाकुलपणे खाली झुकल्या होत्या. मला तो महत्त्वपूर्ण म्हातारा तुर्क दिसला; बहुधा तो दैववादी आणि जुलमी होता व त्याच्या शेजारी त्याचा मुलगा होता—चुंबनांमार्फत विषबाधा झालेल्या प्राचीच्या फिकट नाजुक फुलासारखा. आणि तो अहंकारी पोलीश माणूस, सभ्य व क्रूर, संभाषणचतुर आणि थंड... ते सगळे आता केवळ फिकट सावल्या बनले होते आणि त्यांनी जिची चुंबने घेतली होती, ती माझ्या-शेजारी जिवंत बसली होती; पण काळाने ती वाळून गेली होती, मांस-हीन व रक्तहीन बनली होती, तिच्या काळजात इच्छा नव्हत्या, डोळ्यात चमक नव्हती. तिचीसुद्धा निव्वळ सावलीच उरली होती.

ती पुढे बोलू लागली:

"पोलंडमध्ये राहणं मला अवघड झालं. तिथं थंड काळजाची

आणि खोटी माणसं राहतात. त्यांची सापासारखी भाषा मला येत नव्हती. सगळे फुसफुसायचे... काय फुसफुसायचे? ते लोक खोटे आहेत म्हणून देवानं त्यांना तसली सापांची भाषा दिली. तेव्हा मी तिथून निघाले, कुठं जायचं मला माहीत नव्हतं आणि मी पाहिलं – तुमच्याशी, रशियनांशी बंड करायला ते एकवटत होते. बोखनिया शहरापर्यंत मी पोहोचले. एका यहुद्यानं मला विकत घेतलं. स्वतःसाठी नव्हे, तर माझा व्यापार करायला. मी त्याला कबूल झाले. जगायचं असेल तर काहीतरी केलं पाहिजे. मला दुसरं काहीच कसब अवगत नव्हतं, म्हणून माझ्या देहाचा मोबदला द्यायची. पण मनाशी मी ठरवलं होतं की, माझ्या बिर्लादवरच्या मूळ गावाला परतण्यापुरते पैसे जर मी जमवू शकले, तर ह्या बंधनाच्या साखळ्या मी तोडीन – कितीही भक्कम असल्या तरी! आणि मी तिथं राहू लागले. माझ्याकडं श्रीमंत पोलीश माणसं यायची, मेजवान्या करायची. त्यांना ह्यासाठी फार खर्च करावा लागे. माझ्यासाठी ते आपापसात भांडायचे, त्यातच त्यांचा सर्वनाश व्हायचा. एकानं माझी मर्जी संपादन करायचा खूप काळ प्रयत्न केला आणि शेवटी त्यानं असं केलं: तो आला आणि त्याच्यामागून त्याचा नोकर पाठीवर पोतं घेऊन आला. त्या पोलीश श्रीमंतानं पोतं माझ्या डोक्यावर मोकळं केलं: माझ्या डोक्यावर सोनेरी नाण्यांचा पाऊस पडला. नाणी फरशीवर पडताना खणखणत होती तेव्हा तो आवाज ऐकायला मला खूप मजा वाटली. पण तरीही त्या माणसाला मी हाकलून दिलं. त्याचा चेहरा फार लठ्ठ, तेलकट होता आणि पोट म्हणजे जणू भलीमोठी उशी. भरपूर चरलेल्या डुकरासारखा तो दिसायचा. माझ्यावर सोन्याची उधळण करता यावी म्हणून त्यानं स्वतःची जमीन, घर, घोडे विकले होते असं जरी त्यानं मला सांगितलं, तरी मी त्याला हाकलून लावलं. तेव्हा चेहऱ्यावर जखमांचे वण असलेल्या एका लायक माणसाच्या प्रेमात मी पडले होते. तुर्कांच्या तलवारींच्या वेड्यावाकड्या घावांच्या खुणांनी त्याचा सबंध चेहरा भरला होता. ग्रीकांसाठी नुकताच तो तुर्कांविरुद्ध लढून आला होता. हा खरा माणूस!.. जर तो स्वतः पोलीश होता, तर ग्रीकांची त्याला कशाला काळजी? पण तरीही तो ग्रीकांबरोबर गेला आणि त्यांच्या शत्रूंविरुद्ध लढला. तुर्कांनी क्रूरपणे त्याच्यावर घाव घातले,

लढाईत त्याचा एक डोळा गेला, डाव्या हाताची दोन बोटं तुटली... जर तो स्वतः पोलीश होता, तर ग्रीकांची त्याला कशाला काळजी? त्याचं कारण: त्याला पराक्रम आवडायचे. जेव्हा माणसाला पराक्रम आवडतात, तेव्हा ते कसे गाजवायचे त्याला नेहमी समजतं आणि कुठं करायचे हे तो शोधून काढतो. आयुष्यात पराक्रमांना नेहमीच वाव असतो. ज्यांना पराक्रमाला जागा सापडत नाही, ते केवळ आळशी असतात अथवा भित्रे असतात, किंवा त्यांना आयुष्य समजत नाही. कारण जर माणसांना आयुष्य समजलं असतं, तर प्रत्येकानं स्वतःनंतर त्या आयुष्यात स्वतःची छाया ठेवण्याची इच्छा बाळगली असती. मग आयुष्यानं माणसांना खुणा मागं न ठेवता फस्त केलं नसतं... तर हा घाव खाल्लेल्या चेहऱ्याचा माणूस छान होता! काहीतरी चांगलं कृत्य करायला जगाच्या दुसऱ्या टोकापर्यंत जायची त्याची सज्जता होती. बहुधा, बंडाळीत तुमच्या लोकांनी त्याला ठार मारलं. मादचारांशी लढायला कशाला गेलात तुम्ही! बरं-बरं, चूप रहा!"

आणि चूप राहण्याची मला ताकीद देऊन म्हातारी इझेरगिल अचानक स्वतःच चूप झाली, विचारात गढली.

"एक मादचारही माझ्या ओळखीचा होता. एकदा तो मला सोडून गेला – हिवाळ्याचे दिवस होते – आणि फक्त वसंतात जेव्हा बर्फ वितळलं, तेव्हा तो मैदानात सापडला. त्याच्या मस्तकावर गोळीची खूण होती. तर असं आहे! पाहिलंस – प्लेगनं जेवढी माणसं मरतात, तेवढीच प्रेमामुळं मरतात. मोजणी केली तर दोन्हींची संख्या सारखीच भरेल... काय सांगत होते मी? पोलंडबद्दल... होय, माझी शेवटची खेळी मी तिथं खेळले. एका अत्यंत देखण्या पुरुषाशी माझी भेट झाली. अगदी सैतानासारखा सुरेख होता! एव्हाना मी म्हातारी झाले होते. पार म्हातारी! चाळीस वर्षं झाली होती का मला? मला वाटतं, नक्कीच झाली होती... तो अजून गर्विष्ठ होता, बायकांनी लाडावून ठेवलेला होता. मला तो फार महागात पडला... होय. मला ताबडतोब वश करायची त्याची इच्छा होती, पण मी सहजी त्याच्या कह्यात गेले नाही. मी कधी कुणाची गुलाम बनले नव्हते. एव्हाना यहुद्याशी माझा करार संपला होता... मी त्याला खूप पैसे दिले... आता मी क्राकोवमध्ये रहात

होते. तेव्हा माझ्यापाशी सर्व होतं: घोडे, सोनं, नोकर... तो गर्विष्ठ राक्षस माझ्याकडं यायचा आणि मी स्वतःच त्याच्या मिठीत केव्हा पडते ह्याची वाट पहायचा. आम्हा दोघांची जणू पैज लागली होती... मला आठवतं, त्यापायी मी शिणले होते. खूप काळपर्यंत हा मामला ताणला गेला... मी जिंकले. त्यानं माझ्यासमोर गुडघे टेकले... पण माझी त्याला प्राप्ती होताच त्यानं मला टाकलं. तेव्हा मला कळलं की, मी म्हातारी झाले होते... हाय, ही जाणीव अर्थातच कडवट होती! फार कडू!.. कारण त्या सैतानावर मी प्रेम केलं होतं... आणि तो माझ्याशी भेट घडली म्हणजे हसायचा... पशू होता! दुसऱ्यांपाशीही माझी टिंगल करायचा, मला माहीत होतं. फार फार दुःख सोसलं मी! पण तो त्याच शहरात जवळ रहात होता आणि एवढं सगळं दुःख सोसूनही मी त्याची आराधना करीत होते. जेव्हा तो तुमच्याशी, रशियनांशी, लढायला गेला, तेव्हा माझी स्थिती अति वाईट झाली. मी स्वतःवर ताबा मिळवायचा प्रयत्न केला, पण जमेना... त्याच्या पाठी जाण्याचा निर्णय घेतला. वॉर्सापाशी जंगलात तो होता.

"पण तिथं पोहोचले तेव्हा समजलं की, एव्हाना तुम्ही त्यांचा पराभव केला होता... आणि जवळच्याच एका खेड्यात तो कैदी म्हणून रहात होता.

"म्हणजे – मी विचार केला – इतःपर तो मला भेटणार नाही! पण त्याला भेटायची तर खूप इच्छा होती. भेटण्याची खटपट सुरू केली... मी लंगड्या भिकारणीचं सोंग घेतलं, तोंडावर फडकं गुंडाळलं आणि तो जिथं होता त्या खेड्याकडं निघाले. सगळीकडं कझाक आणि सैनिक... तिथं राहणं मला महागात पडलं! पोलीश कैद्यांना कुठं ठेवलं होतं ते माहीत करून घेतलं, पण तिथं पोहोचणं अवघड होतं असं दिसलं. पण तिथं तर मला जायचंच होतं. तर रात्रीच्या वेळी सरपटत, लपत मी त्यांच्यापर्यंत गेले. भाजीच्या वाफ्यांमधून मी सरपटत जात होते, तेवढ्यात समोरच पहारेकरी आडवा आला... एव्हाना पोलीशांची गाणी आणि मोठमोठ्यानं चाललेली बडबड मला ऐकू येत होती. मेरी मातेबद्दलचं गाणं गात होते... माझा आर्कादेकही त्यांच्याबरोबर गात होता. मनात विचार येताच वाईट वाटलं की, पूर्वी पुरुष

माझ्यामागं सरपटत यायचे... आणि आता अशी वेळ आलीय... मी पुरुषापाठी सापासारखी सरपटत चाललेय, कदाचित माझ्या मरणाकडं सरपटत जात होते. दरम्यान पहारेकऱ्याला माझी चाहूल लागली होती आणि कान टवकारून तो पुढं सरसावला होता. आता मी काय करणार? मी उठून उभी राहिले आणि त्याच्यापाशी गेले. माझ्यापाशी सुरासुद्धा नव्हता, फक्त हात आणि जीभ. बरोबर सुरा न घेतल्याचा पश्चात्ताप होत होता. मी पुटपुटले: 'थांब!' पण त्या सैनिकानं एव्हाना माझ्या गळ्याशी संगिनीचं टोक टेकवलं होतं. मी त्याला दबत्या आवाजात म्हणाले: 'जरा थांब, जर तुला काळीज असेल तर माझं बोलणं ऐक! तुला देण्यासारखं माझ्यापाशी काहीही नाही, पण तुझी विनवणी करते...' त्यानं बंदूक खाली केली आणि तसाच दबत्या आवाजात तो मला म्हणाला: 'चालती हो, म्हातारे! जा इथून! काय काम तुझं इथं?' मी त्याला म्हणाले की, माझा मुलगा तिथं कैदी आहे... 'सैनिका, तुला समजतं, —मुलगा! तूसुद्धा कुणाचातरी मुलगा आहेस ना? तर माझ्याकडं पहा— तुझ्यासारखाच मलाही एक मुलगा आहे आणि तो तिथं आहे! एकदा बघू दे त्याला... कदाचित लौकरच तो मरेल... किंवा कदाचित उद्या तुला कुणी ठार मारील... तुझी आई तुझ्यासाठी रडेल ना? आणि तुझ्या आईला शेवटच्या वेळी न पाहता मरायला तुला त्रास होणार नाही? माझ्या मुलालाही त्रास होईल. स्वत:ची आणि त्याची दया कर आणि माझीही—एका आईची!..'

"किती वेळपर्यंत मी त्याची मनधरणी केली! पाऊस कोसळायला लागला आणि आम्ही ओलेचिंब भिजलो. वारा घोंघावत होता, मला पुढून-मागून झोंबत होता. त्या दगडी काळजाच्या सैनिकासमोर मी हेल-कावत उभी होते... पण त्याचे एकच उत्तर: 'नाही!' आणि दरवेळी त्याचे हे थंड शब्द ऐकताच माझ्या आर्कादिकला भेटण्याची इच्छा माझ्या मनात अधिक जोरानं उफाळून येत होती... मी बोलता बोलता त्या सैनिकाचा अदमास घेत होते—तो बुटका होता, हडकुळा होता व सारखा खोकत होता. मी एकदम जमिनीवर त्याच्यासमोर लोटांगण घातलं आणि अजूनही त्याची विनवणी करीत असताना त्याचे गुडघे पकडून त्याला जमिनीवर पाडलं. तो चिखलात कोसळला. मी पटकन त्याचा

चेहरा जमिनीकडं वळवला आणि त्यानं ओरडू नये म्हणून पाण्याच्या डबक्यात दाबला. तो ओरडला नाही, पण स्वतःच्या पाठीवरून मला फेकून देण्यासाठी धडपडत राहिला. मी दोन्ही हातांनी त्याचं डोकं चिखलात आणखी खोल दाबलं. तो घुसमटला... तेव्हा पोलीश जिथं गात होते त्या कोठाराकडं मी धाव घेतली. 'आर्कादेक!' भिंतीच्या फटीतून मी हळूच हाक मारली. ही पोलीश माणसं मोठी चलाख— माझी हाक ऐकूनही त्यांनी गाणं थांबवलं नाही! त्याचे डोळे माझ्या डोळ्यांना अचानक भिडले. 'इथून बाहेर पडू शकतोस?' 'होय, भिंतीखालून!' तो म्हणाला. 'तर मग लौकर बाहेर ये!' तर ते चौघे कोठाराखालून बाहेर पडले. माझा आर्कादेक आणि इतर तिघं. 'पहारेकरी कुठाय?' आर्कादेकनं विचारलं. 'तिथं पडलाय!' आणि जमिनीशी अगदी वाकून, दबत दबत ते निघाले. पाऊस कोसळतच होता, वारा घोंघावत होता. आम्ही खेड्यातून बाहेर पडलो व खूप वेळपर्यंत एकही शब्द न बोलता जंगलातून चालत राहिलो. आता भरभर चालत होतो. आर्कादेकनं माझा हात धरला होता. त्याचा हात गरम होता आणि थरथरत होता. जोवर तो गप्प होता, तोवर मला त्याच्याबरोबर चालायला फार छान वाटलं! हे अखेरचे क्षण होते—माझ्या सतत अतृप्त जीवनातले सुखाचे क्षण! आम्ही एका कुरणात बाहेर पडलो आणि थांबलो. त्या चौघांनीही माझे आभार मानले. खूप वेळपर्यंत ते माझ्याशी बरंच काही बोलले! मी सगळ्यांची बोलणी ऐकत होते, पण एकटक पहात होते माझ्या आर्कादेवकडं! आता तो माझ्याशी कसं वागणार? त्यानं मला मिठी मारली आणि काहीतरी मोठमोठे शब्द बोलला... काय बोलला ते आठवत नाही, पण त्यातून एवढाच अर्थ निघाला की, मी त्याची सुटका केली होती म्हणून उपकाराखातर माझ्यावर तो प्रेम करील... गुडघे टेकून तो माझ्यासमोर उभा राहिला आणि हसून म्हणाला: 'माझी राणी!' किती खोटारडा कुत्रा होता!.. मी त्याला लाथ मारली आणि त्याच्या थोबाडीत मारलं असतं, पण तेवढ्यात तो चटकन उठला आणि त्यानं बाजूला उडी मारली. भयानक आणि पांढऱ्या चेहऱ्यानं माझ्यासमोर तो उभा होता... बाकीचे तिघेही कपाळांना आठ्या घालून उभे होते. सगळे गप्प. मी त्यांच्याकडं पाहिलं...

आठवतं, तेव्हा मला फक्त खूप उदास वाटलं आणि एकदम कमालीचा थकवा आला... मी त्यांना म्हणाले: 'चालते व्हा!' ते कुत्रे मला विचारतात: 'तू तिकडं परत जाणार आणि आम्ही कुठल्या वाटेनं गेलो ते सांगणार?' कसले नालायक! पण अखेर निघून गेले. मग मीही निघाले... दुसऱ्या दिवशी तुमच्या लोकांनी मला पकडलं, पण लौकरच सोडून दिलं. तेव्हा माझ्या ध्यानात आलं की, आता मला घरटं बांधलं पाहिजे—पाखराचं स्वच्छंद जगणं पुरे झालं! शरीर बोजड झालं होतं, पंख दुबळे बनले होते, पिसं निस्तेज बनली होती... तेव्हा गालीत्सियाला मी गेले आणि तिथून दोब्रूजाला. आणि जवळजवळ तीस वर्षं इथं राहतेय. एक मोल्दावियन पुरुष माझा नवरा होता. वर्षापूर्वी तो वारला. आता मी एकटीच राहतेय... तशी एकटी नाही, त्यांच्याबरोबर!"

म्हातारीने समुद्राच्या दिशेने हात झटकला. तेथे सारे शांत होते. मधूनच एखादा तुटक, फसवा ध्वनी उमटायचा, पण तात्काळ विरून जायचा.

"माझ्यावर प्रेम करतात. मी त्यांना खूप वेगवेगळ्या गोष्टी सांगते. त्यांना त्याची गरज आहे. सगळीजणं अजून तरुण आहेत... मलाही त्यांच्याबरोबर छान वाटतं. त्यांच्याकडं बघताना मनात विचार येतो: 'एकेकाळी मीसुद्धा यांच्यासारखी होते... मात्र माझ्या काळात माणसामध्ये याहून जास्त ताकद आणि आग होती, त्यामुळं आयुष्य जास्त आनंदी आणि जास्त चांगलं होतं... होय!.."

ती गप्प झाली. तिच्याजवळ बसायला मला उदास वाटू लागले. डोके डोलवीत ती डुलकी काढत होती व हळू आवाजात काहीतरी पुटपुटत होती... कदाचित प्रार्थना म्हणत असावी.

पर्वतरांगेप्रमाणे खडबडीत कडांचा एक काळा, अवजड मेघ समुद्रामधून वर उठला. तो स्तेपकडे सरपटत निघाला. त्याच्या वरच्या शिखरांपासून काही पुंजके तुटले आणि मेघापुढे जाऊन त्यांनी तारे एकामागून एक विझविले. सागर खळखळत होता. जवळच्या द्राक्षवेलींमध्ये चुंबनांचे, कुजबुजीचे आणि सुस्काऱ्यांचे ध्वनी उमटत होते. दूर स्तेपमध्ये कुत्रा भुंकत होता... वातावरणात एक विचित्र दर्प भरला होता, तो नाकपुड्यांना झोंबत होता आणि मनोरज्जूंना ताणत होता. ढगांच्या

दाट सावल्या जमिनीवर पडल्या होत्या, त्या सरकत जाताना कधी फिकट तर कधी गडद बनत होत्या... चंद्राच्या जागी आता अस्पष्ट निळसर प्रकाश उरला होता, मधून मधून एखादा ढग त्याला संपूर्ण झाकून टाकत होता. स्तेपमध्ये दूरवर लुकलुकणारे छोटे निळे दिवे आता काळे व भयानक बनले होते, जणू त्यांच्यात काहीतरी भीतीप्रद गोष्ट लपली होती. काहीतरी शोधत माणसे जणू स्तेपवर भटकत होती आणि त्यांनी पेटवलेल्या काडचा वाऱ्याने चटकन विझून जात होत्या, त्याप्रमाणे ते दिवे निमिषार्धात पेटून विझत होते. ह्या अग्नीच्या विचित्र, निळ्या जिभा काहीतरी अद्भुत सूचित करीत होत्या.

"तुला ठिणग्या दिसतात?" इझेरगिलने मला विचारले.

"त्या, फिकट निळ्या?" स्तेपकडे बोट दाखवीत मी म्हणालो.

"फिकट निळ्या? होय, त्या... म्हणजे अजून तशाच उडताहेत! पण, मला आता त्या दिसत नाहीत. मला आता बऱ्याच गोष्टी दिसत नाहीत."

"कुठून आल्या ह्या ठिणग्या?" मी म्हातारीला विचारले.

ह्या ठिणग्यांचा पूर्वेतिहास याआधी मी ऐकला होता, पण म्हातारी इझेरगिल त्यांच्याबद्दल कोणती कथा सांगतेय, हे ऐकायची माझी इच्छा होती.

"दान्कोच्या जळत्या काळजामधून ह्या ठिणग्या उडताहेत. एकेकाळी जगात असं एक काळीज होतं, ज्याच्यातून आगीच्या ज्वाला पेटल्या... त्यातून ह्या ठिणग्या उडताहेत. ही कथा मी तुला सांगीन... हीसुद्धा खूप जुनी गोष्ट आहे... जुनं, सगळं जुनं! जुन्या काळी किती सुरेख गोष्टी होत्या, पाहिलंस?.. आता तसं काही नाही — ना कृत्यं, ना माणसं, ना तशा जुन्या कथा... असं का?.. सांग बघू! सांगू शकणार नाहीस... तुला काय माहीत आहे? तुम्हा तरुणांना काय माहीत आहे? ह्यॅ-ह्यॅ!.. जर भूतकाळाचा शोध घेतलात, तर सगळ्या कोडचांची उत्तरं मिळतील... पण तुम्ही शोधत नाही, म्हणून तुम्हाला कसं जगायचं माहीत नाही... आत्ता काय चाललंय मला दिसत नाही? सगळं दिसतं, माझे डोळे अधू बनले आहेत तरीसुद्धा! मला दिसतं की, माणसं जगत नाहीत, तर जगण्याची तयारी करण्यातच सगळं आयुष्य

घालवतात. आणि जेव्हा सगळा वेळ खर्च करून स्वतःचं सगळं गमावून बसतात, तेव्हा दैवाच्या नावानं रडायला लागतात. इथं दैवाचा काय संबंध? प्रत्येकजण स्वतःचं दैव आहे! आज सगळ्या प्रकारची माणसं मी पाहते, पण ताकदवान माणसं नाहीत! कुठं आहेत ती?.. आणि देखणी माणसं सतत कमी होत चाललीत."

ताकदवान आणि देखणी माणसे जीवनातून कुठे निघून गेली ह्याबद्दल विचार करण्यात म्हातारी गुंतली व जणू उत्तर शोधण्याच्या अपेक्षेने अंधाऱ्या स्तेपकडे टक लावून पाहू लागली.

तिच्या गोष्टीची वाट पहात मी गप्प बसून होतो, कारण तिला काही प्रश्न विचारला तर पुन्हा तिचे विचार दुसरीकडे वळतील अशी मला भीती वाटत होती.

आणि तिने कथन सुरू केले.

३

"फार फार पूर्वी माणसांची एक टोळी अशा जागी रहात होती, जिथं तीन बाजूंना निबिड जंगलं होती व चौथ्या दिशेला स्तेप होतं. ही माणसं आनंदी, सामर्थ्यवान आणि धैर्यवान होती. पण एकदा त्यांच्यावर संकट कोसळलं: कुठूनतरी दुसरी टोळी आली आणि पूर्वीच्या ह्या टोळीला तिनं जंगलात ढकललं. ते जंगल खूप जुनाट असल्यामुळं त्याच्या आत दलदल आणि अंधार होता. तिथल्या झाडांच्या फांद्या अत्यंत दाट असल्यामुळं डोक्यावरचं आकाश मुळीच दिसत नव्हतं आणि पानांच्या दाटीतून खाली दलदलीपर्यंत वाट काढणं सूर्याच्या किरणांना अशक्य व्हायचं. पण जेव्हा सूर्यकिरणं दलदलीतल्या पाण्यावर पडायची, तेव्हा त्या पाण्यातून विषारी वायू बाहेर निघू लागत व माणसं एकापाठोपाठ एक पटापट मरत. त्या टोळीतील बायका व मुलं रडू लागली, पुरुष विचारात पडले आणि कष्टी बनले. त्या जंगलातून बाहेर पडणं आवश्यक होतं व त्यासाठी दोनच मार्ग मोकळे होते: एक – पाठीमागं जायचा – तिथं ताकदवान आणि दुष्ट शत्रू होते; दुसरा – पुढचा – तिथं महाप्रचंड वृक्ष उभे होते, ज्यांच्या मोठमोठ्या फांद्यांनी एकमेकींना

विळखे घातले होते आणि ज्यांची गाठाळ मुळं दलदलीच्या रेंदाळात खूप खूप खोल गेली होती. ही दगडासारखी झाडं दिवसाच्या भुरकट अंधारात गप्प आणि स्तब्ध उभी रहात व संध्याकाळी शेकोटचा पेटल्या म्हणजे माणसांभोवती त्यांचा आणखीच घट्ट विळखा पडल्यासारखा भासे. दिवसा व रात्री सतत त्या माणसांभोवती अंधाराचा वेढा पडलेला होता. त्यांना तो अंधार चिरडायला निघालाय असं वाटायचं. पण त्या लोकांना तर स्तेपच्या मोकळ्या वातावरणाची सवय होती. जेव्हा झाडांच्या शेंड्यांना वारा झोडपून काढायचा आणि सबंध जंगल घूं घूं घुमू लागायचं, तिथं राहणाऱ्या माणसांचं मरणगीत गाऊ लागायचं, तेव्हा आणखीच भेसूर वाटायचं. ही माणसं तशी ताकदवान होती आणि त्यांचा ज्यांनी एकदा पराभव केला होता, त्यांच्याशी मरणाची झुंज घ्यायला ती जाऊ शकली असती, पण त्यांना लढाईत पूर्ण नाश पावणं शक्य नव्हतं, कारण त्यांच्या पूर्वजांच्या आदेशांचं त्यांना रक्षण करायचं होतं आणि जर ती मेली असती, तर त्यांच्याबरोबरच आदेशसुद्धा नष्ट झाले असते. म्हणूनच, भोवती विषारी वायू उमटत असताना आणि जंगल शोकगीत गात असताना, प्रदीर्घ रात्रीच्या वेळांना बसून ती माणसं विचार करीत होती. ती बसून रहात आणि शेकोटीच्या सावल्या त्यांच्याभोवती थयाथया नाचत. असं भासायचं की त्या सावल्या नाचत नव्हत्या, तर जंगलातली आणि दलदलीमधली दुष्ट पिशाचं उत्सव साजरा करीत होती... माणसं सारखी बसून विचार करीत होती. पण माणसांच्या देहाला व मनाला काम आणि बायकासुद्धा जेवढा थकवा आणत नाहीत, तेवढा थकवा दुःखी विचार आणतात. विचारांच्या अतिरेकापायी माणसं दुबळी बनली... त्यांच्या मनात भीती जन्मली, तिनं त्यांचे बळकट हात बांधून टाकले. विषारी वायूमुळं मेलेल्यांच्या प्रेतांवर पडून शोक करणाऱ्या आणि भीतीनं असहाय बनलेल्या जिवंत माणसांच्या भवितव्याबाबत टाहो फोडणाऱ्या बायकांच्या रडण्यांपायी त्यांच्या मनात धास्ती जन्मली. जंगलात भित्रे शब्द ऐकू यायला लागले -- प्रथम बिचकत आणि हळू आवाजात, मग अधिकाधिक मोठ्यांदा... शत्रूकडं जाऊन स्वतःच्या स्वातंत्र्याचं दान देण्याचा त्यांचा इरादा बनू लागला आणि मृत्यूच्या भीतीपायी आता कुणीही गुलामी जिण्याला घाबरेनासा झाला होता... पण

तेवढ्यात दान्को अवतरला आणि त्यानं सर्वांना वाचवलं."

म्हातारीने दान्कोच्या जळत्या काळजाची कथा अनेकदा सांगितली असणार. तिच्या घोगऱ्या, कडकडच्या आवाजात जेव्हा ती निवेदन करीत होती, तेव्हा ज्याच्या गाभाऱ्यात ती कमनशिबी निर्वासित माणसं विषारी वायूंमुळे मरत होती, त्या जंगलाचे भयाण ध्वनी मला स्पष्ट ऐकू येत होते...

"दान्को हा त्या माणसांपैकी एकजण होता, तरुण आणि देखणा. देखणी माणसं नेहमी धीट असतात. तर तो त्याच्या साथीदारांना म्हणाला:

"'नुसत्या विचारांनी वाटेवरचे दगड बाजूला ढकलता येत नाहीत. जो काहीही करत नाही, त्याच्या हातून काहीही निष्पन्न होणार नाही. कशासाठी आपण विचार करण्यात आणि दु:ख करण्यात आपली ताकद खर्चायची? उठा, जंगलातून चालत जाऊन त्याचं दुसरं टोक गाठू; त्याची अखेर कुठंतरी असेलच ना! जगात प्रत्येक गोष्टीची अखेर आहे. चला! चला पुढं!..'

"सगळ्यांनी त्याच्याकडं पाहिलं आणि तो त्यांच्यात सर्वात उत्तम पुरुष आहे असं त्यांना आढळलं, कारण त्याच्या डोळ्यांमध्ये खूप बळ आणि जिवंतपणा चमकत होता.

"'आमचा तू म्होरक्या हो!' माणसं म्हणाली.

"तेव्हा त्यानं त्यांचं म्होरकेपण केलं..."

काळोख जास्त जास्त दाटत चाललेल्या स्तेपकडे टक लावून पहात म्हातारी गप्प बसली. क्षणभरच फुलणाऱ्या हलक्या फिकट निळ्या फुलांप्रमाणे दान्कोच्या जळत्या काळजातील ठिणग्या दूर अंतरावर उडत होत्या.

"तर दान्को त्यांना घेऊन निघाला. सगळे त्याच्या मागोमाग स्वेच्छेनं जात होते, कारण त्यांचा त्याच्यावर विश्वास होता. रस्ता अवघड होता. अंधार होता, दर पावलागणिक लोकांना गिळून टाकणारे दलदलीचे खड्डे होते व प्रचंड भिंतीप्रमाणं झाडं वाट अडवून उभी होती. त्यांच्या फांद्यांनी एकमेकींना घट्ट विळखे घातलेले होते, त्यांची मुळं सापांप्रमाणं सर्वत्र पसरली होती, त्या माणसांना दर पावलागणिक घाम

आणि रक्त सांडावं लागत होतं. खूप काळपर्यंत ते लोक पुढं जात होते. जेवढं पुढं जावं, तेवढं जंगल जास्त दाट बनत होतं आणि त्यांचे हातपाय अधिक दुबळे बनत होते. त्यांनी दान्कोबद्दल कुरकुर सुरू केली; तो तरुण आणि अननुभवी आहे, त्यांना भलत्याच ठिकाणी घेऊन आला आहे, असं ते म्हणू लागले. पण तो त्या सर्वांच्या पुढं नेटानं जात राहिला, त्याचं मन मुळीच खचलं नव्हतं.

"मात्र एक दिवस जंगलात वादळ झालं, झाडांची भयानक कुजबुज सुरू झाली. क्षणात घनदाट अंधार पडला, जणू जंगलाच्या जन्मापासूनच्या सर्व रात्री एकवटल्या होत्या. वादळाच्या गर्जनांमध्ये ती छोटी माणसं मोठ्या झाडांखालून चालत जात होती, प्रचंड वृक्ष करकरत होते आणि अशुभ गाणं गात होते, झाडांच्या शेंड्यांवर विजा चमकत होत्या व सबंध जंगलावर निमिषमात्र निळसर प्रकाश टाकत होत्या, लोकांच्या मनात धडकी भरवत होत्या. विजांच्या चमचमाटांमध्ये झाडं जिवंत भासत होती, आपले गाठाळ लांब हात पसरवून जणू जाळं बनवत होती आणि अंधारापासून पळू पाहणाऱ्या त्या माणसांना पकडू पहात होती. काळोख्या पानांमधून त्या माणसांकडं कुणीतरी थंड, भेदक नजरेनं रोखून पहात होतं. ती वाट खूप अवघड होती व तिच्यावरून जाणारी माणसं दमली होती, मनानं खचली होती. पण स्वतःच्या दुबळेपणाची कबुली द्यायची त्यांना लाज वाटत होती, म्हणून त्यांच्या पुढं चालणाऱ्या दान्कोवर ती आपला सर्व राग काढत होती. त्यांचं नेतृत्व करायला तो नालायक आहे, असा आरोप ती माणसं दान्कोवर करू लागली.

"ती माणसं थांबली. त्या थरथरत्या अंधारात, वादळाच्या दिग्विजयी गर्जनांमध्ये ती चिडलेली व थकलेली माणसं दान्कोचा न्यायनिवाडा करू लागली.

"'तू आमच्या दृष्टीनं नीच आणि तापदायक माणूस आहेस!' ती माणसं त्याला म्हणाली. 'तू आम्हाला इथवर आणून दमवलंस, त्याबद्दल आता तू मरशील!'

"'तुम्ही म्हणालात, आम्हाला घेऊन चल! म्हणून मी घेऊन आलो!' त्यांच्यासमोर छाती काढून दान्को ओरडला. 'म्होरकेपण करण्याची हिंमत माझ्यात आहे, म्हणून मी तुमचं म्होरकेपण केलं! पण

तुम्ही ? स्वतःच्या मदतीसाठी तुम्ही काय केलंत ? तुम्ही नुसते चालत राहिलात, लांबच्या वाटचालीसाठी ताकद राखायची अक्कल ठेवली नाहीत ! तुम्ही नुसते चालत राहिलात, मेंढ्यांच्या कळपाप्रमाणं !'

"ह्या शब्दांमुळं त्या माणसांचा संताप आणखीच वाढला.

"'तू मरशील ! तू मरशील !' ती किंचाळली.

"जंगल गर्जत होतं, त्यांच्या आरोळ्यांचे पडसाद उमटवत होतं, विजा अंधाराच्या चिंध्या करत होत्या. ज्यांच्यासाठी दान्कोनं एवढे प्रचंड श्रम घेतले होते, त्या माणसांकडं दान्कोनं नजर टाकली... ती माणसं जंगली पशूंप्रमाणं दिसत होती. अनेक माणसं त्याच्याभोवती उभी होती, पण त्यांच्या चेहऱ्यांवर मानवतेच्या खुणा अजिबात नव्हत्या व त्यांच्याकडून कोणत्याही दयेची अपेक्षा करण्यात अर्थ नव्हता हे त्याला समजून चुकलं. त्याच्या काळजात तिटकारा उसळून आला, पण लोकांबद्दलच्या करुणेनं तो शांत झाला. त्या माणसांवर त्याचं प्रेम होतं आणि त्याच्याविना ती नाश पावतील अशी त्याला भीती वाटत होती. त्यांना वाचविण्याच्या व सुगम वाटेवर नेण्याच्या महान इच्छेच्या ज्वाला त्याच्या अंतःकरणात पेटल्या, त्या प्रचंड ज्वालांचं त्याच्या डोळ्यांमध्ये प्रतिबिंब पडलं... तो संतापला अशी लोकांची समजूत झाली. म्हणून त्याचे डोळे असे चमकत होते, असं त्यांना वाटलं. लांडग्यांप्रमाणं ते सावध बनले, कोणत्याही क्षणी तो त्यांच्यावर तुटून पडेल अशा अपेक्षेनं ते सावध बनले आणि त्याला पकडून ठार मारण्याच्या इराद्यानं त्यांनी त्याच्याभोवतीचं कोंडाळं अधिक घट्ट आवळलं. लोकांच्या मनातील विचार दान्कोला समजले, पण त्याच्या काळजातील ज्वाला जास्तच भडकून उठल्या, कारण त्यांच्या विचारांपायी त्याला झालेल्या दुःखाचं तेल त्याच्या इच्छांच्या ज्वालांमध्ये पडलं होतं.

"जंगलाचं शोकगीत चालूच होतं, विजा कडाडत होत्या, पाऊस कोसळत होता...

"'ह्या माणसांसाठी मी काय करू ?' मेघगर्जनेपेक्षा मोठ्या आवाजात दान्को ओरडला.

"अचानक त्यानं स्वतःची छाती फाडली, स्वतःचं काळीज तोडून बाहेर काढलं आणि डोक्यावरती धरलं.

"त्याचं काळीज सूर्याप्रमाणं चमकत होतं, सूर्यापेक्षाही जास्त तेजस्वी चमकत होतं आणि सबंध जंगल ह्या मशालीमुळं गप्प झालं व प्रकाशानं उजळलं, माणसांबद्दलच्या महान प्रेमातून पेटलेल्या त्या मशालीपुढं अंधारानं माघार घेतली व थरथरत तो जंगलातील खोल दलदलीत नाहीसा झाला. अतीव आश्चर्यापायी माणसं दगडासारखी निश्चल बनली.

"'चला!' दान्को ओरडला व रस्त्यावर प्रकाश टाकण्यासाठी स्वत:चं जळतं हृदय डोक्यावर धरून पुढं निघाला.

"मंत्रमुग्ध होऊन माणसं त्याच्या पाठीमागून निघाली. पुन्हा एकदा जंगल कुजबुजू लागलं, त्याच्या झाडांचे शेंडे नवलानं डोलू लागले. पण धावत्या पावलांच्या आवाजांमध्ये जंगलाची कुजबुज बुडून गेली. पेटत्या काळजाच्या अद्भुत देखाव्यानं भारलेली माणसं आता धीटपणं आणि वेगानं पुढं धावत होती. आत्तासुद्धा काही माणसं ठार झाली, पण मरताना त्यांच्या डोळ्यात पाणी नव्हतं आणि जिभेवर तक्रारी नव्हत्या. दान्को त्यांच्या पुढं पुढं जात होता, त्याचं हृदय जास्त जास्त तेजानं पेटत होतं.

"अचानक त्यांच्यासमोरचं जंगल दुभंगलं. त्या माणसांना वाट करून देण्यासाठी ते दुभंगलं आणि नंतर परत त्यांच्या पाठी जंगलाची मूक व अभेद्य भिंत उभी झाली. भरपूर सूर्यप्रकाशाच्या आणि पावसानं धुवून निघालेल्या वातावरणात दान्कोनं व त्याच्या अनुयायांनी प्रवेश केला. वादळ आता त्यांच्या पाठी जंगलात घुमत होतं, पण इथं सूर्य चमकत होता, स्तेप स्पंदत होतं, गवतावर पावसाच्या थेंबांचे हिरे चमकत होते, नदी सोनेरी चमचमत होती... संध्याकाळ झाली होती आणि मावळतीच्या किरणांमुळं नदी लाल भासत होती, दान्कोच्या छातीच्या जखमेमधून वाहणाऱ्या रक्तासारखी.

"शूर दान्कोनं असीम स्तेपवर नजर फिरवली, आपल्या स्वतंत्रभूमीवर आनंदाचा कटाक्ष टाकला व तो अभिमानानं हसला. मग खाली कोसळला आणि – मेला!

"आनंदानं आणि आशेनं उत्साहित बनलेल्या लोकांना दान्को मेल्याचं लक्षातसुद्धा आलं नाही, दान्कोच्या प्रेताशेजारी त्याचं शूर काळीज अजून पेटत असलेलं त्यांनी पाहिलं नाही. फक्त एका सावध माणसाच्या हे

ध्यानात आलं आणि अनामिक भीतीनं त्यानं ते पेटतं काळीज पायांखाली तुडवलं... त्या काळजातून ठिणग्यांचं कारंजं उसळलं आणि ते विझलं...

"म्हणून वादळाआधी स्तेपमध्ये ह्या फिकट निळया ठिणग्या उडताना दिसतात."

म्हातारीने ही सुंदर कथा सांगून संपविली तेव्हा स्तेप कमालीचे स्तब्ध बनले होते. स्वतःच्या माणसांसाठी आपले हृदय पेटविणाऱ्या आणि केल्या कृत्याबद्दल कोणत्याही बक्षिसाची अपेक्षा न धरता मरणाऱ्या शूर दान्कोपुढे ते स्तेप जणू नमले होते. म्हातारीला डुलकी लागली होती. तिच्याकडे पाहताना माझ्या मनात विचार आला: "तिच्या स्मरणात आणखी किती कथा आणि आठवणी असतील?" दान्कोच्या पेटत्या हृदयाबद्दल आणि अनेक सुंदर व स्फूर्तिदायक दंतकथा निर्माण करणाऱ्या मानवी कल्पनाशक्तीबद्दलही मी विचार करीत राहिलो.

एव्हाना गाढ झोपलेल्या म्हाताऱ्या इझेरगिलच्या सुकलेल्या छाती-वरील जीर्ण वस्त्रांना वाऱ्याने उडविले. मी तिच्या वृद्ध देहावर पांघरूण घातले आणि तिच्या शेजारीच जमिनीवर पहुडलो. स्तेप शांत आणि काळोखे होते. आकाशातून काळे मेघ संथपणे, कंटाळवाणे सरकत होते... सागराचा मंद, करुण ध्वनी येत होता.

१८९४

माननीय वाचक !

प्रस्तुत पुस्तकाबाबतची आपली मते आणि सूचना जाणून घेण्यास आम्हाला आनंद वाटेल.
रशियन आणि सोविएत साहित्याचे तुमच्या मातृ-भाषेतील अनुवाद आमच्या लोकांच्या संस्कृतीची व जीवनाची सखोल ओळख करून घेण्यास आपल्याला मदत करतील अशी आशा आहे.

आमचा पत्ता : 'रादुगा' प्रकाशन,
१७ झूबोवस्की बुलवार, मॉस्को ११९०२१,
सोविएत संघ.

'रादुगा' प्रकाशनमध्ये प्रकाशित होत आहे:

व्ला. मिखानोवस्की. दोन चेहरे. साहसकथा.

व्लादीमिर मिखानोवस्की मूळचे पदार्थ-वैज्ञानिक. साहित्यात त्यांनी कवी म्हणून पदार्पण केले. त्यांच्या कवितांची गाजलेली पुस्तके: 'मी प्रेम करतो', 'स्वीकार आम्हाला दूरच्या भूमी', 'पावले'.

प्रस्तुत संग्रहात लेखकाच्या सर्वोत्तम साहसकथा समाविष्ट आहेत: 'दोन चेहरे', 'इन्फोरीया', 'घोडचूक,' 'जांभळे फूल'.

१९८७ साली 'रादुगा' प्रकाशनमध्ये पुढील पुस्तके प्रकाशित करण्यात येत आहेत:

रशियन कथा भाग १

रशियन कथा भाग २

फ्यो. दस्तोयेवस्की 'श्वेतरात्री'

अ. पूष्कीन 'बेल्कीनच्या कथा'

व्ला. बोगोमोलोव 'इवान'

व्ला. मिखानोवस्की 'दोन चेहरे'

ता. मकारोवा 'शूर मुंगळा'

नि. रादलोव 'चित्रकथा'